इलियड भाग २ रा.

॥ श्री ॥

महाकविहोमरकृत

इलियडचें

कविताबद्ध मराठी भाषांतर.

भाग २ रा.

गणेश रामकृष्ण हवलदार, बी. ए. एल्. एल्. बी.
सुपरिन्टेन्डन्ट, हायकोर्ट, अपील शाखा, मुंबई,
यांनीं केलें.

सन १९१३—शके १८३५.

आवृत्ति १ ली.

समग्र ग्रंथ भाग १ व २ मिळून
किंमत २॥ रुपये.

Registered under Act XXV of 1867.

Printed by C. S. Deole, at the Bombay Vaibhav Press, Servants of India Society's Building, Sandhurst Road, Girgaum, Bombay.

and

Published by Ganesh Ramkrishna Havaldar, Angre's Wadi, Girgaum, Bombay.

सर्ग ८ वा.

ग्रीकांचे हाल.

सारांशः—जोव्ह सकल देवांची सभा भरवितो. कोणत्याच पक्षाला कोणत्याहि देवानें साहाय्य करतां कामा नये असें त्यांस निक्षून सांगतो. नंतर इदापर्वतावर जातो. तेथें दोघांच्या नियतीचें तोलन करून विजांचा लखलखाट व मेघांचा गडगडाट करून **ग्री**कांस भिववितो. **ने**स्तर संकटांत सांपडतो. **दायोमीद** त्याला साहाय्य करण्यास धांवतो. त्याचें व **हे**क्तराचें युद्ध होतें. **जो**व्ह पुन्हां गडगडाट करतो. **ग्री**क तटा आड जाऊन लपतात अगमेम्नन प्रार्थना करतो. शुभ लक्षणें दिसतांच **दायोमीद** व इतर कांहीं बाहेर पडतात. **त्यू**सर फार पराक्रम करतो. त्यास **हे**क्तर जखमी करतो **जू**नो व **मि**नर्वा मध्यें पडूं पहातांच **जो**व्ह त्यांस प्रतिबंध करतो. रात्रीं **हे**क्तर त्रायांत कांहीं तटबंदी करतो.

कालमानः—सत्तावीसावा दिवस चालू.

स्थलमानः—सुमुद्राकडील समराङ्गण.

इतक्यांत अरुणवसना प्रकटे जों ही प्रभात भूवरतीं ।
आलिंपसोच्चशिखरीं जोव्ह सभा भरवि देव जिस मिळती ॥ १ ॥
बोले तो विस्तारें परिसति तें एकचित्त सुर इतर ।
"परिसा मद्वचनातें देव अणी देवता तुह्मीं अमर ॥ २ ॥
अंतर्यामीं सुचवी मन्मन तें मी करीतसें उघड ।
अमरस्त्रीपुरुषांनीं मन्नियमाचा करूं नये बिघड ॥ ३ ॥
मान्य करा मद्वचना, मोडाया कलह बहु न मग काल ।
त्रायस्था ग्रीकां वा मदत करोनी न करुन घ्या हाल ॥ ४ ॥

जो देव, देवता जी, ग्रीकां वा ट्रोजनांस सहकारी ।
होइल, त्यातें तीतें दण्डिन, अक्षम्य दोष हा भारी ॥ ५ ॥
आलिम्पसावरोनी देइन तार्तारसांत ढकलून ।
खोल स्थल तें आहे धरणीच्या दूर उदरिं येथून ॥ ६ ॥
अतलस्पर्श असे तें; लोहाचा त्यास थोर दरवाजा ।
पितळेचा उंबरठा; अधिकचि ये उग्रता तया समजा ॥ ७ ॥
दूर स्थल तें आहे. परिमिति त्याची बघा कशी झाली ।
स्वर्गाहुन भू जितकी तितकें हेदीस सोडुनी खालीं ॥ ८ ॥
तेथें जाउन पडतां भोगोनी भोग कष्टमय नाना ।
तुह्मां कळेल मद्बल; कळतें सांगून जें न सकलांनां ॥ ९ ॥
परि अमरांनों अधिं या, घ्यावा प्रत्यक्ष आज अनुभव तो ।
स्वर्गातुन पहिल्यानें लोंबवुनी कनकशृंखला धरतों ॥ १० ॥
वळखिंबा तिस घ्याहो देव अणी सर्व देवता मिळुन ।
परि सुरशासक हलला स्वर्गातुन जोव्ह हें नये घडुन ! ॥ ११ ॥
शक्ति पराकाष्ठेची खर्चुन तुह्मांस शक्य हें नाहीं ।
परि शृंखला करांनीं धरणें ओढून सुलभ मज पाहीं ॥ १२ ॥
धरणी, सागर, सुर ह्यां उचलिन सर्वांस वरतिं सरसकट ।
आलिम्पसोच्चसानुस ठेविन बांधून शृंखला विकट ॥ १३ ॥
लम्बायमान सारे तुह्मीं मधल्यामधेंच राहाल ।
+ इतकें अंतर मी अणि सुरनर जे त्यांत हेंच समजाल ” ॥ १४ ॥

+ या दृष्टान्ताचा लाक्षणिक अर्थ बेकननें सुरेख लावून ठेविला आहे; तो असा कीं, या सृष्टींतील कार्यकारणशृंखलेच्या मूळाचा शोध लावतां लावतां असें दिसून येईल कीं सर्वांचें आदिकारण जोव्हच होय.

भाषण याचें परिसुन आलें मूकत्व काय सकलांतें ।
आश्चर्यचकित बसती; दहशथ भरली बरीच अमरांतें ॥ १५ ॥
तितक्यांत नीलनयना हळुच मिनर्वा वदे " अगा तात ! ।
राजाधिराज ! ठावें सुरनर तव बल अजिंक्य गातात ! ॥ १६ ॥
सॅतर्नजा ! परी या ग्रीकांची येतसे अह्मां करुणा ।
मरतात कीं बिचारे दैवाचें कोड पुरवितात ह्मणा ॥ १७ ॥
तरिही न रणीं मिसळूं आज्ञा केलीस तूं तशी जर ती ।
ग्रीकां उपदेश करूं ज्याचा उपयोग होय समयिं अती ॥ १८ ॥
रागावलास भारी ह्मणुन न जावोत फुकट ते मरुनी " ।
यावर घनवाहक तो बोलतसे जोव्ह अल्पसें हंसुनी ॥ १९ ॥
"धैर्य धरोनी हृदयीं स्वस्थ असावें त्रितोनिये तनये ! ।
पुरवीन कोड तव मीं मद्वच परिहासरहित मानुं नये" ॥ २० ॥
ऐसें वदुन रथा हय जोडितसे जोव्ह जावया दूर ।
आयाळ सुवर्णाची, पितळेचे ज्यांस शोभती खूर ॥ २१ ॥
शोभवि शरीर अपुलें बहुप्रकारें प्रशस्त हेमानें ।
कनककशा करिं घेई ज्याचि कळे घडण दिव्य अनुमानें ॥ २२ ॥
आरूढ रथीं होउन, करि तो अश्वांस मग कशाघात ।
नक्षत्रनिवहिं गगनीं धरणीवरुनी उडून ते जात ॥ २३ ॥
वन्य पशूंचें आगर, निर्झरयुत शोभतें इदाशिखर ।
गार्गेरस तेथें स्थळ मधुगन्धिस्थण्डिलें सुखवि नजर ॥ २४ ॥
परिवृत विविक्त जागीं सुरनरजनकें हयांस थांबविलें ।

सर्वभरी दाट धुकें पसरोनी सोडुनी तयांस दिलें ॥ २५ ॥
आरूढ इदाशिखरीं विभवानंदांत मग्न होऊन ।
पाहे ट्रोजन नगरी, ग्रीकांचा नौसमूहही वरुन ॥ २६ ॥
होते ग्रीक कुणी तों पटगृहिं बसुनी करीत उपहार ।
कोणी कवचांचा तो अंगावर घेत चढवुनी भार ॥ २७ ॥
ट्रोजन पुरिं इकडे तों करिती सन्नद्ध सकल निज काया ।
संख्या कमी तयांची, उत्सुक परि ते रणाङ्गणिं लढाया ॥ २८ ॥
पडलें भाग तयांला कान्ता पोरें हवींत राखाया ।
उघडुन नगरद्वारें लागे बाहेर सैन्य धांवाया ॥ २९ ॥
वीरांची मग गर्दी झालि, रथांची तशी पदातींची ।
एकस्थलिं उभय दलें जमतां घाई उडे लढाईची ॥ ३० ॥
ढालीवरतीं ढाली भाल्यांवर आदळोनियां भाले ।
कवचांचें भान सरुनि वीरांवर वीर पालथे झाले ॥ ३१ ॥
हत हन्ता आक्रोशा जयशब्दा करित एक समयाला ।
भूवरतीं पाट झणीं रुधिराचे लागले वहायाला ॥ ३२ ॥
माध्याह्न काल जोंवर, जोंवर पुण्यप्रकाश वर पसरे ।
तोंवर शस्त्रें चालुन उभय दलींचा न जीवनाश सरे ॥ ३३ ॥
लोकपिता जोव्ह तदा होत यदा गगनमध्यगत रवि तो ।
कनकतुला टांगोनी, नियतींचें तोल नीट करवी तो ॥ ३४ ॥
इकडे ट्रायस्थांची, ग्रीकांची नियति घालुनी तिकडे ।
तोली मध्यें धरुनी; ग्रीकांची नियति संशयीं न पडे ॥ ३५ ॥

विपुल धरित्रीवरतीं ग्रीकांची नियति जाउनी बसली ।
त्रायस्थांची परि ती विस्तृत गगनास चिकटण्या चढली ॥ ३६ ॥
बसुनी इदाप्रदेशीं मेघांची जोव्ह गर्जना करवी ।
सोडीत वीज जळती ग्रीकांवर आणि फार त्यां भिववी ॥ ३७ ॥
आजक्ष, इदामिनिअस, अगमेम्नन मार्सदास जे त्यांला ।
सकलां विवर्णता ये. धीर कुणा होत न च रहायाला ॥ ३८ ॥
ग्रीकाग्रेसर नेस्तर पळता परि लागलें रहायाला ।
हेलनपति पारिस तो ताडितसे त्याचिया प्रिय हयाला ॥ ३९ ॥
चूडा सजते जेथें मध्यें शिरिं तेथ तीव्र शर लागे ।
वर्मस्थल तेंच खरें सोसतना क्लेश हय सरे मागें ॥ ४० ॥
मेंदुंत शर रुततां, हय झाडूं पाहे शराग्र हिसडून ।
दुसरे तों हय बुजती. घाईनें वृद्ध येत धांवून ॥ ४१ ॥
तोडीत पार्श्वरश्मिस असिनें तों जवन हय हेक्तराचे ।
धीटपणें रथ आणिती ओढुनियां मधुन जनसमूहाचे ॥ ४२ ॥
जीवास वृद्ध मुकता ! दायोमीदा प्रसंग परि कळला ।
युलिसीसा गर्जोनी बाहे पळतां तयास जो दिसला ॥ ४३ ॥
" लाअर्टीसज ! कोठें पळसी हे नीतिकुशल ! जोव्हज रे ! ।
दाविशि पाठ अरिशीं ! पुसातिल जन 'कोण पळतसे भितरें' ?॥ ४४॥
एकादा कुणि तुजला भाला मारील मागुनी पळतां ।
वृद्धापाठीं लागे वीर तया परत लावुं थांब अतां " ॥ ४५ ॥
कंटक युलिसीस परी ऐकेना गांठि नौप्रदेशाला ।

धांवुन तैदिअसात्मज वीर पुढें एकला तरी सरला ॥ ४६ ॥
राहे उभा जिथें ते वृद्धाचे अश्व नेलिअसजाचे ।
बोले " हे वृद्ध! तुला बिकट स्थलिं तरुण वीर बहु जांचे ॥ ४७ ॥
शक्ति गळाली तव ती वार्धक्यें येतसे तुला थकवा ।
दमले सेवक ही तव, वारू ही भागुनी त्यजीत जवा ॥ ४८ ॥
ये बा रथांत माझ्या, त्रासाचे अश्व बघ तरी कसले ।
धरिती पाठ अरिची पळतां वळतात थांबतात भले ॥ ४९ ॥
चापल्याचे कारक हय हे मज जवळ ईनिआसाचे ।
सेवक तव हय बघतिल, नेऊं ह्यां त्रोजनांवरी साचे ॥ ५० ॥
समजेल हेक्तराला मत्करिं ही केविं पिसळतो भाला " ।
ऐसें तो वदला मग नेस्तर मानी तदीय वचनाला ॥ ५१ ॥
युरिमीदन सेवक हय सांभाळी स्थेनिलसहि अवधानें ।
दायोमीदरथावर चढले दोघे बहूत धीरानें ॥ ५२ ॥
नेस्तर रश्मि करीं घे, अश्वांतें चमकवी कशाघातें ।
हेक्तरसन्निध येतां तैदिअसज घे करांत भाल्यातें ॥ ५३ ॥
मारी घुसुनी पुढतीं, नेम चुके, सारथीस परि लागे ।
उरिं मध्यें क्षत झालें रश्मी पडती गळोनियां मागें ॥ ५४ ॥
थीबीअससुत जनिं हा ख्यात असे एनिओपिअसनावें ।
पडला रथावरोनी, आघातें सहज मग हय बुझावे ॥ ५५ ॥
तेथें जीव तयाचा शक्तीसह हा ! विरोनियां जाय ।
हेक्तर झाला कष्टी होतां सूता अकल्पित अपाय ॥ ५६ ॥

दुःखित अंतःकरणें सोडुन त्या तेथ सोधि सूत नवा ।
त्यास मिळे इफितससुत आर्चिप्तोलेमसाख्य जनिं ठावा ॥ ९७॥
अश्वांवर त्या बसवी, तेणें त्यांची न काळजी उरली ।
तत्करिं रश्मी देई. होती घन घोर वेळ खचित अली ॥ ९८ ॥
त्रोजन कालिं काठिण या जाते पुरिं कोंडले जणूं बकरीं ।
सुरनरजनका परि तें कळतां तो गर्जना बरीच करी ॥ ९९ ॥
दैदीप्यमान वेगें सोडी निज वज्र खालतें भुवरी ।
दायोमीदाच्या त्या अश्वांपुढतीं पडून धाक भरी ॥ ६० ॥
फार भयानक उठली तेथ प्रज्वलित गंधकज्वाला ।
दडती रथाश्व खालीं भरला बहु कंप अंगिं सर्वांला ॥ ६१ ॥
रश्मि गळाले करिंचे, नेस्तर मनिं घाबरोनियां वदला ।
"हे तैदिअसज ! ये अधिं पळ काढायास लाव हययुगला ॥ ६२ ॥
तुजला मिळावयाचा जय जोव्हाकडुन हें न मज दिसतें ।
सॅतर्नसुतें जोव्हें दिधलें यश हेक्तरास सत्याचि तें ॥ ६३ ॥
मनिं आल्या आह्मांही देइल मागून यश, परी ह्मणतों ।
जोव्हा प्रतिबंध करी ऐसा नर शक्तिमान कोणि न तो ॥ ६४ ॥
कां कीं तो सर्वांहुन सामर्थ्यें श्रेष्ठ विदित सर्वांस" ।
दायोमीद तयाला देई रणशूर उत्तर तयास ॥ ६५ ॥
वदलास पुरुषवृद्धा सत्य परी एक दुःख जीवास ।
सलतें हृदयीं हें कीं हेक्तर सांगेल त्या त्रोजनांस ॥ ६६ ॥
'जित तैदिअसज केला'; हेंच तयें गर्वगीत जर गावें ।

तर मग मजसाठीं या विपुलधरेनें अहा दुभंगावें !" ॥ ६७ ॥
त्यास जिरेनिअन तदा नेस्तर सरदार देत उत्तर तें ।
" हे तैदिअसज ! कैसें वदसी हे वीर वाक्य हें भलतें ॥ ६८ ॥
हेक्तर ह्मणेल भितरा तुजला तर त्यांत काय हांशील ।
त्रोजन नर अणि नारी यां जर जाऊन सत्य पुसशील ॥ ६९ ॥
ज्यांचे त्वां निधडे पति रणधूलीमाजि निजविले अणुन ।
त्या दृढहृदयत्रोजनकान्ता तद्वचन सत्य ह्मणातिल न ! " ॥ ७० ॥
ऐसें वदुनी वळवी दृढशफतुरगांस जनसमूहांत ।
त्रोजन अणि हेक्तर मग वर्षति शस्त्रांस उचलुनी हात ॥ ७१ ॥
नंतर हेक्तर बोले गर्जोनी " परिस तैदिअसजा हे !
ग्रीकांनीं तुरगप्रिय केला बहुमान रे तुझा आहे ! ॥ ७२ ॥
उच्चासन, मांसाशन, आणि सुरापान अर्पिलें ज्यांनीं ।
अवमानतिल तुला ते आचरसी स्त्रीसमान अवसानीं ! ॥ ७३ ॥
पळ ! जा ! भितऱ्ये पोरी ! बुरुजांवर आमुच्या न चढशील ।
मजला जिंकुन अमुच्या नारी नौकांत कधिं न हरशील ॥ ७४ ॥
पहिल्यानें करितों मी नाश तुझा थांबरे कसा पाहें ! " ।
विचरे तैदिअसज मनिं फिरवावे अश्व आजि लढाया हे ॥ ७५ ॥
ठरवी त्रिवार मनिं परि जोव्ह करी तीन वेळ मेघरवा ।
त्रायस्थांस खुणेनें सुचवी कीं विजय मार्ग होत नवा ॥ ७६ ॥
उच्चस्वरांत तेव्हां हेक्तर गर्जून बोलला त्यांतें ।
"दार्देनिअन ! त्रोजन ! लिसिअन ! विसरा न उद्धतबलातें ॥७७॥

वीरांसम वागा हो मित्रानों ! देत जोव्ह जय मजला ।
देउन यश अज मजला ग्रीकांचा तो करीत नाश भला ॥ ७८ ॥
निर्जीव निरुपयोगी बांधियल्या भिंतिंच्या कुणी रांगा ।
बालिश हो ! त्या कैशा करतिल मद्बलविरोध तें सांगा ॥ ७९ ॥
असुचे अश्व सहज हे उडुनी जातील खंद्का वरुनी ।
ठेवीन नौप्रदेशीं स्मृति करती खूण अग्निची करुनी ॥ ८० ॥
अग्निज्वालांनीं मीं करिन अधीं आरमार भस्म अणी ।
धूमांधितनयनां मी ग्रीकां मारुन दाखविन करणी ॥ ८१ ॥
ऐसें बोलुन नंतर इर्षा आणित हयांस धांवाया ।
त्यांस वदे "झान्थस तूं लांपस तूं जाग आजच्या समया ॥ ८२ ॥
पोदार्गस, ईथन हो ! बाळगिलें नीट सर्व काळ जिनें ।
मत्स्त्री ॲन्ड्रोमाकी जाणतसां जिस तिनेंच काळजिनें ॥ ८३ ॥
खाया यव गोड तुह्मां प्याया मदिरा न वेळ घालवितां ।
मानी पतिच्या देखत दिधली तुम्हांस आवडे कळतां ॥ ८४ ॥
आज त्वरा करा हो अरिची घ्या पाठ योग्य कारण कीं ।
ती ढाल नेस्तराची हरुं जीची कीर्ति पोंचली नाकीं ॥ ८५ ॥
सगळी सोन्याची ती सोन्याची मूठ ही सबंध तिला ।
दायोमीदाच्या मग कवचा हरुं व्हल्कनाचिया कृतिला ॥ ८६ ॥
हरतां हीं जर येतिल लपतिल हे ग्रीक नौप्रदेशांत " ।
परिसुन गर्वित वच हें जूनोतें क्षण न राहवे शांत ॥ ८७ ॥
सिंहासनिं तनु कांपवि; आलिम्पस कांपु लागला स्थानीं ।

नेप्चूनास वदे ती उघडपणें तीक्ष्ण मधुर शब्दांनीं ॥ ८८ ॥
" धिक् धिक् भूकंपक हे ! काय नसे हृदयिं तव दया माया ।
मरतात कीं बिचारे ग्रीक तुला वस्तु अर्पिती वायां ॥ ८९ ॥
ईलीसींत सदांचा अणि त्या ईजींत ठेविती क्रम हा ।
ह्मणुनी त्या लागीं तूं द्यायां मनिं आण समारिं कीर्ति महा ॥ ९० ॥
ग्रीकांचे मित्र अतां सारे आह्मीं मनांत जर घेऊं ।
त्रायस्थां हांकोनी जोव्हा बसवुन इदास्थलीं ठेऊं " ॥ ९१ ॥
नेप्चून नृपति रागें बोले " जूनो पिसाट तूं दिसशी ।
भलतें कां वदसी हें ! जोव्हाची शक्ति जाणशी न कशी? ॥९२॥
आह्मीं इतर सुरांनीं त्याशिं लढावें नसे पसंत मला" ।
ऐसें भाषण होई इकडे तों वीर सर्वही जमला ॥ ९३ ॥
उठली गर्दी एकचि अश्वहि गेले तिर्येत मिसळून ।
नौकांच्या बुरुजांच्या मधलें स्थल जातसे क्षणीं भरुन ॥ ९४ ॥
जोव्हें विजयी करतां प्रायमजें हेक्तरें मार्सचपलें ।
गर्दी केली ऐशी ह्मणुन असें दल सभोंवतीं जमलें ॥ ९५ ॥
अरिच्या नौका आतां देता तो सर्व पेटवुन खचित ।
अगमेम्ननहृदयीं जर जूनो उत्साह नाणती उचित ॥ ९६ ॥
ग्रीकां उत्तेजन दे धुंडाळी घेउनी स्वतां श्रम तो ।
त्यांतें शोधी पटगृहिं शोधी नौकांत कोणि जर दिसतो ॥ ९७ ॥
युलिसीसाची नौका मोठी बहु कृष्णवर्ण तीमाजी ।
मध्यें उभा, करानें फडकवि तो जांभळा झगा राजी ॥ ९८ ॥

शब्द तयाचा तेथुन जाइल ऐकावयास दोंहिकडे ।
आजक्षातें इकडे अकिलीसातें तसाच दुसरिकडे ॥ ९९ ॥
नौकांच्या रांगेला टोकें सजतात शेवटीं दोन ।
तेथें या दोघांनीं नौका निज ठेविल्या बहु जपोन ॥ १०० ॥
बाहुबलावर त्यांचा पूर्ण भरंवसा स्वविक्रमावरतीं ।
ग्रीकां संबोधुन करि अगमेम्नन वचन उच्चवर्ण अती ॥ १०१ ॥
" धिक् ! धिक् ! जीवित तुमचें लज्जास्पद एवढे कसे झालां ।
बोला ! ग्रीक सकल हो, नुसता आकार रुचिर काशाला ? १०२ ॥
' सर्वांत शूर आह्मीं ! ' गेली गर्वोक्ति ही कुठें सांगा ? ।
जें का लेम्नासपुरीं वदलां तें व्यर्थ ठरुन ये आंगा १०३ ॥
जल्पक हो व्यर्थ ठरे वदला तें वृषभमांस खातां जें ।
अथवा पेला भरुनी पीतांनां मद्य मधुर तें ताजें ॥ १०४ ॥
त्रोजन शंभर अथवा वेळेला दोनशें रणांगणिं ते ।
अमुच्यांतिल एकावर करति न सर ठरविलें असें गणितें ॥ १०५ ॥
परि सकलां त्यां आह्मां हेक्तर तो एकला अतां भारी ।
जाळिल अमुच्या नौका लवकर घालून आग परभारी ॥ १०६ ॥
हे तात ! जोव्ह सांगें ! आजवरी थोर थोर नृप झाले ।
छळिलेंस का कधीं त्या हरुनी यश, नाश करुन बहु हालें॥१०७॥
ह्मणतों मीं कधिं नाहीं नौकेमाजी बसून गर्वानें ।
स्थंडिल वलांडिलें तव छळिलें परि मजसिं उलट दैवानें ॥ १०८ ॥
वृषसक्थिमांस अर्पुन केलें मीं हवनही वृषवसेनें ।

आशा प्रतिस्थलीं कीं त्रायपुरीतें लुटीन हौसेनें ॥ १०९ ॥
हे जोव्ह ! राहुं दे तें देईं वर आज हा निदानींचा ।
धडपणिं घरिं जाऊं दे. ग्रीकांवर समय घोर हानीचा " ॥ ११० ॥
रडत्याची मग त्याची लोकपित्याला दया जरा वाटे ।
वर देत कीं सुरक्षित जाइल तव सैन्य आपुल्या वाटे ॥ १११ ॥
धाडी विहगश्रेष्ठा गरुडा भूतलिं अखंड शुभ शकुन ।
जो उतरे हरिणाच्या शिशुतें पञ्ज्यांत आपुल्या धरुन ॥ ११२ ॥
होते करीत कांहीं जोव्हातें ग्रीक जेथ बलिदान ।
तेथ स्थंडिल सुन्दर त्यावरि टाकीत मृगशिशु लहान ॥ ११३ ॥
जोव्हप्रहितविहंगम बघतां ते त्रोजनांवरी घुसले ।
सकलां ग्रीकां लागीं समरींचें स्फुरण बहुपरी चढलें ॥ ११४ ॥
' जवन हयां नेलें म्यां दायोमीदास टाकुनी मागें ' ।
गर्वोक्ति ही कराया इतर ग्रीकां अशक्य दिसुं लागे ॥ ११५ ॥
बाहेर खंदकाच्या अरितें हांकून करित हा समर ।
बलि पडला फाग्नज त्रोजन तो प्रथम शीर्ष कवचधर ॥ ११६ ॥
आजीलासाख्य असा फिरवी जों हय पळावयालागीं ।
दायोमीद तसा तों भाला बोंचीत सरळ पृष्ठांगीं ॥ ११७ ॥
अंसांतरास छेदुनि गेला तो ऊर भेदुनी पार ।
पडला वीर रथांतुनि शस्त्रांचा खणखणे वरी भार ॥ ११८ ॥
सरले एत्रिअसात्मज अगमेम्नन मेनिलास रणीं पुढतीं ।
उद्धत विक्रमयुत ते भावळ आजक्ष दोन मग घुसती ॥ ११९ ॥

येत इद्दामिनिअस मग संगें घेऊन मेरिआनीस ।
तो कवचवाह याचा जैसा नरहन्तृमार्स मदतीस ॥ १२० ॥
धांवे युरिपैलस मग एव्हीमनसुत सुजात शस्त्रधर ।
त्यूसर अधिज्यकार्मुक सरला राणें नवम वीर भीतिकर ॥ १२१ ॥
ढालीमागें राहे आजक्षाच्या उभा सुरक्षित तो ।
आजक्ष ढाल फिरवी तितक्यांमधिं नेम शत्रुवर धरतो ॥ १२२ ॥
गर्दींत बाण सोडी, शत्रु पडे एक मुकुन जीवास ।
त्यूसर मागें सरके मातेची धरुन मूल जणुं आस ॥ १२३ ॥
आश्रय आजक्षाचा धरितां तो वरतिं आड करि ढाल ।
त्यूसर ऐसे त्रोजन मारितसे कोण कोण जंजाल ? ॥ १२४ ॥
दीतर आर्मीनस ते, ओफीलेस्तीस आर्सिलोकस ते ।
लैकोफान्तीस तसा अणि आमोपाअन क्रोमिअस ते ॥ १२५ ॥
अष्टम मेलानिप्पस; एका मागून एक सर्व रणीं ।
निजवी विपुल धरेवर. अगमेम्नन नृवर वार्णी ही करणी ॥ १२६ ॥
त्रोजनसैन्यव्यूहा बळकट चढवून चाप तो नाशी ।
पाहुन हें त्या बोले नीट उभा राहुनी तयापाशीं ॥ १२७ ॥
" त्यूसर ! सैन्याधिप हे ! तेलामनतनय ! चालवीं क्रम हा ।
ग्रीकांत तूंच होशिल कुलदीपक करुन अचल विक्रम हा ॥ १२८ ॥
जनकें वाढविलें तुज तान्हयातें मंदिरांत काळाजिनें ।
होसी जरि दासीतें घालविला चौर्यरतिंत काळ जिनें ॥ १२९ ॥
दूर पिता तो तव परि केलेंसी प्रथित नाम पितयाचें ।

कथितों देइन तुज मी उचित असें पारितोषिक तयाचें ॥ १३० ॥
जोव्ह मिनर्वा जर तीं मजकडुनी लुटवतील इलियम रे ।
पुरवून हौस माझी देइन तुज शेष लूट कायम रे ॥ १३१ ॥
कनकाची ती तिवई, अथवा हययुगल तें रथासकट ।
चार्वंगी कीं ललना व्हाया आरूढ शयनिं तव निकट " ॥ १३२ ॥
त्यूसर निष्कपट वदे "बहु मान्या एत्रिअससुता मातें ! ।
कार्यरतातें लालुच नलगे इर्षा मनीं चढायातें ॥ १३३ ॥
जोंवर बल उरलें मज तोंवर केली कधीं न कुचराई ।
त्रोजन हांकुन दिधले परत तदा केलि फार चतुराई ॥ १३४ ॥
मर्दियले वीर कितिक शरसंधानांत चालवुन हात ।
मीं आठ पक्षधर शर रोंवियले तरुण वीर देहांत ॥ १३५ ॥
परि अज पिसाळलेला माझ्यानें मारवे न हा कुतरा " ।
ऐसें बोलुनियां तो सोडी शर हेक्तरावरी दुसरा ॥ १३६ ॥
मन उत्सुक त्या वधण्या, चुकला परि नेम लागला भलत्या ।
प्रायमसुत गार्जिथिअन शूर जगीं, वार होतसे उरिं त्या ॥ १३७ ॥
जननी याची लोकीं देवीसम कास्तिआनरा विलसे ।
जी ईसिमाहुनी ये रुचलें पितयास ही वरावि असें ॥ १३८ ॥
लोंबे अफीणिचा तरु, हिमसेकें विनत सुमनफलभारें ।
एकांगावर लोंबवि तेवीं जडकवचनमित शिर सारें ॥ १३९ ॥
त्यूसर वांकवुनी धनु सोडी शर हेक्तरावरी फिरुन ।
आशा शत्रुवधाची भंगतसे नेम सर्वही चुकुन ॥ १४० ॥

वेळींच अपालोनें दक्षपणानें निवारिला बाण ।
लागे मध्यावरतीं आर्चिप्तोलेमसास हा जाण ॥ १४१ ॥
युद्धास हेक्तराचा धांवे हा सूत शूर तोंच रणीं ।
पडला विद्ध रथांतुन फिरती हय जवन मागल्या चरणीं ॥ १४२ ॥
प्राण बलासह याचे गेले विरघळुन हें यदा कळलें ।
हेक्तरमन सदय तदा सूत गतप्राण ह्मणुन कळवळलें ॥ १४३ ॥
दुःखित अंतःकरणें सोडुन त्या घे दुजास मदतीस ।
सांभाळाया रश्मिस सज्ज करी त्वरित सेब्रिआनीस ॥ १४४ ॥
सूताचा भ्राता हा, मानी आज्ञा जशी अली कानीं ।
मारी उडी रथांतुनि हेक्तर गर्जोनि भयद शब्दांनीं ॥ १४५ ॥
बुद्धिप्रेरित अरिवरि धांवे उचलोन धोंड हस्तानें ।
*त्यूसर चापीं चढवी शरधींतिल बाण एक रागानें ॥ १४६ ॥
ग्रीवा उरा निराळी करितें कण्ठास्थि, तेथ अंसाशीं ।
खरखरित दगड लागे; या जागीं क्षत कठीण जीवाशीं ॥ १४७ ॥
चापल्योद्यत हेक्तर घुसला तों शत्रुवरतें धांवोनी ।
अरिधनुची ज्या तुटुनी मनगट पडलें लुलें दुखावोनी ॥ १४८ ॥
पडुनी जानूंवर तो सांवरतां धनु गळे करांतुनियां ।

---

* पोपकवीनें याचेंच वर्णन स्वभावोक्तिमूलक फार चांगलें केलें आहे.
आकर्ण वांकलें धनु झाला आरूढ शर जया वरतीं ।
तत्पक्षही पळाया फुरफुरतां गुदगुल्या गळीं करती ॥

पतितास बान्धवाला गेला आजक्ष परि न विसरुनियां ॥ १४९ ॥
त्या रक्षाया धांवे आड धरी ढाल आपुली जबरी ।
मेसिस्थ्यूस, अलास्तर दोघे सन्मित्र करिति मदत बरी ॥ १५० ॥
कण्हत्यास त्यास नेती उचलुनियां ज़वळ नौसमूहांत ।
जोव्हें त्रायस्थांतें देतां बल फिरुन उचलती हात ॥ १५१ ॥
ग्रीकां हांकुन देती थेट जिथें जलधि खोल फेणमय ।
उग्राकार रणाग्रीं हेक्तर तो क्रूर ओळखी समय ॥ १५२ ॥
तो सारमेय पकडी मागोनी चपलपद वराहातें ।
वळतां सावध राहुन हाणी वा पार्श्वभागिं सिंहातें ॥ १५३ ॥
तैसा हेक्तर राहे ग्रीकांच्या पार्श्वभागिं लागून ।
सर्वांत मागल्यातें पळतां टाकीत ठार मारून ॥ १५४ ॥
परि ते जेव्हां गेले खंदक उलटोन जों समुद्राशीं ।
त्रोजनहस्तां खालीं ग्रीकांच्या होत बहुत जित राशी॥ १५५ ॥
यां लागीं नौदेशीं अडकुनियां लागलें लढायाला ।
एक दुजा उत्तेजी, विनवुन देवांस बिकट समयाला ॥ १५६ ॥
हेक्तर गार्गनलोचन, अथवा जनहन्तृमार्सनयन ह्मणा ।
सुग्रीवकेशतुरगांकरवीं करवीत समरिं संभ्रमणा ॥ १५७ ॥
जूनो धवलकरा हें पाहुन अपुल्या मनांत कळवळली ।
तत्काल मिनर्वेच्या समुरी बोलावयास ती वळली ॥ १५८ ॥
“ ईजिसधर जोव्हसुते ! हा ! धिक् ! आह्मां न वाटतें कांहीं ।
अत्यन्त कठिण आला ग्रीकांवर मृत्युसमय गे पाहीं ॥ १५९ ॥

हेक्तर कोपा चढला करणें याची क्षमा न दिसत भलें ।
नियतीच्या दुर्गतिनें ग्रीकां नाशीत एकलाच बलें ॥ १६० ॥
आधींच नाश यानें केला बघ तो बहु प्रकारानें " ।
तिज वदत नीलनेत्रा परत मिनर्वा तशी विचारानें ॥ १६१ ॥
" निःसंशय या वीरा येतें गे मरण शक्तिपातानें ।
ग्रीकांच्या हस्तानें झाला असता विनाश पहिल्यानें ॥ १६२ ॥
काय करूं परि ताता ! झाला उन्माद चित्त नच ठायीं ।
करितो निष्फल माझ्या यत्नां हा बहुत दुष्ट अन्यायी ॥ १६३ ॥
केलीं त्याचीं कार्यें त्यांतिल गे एक ही न हा स्मरतो ।
तत्तनया रक्षियलें, अरिहस्तें वाटला तदा मरतो ॥ १६४ ॥
दीर्घ परिश्रम करुनी तत्तनया नाडिलें युरिस्थिअसें ।
केलें रोदन तेणें स्वर्गीं पोंचेल करुण वचन असें ॥ १६५ ॥
स्वर्गाहुन जोंव्ह मला धाडी साहाय्य त्या करायास ।
तेव्हां न उमगलें हें कांहीं माझ्या कुशाग्र डोक्यास ॥ १६६ ॥
कारागृहरक्षक जो प्लूतो त्याच्या घरास मज धाडी ।
अंबराया ओढोनी एरिबर्सीं श्वान जो तया नाडी ॥ १६७ ॥
* स्तिजिअनवीचि वलांडुनि जाता कीं काय पाहिलें असतें ।
द्वेष अतां करि माझा, अणि करि इच्छील आज थेटिस तें ॥१६८॥
तज्जानू चुंबुन जी हस्तें दाढी धरून कुरवाळी ।
'पुरनाशक अकिलीसा देंई यश ह्मणुन' विनवि ती टवळी ॥ १६९ ॥

---

* ही ग्रीकांची वैतरणी होय. हिचेंही पाणी कडू आहे.

येईल वेळ तेव्हां ' मजसिं मिनर्वा ' ह्मणेल ' प्रियतम ही ' ।
शृंगारीं दृढशफहय. जोव्हगृहीं अज न लावितां क्षणही ॥ १७० ॥
सन्नद्धकाय होउन समरपथ क्रमुन कठिण या समया ।
बघतें हेक्तर जर मज मोदें पाहील वा धरील भया ॥ १७१ ॥
निःसंशय नौदेशीं त्रोजन पावेल पतन एखादा ।
मांसवसानीं आणिल तुष्टि श्वानांस विहगमांस तदा " ॥ १७२ ॥
ऐसें वचन तियेचें जूनो ऐकून घेत शुभ्रकरा ।
उठली सॅतर्नसुता देवी जूनो त्वरा करून जरा ॥ १७३ ॥
करुनी भूषित अश्वां सोन्याच्या रश्मि चढवि ती वरतीं ।
जोव्हांगणीं मिनर्वा टाकी स्वग्रथित चित्रवसन अती ॥ १७४ ॥
जोव्हाच्या उरकवचें शोभवि तनु; रण जनांस रडवील ।
दैदीप्यमान निज रथिं पद ठेवी आदिशक्ति रणशील ॥ १७५ ॥
उचली दीर्घ करानें संवयींचा सहज कठिण जड भाला ।
ज्यापुढतीं हिस चिढवुनि कुठला अरिसंघ वद रणिं निभाला ॥ १७६ ॥
फडकावुनी प्रतोदा जूनो मग धांववीत हय अपुले ।
घटका राखिति ज्या, तें स्वर्गाचें द्वार अपणची उमले ॥ १७७ ॥
स्वर्ग अणी आलिम्पस ज्याच्या स्वाधीन तेंच हें द्वार ।
केव्हां कोंडी मेघा केव्हां सोडून देत बाहेर ॥ १७८ ॥
यांतुन नेले यांनीं निज हय; दिसलीं दुरून जोव्हास ।
सक्रोध इदावासी, दूती धाडीत पुढतिं मग इरिस ॥ १७९ ॥
वदला " जागे ! वेगें त्यांतें इकडे न येउं दे वळव ।

अंतःकलह विफल हा, वदतों मीं त्यांत नच असत्यलव ॥१८०॥
सुटले न रथापासुन हय त्यांचें तोंच पाय मोडीन ।
ओढीन रथभ्रष्टां यां अणि रथ तोहि पार फोडीन ॥ १८१ ॥
वज्रें पाडिन यांच्या देहीं मीं तीं क्षतें बरीं व्हाया ।
दश पाहिजेत वर्षें, माझ्याशीं रण हवें तिस कळाया ॥ १८२ ॥
रागावतों जरी कधिं जूनोवरतीं परी न इतका मी ।
कारण संवय तिची कीं घालावा मोड योजिल्या कामीं" ॥ १८३ ॥
घेउन या संदेशा धांवतसे इरिस मग पवनजवना ।
गेली इदाचलाच्या खालीं आलिम्पसास सुरभवना ॥ १८४ ॥
पुढल्या द्वारीं अडवुन जोव्हाचें वचन त्यांस ती सांगे ।
"देहीं झाले तुमचे आत्मे कां क्षुभित ! कोठ जातां गे ? ॥ १८५ ।
ग्रीकां साहाय्य रणीं करितां सॅतर्नजा न हें अवडे ।
घालुन भय करिन ह्मणे तें जें करणें तया न कठिण पडे ॥१८६॥
ह्मणतो 'युक्त रथां जों असातिल तों तत्पदांस मोडीन ।
ओढीन रथभ्रष्टां यां अणि रथ तोहि पार मोडीन ॥ १८७ ॥
वज्रें पाडिन यांच्या देहीं मीं तीं क्षतें बरीं व्हाया ।
दश पाहिजेत वर्षें. ताताशीं रण हवें तिस कळाया ॥ १८८ ॥
रागावतों जरी कधिं जूनोवरतीं तरी न इतका मी ।
कारण संवय तिची कीं घालावी मोड योजिल्या कामीं' ॥ १८९ ॥
परि तूं उद्धत किति गे ! पारधिची धृष्ट वाटसी कुतरी ।
जोव्हावरी खरोखर निज भाला उचलशील पाहुं तरी" ॥ १९० ॥

गेली इरिस वदुन हें जूनो बोले तदा मिनर्वेस ।
" हा धिक् जोव्हसुते ! मज जोव्हाशीं सुचत रण न वेळेस ॥१९१॥
रण मर्त्यविषय आहे. एक तरो वा मरो जसें दैवीं ।
ग्रीकां वा त्रायस्थां जोव्हमतानें यशस्विता यावी " ॥ १९२ ॥
ती हें बोलुन फिरवी हय. तों घटका हयांस वेळेला ।
सोडुन बांधायातें जाती घेऊन अश्वशाळेला ॥ १९३ ॥
ठेविति जपुन रथातें टेंकोनी भव्य भिंतिला आजी ।
हेमासनिं खिन्न मनें बसती या इतर देवतांमाजी ॥ १९४ ॥
स्यंदनिं इदाचलाहुन नंतर आलिंपसास जोव्ह अला ।
नेप्चूनें तों त्याच्या नेलें सोडून तेथुन हयांला ॥ १९५ ॥
स्तंभाच्या आधारें रथ ठेवुन वरतिं अस्तरा घाली ।
जोव्ह बसे कनकासनिं आलिंपस कांपला पदाखालीं ॥ १९६ ॥
जूनो अणी मिनर्वा जोव्हापासून दूर बहु बसती ।
भाषण त्याशिं न करिती प्रश्न हि त्यालागिं एक नच पुसती ॥१९७॥
अंतरिं कळतां सारें जोव्ह विचारी तदा मिनर्वेस ।
"जूनो अणि तूं कां गे ! बसलां उद्विग्न याच वेळेस ? ॥ १९८ ॥
त्रोजननाशार्थ रणीं तुह्मीं श्रमलांत का? खरें पुसतों ।
त्यांच्या विषयीं तुमच्या चित्तीं विद्वेष घोर कां वसतो ? ॥ १९९ ॥
आलिंपसस्थ सर्वहि सुर मज पळवून लावितिल काय ? ।
माझें बल विपुल असे, अपराजित हस्त, सुदृढ मम काय ॥ २०० ॥
लढतां दृष्टि न पडलों, मत्कृत्यें घोर विदित जों नाहीं ।

का तोंच तुमचिं अंगें लपताती रुचिर कांपतानां हीं ? ॥ २०१ ॥
वज्रानें त्यां दण्डिन माझ्याशीं वैर जे असें करिती ।
निक्षून सागतों हें याची केली बजावणी असती ॥ २०२ ॥
आलिम्पसास याया बसुन रथांतून उरति नच आस " ।
जूनो आणि मिनर्वा कुजबुजती श्रवण करुन वचनास ॥ २०३ ॥
दोघी जवळी बसुनी चिंतिति अति अहित त्या त्रोजनांचें ।
सेवी मौन मिनर्वा रागानें शब्द काढिना वाचे ॥ २०४ ॥
जोव्हाची चीड अतां वाटे आली असे तिला भारी ।
जूनोला गिळवेना आला जो क्रोध तो असुखकारी ॥ २०५ ॥
जोव्हासीं वदली ती "भयदा सॅतर्नजा ! कसें वच हें ! ।
बल तव अजिंक्य ठावें ग्रीकांचा परि विनाश अज न सहे ॥ २०६॥
मरतील हे बिचारे नियतीच्या दुर्गतीस अनुसरुन ।
इच्छा तुझी ह्मणोनी देऊं आह्मीं रणास सोडून । २०७ ॥
क्रोध तुला आला तरि त्यांचा व्हावा विनाश नच पुरता ।
ग्रीकां उपदेश करूं होइल जो पथ्यकर तयांस अतां" ॥ २०८ ॥
नंतर घनवाहक तो उत्तर तिज जोव्ह काय देत पहा ।
" जूनो विशालनयने ! सन्मान्ये धरिन घोर मी क्रम हा ॥ २०९ ॥
इच्छिसि तरी उद्यां तूं बघशिल सॅतर्नतनयहस्तानें ।
ग्रीकांची थोर चमू होतांनां नष्ट अधिकमानानें ॥ २१० ॥
नौकाश्रित चपलचरण जोंवर चिढला न पेलिअसतनय ।
तोंवर योधन हेक्तर मांडिल गे ! सारखा रणीं प्रळय ॥ २११ ॥

नौकागणप्रदेशीं करतिल जागीं निरुंद रण जेव्हां ।
निर्देश नियतिचा कीं येइल पत्रोक्लशा मरण तेव्हां ॥ २१२ ॥
तूझ्या कोपाची अधिं नाहीं गणना मुळींच मजला गे ।
पृथिवीच्या अंताला जाईं तूं क्रमुन सागरजला गे ॥ २१३ ॥
सॅतर्न, इआपेतस बसले रुसुनी जिथें, न निजधामीं ।
वायु न ज्यातें सुख दे, आनंदवि रवि न उच्चपथगामी ॥ २१४ ॥
तार्तारस भरलासे खोल संभोवार गे जया ठाया ।
फिरतां तिथेंहि जा, तरि तव कोपा मान कोठ मी द्याया? ॥ २१५ ॥
कारण जगांत कोणी तूझ्याहुन अधिक नाहिं उद्धत गे ! " ।
ऐकुन वच धवलकरा जूनो द्याया न उत्तरा लागे ॥ २१६ ॥
तों शुभ्र तेज रविचें पावतसे सागरांत परिपतन ।
सुफल महीवर पसरे तिमिरास्तर दीर्घ रात्रिचें सघन ॥ २१७ ॥
हिरमोड बहुत झाला त्रायस्थांचा प्रकाशलोपानें ।
ग्रीकां सुखदा झाली रजनी ती इष्ट तिमिरयोगानें ॥ २१८ ॥
आवर्तवतीचें शोभे तटिनीचें दीर्घ जेथ तीर महा ।
नौकांपासुन दूरी, वीरसभा जमवि तेथ हेक्तर हा ॥ २१९ ॥
नव्हतें शवप्रकीर्ण स्थल हें. तुरगावतार उचित जिथें ।
भूमीवर उतरोनी परिसाति हेक्तरवचास वीर तिथें ॥ २२० ॥
जोव्हप्रिय हेक्तर करिं भाला धरि लांब हात जो अकरा ।
कांचन वलयालंकृत यदग्र पाडी प्रकाश पुढतिं बरा ॥ २२१ ॥
टेंकुन भाल्यावरतीं बोलतसे तीक्ष्ण शब्द लोकांतें ।

"दार्देनिअन! त्रोजन! सुमित्र! परिसा मदीयवचनातें ॥ २२२ ॥
नुकतेंच वाटलें कीं ग्रीकांसह नौसमूह नासोनी ॥ ।
मारुतसुखितास अणी जाइन मी इलियमास परतोनी ॥ २२३ ॥
पहिल्यानें परि आलें तम हें, नौकांस राक्षि सग्रीक ।
यामा प्रमाण मानुन, भोजन करुं सिद्ध येथ हो नजिक ॥ २२४ ॥
सुन्दर आयाळांच्या तुमच्या रथिंच्या हयांस सोडा हो ।
त्यां तृण चारुन आणा एक अजा आणि पीन पाडा हो ॥ २२५ ॥
मग मधु मधुर अणावें, घरची तशि भाकरी अणावी हो ।
सरपण जमवुनि परसे पेटवुं जों यामिनी रहावी हो ॥ २२६ ॥
येई प्रभातजननी आरोरा तों प्रकाश परशांचा ।
स्वर्लोका पोंचोनी पळतां अरि ओळखो सुकेशांचा ॥ २२७ ॥
यत्न करावा न तयें उदधीचें पृष्ठही तरायास ।
नौकारोह तयाचा होउ न अनपाय नच निरायास ॥ २२८ ॥
शूलाचा बाणाचा नौकारूढास अरिस घाय करा ।
स्मृतिपूर्वक त्या लावा व्रणशुश्रूषा करावयास घरा ॥ २२९ ॥
त्रायस्थांशीं न करो कुणि रण अश्रान्त अश्वदमनांशीं ।
जोव्हप्रिय दूतां हा घोष करूं दे पुरांत संकलांशीं ॥ २३० ॥
ईश्वरनिर्मित हर्म्यीं वृद्धांनीं जर्जरितकपोलांनीं ।
प्रौढांसह जागावें पुर रक्षाया अतां समस्तांनीं ॥ २३१ ॥
आग्नि ज्वलित करावा अपुल्या मंदिरिं बसून अबलांनीं ।
तेथें सबळ असावे रक्षक; अरि येइ गुप्त मार्गांनीं ॥ २३२ ॥

कां कीं कोणि न तेथें. त्रोजन हो होउंद्या जसें ह्मटलें ।
सांप्रत जें वच हितकर केलें म्यां तेंच अर्थपूर्ण भलें ॥ २३३ ॥
परि जें उचित सकाळीं, तें मी बोलेन तेधवां स्वजनां ।
जोंव्हां इतरां अमरां नवसावें वाटतें मदीय मना ॥ २३४ ॥
दैवें ओढुन अणिलें घालोनी कृष्णवर्ण नौकांत ।
ज्या श्वानां त्यां येथुनि हांकिन ही थोर आस चित्तांत ॥ २३५ ॥
राखण करुं रात्रभरी प्रातःसमयीं न अरुण जों उगवे ।
सन्नद्धकाय होउन माजवुं नौकांसमीप तुमुल नवें ॥ २३६ ॥
विक्रान्त तैदिअससुत नौभागांतून परत नगरतट ।
दाविल मज कीं घेइल तत्प्राणां शूल मम रणीं विकट ॥ २३७ ॥
तत्क्षणिं हरिन तयाचें सारें धन युद्धलब्ध रक्तमय ।
मच्छूला प्रतिरोधूं शकला तर त्या उद्यां अला समय ॥ २३८ ॥
वाटे उद्यां प्रभातीं अधिं तो पावेल विद्धतनु पतन ।
भोंवतिं पडतिल मित्र हि समय ग्रीकांस काय दुर्धर न ॥ २३९ ॥
होईल निश्चयें हें. माझें होवो तसेंच अन्य हित ।
ईशें चित्तीं अणुनी मजसिं करावें जरामरणरहित ॥ २४० ॥
भजतात अपालोला आणि जसे लोक हे मिनर्वेला ।
मजसीं तसे भजाया पूजाया काय येइल न वेला " ॥ २४१ ॥
त्रोजन करितीं श्लाघा हेक्तर वाक्पाटवास परिसुनियां ।
युर्युक्त अश्व भिजले घर्में त्यां सर्व देति सोडुनियां ॥ २४२ ॥
बांधुन रथास ठेविति रज्जूनें नीट आपुल्या हातें ।

अणविति नगराहुन मग पीन अजेतें तसेंच वृषभातें ॥ २४३ ॥
मधुरा मदिरा घरची, तरुकाष्ठें, भाकरी तशी खाशी ।
यांचा पवनें नेला वाहुन तो रुचिर गन्ध आकाशीं ॥ २४४ ॥
जन मग बहुत विगर्वित सैन्यव्यूहांत रात्रभर बसले ।
त्यांचे भोंवतिं उज्ज्वल परसे सर्वत्र पेटतां सजले ॥ २४५ ॥
गगनीं उज्ज्वल तारा विलसति त्या इन्दुच्या सभोंवार ।
निर्वात गगन होउन सृष्टिस लावण्य येतसे फार ॥ २४६ ॥
होती स्पष्ट शिलोच्चय शिखरें उत्तंग अंग दाखविती ।
कान्ति चढे वनराजिस निवळुन आकाश विमल होत अती ॥२४७॥
ठायीं ठायीं चमकति नक्षत्रें जेंवि दृश्य होऊन ।
मुद मेषपाल पावे दीप्ति अशी धन्य नयनिं पाहून ॥ २४८ ॥
तेविं प्रकार झाला; सजले परसे, पुढें इलियमाचे ।
मध्यें नौदेशाचे आणि त्याही झान्थस प्रवाहाचे ॥ २४९ ॥
परसे सहस्र शोभति. एका भोंवति पदाति पन्नास ।
तृण यव सेवुन हय ते वाहति सिंहासनस्थ अरुणास ॥ २५० ॥

सर्ग ९ वा.

अकिलीसाची समजावणी करण्याचा व्यर्थ प्रयत्न.

सारांश:—आदल्या दिवशीं पराभव पावल्यावर **अगमेम्नन** परत घरीं जाऊं असें **ग्री**कांस सांगतो. **द्यायोमीद** विरुद्ध बोलतो. **नेस्तर** त्याची त्याच्या सुज्ञत्वाबद्दल व दृढनिश्चयी स्वभावाबद्दल प्रशंसा करतो. व उपाय-चिंतन करण्यास वीरसभा भरवावी असा सल्ला देतो. **अगमेम्नन** तसें करतो. **अकिलीसाची** समजावणी करण्यास दूत पाठवावे असें ठरतें. **युलिसीस** व **आजक्ष** या दोघांची नेमणूक होते. त्यांबरोबर वयोवृद्ध **फीनिक्स** जातो ते जाऊन सर्वजण मोठ्या कळकळीचीं भाषणें करतात. परंतु **अकिलीस** त्या सर्वांची प्रार्थना अगदींच कठोरपणें अमान्य करतो. दूत विन्मुख परत जातात. व सर्वसैन्य सुषुप्त्यवस्थेंत मग्न होतें.

कालमान:—सत्ताविसाव्या दिवसाची रात्र.

स्थल:—समुद्रतीर व नौप्रदेश.

त्रोजन राखण करिती. परि झाला ग्रीकनायकां ताप ।
दुर्धर पलायनें त्यां भयमित्रें घेरिलें अपोआप ॥ १ ॥
थ्रेसाकडून सुटतां उत्तर दक्षिण असे पवन दोन ।
मत्स्याकुल जलधीला क्षोभविती, श्याम ऊर्मि उठवोन ॥ २ ॥
टाकविती बाहेरी सागरसंभव बहूत शैवाल ।
चित्त क्षोभें तैसे ग्रीकांचे जाहले बहू हाल ॥ ३ ॥
दुःखक्षतहृदय फिरे सर्वभरी भूप एत्रिअसज परी ।
ज्यांची वाणी स्फुट त्यां दूतां आज्ञा अनेक मधुन करी ॥ ४ ॥

कीं " जा सभेस आणा प्रत्येका हांक मारुनी नांवें ।
उच्चवचा न करावें". झटले जे प्रथम त्यांत हा मावे ॥ ५ ॥
जमले दुःखित सारे अगमेम्नन उठुन नयनजल गाळी ।
वरुनी शिलोच्चयाच्या निर्झर कीं धार सोडितो काळी ॥ ६ ॥
ग्रीकां उद्देशुनियां बोलतसे दीर्घ सोडुनी श्वास ।
" मित्रांनों ! श्रेष्ठांनों ! ग्रीकांनीं मुख्य मानिलें ज्यांस ! ॥ ७ ॥
जोव्हें सॅतर्नसुतें क्लेशमयीं लोटिलें मला व्यसनीं ।
दिधलें वचन तयें तें, मानवलें जें तयाप्रति स्वमनीं ॥ ८ ॥
कीं ध्वंसुनि इलियम, मीं जावें परतोन; तो परी अदय ।
योजी कपटोपायां, मम झाली लोकहानि दुःखमय ॥ ९ ॥
हें सर्वशक्ति जोव्हा प्रिय होइल आज यांत संशय न ।
तुंग पुरें करिताती करितिल तद्विक्रमा पुढें शयन ॥ १० ॥
ऐसा बलिष्ठ आहे. ऐका या आज मम सदुपदेशा ।
त्राय मिळेल न आह्मां, नौकांतुन जाउं या परत देशा " ॥ ११ ॥
भाषण सरलें याचें परि हे सेवून मौन बसले कां ? ।
दुःख हृदयिं बहु झालें ग्रीकांच्या सकल बद्धमुखलेंकां ॥ १२ ॥
मग तैदिअसज बोले उठुनी रणशूर " एत्रिअसतनया ! ।
वीरगणीं न्याय्यचि कीं जर अजि बोलेन सोडुनी विनया ॥ १३ ॥
वदतों विरुद्ध तूझ्या प्रथम परी राग मनिं न मानावा ।
तूं पहिला ग्रीक जयें लघु गणिलें वीर्ययुक्त मम नांवा ! ॥ १४ ॥
आबाल वृद्ध सर्वहि जाणति हे ग्रीक वचन तव सारें ।

ह्मटलेंस मजसिं तूं कीं ' दुर्बल रणभीरु हा नर कसा रे' ! ॥१५॥
कपटी सॅतर्नसुतें दोहोंतुन फक्त एक तुजसिं दिलें ।
दिधलें प्रभुत्व मोठें, परि नच रे शौर्य जें जगीं पहिलें ! ॥ १६ ॥
सांगें विचित्र पुरुषा ! ग्रीकांचे पुत्र जेविं ह्मणतोस ।
तेवीं त्यां रणभीरु व दुर्बल तूं खचित काय गणतोस ! ॥ १७ ॥
सांगे मन तुज जर कीं जावें हें नीट आज परतोन ।
जा ! जा ! खुशाल जा ! बा ! मार्ग तुला काय मोकळा तो न ? ॥ १८ ॥
नौका जलधिंत जवळी, मिसिनीहुन मागुनी तुझ्या आल्या ।
ग्रीक न हलतिल रे हे, त्रायाचा पूर्ण नाश नच झाल्या ! ॥ १९ ॥
परि अवडे तर त्यांहीं नौकांतुन पळत जाउंदे परत ।
हा स्थेनिलस अणी मी दोघे होणार पूर्ण समररत ! ॥ २० ॥
थांबूं जेव्हां पाहूं त्रायपुरी ध्वस्त सर्व ही नयनीं ! ।
देवप्रसाद घेउनि आह्मीं आलों निघून शुभ शकुनीं" ॥ २१ ॥
परिसुनि ऐसें भाषण ग्रीकांचे पुत्र धन्य त्या ह्मणती ।
आश्चर्य सर्व करिती नेस्तर बोलावया सरे पुढतीं ॥ २२ ॥
" हे तैदिअसज होसी प्रमुख रणीं अग्रणी सभेमाजी ।
त्वद्वच निंदि निषेधी ऐसा ग्रीकांत एकहि न आजी ॥ २३ ॥
इतुक्यानें आलासि न, वादाच्या वाटतें समाप्तीला ।
सजशिल कनिष्ठ मम सुत वयमानें वाटतें असें मतिला ॥ २४ ॥
तरुणवयस्क असा तूं ग्रीकनृपां बोध करिशि रे बरवा ।
वृद्ध ह्मणवितों मजसीं, या तर करतों जसा विवाद हवा ॥ २५ ॥

मद्वच कुणि न उपेक्षिल, निंद्य न वाटेल तें एत्रिअसजा ।
+ जो आपसांत भांडे जात्याश्रयधर्महीन तो समजा ! ॥ २६ ॥
आली सतिमिर रजनी पाळुन तिस सज्ज भोजनास करा ।
बाहेरील तटाच्या खंदक राखील रक्षिवर्ग जरा ॥ २७ ॥
तरुणांतें हें कथितों परि नृवरा ऊठ एत्रिअसतनया ! ।
मिष्टान्न भोजना दे वृद्धां हें उचित जाण तव विनया ॥ २८ ॥
थ्रेसाहुन मदिरा जी उदधि वलांडून आणिती नावा ।
डेरे भरले तीनें न्यून नसे अल्प ही तुझ्या विभवा ॥ २९ ॥
अमितजनांचा शास्ता तूं, परि जेथें बरेच जन जमति ।
मानावें सद्बोधा सादर जर कोणि करिल सुज्ञमति ॥ ३० ॥
ग्रीकां कारण आहे मिळवाया दूरदृष्टिचा बोध ।
नौकांसन्निध टपला परशांशीं शत्रु धीट सक्रोध ॥ ३१ ॥
सांगा मग या समया एकालाही पडेल चैन कसें ।

+ या अन्तःकलहकारक प्राण्याचे गूण पोपकवीनें खालीलशब्दांत विस्तरानें गाइले आहेत.

कोण नराधम राक्षस भांडुन जो आपसांत मुद पावे ! ।
हत्याभिलाष जो धरि दुष्कृत्यें सौख्य नित्य ज्या व्हावें ॥ १ ॥
नाशी स्वजातिबान्धव विध्वंसी शेवटीं स्वदेशाला ।
धिक्कार त्या नराला ! धर्मभ्रष्टास नीतिविमुखाला ! ।
जगिं तो नको कुणाला मिणमिण तेवे जसा उगाच दिवा ।
पाळावें न नृपानें, आणि जपावें जनें न तज्जीवा ! ॥ ३ ॥

तारिल अथवा मारिल यामा ही आज भय मनांत वसे" ॥ ३२ ॥
ऐसें भाषण करि तो ऐकति जन सावधान चित्तानें ।
झालें तें मान्य तयां रक्षक निवती सशस्त्र धीरानें ॥ ३३ ॥
मार्सज आस्केलाफस आयेल्मेनस जयास मदतीस।
पहिल्यानें उठला तो नेस्तरज थ्रासिमेदीस ॥ ३४ ॥
आफारीअस दुसरा शूरोत्तम वीर दीइपैरस तो ।
क्रीअनसुत लगबागिनें लैकोमेदीस पुढतिं मग सरतो ॥ ३५ ॥
हा रक्षिवर्ग चाले सप्तम यांतील मेरिआनीस ।
शंभर शूलधरांच्या दर एकातें समूह मदतीस ॥ ३६ ॥
खंदक अणि तट यांच्या मध्यें जाऊन पेटवुन परसे ।
भोजन करण्यामाजी गेले गुंतोन त्यांस इष्ट तसें ॥ ३७ ॥
इकडे एत्रिअससुतें नेले तंबूंत वृद्धजन मानें ।
मिष्टान्न शक्तिवर्धक वाढविलें यांस बहुविध तयानें ॥ ३८ ॥
अर्पितसिद्धान्नीं मग यांनीं ही खूप मारिला हात ।
पानाशनावरिल मग इच्छा यांची उडोनियां जात ॥ ३९ ॥
उत्तम बोध जयाचा नेस्तर तो मग उपक्रमास करी ।
उद्देशुनियां यांतें उपदेशी सुज्ञरीति धरुन बरी ॥ ४० ॥
" हे ख्यात एत्रिअसजा नृवरा अगमेम्नना! असें पाहें ।
आरंभ मद्वचाचा शेवटही तो तुझ्यांतची आहे ॥ ४१ ॥
बहु देशांचें दिधलें ईशें तुजला प्रभुत्व हे राया ।
करिं राजदण्ड दिधला धर्मपथानें जन प्रवर्ताया ॥ ४२ ॥

ह्मणुनी तूंच विशेषें बोध करावा तसाच परिसावा ।
ज्यातें प्रेरिल तन्मन भूपति कीं जनहितार्थ बोधावा ॥ ४३ ॥
घ्यावा तदर्थ समजुनी तूझ्या स्वाधीन कृति परी राहे ।
बोलेन तेंच परि मी जें मज वाटेल योग्य नृवरा हे ॥ ४४ ॥
कारण पुरुष न दुसरा अधिक हिताचें शकेल सांगाया ।
मागें जें मत दिधलें निश्चित बा ! तेंच होय समया या ॥ ४५ ॥
अकिलीसाच्या तंबुंत होती ब्रैसीसजा तदा युवती ।
नेलीस ती सुजाता! हरुनी ही कृतिच मान्य मज नव्हती ॥ ४६ ॥
मोठे प्रयत्न करुनी होतें म्यां फिरविलें तुझें मन तें ।
केलीस अप्रतिष्ठा वीराची फार दुरभिमानरतें ॥ ४७ ॥
स्तविती मानव ज्यातें, अमरहि देतात ज्यास सन्मान ।
हरुनी त्वां तदुपायन अजुनी केलेंस परत तूं कां न ? ॥ ४८ ॥
तरिही विचार करुंया यश ये कैसें तयास वळवाया ।
रम्य उपायन देऊं सामवचा बोलुं कोप शमवाया " ॥ ४९ ॥
अगमेम्नन नृवर वदे " वृद्धा कथिलेस दोष तेच खरे ।
चुकलों कबूल करतों; आतां मी दाविल्याविणें नखरे ॥ ५० ॥
जो न्हप्रेम जयावरि तो नर ह्मणजे असंख्य सैन्य गणा ।
ग्रीकां अपयश आलें ! मान मिळाला* तयास हाच ह्मणा ॥ ५१ ॥

---

* अकिलीसला समजावुन आणावा असें अगमेम्ननाला वाटून तसें करण्याचा त्यानें निश्चय केला आहे परंतु कोठेंही त्याचें नांव घेण्यास त्याला आंतून लाज वाटत आहे असें जें कवीनें दाखविलें आहे तें मनुष्यस्वभावास धरून आहे.

स्वैरस्वभाव ह्मणुनी, चुकलों इच्छा परी मनीं खास ।
द्यावे बहु मोलाचे नजराणे कोपशान्ति व्हायास ॥ ५२ ॥
घेतों सर्वां देखत नजराण्यांची सबंध नावनिशी ।
तिवया त्या सात धरा, ज्यांचा संबंध नाहिं अग्निशीं ॥ ५३ ॥
खण्डोगणती सोनें, कढया त्या वीस थोर लखलखित ।
द्वादश तुरग महाबल, करिती इतरांस धांवण्यांत जित ॥ ५४ ॥
पद सामर्थ्यें ज्यांनीं मेळविलीं बक्षिसें द्दढशफांनीं ।
जितकीं मजासिं मिळालीं, होता श्रीमन्त इतर तितुक्यांनीं ॥ ५५ ॥
दारिद्य कोठलें मग ? सोन्याची वाण काय ये त्यासीं ? ।
सुंदर सात वरी मी वामा देईन लेस्बिआवासी ॥ ५६ ॥
कौशल अदोष ज्यांचें स्त्रीवर्गा लाजवीत ज्या रूपें ।
ज्यां मीं हरिलें जेव्हां त्यांचें पुर जिंकिलें तया भूपें ॥ ५७ ॥
त्या देइन मी त्याला हरिली मी तीहि यांतची युवती ।
ब्रैसीसकन्यका ती; घेतों तिजविषयिं शपथ ही वरतीं ॥ ५८ ॥
आलिंगिलें न तिजशीं, शय्या वा स्पर्शिली कधीं न तिची ।
जरि रीत माणसांची सर्व नरांची तशीच नारींची ॥ ५९ ॥
हीं सर्व आज देतों. अमरांची जर कृपा ह्मणा घडली ।
आणी प्रायमनगरी आह्मां ध्वंसावयास सांपडली ॥ ६० ॥
ते ग्रीक वीर घेतिल वांटोनी युद्धलब्ध धन जेव्हां ।
पित्तल, कांचन, यांनीं नेवो नौका भरून तो तेव्हां ॥ ६१ ॥
वीस ट्रोजन नारी घेऊंदे यास करुनियां निवड ।

तान कराया ज्यांवर हेलनला एकलीस हो सवड ॥ ६२ ॥
पोंचूं जर अर्गासा, जें पुर ओंटी *दुधाळ देशाची ।
तर मी करुनी यातें जामाता, वृद्धि करिन भाग्याची ॥ ६३ ॥
प्रेमें ओरिस्टीसा गृहिं मी पुत्रीकृतास वाढविला ।
त्याच्या समान याचा ठेविन मी मान आदरें पहिला ॥ ६४ ॥
आज तिघी हर्म्यतला शोभविती नववयस्क मम दुहिता ।
कांचनवर्ण जयांचे वेधिति नयनांस केश शिरिं रुळतां ॥ ६५ ॥
क्रैसोथेमिस पहिली, लेओदिसि, आणि ऐफिआनासा ।
उतरेल जी पसंतिस, न्यावी; या सर्व योग्य सहवासा ॥ ६६ ॥
गेहा पेलिअसाच्या नेतां स्त्रीधन तयांस न लगे तें! ।
देईन शुल्क बहुविध, दिधलें कुणि तेवढें न दुहितेतें ॥ ६७ ॥
सप्त जनाकीर्ण पुरें, त्यातें देईन सांगतों वरतीं ।
कार्देमिली व ऐरा, ईनोपी वैभवें न जीं कमती ॥ ६८ ॥
आन्थीआ शाद्वलवृत, ईपैआ, नयनरम्य तें फेरी ।
पेदासस जलधीशीं, द्राक्षलता जेथ पसरल्या सभरी ॥ ६९ ॥
शेवटचें पुर आहे सिकतामय जेथ नगर पैलस तें ।
त्यामाजी जन वसती, अजधन ज्यांच्यापशीं बरें असतें ॥ ७० ॥
करुनी उपायनार्पण भजतिल देवासमान ते त्यास ।
करिं राजदंड धरितां देतिल करभार जे निरायास ॥ ७१ ॥

---

* साध्याच पण एका शब्दानें धनधान्यसमृद्ध देशाचें वर्णन होमरनें फार सरस केलें आहे.

देइन हीं त्या नगरें क्रोध जरी आज धरिल अंवरून ।
त्याचें मन वळवावें. सोडुं नका बहु उपाय ते करुन ॥ ७२ ॥
फ्लूतो दीर्घद्वेषी, निष्ठुर तो नावडे सुरनरांस ।
हा न तसा. ह्मणुनी वश होवो भूपास मजसिं वडिलास" ॥ ७३ ॥
उत्तर करि मग नेस्तर " अगमेम्नन! नृवर! हे एत्रिअसज ! ।
ऐशीं उपायनें तव अकिलीसा तुच्छ नव्हत हें समज ॥ ७४ ॥
मग ये निवडूं जन जे भेटाया योग्य पेलिअसजास ।
हें बघ; यां योजितसें; होतिल का वश्य पाहुं वचनास ॥ ७५ ॥
पहिला फीनिक्स धरीं जोव्हाप्रिय हा बरा तयां नेता ।
युलिसीस दिव्य दुसरा अणखी आजक्स शत्रुचा जेता ॥ ७६ ॥
दूतां युरीबटीसा, होदिअसा पाठवूं तयांसहित ।
अणवावें जल सत्वर हस्तप्रक्षालनार्थ जें विहित ॥ ७७ ॥
सांगें मंगल वाणी बोलायातें अशा प्रसंगाला ।
विनवूं सॅतर्नसुता येइल अमुची जरी दया त्याला " ॥ ७८ ॥
ऐसें भाषण करुनी सर्वांतें मान्य मत तयें दिधलें ।
त्यानंतर दूतांनीं तत्करिं जल लागलेंच ओतियलें ॥ ७९ ॥
भूषित करुनी पात्रें नव मद्यें तरुण वांटिती सकळां ।
पीती मनसोक्त सुरा करुनी हे देवसंतर्पणाला ॥ ८० ॥
नृवराच्या तंबूंतुन निघुनी जाती मग त्वरा करुन ।
आदेश सुचवि नेस्तर सस्पृह सर्वांकडेस पाहून ॥ ८१ ॥
त्यांतूनियां विशेषें युलिसीसा सुचवि " यत्न सर्व करा ।

पेलिअसाच्या तनया वळवा तोही विशुद्धहृदय खरा "॥ ८२ ॥
गर्जत्सागरतीरें नेप्चूना प्रार्थुनी पथा क्रमिती ।
कीं " पृथ्वीव्यापक हे ! ईआकसपौत्र अज वळो सुमती " ॥ ८३ ॥
मिर्मिदनांच्या नौका आणी डेरे जया स्थळीं सजती ।
तेथें ते आले अणि अकिलीसा दृष्टिनें पुढें बघती ॥ ८४ ॥
हृदया आनंदवितो सुस्वर तंत्री सुरेख वाजवितो ।
कौशलरचितावयवा कुक्कुटचूडांकिता करीं धरितो ॥ ८५ ॥
एइशन ध्वंसोनी अणिली जी लूट तींत ही गवसे ।
गातां वीरचरित्रें अज ती घेऊन हर्ष हृदयिं वसे ॥ ८६ ॥
पत्रोक्लश समुर बसे सेवेचा भंग अल्प तो हि न हो ।
ईआकसवंशज हा जेव्हां हें थांबवील गायन हो ॥ ८७ ॥
मग हे होती पुढतीं अग्रीं घालून दिव्य युलिसीसा ।
पाहुन पुढें उभे यां, वाटे आश्चर्य फार अकिलीसा ॥ ८८ ॥
पत्रोक्लश घेत उडी उठतां तंत्रीसहीत अकिलीस ।
विस्मयवश हे झाले बोले अकिलीस त्यां अखेरीस ॥ ८९ ॥
" कुशल असो वीरांचें, येथें आलेत मित्र ह्मणवून ।
क्रुद्धासहि आवडतां मज तुह्मीं ग्रीक जातिचे असुन ॥ ९० ॥
आलांत येथवर तर आहे कांहीं तसेंच कारण कीं ? " ।
ऐसें पुसुनी बसवी त्यां नीलावरणयुक्त पर्यंकीं ॥ ९१ ॥
जवळ उभा पत्रोक्लश; त्या बोले " रुंद पात्र आणावें ।
मीनीशिअससुता हे ! यांकरितां विमल मद्य ओतावें ॥ ९२ ॥

प्रत्येकातें द्यावें प्रियजन अन्न सजविती मदीय घर " ।
मित्रवचा पत्रोक्लश मानी, संभ्रम करोनियां फार ॥ ९३ ॥
अग्निज्वालांमाजी आकिलीसें सिद्ध काष्ठ टाकियलें ।
अजमेषसूकरांचें वरतीं मग पृष्ठमांस ठेवियलें ॥ ९४ ॥
आकिलीस मांस कापी आतोमीदन करें धरुन ठेवी ।
भाग लहान करोनी शूलीं रोंवीत मागुनी तेवीं ॥ ९५ ॥
मीनीशीअससुतानें देवसमानें कृशानु चेतविला ।
कालें दाह निमाला ज्वालाही क्षीण होत मंदवला ॥ ९६ ॥
उकरून राख पुढतीं यानें तीवरतिं शूल ठेवियले ।
भाजून मांस होतां वरतिं तयें लवण अल्प सिंचियलें ॥ ९७ ॥
होतां भरुन मसाला खाया तें मांस उचित मग झालें ।
पत्रोक्लश वाढितसे भाकर जीनें करंड बहु सजले ॥ ९८ ॥
आकिलीस मांस वाढुन युलिसीसाच्या समूर बैसून ।
" मित्रा! दे बलि अमरां " सांगे भिंतीस अंग टेंकून ॥ ९९ ॥
प्रथम ग्रासाची त्या अग्नित आहुति तदा तयें दिधली ।
सिद्धान्न खावया मग निज हस्तां सर्व मंडळी उचली ॥ १०० ॥
खायाची प्यायाची इच्छा यांची यदा पुरी झाली ।
+आजक्षें फीनिक्सा, केलेली खूण दृष्टिला पडली ॥ १०१ ॥

+ आजक्ष हा पडला आडदांड शिपाई गडी. त्याला लांब लांब वक्तृत्व कसलें आवडणार ! ज्या कामाकरतां आलों तें लागलेंच कसें होईल एवढीच त्याला काळजी. ह्मणून अगदीं उतावीळ होऊन तो फीनिक्साला एकदम कामाला प्रारंभ करण्यास खूण करतो. अर्थात् युलिसीसानें त्याचें ऐकिलें नाहीं. तो सुज्ञच होता.

ह्मणुनी युलिसीसानें भरली पात्रांत सुन्दरा मदिरा ।
अकिलीसाच्या कुशला चिन्ताया वदत धीर मंदगिरा ॥ १०२ ॥
" कुशल असो ! अकिलीसा ! भोजनसंपूर्णता अह्मां लाधे ।
अगमेम्नन नृपतीच्या तंबुंत वा येथ ही तशी साधे ॥ १०३ ॥
बलवर्धक मिष्टान्नें खाणें हें आजचें नव्हे काज ।
जोव्हप्रसाद नृपते ! निजबल दावून राख अज लाज ॥ १०४ ॥
×करतां विचार कळतें लवकर होईल कीं अनर्थ महा ।
ग्रीकांच्या नौका धड टिकतिल अथवा न थोर संशय हा ॥१०५॥
नौकांशीं व तटांशीं त्रोजन आणि मित्र दूरचे सारे ।
तळ देउनियां बसले, परसे बहु कटाकिं पेटवुन बारे ॥ १०६ ॥
ह्मणती ' धीर न धरवे, नौकांवरि यांचिया पडूं तुटुन ' ।
सॅतर्नसुतें जोव्हें दावियले त्यांस अमित शुभ शकुन ॥ १०७ ॥
हेक्तर पराक्रमोद्धत नयनां क्रौर्यें गरागरां फिरवी ।
क्रोधें चवताळे तो निष्ठा जोव्हावरी खरी दावी ॥ १०८ ॥
याहुन इतरा कोणा मानीना तो नरा न अमरा वा ।
उन्माद यास झाला, प्रार्थि ' उषःकाल लवकरी यावा ' ॥ १०९ ॥
केली तयें प्रतिज्ञा ' नौपश्चाद्भाग आज फोडोनी ।
नौका नंतर सगळ्या जाळिन कीं पार आग घालोनी ११० ॥

× पोप कवीनें हेंच वर्णन फार थोडक्यांत केलें आहे.
समरीं पलीकडे त्या उडवी संहार केवढा अरि तो ।
मेलेल्यांस्तव रडतों, जगले त्यांविषयिं काळजी करितों. ॥

धूमांधितनयनां मी ग्रीकां काढीन सर्व कापोनी ' ।
ह्मणुनी मज भय वाटे सुर हे अणतील कार्य घडवोनी ॥ १११ ॥
अर्गोसाहुन दूरी त्रायांतचि ठेविलें अह्मां मरण !।
उशिरां कां होईना ऊठ अतां तुजसिं होय उचित रण ॥ ११२ ॥
त्रस्त ग्रीकांवरतीं त्रोजन भाडिमार घोर करतील ।
त्यांतें आजि राखावें; ना तर मग दुःख तुजसिं होईल ॥ ११३ ॥
+घडतां अनर्थ मागुन फल काई सांग शोधुन उपाय ।
तें कर आधीं जेणें ग्रीकांवरचें अरिष्ट दुर जाय ॥ ११४ ॥
पेलिअसें तव पितयें, धाडियलें तुजसिं जैं थियाहून ।
नृपतिकडे, तैं मित्रा ! केला उपदेश चित्त लावून ॥ ११५ ॥
' जूनो अणी मिनर्वा, इच्छिति तर शक्ति तुजसिं देऊत ।
बरवी सदा सदयता. क्रोधा अंवरीं न येंउंदे ऊत !॥ ११६ ॥
पीडाकर कलह नको ! ग्रीकांतिल वृद्धतरुण वानोत ' ।
वृद्धें तुज कथिले ते विसराया बोल आजचि नकोत ॥ ११७ ॥
अजुनहि शान्ति वरोनी सोडुन दे क्रोध भक्षि जो हृदया ।
देई उपायनें नृप, कोप तुझा जर शमेल अज सदया ॥ १८ ॥
घेतों नजराण्यांची तंबुंतल्या ऐक आज नांवनिशी ।
तिवया सात जयांचा झाला संबंध नाहिं अग्नीशीं ॥ ११९ ॥

संदीप्ते भवने तु कूपखननं प्रत्युद्यमः कीदृशः   भर्तृहरि.
गतोदके सेतुबंधो न कल्याणि विधीयते. मंथरेचा कैकयीस उपदेश.
वाल्मीकि रामायण.

खण्डोगणती सोनें, कढया त्या वीस थेर लखलखित ।
द्वादश तुरग महाबल करिती अन्यांस धांवण्यांत जित ॥ १२० ॥
पदसामर्थ्यें ज्यांनीं मेळविलीं बक्षिसें दृढशफांनीं ।
जितकीं तयां मिळालीं, होता श्रीमन्त इतर तितुक्यांनीं ॥ १२१ ॥
दारिद्र्य कोठलें मग सोन्याची वाण काय ये त्यासीं ।
सुंदर सात अणी तो वामा देईल लेस्बिआवासी ॥ १२२ ॥
कौशल अदोष ज्यांचें स्त्रीवर्गा लाजवीत ज्या रूपें ।
हरिलें ज्यांतें जेव्हां त्यांचें पुर जिंकिलें तया भूपें ॥ १२३ ॥
त्या देइल तो तुजला तद्हृत जी तीहि यांतची युवती ।
ब्रैसीसिकन्यका ती. घेइल तिजविषयिं शपथ ही वरतीं ॥ १२४ ॥
' जरि रीत माणसांची सर्व नरांची तशीच नारींची ।
आलिंगिलें न तिजशीं शय्या वा स्पर्शिली कधीं न तिची ' ॥१२५॥
हीं सर्व आज देइल. अमरांची जर कृपा ह्मणा घडली ।
आणी प्रायमनगरी आह्मां ध्वंसावयास सांपडली ॥ १२६ ॥
ते ग्रीकवीर घेतिल वांटोनी युद्धलब्ध धन जेव्हां ।
पित्तल कांचन यांनीं ने तूं नौका भरूनियां तेव्हां ॥ १२७ ॥
वीस ट्रोजन नारी ने बा तूं प्रथम करुनियां निवड ।
तान कराया ज्यांवरि हेलनला एकलीस हो सवड ॥ १२८ ॥
पोंचूं जर अर्गासा जें पुर ओंटी दुधाळ देशाची ।
तर तो करुनी तूतें जामाता वृद्धि करिल सौख्याची ॥ १२९ ॥
ओरिस्टीसास तयें पुत्रीकृत वैभवांत वाढविला ।

त्याच्या समान तूझा ठेविल तो मान आदरें पहिला ॥ १३० ॥
आज तिघी हर्म्यतला शोभविती नववयस्कतद्दुहिता ।
कांचनवर्ण जयांचे वेधिति नयनांस केश शिरिं रुळतां ॥ १३१ ॥
क्रैसोथेमिस पहिली लेओदिसि आणि ऐफिआनासा ।
उतरेल जी पसंतिस न्यावी. ह्या सर्व योग्य सहवासा ॥ १३२ ॥
गेहा पेलिअसाच्या नेतां स्त्रीधन तयांस नलगे तें ।
बहुविध हुंडा देइल, दिधला कुणि तेवढा न दुहितेतें ॥ १३३ ॥
सात जनाकीर्ण पुरें तुजला देईल सांगतों वरतीं ।
कार्देमिली व ऐरा, ईनोपी वैभवें न जीं कमतीं ॥ १३४ ॥
आन्थीआ शाद्वलवृत ईपैआ, नयन रम्य तें फेरी ।
पेदासस जलधीशीं द्राक्षलता जेथ पसरल्या सभरी ॥ १३५ ॥
शेवटचें पुर आहे सिकतामय जेथ नगर पैलस तें ।
यामाजी जन वसती अजधन ज्यांच्यापशीं बहू असतें ॥ १३६ ॥
करुनी उपायनार्पण भजतिल देवासमान तुज खास ।
करिं राजदण्ड धरतां देतिल करभार जे निरायास ॥ १३७ ॥
देइल सारें तुज जर कोपा धरशील आज आंवरुन ।
जरि एत्रिअससुतासम नजराणे तुच्छ चालसी धरुन ! ॥ १३८ ॥
त्रस्त ग्रीकांवर तरि करुन दया मान्यतेप्रति चढावें ।
भजतिल देवा परि ते. त्वां अज त्या हेक्तराप्रति वधावें ॥ १३९ ॥
क्रोधावेशें आला जवळ तुझ्या आयता. अणी ह्मणतो ।
'इतुक्या नौकांमाजी, ग्रीक बळें तुल्य मजासिं एक न तो' " ॥ १४० ॥

अकिलीस चपलपद मग बोले " युलिसीस ऐक नयकुशल ! ।
लाअर्टीसज ! कथिलें मत माझें पाहिजे तुला सकल ॥ १४१ ॥
मन मोकळें करोनी कथितों मी जो विचार हृदयिं खरा ।
मागुन करीन तेंची, कुरकुर बाजूस बसुन मग न करा ॥ १४२ ॥
वागवितो एक मनीं, दुसरें बोलून दाखवीत जनीं ।
हेदीसद्वारांसम मजला तो द्वेष्य होय खचित मनीं ॥ १४३ ॥
उत्तम जें मज वाटे, तें मी बोलेन मज असें गमतें ।
अगमेम्नन अथवा तो ग्रीक दुजा फिरवुं शकत मम न मतें ॥ १४४ ॥
सतत झुजे जो अरिशीं त्याच्या कृतिचें नसे कुणा स्मरण ।
समभाग आळशाला देती, जणुं करित तोच सतत रण ॥ १४५ ॥
भीरूस देति तितुका जितुका सन्मान आज शूरास ।
कृतिशून्य पुरुष मरतो, मरतो तो घालि कृतिचि जो रास ॥ १४६ ॥
पक्षिण पिलांस शोधुन चारा घालीत पक्षहीनांस ।
सोसून कष्ट जेवीं नाहीं वगळीत कांहिं अपणांस ॥ १४७ ॥
अधिक उणा केला मीं संग्रह तेवीं न कधिंहि कसलाही ।
व्यसनीं जीवा घालुनि समरीं म्या कष्ट सोशिले पाहीं ॥ १४८ ॥
निद्रेवांचुन बहु म्यां घालविल्या रात्रि समरिं रुधिरमय ।
वीरांशीं लढलों मीं यांच्या राखावया स्त्रिया सभय ॥ १४९ ॥
द्वादशनगऱ्या केल्या ध्वस्त तया समयिं युद्धनौयोगें ।
त्रोदीं पदीं लढुन धन अकरांतुन आणिलें मनाजोगें ॥ १५० ॥
अगमेम्ननास दिधलें, जो होता स्वस्थ नौप्रदेशांत ।

कांहीं त्यांतिल वांटी ठेउन बहुतेक तो बसत शांत ॥ १५१ ॥
सरदारां भूपां वा त्यानें जीं पारितोषकें दिधलीं ।
तीं पाहीं त्यांपाशीं अजुनहि सारीं अखंड राहियलीं ॥ १५२ ॥
इतक्या ग्रीकांतुन कां घेई माझाच भाग एकाचा ।
माझी रमणी ठेवी जी मम आनंद होय हृदयाचा ॥ १५३ ॥
विश्रान्ति शयनिं तीसह घेतां सुख यास होउंदे अज रे! ।
त्रायस्थांसह लढणें ग्रीकां कां जाहलें अवश्य बरें? ॥ १५४ ॥
जमवुन सैन्य अणाया काय इथें एत्रिअससुता गरज? ।
कारण काय सुकेशी हेलन झाली न यास सांग अज ॥ १५५ ॥
वाणी परिस्फुटाक्षर बोलतसे जाति जी मनुष्यांची ।
तींत प्रीति असे का दयितांवर फक्त एत्रिअसजाची? ॥ १५६ ॥
सच्चरित, सुज्ञ नर जो ठेवितसे प्रेम तो स्त्रियेवरतीं ।
दासी शूलजिता तरि नव्हतें मत्प्रेम तिजवरी कमती ॥ १५७ ॥
हरुन करांतुन नेला तेणें मम भाग वंचना करुन ।
बघणें नको प्रतीति, सावध मी, काय वळवि मज फिरुन ॥ १५८ ॥
करुंदे मसलत त्यातें युलिसीसा! तुजशीं, अन्य नृपतींशीं ।
वैराग्नीच्या ज्वाला कैशा विझवूं शकाल नौदेशीं ॥ १५९ ॥
मजविण तेणें केलीं बहुकार्यें ज्यांस लागती श्रम ते ।
तटबंदी करुनीयां खंदक खणिले अगाध उत्तम ते ॥ १६० ॥
मोर्चे रोंवुन झाले अंवरे परि जीवहर न हेक्तर तो ।
लढलों ग्रीकांत तदा करिना रण सोडुनी तटा तर तो ॥ १६१ ॥

स्कीअननगरद्वारीं बीचतरूच्या तळीं दुरी राहे ।
टपतां मजसिं वधाया काढुन पळ जीव रक्षुनी आहे ॥ १६२ ॥
हेक्तर उदार आहे, त्यासह लढणें प्रशस्त नच मातें ।
प्रथम उद्यां जोव्हातें यज्ञें पूजीन इतर अमरांतें ॥ १६३ ॥
इच्छिसि तरि बघशिल तूं अवडे असला प्रसंग तर सहजीं ।
नौका सर्व भरोनी घेइन ओढून सागरामाजी ॥ १६४ ॥
हेलिस्पान्टजलीं मग मत्स्याकुलिं चालतील नावा या ।
प्रातःसमयीं दिसतिल नाविक नावांत सज्ज वलवाया ॥ १६५ ॥
नेप्चून कीर्तिकर जर अमुचें सुखकर करील जलयान ।
तिसऱ्या दिवशीं गांठिन बहुफलदा ती थियापुरी कां न ? ॥ १६६ ॥
बहु वस्तुजात तेथें टाकुन आलों ह्मणून नुकसान ।
झालें, परि तेथें मीं नेईन रणलब्ध धन न जें सान ॥ १६७ ॥
सुन्दररशना रामा, धवलायस, पीत पितळ, तें सोनें ।
परि सांग पारितोषक अवमानें एत्रिअसज कां तो ने ? ॥ १६८ ॥
कथितों तैसें सारें त्यालागीं स्पष्ट परत जा सांग ।
ग्रीकां फसवूं पाहे येऊंदे उद्धता तया राग ॥ १६९ ॥
वरतीं मान करोनी पाहिल तो काय मजकडे श्वान ।
समरीं साहस करतां मंत्रहि सांगेन कधिंहि त्याला न ॥ १७० ॥
साहाय्य त्यास करणें माझ्या हातुन कदापि नच घडणें ।
अपकार एकवेळा करुन पुन्हा व्यर्थ वंचना करणें ॥ १७१ ॥
आजवरी बहु फसलों काय फसूं फिरुन गोडशब्दानें ।

त्याला स्वस्थ मरूंदे, हरिली तद्बुद्धि खचित जोव्हानें ॥ १७२ ॥
त्याच्या उपायनांचा वाटे मज फार आज तिटकारा ।
खुद्द तयाची करितों किंमत मी एक केश हि न सारा ॥ १७३ ॥
वीस दहांत मिळवुनी, तितक्या पट हे पदार्थ वाढविल ।
अन्य दिशा धुंडोनी स्वमतें भर त्यांत अणुन घालील ॥ १७४ ॥
ईजिप्तांतिल थीब्रीं अगणित संपत्तिनें गृहें भरलीं ।
द्वारें दशशत जेथें सेना पसरोनि बहुत गजबजलीं ॥ १७५ ॥
प्रत्येक द्वारांतुन हययुत रथिं बसुन दोनशें वीर ।
बाहेर निघुन येती तेथिल आणील संपदा रुचिर ॥ १७६ ॥
आर्कोमेनासांतिल देइल आणून सर्व ऐवज तो ।
वाळूचे धूलीचे कण संख्यातीत, तेवढा ह्मण तो ॥ १७७ ॥
अर्पिल संचय हा तरि तत्कृत अपमान मी न विसरेन ।
त्याची हानि भरोनी दिधल्याविण पुढतिं मी नच सरेन ॥ १७८ ॥
अगमेम्नन एत्रिअसज याची दुहिता मला नको नवरी ।
रुचिरा सुवर्णवर्णा व्हीनससम ती असो तरी न वरीं ॥ १७९ ॥
पावो साम्य गुणांनीं तीस मिनर्वा विनीलनयनांची ।
तरिही तिजसिं वराया काढावी कधिं न गोष्ट लग्नाची ॥ १८० ॥
ऐश्वर्य अधिक ज्याचें होइल अनुरूप तीस जो राजा ।
त्या ग्रीकमंडलांतुनि निवडोनी, जांवई ह्मणावें जा ॥ १८१ ॥
रक्षण माझें करुनी नेतां मजला घरास देवांनीं ।
माझें लग्न करिल मग माझा तो तात पेलिअस मानी ॥ १८२ ॥

ग्रीकांमाजी असती हेलासीं वा थियांत बहु ललना ।
कन्या चमूपतींच्या राखिति जे सर्व काल पौरजनां ॥ १८३ ॥
उतरेल जी पसंतिस लवलाहीं मी वरिन लाडकी ती ।
मग या उदारमनिंचे पुरविन बहुवार गोड लाड किती ॥ १८४ ॥
झालें वाग्दान जिचें ती शयनींची वरोन सहभागी ।
पोलिअसार्जित धन मीं भोगावें वाटतें बसुन जागीं ॥ १८५ ॥
येथें ग्रीकागमनापूर्वी होतें प्रशान्तिच्या कालीं ।
पौराकुल इलियम जें धन ज्याची वाच्यता जनीं झाली ॥ १८६ ॥
पैथोंत प्रस्तरमयिं वसत अपालो सचाप फीवस तो ।
तद्गेहदेहलीच्या खालीं द्रव्यापचय बरा असतो ॥ १८७ ॥
या दोन्हीं स्थानांतिल आणवुनी संपदा करा रास ।
मत्प्राणांच्या इतुकें मोल तिचें व्हावया नको आस ॥ १८८ ॥
तिवया, पीन अजा, वृष, हयतुण्डें लाभती लुटींत नरा ।
दन्तावरणविनिर्गत जीव परी परत ये न माघारा ॥ १८९ ॥
देवी माता थेटिस सांगे रजतांघ्रि भाग्यभाग मला ।
द्विविध प्राक्तनयोगें येइल मज शेवटास मृत्यु भला ॥ १९० ॥
त्रोजन नगराभोंवतिं राहें मी जर करावया समर ।
येणें परत नसे मज, मातें मिळणार यश परी अमर ॥ १९१ ॥
जाईं जनकगृहा जर, सांगा मग मद्यशास कायम जा ! ।
होइल आयु चिरंतन मरण ग्रासिल न शीघ्र; काय मजा ! ॥१९२॥
बुद्धि शिकवितों दुसऱ्यां नावा हांकारुनी घरा जावें ! ।

आशा तुह्मि न करावी इलियम कीं ध्वस्त आढळुन यावें १९३ ॥
जोंव्हें त्या नगरावर पसरुनिकर धीर बहु जनां दिधला ।
ग्रीकांस परत जाउन सांगा मुख्यांस हा निरोप भला ॥ १९४ ॥
कार्यचि हें प्रतिनिधिंचें ' बरवी याहून युक्ति योजावी ।
जीनें नौकारक्षण होउनियां राखिली चमू जावी ' ॥ १९५ ॥
ही युक्ति विफल त्यांची होइल जों रोष मी बसें धरुन ।
फीनिक्स येथ असुंदे सन्निध माझ्या अजी शयनिं पडुन ॥ १९६ ॥
इच्छी तरी उद्यां मग, मत्संगें जनकभूमिला जावा ।
अर्थात मीं तयाला सक्तीनें येथुनी न घरिं न्यावा " ॥ १९७ ॥
ऐसें तो वदला मग सेवुनियां मौन हे मुके बसले ।
आश्चर्य चित्तिं करती उत्तर हें तीव्र कां तयें दिधलें ॥ १९८ ॥
सरदार वृद्ध शेवटिं बोले फीनिक्स अश्रु गाळून ।
ग्रीकांच्या नौकांची राहे जो काळजी मनीं धरुन ॥ १९९ ॥
" जर तूं उदारचरिता ! अकिलीसा ! चिंतिशी घरा जाया ।
नाशकवन्हीपासुनि इच्छिसि नौकांस जर न राखाया ॥ २०० ॥
तर रुष्ट खचित होसी. बाळा ! मज सोडुनी कसा जाशी ? ।
पेलिअसें जरठें कां त्वद्संगें धाडिलें वदें मजशीं ? ॥२०१॥
वदला थियापुराहुनि निघतां अगमेम्ननाकडे तुजला ।
'बारे ! न जाणिलें त्वां रण जें नाशी सदैव उभयदलां ॥ २०२ ॥
ठावी सभा न तेवीं, जीमाजी पुरुष पावतो मान' ।
या साठीं मज धाडी, यांचें शिकवावया तुला ज्ञान ॥ २०३ ॥

वक्तृत्व तूं करावें, यावें कर्तृत्व अंगीं तव तैसें ।
सोडून लाडक्या त्वां जावें इच्छीन हें मुला कैसें ? ॥ २०४ ॥
'हरुन जरा नवयौवन देइन' हें देइ देव जरि वचन ।
तुजला न सोडण्याचा निश्चय ढळणार तरि कदापिच न ॥ २०५ ॥
आठवितों मम यौवन, ताता आमिन्तरास जें नडलें ।
सुन्दर नारींचें स्थल जेव्हां हेलास सोडुनी दिधलें ॥ २०६ ॥
आर्मीनससुत मजवर कोपतसे तात, यास कारण ती ।
वेश्या एक सुकेशी, होता आसक्त तोच जीवरतीं ॥ ॥ २०७ ॥
निज भार्येसीं ह्मणजे माझ्या जननीस नित्य अवमानी ।
मज्जानूंतें जननी कवटाळी विनतिपूर्व हस्तांनीं ॥ २०८ ॥
कीं म्यां तरुणें प्रथमचि गणिकेला रतिसुखार्थ भुलवावी ।
येऊन अरुचि तेणें गणिका वृद्धास सोडुनी जावी ॥ २०९ ॥
जननीच्या अनुरोधें वर्तन केलें, तिलाच सुखवाया ।
परि संशयी पित्यानें श्रम माझे सकल दवडिले वाया ॥ २१० ॥
कळतां तें उच्चारी वाचे जे वाटतिल शिव्याश्राप ।
एरिन्निसांस गर्ह्यां प्रार्थी " व्हावें न मी कधीं बाप ॥ २११ ॥
ह्मणजे तज्जानूंवर मत्सुत नलगे कधीं हि ठेवाया ।
सत्य कराया याचे आवडले श्राप सर्व देवां या ॥ २१२ ॥
प्रासर्पैनीचें हें जोव्हाचें कार्य घोर तूं समज ।
असतां क्रुद्ध पिता मम न रुचे एकत्र हर्म्यवास मज ॥ २१३ ॥
मग आप्त मित्र माझे जाया निघतांच आडवे आले ।

भव्य महालीं मातें दक्षपणें कोंडिते तदा झाले ॥ २१४ ॥
पादप्रहार करिती ऐसे बहु उक्ष वक्र शृंगांचे ।
कापिति, शिवाय तैसे मजसाठीं मेष पीन देहांचे ॥ २१५ ॥
पोळावयास सूकर, पेटविती व्हल्कनोज्ज्वल ज्वाला ।
मृण्मय भांडांतोनी, वृद्धांचें मद्य घेति पीण्याला ॥ २१६ ॥
माझ्या वाटोळे ते सावध नउ रात्रि राहिले निजुनी ।
ठेविति सक्त पहारा पाळ्याही आपसांत ठरवूनी ॥ २१७ ॥
अग्नि प्रदीप्त करुनी वासगृहद्वारदेहलीभागीं ।
बहिरावर्णद्वारीं ठेविति तम दूर व्हावयालागीं ॥ २१८ ॥
आली निशा दहावी पाहुन मीं धांव घेत जो उठलों ।
कौशल्यसंधियुक्त द्वारां फोडून खोलिच्या सुटलों ॥ २१९ ॥
आवरण मंदिराचें वेगानें मी वलांडिलें उडिनें ।
मीं लक्ष्य रक्षकांचें दासींचें चुकविलें कुशल कृतिनें ॥ २२० ॥
विस्तृत हेलासांतुनि काढियला पळ थियापुरीमाजी ।
मेषप्रसवा नगरी, भूप तिचा होय पेलिअस गाजी ॥ २२१ ॥
आदर केला सदयें. दावितसे फार मग सदा माया ।
श्रीमन्त जनक जेवीं वार्धक्योत्पन्न एकल्या तनया ॥ २२२ ॥
धनवान मजासिं केलें दिधलें मज राज्य बहुत लोकांचें ।
केलें थियापुरीच्या पार दुरी स्थान राज्य विभवाचें ॥ २२३ ॥
दोलोपिअनांवरती आकिलीसा ! राज्य नीट मीं केलें ।
संगोपनपूर्वक मी प्रौढावस्थेस मींच तुज आणिलें ॥ २२४ ॥

हृदयानंदकरा ! तूं अन्यासह भोजना न गेलास ।
अपुल्या वाड्यांतहि तूं नाहीं अन्नास कधिंहि शिवलास ॥ २२५ ॥
पायांवर मग घेउनि मी द्यावे तुज करोनिया घांस ।
तेव्हां व्हावें सुख तुज. द्यावें मग मद्य मधुर पीण्यास ॥ २२६ ॥
बहुवार भिजविलें त्वां अंगांतिल चोलवस्त्र मम सारें ।
+ मद्याचे चूळ तुवां टाकावे ! राग कोण बाळा रे ! ॥ २२७ ॥

+ हें याचें लांबलचक भाषण वाचून यानें काय बडबड लावली आहे अशी समजूत वाचकांची होईल. परंतु त्याचें वार्धक्य लक्ष्यांत घेतलें ह्मणजे हें भाषण त्यास उचितच आहे अशी खात्री होईल. या शिवाय याच्या या भाषणांत एक मोठी खुबी आहे. जेव्हां एकादा मनुष्य विस्मरणानें किंवा हट्टानें अथवा गैरसमजानें त्याच्यावर प्रेम करणाऱ्यावर रागावून किंवा रुसून बसतो व त्याविषयीं चित्तांत फार कठोरपणा बाळगतो तेव्हां त्याच्या हृदयास द्रव आणण्याकरतां वाक्यविशारद लोक त्याला एकादें हृद्गत निवेदन करतात व त्याच्या मनाला अंशतः तरी द्रव आणूं शकतात. उदाहरणार्थ, शकुंतला ऋषीकुमार बरोबर देऊन पतिसदनीं पाठविली असतां दुष्यन्तास शापयोगानें तिचें विस्मरण होऊन त्यानें तिचा स्वीकार करण्याचें नाकारिलें. त्याबरोबर राजास स्मरण देण्याकरतां तन्नामांकित मुद्रा हस्ताचे ठायीं पाहूं लागली. पण ती कशी सांपडणार ? ती आधींच शचीतीर्थाचें वंदन करतांना पाण्यांत निसटून पडली होती. मुद्रा नाहीं असें पाहून शकुन्तलेनें राजास स्मरण होण्याकरतां एक हृद्गत निवेदन करून पाहिलें तें असें:—

महाराज ! असें पहा, एक दिवस आपण नवमालिकामंडपांत बसलों असतां कमळाचे पानाचा द्रोण करून तो पाण्यानें भरून आपण तळहातावर ठेविलात व आपण पाणी सेवन करणार तोंच माझा पुत्राप्रमाणें प्रिय असा

ऐसे लाड सदोदित, सोसुनिया कष्ट, बहुत मीं केले ।
केला विचार कीं मज पोटीं संतान ईश्वरें न दिलें ॥ २२८ ॥
सुरतुल्यच्या अकिलीसा ! पुत्र तुला मी सदैव मानावें ।
ह्मणजे पूर्ण निवारण निपुत्रतेच्या कुनियतिचें व्हावें ॥ २२९ ॥
संहर! हे! अकिलीसा! संहर! निज कोप हा अनुपमित रे।
वीराच्या ह्रदयिं सदा क्रौर्याचा वास होय अनुचित रे ॥ २३० ॥
अधिक बळानें मानें गुणयोगें देव, तेहि मृदु होती ।
धूपें व्रतयागें वा पापें हरतात लोककृत हो तीं ॥ २३१ ॥
जोव्हाच्याच सुतात्या असती तुज ठाउक्या प्रार्थनाही ।
पंगु वलीयुत असती दृष्टीची ज्यांस सरलता नाहीं ॥ २३२ ॥
एटीमागुन जाती, चिंतेनें ग्रस्तह्रदय असति सदा ।

दीर्घापांग नावाचा हरिणशिशु आपल्या अगदीं जवळ येऊन उभा राहिला. ‘अरे याला आधीं पिऊं दे’ असें सदयान्तःकरणानें ह्मणून त्याचा च्छंद पुरवूं लागलांत. परंतु त्याचा व आपला परिचय नसल्यामुळें आपल्या हातांतून तो पाणी पिईना. नंतर त्याच द्रोणांत मी जेव्हां आपल्या हातांत पाणी घेतलें तेव्हां त्यानें मनःपूर्वक उदक सेवन केलें. तें पाहून आपणास फार हसूं आलें व ह्मणालांत ‘बरोबरच आहे जो तो स्वजातीयांवरच विश्वास ठेवतो तुह्मी दोघही अरण्यवासी पडलांत’! **कालिदासकृत शाकुन्तल.**

अपत्यवात्सल्यानें पायांवर घालून अथवा कडेवर घेऊन भवनाङ्गणीं फिरवितांना कावळा व चिमणी दाखवून हट्टी मुलांस भरवतांना व पाणी पाजतांना ज्यांचीं वस्त्रें बाळलीला ह्मणून त्यांनीं टांकिलेल्या चुळानीं कधींतरीं भिजलेलीं आहेत, निदान दुसऱ्याचीं भिजलेलीं तरी पाहिलीं आहेत, त्या भाग्यवान प्राण्यांस फीनिक्सानें कथन केलेल्या हृद्गताची खुबी चांगली कळेल.

एटी सद्दढावयवा धावे याच्या पुढें जगीं भयदा ॥ २३३ ॥
मांसल तनु ही जात्ये सर्वांच्या आधिं सर्व देशांत ।
पींडा देत नरां ही, ती या करितात मागुनी शांत ॥ २३४ ॥
जो जो जोव्हसुतां यां मानी त्या त्या सहाय होतात ।
चित्तीं घेति विनन्तिस, यांतें झिडकारणें कठिण सतत ॥ २३५ ॥
झिडकारिल्यास हट्टें जाती जोव्हापशीं खरोखर या ।
विनविति कीं एटीतें याच्या पाठीस लाव या समया ॥ २३६ ॥
पींडा त्यास करुनही शिक्षा करवितिल योग्य बहुतांशीं ।
ह्मणुनी अकिलीसा तूं द्यावा सन्मान जोव्हदुहितांशीं ॥ २३७ ॥
सन्मानें शूर लवे. करितो तव एत्रिअसज अज मान ।
देता न देणग्या हा, देइन दुसऱ्या असेंहि ह्मणता न ॥ २३८ ॥
क्रोधावेशें जळता, तर मग उपदेशिलें तुला नसतें ।
कीं क्रोधा सोड अतां ग्रीकांचें व्हावयास रक्षण तें ॥ २३९ ॥
आतांचे आतां धन देउनि बहु ह्मणत बहुत देईन ।
मनधरणी तव करण्या धाडि अह्मां भूप होउनी दीन ॥ २४० ॥
ग्रीकोत्तमांतुनी ते धाडी जे होति तुजसिं संमत रे ।
निन्दीं न ताद्विनंतिस, तत्कार्या तुच्छ मानणें न बरें ॥ २४१ ॥
दोष तुझा नव्हता रे ! आला तुज राग तेंहि योग्य असे ।
वीरांचे पहिल्यांचें वृत्त असें ऐकण्या अह्मां गवसे ॥ २४२ ॥
दानें उपायनांच्या पावे तत्क्रोध सत्वरी शमन ।
किंवा मधुरवचानें पूर्णपणें होतसे समाधान ॥ २४३ ॥

आठवतें मजलागीं वृत्त पुरातन, न होय आतांचें ।
कसलें वृत्त बघा तें ? कथितों मित्रांस बोलुनी वाचे ॥ २४४ ॥
क्यूरीतिअनांसंगें समरिं ईतोलिअन लढत झुंझार ।
कालिद्नाच्या भोंवतिं कंद्न झालें खरेंच अनिवार ॥ २४५ ॥
ईतोलिअन श्रमती, राखाया उच्च कालिद्न नगर ।
क्यूरीतिअन पहाती ध्वंसाया तेंच करुनियां समर ॥ २४६ ॥
लावुन देई कलहा देवी हेमासनस्थ दायाना ।
ईनियुसें कां न दिलें पहिलें तें पीक यज्ञयागांनां ॥ २४७ ॥
क्षेत्राची फलवत्ता पाहुनियां कोप हीस बहु आला ।
शतमेधांची पूजा झाली ती प्राप्त अन्य अमरांला ॥ २४८ ॥
जोव्हसुतेला पुजिलें एकलिला कां न यज्ञ करुन भला ? ।
अविचार ह्मणा केला, किंवा या विसर एवढा पडला ! ॥ २४९ ॥
जोव्हसुता शरधिप्रिय वन्य वराहा तयास्थलीं धाडी ।
तो शुभ्रदंष्ट्र तेथें लवकर अभ्यस्त करित नासाडी ॥ १५० ॥
तुंग समूल तरू तो लोटितसे एक एक बहु खालीं ।
फलदायी कुसुमांची भूमीवर वृष्टि निष्फला झाली ॥ २५१ ॥
नगरें धुंडाळोनी व्याधां श्वानांस जमवुनी फार ।
मीलीएजर नंतर ईनियुसात्मज तया करी ठार ॥ २५२ ॥
थोड्याशा मर्त्यांला, बसला तो काय हो बधायाला !
पशु भूदारक बहुतां लावि चितेवरतिं हो चढायाला ! ॥ २५३ ॥
झाला वराह हत मग धूमाकुल मातवीत दायाना ।

क्युरीतिअन झगडती ईतोलिअनांशिं धरुन अभिमाना ॥ २९४ ॥
हढलोमचर्म याचें भेसुर त्यां मुंडकें हवें होतें ।
मीलीएजर जों रणें तों क्यूरीतिअन होत जित होते ॥ २९५ ॥
होते अगणित तोर त्यां भिंतीविण समर झेंपलें नाहीं ।
मीलीएजर परि तो रुसुन बसे, वृत्त जाहलें कांहीं ॥ २९६ ॥
क्रोध क्षोभवि हृदयां, ज्यांच्या चित्तीं विचार, त्यांच्याही ।
आल्थीएवर झाला राग तयाचा असून माता ही ॥ २९७ ॥
पारगीतवधूनादें समरव्यवसाय सोडुनी बसला ।
क्लीओपात्रा ठाउक याची सहधर्मचारिणी सकलां ॥ २९८ ॥
मार्पेसा जिचि माता, ईव्हीनस ठाउकी जिची आजी ।
आजा इदास होता ज्याचें पृथु यश दिसून ये आजी ॥ २९९ ॥
शोभन गुल्फस्त्रीच्यास्तव नृप धनु +फीबसावरी उचली ।
आल्सायोनी संज्ञा पितरांनीं कन्यकेस या दिधली ॥ २६० ॥
कारण तन्मातेला ज्याकालीं फीबसें दुरी हरली ।
त्या कालीं तन्माता आल्सायोनीस्वरांत आरडली ॥ २६१ ॥
क्लीओपात्रावश नृप मीलीएजर धरी न रणिं काज ।

+मनाजोग्या स्त्रीच्या प्राप्तीकरतां हिंडत असतां यानें मार्पेसा नामक स्त्री पसंत केली व घरीं तिला नेऊं लागला. फीबस अपालोनें त्याजवळुन तिचें हरण केलें. त्याक्षणीं यानें त्यावर बाण सोडण्यास धनु वांकविलें. जोव्ह मध्यें पडून अशी आज्ञा करिता झाला कीं, तिला वाटेल त्याचा स्वीकार तिनें करावा. तिनें फीबस हा कदाचित् आपला त्याग करील ह्मणून इदासासच आपला कर अर्पण केला.

क्रुद्धास खेद भारी, लागोनी ध्यास राहिला आज ॥ २६२ ॥
कीं जननीनें दिधले यास शिव्याश्राप फार दुःखांत ।
विनवी ती देवां कीं केला मद्बन्धुचा तयें घात ॥ २६३ ॥
फलद धरित्रीवरतीं अपुले कर फिरुन फिरुन ती आ.टी ।
प्रासर्पैनीतें व प्लूतोतें मारि हांक ती कपटी ॥ २६४ ॥
जानुनिषण्णा मागे अश्रुस्नातस्तनी सुता मरण ।
एरिबसीं एरिन्निस तिमिरचरी अकृप हांक देत पण ॥ २६५ ॥
मग लागलीच झाली गलबल बहु कालिदनपुरद्वारीं ।
फुटले बुरूज सारे, गोंधळ लोकांतला कुण निवारी ! ॥ २६६ ॥
ईतोलिअनांतिल मग वृद्धांनीं यास विनविलें भारी ।
प्रार्थावयास अमरां प्रेषियले बहुत पूज्य पूजारी ॥ २६७ ॥
लोभें उपायनांच्या तेणें बाहेर लोक राखावे ।
क्षेत्र बिघे पंचाशत ध्याया वाटेल तें तयें यावें ॥ २६८ ॥
साऱ्या कालिदनांतिल उत्तम जो तोच भाग हा होय ।:
कृषितें समभू निर्वन, अर्धी द्राक्षीलतांस ही सोय ॥ २६९ ॥
निज तनया ईनियुस प्रार्थी बहु जरठ नृपति हयदम तो ।
याच्या वासगृहाचे उंबरठे चढुनियां न तो दमतो ॥ २७० ॥
पुत्रा प्रार्थित असता संश्लिष्टद्वार फार घडघडवी ।
अधिकाचि हा नाकारी जननी वा जों स्वसा तया विनवी ॥ २७१ ॥
प्रियतर मित्र विनविती, प्रियतम जे ते हि विनविती मित्र ।
परि नाहीं द्रवलें मन याचें हें वृत्त काय न विचित्र ! ॥ २७२ ॥

शेवटिं आवासगृहा फोडियलें जोर करुन लोकांनीं ।
तों क्यूरीतिअन पुरा जाळाया लंघिती तटा मानी ॥ २७३ ॥
नंतर सुन्दररशना तत्स्त्री नेत्रांस आणुनी पाणी ।
बंदीकृत नगरांतिल हाल जनांचे निवेदिते राणी २७४ ॥
* ' प्रथम नरांची कत्तल मागुन अग्नींत भस्म नगराचें ।
निरुंद रशनांच्या मग नारींचें हरण, तेविं बालांचें ' ॥ २७५ ॥
ऐकुन दारुण कर्मे मीलीएजर मनांत कळवळला ।
उज्वल कवचावृत निज देह करायास घाइनें वळला ॥ २७६ ॥
ईतोलिअनां वरचा तेणें मग हा प्रसंग टाळियला ।
द्रवलें चित्त तयाचें, त्यांनीं परि उक्त भाग नच दिधला ॥ २७७ ॥
केलें न काय त्यानें दूर तथापि हि अरिष्ट नीटपणें ? ।
मित्रा नलगे ह्मणुनी चित्तीं आतां विचार बहु करणें ॥ २७८ ॥
रुसवोत देव तुज नच ! रक्षण तें व्यर्थ दग्ध नांवांचें ।
घ्याया उपायनां लढ, ह्मणतिल हे ग्रीक देव तुज वाचे ॥ २७९ ॥

---

* हेंच वर्णन पोपकवीनें जरा जोरदार भाषेंत केलें आहे.

विध्वंस मंदिरांचा ! मोठा संहार वीरजातीचा ! ।
दास्यें छल पौरांचा ! बलसंभोगें तसा पुरंध्रींचा ! ॥

शत्रूच्या वेढ्यांत सांपडून फोकियन लोकांच्या झालेल्या नाशाचें वर्णन डेमास्थनीसनें असेंच केलें आहे. "उध्वस्त मंदिरें, व पुराचे उच्छिन्न तट, जिकडे तिकडे दृष्टीस पडत होते! बाल्यावस्था सोडून प्रौढदशापन्न झालेले असे जीवन्त नागरिक कोठेंच दिसत नव्हते ! कांहीं ठिकाणीं थोड्या स्त्रिया व अर्भकें व दुर्दैवी जराजर्जरित पुरुष मात्र आढळत होते !

टाकुन उपायनें हीं, शिरशिल जर जीवघातक रणीं रे ।
संकट वारोनी ही इतकी सन्मान्य तव न करणी रे " ॥ २८० ॥
बोले चपलचरण तो उत्तर देतां तयास अकिलीस ।
"जोव्हप्रिय फीनिक्सा ! असला मज मान दे न तुष्टीस ॥ २८१ ॥
मान्यवरा तातसमा ! जोव्हाज्ञेनें सुकीर्ति मज लाधे ।
राहिन येथ वसे जों श्वास उरीं, चालणें पदां साधे ॥ २८२ ॥
सांगेन अधिक तुज मी, त्याचें चित्तांत चालवीं मनन ।
मज्जीवा न छळावें, न करीं आक्रोश दीर्घ रोदन न ॥ २८३ ॥
तेणें एत्रिअससुता देतोसी सौख्य दावुनी माया ।
प्रेमखरें मम तुजवर, परि नच रोपा मदीय सीमा या ॥ २८४ ॥
×ज्यानें त्रास दिला मज त्या त्वांही पाहिजे दिला त्रास ।
मद्भाग्यार्धा घेशिल जर या संभाळशील तंत्रांस ॥ २८५ ॥
कथितिल निरोप हे मम, येथ रहा पडुन झोंप घे शयनीं ।
जावें न वा रहावें, ठरवूं जों सुप्रभात हो रजनी " ॥ २८६ ॥
पत्रोक्लशास खुणवी भ्रूभंगें करुन तो असें वचन ।
फीनिक्सास्तव घालीं शय्या येथें करावया शयन ॥ २८७ ॥
तंबूंतून निघाया बघती हे शक्य ती त्वरा करुन ।
तेलामोनिअन वदे सुरसम आजक्ष तो तयां दुरुन ॥ २८८ ॥
"लाअर्टीसज ! जाऊं, हे जोव्होत्पन्न सुज्ञ युलिसीस ! ।

× जे तत्सख तद्रिपु ते मत्सख मद्रिपु खरे अगा राया ।
श्रीकृष्णानीं पांडवांस उद्देशून दुर्योधनाजवळ असें ह्मटलें आहे.

साधाया हेतु गमे नाहीं येणार सुयश उक्तीस ॥ २८९ ॥
नाहीं निदान पथ हा. ग्रीकां सांगावया निरोप हवा।
बघतात वाट अपुली अप्रिय उत्तर निवेदण्या धावा ॥ २९० ॥
अकिलीसाच्या हृदयीं आत्मा निष्ठुर सदर्प वास करी।
अत्याग्रही असे तो, मित्रांचा स्नेह ही न मान्य धरी ॥ २९१ ॥
त्या सर्व नौसमूहीं अन्यांहुन फार या दिला मान।
कोणी घेइ विचारी भ्रातृवधाचें भरून नुकसान ॥ २९२ ॥
कोणी पुत्रवधातें विसरे; धरि नांदतो खुनी स्वजनीं।
घेउनि हानि भरोनी बाळगितो क्रोध मागुनी न मनीं ॥ २९३ ॥
देवांनीं दिधला तुज आत्मा हृदयांत अधम रे! अदया।
आग्रह सोडित नाहीं! झाली प्रमदा निमित्त एक तया ॥ २९४ ॥
तीहुन विशेष सुन्दर, देतों प्रमदा तुला अतां सात।
देतों उपायनें वरि व्हावें आतां प्रसन्न हें उचित ॥ २९५ ॥
आह्मीं ग्रीक अतिथि तव वलभीच्या खालते उभे आहों।
इच्छा मनिं कीं मोठा मान घराचा तुझ्या जरा राहो ॥ २९६ ॥
दिसतात एकियन जे त्यांहुनि सर्वांहुनी अतां तव रे!।
स्नेही प्रियतम होऊं इतुकें करिं तूं अभीष्ट अल्प बरें "॥ २९७ ॥
उत्तर यातें देतां बोले अकिलीस मग चपलचरण।
" आजक्ष! लोकनायक! हे तेलामनज परिस वचन पण ॥ २९८ ॥
अंतःकरणापासुन वाटे तूं बोलतोस, परि मम तो।
चित्तांत कोप चढतो एत्रिअसाची जशी कृति स्मरतों ॥ २९९ ॥

केला ग्रीकांमाजी माझा अपमान मीं जणूं परका ।
जावें तुह्मीं आतां, सांगायातें निरोप विसरुं नका ॥ ३०० ॥
ग्रीकांतें संहरुनी प्रायमसुत समरशूर हेक्तर तो ।
मिर्मिदनांच्या नौकाभागीं जों पोंचला नृवीर न तो ॥ ३०१ ॥
जाळी न नौसमूहा तों नलगे मजासिं रक्तमय समर ।
तंबूला नौकेला मम तो परि नच शिवेल भूपवर" ॥ ३०२ ॥
ऐसें भाषण होतां सारे करिं जोडपात्र घेऊन ।
साधून पेय तर्पण पोतावलिमार्गे जाति चालून ॥ ३०३ ॥
युलिसीस पुढें चाले; इकडे दासींस आणि दासांस ।
पत्रोक्लश आज्ञा करि शय्या घन रुंद मग रचायास ॥ ३०४ ॥
आज्ञा प्रमाण मानुनि शय्या रचिली निरुंद घन त्यांनीं ।
आच्छादन वस्त्रांनीं क्षौमांनीं सुभग मेषचर्मांनीं ॥ ३०५ ॥
तेथें वृद्ध पडोनी, वाट बघे तो प्रभात समयाची ।
तंबूच्या अभ्यंतरिं, अकिलीसा सोय ती निजायाची ॥ ३०६ ॥
जवळी श्रान्त सुखानें गौरकपोला विशुद्ध ती ललना ।
फोर्बासजा प्रसिद्धा दायोमीदी सखी ललितरशना ॥ ३०७ ॥
पूर्वीं तिजला अणिलें, जेव्हां हा ये बघून लेस्बास ।
पत्रोक्लशास होती सोय निजायास अन्य ठायास ॥ ३०८ ॥
श्रमुनी जवळी पडुनी चारुकटी इफिस सेवि सौख्यास ।
अकिलीसें यास दिली अणुनी जिंकून नगर सैरास ॥ ३०९ ॥
हें नगर मालकीचें होतें त्या श्रेष्ठ एनियूसाचें ।

तंबूंत पोंचले ते इकडे हे लोक एत्रिअसजाचे ॥ ३१० ॥
ग्रीकांचे पुत्र तदा हस्तीं घेऊन हेमपात्रातें ।
स्वागत करुनी मानें पुसते झाले तयांस वृत्तातें ॥ ३११ ॥
प्रथम पुसे अगमेम्नन " ये बा युलिसीस ! बहुजनस्तुत रे! ।
ग्रीकांचें वैभव तूं सांगें मजलागिं आधिं वृत्त बरें ॥ ३१२ ॥
शात्रव अग्नीपासुन इच्छी नौकांस काय राखाया ।
अथवा तो नाकारी क्रोधानें ग्रस्त ह्मणुन या समया " ॥ ३१३ ॥
सोसक युलिसीस वदे " सर्वोत्तम एत्रिअसज ! हे नृवर ! ।
कोपा शमवाया तो इच्छीना उलट चिढत अधिक वर ॥ ३१४ ॥
तूझ्या उपायनांसह करित तुझा तो बहू तिरस्कार ।
हें ग्रीकसैन्य नौका रक्षाया तूंच कर तव विचार ॥ ३१५ ॥
ह्मणतो ग्रीकां पुस तूं. आणि वरी भीति घालितो तुजला ।
कीं अरुणोदय होतां तन्नौका स्पर्शतील जलधिजला ॥ ३१६ ॥
अणखी ह्मणतो इतरां ' उपदेशिन जावया घरालागीं ।
इलियम नाश न होइल ' ! त्याची आहे वरी अशी सांगी ॥ ३१७ ॥
' त्या दीर्घनाद जोव्हें रक्षाया पसरिला वरी हात ।
ह्मणुनी धीर जना ये, ' " ऐसें बोलून तो मुका बसत ॥ ३१८ ॥
हे अज मजसह आले, आजक्षासहित दूत दोन पहा ।
तुज वृत्त सांगतिल ते असती लोकीं प्रसिद्ध सुज्ञ महा ॥ ३१९ ॥
फीनिक्स वृद्ध परि तो निजला तेथेंच, यास तो सांगे ।
कीं प्रातःसमयीं जर इच्छिसि तर जावया घरा लागे ॥ ३२० ॥

इच्छेविरुद्ध परि तुज नाहीं नेणार तातदेशास " ।
परुषाक्षर वच ऐसें परिसुनि सेविति समस्त मौनास ॥ ३२१ ॥
आश्चर्य कितिक करती करती बहु काल खेद किति बसुन ।
अन्तीं वदत तयाला मग दायोमीद धैर्य मनिं धरुन ॥ ३२२ ॥
"हे थोर एत्रिअसजा! नृवरा अगमेम्नना असें! पाहीं ।
पेलिअसाच्या पुत्रा प्रार्थियलें व्यर्थ खचित लोकांहीं ॥ ३२३ ॥
अगणित उपायनें नच लगतीं त्या दस जो स्वभावानें ।
आतां गेला चिढुनी उलटा तो अधिक सरलभावानें ॥ ३२४ ॥
जावो अथवा राहो, त्याचा अजि सकळ सोडुं या नाद ।
प्रेरील ईश अथवा, येइल मनिं तर लढेल नच वाद ॥ ३२५ ॥
परि या करुंया आधीं जैसा उपदेश मी तुह्मांस वदें ।
घ्याया विश्रान्ति चला सेवुनियां अन्न, मद्य जें बल दे ॥ ३२६ ॥
चमके अरुणांगुलिची ज्यावेळीं सुप्रभात भूवरतीं ।
त्यावेळीं आणावे स्वार अणी पायदळ जरा पुढतीं ॥ ३२७ ॥
उत्साह त्यां अणावा सर्वांपुढतीं तुवां रणिं लढावें " ।
बोले ऐसें तो तें सकल नृपालांस मान्य जें व्हावें ॥ ३२८ ॥
दायोमीदाचें त्या हयदमनाचें करीत कौतुक ते ।
साधून पेय तर्पण गेले तंबूंत लोक जों नुकते ॥ ३२९ ॥
सकलश्रमपरिहारक निद्रा वर दिव्य लाधला जीवां ।
तत्सुख पडुनी सेविति आलि निशा गुंग तींत हे किंवा ॥ ३३० ॥

सर्ग १० वा.

दायोमीद व युलिसीस यांनीं रात्रीस केलेलें साहस.

सारांश:—अकिलीस वळत नाहीं हें जाणून अगमेम्नन फार हताश होतो. त्यास काळजी लागल्यानें निद्रा येत नाहीं. तो सर्व सेनानायकांसही जागे करतो व वीरसभा भरवितो. शत्रूची हालचाल काय आहे तें पाहून येण्यास हेर पाठवावे असें ठरतें. दायोमीद हेराची कामगिरी पतकरतो. युलिसीसला साथीदार ह्मणून बरोबर घेतो. याच हेतूनें ग्रीकांच्या छावणींत जाऊन येण्याकरतां हेक्तरानें पाठविलेल्या डोलननामक हेराची व यांची वाटेंत गांठ पडते. त्यास पकडून त्याजवळून ट्रोजनांस साहाय्य करणारे जे थ्रेशिअन त्यांची माहिती मिळवतात. त्याप्रमाणें हे पुढें जाऊन त्यांचा नायक जो ऱ्हीसस त्याचा वध करून त्याचेच घोडे घेऊन परत छावणींत येतात.

कालमान:—मागलीच रात्र पुढें चालू.

स्थलमान:—उभयपक्षांच्या छावण्या.

सारे ग्रीकांचे ते नौदेशीं स्वस्थ पडति सरदार ।
निद्रेच्या मृदुल भरा राहति होऊन सुवश रात्रभर ॥ १ ॥
अगमेम्नन एत्रिअसज जननायक यास गाढ झोंप नसे ।
चिंतन बहु गोष्टींचें त्याच्या मनिं सतत बिकट चालतसे ॥ २ ॥
वरचेवर गर्जतसे जूनोचा जेविं पति सुकेशीचा ।
उपलांचा व हिमाचा करण्या संपात विपुल वृष्टीचा ॥ ३ ॥
जेव्हां हिमसेकानें शेतें होतात सर्वभर धवल ।
गर्जे अथ कोठें तरि उघडाया समरमुख कटु प्रबल ॥ ४ ॥

तेवीं वरचेवर नृप अगमेम्नन कण्हतसे उरोभागीं ।
हृदयीं पीडित दिसतो होतां संत्रास तन्मनालागीं ॥ ५ ॥
वारंवार बघतसे ट्रोजनरणभूकडे स्वनेत्रांनीं ।
जळतात इलियमाच्या पुढतीं परसे ह्मणुन नवल मानी ॥ ६ ॥
वाजति कितिक तुताऱ्या, सनया, कल्होळ करति कितिक नर ।
नौकांतें सैन्यातें ग्रीकांच्या पाहतो सदा सभर ॥ ७ ॥
टाकी समूल उपटुन उद्वेगें बहुत केश डोक्याचे ।
स्मरण घडोनी चिढला आतां आकाशवासिजोव्हाचें ॥ ८ ॥
दुःखातिशयें कण्हतो पीडा बहु होतसे उरोभागीं ।
सुचलें रुचलें त्या मग पुसण्याचें मार्ग नेस्तरालागीं ॥ ९ ॥
साधा उपाय कांहीं टाळाया हें अरिष्ट कथिल जर ।
उठुनी मग गुंडाळी भूपति निज चोल तंग अंगभर ॥ १० ॥
आणि रुचिर वाहणांचा जोड तदा मसृण चरणिं घालितसे ।
पांघरि रुधिरमलिन वरि सिंहाचें चर्म थोर पिंगटसें ॥ ११ ॥
गुल्फावरी झुले तें. गच्च करीं तो धरीतसे भाला ।
भरला तसाच इकडे कंप भयें थोर मेनिलासाळा ॥ १२ ॥
नयनपुटीं न वसे तीं निद्रा ग्रीकां अपाय होइल कीं ।
दुःखें यदर्थ सोशिति अर्णव लंघून जे हवीं तितकीं ॥ १३ ॥
चित्र व्याघ्राच्या तो चर्में झांकीत रुंद निज पृष्ठ ।
शूल करीं दृढ धरुनी घाली शिरिं तेविं कवच उत्कृष्ठ ॥ १४ ॥
ग्रीकांच्या सैन्याच्या अधिपतिला थोर बन्धुराजाला ।

गेला उठवायाला सुरसम जो पूज्य होय लोकांला ॥ १५ ॥
नौकाग्रभागिं दिसला भ्राता अंगांत चढवितां कवच ।
यातें येतां पाहुन याशीं तो स्वागतार्थ करित वच ॥ १६ ॥
रणशूर मेनिलासें केला त्या प्रश्न "आज कां राया ।
झालास सज्ज! धाडिशि कोणा हेरा अरीकडे जाया ? ॥ १७ ॥
मज काळजी मनीं कीं कोणी ही कार्य हें न पतकरिल ।
जावून मध्य रात्रीं शत्रुनिरीक्षण न एकला करिल ॥ १८ ॥
त्याच्या हृदयीं वसतें धैर्य खरोखरचि जो असें साधी" ।
अगमेम्नन उत्तर दे "खचित हवा सदुपदेश अज आधीं ॥ १९ ॥
जोव्हप्रसाद बन्धो! तुजसि हवा तो हवा तसाच मज ।
हे मेनिलास ! जेणें नौदेशीं ग्रीक अभय होति अज ॥ २० ॥
जोव्हाची बुद्धि फिरे हेक्तरकृतयज्ञ त्यास आवडले ।
जोव्हप्रिय हेक्तर हा ग्रीकांवर आणवी प्रसंग भले ॥ २१ ॥
एका दिवशीं केलीं दुष्कर कृत्यें अशीं न एकानें ।
ऐसा न पाहिला म्यां, अथ जो हें वृत्त ऐकवी कानें ॥ २२ ॥
देवीचा देवाचा सुत नोहे खचित वीर हेक्तर तो
आश्चर्य काय सांगूं समरीं साहस सदा कसें करतो ! ॥ २३ ॥
याची समरक्रीडा वाटे ग्रीकांस बहुत जांचेल ।
ग्रीकांतिल एकहि जण झाली ती दुर्दशा न विसरेल ॥ २४ ॥
जा आतां आजक्षा बोलावीं त्या इदामिनिअसा ही ।
नौदेशा धांवत जा, जातों मी नेस्तरापशीं पाहीं ॥ २५ ॥

विनवुनि बघतों जर तो उठुनी बोधील रक्षकां वाचे ।
ते ऐकतील त्याचें वच देउन लक्ष्य, जरि न इतरांचें ॥ २६ ॥
कारण अधिपति यांचा नेस्तरसुत नेमिला असे साचा ।
मदतीस कवचवाहक आहे जवळी इदामिनिअसाचा ॥ २७ ॥
मुख्याधिकार यातें सर्व दिला अपण पूर्ण विश्वासें "।
उत्तर यावर केलें रणशूरें तेधवां मेनिलासें ॥ २८ ॥
"कैशी तुझी मनीषा, म्यां ती अज नीट घेतली न मनीं ।
त्यांच्या जवळी राहूं येशिल तों वाट बघत का नयनीं? ॥ २९ ॥
आज्ञा निवेदुनी मी येऊं वा फिरुन तुजकडे परत? "।
अगमेम्नन नृवर वदे " राहीं तूं वाट तेथ मम बघत ॥ ३० ॥
नाहीं तर दोघांची होय चुकामुक उगाच येतानां !।
शिबिराचे मार्ग बहु; आतां वाटेल त्या पथें जा ना ! ॥ ३१ ॥
जाशिल तो अरडत जा; 'सावध व्हा' सांग रक्षिवर्गाला ।
*पित्रागत नांवानें मारुनियां हांक मान दे सकलां ॥ ३२ ॥
उच्च पदा अनुचित तरि कष्ट करूं; व्यर्थ होय अभिमान ।
केलें अरिष्ट संचित जोव्हें जैं आमुचें घडे जनन " ॥ ३३ ॥
ऐसें बोलुन धाडी निजबन्धूला निरोप पढवून ।
जनपाल नेस्तरापाशीं गेला नृप आपण त्वरा करुन ॥ ३४ ॥
नौके जवळी तंबुंत मृदुमंचारूढ तो तयां दिसला ।
शस्त्रें होतीं पाशीं शूलद्वय, ढाल, कवच शीर्षाला ॥ ३५ ॥

* विनयाचा धडा शिकविणारा हा उपदेश फार सुंदर आहे.

पट्टा चिवट नृपाची कंबर वेष्टोनियां बरा सजला ।
जीवध्वंसक समरीं नेतो आतां स्वकीय लोकांला ॥ ३६ ॥
कष्टद वार्धक्याच्या पुढतीं नृप जरठ हा नसे लवला ।
उचली डोकें वरतीं कोंपर टेंकून सांवरी तनुला ॥ ३७ ॥
आणि शब्द एत्रिअसजा बोले " तूं कोण एकला येशी ? ।
या कटकाच्या पार्श्वीं, रात्रीं या सांधकार नौदेशीं ! ॥ ३८ ॥
जन सर्व सुप्त झाले; सोधिशि मित्रास वा रक्षकास ? ।
बोल न येई जवळी, येसी मनिं धरुन कोणती आस ? " ॥ ३९ ॥
अगमेम्नन नृवर वदे "ग्रीकांचें तूंच असशि वैभव रे ! ।
नेस्तर ! नेलिअसात्मज ! जाणें मीं भूप एत्रिअसज बरें ॥ ४० ॥
ज्यातें जोव्हें संकटिं बुडवोनी ठेविलें असे सतत ।
श्वास वसे उरिं जोंवरि जोंवरि जानूंत बल जरा वसत ॥ ४१ ॥
तोंवरि फिरतों, नाहीं झोंपेचा स्पर्श गोड नयनांला ।
समरीं ग्रीकांवर जें येइल त्या मी भितों अरिष्टाला ॥ ४२ ॥
ग्रीकांस्तव मज वाटे भय भारी, स्थैर्य हृदयिं मम नाहीं ।
बाहेर उडुन तें ये या समयीं मज न सुचतसे कांहीं ॥ ४३ ॥
करशील यत्न जर तूं; झोंप तरी येतसे कुठें तुजला ? ।
चल ये जाऊं खालीं पाहाया रक्षकांस आजि सकलां ॥ ४४ ॥
कष्टें श्रान्त असाति ते लघुनिद्रेच्या सुखास अनुभवितां ।
रक्षणकार्या गेले विसरुनियां हेंच संभवेल अतां । ॥ ४५ ॥
शत्रूचा तळ पडला जवळी आह्मां न समजतें कांहीं ।

रात्रीच्या समयीं हे आतां करणार युद्ध कीं नाहीं" ॥ ४६ ॥
नेस्तर उलट तयाला बोले सरदार तो जिरेनिअन ।
"अगमेम्नन ! एत्रिअसज ! दिसतें मज जों करीतसें मनन ॥ ४७ ॥
कीं जोव्ह सुज्ञ करिल न हेक्तरचातुर्य सफल तें सकल ।
आशा पूर्ण यशाची, शक्य तरी तो करील ती विफल ॥ ४८ ॥
अकिलीस वीर मनिंचा त्यजिल जर चण्ड कोप या समया ।
तर तो मला गमे कीं हेक्तर बैसेल धरुन अधिक भया ॥ ४९ ॥
आपण होउन येतों, ईर्ष्या आणूं बरीच अन्यांला ।
युलिसीसा, आजक्षा, फैलीअसजा प्रचण्ड वीरांला ॥ ५० ॥
अणि त्या दायोमीदा बघ कोणी जर तयार जायास ।
सुरसम आजक्षाला बोलविण्या अणि इदामिनिअसास ॥ ५१ ॥
दूर तयांच्या नौका, इथुनी नाहींत त्या मुळीं जवळी ।
प्रिय पूज्य होय मज जरि, चिढवाया योग्य मेनिलास बळी ॥ ५२॥
लपवुन ठेवित नाहीं, धरशिल माझ्या वरी जरी राग ।
आपण झोंपा काढी, श्रम तुज करण्यास लावि कां सांग ॥ ५३ ॥
त्यानें कष्ट करावे विनवावे मुख्य मुख्य सरदार ।
आलें आह्मांवरतीं संकट तें दुःख देतसे फार" ॥ ५४ ॥
अगमेम्नन नृवर वदे "दूषण दे त्यास अन्य समयास ।
सुचवीन मीच तें तुज; बहु वेळा हा प्रमाद करि खास ॥ ५५ ॥
उद्यम यास न अवडे, वश आलस्या तसाच अविचारा ।
माझ्या कडे बघोनी व्हावा आरंभ वदत परभारा ॥ ५६ ॥

परि तो आधीं उठला जवळ उभा राहिला तयार अज ।
तूं सोधिशी तयांनां सोधाया धाडिला तया सहज ॥ ५७ ॥
चल जाऊं मिळतिल हे रक्षकवर्गांत थोरल्या द्वारीं ।
कारण सांगितलें मीं जमवाया तेथ मंडळी सारी " ॥ ५८ ॥
मग त्या उत्तर देई नेस्तर सरदार तो जिरेनिअन ।
" ग्रीकांमाजी तर मग यावरि धरि राग तो असे न जन ॥ ५९ ॥
अवमानी कोण वचा, आज्ञेचा शब्द कोण मग टाळी " ।
ऐसें भाषण करुनी तनुभोंवतिं दीर्घ चोल गुंडाळी ॥ ६० ॥
चढवी उपानहांचा जोड पदीं मसृण रुचिर चर्माचा ।
फांसा लावुन चढवी अंगिं झगा पघळ धूम्र वर्णाचा ॥ ६१ ॥
सजला वरी दुहेरी लोंकरिचा सघन मृदुल मृदुल थर ।
पित्तलमयाग्रभाला करिं धरिला मग तयें अति प्रखर ॥ ६२ ॥
नौदेशा गेला तो, असति जिथें कास्यकवच एकियन ।
उच्चस्वरांत अरडे नेस्तर सरदार तो जिरेनिअन ॥ ६३ ॥
जोव्हसमानप्रज्ञा युलिसीसा निद्रिता करी जागा ।
तन्मस्तकिं भरला ध्वनि बोले सोडून तंबुची जागा ॥ ६४ ॥
" कां हो कां नौदेशीं फिरतां कटकांत? विनवितों सांगा ।
अमृतमयी रजनी कां घालवितां? भीति काय ये आंगा?" ॥ ६५ ॥
प्रत्युत्तर त्या देई नेस्तर सरदार तो जिरेनिअन ।
" युलिसीस! जोव्हसुत! हे लाअर्टीसज! करीं न कुपित मन ॥ ६६ ॥
ग्रीकांवर तसलेंची संकट गुदरोन आज रे बसलें ।

उचित पलायन रण वा, इतरां चतुरा पुसावयास चलें " ॥ ६७ ॥
बोले हा ऐसें मग जाउन तंवूंत सुज्ञ युलिसीस ।
त्यांमागें जात असे अंसीं लटकवुन चित्र ढालीस ॥ ६८ ॥
गेले दायोमीदा भेटाया सर्व तैदिअसजा ते ।
तंबूंच्या बाहेरचि पुढती बघती सशस्त्र ते त्यातें ॥ ६९ ॥
सहचर निजले भोंवतिं, ढाली घेवोनियां उशाखालीं ।
शूलांची पंक्ति सजे दुरुनी बघता निखात भूमितलीं ॥ ७० ॥
बिजली जोव्हाची जणुं चमके अग्रांवरील ती पितळ ।
नरवीर सुप्त परि तो, वृषभाचें चर्म अंथरुन सरळ ॥ ७१ ॥
होतें एक उशाला विस्तृत मउ वस्त्र शबल तें रुचिर ।
नेस्तर उठवी यातें हलवोनी पादमूल तो स्थविर ॥ ७२ ॥
निर्भर्त्सीत तयाला उघडपणें " ऊठ तैदिअसतनया ! ।
रात्रभरी निद्रेच्या छंदीं तूं मग्न होसि कां वायां ?॥ ७३ ॥
नौदेशाच्या सन्निध, समभूवर उच्च थोरल्या जागीं ।
देती त्रोजन तळ ही कैशी अज माहिती न तुजलागीं ॥ ७४ ॥
मध्यें अंतर उरलें बघ रे अगदींच थोडकें आतां " ।
परिसुन वच घेत उडी निद्रेंतुन गडबडून अज उठतां ॥ ७५ ॥
करि मग सरस वचा तो " वृद्धा ! असशी बहुश्रमक्षम रे ।
चालवसी सतत कसे विश्रान्तीवीण हे परिश्रम रे ॥ ७६ ॥
पुत्रांत ग्रीकांच्या ज्वान न उरले कसे कुणी दुसरे ।
उठवाया अन्यनृपां, सकलदिशांनीं न काय जातिल रे ॥ ७७ ॥

परि हे वृद्धा! गमतें होशिल तूं श्रान्त ही न शक्य कथा" ।
उत्तर नेस्तर या दे " मित्रा तूं बोललास हें न वृथा ॥ ७८ ॥
मजला निर्दोष असे असति खरोखर अनेक ते तनय ।
असति स्वार बहुत मम करतिल आमंत्रणास जे अभय ॥ ७९ ॥
ग्रीकां आपन्नदशा क्षुरधारेवरतिं तोलुनी धरिते ।
संहार घोर मांडिल अथवा रक्षील जीव बघ जरि ते ॥ ८० ॥
जाई तूं तरुण तरी, आजक्षा जाउनी अतां उठवीं ।
फैलीअसजा उठवीं, करुणा माझी सुटावयास हवी" ॥ ८१ ॥
पहिला बोले ऐसें दुसरा घेऊन चर्म सिंहाचें ।
अंसांवर गुंडाळी स्पर्शितसे अग्र जें पदतलाचें ॥ ८२ ॥
शूल करीं घेवोनी धांवे, चित्ता शिवे न भीति जरा ।
वीर दुजां उठवोनी, दावोनी मार्ग ह्मणत पुढतिं सरा ॥ ८३ ॥
जमले रक्षक जेथें तेथें हे पातले तया समया ।
सशस्त्र रक्षकनायक होते बहु दक्ष, कोठ झोंप तयां ? ॥ ८४ ॥
पर्वतानिर्गत जेव्हां वन्य पशु क्रूर ये वनांतून ।
तेव्हां तद्रव ऐकुन गोष्ठिं अजां श्वान रक्षितो जपुन ॥ ८५ ॥
लोक अणि श्वान तदा एकच ओरड तयावरी करिती ।
त्यां मग निद्रा कैंची ? नयनपुटीं झोंप यां न या रीती ॥ ८६ ॥
रात्रिस करिति पहारा, कर्णी पडतां दुरून पायचळ ।
+त्यां वाटे अरि आला ! भेणें बघती रणाकडे सकळ ॥ ८७ ॥

+इंद्रजिताचे हातचा मार मिळाल्यावर वानरांची स्थिति अशीच झाली होती.

तृणेष्वपि च चेष्टत्सु राक्षसा इति मेनिरे ॥ रामायण.

नुसती गवताची काडी हलली कीं राक्षस आले असा वानरांस भास होई.

ऐसे त्यांतें बघुनी हृष्टमनें वृद्ध धीर त्या व्याया ।
बोले मोठ्यानें तो " बाळांनों! दक्ष या रहा समया ॥ ८८ ॥
निद्रेनें घेरियलें एकालाही असें न हो व्हावें ।
सकलांनीं अरिस अतां होउनि का हास्य विषय बैसावें " ? ॥८९॥
ऐसें बोलून गेला वीर वलाडून थोर खंदक तो ।
त्यातें वीर सभेंतिल एका मागून एक अनुसरतो ॥ ९० ॥
नेस्तर तनयासह मग गेला मागून मेरिआनीस ।
बोलाविलें पुसाया होतें सुविचार यां अखेरीस ॥ ९१ ॥
बाहेर खंदकाच्या होतें स्थल शुद्ध जें शवांरहित ।
हेक्तर परते जेथुन पडतां ती रात्रि साधुनी अहित ॥ ९२ ॥
खालीं तेथ बसोनी पुसती मंत्रास करुनि हे वचन ।
त्या समयीं त्यांस वदे नेस्तर सरदार तो जिरेनिअन ॥ ९३ ॥
"सुहृदांनों ! काय न कुणि ठेविल निज धृष्ट हृदयीं विश्वास ।
मोठ्या त्रोजन सैन्यावरंतीं धांवून चाल करण्यास ? ॥ ९४ ॥
कटकान्तीं भटके त्या अरिच्या सुभटा धरावया लागीं ।
अथवा कळल्या वार्ता मंत्राची शत्रुच्या निभृत जागीं ॥ ९५ ॥
ग्रीकां जेरिस अणिलें ह्मणुनी करणार अरि पुढें काय ? ।
नौदेशासन्निध तो राहिल जाईल वा पुरा अभय ॥ ९६ ॥
जर का त्या लागीं हा सर्व सुगावा खरेंच लागेल ।
अक्षत येइल परतुनि भूमण्डळिं सुख अपार पावेल ॥ ९७ ॥
मिळविल उपायनें बहु. नौकापति येथ अमित सरदार ।

प्रत्येक त्यास देइल कृष्ण अजा एक पीन अज फार ॥ ९८ ॥
कोंकरुं तैसें देइल चिकटे ओंटीस जें बहु ल्हान ।
ही संपदा न कोठें ! उत्सविं भोजनिं मिळेल बहु मान " ॥ ९९ ॥
ऐसें तो वदला मग सारे मौनास सेवुनी बसले ।
रणशूरें केलें हें दायोमीदें सुवचन मान्य भलें ॥ १०० ॥
" नेस्तर ! मन्मन कथि मज कटकीं निःशंक शत्रुच्या जाया ।
आतां प्रवृत्त झालों. संगतिला एकजण तुह्मांतुन या ॥ १०१ ॥
उत्साह अधिक येइल कारण होईल अधिक सौख्यास ।
दोघे जातां हितपथ दिसतो एकास जो न अन्यास ॥ १०२ ॥
परि एकलाच असतां अवलोकिल गोष्ट एक जर कांहीं ।
होतो न बोध सत्वर येतें बल निश्चयास नच पाहीं" ॥ १०३ ॥
एस तो वदला मग बहुतां वाटे तयासहित जावें ।
आजक्षद्वय इच्छिति मार्साचे दास ते मनीं भावें ॥ १०४ ॥
नेस्तरसुत इच्छितसे, इच्छितसे थोर मेरिआनीस ।
इच्छी एत्रिअसज तो जायातें मेनिलास मदतीस ॥ १०५ ॥
सोसक युलिसीस मनीं इच्छी अरिभार भंगुनी जाया ।
भारी धृष्टहृदय तो. अगमेम्नन मग करीत वचना या ॥ १०६ ॥
" माझ्या हृदयानंदा ! दायोमीदा ! सुतैदिअसतनया ! ।
झाले सज्ज बहुत हे. शूरतमा निवड संगतिस याया ॥ १०७ ॥
घे आवडेल तो तूं दुसऱ्या गोष्टींकडे नको बघणें ।
नातर बऱ्यास सोडुन भलत्यासंगें पडेल तुज जाणें ॥ १०८ ॥

पदवीची भीड नको, श्रेष्ठ कुळाचा नको बडेजाव ।
नलगे लहान मोठा, राजा तो, हा धरावया भाव " ॥ १०९ ॥
संशय यातें होता, होइल कीं निवड मेनिलासाची ।
दायोमीदें केली शूरें मग उक्ति सरळ जी साची ॥ ११० ॥
" ज्या अर्थीं कथितां मज सहचर वाटेल तो सवें न्याया ।
त्या अर्थीं युलिसीसा सुरतुल्या मीं शकें न विसराया ॥ १११ ॥
सुज्ञ मनानें मोठा, धैर्यानें विपुल जो करी श्रम ते ।
प्रिय फार मिनर्वेला येत असे आज पुरुष तो स्वमतें ॥ ११२ ॥
दोघे येऊं परतुन जळत्या आगींतुनी सुटून बरें ।
बहु युक्तिमान आहे. अन्य तसे नसति लोक हेंच खरें " ॥११३॥
सोसक युलिसीस वदे " निंदा स्तव उगिच काय रे करुन ?।
ग्रीकांसमक्ष कथिसी गोष्टी ठाउक तयांस या असुन ॥ ११४ ॥
जाऊं चल पण आपण, रात्र पळे ही सकाळ ये हाता ।
वर तारका अल्या किति यामा बहुतेक निर्गता आतां ॥ ११५ ॥
भागद्वय जावोनी उरला नुसता तृतीय तो भाग " ।
ऐसें बोलुन होतां शस्त्रांनीं भयद सजविती आंग ॥ ११६ ॥
दायोमीदा तेव्हां देई निज असि थ्रासिमेदीस ।
नौदेशीं निज विसरे ह्मणुनी हा देत ढाल जोडीस ॥ ११७ ॥
वृषचर्मीचें घाली कवच शिरीं ज्यास कोन तो नाहीं ।
हलतो तुरा न ज्यावर साधें जें घालती मुलें कांहीं ॥ ११८ ॥
तूणीर चाप अणि असि युलिसीसा देत मेरिआनीस ।

चर्माचें शिरिं घाली कवच जया बंद आंत बळकटिस ॥ ११९ ॥
गजदन्तशुभ्र वरतीं शोभतसे दन्त तो वराहाचा ।
चातुर्यें मढवुनियां होता जो अचल बसविला साचा ॥ १२० ॥
आंतून लोंकरीचें अस्तर होतें जयास शिंवलेलें ।
ईलीअनांतुनी जें मंदिर फोडुन होय आणिलेलें ॥ १२१ ॥
हार्मीनससुत ठावा आमिन्तर त्याचिया पुरांतून ।
आतोलैकस आणी, टाकी दुसऱ्यास तोहि देऊन ॥ १२२ ॥
स्कान्दीएतें न्याया घेत सिथीरिअन आम्फिदामास ।
अणि मोलसास देई खूण तया होत आतिथेयास ॥ १२३ ॥
तेणें तनया दिधलें घालाया नित्य मेरिआनीसा ।
तें एकवार घालुन देत असे आज वीर युलिसीसा ॥ १२४ ॥
भयदां शस्त्रां चढवुनि केली त्यांनीं त्वरा निघायास ।
सैन्याधिपां तिथेची टाकोनी शीघ्र करित गमनास ॥ १२५ ॥
मार्गीं पलास धाडी क्रौंचातें त्यां न जो दिसे नयनीं ।
अंधेरी रात्रि असे, पंखाचा फडफडाट ये कानीं ॥ १२६ ॥
विहगागमनें प्रमुदित युलिसीस स्तवितसे मिनर्वेला ।
" ईजिसधर जोव्हसुते ! असासि उभी कठिण येत जों वेळा ॥१२७॥
गेलों दुरी जरी मी तुजसिं तरी पडत गे नसे विसर ।
आज मिनर्वे ! परिसें, फिरुनी मजवर अनुग्रहासिं कर ॥ १२८ ॥
वर देई कीं 'विजयी होउन येईन परत नौभागा '।
अतिमात्र शौर्य करुं दे त्रोजन जेणें सखेद रडतिल गा " ॥१२९॥

नंतर दायोमीदें रणशूरें मांडिलें अशा स्तुतितें ।
" प्रार्थितसें अज मी तुज, अजिते ! परिसें विनंति जोव्हसुते ! ॥१३०॥
तूं राख पाठ माझी, पूर्वी जैशी मदीय पितयाची ।
एकियनांच्या तर्फे होती वकिली यदा करायाची ॥ १३१ ॥
आसोपसतीरीं त्या ग्रीकां सोडून थीबपुरिं गेला ।
काड्मिअनांतें जेणें जातां संदेश सौम्यसा नेला ॥ १३२ ॥
परतुन येतां तेणें केलीं कृत्यें अनेक दुष्कर गे ।
साहाय्य देवि होतें तूझें, तूं पाठिशिं उभी मागें ॥ १३३ ॥
राख मला तेविं अतां अर्पिन तुज एकहायनी गोजी ।
रुंदकपाला दम्या, केव्हां ही जोडिली रथा नच जी ॥ १३४ ॥
अर्पिन गे तुजला ती मढवुन शृंगें तिचीं सुवर्णानें " ।
करिती ते स्तवन असें. देवी ऐके बहूत अभिमानें ॥ १३५ ॥
विनवोनी प्रबलेतें जोव्हसुतेतें, सवेग हे निघती ।
सिंह जणूं जोडीनें आक्रमताती अरण्य निबिड अति ॥ १३६ ॥
अंधेऱ्या रात्रींतुनि कदनाच्या भूमिवरुन हे पळती ।
राशींतुनी मृतांच्या, शस्त्रांचा थोर भार उत्क्रमती ॥ १३७ ॥
शूरत्रोजन वीरां निजुं न दिलें हेक्टरें परी इकडे ।
जननायका व भूपा जमवी जो जो तयास दृष्टि पडे ॥ १३८ ॥
आमंत्रित वीरांतें प्रश्न विचारी करी शहाणपण ।
"कोण" पुसे " मजसाठीं साधुन हें कार्य जिंकि आज पण ? ॥१३९॥
उत्तेजनार्थ देऊं रथ अणि हय ज्यां कठोर आयाळ ।

ग्रीकांच्या नौभागीं मिळतिल हय ज्यां समान नच चपळ ॥ १४० ॥
देऊं इतुकें त्याला—धीर करिल जो तयास यश मिळणें ।
नौभागीं जाउनियां शोध तयानें अवश्य हा करणें ॥ १४१ ॥
नौकागण रक्षाया दक्षपणा शत्रु दाखविल पाहिला ! ।
अस्मत्करजित अथवा पळण्याचा बेत करिल काय भला! ॥१४२॥
रात्रीं न जागतिल ते सैनिक जे कष्ट करुनियां दमले" ।
ऐसें तो बोले मग सारे मूकत्व सेवुनी बसले ॥ १४३ ॥
पुत्र युमीदीसाचा, एकुलता एक राजदूताचा ।
भगिनी पांच तयाला संभव कनकादि लाभ होण्याचा ॥ १४४ ॥
दिसला कुरूप तरी तो, होता बहु चपल मार्ग चालाया ।
राहुन उभा वदे तो त्रायस्थां हेक्तरा तया समया ॥ १४५ ॥
"हेक्तर ! मद्हृदयींचें धैर्य कथी जावयास नौदेशा ।
वार्ता हरावयातें; उचलुन कारें राजदण्ड लोकेशा ॥ १४६ ॥
शपथ करीं कीं देइन मोर्दे रथ सहय पेलिअसजाचा ।
*चित्रित जो पितळेचा; होइन मग हेर सदुपयोगाचा ॥ १४७ ॥

---

* कोणी दीक्षा घेतलेले, जटा वाढविलेले व डोकें मुण्डन केलेले, गोचर्म व कृष्णाजिन अंगावर घेतलेले, विद्रुप व सुरूप असे बहुरूपें धारण केलेले हेर रावणाच्या नगरांत मधल्या चौकांत मारुतीला आढळले असा रामायणांत उल्लेख आहे.

दद‍र्श मध्यमे गुल्मे राक्षसस्य चरान् बहून् ।
दीक्षिताञ्जटिलान् मुण्डान्गोजिनाम्बरवाससः ॥
विरूपान् बहुरूपांश्च सुरूपांश्च सुवर्चसः । इ०

करिन न निराश तुजला, कटकीं इतका प्रवेश मी करिन ।
अगमेम्नन नृपतीची नौका गांठीन जों बघे अरि न ॥ १४८ ॥
तेथें जननायक ते बसले असतिल विचार जरि करित ।
काय बरें पतकरणें, युद्ध रणीं वा पलायन त्वरित! " ॥ १४९ ॥
ऐसें भाषण परिसुनि हेक्तर उचलून राजदण्ड धरी ।
घेई शपथ किं " होवो जूनोपति जोव्ह साक्षि या प्रहरीं ॥ १५० ॥
हय हे अन्या कोणा नेतिल नच वाहुनी त्रोजनास ।
सारें भाग्य तयानें कथितों येइल तुझ्याचि वांट्यास " ॥ १५१ ॥
ऐसें तो वचन करी. त्यानें परि घेतली वृथा शपथ ।
व्यर्थ दिलें या मूढा उत्तेजन घ्यावयास समरपथ ॥ १५२ ॥
धनु वक्र अंसिं लटकवि धूसर वृकचर्म पांघरी वरुन ।
नकुलाच्या चर्माचें कवच शिरीं घालि शूल करिं धरुन ॥ १५३ ॥
नौभागपथें चाले, परि येउनियां सजीव हा परत ।
सांगेल हेक्तरातें वार्ता काढून काय दैवहत! ॥ १५४ ॥
अश्वसमूहांतुनि तो जनसंमर्दातुनी पुढें निघत ।
युलिसीस तों बघे या, दायोमीदास सत्वरीं वदत ॥१५५ ॥
" दायोमीदा! बघ रे! कटकांतुन कोण येत माणुस रे! ।
नौभागीं हेर फिरे अथवा लुटण्या शवांस चोर बरें! ॥ १५६ ॥
जाऊंदे कांहींसा आधीं या चालुनी रणपथातें ।
नंतर यावर धांवत जाउन मागून हळुच धरुं यातें ॥ १५७ ॥
धांवेल अधिक जर हा तर ह्यावर चालवोनियां भाला ।

कटकांतुन हाकुनियां नेऊंया नीट नौप्रदेशाला ॥ १५८ ॥
मग अपुल्या नगराला जाइल हा पळुन परत हें सांड " ।
ऐसें बोलुन दोघे पथ सोडुन लपति हळु शवां आड ॥ १५९ ॥
बेसावधपाणिं मग तो धांवत जाई तसाच मंदमति ।
अंतर पाडी तें, जें नागरुनी खेंचरें एकदम तीं ॥ १६० ॥
अहल्यभूम्युत्कर्षणकार्यीं हीं योग्य; ते न बैल तसे ।
धांवुन त्यावर गेले, स्वस्थ उभा शब्द कांहिं ऐकतसे ॥ १६१ ॥
कारण मनिं ये त्याचे कीं त्रोजन एक साथिदार अला ।
न्यायास यास फिरवुनी हेक्तर धाडीत ज्यास समयाला ॥ १६२ ॥
आटोक्यांत परी ते भाल्याच्या नीट जेधवां दिसले ।
अथवा त्याहुनि जवळी, तेव्हां शत्रू असें तया कळलें ॥ १६३ ॥
योजित जानु चपळ निज धांवाया, तोंच पाठ हे धरती ।
मृगयाकुशल गमति जणुं कुक्कर हे तीव्रदंत वनिं पळती ॥ १६४ ॥
शशका बालमृगा वा करतां चीत्कारशब्द अनुसरती ।
युलिसीस तैदिअससुत दोघेजण पाठलाग हे करती ॥ १६५ ॥
स्वजनांपासुन याला काढियलें दूर फार अज यांनीं ।
नौरक्षकांत जाउनि पडता तो पळत सहज पायांनीं ॥ १६६ ॥
परि तैदिअससुताला शक्ति दिली थोर त्या मिनर्वेनें ।
कीं " या क्षत मीं केला आधिं " हें जल्पो न अन्य गर्वानें ॥१६७॥
दुसऱ्याचा वार पडो मागोनी मान्य हा विचार तिचा ।
उचलोनी शूल घुसे तैदिअसज तो पराक्रमी कृतिचा ॥ १६८ ॥

बोले त्या " थांबावें अथवा तुज वश करीन शूलानें ।
मज न गमे सुटशिल तूं नाश तुझा अज मदीय हस्तानें " ॥१६९॥
ऐसें बोलुन फेंकी बुद्धया चुकवून नेम तो शूल ।
दक्षिण अंसावरुनी रुतलें भूमींत तीक्ष्ण तन्मूळ ॥ १७० ॥
स्वस्थ उभा तो राहे. कंप सुटे, स्खलन शब्द मुखिं पावे ।
दांतखिळी ही वाजे, कां नच मुख तें विवर्ण मग व्हावें ॥ १७१ ॥
श्वास तयाला लागे, तों त्या पकडून बांधिती हात ।
परि तो रडुनी विनवी " जीवाचा मम नका करूं घात ॥ १७२ ॥
देऊन खंडणी बहु घेइन मी सोडवून अपणाला ।
अयसाला पितळेला तोटा मद्गृहिं न वा सुवर्णाला ॥ १७३ ॥
अरिच्या नौभागीं मीं आहें जीवन्त हें कळून अतां ।
यांतून तात माझा देइल तुह्मांस मूल्य नच गणतां " ॥ १७४ ॥
युलिसीस सुज्ञ उलटा बोले त्या " त्वां न धीर सोडावा ।
द्यावी शिरून चित्तीं मरणाची भीति अल्प तूं अथवा ॥ १७५ ॥
ये सांग जें खरें तें; नौभागीं कटक सोडुनी येसी ! ।
तूं एकलाच फिरसी, अंधेरी रात्रि, बहर झोंपेसीं ! ॥ १७६ ॥
आला असशिल येथें राशिंतल्या या शवां लुटायास ।
टेहळणी करण्या वा हेक्तर धाडीत नौप्रदेशास ? ॥ १७७ ॥
अथवा अलास सांगें ऐसा तूं येथ अपण होऊन ? " ।
डोलन उत्तर देई, तद्गात्रां कंप येतसे भरुन ॥ १७८ ॥

"*इच्छे विरुद्ध मजला पाडियलें हेक्तरें प्रसंगात ।
देऊं करी सहय रथ पेलिअसाचा जयास जन गात ॥ १७९ ॥
विश्वस्त कार्य सांगे काळोख्या भयद रात्रिंतुन निघणें ।
अरिसन्निध जावोनी नौभागीं शोध नीट हा करणें ॥ १८० ॥
नौकागण रक्षाया दक्षपणा शत्रु दाखविल पहिला ।
अथवा अस्मत्करजित पळण्याचा बेत करितसेल भला ॥ १८१ ॥
रात्रींही जागाया तुह्मीं इच्छीतसाल जरि दमलां" ।
युलिसीस सुज्ञ बोले " मनिं धरिलेंसी अमोल देणगिला ॥ १८२ ॥
ईआसैदीसाचे आटपती शूर हय न मर्त्याला ।
त्यां हांकणें न साधे अकिलीसाच्या शिवाय अन्याला ॥ १८३ ॥
माता अमर तयाची. परि ये, तूं सांग जें असेल खरें ।
इकडे येतांना त्वां सोडियला कोठ भूप हेक्तर रे ! ॥ १८४ ॥
शस्त्रें कोठ तयाचीं? असती वद कोठरे हय तयाचे? ।
रक्षक कोठ कसे ते? तंबू वद कोठ असति इतरांचे? ॥ १८५ ॥
करितात बेत कसला? नौभागा जवळ राहतिल काय? ।
जातिल नगरा अथवा, ग्रीकांतें करुन बहुपरि अपाय?" ॥ १८६ ॥
वदत युमीदीसज तो दोलन " मीं हें निवेदितों सारें ।

---

* " हेक्तरानें मला पेलिअसाचे अश्व देण्याचें आमिष दाखविल्यावरून मी बातमी काढावयास इकडे आलों" हें दोलन खोटें सांगत आहे. कारण याच्याच मागणीवरून हेक्तरानें त्यास बातमी काढून आणण्याकरतां अश्व देऊं केले. मागील आर्या १४७ पहा.

जें सत्य तोंचि कथितों सरळपणें आणि इष्ट विस्तारें ॥ १८७ ॥
ऐलसच्या कबरीशीं, लोकांच्या संभ्रमाहुनी दूर ।
हेक्तर मंत्रिजनांशीं बसुनी अज मंत्र करितसे शूर ॥ १८८ ॥
पुसतोस रक्षकांची गोष्ट, परी निवड यांतरे नाहीं ।
त्रोजन दक्ष असाति ते ज्यांना घरदार असतसे कांहीं ॥ १८९ ॥
राहुन जागृत विनविति ठेवाया लक्ष्य एकमेकांस ।
परिजे सहाय आले दुरुनी, ते घेति निज निरायास ॥ १९० ॥
दूर सुरक्षित ठायीं ठेवियलीं बायका मुलें यांनीं ।
ह्मणती दक्ष रहावें रक्षण करण्यांत या त्रोजनांनीं " ॥ १९१ ॥
युलिसीस सुज्ञ बोले " निजले कैसे सहाय हे वद रे ।
निजले तिथें निराळे, अथवा हे त्रोजनांत सांग बरें ॥ १९२ ॥
मजला हवें कळाया." दोलन उलटा ह्मणें "अतां सारें ।
जें सत्य तेंचि कथितों सरळपणें आणि इष्ट विस्तारें ॥ १९३ ॥
एके बाजुस जलधिशिं ते पीओनिअन आणि केरिअन ।
वक्र धनुष्यें घेउन ते काकोनिअन निजति शूर जन ॥ १९४ ॥
पेलास्जिअन तसे ते लेलीगन निजति अन्य बाजुस रे ।
थिम्ब्रापाशीं निजती लिसिअन मिसिअन सगर्व ते दुसरे ॥ १९५ ॥
फ्रिजिअन अश्वदमन ते आणि मीओनिअन तुरगबलही तें ।
पुसतोस निरनिराळें यां विषयीं कां ? मला असें कळतें ॥ १९६ ॥
त्रोजन सैन्यामाजी जाया तुजला असेल उत्सुकता ।
आहे थ्रेशिअनांचा वर्ग तिथें जो अला असे नुकता ॥ १९७ ॥

सर्वांहून निराळा त्याच्या मार्गें नसे कुणी दुसरा ।
ईओनीअससुत तो ह्रीसस यांचा नृपाल होय बरा ॥ १९८ ॥
याचे हय सर्वोत्तम मोठे मीं पाहिले न कधिं असले ।
शुभ्र हिमाहुन असती, लोकिं जवें वायुतुल्य जे गणले ॥ १९९ ॥
तद्रथ भूषित आहे रजतानें कान्तिमय सुवर्णानें ।
शिरिं हैमकवच आला घालुन तो भूप दृप्त विभवानें ॥ २०० ॥
सेवावें अमरें जें तें कैसें मानवेल मर्त्यातें ।
परि आतां येथुनियां नौभागीं न्या चला कसे मातें ! ॥ २०१ ॥
अथवा करकटवुन मज बांधोनी परत याल तों ठेवा ।
घ्या अनुभव आतां कीं सत्य कथीं मीं असत्य वच हें वा " ॥२०२॥
नयन वटारून वदे त्या दायोमीद शूर " दोलन हे! ।
कथिलेंस वृत्त बरवें; सुटशिल तूं परि मनांत आणिं न हें ॥ २०३ ॥
हातांत गवसलासीं; केलें जर का स्वतंत्र सोडुन रे ।
ग्रीकांच्या नौभागीं चोरुन येशील खचित परतुन रे ॥ २०४ ॥
हेराची कामगिरी करशिल अथवा रणांत वीराची ।
ग्रीकां व्याधि न होशिल मत्करगत नष्टजीव होतांची !" ॥ २०५ ॥
ऐसें हा वदतो जों, तों तो लावून कठिणकर हनुला ।
प्रार्थी सविनय, तरि हा घेउनियां असि तयावरी घुसला ॥ २०६ ॥
ग्रीवेच्या मध्यावर हाणोनी स्नायु तोडिले दोन ।
पुटपुटत्याचें त्याचें शिर पडलें तें धुळींत जावोन ॥ २०७ ॥
नकुलाच्या चर्माचें डोक्यांतिल घेति कवच हरुनीयां ।

वृकचर्म, दीर्घ भाला, वक्र धनूसहित सर्व काढुनियां ॥ २०८ ॥
युलिसीस उंच उचली दावाया वस्तु या मिनर्वेला ।
अपहारदेवतेला प्रार्थी " आनंद पाहिजे केला ! ॥ २०९ ॥
हे देवि ! तूंच पहिली आलिंपसवासिनी अह्मां नमितों ।
थ्रेशिअनांचे तंबू अश्व जिथें, ने तिथें अह्मां ह्मणतों " ॥ २१० ॥
ऐसें बोलुन टांगुन वस्तू ठेवीत पिचुलवृक्षास ।
ठेवी खूण ह्मणुन वरि बोरूच्या लांब जाड पेरांस ॥ २११ ॥
अणि विखरी पिचुलाच्या विस्तृत शाखा तशाच सर्वभर ।
घोर भयंकर रात्रीं फिरतां दिसतील वस्तु नाहिं तर ॥ २१२ ॥
शस्त्रांच्या भारांतुन पायांनीं कृष्ण कालवुन रुधिर ।
जातां पुढतीं दिसले थ्रेशिअनांचे बलाढ्य ते वीर ॥ २१३ ॥
ते श्रान्तसुप्त होते, कवचें ठेऊन सर्व भूवरतीं ।
साधुन अनुक्रमाला ओळि तिथें तीन थोरल्या सजती ॥ २१४ ॥
प्रत्येका जवळ सजे हययुग; मध्यावरी नृपाल निजे ।
अश्व तयाचे होते जवळी ते बद्ध सुरथवलयीं जे ॥ २१५ ॥
युलिसीस यास बघतां दायोमीदास दाखवुन वदला ।
" दायोमीद बघें हें हययुग तें आणि तोच नृपति भला॥ २१६ ॥
ज्या दोलनास वधिलें आह्मीं, तेणें च वर्णिलें ज्यांस ।
ये अजि खरचीं बळ तव, कवचावृत तूं न बस निरायास ॥२१७॥
हरिं हय अरिवध करिं, सांभाळिन मी हयांस मग जाण " ।
ऐसें हा वदला मग चढवि मिनर्वा दुजास तें स्फुरण ॥ २१८ ॥

संचारुनि सर्वभरी, चालवि तो घोर तेथ कंदन हो ।
असिघातें कण्हति बहू, रंगवि भूच्या तलां असृग्घन हो ॥ २१९ ॥
सिंह जसा तुटुन पडे मेषांवरतीं अणी अजांवरतीं ।
तैसा तैदिअसज हा थ्रेशिअनांवर पडे नृशंस अती ॥ २२० ॥
वधिले द्वादश तेणें. होता युलिसीस मदतिला जवळी ।
ओढी त्या पद धरुनी ज्या दायोमीद देत आसिस बळी ॥ २२१ ॥
हेतु मनीं कीं व्हावा अश्वांचा सुकर पथ रणांतील ।
तुडवुन शवांस जाया संवय नसे ह्मणुन अश्व बुजतील ॥ २२२ ॥
ऐसा कापित जातां दायोमीदास भूप करिं गवसे ।
बलि हा या तेरावा त्याच्या कंठीं न जीव उरवितसे ॥ २२३ ॥
अंधिं यास मिनर्वेच्या इच्छेनें दिसत वध्यमानास ।
स्वप्नीं पुरुष वधोद्यत दायोमीदासमान सुत्रास ॥ २२४ ॥
मुक्त करी दृढशफ हय इकडे युलिसीस सोडुनी गांठी ।
रश्मीनें बांधि तयां गर्दीतुन दूर काढण्यासाठीं ॥ २२५ ॥
मारी धनुष्य पाठिंत, होउन सारथि नको कशा घ्याया ।
घाली शीळ मुखानें दायोमीदास खूण ती द्याया ॥ २२६ ॥
राहे उभा परी तो, चिंति अतां काय साहस करावें? ।
चित्रित कवचासाठीं धरुन धुरेतें रथास ओढावें? ॥ २२७ ॥
अथवा जोर करोनी स्यंदन उचलोन चालतें व्हावें? ।
किंवा थ्रेशिअनांतिल, अधिकांचे जीव आयते घ्यावे? ॥ २२८ ॥
ऐसा विचार करि तों त्यास मिनर्वा वदे उभी पाशीं ।

" हे थोर तैदिअसजा ! आण मनीं परत गमन नौकांशीं ॥ २२९ ॥
जावें लागेल बरें नाहीं तर कुणि पिटाळितां तुजला ।
देवांतिल कोणि तरी देइल उत्तेजन त्रोजनांला"॥ २३० ॥
ऐसें देवी वदली तीचा स्वर ओळखून हे नियती ।
हयपृष्ठीं धनु वेगें हाणी युलिसीस, शीघ्र हय पळती ॥ २३१ ॥
गेले नौभागाला; उगीच न तें लक्ष्य ठेवि फीबस तो ।
आला कोप तयाला देवीसह तैदिअसज जों दिसतो ॥ २३२ ॥
हिप्पोकोआनातें नृपतीच्या उठवि चुलत भावातें ।
थ्रेशिअनांच्या मोठ्या उपदेष्ट्यातें अचेष्ट सुप्तातें ॥ २३३ ॥
गडबडुनी उठतो तों अश्वांविण शून्य त्या स्थला पाहे ! ।
वध झाला कितिकांचा ! कितिकांतें श्वास लागला आहे ! ॥ २३४ ॥
रोदन करि मोठ्यानें हांका मारुन सख्यांस नांवानें ।
त्रोजन जमुनी सारे करिती आकान्त फार शोकानें ॥ २३५ ॥
आश्चर्य फार करिती साहस कोणी बरें असें केलें ।
आणि त्वरित तिथोनी नौभागा परतुनी कसे गेले ॥ २३६ ॥
इकडे तों हे आले हनन जिथें होत गुप्त हेराचें ।
जोव्हप्रिय युलिसीसें थांबविलें गमन योधनाश्वांचें ॥ २३७ ॥
उतरे धरणीवरतीं उडिसरसा शूर तैदिअसतनय ।
युलिसीसाचे हातीं उचलुनियां लूट देत रुधिरमय:॥ २३८ ॥
नंतर आरूढ रथीं होवोनी कोरडे हयां हाणी ।
नौभागीं जायातें उत्सुक ते धांवले तिथून क्षणीं ॥ २३९ ॥

यांचा ध्वनि ऐकोनी पहिल्यानें वदत तेथ नेस्तर तो ।
"ग्रीकाग्रणिनों! आतां सुहृदानों! येत मनिं तसें वदतों ॥ २४० ॥
खोटें खरें असूं द्या, जवन हयांचा पडे ध्वनी कानीं ।
दायोमीदें अरिचे युलिसीसें अश्व पकडले मानी ॥ २४१ ॥
परि मोठें भय वाटे! ग्रीकांचे शूर लोक हे दोन ।
त्रोजनहस्तें अथवा गेले हो काय आज गांजोन ! " ॥ २४२ ॥
झालें पुरें न भाषण तों ते आले स्वतां तया स्थानीं ।
धरणीवरी उतरतां, केला आनंद फार मित्रांनीं ॥ २४३ ॥
वंदिति दक्षिण हस्तें, प्रेमाचें बोलती मुखें वचन ।
नंतर बोले त्यांशीं नेस्तर सरदार तो जिरेनिअन ॥ २४४ ॥
"ग्रीकांचें वैभव तूं! युलिसीसा! उत्तमा! कथीं मज ये ।
कैसे अश्व मिळविले? अरिपासुनि काय घेतले विजयें? ॥ २४५ ॥
कुणि देव भेटला का रविकिरणप्रभ जयें तुरग दिधले? ।
त्रायस्थांसह लढतां असले कधिं नाहिं दृष्टिला पडले ॥ २४६ ॥
आहें वृद्ध परी मी नौभागीं राहिलों न कधिं बसुन ।
असले न पाहिले म्यां, देवानें भेट हे दिले म्हणुन ॥ २४७ ॥
घनवाहक जोव्हाची, जोव्हसुतेची तशी मिनर्वेची ।
तुह्मां दोघांवरतीं प्रीति असे नित्य हें मत खरेंची" ॥ २४८ ॥
युलिसीस सुज्ञ बोले " ग्रीकांच्या वैभवा नेस्तरा! हे! ।
नेलिअसाच्या पुत्रा! देवांची शक्ति विपुल बा आहे ॥ २४९ ॥
ह्मणुनी मनिं आलें तर देतिल रे देव यांहुनी बरवे ।

ज्यांविषयीं पुसशी ते थ्रेशिअनांचे सुरूप अश्व नवे ॥ २५० ॥
दायोमीदें वधिला नाथ तयांचा, तसे दुजे बारा ।
तेरावा स्पश जाणें नौभागीं येत जो अभीरु जरा ॥ २५१ ॥
हेक्तरपूर्वक दुसरे त्रोजन जे, धाडिलें तया त्यांनीं " ।
ऐसें बोलुन हृदशाफ हय तो ने दूर खंदकावरुनी ॥ २५२ ॥
दुसरे ग्रीक तयाच्या मागुन जाती अनेक हृष्ट मनें ।
दायोमीदाच्या मग तंबूंशीं पोचती बहु जवानें ॥ २५३ ॥
हयशालेंत हयांनां रश्मीनें बांधिती तया कालीं ।
दायोमीदाचे बहु हय होते तेथ धान्य खात बली ॥ २५४ ॥
नौपृष्ठभागिं ठेवी, सांपडलें जें लुटून हेराला ।
युलिसीस सर्व राखी प्रेमें अर्पावया मिनर्वेला ॥ २५५ ॥
मज्जन जलधिंत करिती अंगावरचा तदा धुवायाला ।
पायांनां, ग्रीवेला, जंघांला घर्म विपुल जो आला ॥ २५६ ॥
तेव्हां श्रमापहारें हृदयीं अतिमात्र मोद त्यां झाला ।
स्नानगृहीं मग जाती स्नानोद्भव सेवण्यास सौख्याला ॥ २५७ ॥
स्नातानुलिप्त बसले मग ते मिष्टान्न भोजन कराया ।
पात्रांतुन मधु ओतिति, अल्प मिनर्वेस भाग अर्पाया ॥ २५८ ॥

सर्ग ११ वा.

अगमेम्ननाचा पराक्रम.

सारांशः—अगमेम्नन मोठा पराक्रम करतो. परंतु जखमी होऊन समराचा त्याग करतो. **दा**योमीदास **पा**रिस जखमी करतो. व **यु**लीसास **सो**कस जखमी करतो. **आ**जक्षास साहाय्य करावयास **मे**निलास जातो. **यु**रिपैलसही त्यांस मिळतो. परंतु **पा**रिस त्याला मांडीवर जखम करतो, व तशीच **मे**काअनासही करतो. **ने**स्तर त्यास रणांतून उचलून नेतो. त्याच्या तंबूकडे **अ**किलीस **प**त्रोक्लशाला पाठवितो. **अ**किलीसाचें कवच घालून तूं रणांत लढावयास चल ह्मणून **ने**स्तर त्याची विनंति करतो.

ज्यावरतीं आरोरा श्रीमत् तैथोनसासवें रमते ।
त्या मंचकावरुन ती उठली द्याया प्रकाश सकलांतें ॥ १ ॥
ग्रीकाच्या नौभागा जोंव्ह तदा कलहदेवता धाडी ।
दुर्लक्षण युद्धाचें धरुन करीं साधि नीट आघाडी ॥ २ ॥
युलिसीसाच्या नौकेवरतीं ती जाउनी उभी राहे ।
ह्या मध्यवसतिच्या स्थलिं अरडाया साधल्यास ती पाहे ॥ ३ ॥
आजक्ष एक बाजुस दुसऱ्या बाजूस वसत अकिलीस ।
मुद्दाम शेवटाला राहति बहु मानुनी स्वशक्तीस ॥ ४ ॥
तेथ उभी ती गाई उच्चस्वरिं गीत आर्थिअन * आतां ।

---

*या चालींचें गीत फार रोमहर्षण होतें. असलेंच गीत **टि**मोथिअसनें एकदां **शी**कंदर बादशहास गावून दाखविलें. त्या सरसा तो जागेवरून एकदम उडी मारून पुढें आला व हस्तांत शस्त्र धरून उभा राहिला. कोणी ह्मणेल हा लढाईस सज्ज झाला आहे ! इतका परिणाम त्याचे मनावर त्या गीताचा झाला.

ग्रीकां बल हृदयिं चढे लढण्या तों तीव्र गीत आइकतां ॥ ५ ॥
न गोड मातृभूमिहि, जैसें वाटे तयांस समर अज ।
आज्ञा ग्रीकांस करी व्हाया सन्नद्ध नृप एत्रिअसज ॥ ६ ॥
आपण सज्ज जहाला घालोनी कवच अंगिं लखलखित ।
रजताचे बंद जया जंघांचें त्राण घालि तें असित ॥ ७ ॥
स्वारी त्रायस्थावर करुं बघती ग्रीक हें कळून चव ।
आतिथ्य कर्म ह्मणुनी योजी सिनिरास द्यावया कवच ॥ ८ ॥
सैप्रासिं एत्रिअससुता तोषवि नृप दान करुन कवचाचें ।
पत्रे दहा तिख्याचे होते बारा तयास हेमाचे ॥ ९ ॥
वीस तसे जसताचे, ज्यांवरती तीन सर्प अयसाचे ।
अग्रें शोभित करती, रूप तयां होय सुरधनुष्याचें ॥ १० ॥
ज्या जोव्ह दृश्य घनिं करि खूण नरां ज्यां स्फुटाक्षरा वाणी ॥
अंसीं खड्ग लटकवी शोभा ज्या हेम मण्डनें आणी ॥ ११ ॥
म्यान रुप्याचें त्याचें; सोन्याचीं बसविलीं तया वलयें ।
सुन्दर विचित्र कृतिची धरिली उचलोन ढाल कठिण तयें ॥ १२ ॥
झांकी ती तत्तनुला, शोभविती मंडलें तियेस दहा ।
वर वीस गण्ड जसती, लोहाचा मध्यवर्ति एक महा ॥ १३ ॥
गार्गन उग्रानन वरि होता शोभेस तेथ काढिवला ।
भीति, पलायन करिती सोबत या उग्रदर्शना प्रबला ॥ १४ ॥
बंद तिचा रजताचा, लोहाचा सर्प लोंबतो ज्याला ।
डोकीं तीन तयाच्या होतीं लागून एक कण्ठाला ॥ १५ ॥

कवच शिरीं नृप घाली ज्याच्या बाजूस रम्य बहु नकशी ।
चारी गण्डांसह त्या शोभा देतात अश्वकेश कशी ॥ १६ ॥
भयद हले किति चूडा! दोन करीं पित्तलाग्र शूलधरी ।
त्यांचा प्रकाश पसरे स्वर्गापर्यंत फार दूरवरी ॥ १७ ॥
जूनो अणी मिनर्वा करती वर गर्जना भयंकर ती ।
श्रीमन् मिसिनीपाचा हौसेनें थोर मान जणुं करती ॥ १८ ॥
निज सारथीस जो तो कथि धरण्या अश्व खंदकापाशीं ।
कवचावृत अपण निघे पायांनीं जावयास समराशीं ॥ १९ ॥
प्रातःकालापूर्वीं झालि रणांगणिं अशाम्य गलबल ती ।
ते स्वार खंदकाशीं सज्ज तसे अधिप राहिले पुढतीं ॥ २० ॥
अनुसरती त्यां हलतां हळु हळु जों स्वार तोंच जोव्हानें ।
पाडियलें हिम खालीं मिश्रित जें होय रक्त रुधिरानें ॥ २१ ॥
हेंदीसाप्रति धाडिन वीरात्मे ईंगितार्थ हा सुचवी ।
त्रोजनदल इकडे तों उन्नत भूवर रणांगणा सजवी ॥ २२ ॥
बलवान हेक्तराच्या वाटोळे वीर सिद्ध युद्धास ।
तो ईनिआस सुरसम, दुसरा निर्दोष पालिदामास ॥ २३ ॥
आकामास तरुण अणि तेजस्वी आजिनार, पालिबस ।
शूर तिघे हे होते ढवय्ये पुत्र आन्तिनारास ॥ २४ ॥
सर्वत्र संचरुन रणिं हेक्तर फीरवीत आपुली ढाल !
पापग्रह जणुं चमके क्षणिं ज्यातें लोपवीत नभजाल ॥ २५ ॥
आज्ञा पुढिलां करुनी सत्वर तो मागल्यांकडे धांवे ।

सहजचि शस्त्रधरें मग विद्युत्सम कीं जनांस वेधावें ॥ २६ ॥
धनवन्ताच्या क्षेत्रीं पिकतां गोधूम आणि यव भारी ।
करतात कापणीतें बसुन समूरा समूर कामकरी ॥ २७ ॥
कापून कवल राशी एकामागून एक ते रचिती ।
ग्रीक त्रोजन तेवीं समरक्षेत्रांत कापणी करिती ॥ २८ ॥
कंदन सकलां रुचलें, सुचलें निंदार्ह नच पलायन तें ।
वृकसे अन्योन्यांवर माथा उचलोन जाति धांवुन ते ॥ २९ ॥
लढतां यां पाहोनी झाली बहु कलहदेवता मुदित ।
राणिं एकलीच होती, देव दुजे मात्र येउनि न बघत ॥ ३० ॥
आलिम्पसोच्चशिखरीं सेविति निज भवनिं शान्तिसौख्यास ।
सारे तथापि देती दोष खरा जलदवाहजोव्हास ॥ ३१ ॥
ह्मणती कां देतो हा त्रायस्थां विजय आदरें करुन ।
तिकडे लक्ष्य न तो दे विभवानंदांत मग्न होऊन ॥ ३२ ॥
त्रायपुरा तो पाहे, नौभागा अचलचित्त तो पाहे ।
हन्त्यांनीं व हतांनीं शस्त्रांनीं समर भरुनियां राहे ॥ ३३ ॥
पुण्य चढे दिवस वरी, तों शस्त्रें वाजतात दोघांचीं ।
तों वीर पतन पावति झाली जों वेळ या सुमाराची ॥ ३४ ॥
ह्मणजे लांकुडतोडच्या जेव्हां तोडून उंच तरु दमतो ।
पर्वत दरींत बसुनी सेवाया अन्नसिद्धता करतो ॥ ३५ ॥
*अणि तृप्तचित्त होतो, मिष्टान्नाची उडोन चव जाय ।

* वन्य लोकांच्या नित्य व्यवसायावरून सुचलेले असे सुंदर दाखले या काव्यांत अनेक आहेत.

याच सुमारास धरा ग्रीकांनीं टाकिला पुढें पाय ॥ ३६ ॥
अरिच्या व्यूहा भेदुनी केला विक्रम नितान्त रणीं त्यांनीं ।
सहचर योद्धयांनीं ही धरिला उत्साह चित्तिं अवसानीं ॥ ३७ ॥
अगमेम्नन घेत उडी बीएनारा नृपा अणी मारी ।
मग होत ओइलीअस हत तो हयवाह चतुर जो भारी ॥ ३८ ॥
कारण रथावरुन तो उतरुन खालीं निघे लढायाला ।
जाई धांउन अरिच्या वरतीं घेऊन हस्तिं शूलाला ॥ ३९ ॥
वार कपाळीं झाला, केला प्रतिबंध या न शिरकवचें ।
झालें भग्न मुळिंच तें, त्यासह तें हाडही कपाळाचें ॥ ४० ॥
आंतिल मेंदू सारा गेला होऊन रक्तबंबाळ ।
वीरा युयुत्सु ऐसा जित करि समरांत भूप तत्काळ ॥ ४१ ॥
अगमेम्नन नृपवर मग उरकवचें घेत काढुनी यांचीं ।
ठेऊन ऊर उघडे जाई घ्यायास भेट दुसऱ्यांची ॥ ४२ ॥
प्रायमसुत दोघेजण ऐसस अणि आन्थिपस पुढें दिसले ।
पहिला सुत दासीचा, दुसरा धर्मज, रथांत हे बसले ॥ ४३ ॥
हांकी एक हयांला सरसावे अन्य तो लढायाला ।
होतें अकिलीसानें दोरानें बांधिलें पुरा यांला ॥ ४४ ॥
शिखरावरी इदाच्या होते चारीत हे निज अजांला ।
घेऊन खंडणी मग दिधलें सोडून बघुन समयाला ॥ ४५ ॥
उरिं भाला अगमेम्नन मारी पहिल्यास चूचुकापाशीं ।
पाडी खालीं दुसऱ्या असिचा त्या वार करुन कर्णाशीं ॥ ४६ ॥

घेई त्वरा करोनी, कवचें काढुन लागलिंच त्यांचीं ।
त्यां ओळखी तदा हा, अठवण झाली तयांस बघतांची ॥ ४७ ॥
कीं यां अणिलें होतें अकिलीसें धरुन नौप्रदेशाला ।
राहो हें. परि रानीं सिंह बली परत जो गुहेस अला ॥ ४८ ॥
चपलमृगांच्या बालां सहजीं दातांत चिरडितो धरुन ।
कोमल जीव तयांचे घेतो जवळी मृगी उभी असुन ॥ ४९ ॥
साहाय्य यां न करवे भीतिमुळें कांपरें भरे तिजला ।
वन्य पशूचा घाला अनुभवुनी गाळि बहुत घर्मजला ॥ ५० ॥
तेथुन मृगी पळे झणिं जाउन रानावनांत लपण्यास ।
त्रोजन तसा न आतां आला राखावयास एकास ॥ ५१ ॥
ग्रीकांपुढतीं त्रोजन सुटले कीं सर्व आपणाचि पळत ।
अगमेम्ननास दिसला हिप्पोलेकस पिसान्दरासहित ॥ ५२ ॥
या वीरांचा जाणा वृद्ध पिता शूर आन्तिमाकस तो ।
कांचनदानें होउन वश समयीं पारिसाकडे वळतो ॥ ५३ ॥
हेलन परत तरिच हा देऊं देई न मेनिलासाची ।
तत्तनयाची आतां नृपतीशीं गांठ पडत दोघांची ॥ ५४ ॥
एका स्यंदनिं बैसुनि होते हांकीत धीट जवन हयां ।
सुन्दर रश्मी करिंच्या गळती कांहीं अतां सुचे न तयां ॥ ५५ ॥
मग एत्रिअसज यांवर गेला धांवून सिंह भीषणसा ।
परि मग रथांतुनी ते विनविति या हात जोडुनी सहसा ॥ ५६ ॥
“ हे एत्रिअसज आह्मां धरिं तूं जीवन्त मूल्य देऊं तुला ।

रे ! हेम, लोह, पित्तल, तात गृहीं ठेवि जपुन बाजूला ॥ ५७ ॥
आह्मीं सजीव आहों ग्रीकांच्या स्वस्थ नौप्रदेशांत ।
परिसुनि हें तुज देइल यांतिल बहुमूल्य अंश नृप शान्त "॥ ५८ ॥
करिती सामवचा या दोघे नेत्रांस आणुनी पाणी ।
उत्तर हें दे त्यां नृप ज्याची हृदयास जांच करि वाणी ॥ ५९ ॥
"गेला युलिसीसासह करण्यातें मेनिलास शिष्टाई ।
तेव्हां 'बघेन' वदला 'स्वजनां हा भेटण्या कसा जाई' ॥ ६० ॥
जेणें सभेंत ह्मटलें 'मारा या !' 'बेत हा बरा दिसतो' ।
आज मरा ! जर तुमचा तात असे दुष्ट आन्तिमाकस तो !॥ ६१ ॥
त्या तुमच्या पितयाच्या औद्धत्याचा भरा अतां दण्ड " ।
खालीं पिसान्दरातें ओढी हें वाक्य वदुन नृप चण्ड ॥ ६२ ॥
रोंवी उरांत भाला. पडला तो ऊर्ध्वमुख धरेवरतीं ।
हिप्पोलोकस खालीं घेत उडी तों मरे त्वरेंत अती ॥ ६३ ॥
नृप कापी कर असिनें; आणी कापीत शेवटीं मान ।
शिर देई फेंकोनी गिरक्या जें खात वर्तुलसमान ॥ ६४ ॥
यां सोडोनी धांवे नृप जेथें शत्रु सैन्य घाबरलें ।
भूपा मागुन जाती, ग्रीकांचीं लागलींच सर्व दलें ॥ ६५ ॥
वधित पदाति पदातिस होतें ज्या लागलें पळायाला ।
स्वार स्वारा लागीं पितळेचा रोंवुनी उरीं भाला ॥ ६६ ॥
अश्वांच्या टापांनीं धूळ उडाली बरीच निखळून ।
ग्रीक नृपा उत्तेजिति, नृप चाले सैन्यराशि संहरुन ॥ ६७ ॥

निबिड अरण्यीं जैसा वणवा लागे बहू विनाशक तो ।
आणि झंझावातानें पसरे, त्या कोण आंवरूं शकतो ॥ ६८ ॥
तरुशाखा दीर्घ जशा ज्वालावेगें समूळ ही पडती ।
त्रोजनशिरें तशिंच अज ते पळतांना नृपा पुढें गळती ॥ ६९ ॥
उच्चग्रीव हय रिते सैन्यांतुन रथ खडांखडां नेती ।
निज वाहकांस शोधिति, रणिं ज्यांची यां उणीव भासे ती ॥७०॥
परि ते निजले भूवरि, त्यांचा व्यवसाय पोंचला अन्ता ! ।
आनंद गृध्र करतिल, त्यांच्या करतील शोक घरिं कान्ता ! ॥ ७१ ॥
धूळ रणांत उधळली झाला कल्होळ कदन मातून ।
तों हेक्तरास जोव्हें नेलें काढून दूर तेथून ॥ ७२ ॥
बहु रक्तपात झाला शस्त्रांचें यास परि अतां न भय ।
अगमेम्नन पाठ धरी भर देती ग्रीक मिळविण्यास जय ॥ ७३ ॥
त्रोजन नगरा जाया उत्सुक बहु लागले पळायास ।
मध्यें रणांत आले वन्यतरूजवळ करुन सायास ॥ ७४ ॥
दार्देनसकुलसंभव तेथ समाधिस्थ वंद्य ऐलस तो ।
अगमेम्नन पाठ धरी विजयी तद्धस्त रक्तमय दिसतो ॥ ७५ ॥
स्कीअननिर्गमपथिं ते बीचतरूच्या अले तदा खालीं ।
थांबुन वाट बघति ते इतरांची वेळ यावया झाली ॥ ७६ ॥
रण मध्यावरुनीही पळती दुसरे धरून भीतीस ।
वाटे पिटाळिले वनिं हरिनें मागून वृषभ रात्रीस ॥ ७७ ॥
सारे पळति परन्तू एकाचा नाश होतसे उघड

मोडी दंतांनीं हरि शेवटल्याची धरून मान जड ॥ ७८ ॥
अंत्रें चावुन खातां पीतो चाटून रक्त तो सहसा ।
वधि मागल्यास पळतां अगमेम्नन धरुन पाठ समरिं तसा ॥ ७९ ॥
पडले कितिक उताणे कतिक तरी पालथे रथांतून ! ।
ऐशी पीडा झाली त्याचा कितिकांस शूल लागून ॥ ८० ॥
धारण करून विद्युत् , सांगे मग जोव्ह इरिसला काज ।
"जा गे ! चपल इरिस हे ! सांगें संदेश हेक्तरा आज ॥ ८१ ॥
' अगमेम्ननास जोंवर अग्रीं बघशील मारितां स्वजनां ।
तोंवर तूं सर मागें, भर दे सैन्यास मात्र लढतांना ॥ ८२ ॥
शूल तयाला लागुन अथवा होऊन विद्ध बाणानें ।
बैसेल तो हयावर, तेव्हां तुज आदरीन बलदानें ॥ ८३ ॥
जाइल तो मग मागें पळुनी गांठील नौप्रदेशाला ।
अस्तास सूर्य जाइल पसराया सांपडेल तिमिराला, "॥ ८४ ॥
ऐसें तो बोले मग चपलपदी इरिस मान्य वचन करी ।
उतरे इदावरोनी, जाई धांवून इलियमद्वारीं ॥ ८५ ॥
प्रायमसुत हेक्तर तिस दिसला रणिं उभा रथाश्वगणीं ।
त्याच्या जवळी जाउनि चपलपदी वदत इरिस दक्षपणीं ॥ ८६ ॥
"जोव्हसमानप्रज्ञा ! प्रायमजा ! हेक्तरा ! इथें मजला ।
जोव्हें धाडुन दिधलें तुजसीं सांगावया निरोप भला ॥ ८७ ॥
' अगमेम्ननास जोंवर अग्रीं बघशील मारतां स्वजनां ।
तोंवर तूं सर मागें भर दे सैन्यास मात्र लढतांना ॥ ८८ ॥

शूल तयाला लागुन अथवा होऊन विद्ध बाणानें ।
बैसेल तो हयावर, तेव्हां तुज आदरीन बलदानें ॥ ८९ ॥
जाइल तो मग मागें पळुनी गांठील नौप्रदेशाला ।
अस्तास सूर्य जाइल पसराया सांपडेल तिमिराला' " ॥ ९० ॥
ऐसें सांगुन गेली चपलपदी इरिस तोंच हेक्तर तो ।
घेत रथांतून उडी फेंकी जो शूल गरगरां फिरतो ॥ ९१ ॥
कवचावृत दलिं फिरुनि, देउनि उत्साह मातवी समर ।
जमली सारी सेना द्याया ग्रीकांस तोंड रणिं सभर ॥ ९२ ॥
ग्रीकांनीं बल अपुलें वाढवुनी युद्ध जुंपुनी दिधलें ।
तोंडास तोंड मिळतां अगमेम्नन नृप रणीं घुसे स्वबलें ॥ ९३ ॥
आलिम्पसवासिनि ! कथिं मजला वाद्देवि ! कोणता वीर ।
त्रायस्थांतुनि अथवा तन्मित्रांतून रणिं करी धीर ॥ ९४ ॥
अगमेम्ननावरी ये धांवोनी अन्तिनारसुत शूर ।
इफिदामास बरें जो थ्रेसपुरीं वाढला असे दूर ॥ ९५ ॥
सिसिअस मातामह, ज्या होय सुता अन्य गौर सुथिआनो ।
वाढवि तो गृहिं कुमरा, होतां हा तरुण नृप न कां वानो ? ॥ ९६ ॥
*देई दुहिता त्यातें, ठेवोनी घेवुनी तयालागीं ।

---

* इफिदामास याचें लग्न त्याच्या मावशीशीं झालें होतें हें उघड दिसत आहे. तें वाचून वाचकांस विस्मय वाटेल. कारण

असापिण्डा च या मातुरसपिण्डा च या पितुः ।
सा प्रशस्ता द्विजातीनां दारकर्माणि मैथुने ॥

या मनुवचनाप्रमाणें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य या त्रिवर्गांत सपिण्ड संबंधाच्या स्त्रीपुरुषांत विवाहसंबंध होऊं शकत नाहीं परंतु होमरच्या काळीं ग्रीस देशांत हा प्रतिबंध नव्हता. दायोमीदाचा त्याच्या आतेशीं विवाह झाला होता.

झालें लग्न तयाचें, ग्रीकांची पोंचली तया सांगी ॥ ९७ ॥
मुदित विवाहोत्साहें होता हा बैसला महालांत ।
द्वादश नौकांसह परि धांवुन आला रणांत हालांत ! ॥ ९८ ॥
पर्कोटींत तयानें दिधल्या सोडून आपुल्या नांवा ।
त्राया चालत आला ! धांवे तो नृपतिवरतिं वीर नवा ॥ ९९ ॥
अन्योन्यांवरि धांवुनि दोघे आले बरेच ते जवळी ।
अगमेम्नन वार करी, नेम चुके, उचलि शस्त्र शत्रु बळी ॥१००॥
उरकवचा खालीं जो रुंद असे बंद त्यावरी भाला ।
लावोनी जोर करी, बंद परी त्या न तोडितां आला ॥ १०१ ॥
लवलें अग्र तयाचें रौप्यावरि घांसतां जसें कथिल ।
ओढी शूल तयाचा अगमेम्नन निज करें न जो शिथिल ॥ १०२ ॥
ओढी बल घेवोनी त्वेषा जणुं सिंह चढुनियां गेला ।
पाडी ढिले तदवयव असिचा शिरिं वार करुन खेपेला ॥ १०३ ॥
×ऐसा हा दुर्दैवी ! करितां साहाय्य निज जनां पडला !

× हेंच भाषांतर पोप कवीनें कसें केलें आहे तें पहा:—
उचित नव्हे शेवट हा ! आलें तुज मरण रणिं अकालिक रे ! ।
देशाचा मित्र खरा ! काय करावें अतां सुगुणनिकरें! ॥ १ ॥
नाहीं घेणार युवा कुशिंत कधींही अतां सहचरीतें ।
होती प्रथम कुमारी, नवरीपण ये उगाच पदरीं तें ॥२॥
आलिंगनलोभानें तिजला देईल कोण नजराणे ? ।
युद्धार्जित वित्तातें अर्पाया तत्पदीं कुणी जाणें ? ॥ ३ ॥
प्रेमचि याचें तिजवर, टाकी देऊन सर्वही तिजला ।
उधळ्या ह्मणा तयाला, अधिकाचें वचन देउनी बसला ॥ ४ ॥
आतां रणांत पडला अगदीं उघडा, कुणी न तो रडला ।
शस्त्रें हरण कराया विजयी अरि जों सगर्व तो धजला ॥ ५ ॥

अक्षत तरुणी कान्ता, सोडुनियां दूर सततचा निजला ! ॥ १०४ ॥
होते बहुपरिचे तिज दिधले यानें अनेक नजराणे ।
सुंदर विलास तीचे नव्हते भोगीयले परी याणें ! ॥ १०५ ॥
शंभर बैल दिले आधिं, देऊं केले सहस्र मेष अज ।
या साठीं अगणित तो प्राणी कुरणांत चारवी सहज ॥ १०६ ॥
अगमेम्नन या लुटुनी शस्त्रें काढून घेतसे सारीं ।
ग्रीकांमध्यें मिरवे घेउन बहुमूल्य कवच हें भारी ॥ १०७ ॥
त्या अन्तिनारतनयें कूनें जों पाहिलें नृविख्यातें ।
काळोखी वेगें तों येउन अंधत्व येत नयनांतें ॥ १०८ ॥
बन्धु तयाचा पडला घेउन करिं शूल तो उभा जवळ ।
अगमेम्नन नृपतीच्या ध्यानीं आला नसे कसा प्रबळ ॥ १०९ ॥
वार करी बाहूच्या मध्यें नृपतीस कोंपरा खालीं ।
उज्ज्वल शूलाग्र तदा गेलें तें आरपार त्या कालीं ॥ ११०
कंप भरे नृपतीला, विन्मुख समरांत तो न परि झाला ।
धांवे कूनावरतीं घेवोनी पवनपुष्ट करिं भाला ॥ १११ ॥
इफिदामासा सहजा होता ओढीत धरुन तो पाय ।
मारित हांक दुजांतें जमले जे तेथ अगणित सहाय ॥ ११२ ॥
पित्तलमय शूलानें ढालीच्या खालतीं करी वार ।
आणि तया अगमेम्नन ओढी बाहेर गर्दितुन फार ॥ ११३ ॥
पाडी दिले तदवयव भ्रातृशवावरतिं ताच्छिरा तोडी ।
पूर्ण करी नृपहस्तें नियतीतें शूर बन्धुंची जोडी ॥ ११४ ॥

हेदीसपुरा धाडुन यांतें तो एत्रिअसज रणीं फिरतो ।
फेंकुन जड दगड कुठें, फिरवुन असि, शूल चालवुन बवतो ॥११५॥
तेंव्हां क्षतांतुनी बहु पाघळतां सघन रुधिर तें कढत ।
जाय सुकोनी क्षत तें कालानें स्राव बंद ही पडत ॥ ११६ ॥
परि एत्रिअससुताला लागति बहु तीव्र वेदना व्हाया ।
सर्व स्त्रियांस होती जैशा कीं त्या प्रसूतिच्या समया ॥ ११७ ॥
ऐलिथिया जूनोच्या दुहिता प्रसवाधिकारिणी असती ।
त्या स्वामिणी व्यथेच्या, प्रसवित्रीलागिं पीडितात अती ॥ ११८ ॥
समरांत एत्रिअसजा लागति बहु तीव्र वेदना व्हाया ।
बसुनी रथांत सत्वर सूता सांगे रथास हांकाया ॥ ११९ ॥
नौदेशाला जातो; हृदयातें लागल्या असह्य कळा ।
ग्रीकांतें अरडोनी हांका मारीत खरचुनी स्वबळा ॥ १२० ॥
" ग्रीकांच्या अधिपांनों! मित्रांनों ! श्रेष्ठ लोकमुख्यांनों ! ।
नौदेशांतुन अरितें द्यावें हांकून शूर वीरांनों !॥ १२१ ॥.
त्रायस्थांशीं मजला लढुं देइ न जोव्ह देव दिवसभर" ।
ते शुभ्रकेश हय मग हांकि कशाघात करुन सूतवर ॥ १२२ ॥
पळति मनापासुन ते, भरला उर सर्व शुभ्र फेंसानें ।
बहु धूलिसिक्त होती क्षतनृपतिस नेति जों घरा मानें ॥ १२३ ॥
पळतां नृपास पाहुनि हेक्तर विनवीत थोर मित्रांतें ।
" त्रोजन हो! लिसिअन हो! परिसा दार्देनिअन मम वचातें ॥१२४॥
पारुष्य दाखवा या! मित्रानों चण्ड निज बला अठवा ।

वीरोत्तम गेला तो ! जोव्हानें अर्पिलें मला विभवा ॥ १२५ ॥
ग्रीकांवर चालवुनी दृढशफ हय सरळ जय अतां मिळवा "।
ऐसें बोलुन तो आणि सैनिकवर्गी सहर्ष धीर नवा ॥ १२६ ॥
समयीं उठवून जसा व्याध कुणी शुभ्रदन्त कुतऱ्यांस ।
त्वरित धराया लावी वनिंच्या सिंहास वा वराहास ॥ १२७ ॥
त्रायस्थां ग्रीकांवर दवडि तसा मार्सतुल्य हेक्तर तो ।
बलवन्त अग्रभागीं लढतो अथवा रणांगणीं घुसतो ॥ १२८ ॥
जणुं हा प्रचण्ड वारा काय नभांतून खालतीं वाहे ।
अणखी नील जलधिच्या गाढजला क्षुब्ध करित अज राहे ! ॥१२९॥
जोव्हें देतां जय या प्रायमजें हेक्तरें कुणा वधिलें ? ।
पहिल्या प्रथम कुणाला ? शेवटिं कोणास ? तें इथें कथिलें ॥ १३० ॥
एशीअसास आधीं त्या आतोनोअसास मागुनियां ।
ओपैतीसासह त्या दोलप्सा क्लैतिसात्मजा क्षणिं या ॥ १३१ ॥
आफिल्तिअसास अधीं आणि त्या ईसिम्निसास नंतर हो ।
आजीलासा मारुनि मारितसे ओरसास लवकर हो ॥१३२ ॥
रणलुब्धास वधी मग त्या हिप्पोनोअसास वीरास ।
ग्रीकाग्रणींस या अधिं वधुनी मग तो वधीत इतरांस ॥ १३३ ॥
पश्चिम मारुत जैसा दक्षिण मेघांस पळवुनी लावी ।
क्षुब्ध करी वीचींतें तीव्र जवें फेन ही वरी उडवी ॥ १३४ ॥
तैसां हेक्तर उडवी कितिक शिरें ! नाश फार होता हो ! ।
क्रांति फार घोरं घडती ! नौदेशा ग्रीकसंघ पळता हो ! ॥ १३५ ॥

युलिसीस चेतवी परि वचनें या तैदिअससुता रागें ।
" हे तैदिअसज ! गेलों कां रे विसरून निज बला सांगें ! ॥ १३६ ॥
मित्रा असा इथें ये माझ्या जवळी जरा उभा राहें ।
हेक्तर नौका जिंकी दूषण हें निंद्य केवढें आहे ! " ॥ १३७ ॥
दायोमीद् वदे " हा आलों पळणें रुचे न, फल न परी ।
द्याया इच्छी जोव्ह त्रायस्थां जय, अह्मा न तो लहरी" ॥ १३८ ॥
ऐसें बोलुन खालीं फेंकी थिम्ब्रीअसा रथांतून ।
डाव्या चूचुकिं भाला, जोर करोनी बराच रोंवून ॥ १३९ ॥
सुरसम नृपसहचर जो त्या वधि युलिसीस धीट मोलिअना ।
ह्यातें सोडुन जाती कारण करतिल न हे फिरुन कद्ना ॥ १४० ॥
जनसंमर्दी जाउन केला संक्षोभ बहुत दोघांनीं ।
जणुं वनिं वराहयुग तें श्वानांची परतुनी करी हानी ॥ १४१ ॥
समरीं उलटुन लढतां वधिती हे त्रोजनां झणीं शूर ।
ग्रीकां विश्रान्ति मिळे हेक्तरभय जाहलें जसें दूर ॥ १४२ ॥
नंतर यांनीं धरिले रथिं एका वीर शूरतम दोन ।
मीरप्स जनक यांतें समरा शकुनज्ञ जाउं दे तो न ॥ १४३ ॥
तद्वच अवमानिति हे नियतीनें ओढुनी तयां नेलें ।
दायोमीदें शूलें श्वासाविण विगतजीव यां केलें ॥ १४४ ॥
हरिलें कवच तयांचें. तों मारी दोन वीर युलिसीस ।
तो एक हैपरोकस, हिप्पोदामस तसाच जोडीस ॥ १४५ ॥
जोव्ह इदावरुनि बघे, धरुनी तोलुन समान कलहातें ।

अन्योन्यांचें कर्तन करताती वीर सबल निज हातें ॥ १४६ ॥
आगास्त्रोफस मोठा पीअनसुत त्यास तैदिअसतनयें ।
क्षत जघनावर केलें, ठेवियले दूर लांब अश्व तयें ॥ १४७ ॥
आतां पळेल कैसा ? केली यानें न चूक ही काय ? ।
पायीं गर्दींतुन तों धांवे जों जीव निघुनियां जाय ! ॥ १४८ ॥
सैन्यांतुन हें बघुनी हेक्तर धांवुन तयाकडे आला ।
अरडे मोठ्यांनीं तों त्रोजन जों घोर घालिती घाला ॥ १४९ ॥
रणशूर तैदिअसजा यातें पाहून थोर कंप भरे ! ।
युलिसीस जवळ होता, त्यास वदे "येत थोर संकट रे ! ॥१५० ॥
चालक त्याचा हेक्तर; परि ये राहूं उभे करुं विरोध ।
परतवुं संधि बघुनि त्या." ऐसा केला तयास रणिं बोध ॥ १५१ ॥
दीर्घच्छाय करींचा फिरवोनी फेंकिला तयें भाला ।
शिरकवचाग्रीं लागे, वार तयाचा न विफल बहु झाला ॥ १५२ ॥
पित्तलमय कवचावर पित्तलमय शूल आपटुन सरला ।
फीबसदत्त कवच तें रक्षी चर्मा न शूल ज्या शिवला ॥ १५३ ॥
हेक्तर करी त्वरेला घेई काढून पाय दूर तदा ।
गर्दींत जाय मिसळुनी, घेरी नयनां पुढें अली भयदा ॥ १५४ ॥
गुडघे टेंकुन राहे, स्वतनु करें सांवरून भूवरतीं ।
जाई शूलोत्साहा अनुसरुनी तैदिअसज तों पुढतीं ॥ १५५ ॥
याचा भाला होता भूमीमाजी बराच रुतलेला ॥
अग्रेसर वीरांतें भेदुनियां तेथ वीर हा गेला ॥ १५६ ॥

इतक्यांत शूर हेक्तर इकडे खावोनियां जरा दम तो ।
जाया गर्दींत मिसळुनि मारुन सत्वर उडी रथीं बसतो ॥ १५७
ऐसें मरण चुकवितां, धांवतसे तैदिअसज त्यावर तो ।
शूल करीं उचलोनी त्यालागीं वचन परुष हें वदतो ॥ १५८ ॥
“आला विनाश जवळी तात्कालिक मरण चुकविलेंस तरी ।
तुज आज अपालोनें वांचविलें प्रार्थितोस ज्यास घरीं ॥ १५९ ॥
होतास गावलासी, शूलाच्या फार जवळ आघाता ।
परतुनि भेट, तुझा मी शेवट करतों, खरोखरी आतां ॥ १६० ॥
साहाय्य पाहिजे परि एकाचें समयिं समरिं देवाचें ।
आतां परंतु जातों करण्या कंदन मिळेल जो त्याचें” ॥ १६१ ॥
ऐसें बोलुन मारी, लवलाहीं शूल चतुर पीअनजा ।
हेलनपति पारिस परि होता तेथेंच जवळ कीं समजा ॥ १६२ ॥
नेता वृद्ध जनांचा ऐलस दार्देनिअन जिथें सुभट ।
होता पुरलेला तो तेथें स्तंभास टेंकुनी निकट ॥ १६३ ॥
तेणें धनु वांकविलें माराया बाण तैदिअसजाला ।
पीअनजाच्या उरिंच्या होता जों हरित कठिण कवचाला ॥ १६४॥
अंसास्थित ढाल, तसें कवच शिरींचें तया हवें होतें ।
पारिस तितक्यांतचि तो, होता ओढीत शार्ङ्ग धनु हो तें ॥ १६५ ॥
त्याच्या हातुन सुटलें शस्त्र, परी विफल जाहलें नाहीं ।
उजव्या पाया लागे, रुंद असे जेथ भाग तो कांहीं ॥ १६६ ॥
नंतर शर जाई तो, धरणीमाजी रुतोनियां पुरता ।

निभृतस्थल सोडोनी, पारिस बाहेर येत मुदित अतां ॥ १६७ ॥
करि गर्वोक्ति हंसोनी, "केलें क्षत कैंवि तुजसिं तीव्रतम ।
शस्त्र उगीच न सुटलें ! इच्छियलें मरण मी तुला विषम ॥ १६८ ॥
वार हवा होता रे व्हायाला ऊरुसंधिच्या खालीं ।
नाशापासुन मिळती विश्रान्ति त्रोजनांस या कालीं ॥ १६९ ॥
तूतें पाहुनियां जे गेले आहेत घाबरुन तैसे ।
मेंमें करणारे अज सिंहा पाहून कांपतां जैसे!" १७० ॥
दायोमीद तयाला बोले तत्कालिं मुळिं न डगमगतां ! ।
"अलकालंकृत इषुधर! निंदक हे स्त्रैण! परिस वचन अतां ॥ १७१ ॥
येशील हातघाइस माझ्याशीं तूं सशस्त्र जरि आज ।
कामा धनु नच येइल, बाण कसे राखतील तव लाज ॥ १७२ ॥
नुसता कुठें तुझा इषु गेला चाटून रुंद मम पाय ।
करितोस तों बढाई! वाटे स्त्री वार करित जणुं काय? ॥ १७३ ॥
अथवा गमतें मजला पोर कुणी वेडपें उगा थकतें ।
निर्वीर्य निर्गुणाचें शस्त्र असे सर्वदा निरर्थक तें ॥ १७४ ॥
+ सुटतांच शस्त्र माझें होइल उलटा क्षणीं प्रकार खरा ।
पडलें वेधक भारी स्पर्शें निर्जीव करित सहज नरा ! ॥ १७५ ॥

+ हेंच भाषांतर पोपनें कसें केलें आहे तें पहा.

नच ऐसा शर माझा, एकदिनीं तुज कळून येईल ।
दैव तयाला पळवी; तीक्ष्णाग्रीं बसत मरण दुःशील ॥
जेथें नुसता पडतो, तेथें मृत होत एक वीर महा ।

तद्भार्येचे होती गाल कसे अश्रुलिखित मग गोरे! ।
आणी अनाथ होउनी रडताती पोरकीं घरीं पोरें ॥ १७६ ॥
रंगवुनी रुधिरें भू तोही पडतो तिथेंच कीं कुसत ।
जमती स्त्रिया न ऐसे अगणित पक्षी सभोंवतीं बसत ! " ॥ १७७ ॥
ऐसें तो वदला मग शूलविशारद तसाच युलिसीस ।
राहुन उभा तयाच्या, जवळी जाउन करित मदतीस ॥ १७८ ॥

पोरांस पोरकेपण, यत्स्पर्शे येतसे व्यथावह हा ! ।
अश्रूस्नानातानन ते गुरुजन, ती रुधिरासिक्त होत धरा ॥
विहंग भोजन करिती; स्त्रीजन उद्भ्रान्तचित्त होत धरा. ।

रामानें रावणवधार्थ जो बाण चापावर चढविला त्याचें वर्णन वाल्मिकीनें केलें आहे तें पहाः—

यस्य वाजेषु पवनः फले पावकभास्करौ ।
*   *   *   *   *   *
सधूममिव कालाग्निं दीप्तमाशीविषोपमम् ॥
*   *   *   *   *   *
कंकगृध्रबकानां च गोमायुगणरक्षसाम् ।
नित्यभक्ष्यप्रदं युद्धे यमरूपं भयावहम् ॥
द्विषतां कीर्तिहरणं प्रहर्षकरमात्मनः ।

अर्थ—त्या बाणाच्या वेगसाधनरूप पिच्छांचे ठिकाणीं वायूचें वास्तव्य असून फळाचे ठिकाणीं अग्नि व सूर्य यांचें वास्तव्य होतें. प्रलयकाळच्या अग्नीप्रमाणें तो धूमयुक्त होता. भुजंगाप्रमाणें उग्र होता. कंक, गृध्र, बक व कोल्ह्यांचे कळप व दुष्ट प्राणी यांस नेहमीं युद्धांमध्यें भक्ष्य देणारा होता. त्याचें रूप यमरूपाप्रमाणें भयावह होतें. शत्रूची कीर्ति हरण करणारा व आपल्या लोकांस आनंद देणार होता.

दायोमीद तयाच्या मागें बसुनी झणीं पदांतून ।
काढितसे शर उपटुन तीव्र कळा जात तनुस लागून ॥ १७९ ॥
पीडितहृदय रथीं मग उडि घेवुन तो कथीत सारथिस ।
नौदेशातें जाया; उरला असहाय समरिं युलिसीस ॥ १८० ॥
ग्रीक न एकहि तेथें; सारे ते जाहले भयग्रस्त ।
ह्मणुनी निज आत्म्यातें उद्देशुनि बोलला रणत्रस्त ॥ १८१ ॥
"हा धिक्! नकळे होइल माझी या समयिं समरिं गति काय ! ।
दूषण देतिल जर मी शत्रुभयें काढिला अतां पाय ॥ १८२ ॥
वाईट अधिक होइल धरतिल जर एकल्यास आज मज ।
इतर ग्रीकां जोव्हें टाकियलें भेवडावुनी सहज ॥ १८३ ॥
असल्या गोष्टींचा मी आज परी कां विचार चालवला ।
कारण भितरा जन जो, तोच रणांतून पाहिजे वळला ॥ १८४ ॥
परि जो रणशूर खरा, तेणें स्थैर्यें उभें रणिं रहावें ।
लढतां क्षत पर व्हावा, अथवा यातें परें क्षत करावें " ॥ १८५ ॥
ऐसा हा मनिं विचरे तों त्रोजनपंक्ति यावरी घुसती ।
वेढुनि यातें मध्यें नाशाचें मूळ गवसलें म्हणती ॥ ॥ १८६ ॥
ते सारमेय घेरिति जेविं वराहा सशक्त अणि तरणे ।
परि तो घन गुल्मांतुन येतो धांवुन करावयास रणें ॥ १८७ ॥
दंष्ट्रांतरांत ठेवी पाजवुनी बिकट शुभ्र दंतांस ।
मग सारमेय पडती तुटुन तयावर धरून वेगास ॥ १८८ ॥
चकमक भयद उडे मग दंतांवरी दंत घांसतां प्रखर ।

प्राणी भयद खरा तो ! दूर रहाती सदा भयें इतर ! ॥ १८९ ॥
तेविं त्रोजन धांवुनि युलिसीसा घेरिती परी वीर ।
दिइओपैतीसातें अंसीं क्षत करितसे वरुन धीर ॥ १९० ॥
शूली विश्रुत होता. नंतर वधि तेथ थूनवीरास ।
ईन्नोमोअस वधुनी, क्षत करि त्या शूर चर्सिदामास ॥ १९१ ॥
होता वीर रथांतुन उतरत तों नाभिच्या जरा खालीं ।
ढालीच्या सरशी त्या वीरातें घोर जखम ती झाली ॥ १९२ ॥
पडुनी धुळींत तेणें धरिली कवळून भूमि हस्तपुटें ।
यां तो सोडी सकलां; चारप्सावर तदीय बाण सुटे ॥ १९३ ॥
हिप्पाससपुत तो हा ज्याचा भ्राता उदार सोकस तो ।
साहाय्य यास करण्या सुरसम झणिं वीर धांवुनी निघतो ॥ १९४ ॥
येतो जवळी आणी धीट उभा बोलतो तया वचन ।
"युलिसीसा ! नयकुशला ! गमितें गणिले तुवां कधीं श्रम न॥१९५॥
हिप्पाससपुतविषयक करशिल गर्वोक्ति कीं तयां वधुन ।
हरिलीं शस्त्रें त्यांचीं, मरशिल जर अज न विद्ध होऊन "॥१९६॥
मग करि शस्त्रविमोचन, ढालीचा मध्य नीट साधोनी ।
गेलें शस्त्र चपल तें ढालीचें तकट सकल भेदोनी ॥ १९७ ॥
अंगीं उरकवच असे चित्रकृतीचें तयांत तें रुतलें ।
दोन्ही कुशींतुनी मग पुष्कळसें चर्म भोंवतीं सुटलें ॥ १९८ ॥
वीराच्या अंत्रीं परि त्या न दिलें गुंतुनी मिनर्वेनें ।
प्राणहर व्रण नोहे युलिसीसें जाणिलें परिक्षेनें ॥ १९९ ॥

मार्गे सरुनी बोले उद्देशुन सोकसास वीर भला।
" रे मन्दभाग्य! आतां लवकरची समज नाश तव झाला ॥२००॥
त्रायस्थांशीं लढणें मजला केलेंस तूं अशक्य खरें ।
परि मी निवेदितों कीं दुर्विधिनें मरण तुजसिं येइल रे ॥ २०१ ॥
मच्छूलांकित होउनि करशिल माझें बरेंच गौरव रे।
प्लूतोपुरास तूझा आत्मा जाइल निघोन आज बरें " ॥ २०२ ॥
ऐसें हा वदला. तो सोकस वळुनी निघे पळायाला ।
युलिसीसें शूल तदा याच्या अंसांतरालिं रोंवियला ॥ २०३ ॥
शूल उरातें भेदी, वीर पडे शस्त्रभार खणखणतां ।
युलिसीस पाहुनी हें लागत बोलावया सगर्व अतां ॥ २०४ ॥
" सोकस हे वीरतनय! हिप्पासस अश्वदमन तव तात।
मरण अतर्कित तुज ये, नाहीं त्वां चुकविलास तव घात ॥ २०५ ॥
रे दैवहतक! परिसें तूझ्या देहावसानसमयाला ।
जननी पूज्य जनक वा झांकिल कोणी तुझ्या न नयनांला ॥२०६ ॥
गृध्र क्षुधार्त तुजला हलवोनी पंख फाडतील बरें।
प्रेतविधी करतिल मम सन्मानें ग्रीक हें परन्तु खरें " ॥ २०७ ॥
ऐसें वदुनी काढी उपटुनि सोकसाविसृष्ट शूलास।
छेदून ढाल होता शिरला अंगांत भेदुनी मांस ॥ २०८ ॥
त्या सरसें रुधिर गळे, चित्तातें होतसे व्यथा घोर।
युलिसीसाच्या रुधिरा पाहुनियां त्रोजनांस ये जोर ॥ २०९ ॥
अन्योन्यां उत्तेजन देवोनी सर्व त्यावरी घुसती।

तों तो मागें सरुनी मित्रांतें हाक मारितो पुढतीं ॥ २१० ॥
काढितसे उच्चस्वर मावतसे मनुज मस्तकीं जितका ।
अरडे त्रिबार दुरुनी ऐकतसे मेनिलास त्या हांका ॥ २११ ॥
आजक्ष जवळ होता त्यालागीं मेनिलास मग वदला ।
" जननायक ! आजक्षा ! तेलामनजा ! प्रसंग कठिण अला ॥२१२॥
दुर्जय युलिसीसाचा माझ्या अजि आर्त शब्द ये कानीं ।
जणुं एकल्यास छळिलें कोंडुनियां समरिं त्या त्रोजनानीं ॥ २१३ ॥
घस्मर समरीं त्यातें यांनीं केला असेल रे वार ।
चल जाऊं गर्दींतुनि, वेळीं साहाय्य पाहिजे फार ॥ २१४ ॥
मजला भीति अशी कीं अरिकरिं जर आज एकला गावे ।
जीवा अपाय घडुनी वरतिल हे ग्रीक दैन्य तद्भावें" ॥२१५॥
बोलुन हें वीर निघे, सुरसम तान्मित्र मागुनी चाले ।
बघती कीं युलिसीसा त्रोजनदल वेधुनी असे बसले ॥ २१६ ॥
चापविसृष्ट शरानें जेविं मृगा व्याध विद्धकाय करी ।
पर्वतभागीं पळतां गोमायूंचा समूह पाठ धरी ॥ २१७ ॥
पळतो मृग जों त्याच्या कांहीं रुधिरांत उष्णता आहे ।
अथवा जानूंमध्यें पळण्यातें स्वल्प शक्ति ती राहे ॥ २१८ ॥
परि जेव्हां निशितशरा होत असे तो दमून पूर्ण वश ।
ते पिशुन हिंस्र जंबुक त्याचा करितात सत्वरी नाश ॥ २१९ ॥
दैवें तथापि येतो सिंह तिथें एक जीवघातक तो ।
भिवुनी शृगाल पळती, सिंह अणी भक्ष्य आयतें खातो ॥ २२० ॥

तेंवि त्रोजनजंबुक युलिसीसा वेढिती असंख्य रणीं ।
शूल करीं परि घेउनि धांवुनियां वीर दाखवी करणी ॥ २२१ ॥
चुकवी निर्दय वेला घेई आजक्ष ती करीं ढाल ।
शोभे जी बुरुजासम. निपजवि भय अरिंत वीर जंजाल ॥ २२२ ॥
त्रोजन पळती भिउनी ज्याला जी वाट सांपडे तीनें ।
तों मेनिलास तेथें रणभागीं येतसे त्वरितगतिनें ॥ २२३॥
युलिसीसातें काढी गर्दींतुनि हात धरुन बाहेर ।
सूतें सन्निध अणिला रथ, बैसे वीर आंत तो जेर ॥ २२४ ॥
त्रायस्थांवर पडला तुटुनी आजक्ष वीर नंतर तो ।
दोरिक्लसास वेगें प्रायमजातें अनौरसा वधितो ॥ २२५ ॥
पांदोकस व लिसान्दर शूर पिरासस व तो पिलार्तीस ।
वीरावलि इतुकी ही झाली क्षत, कोण करिल गणतीस ॥ २२६ ॥
आणी जशि ती वाहे समभूमीवरतिं फुगुन निर्झरिणी ।
कीं वृष्टिपुष्ट सुटतो गिरिवरुनी तो जलप्रवाह झणीं ॥ २२७ ॥
बहु देवदारु सुन्दर इत्यादिक वृक्ष नेति वाहुनियां ।
संक्षुब्ध इतर ओघां देती त्या वारिधींत लोटुनियां ॥ २२८ ॥
आजक्षाची करणी आज तशी दिसत अरिस अनुसरतां ।
वेढुन रणांगणीं त्या अश्वां सुभटां वधीत समररतां ॥ २२९ ॥
हें वृत्त हेक्तराच्या नाहीं अद्यापि पोंचलें कानीं ।
स्कामन्दरोपकंठीं डाव्या बाजूस लढतसे मानी ॥ २३० ॥
नररुण्डें गळति जिथें, उठला उत्क्रोशाही अशाम्य जिथें ।

वीर इदामिनिअस आणि नेस्तर हे शूर झगडतात तिथें ॥ २३१ ॥
हेक्तर यांतचि मिसळुनी, दुष्कर दावीतसे जनां करणी ।
शूलक्षेपणकौशल्य आश्विकनैपुण्य तेविं थोर रणीं ॥ २३२ ॥
तरुण भटांच्या रांगा, नासुनियां एकसारख्या टाकी ।
ग्रीक तथापि न पळते, हेलनपति दूर अरिस परि हांकी ॥ २३३ ॥
मेकाअन जननायक अद्भुत ज्याची असे प्रसिद्ध कृति ।
त्यातें त्र्यग्रशरें हा क्षत अंसावरतिं करितसे सुमति ॥ २३४ ॥
शूर ग्रीकांलागीं त्याच्या करतां बरेंच भय वाटे ।
होतां तो हत सकलां जाया लागेल आपुल्या वाटे ॥ २३५ ॥
वदत इदामिनिअस तो मारोनी हांक नेस्तरालागीं ।
"नेस्तर नेलिअसज ! हे ग्रीकांच्या तूंच वैभवाजागीं ॥ २३६ ॥
ये तूं रथांत चढुनी घेईं मेकाअनास तुजसरसा ।
दृढशफ हय नौदेशा नेईं हांकून आज सत्वर सा ॥ २३७ ॥
एका वैद्याची सर नाहीं येणार बहुत वीरांस ।
सौम्य उपायां योजी काढी बाहेर ओढुन शरास "॥ २३८ ॥
ऐसें तो वदला मग नेस्तर सरदार तो जिरेनिअन ।
मानुन वच रथिं चढला संगें मेकाअनास घेऊन २३९ ॥
हा एस्क्युलेपिअससुत अगदीं निर्दोष वैद्य विख्यात ।
बसतां जवळी हांकी निज हय तो करुनियां कशाघात ॥ २४० ॥
पळती प्रेमें हय ते. त्यांच्या नौमार्गे सुखद वृत्तीस ।
बसुनी हेक्तर सन्निध न्याहाळी समर सेब्रिआनीस ॥ २४१ ॥

अस्ताव्यस्त त्रोजन पाहुनियां शब्द बोलला वाचे ।
"हेक्तर आह्मीं दोघे येथें ग्रीकांत मिसळलों साचे ॥ २४२ ॥
घोरध्वनियुत माते इकडे रण परि जरा बघें तिकडे ।
भ्रांत त्रोजन झाले भीति हयां सैनिकां बरीच जडे ॥ २४३ ॥
तेलामनजें यांतें आजक्षें वेढिलें मला कळतें ।
ओळखितों मी त्याला, त्याची ती रुंद ढाल नच लपते ॥ २४४ ॥
परि नेऊं चल हय रथ जेथें ते स्वार आणि पदातिबल ।
अन्योन्यांतें कापुन विग्रह दुर्वाय करिति बहु सफल ॥ २४५ ॥
संभ्रम बहुत उडाला, कोणाला तो न आंवरेल अज "।
ऐसें बोलुन तेणें फडकविला तो प्रतोद निज सहज ॥ २४६ ॥
हेतु तयाचा कळतां जवन रथा पळविती दुरी हय ते ।
ग्रीक त्रोजन संघा तुडवोनी जाहले पुढें पळते ॥ २४७ ॥
शस्त्रास्त्रें चुंधडिती, चुंधडती प्रेतभार विक्राळ ।
रथचक्रांच्या धांवा नेमींसह होत रक्तबंबाळ ॥ २४८ ॥
चक्राच्या वलयांनीं अश्वशफांनीं वरी उडे रुधिर ।
तरि तो वीरसमूहा भेदाया होतसे अति अधीर ॥ २४९ ॥
ग्रीकांचा नाश तयें चालवितां उडत बहुत संभ्रम तो ।
शूल न खालीं ठेवी फेंकी जड दगड, असिहि चालवतो ॥ २५० ॥
परि तेलामनजाशीं आजक्षाशीं न कलह तो मांडी ।
जोव्हानें आजक्षा केलें भयभीत धीर तो सांडी ॥ २५१ ॥
स्तब्ध उभा ठाकोनी सप्तबलीवर्दचर्मकृत ढाल ।

भीतिग्रस्तहृदय तो मागें परते चुकावया हाल ॥ २९३ ॥
मागें पुढें वळोनी न्याहाळोनी दिशा पशूसम हा ।
जानूवरि जानूतें दडपोनी सरत दूर भीरु पहा ॥ २९४ ॥
घेऊन सारमेयां रात्रभरी व्याध करिति जागरण ।
गोठ्यांतुनी गुरांच्या देती सिंहास हांकलून पण ॥ २९५ ॥
देति न नेउं तयाला कळपांतिल पुष्ट एक ही प्राणी ।
मग मांसलुब्ध वेगें चाल करी परि कुणा न तो हाणी ॥ २९६ ॥
रोंविति असंख्य भाले, धरिति मशाली समूर धृष्ट जन ।
क्रूर, तरी तो कांपे, भीति ग्रासी बहू तदीय मन ॥ २९७ ॥
होतां प्रभात, वनिंची खिन्नमनें सरळ वाट सिंह धरी ।
त्रायस्थांतुन जातां तैसें आजक्ष फार दुःख करी ॥ २९८ ॥
ग्रीकांच्या नौका तो राखाया करित काळजी फार ।
लोंचट गर्दभ जैसा खात असे भग्न यष्टिंचा मार ॥ २९९ ॥
अणि उंच वाढलेलीं क्षेत्रांतिल खातसे पिकें जून ।
मग तीं पोरें त्यावर ओढिति काठ्या करें सपाटून ॥ २६० ॥
त्यांचें बल अल्प तरी, अन्तीं तृप्तास देति हांकलुन ।
तैसें तेलामनजा आजक्षा शत्रु हांकिती जपुन ॥ २६१ ॥
त्रोजन आणि तयांचे मित्र तदा लागती तया मागें ।
त्याच्या ढाली वरतीं शस्त्रास्त्रें सोडिती बहू रागें ॥ २६२ ॥
आजक्ष उलट फिरुनी मधुनी मधुनी तयांस बल दावी ।
त्रायस्थां हयदमनां ध्याया माघार अल्प तरि लावी ॥ २६३ ॥

फिरुनी वळे पळाया, जातां नौकांकडे तयां अडवी ।
उभय दलांच्यामध्यें राहुनियां शौर्यशील कृति दावी ॥ २६४ ॥
भाले धृष्ट जनांचे सुटतां ढालींत चिकटती कांहीं ।
आणि मांसलुब्ध रुतती भूंत जयां नेम साधला नाहीं ॥ २६५ ॥
ईव्हीमनज दुरोंनी युरिपैलस यास बघुन शरबद्ध ।
तद्रक्षणार्थ धांवुन त्याजवळी जाइ वीर संनद्ध ॥ २६६ ॥
आणि फासिआसतनया माराया आपिसाअना जेव्हां ।
तनुमध्याच्याखालीं यकृद्भागांत वार करि तेव्हां ॥ २६७ ॥
तद्गात्रें कोसळलीं. जेता करुं लागला कवचहरण ।
पाहुनियां पारिस त्या वांकवि धनु घ्यावयास तत्प्राण ॥ २६८ ॥
डाव्या ऊरुवरी तो शर सोडी; वेत्र मोडला त्याचा ।
ऊरुस इजा जहाली गांठी तो पळुनि संघ मित्रांचा ॥ २६९ ॥
चुकवी दुर्नियतीला; ग्रीकांतें मारि अरडुनी हांका ।
“मित्र अहो ! नायकहो ! ग्रीकाधिप हो ! अला समय हा कां ?॥२७०॥
सर्व जमा, स्थिर राहा, आजक्षावरिल वेळ टाळावी ।
पडला शरपंजरिं हा न कळे सुटका अतां कशी व्हावी ॥ २७१ ॥
होवो जें होइल तें. आजक्षा जवळ धीर धरुन रहा । ”
युरिपैलस हें बोले जमती तों धृष्ट वीर तेथ महा ॥ २७२
ढाली अंसांवरतीं शोभति, भाले करांत लखलखित ।
आजक्ष यां मिळाला, वळुन उभा स्थैर्य दाखवी अमित ॥ २७३ ॥
सहचर यास मिळाले चेतविती समर दीप्त अग्नि जसे ।

नेलिअसाचे हय तों नेती रथ ज्यांत वैद्यराज बसे ॥ २७४ ॥
होता नेस्तर संगें; श्रमले हय घर्मयुक्त बहु झाले ।
अकिलीस दुरुन पाहे, त्याच्या नजरेस सर्व हें आलें ॥ २७५ ॥
नौकाग्रभागिं बसुनी कठिण बघे कष्ट शोचनीय असे ।
पत्रोक्लशास सुहृदा नौकेंतुन हांक दीर्घ मारितसे ॥ २७६ ॥
तंबूंत हांक गेली; मार्सासम तो अला झणीं पुढतीं ।
त्याच्या दुर्दैवाचा झाला प्रारंभ येथ कठिण अती ॥ २७७ ॥
मीनीशिअसज वीरें केली पृच्छा " मला कशाला रे ! ।
अकिलीसा ! बोलविलें कार्याची काय आलि वेला रे ? " ॥२७८॥
बोले अकिलीस तया " वाटे मीनीशिअससुता मजला ।
मच्चरणिं लागतिल हे ग्रीक भले नाडले पुरे अजला ॥ २७९ ॥
पत्रोक्लश ! जोव्हप्रिय ! आतां त्वां जिवलगा तिथें जावें ।
आणि नेस्तरा पुसावें, लागे कोणा क्षता घरा न्यावें ? ॥ २८० ॥
मागें दिसतो कोणी मेकाअन एस्क्युलेपिअसज जसा ।
परि चेहरा तयाचा दृष्टि न पडला' कळे न कोण कसा ? ॥२८१॥
माझ्या अंगावरुनी हय गेले जवन शीघ्र धांवत ते । "
आज्ञा प्रमाण मानी पत्रोक्लश वच न कर्णी जंव पडतें ॥ २८२ ॥
ग्रीकांच्या नौभागीं धांवे तंबूंकडेस तो जाया ।
तंबूंत नेस्तराच्या करिती हे तों प्रवेश या समया ॥ २८३ ॥
उतरति सकल धरेवरि; युरिमीदन सोडि चपल अश्वांनां ।
सागरतीरीं राहुन सर्व उभे सुखद सेविती पवना ॥ २८४ ॥

घर्मानें अंगींचे भिजले जे चोल त्यांस वाळविती ।
नंतर तंबुंत जाउनि मंचावर सर्व लोक हे बसती ॥ २८५ ॥
तत्काल पेय आणी हेकामीदी तयां कुरळकेशी ।
नेस्तर संगें घे हिस, लाभ हिचा घडत तेनिद्सदेशीं ॥ २८६ ॥
अकिलीसानें पूर्वी केला विध्वंस याच नगराचा ।
तेथिल नृपकन्या ही ग्रीकांनीं भाग ठरविला याचा ॥ २८७ ॥
कारण यासम दुसरा मंत्री ग्रीकांस लाधला नाहीं ।
ती आर्सिनोअसाची दुहिता कार्या उभी पुढें राही ॥ २८४ ॥
मांडीत मेज सुंदर, पद ज्याचे नीलवर्ण गुळगुळित ।
वर पितळेच्या पात्रीं ठेवी कंदर्प एक रसभरित ॥ २८९ ॥
दुसरे पदार्थ आणी लावाया स्वाद मिष्ट पेयास ।
आणी पवित्र धान्यें, नूतन मधु, सुरभिगन्ध ये ज्यास ॥ २९० ॥
पेला सुन्दर काढी, वृद्धें जो आणिला निज घराला ।
हेमाचे कीलक बहु ज्या लागीं लागले घडायाला ॥ २९१ ॥
चार मुठी ज्या सजती; दोन वरी ते कपोत हेमाचे ।
वाटे जणुं मधु पीती; बळकट तल दोन सजति पेल्याचे ॥ २९२ ॥
ऐसा भरतां पेला उचलाया जाय कठिण अन्याला ।
सहजपणें येत असे उचलाया थोर तोच वृद्धाला ॥ २९३ ॥
पात्रांत सुंदरीनें ओतियली प्राम्निअन सुरा कांहीं ।
शेळीच्या दुग्धाचें पळिनें मिसळीत आंत गोड दहीं ॥ २९४ ॥
गोधूमपिष्ट वरतीं सिंचुनियां पेय ती तयार करी ।

प्याया त्यांतें विनवी, पेय तयांची तहान पूर्ण हरी ॥ २९५॥
संभाषण मग करुनी रंजविती सर्व एकमेकांस ।
द्वारिं उभा पत्रोक्लश; सुरसम तो वीर पाहतो यांस ॥ २९६ ॥
वृद्ध तया पाहोनी उठला निज सुप्रभासनावरुन ।
त्यास बसाया सांगे नेवोनी आंत निज करें धरुन ॥ २९७ ॥
पत्रोक्लश नाकारी, उत्तर द्यायास शब्द उच्चारी ।
"नलगे आसन मजला; जोव्हप्रिय! फुकट योजना सारी ॥ २९८ ॥
ज्यानें मज धाडियलें तो आहे सुलभ कोप मान्य जनां ।
सांगे 'बघून यावें नेसी घायाळ कोण तूं भवना' ॥ २९९ ॥
मज देखिल हें ठावें कारण मेकाअनास मीं पाहें ।
अकिलीसा संदेशा सांगाया परत जात मीं आहें ॥ ३०० ॥
जोव्हप्रिया! प्रबुद्धा! ठावा तुज तो किती भयंकर रे ।
निर्दोषा पुरुषा ही देतो तो दोष नाहिं काय बरें? " ॥ ३०१ ॥
उत्तर देई त्यातें नेस्तर सरदार तो जिरेनिअन ।
"कांरे अकिलीसाचें ग्रीकसुतांवर दया करी न मन? ॥ ३०२ ॥
असती अनेक येथें झाले जे आज समरिं घायाळ ।
जाणेना तो कटकीं शोकाचा मातला कसा काळ!। ३०३ ॥
सर्वांत शूर जे ते पडले जाऊन सर्व नौभागीं ।
झालीं क्षतें झगडतां जवळुन अथवा दुरून ज्यांलागीं ॥ ३०४ ॥
क्षत तैदिअसज झाला तो दायोमीद शूर समरांत ।
अगमेम्नन, युलिसीसहि आले घायाळ परत कटकांत ॥ ३०५ ॥

युरिपैलसास लागे एका मांडींत घाय बाणाचा ।
हा मी दुसरा अणिला, लागतसे शर तया धनुष्याचा ॥ ३०६ ॥
अकिलीस शूर असुनी ग्रीकां अवमानुनी दया न करी ।
अमुच्या नौकांविषयीं इच्छा त्याची मला कळीव खरी ॥ ३०७ ॥
साऱ्या शात्रव अग्नित जळुनी ग्रीकां अनिष्ट कां व्हावें ? ।
बघतो वाट अरीनें आह्मां सकलांस ठार मारावें ? ॥ ३०८ ॥
माझें बल तें नाहीं जें होतें प्रथम मम अवयवांत ।
फार बरें असतें मज होतें जें विकट मम नववयांत ॥ ३०९ ॥
ईलीअन अणि आह्मीं तेव्हां केलें बरेंच भांडण रे ।
वळवून बैल नेणें हें झालें त्यास मुख्य कारण रे ॥ ३१० ॥
ह्मणतां नको तयांनीं, केला प्रारंभ बैल वळवाया ।
हैपीइरोकसज तो इतिमोनीअस पडे बळी वायां ॥ ३११ ॥
हा ईलिसांत होता शौर्यें राखीत कळप या समया ।
मम शूल थास लागे पहिल्यानें त्यजित भूवरी काया ॥ ३१२ ॥
स्वार तयाचे पळती सर्व दिशांनीं खरेच गांवढळ ।
समरातुन बहु आह्मीं नेलि घरा लूट मिळुनियां सकळ ॥ ३१३ ॥
कळप अजांचे, तितुके तांडे पन्नास थोर वृषभांचे ।
तितुकेच वराहांचे, तितुके मोजून पुष्ट मेषांचे ॥ ३१४ ॥
रथवाह दीडशें त्या होत्या साऱ्याच वाजिनी चपळ ।
त्यांच्या खालीं होते छावे जे काढितात लांब पळ ॥ ३१५ ॥
नेलिअसाचें पत्तन पैलस, त्यामाजि रात्रिं यां नेलें ।

नेलिअसा सुख झालें, कीं मी वित्तार्जनास बहु केलें ॥ ३१६ ॥
कारण समरा गेलों तेव्हां होतों मुळींच मी बाळ ।
धनकोंनां बोलविलें दूतें जों जाहला उषःकाल ॥ ३१७ ॥
ईलीअन रिणकोंचें पिलिअन सरदार जाणते धनको ।
वांटून लूट घेती करगत ह्मणतील धन कशास नको ॥ ३१८ ॥
ईलीअनास होतें देणें वेळेस या अनेकांचें ।
अह्मि पैलसांत थोडे, ह्मणुनी दिन काढिले अपायांचे ॥ ३१९ ॥
ह्क्यूलीअन बल तें झालें आह्मां पुरा विघातक रे ।
शूरांच्या जीवांचा तेणें केला रणांत घात करें ॥ ३२० ॥
नेलिअसाचे आह्मीं सुत बारा त्यांत एक मी उरलों ! ।
अणि नष्ट इतर झाले, गर्वित ईलीअनांस मीं सललों ॥ ३२१ ॥
दुष्कृत्यें योजोनी केला अपमान आमुचा त्यांनीं ।
ढोरांचा, मेषांचा घेई तो कळप तात मम मानी ॥ ३२२ ॥
पशु तीनशें असे अणि पालक त्यांचे बरोबरी आले ।
ईलीअनांकडे ऋण ताताचें मूळचें बहु निघालें ॥ ३२३ ॥
शर्यत जिंकाया मम तातें हय धाडिले पुरा चार ।
रथयुत पहिले येतां तिवई होती तयांस मिळणार ॥ ३२४ ॥
ईलीअन भूपें परि आजीआसें असें असे केलें ।
ठेऊन घेतले हय, सूता मग परत पाहिजे गेलें ॥ ३२५ ॥
बोलाचाली झाली, आला अति कोप ह्मणुन वृद्धास ।
त्या वेळेचें इच्छी उसनें फेडून सर्व घेण्यास ॥ ३२६ ॥

घेई स्वतांस मोठा भाग अणी देइ शेष इतरांस।
कोणीही न फसावा ह्मणुनी तो देत अंश सकलांस ॥ ३२७ ॥
वांटप योग्य करोनी, आह्मीं नगरांत यज्ञही केले।
ईलीअन तिसरे दिनिं जमुनी आले, अर्धी जरी गेले ॥ ३२८ ॥
त्यांसह आले दोघे मोलिअन प्रथम सोडुनी भवन।
होते कुमार केवळ; उद्धत रणिंचा तयांस अनुभव न ॥ ३२९ ॥
आल्फिअसाच्या सन्निध, सिकतामय पैलसांत दूरवरी।
उन्नत भूभागीं ती थ्रोयोईसा सजे जुनी नगरी ॥ ३३० ॥
तिजला वेढा देती नाश करायास साधुनी वेला।
उत्क्रमती समभू तों चिंता जडली जरा मिनर्वेला ॥ ३३१ ॥
दूतीकृत्य कराया आलिम्पसवासिनी अली खालीं ।
व्हाया सशस्त्र आह्मां सकलां तों प्रेरणा मनीं झाली ॥ ३३२ ॥
एक उरे अचलित तो उत्सुक जो नच रणास जायातें ।
सन्नद्धकाय होऊं देईना तात नेलिअस मातें ॥ ३३३ ॥
मम हय लपवी, सांगे, ' तुजला रणकृत्य ठाउकें नाहीं '।
मी परि निघून गेलों स्वारांसह मग तसाच पायांहीं ॥ ३३४ ॥
रणमुखिं तेव्हां नेउनि केलें विख्यात मज मिनर्वेनें।
मिनिईअसनिर्झरिणी होत रिती सागरांत लीलेनें ॥ ३३५ ॥
तेथें आरीनाशीं बसले जाऊन पिलिअन स्वार।
बघती वाट उषेची; तों आलें शत्रुसैन्य तें फार ॥ ३३६ ॥
आल्फीअसप्रवाहा जवळी आलों दुपारला सहसा।

जोव्हातें दिधले बालि, नेप्चूना वृषभ अर्पिला नवसा ॥ ३३७ ॥
आल्फीअसा दिला वृष, सुन्दर गोजी दिली मिनर्वेला ।
संघ करोनी केलें भोजन साधोनियां बरी वेला ॥ ३३८ ॥
स्रोतःसन्निधभागीं निजलों घेउन उशास निज कर ते ।
नाश करायालागीं ईलीअन वेढिति तंव पुरातें ॥ ३३९ ॥
दैदीप्यमान जों रवि झाला आरूढ धरणिच्या वरतिं ।
दिसुं लागली पुढें ती उज्ज्वल अद्भुत रणांत मार्सकृति ॥ ३४० ॥
करुनि मिनर्वास्मरणा प्रार्थुन जोव्हा रणांत मीं लढलों ।
पिलिअन ईलीअन हे लढतां मी मारुनी कुणा बसलों? ॥ ३४१ ॥
मोलिअनातें वधुनी त्याच्या दृढशफ हयांस मीं हरिलें ।
आजीआसाच्या त्या ज्येष्ठ सुतेनें जयास कीं वरिलें ॥ ३४२ ॥
आगामीदी ठावी सर्वां लोकांस पीत केंसाची ।
विपुल धरे वरिल तिला ओषधिंची माहिती असे साची ॥ ३४३ ॥
पितळेचा मम भाला, मारियला त्यास मजवरी येतां ।
पडला धुळींत तो, मीं सजलों तत्स्यंदनीं उडी घेतां ॥ ३४४ ॥
मीं अग्रगण्य योद्धा माझी ईलीअनांस भीति भरे ।
पळती सर्व दिशांनीं सेनानींचें अमोल आयु हरे ॥ ३४५ ॥
त्यांतिल उत्तम होता योद्धा हा ह्मणुन मी पुढें घुसलों ।
लोटींत यास नेलें रणिं झंझावातसा तयां गमलों ॥ ३४६ ॥
पन्नास पकडिले रथ दर एकीं वीर दोन दोन भले ।
मच्छूल विजित होउनि दन्तें चाउन धरेस जे निजले ॥ ३४७ ॥

आक्तरतनया आतां मोलिअना खचित मारिलें असतें ।
नेप्चूनें तातें जर दाट धुक्यांमाजि लपविलें नसतें ॥ ३४८ ॥
नंतर जोव्हें दिधलें अद्भुत बाहूंत बल पिलिअनांस ।
मागें लागुन आह्मीं वधिलें याच्या अधीं अनेकांस ॥ ३४९ ॥
गोधूम प्रचुर अशा बूप्राशिअमाकडे अतां अभय ।
कवचहरांचे अमुचे अरिच्या मागून नेत जोव्ह हय ॥ ३५० ॥
ओलीनिआ शिलोच्चय जेथें, तेथें तयांस दवडीत ।
कोलोनी नाम पडे एलीशिअमा तयां तिथें अणित ॥ ३५१ ॥
येथून मिनर्वेनें अमुच्या लोकांस फिरविलें परत ।
शेवटल्यास इथें मीं वधुनी त्यजिलें असून समररत ॥ ३५२ ॥
जोव्हा सुरांत, देती जन यश मज नेस्तरा नरांत तसें ।
हे मम सत्य पराक्रम, होतों जीवन्त हेंहि सत्य जसें ॥ ३५३ ॥
परि निज पराक्रमाच्या सेवि सुखा एकटाच अकिलीस ।
तडफडुनी जन मरतां शोकें येईल खचित जेरीस ॥ ३५४ ॥
अगमेम्ननाकडे तुज जेव्हां बत्र धाडिलें थियाहून ।
मीनीशिअसें तेव्हां, मित्रा ! कथिलें न अधिक याहून ॥ ३२५ ॥
युलिसीस आणखी मीं दोघे जों बसुन आंत होतों रे ।
जें जें तुज उपदेशी तें तें आह्मांस ऐकुं ये तों रे ॥ ३५६ ॥
बहुत जनाकीर्ण अशा पोलिअसाच्या विशाल हर्म्याशीं ।
आलों ग्रीसांतोनी आह्मि जमा करुन थोर सैन्याशीं ॥ ३५७ ॥
मीनीशिअस, तसा तूं, अणि तो अकिलीस आंत दृष्टि पडे ।

वृषसक्थि वृद्ध करिं घे हर्म्यावरणांत पेलिअस तिकडे ॥ ३५८ ॥
जोव्हा बलि अर्पाया वृद्धाचा हेतु तेधवां दिसला ।
हेमाच्या पात्रांतुन कुंडाग्नींत ओतण्या सुरा बसला ॥ ३५९ ॥
तेथें वृषमांसाशीं तुह्मीं होतेत कायसें करित ।
देहलिबंधीं आह्मां पाहुन आकिलीस होतसे चकित ॥ ३६० ॥
उठुनी हात धरोनी नेउन आह्मांस आंत ह्मणत " बसा " ।
करि मान वस्तुदानें अतिथीला योग्य जो जनांत तसा ॥ ३६१ ॥
खाउन पीउन झालों तृप्त तदा लागलों वदाया मीं ।
याया अमुच्या संगें केली तुह्मां विनंति हंगामीं ॥ ३६२ ॥
झाली मान्य तुह्मां ती, तुह्मां कथिलें तसेंच वृद्धांनीं ।
पेलिअसें अकिलीसा कथिलें ' तूं शूर हो प्रसिद्ध जनीं ' ॥ ३६३ ॥
मीनीशिअस पिता तव आक्तरसुत वदत ' परिस पुत्र अज ।
अकिलीस श्रेष्ठ कुलें, होसी तूं श्रेष्ठ परि वयें सहज ॥ ३६४ ॥
तो श्रेष्ठ शक्तियोगें, बुद्धिबलें तूं. तयास बोधावें ।
सुपथा त्वां दावावें. हितकामें त्या पथें तयें जावें ' ॥ ३६५ ॥
वृद्धाचा बोध असा, अजला तूं सांग विसरलास कसा ।
आतां तरि अकिलीसा गोष्टी या सांग ऐकिल्या सहसा ॥ ३६६ ॥
न कळे, कुणास ठाउक? सद्बोधें चित्त वळवशिल त्याचें ।
होवो सहाय ईश्वर. हितकारक बोध वचन मित्राचें ॥ ३६७ ॥
सिद्धादेश तया जर चुकवायाचा असेल एखादा ।
अथवा तद्जननीनें जोव्हाची उक्ति कथिलि जर भयदा ॥ ३६८ ॥

तर तुज तेणें धाडुन, मिर्मिदनांच्या दला सर्व द्यावें ।
साहाय्य ग्रीकांतें करण्या तत्कवच अंगिं तूं ल्यावें ॥ ३६९ ॥
ऐसा रणिं तुज बघुनी, त्रोजन समजून तुजासिं अकिलीस ।
पळतिल सोडुन समरा; ग्रीकां लाधेल सुख अखेरीस ॥ ३७० ॥
युद्धा पडेल खळ मग; सारे तुह्मीं नवीन वीर धड ।
नौदेशाहुन नगरा श्रान्तारिस हाकणें तुह्मा सुघड" ॥ ३७१ ॥
ऐसें तो वदला मग; याचें मन होत हर्षनिर्भरित ।
भेटाया अकिलीसा नौभागीं धांव घेतसे त्वरित ॥ ३७२ ॥
सुरसम युलिसीसाच्या नौकांशीं पोंचला असे पळत ।
न्यायाधिष्ठान तसें वाक्कलहाङ्गण तिथें जुनें सजत ॥ ३७३ ॥
देवार्चनार्थ मोठीं होतीं तीं स्थंडिलें जिथें रचिलीं ।
ईव्हीमनज तिथें तो युरिपैलस भेटला तयास बली ॥ ३७४ ॥
मांडींत बाण रुततां समरांतुनि निघुनि येत लंगडत ।
डोक्याच्या वरुन तसें अंसांच्या वरुन घर्मजल गळत ॥ ३७५ ॥
क्षत दुःखद त्या झालें, त्यांतुनियां कृष्ण रुधिर पाघळत ।
त्याचें तथापि पाहीं धैर्य मनींचें न अल्पही ढळत ॥ ३७६ ॥
मीनीशिअससुताला पाहुन या कींव येतसे भारी ।
खेद करोनी हृदयीं वाचेनें दीन शब्द उच्चारी ॥ ३७७ ॥
"हा! दुःखभाग् नरानों! ग्रीकाग्रणिनों! अनेक भूपतिनों!।
देशाचा, मित्रांचा विरह विदेशीं न नियतिला मानो! ॥ ३७८ ॥
स्वच्छवसेनें त्रायीं तोषविणें काय सारमेयांस!

जोव्हप्रसाद नृपते ! युरिपैलस ! कथिं भविष्य समयास ॥ ३७९ ॥
ग्रीकांस अजुन ऐसा हेक्तर बलवन्त काय झेंपेल ? ।
अथ तच्छूलजितांचा होउनियां नाश एक हि न उरेल " ॥ ३८० ॥
युरिपैलस सुज्ञ तया उत्तर देतां वदे तदा उलट ।
" जोव्हप्रिय ! पत्रोक्लश ! नाहीं ग्रीकांस मदत सन्निकट ॥ ३८१ ॥
नौभागाचा घेतिल आश्रय ते पाय काढुनी परत ।
त्रोजनशरहत कण्हती नौदेशीं मुख्य वीर अज अमित ॥ ३२ ॥
अरिचें बल वाढतसे. नौभागीं नेउनी मला राखीं ।
मांडींतिल शर काढी; रक्त जलें पूस तनुस जें माखी ॥ ३८३ ॥
सौम्य अशा ओषधिंचा आरोग्यावह करीं वरी सेक ।
ह्मणसी त्या अकिलीसें सांगितल्या ज्या गुणावह अनेक ॥ ३८४ ॥
त्यातें चिरनें कथिल्या पूर्ण दयाळें विशुद्ध सेन्तारें ।
पोदालिरिअस आणी मेकाअन वैद्य हे इथें सारे ॥ ३८५ ॥
दुसरा क्षत होउनियां तंबुंत जाऊनियां कळे निजला ।
कुशल भिषग्वर्याची आहे कीं गरज फार त्या अजला ॥ ३८६ ॥
त्रायस्थाशीं पाहिला समरीं करण्यास युद्ध अजि पाहे " ।
मीनीशिअसज बोले " व्हायाचें काय हो पुढें आहे ! ॥ ३८७ ॥
हे ! युरिपैलस ! सांगें आह्मा आतां पुढें कसें करणें ।
त्या पूज्य नेस्तराचा अकिलीसातें निरोप मज कथणें ॥ ३८८ ॥
तरिही तूझी आतां व्यथिताची काशि करीन हयगय रे ! " ।
ऐसें बोलुन भूपा नेई तंबूंत उरिं धरून करें ॥ ३८९ ॥

त्याचा सहचर यातें पाहुन गोचर्म खालतीं पसरीं ।
पत्रोक्कश या निजवी, ताणुनियां हात पाय त्याजवरी ॥ ३९० ॥
शस्त्रानें मग काढी कटुतम तो निशित बाण मांडितला ।
आणि कृष्ण रुधिर काढी धुवुनी सिंचून वरतिं उष्णजला ॥ ३९१ ॥
शामक एक मुळी वर चोळी; तों तीव्र वेदना शमुनी ।
जाई व्रण हि सुखोनी वाहेना रुधिर कृष्ण तें मधुनी ॥३९२ ॥

सर्ग १२ वा.

ग्रीकांच्या तटांसन्निध युद्ध.

सारांशः—**त्रो**जन **ग्री**कांचे तटांवर तुटुन पडतात. कांहीं शकुन होतात. **पा**लिदामास ते अशुभ आहेत असें समजून हेक्करास परावृत्त करूं पहातो. हेक्तर त्याचें ह्मणणें न जुमानतां तटांमधलें दार फोडून नौप्रदेशांत जावयास मार्ग काढतो.

तंबुंत **मी**नीशिअसज जों करि युरिपैलसक्षतास बरें ।
तों **ग्री**क **त्रो**जन हे चालविती युद्ध रणमुखीं जबरें ॥ १ ॥
ग्रीकांचा खंदक अणि भित्तिप्राकार अरिस नच नडले ।
खंदक खणिले यांनीं देवां शतमेध नाहिं कां दिधले ! ॥ २ ॥
नौकांत लूट यांची, कैशी राखूं शकेल आवरण ।
ईश्वर विरुद्ध असतां रचिलेला कां टिकेल वस्तुगण ॥ ३ ॥
हेक्तर सजीव जों तो, जों तो बसला रुसून अकिलीस ।
प्रायमपुरास झाला तों न उपद्रव तसाच भिंतीस ॥ ४ ॥
त्रोजन वीरोत्तम परि समरशिरीं मृत्युमुखिं यदा पडले ।
ग्रीकांतिल पुष्कळसे जित झाले, शेष धरुन रण बसले ॥ ५ ॥
आणि दहाव्या वर्षीं **प्रा**यमपुर जाहलें यदा नष्ट ।
ग्रीक गृहा नौकांतुन गेले करुनी यदा रणीं इष्ट ॥ ६ ॥
नेप्चून आणि अपालो यांनीं पाडावयास भिंत तदा ।
केला निश्चय पुरता योजुन कामीं नद्यास आणि नदां ॥ ७ ॥

मिळती इदाद्रिवरुनी वाहोनी सागरास हीं सारीं ।
ऱ्हीसस, हेप्तापोरस, कारीसस कलुष शीघ्रगतिवारी ॥ ८ ॥
ग्रानिकस, स्कामन्दर, ईसिपस, ऱ्होदिअस सरिद्विमल ।
आणि सिमोइस तटिनी इतक्यांचें खर्चिलें ह्मणून बल ॥ ९ ॥
त्यांच्या पांशुल भागीं ढालींचा भार आणि कवचांचा ।
पडुनी गढला होता मनुजांचा तेविं सुरसमानांचा ॥ १० ॥
थोर अपालोनें मग एक स्थलिं फिरविलीं मुखें यांचीं ।
नउ दिन लावुन दिधली भिंतीवर झोड या प्रवाहांची ॥ ११ ॥
जोव्हानें इतक्यांताचि केला वर्षाव सारखा वरुन ।
हेतु मनिं कीं जावी जलधिजलें भिंत पार ढांसळुन ॥ १२ ॥
नेप्चून धराकंपक, नेई यां शूलहस्त या ठाया ।
प्रस्तर जलांत लोटी होता यद्रचित भिंतिचा पाया ॥ १३ ॥
ग्रीकश्रम विफल करुन हेलिस्पान्टा सपाट पार करी ।
विध्वंसुनि भिंतीतें, वाळूनें तीर तें अफाट भरी ॥ १४ ॥
मूलपथाला नंतर लावितसे सर्व या प्रवाहांला ।
जेणें मिळवित होते पहिल्यानें स्वादुजल समुद्राला ॥ १५ ॥
नेप्चून आणि अपालो, यां होतें हें पुढें करायाचें ।
आजि भोंवतीं तटाच्या तोंड मिळे प्रखर मुखर समराचें ॥ १६ ॥
बुरुजाच्या रुंद कड्या घुमती लागून वार शस्त्रांचा ।
जोव्हप्रहितोत्पातें जित झाले ग्रीक; गूण कालाचा ॥ १७ ॥
नौभागीं अडकोनी बसले; भीतात हेक्तरा भारी ।

कारण पळण्याचें कीं लढला हा+ चक्रवातसम समरीं ॥ १८ ॥
सूकर अथ सिंह जसा, सांपडतो समयीं रानिं घेराया ।
मुद्रा उग्र तयाची श्वानां व्याधा दिसे तया समया ॥ १९ ॥
एकत्र जमुन सारे चौकोनी करिति नीट कोंडाळें ।
त्याच्यांशीं झुझतांना भाल्यांचें फेंकितात वर जाळें ॥ २० ॥
परि नाहीं धीटाच्या हृदयाला ठाउकें कसें भय तें ।
मग तो पळेल कैसा ? शूरा धैर्यंच मरण ओढवतें ॥ २१ ॥
मधुनी मधुनि फिरे तो वाटोळा, पाहतो कसे नर ते ।
जिकडे वळतो तिकडिल पळताती लोक भिउन सत्वर ते ॥ २२ ॥
जनसंमर्दांतुनियां हेक्तर फिरुनी तसा स्वमित्रांस ।
कथितो घ्याया खंदक; धजति न हय, त्यांस होतसे त्रास ॥ २३ ॥
खिंकाळति जोरानें कांठ पुढें पाहुनी उभा तुटका ।
खंदक रुंद भयावह, करणें उड्डाण वरुन भयद न का ? ॥ २४ ॥
कैसें उतरुन जावें, दोहोंबाजूस दीर्घ घसरड ती ।
ग्रीकांनीं रचिले तळिं शूलाग्रस्तंभ दीर्घ दाट अती ॥ २५ ॥
ऐशी प्रचण्ड होती हल्ला टाळावया अज तयारी ।
जवन रथा ओढोनी धांवाया अश्व धरित भय भारी ॥ २६ ॥
परि साधल्या सरावें पुढतीं ही आस पत्तिसैन्यास ।
हेक्तरसन्निध जाउनि बोलतसे वीर पालिदामास ॥ २७ ॥
" हे ! हेक्तर ! अणि तुम्ही ! जननायक मित्रवर्य हो ! दुसरे ।

+ शिरला कौरवकटकीं जैसा झंझासमीर तरुनिकरीं । मोरोपंत.

हय खंदकावरोनी नेतां होईल मूर्खपण जबरें ! ॥ २८ ॥
शूलाग्रस्तंभांनीं भरलें तल, म्हणुन होय दुर्गम तें ।
पुढल्या तटावरोनि स्वार अतां उतरतिल न हें गमतें ॥ २९ ॥
लढतिल हेंहि अशक्याचि, आहे तें स्थल अरुंद हो भारी ।
तेथें सेना अमुची होइल शस्त्रोपहत खचित सारी ॥ ३० ॥
जरि जोव्ह मेघगर्जन मारी ग्रीकांस कपट योजुन हो ।
त्रायस्थांस कराया इच्छी साहाय्य तर उशीर न हो ! ॥ ३१ ॥
अर्गास सोडुनी दुरि, होउत हे ग्रीक नष्टजीव अतां ।
येइल जर त्यां लागीं नौभागीं अयश पूर्ण अज लढतां ॥ ३२ ॥
कोंडून खंदकीं हे ग्रीक न उरतील वृत्त कळवाया ! ।
कथितों तैसें करण्या या समयीं जनमनांस वळवा या ॥ ३३ ॥
या रुंद खंदकांशीं सेवक संभाळतील अश्वांस ।
कवचावृत तनु आह्मीं अनुसरुंया हेक्तरास वीरास ॥ ३४ ॥
भरलें असल्यास कसा ग्रीकांचा मग टिकाव लागेल ? " ।
ऐसें तो उपदेशी. बोध हिताचा कुणा न मानेल ? ॥ ३५ ॥
हेक्तर कवचावृत तनु घेत उडी स्यंदनांतुनी खालीं ।
कोणि न हयपृष्ठिं उरे, ज्या त्या निघण्या त्वरा बहू झाली ॥ ३६ ॥
हेक्तर जातो बघुनी, करिती स्वाधीन अश्व सूतांचें ।
अणि सर्व जमुन रचिती व्यूह तदा पांच सर्व सैन्याचे ॥ ३७ ॥
नायक चालति पुढतीं, नेती मागून सैन्यभागास ।
हेक्तर नायक पहिला, दुसरा तो शूर पालिदामास ॥ ३८ ॥

अनुयायी याचे ते होते अतिशूर ज्यां नसे गणना ।
नौभागीं तट भेदुनि लढण्या उत्सुक तयार अरिंदमना ॥ ३९ ॥
हेक्तर रथाशिं अन्या ठेवितसे, ह्मणुन सेब्रिआनीस ।
सेनानी तिसरा ये, चवथा पारिस रणांत मदतीस ॥ ४० ॥
आल्काथोअस तेवीं सरला समरांत आजिनार तसा ।
प्रायमज दीइफोबस अणि दुसरा हेलिनस निघे सहसा ॥ ४१ ॥
आणिक तुकडी नेई राणिं हिर्ताकसज आशिअस वीर ।
तापट उंच हयांनीं अणिलें त्या लावितां न मुळिं उशिर ॥ ४२ ॥
आरिस्बेहुन आला सीलीइस आपगा जिथें वाहे ।
अणि ईनिआस त्यासह अन्कैसीसज रणांत शिरिं राहे ॥ ४३ ॥
ते दोन अन्तिनारज, तो आकामास आर्चिलोकस तो ।
दोघे युद्धविशारद. राणिं नन्तर सर्पिदन पुढें दिसतो ॥ ४४ ॥
सपक्षनायक हा मग घेई त्या ग्लाकसास मदतीस ।
आस्तीरोपीअस तो संगें जाया निघे अखेरीस ॥ ४५ ॥
शूरोत्तम दोघे जण ऐसे नाहीं कुठें सपक्षांत ।
गोचर्मग्रथित करीं ढाली घेऊन समरिं ते जात ॥ ४६ ॥
ग्रीकांवर धैर्यानें गेले चालोन वीर हे खासे ।
त्यांस गमे नौभागीं अरि पळतो, त्या न मार सोसतसे ॥ ४७ ॥
अन्य त्रोजन दुरचे मित्र तयांचे धरून विश्वास ।
वागाति जैसें सांगे सेनानी सुज्ञ पालिदामास ॥ ४८ ॥
वीरांचा नायक परि हिर्ताकसतनय आशिअस चपल ।

अश्वा सूता सोडुन जाया इच्छी न. तो परी प्रबल ॥ ४९ ॥
त्यांसह नौभागातें जायाला सिद्ध! केवढा मूढ ।
सरथ न इलियम पाहिल नियतिस चुकवून हा, न हें गूढ ! ॥५०॥
त्यास इदामिनिअस मग तो ड्यूकालिअन तनय वेढीत ।
डाव्या नौभागीं हा घुसत पथें ज्या पळे अरि त्वरित ॥ ५१ ॥
समरांतुन रणविन्मुख रथ हय जों जाति तोंच हा तिकडे ।
हांकितसे निज रथ हय, उघडें तों द्वार यास दृष्टि पडे ॥ ५२ ॥
अडसरहि त्यास नव्हता, पळत्याचे स्वागतार्थ जें उघडें ।
सरळ पुढें हांकी हय, सहचर करतात घोष तो न दडे ॥ ५३ ॥
स्वार तया अनुसरती; मौर्ख्य तयांचें कळून थे न कसें ? ।
त्यांस गमे नौभागा घेइल पळ अरि, न मार सोसतसे । ॥ ५४ ॥
द्वारिं उभे वीर भले दोघेजण थोर लापिथीकुलज ।
लीआन्तीअस पहिला शौर्यें मार्सास तुल्य जो सहज ॥ ५५ ॥
पिरिथौसज तो दुसरा विक्रमयुत होय पालिपीतीस ।
उच्च द्वारिं उभे हे दोघे, ज्यां सागवृक्ष उपमितिस ॥ ५६ ॥
पर्वत भागीं सोसुन सर्व ऋतूंमाजि वृष्टि अणि पवन ।
जे बद्धमूल सजविति धैर्यें राहुन उभे विशाल वन ॥ ५७ ॥
तैसे तेही ठेवुन भिस्त तदा भुजबलावरी सारी ।
वाट उभे बघताती आशिअसाची जयास बल भारी ॥ ५८ ॥
स्वार परी ढाली वरि उचलोनी चालले तटावरतीं ।
आशिअसा तत्सेना राहे वेढून तीस नच गणती ॥ ५९ ॥

आयेमेनस होता, तो ओरीस्टिस, थून, यांत गणा ।
ईनोमास पुढें ये, अणि आक्रामास आशिअसज रणा ॥ ६० ॥
द्वारस्थ वीर दोघे ग्रीकां नौकांस राखण्या कथिती ।
त्रोजन परि धांवुनियां आले तें ग्रीक सर्वजण बघती ॥ ६१ ॥
संभ्रम बहुत उडाला, जो तो लागे तदा पळायास ।
बाहेर पडुन दोघे लढती, रणिं तुल्य जे वराहांस ॥ ६२ ॥
व्याधाची श्वानांची गडबड ऐकून पर्वतावरुनी ।
जाती वक्रगती जे झुंज जिथें येतसे वनीं जुळुनी ॥ ६३ ॥
अणि आसपासचे तरु करती जे भग्न तोडुन मुळांस ।
चाविति दांत कडाकड, जों त्यांच्या कोणि घेत जीवांस ॥ ६४ ॥
पित्तलमय कवचें तीं शस्त्राघातें रणांत खणखणती ।
स्वार अणी निज भुजबल यांवर ठेवून भिस्त हे लढती ॥ ६५ ॥
ग्रीक स्वतांस रक्षिति तंबूंतें आणि जवन नौकांतें ।
बुरुजांवरुनी खालीं देती फेंकून दीर्घ दगडांतें ॥ ६६ ॥
जेंविं महावात सुटे, फांकी प्रच्छाय जलद दूरवरी ।
सफल धरित्रीवरतीं हिमशकलांची प्रचण्ड वृष्टि करी ॥ ६७ ॥
ग्रीक त्रोजन तेवीं शस्त्रास्त्रें वर्षिती रणीं सतत ।
अगणित ढाली कवचें करताती घोर नाद उपलहत ॥ ६८ ॥
अंतीं हिर्ताकससुत मांडीवर आशिअस पिटी हात ।
दुःखार्त क्रोधानें विनवी जोव्हास " काय हें तात ! ॥ ६९ ॥
तूं ही अतां खरोखर झालासी थोर शुद्ध वंचक रे !

गमलें ग्रीकां आह्मीं जिंकूं अपुल्या अजिंक्य सबल करें ! ॥ ७० ॥
जैशा गांधिल माशा ज्यांचा कटिभाग बहु असे चिवट ।
अथवा मधमाशा ज्या खोल घरें बांधिती स्थलीं बिकट ॥ ७१ ॥
सोडिति सदन न अपुलें, बसताती टपुन लुब्धकांवरतीं ।
निज संततिकरितां त्या तोडोनी जीव सर्व ही लढती ॥ ७२ ॥
तैसे ग्रीक न इच्छिति लढतां सोडावया निज द्वारा ।
दोघे असुनि न भीती; पकडा जीवन्त त्यांस अथ मारा " ॥७३॥
ऐसें तो वदला; परि जोव्हाचें चित्त या वचें न वळे ।
यश हेक्तरास यावें ह्मणुनी योजीत हा उपाय बळें ॥ ७४ ॥
इतर द्वारीं इकडे वीर दुजे युद्ध करिति सापाय ।
इत्थंभूत कसें वदुं ! मीं आहें देव गुणि जसा काय ? ॥ ७५ ॥
कारण तटा सभोंवतिं चाले वर्षाव तप्त उपलांचा ।
ग्रीक श्रान्त असुन ही लढती अभिमान धरुन नौकांचा ॥ ७६ ॥
कष्टी सुर मनिं झाले, होते ग्रीकांस जे सहाय रणीं ।
मग लापिथीकुलांतिल दाखविती पुरुष आपुली करणी ॥ ७७ ॥
दामाससास मारी पिरिथौसज शूल पालिपीतीस ।
शिरकवचांतुन भाला गेला भेदून जाड अस्थीस ॥ ७८ ॥
मेंदू किरुनी गेला, ऐसा हा वीर समरिं जित झाला ।
पैलन अणि आर्मीनिस यांतें मृत्यू असाच मग आला ॥ ७९ ॥
तो मार्सवृक्षशाखा लीआन्तीअस करी पराक्रम तो ।
हिप्पोमाकस घेई तच्छूलाघात समरिं उत्तम तो ॥ ८० ॥

म्यानांतुन असि काढुन गर्दीतुन धांवला अखेरीस ।
येऊन हातघाइस झाला क्षत तेथ आन्तिफेतीस ॥ ८१ ॥
पडत उताणा खालीं मग अद्भुत वृत्त घडुनियां आलें ।
मेनन, आयेमेनस अणि ओरिस्टीस पालथे पडले ॥ ८२ ॥
होते घेत हिरावुन कवचें हे जों रणांत पतितांची ।
संख्यातीतांचीं तों गर्दी बहु होत शूर तरुणांची ॥ ८३ ॥
उत्सुक तट भेदाया जाळाया आस यांस नौकांस ।
नायक यांचा हेक्तर दुसरा तो शूर पालिदामास ॥ ८४ ॥
खंदकमुखीं उभे ते राहुन करिती विचार गंभीर ।
शकुन तयांला दिसला क्रमण्या खंदक उभे यदा वीर ॥ ८५ ॥
उभय दलांच्या वरतीं उंच मधोमध दिसे तिथें गरुड ।
नखपुटरीं भीषण अहि रक्तानें सिक्त धरितसे उघड ॥ ८६ ॥
होता सजीव अजुनी सोडी निश्वास, डूक नच सोडी ।
नखधृतही वर वळुनी मानेशीं दंशुनी उरां फोडी ॥ ८७ ॥
गरुड तया भूवरतीं टाकी, नच तीव्र वेदना साहे ।
जनसंमर्दी ऐसा भीषण हा सर्प पडुनियां राहे ॥ ८८ ॥
पंखांतें फडफडवुन गेला तो गरुड पवनवेगानें ।
त्रायस्थां कांपाया लावियलें या विचित्र भुजगानें ॥ ८९ ॥
ईजिसधर ज्योव्हानें मध्यें उत्पात घडविला खास ।
मग हेक्तरास वदला सरुन पुढें सुज्ञ पालिदामास ॥ ९० ॥
"हेक्तर तुजला मसलत देतों मीं सर्वकाल हितकर रे ।

वीरसभेंत कसा तरि चिढविशि तूं मजसिं नित्य हें न बरें ॥ ९१ ॥
होउन केवळ पुरजन उचित नसे तुज विरुद्ध बोलाया ।
राजसभा वीरसभा संस्था सत्ता जनास दावाया ॥ ९२ ॥
बोलेन मी तरीही जें मज वाटेल आज उत्तम तें ।
नौकांसाठीं नलगे ग्रीकांसह युद्ध मज असें गमतें ॥ ९३ ॥
होइल असाच शेवट; शकुन जसा त्रोजनांस अज झाला ।
खंदक वलांडुनीया जाण्याचा वेळ जों पुढें आला ॥ ९४ ॥
उभय दलांच्या वरतीं उंच मधोमध दिसे तिथें गरुड ।
नखपुटरीं भीषण अहि रक्तानें सिक्त धरितसे उघड ॥ ९५ ॥
सर्वांहुन आवडतें स्थल जें गृह तेथ पोंचला न जरी ।
तरि ही सजीव असतां देई टाकून त्यास भूमिवरी ॥ ९६ ॥
अथवा नाहीं शकला निज बाळांलागिं खावया द्याया ।
होइल गति अशि अमुची, शकलों जरि या तटांस भेदाया ॥ ९७ ॥
ग्रीकांचीं हीं द्वारें फोडूं खर्चून आज अमित बळ ।
करिल प्रतिबंध न अरि, परताया मार्ग तरि न तो सरळ ॥ ९८ ॥
पित्तलमयशूलांनीं कितिकांतें ग्रीक विजित करतील ।
त्रोजन ते रणभूवरि नौकांशीं पडुनियां रहातील ॥ ९९ ॥
शकुनपरीक्षक कोणी आज भविष्यज्ञ हेंच सांगेल ।
त्या अर्थातें धरुनी जनही मग निजहितार्थ वागेल " ॥ १०० ॥
क्रोधानें उत्तर दे हेक्तर मग " परिस पालिदामास ! ।
तूं कथिशी गोष्टी त्या हेतु न मजला खचीत सौख्यास ॥ १०१ ॥

उपदेश अधिक याहुन बरवे तुज ठाउके कसे करणें ।
तत्रापि सांग जर तव भाषण म्हणजे विनोद सत्यपणें ॥ १०२ ॥
नसला विनोद, तर तव मति हरिली खचित आज अमरांनीं ।
घनगर्जन जोव्हाच्या उपदेशा विसरुं काय अवसानीं ॥ १०३ ॥
केलें मदर्थ तेणें करणें जें हित मदीय पतकरुनी ।
पक्षधरा विहगातें मानाया सांगतोस विनवूनी ॥ १०४ ॥
देतों मान न यां मी; करितों मी काळजी न कधिं यांची ।
भानूकडे सकाळीं सव्य पथें पाखरें उडायाचीं ॥ १०५ ॥
उजवेकडेस जाउन, तिमिरावृत पश्चिमेस कधिं पळत ।
जोव्हाज्ञा मानूं या, शास्ता तो सुरनरांवरी असत ॥ १०६ ॥
*देशहितार्थ लढावें बा आहे एक शकुन उत्तम हा ! ।
काय भितोशी समरा, देशी सोडून काय कलह महा ? ॥ १०७ ॥
ग्रीकांच्या नौकांशीं, मेलों आम्हीं जरी अतां सारे ।
जीवा वांचवशिल तूं रणविन्मुख, भीसि उगिच मग कां रे ?॥१०८॥
सोडाया रण जर तूं हृदयीं भीती धरून धजशील ।
इतरां वळवूं बघशिल मच्छूलाहत तूं क्षणांत मरशील "॥ १०९ ॥
ऐसें बोलुन चाले अग्रीं तो इतर मागुनी जाती ।
निर्घोष उच्च करिती; वातानें जोव्ह उधळवी माती ॥ ११० ॥
नौका धूल्यावृत त्या पाहुनियां ग्रीक गाळिती धीर ।
ट्रोजन होत यशस्वी, हेक्तर मिळवीत कीर्ति नरवीर ॥ १११ ॥

---

*वीर करीं असि घेई देशहिताविण न अन्य शकुन गणी । **पोप.**

जोव्हाच्या शकुनांवर ठेउनियां भिस्त निज बलावर ते ।
ग्रीकांचे तट मोठे भेदाया यत्न करिति लवकर ते ॥ ११२ ॥
प्राकार बुरुज भिंती, देती उडवोन कोटही तसले ।
उत्तोलन दण्डानें करिती उध्वस्त कितिक वप्र भले ॥ ११३ ॥
आधारभूत बुरुजां ग्रीकांनीं रोंविले भुईंत बरे ।
जे स्तंभ त्यांस नासुनि हे भेदूं पाहतात तट जबरे ॥ ११४ ॥
ग्रीक न अजुनी गेले, सोडुनियां लांब आपुली जागा ।
प्राकारच्छिद्रांतें रक्षिति लावून ढालिंच्या रांगा ॥ ११५ ॥
करिती अरिला क्षत ते तो जों येई चढून तट, वरतीं ।
बुरुजांवरुनी साऱ्या दोघे आजक्ष अरडुनी फिरती ॥ ११६ ॥
ग्रीकांतें उत्तेजन देती, उत्साह यावयाकरतां ।
मृदुवचनांनीं अणिती ईर्षा वेळेस सकल समररतां ॥ ११७ ॥
समरीं मंदादर जे, निर्भर्त्सिति त्यांस परुष वचनांनीं ।
" मित्रानों, ग्रीकांनों ! होणें नच तुल्य शौर्य सकलांनीं ॥ ११८ ॥
+ कर्तव्यातें जागा ! उत्तम, मध्यम, कनिष्ठ जरि असलां
तुह्मां स्वतांस आहे विदितचि हें तत्व तें कळे मजला ॥ ११९ ॥

× या काव्यांतिल जागोजाग आढळणारे उत्तम विचार इंग्रजी कवींच्या काव्यांतही आढळतात; परंतु ते न देतां आमचे कडील कवींचे निवडक समानार्थ विचार बरेच ठिकाणीं दिले आहेत. त्यांचा उद्देश एवढाच कीं भिन्न देशांत भिन्न किंवा अभिन्न कालीं त्याच विचारांची वाढ झालेली असते. त्यांच्या वाचनानें वाचकांचे मनास तुलनामूलक चमत्कार वाटावा व आनंद

भीषण हेक्तर शब्दा परिसोनी परतणें न नौकांशीं ।
चालुन जाणें पुढतीं, देउन उत्साह एकमेकांशीं ॥ १२० ॥
विद्युत्कारक जोव्हा देवा आलिम्पसस्थ अवडेल ।
तर अरिला फिरवोनी, धरुं आह्मीं पाठ हें अज घडेल " ॥ १२१ ॥
अरिवर जातां ग्रीकां आणिति अवसान हे असें वदुनी ।

व्हावा. परंतु या ठिकाणीं मात्र एका फारच सरस इंग्रजी वीरोक्तीचा उतारा येथें दिल्या शिवाय रहावत नाहीं. परमेश्वराचे अंगीं लयाचें कारक ह्मणून एक महातत्व आहे, त्याचा प्रावल्यें करून ज्याच्यामध्यें वास होता त्या नेपोलिअनाच्या नौकाध्यक्षाशीं दण्ड थोपटून उभा राहिलेला इंग्रज वीर जो नेल्सन त्याच्या तोंडचें अशाच आणीबाणीच्या प्रसंगांत काढलेलें स्फूर्तिदायक असें एक वाक्य वरील आजक्षाच्या उक्तीस समानार्थ आहे. तें असें "England expects every man to do his duty."—आपला प्रत्येक पुत्र आपलें कर्तव्य करील असा भरंवसा आंग्लमातेला वाटत आहे—हें वाक्य उच्चारितांच विद्युद्वेगानें सर्वांचे अंगीं संचरून इष्ट कार्य करितें झालें हें सांगणें नलगे. त्राफल्गार येथें, या लढाईत इंग्लदचें आरमार पूर्ण विजयी झालें. अशा या महामंत्ररूपी वाक्याचें मूळ कदाचित् आजक्षाच्या वरील वाक्यांत असेल. या वाक्याप्रमाणें वागल्यानें आई बाप, पुत्र कलत्र, आप्त इष्ट स्नेही इत्यादिकांच्या सहवासांत संसार केवळ सुखमय होईल. सर्व मनुष्यें धार्मिक व नीतिमान व परमेश्वरावर निष्ठा ठेवणारीं होतील. एकंदर समाजसंस्था उत्सवप्रद होईल व सर्व मनुष्यें हृष्ट व पुष्ट होत जातील यांत शंका नाहीं. कारण हें वाक्य जरी वरील ठिकाणीं समरपथानें जाणाऱ्या योध्यांसच उद्देशून ह्मटलेलें आहे, तरी तें व्यापक स्वरूपाचें असल्यामुळें संसारपथें जाणाऱ्या गृहस्थास जसें तसेंच मोक्षपथें जाणाऱ्या मुमुक्षूलाही लागू आहे.

सुरु झाली दगडांची वृष्टि हिमाची जणूं गमे वरुनी ॥ १२२ ॥
हेमन्तीं जोव्ह तदा शस्त्रास्त्रांच्या प्रदर्शना उघडी ।
आणि करि हिमवर्षावा, पवनातें शान्त करुन एक घडी ॥ १२३ ॥
धारा सतत वहाती, पर्वतशृंगें बुझोनियां जाती ।
कमलवनें किति दडती, कृषिची संपत्ति जाय विलया ती ॥ १२४ ॥
नौकाशायिं वृष्टि पडे, वृष्टि पडे जरठ सागरावरतीं ।
उपगतलहरी त्याच्या वृष्टिप्रगतीस आंवरुन धरती ॥ १२५ ॥
वस्तू शेष सकल परि हिमवृष्टी खालतीं तदा दडती ।
वृष्टि तशी दगडांची, दोहों बाजूंकडून होत अती ॥ १२६ ॥
कांहीं त्रोजन करिती, कांहीं ते ग्रीक करिति अरिवरतीं ।
सर्व तटाच्या भोंवतिं एकचि कल्होळ सर्वजण करती ॥ १२७ ॥
अडसर लांब कठिण तो द्वार तटाचें तसेंच बळकट तें ।
हेक्तर आणि त्रोजन फोडायातें खरेंच न च शकते ॥ १२८ ॥
जोव्हें प्राज्ञें तनुजा सर्पिदना चेव अणुन शत्रुवर ।
सोडियला सिंह जसा बलिवर्दावरतिं घोरवनिं नखर ॥ १२९ ॥
पितळेची ढाल करीं घे तो सर्वांग सुंदराकृतिची ।
आंतून ताम्रकारें गोचर्में मढविली कुशी तीची ॥ १३० ॥
यन्मंडल पत्रावृत शोभतसे बहुत हैमतारांनीं ।
ऐशी ढाल धरुनि तो शूलातें तळपवी निज करांनीं ॥ १३१ ॥
पर्वतपरिपुष्ट जसा सिंह, मिळे मास बहुत दिन न जया ।
वेष्टणरक्षित ऐसा मेषव्रज धुंडण्या निघे समया ॥ १३२ ॥

मेषप्राप्त्यर्थ तया वाटे उद्योग ईप्सित करावा ।
तों मेषपाल तेथें राखिति कळपास जाणुनी कावा ॥ १३३ ॥
करिं तीक्ष्ण धरिति भाले, फिरती ते श्वान दक्ष जवळ तसे ।
व्रजभंगोद्यम कांहीं केल्याविण या न परत वळवतसे ॥ १३४ ॥
मारुन झडप हरी अज, शूलाचा वार तीव्र अथ खाई ।
वप्रतटां भेदाया तेंवीं धांवून सर्पिदन जाई ॥ १३५ ॥
हिप्पोलोकस तनया वच बोले ग्लाकसास सत्वर तें ।
"ग्लाकस ! कां रे अमुचा लिसिआ सन्मान फारसा करते ?॥१३६॥
स्वाद्वन्नाशन समयीं अग्रासन, पूर्णपात्र कां मिळतें ।
जैशी देवां तैशी आह्मां जनिं पूज्यता कशा असते ! ॥ १३७ ॥
बहुशस्य फलद अमुची झॅन्थसतीरीं कशास भूमि असे ? ।
द्राक्षलता मण्डप ते अमुचे रमणीय मधुर बहुत कसे ? ॥ १३८ ॥
आह्मां ह्मणुन उचित कीं न्यावे समरांत अग्रिं लिसिअन ते ।
रणिंची धुरा वहावी, जाऊं द्यावें कदापि धैर्य न तें ॥ १३९ ॥
लिसिअन बोलेल कुणी मागुन कीं धन्य आमुचे नृपती ।
खातात पुष्ट मेषां, पीती मधु मधुर नित्य उगिच न ती ! ॥१४०॥
श्रेष्ठ पराक्रम यांचा, लिसिअन लढतात समरशिरिं सारे ! ।
सुहृदा ! समर चुकविता चुकत जरा मृत्यु सांग कैसा रे ? ॥१४१॥
अग्रीं लढलों नसतों, नसतें मग धाडिलें तुला समरीं ।
*सहस्र मार्गे येत्ये आह्मांवर मृत्युविषय नियति खरी ॥ १४२ ॥

*जो प्राणी जन्मास आला तो कपाटांत जाऊन लपून बसला तरी तेथें-

चुकवि न फिरवि न तिज कुणि, तर आतां जाउं चल पुढें ह्मणतों ।
देऊं दुजास यश कीं, देइल आह्मांस यश रणीं अथ तो " ॥१४३॥
ऐसें तो बोले मग कचेरे ग्लाकस न, वच न अवमानी ।
दोघे सरती पुढतीं लिसिअन घेऊन बहुत अवसानीं ॥ १४४ ॥
पेटिअसाच्या तनया मेनिस्थिअसा दुरोन हें दिसलें ।
कंप भरे कीं येती त्याच्यावर चाल करुन वीर भले ॥ १४५ ॥
करतील नाश पुरता, ग्रीकांच्या पंक्ति वळुन हा पाहे ।
जर मित्रांच्या वरचें संकट टाळावया कुणी आहे ॥ १४६ ॥
आजक्षद्वय दिसले, ज्यांस रणाचा न येतसे वीट ।
त्यूसर तेथें होता तंबूबाहेर येउनी धीट ॥ १४७ ॥
परि यातें ऐकाया मारियली हांक ती कशी जावी ? ।
रणघोष उच्च उठला स्वर्गाची लाधली जया पदवी ॥ १४८ ॥
ढाली आपटताती, द्वारीं चुरतात बहु शिरस्त्राणें ।
हल्ला सर्वांवर ते करती, त्यां द्वार फोडुनी जाणें ॥ १४९ ॥
थोआतीसा दूता आजक्षांच्या कडे तदा दवडी ।

ही मरण त्याला गांठून त्याचा शेवट करणार हें सिद्ध आहे. ह्मणून शूर वीरांनीं आपल्या मानधनाचें रक्षण करण्याकरतां मोठ्या उत्साहानें, न डगमगतां, सारखें झटून ईश्वराचे इच्छेनुरुप लढलें पाहिजे. डेमास्थनीस.

स्वभटांसिं ह्मणे कुरुपति मरण चुकेना कधीं असें कळतां ।
पळतां, धर्मापासुनि चळतां, अयशें करून कां मळतां ! ॥ १ ॥
भीमा आजि पुढें ही निमिषाहि चुकवुनि यमा न वांचाल ।
ज्यां जन्म, मरण त्यां; हे ठावी कोणा न मानवां चाल ॥२॥ मोरोपंत

बोले धांवुन शोधीं आजक्षांतील एक शूर गडी ॥ १५० ॥
अथवा दोघां आणीं, होइल सर्वांत हेंच उत्तम रे ।
कारण इतक्यांत इथें होइल संहार घोर तर समरें ॥ १५१ ॥
लिसिअननायक आतां नेती चेंपीत फार जोरानें ।
उद्धत यांचा झाला ठाउक सर्वांस वेग कलहानें ॥ १५२ ॥
त्यांवर तेथें गेला गुदरुन जर तेथ कठिण अधिं समय ।
तर तेलामोनिअना आजक्षा येउं दे जरि न उभय ॥ १५३ ॥
त्यूसर संगें यावा, आहे तो फार कुशल चापधर " ।
ऐसें तो वदला तें ऐकतसे दूत दक्ष वचनपर ॥ १५४ ॥
ग्रीकांच्या भिंतिवरुन जायातें त्वरित धांवला पळत ।
दोघां आजक्षांच्या पुढतिं उभा राहुनी असें म्हणत ॥ १५५ ॥
" आजक्ष द्वय तुम्हीं ! ग्रीकांचे अग्रणी सुकवचधर ।
जोव्हप्रिय पेटिअसज विनवी तुम्हांस यावया नृवर ॥ १५६ ॥
रणिं त्याच्या कष्टांचा कांहींसा वेळ भाग उचलाया ।
दोघे येतां उत्तम म्हणुनी दोघे निघा अज चला या ! ॥ १५७ ॥
कारण इतक्यांत तिथें होइल कीं फार घोर संहार ।
लिसिअननायक आम्हां नेती चेंपीत बल तयां फार ॥ १५८ ॥
उद्धत यांचा झाला ठाउक सर्वांत वेग कलहात ।
अरिनें परंतु इकडे तुमचे असतील गुताविले हात ॥ १५९ ॥
तर तेलामोनिअना आजक्षा पाठवा इथें अभय ।
त्यूसर संगें यावा धन्वी तो कुशल ओळखी समय " ॥ १६० ॥

हें तेलामोनिअनें आजक्षें मानिलें तदा वचन ।
मग ओइलीअसाच्या पुत्रातें वदत आर्जवें करुन ॥ १६१ ॥
" आजक्ष ! तूं अणी हा लैकोमेदीस येथ नीट रहा ।
मीं जातों. तरि येथें ग्रीकां आणा रणांत उत्साहा ॥ १६२ ॥
देऊन तोंड युद्धा तिकडे साहाय्य त्यांस मी करिन ।
आणी येइन परतुन, तिकडे दवडीन वेळ मी मुळिं न " ॥ १६३ ॥
तेलामोनिअन तदा गेला आजक्ष करुन भाषण हें ।
भ्राता समानपितृक गेला त्यूसर रणास उत्साहें ॥ १६४ ॥
सह पान्दिअन निघाला घेउन धनु थोर त्या त्यूसराचें ।
मेनिस्थिअसापाशीं गेले हे जवळ थोर बुरुजाचे ॥ १६५ ॥
होते आड तटांच्या, ग्रीकांनीं मित्र नाडिले याचे ।
झंझासम चढती ते वप्रावर अग्रणी लिसिअनांचे ॥ १६६ ॥
आतां सन्मुख लढती उठला कल्होळ, कठिण ये काळ ।
सर्पिदनाचा सहचर रणिं एपीक्लीस होत घायाळ ॥ १६७ ॥
तेलामोनिअनानें वधिलें त्या एक विषम दगडानें ।
उंच विशालाकृति जो दगड असे वप्रशिखरिं डौलानें ॥ १६८ ॥
सहज न उचलेल कुणा इतका हा दगड दोन हातांनीं ।
जन असलेच अतांचे सारे, आली जरी तयां ज्वानी ॥ १६९ ॥
तेणें परंतु उचलुनि दिधला फेंकून बहुत जोरानें ।
फुटलें शिरकवच झणीं, जात कपालास्थि चुरुन घावानें ॥ १७० ॥
बुरुजावरुनी खालीं पडला, जलधींत जेविं पाणबुड्या ।

अस्थींतुनी निघोनी गेला मारीत जीव दूर उडचा ॥ १७१ ॥
हिप्पोलोकसतनया मारी त्यूसर शर ग्लाकसाला ।
चढतां उंच तटावर तत्कर उघडा, तया जिथें दिसला ॥ १७२ ॥
त्यागुन रण गेला तो; तट सोडुन आड आपणा लपवी ।
कीं या क्षत पाहोनी ग्रीकें निंदा कुणी नच करावी ॥ १७३ ॥
जातां ग्लाकस पाहुनि सर्पिदना दुःख जाहलें भारी ।
नाहीं दिलें तयानें सोडुन रणिंचें अगत्य लवहि परी ॥ १७४ ॥
आल्क्माअनास तो करि थेस्टरतनयास नेमकी जखम ।
भाला तनूंत रोंवी, काढी त्या परत तीक्ष्ण जरि परम ॥ १७५ ॥
अरि मग शस्त्रामागुन भूवर उत्तानमुख तदा पडला ।
पित्तलशोभित त्याच्या कवचाचा भार वरतिं खणखणला ॥ १७६ ॥
आधारार्थ स्थापित वप्रा ओढीत सर्पिदन हातें ।
खालीं आलें सगळें; भिंत निघाली; अभीष्ट तें यातें ॥ १७७ ॥
झाला पथ सकलांला; त्यूसर आजक्ष रोंखिती याला ।
ढालीच्या कटिबंदीं एकाचा वार मग उरीं झाला ॥ १७८ ॥
जोव्हात्मजनियतीला फिरवी, व्हावा न विहत नौभागीं ।
आजक्ष तुटुन पडुनी वार करी ढाल फोडण्यालागीं ॥ १७९ ॥
भाला सर्पिदनाला लागे प्रतिबंध त्या न परि झाला ।
प्राकाराहुन मागें सरला परि परतला न जायाला ॥ १८० ॥
कारण धैर्य तयाला होतें संपादण्यास विजय महा ।
आशेनें म्हणुन वळुन सुरसम लिसिअन वदे तया नृप हा ॥ १८१ ॥

" लिसिअन हो ! शिथिल कसा अपुला आवेश आज केलात ? ।
केला भेद परी मज एकासहि मार्ग होइना आंत ! ॥ १८२ ॥
नौभागीं मी जातों माझ्या मागून आज या सकळ ।
*मिळुनी अधिक श्रम करुं. संहति ही कार्यसाधिका प्रबल" ॥१८३॥
ऐसें तो वदला, त्या भूपतिच्या भाषणास मानुनियां ।
उत्साहें सरले ते, सुज्ञनृपाभोंवतीं जमूनीयां ॥ १८४ ॥
बळकट सैन्यव्यूहा रचिती हे ग्रीक अज तटाआंत ।
होतें साधायाचें एक महत्कार्य चालवुन हात ॥ १८५ ॥
ग्रीकांचे तट भेदुन लिसिअन जाया न शकति नौदेशा ।
पळवायास लिसिअनां ग्रीक न शकती धरून आवेशा ॥ १८६ ॥
परि जैसे दोघेजण घेउन परिमाणदण्ड हस्तांत ।
हद्दीवरुनी भांडति वादाच्या त्या बसून शेतांत ॥ १८७ ॥
समदर्शि स्वामित्वा सांगति जे अल्प भूमिभागांत ।
तैसे प्राकारांशीं दोघांचे वीर हे झगडतात ॥ १८८ ॥
गोचर्मरचित ढाली वाटोळ्या मारिती उरावरतीं ।
दुसरीं लहान फलकें चर्माचीं हाणितात चिवट अती ॥ १८९ ॥
पित्तलमय शस्त्रांचे कठिणांचे वार पुष्कळां झाले ।
बहु विद्ध नग्न पृष्ठीं, ढालींतुन विद्ध बहु व बहु सुटले ॥ १९० ॥
ग्रीक त्रोजन झाले क्षत त्यांचें रक्त उडुनियां लाल ।
वप्रांसह बुरुज भले गेले रंगुन न लागतां काल ॥१९१ ॥

*संहतिः कार्यसाधिका, व समवायोहि दुस्तरः, या म्हणी समानार्थ आहेत.

ग्रीक तथापि न पळती स्थैर्ये जागेस चिकटुन रहाती ।
म्हातारी प्रामाणिक कष्टें स्थिर जेविं धरि तुला हातीं ॥ १९२ ॥
एकिकडे इष्ट वजन, लोंकर आणुन दुजेकडे घाली ।
व्हाया तोल बरोबर घेई काढून जपुन इवलाली ॥ १९३ ॥
कीं व्हावें पोरांचें पालन पोषण तयें जरी अपुरें ।
तेविं स्थिर रण लांबे, स्थिर तें अपयश व यश तसेंच उरे ॥१९४॥
प्रायमजा मग शेवटिं जोव्हानें विजय हेक्तरा दिधला ।
आंत तटाच्या मारी ग्रीकांच्या मग उडी न तो भ्याला ॥ १९५ ॥
कर्णोद्भेदक उच्च स्वर काढुन मारि तो जनां हांका ।
"पुढतिं सरा त्रोजन हो ! तट भेदायास समय हा बांका ॥१९६॥
नौभागा पेटवुनी आतां द्या, घालुनी वरी जाळ" ।
उत्तेजनपर वच हें त्रोजनकर्णांत पडत तत्काळ ॥ १९७ ॥
करुनी जमाव जाती भिंतीवरतीं धरून शूल करीं ।
द्वारापुढला प्रस्तर हेक्तर उचलोनियां करांत धरी ॥ १९८ ॥
तलभागीं रुंद परी चिंचोळा तीक्ष्ण दिसत टोंकाशीं ।
गाडीवर चढवाया जो न बलिष्ठांस शक्य दोघांशीं ॥ १९९ ॥
असलेच जन अतांचे; परि तो उचलीत एकला सहज ।
सॅतर्नजें परंतू हलका केला तयास दगड अज ॥ २०० ॥
सहज कृषीवल नेतो उचलोनी मेषलोमभार जसा ।
पुरतो एकच कर त्या, वजन परी भासतें न त्या सहसा ॥ २०१ ॥
प्रस्तर हेक्तर उचली, दीर्घ तसा नेम आणि धरी लांब ।

दृढसंधि द्वारां जे देती बळ ते बघे पुढें खांब ॥ २०२ ॥
अति उंच हे दुहेरी अडसर ज्यां दोन राखिती सघन ।
कुलुप अभेद्य करी ज्यां, हेक्तर त्या निरखि फिरवुनी नयन ॥२०३॥
जाउन तसाच जवळी खर्ची बळ बंद करुनियां वाचा ।
फेंकी, पद टेंकुन दुर, कमती व्हावा न जोर घावाचा, ॥ २०४ ॥
मोडुन बिजागरें तो दगड पडे आंत भार बहु ज्याचा ।
द्वारें विभिन्न झालीं तुटतां अडसर निभाव नच त्यांचा ॥ २०५ ॥
पिंजून खांब गेले सर्व भरी लागतां तयां घाव ।
मग थोर हेक्तराचा झालासे आंत सहजचि रिघाव ॥ २०६ ॥
रूप तयाचें दिसलें उग्र भयंकर जसें विभावरिचें ।
पित्तलमय कवचावृत तो चमके, शूलयुगल ही करिंचें ॥ २०७ ॥
द्वाराच्या आंत उडी घेवोनी वीर नीट जो गेला ।
देवावीण दुजा त्या अडवाया शक्त कुणि न वेळेला ॥ २०८ ॥
झाले लाल तयाचे डोळे जणुं वमति अग्निच्या ज्वाला ।
त्रायस्थां उत्तेजी वरतिं तटाच्या चढावया सकलां ॥ २०९ ॥
सांगे तो तैशी जन वीरोचित साहसिक कृती करती ।
झुंडीच्या झुंडी त्या भग्नद्वारांतुनी पुढें शिरती ॥ २१० ॥
कोणी तट उल्लंघुन जाती धैर्यें पुढें पथें सरळ ।
संभ्रम अशाम्य माते ग्रीकांचा व्यूह भंगुनी सकळ ॥ २११ ॥

सर्ग १३ वा.

इदामिनिअसाचा पराक्रम.

सारांशः—हेक्तरानें केलेला ग्रीकांचा विनाश पाहून नेप्चूनास त्यांचा कळवळा येऊन तो कल्कासरूप धारण करून ग्रीकांस उत्तेजन देतो. आजक्षबन्धू हेक्करास प्रतिबंध करतात. एक भाला भग्न झाला ह्मणून दुसरा आणण्याकरतां तो इदामिनिअसाच्या तंबूंत येतो. दोघांचें संभाषण चालतें. इदामिनिअस हा विशेष पराक्रम करतो. मेनिलास सुद्धां पराक्रम करतो. त्रोजनांपैकीं कांहींस माघार घ्यावी लागते. तरीहि हेक्तर आजक्षांशीं झुंझ चालवितो. पालिदामास वीरसभा भरविण्यास सांगतो. हेक्तरास तें मानवतें; परंतु आधीं त्रोजनसैन्यांत जमवाजमव करण्यास जातो. पारिस दिसतांच त्याची निर्भर्त्सना करितो. व युद्ध चालू ठेवतो.

कालमानः—अठाविसावा दिवस चालू.

स्थलमानः—ग्रीकांची भिंत व समुद्रतीर, यांमधला प्रदेश.

त्रोजन आणी हेक्तर यांतें आणून एक ठायास ।
नौभागीं सोडितसे सोसाया जोव्ह सतत सायास ॥ १ ॥
भूमि थ्रेशिअनांची उज्ज्वल नेत्रीं बघे आश्विकांची ।
हिप्पोमोल्गिअनांची सत्यव्रत शुद्ध सरलचरितांची ॥ २ ॥
त्या दुग्धपोषितांची; झुंझारांची तशी मिसिअनांची ।
उज्ज्वल नेत्रांनीं परि पाहेना तो अतां त्रोजनांची ॥ ३ ॥
त्याचे मनीं न आलें कीं कोणी एक ही अतां अमर ।
त्रायस्थां ग्रीकां वा देइल साहाय्य राखण्या समर ॥ ४ ॥
उगिच न दक्षपणें परि नेप्चूनें लक्ष ठेविलें समरीं ।

सामासोच्चशिखरिं तो बसुनी फेंकीत दृष्टि सर्वभरी ॥ ५ ॥
तेथुन इदाद्रि दिसतो दिसत्ये प्रायमपुरी तशी तिथुन ।
ग्रीकांच्या ही नौका दिसताती स्पष्ट सर्व जरि दुरुन ॥ ६ ॥
बाहेर जलधिच्या तो येउनियां प्रथम खालतीं बसला ।
ग्रीकां त्रोजनविजितां पाहोनी फार चित्तिं कळवळला ॥ ७ ॥
जोव्हावर रागावुन विषमाद्रीवरुन उतरला खालीं ।
धांवत पायीं गेला पद्भारें अद्रि आणि वनें हल्लीं ॥ ८ ॥
टाकी तीन पदें परि गांठी उद्दिष्ट भूमि चवथ्यानें ।
ईजी, त्या प्रिय, जेथें बांधियलीं मंदिरें सुवर्णानें ॥ ९ ॥
कधिंही नच विटती तीं शोभविती जलधिपृष्ठ चमकून ।
पित्तलमयशफ हय तो तेथें जोडी रथा त्वरा करुन ॥ १० ॥
बहु जवन गति तयांची, त्यां मानेवरतिं हैम आयाळ ।
हेमालंकृत तनु तो, कनक कशा घेतसे करीं सरळ ॥ ११ ॥
त्याची सुघटित रचना रुचिर रथारूढ नरकरा सजवी ।
हांकी वीचिंवरुन रथ, आंतिल परि तो न जलचरां भिववी ॥ १२ ॥
विवरविनिर्गत खेळति विकटाकृति मत्स्य निजनृपा बघुन ।
मार्ग मुदें जलधि करि, रथचक्रें त्वरित फिरति घडघडुन ॥ १३ ॥
अक्षाग्रें भिजल्याविण हय गेले ग्रीकनौसाधनाशीं ।
विस्तीर्ण विवर आहे जलधीच्या एक दीर्घ कोनाशीं ॥ १४ ॥
त्या विवराच्या इकडे इंब्रस शोभे व तेनिदस तिकडे ।
नेपूचून धराकंपक सोडवितां तुरग तेथ दृष्टि पडे ॥ १५ ॥

टाकी त्यांच्या पुढती खायातें अमृतमय तदा घांस ।
जखडी पाय तयांचे बंदांनीं हैम त्याच समयास ॥ १६ ॥
वाट बघावी तेथें त्यांनीं कीं तेथ बसुन राजाची ।
मग तो तेथुन गेला ग्रीकांच्या वाट धरुन कटकाची ॥ १७ ॥
त्या थोर हेक्तराच्या प्रायमजाच्या क्षणांत मागून ।
त्रोजन धांवति जणुं ती पसरे ज्वाला न वात वा भ्रमुन ॥ १८ ॥
निरतिशयोत्साहानें करताती बहुत आरडाअरड ।
जिंकुन नौका, ग्रीकां मारूं ही आस त्या सुटे उघड ॥ १९ ॥
नेप्चून धराकंपक जलधितुनी येथवरि झणीं आला ।
कल्कासरूपधारी ज्याचा स्वर तो श्रमक्षम निघाला ॥ २० ॥
ग्रीकां उत्साह भरी आजक्षांतें वदे अवहितांस ।
" आजक्षद्वय ! तुम्हीं ! ज्ञातपराक्रम न सिद्ध पळण्यास ॥ २१ ॥
म्हणुनी वाटे तुम्हीं ग्रीकसमूहा खचीत राखाल ।
धृष्ट त्रोजनहस्तां मी न भितों जर मुळीं मज पुसाल ॥ २२ ॥
मोठा संघ करोनी आले ते आंत लंघुनि तटांस ।
ग्रीक परी वाटतसे आतां संभाळतील सकलांस ॥ २३ ॥
परि एकचि चित्ता चिंता, सोसाया दुःख बहुत लागेल ।
नेतां स्वजना हेक्तर अग्निज्वालेसमान नाचेल ॥ २४ ॥
गर्वानें तो म्हणवी जोव्हज जगतांत शूर अपणातें ।
कोणि तरी देव अतां देवो उत्साह आज तुम्हांतें ॥ २५ ॥
धरुन रहा स्थैर्य रणिं प्रार्थी इतरां रहावया समरीं ।

लावा त्यास पिटाळुन नौभागांतून लांब दूरवरी ॥ २६ ॥
आहे उद्धत भारी, देइल उत्साह जोव्ह समयिं तया "।
आजक्षां मग दंडें ताडी नेप्चून तेधवां उभयां ॥ २७ ॥
दुर्धर बल त्यां देउनि गात्रें त्यांचीं करी श्रमक्षम तो ।
झाले चरण क्षणिं दृढ, हस्त तसे प्रबल कोण त्यां धरतो ? ॥२८॥
जैसा शिलोच्चयस्थित सोडोनी श्येन आपुलें निलय ।
गगनीं सवेग पळतो धरण्या लघु विहग तो विजातीय ॥ २९ ॥
तैसा नेप्चून निघे. ओळखि त्या ओइलीअसात्मज तो ।
आजक्षास दुजा तो तेलामनजास वच असें करतो ॥ ३० ॥
" हे ! आजक्ष ! कुणी तरि, आलिम्पसवासि देव आम्हातें ।
दैवज्ञाच्या रूपें देतो भर युद्ध चालवायातें ॥ ३१ ॥
नोहे भविष्यवादी, मोठा शकुनज्ञ नच न कल्कास ।
पळतां पद्धति पाहुन अन्य न, धरिला असाच विश्वास ॥ ३२ ॥
वळखाया देव सुलभ, मजविषयीं पुससि आज जरि परिस ।
हृदयीं आत्मा स्फुरतो लढुनी समरांत मारण्या अरिस ॥ ३३ ॥
+खालीं पाय, वरी कर, औत्सुक्यें इच्छितात रे समर "।
तेलामनजें उत्तर आजक्षें त्या दिलें असे सभर ॥ ३४ ॥
" तैसे सोत्सुक इच्छिति शूल धराया मदीय हस्त अज ।
धैर्य मला येवोनी पद नेती धांवुनी पुढें सहज ॥ ३५ ॥
प्रायमजाशीं वाटे युद्ध करावें अतां हेक्तराशीं "।

+ वाटे पंखें उडतों, चालतसें वा हवेंत सर्वभर ॥ पोप०

ईशप्रेरित करिती रणलोलुप वचन एकमेकांशीं ॥ ३६ ॥
नौभागीं होते जे बसुनी दम खात एकियन मागें ।
नेप्चून त्यांस सकलां उत्तेजन द्यावया अतां लागे ॥ ३७ ॥
बहु कष्टद श्रमानें त्यांच्या गात्रांस शिथिलता आली ।
दुःख तयां झालें कीं त्रोजनसेना तटावरी चढली ॥ ३८ ॥
भूच्या तटावरोनी अश्रूंचा पात करिति हें बघुन ।
कीं पुरता नाश अतां होइल, गेलें तयांस हें कळुन ॥ ३९ ॥
परि पृथ्वीकंपक या देई नेप्चून धीर सैन्यास ।
होते त्यूसर, लिइयस आणि पेनील्यूस तेथ थोआस ॥ ४० ॥
तो वीर दीइपैरस तैसा रणचतुर मेरिआनीस ।
दृढशौर्य आन्तिलोकस, त्यांतें लढण्या करी विनंतीस ॥ ४१ ॥
उत्तेजनपर बोले त्यांतें लागून तीव्र तें वचन ।
"हा! धिक् ग्रीकांनों! अज दिसतां तुह्मीं वरून तरुण जन ॥ ४२ ॥
नौकारक्षण अजुन हि शक्य दिसे नीट सर्व जर लढलां ।
व्हाया त्रोजनकरजित समय अला, आज अल्प जर चुकलां ॥ ४३ ॥
हे! देवांनों! बघतों नयनीं मी केवढा चमत्कार ।
नौदेशावर येती त्रोजन घेऊन थोर दलभार! ॥ ४४ ॥
दुःखद गोष्ट अशी ही येइल अज घडुन वाटलें नाहीं ।
त्रोजन हिण्डत होते हरिणें जणुं धैर्य ज्यां नसे कांहीं ॥ ४५ ॥
व्याघ्रवृकांनीं खावें फिरतां ज्यां रानटी बिडालांनीं ।
कलहा अक्षम ह्मणुनी दुर्बल फिरतात मूर्ख जीं रानीं! ॥ ४६ ॥

ग्रीकांचा न तडाका सोसवला त्रोजनांस ज्यां समरीं ।
ते आतां नौदेशा येती सोडून दूर निज नगरी! ॥ ४७ ॥
विपरीत बुद्धि सुचली सैन्याध्यक्षास एक कारण तें ।
सैन्य करीत उपेक्षा कारण हें अन्य, सर्वथा जुळतें ॥ ४८ ॥
+अंतःकलहें सैनिक इच्छिति नौकांस मुळिं न राखाया ।
नौभागाच्या पाशीं झाले हत पडुन राहिले ठाया ॥ ४९ ॥
होय खरें कीं पाहिला अगमेम्नन एत्रिअसज हा दोषी ।
अकिलीसा अवमानी असुनी तो फार अल्पसंतोषी ॥ ९० ॥
करणें रणीं उपेक्षा तुमचा तत्रापि धर्म हा न कदा ॥
चूक सुधारा आतां शूराची कोपशान्ति सुलभ सदा ॥ ९१ ॥
शूरतमांचें तुमचें अरिच्यानें शौर्य शिथिल नच करवे ।
जो भ्याड रणपराङ्मुख कोप तयावर न मज मनीं धरवे ॥ ९२ ॥
तुमचा परंतु येतो राग मनापासुनी मला भारी ।
सुकुमार वीर कुठले! सरलीं का अजुन संकटें सारीं ? ॥ ९३ ॥
तुमच्या आलस्यानें याहुनियां घोर अधिक आणाल ।
हें किति लाजिरवाणें! निंदास्पद तें मनीं न कां घ्याल ? ॥ ९४ ॥
द्वारें अर्गल भेदुन नौभागीं शिरुन लढत हेक्तर हा ।

+ भीष्म ह्मणतात—

द्रोणद्रौणिकृपांहीं आजि करावी क्षमा न कोपावें ।
भेद नसावा बुध हो, भेदें स्वयश न परांसि ओपावें ॥ मोरोपंत.

*संहार घोर मांडुन करिलचि इतक्यांत तो अनर्थ महा ! ” ॥९५॥
नेपूनें ग्रीकांतें भरलें अवसान या प्रकारानें ।
सैन्यव्यूहामध्यें राहे आजक्ष बहुत धीरानें ॥ ९६ ॥
यांमाजी मार्साहि न कांहीं मिळणार नांव ठेवाया ।
सेनासंभ्रामक ही ठेविल का दोष ती मिनर्वा, या ? ” ॥ ९७ ॥
लढण्यास हेक्तरासह मग रचिती ग्रीक सघन सैन्यातें ।
भाला भाल्या लागे, ढालीतें ढाल, कवच कवचातें ॥ ९८ ॥
स्वार स्वारा घांसे शिरकवचाची कडा कडे वरतीं ।
ते क्षिप्तमान भाले धृष्ट करीं कंपमान चकमकती ॥ ९९ ॥
अरिवरतीं चालुनियां उत्सक जायास जाहले समरीं ।
हेक्तरनीतत्रोजन पडले आधिं तुटुन समरिं शत्रुवरी ॥ ६० ॥
हेमन्तीं वृष्टि पडे, विषम शिलाधार ढांसळुन जाती ।
सुटुनी शिलोच्चयाचा गोलाकृति दगड नाश करित अती ॥ ६१ ॥
+ लोळत उडत उडत तो जातां वन भोंवतालचें वाजे ।
अप्रतिबद्ध तयाची उतराणिवरतीं सवेग गति साजे ॥ ६२ ॥
समभूमीवर येतां थांबे ढकलूनही जसा न हले ।

---

* पोप महाराजांनीं थोडी भर घालून वीररसाला नुसता ऊतच आणला आहे. त्यांनीं या आर्येचा शेवटला चरण असा ठेविला आहे.

जिंका ! जित व्हा ! हा दिन ! हें स्थल ! संपादण्यास कीर्ति महा !

+ धांवे, तरु मोडित तो सुटला गिरिवरोनि पाथरसा. मोरोपंत.

हेक्तर कुपित तसा हा जलधिंशिं थडकेल हें तदा गमलें ॥ ६३ ॥
नौभागीं जाउनियां, तंबूंमाजी प्रवेश कीं करिल ।
ग्रीकांचें अणि कंदन निर्व्याकुलचित्त खचित मांडील ॥ ६४ ॥
परि सैन्यव्यूहाशीं भिडतां थांबे तिथेंच समररत ।
ग्रीकांच्या पुत्रांनीं करितां प्रतिबंध सरतसे परत ॥ ६५ ॥
झाले घाय असींचे, रुतले किति शूल दोन धारांचे ।
मागें वळुनी काढी पद, तेयुन फिरत चिन्ह समराचें ॥ ६६ ॥
त्रोजन ऐकूं शकतिल ऐशा उच्चस्वरें तदा अरडे ।
" दार्देनिअन त्रोजन लिसिअन हो! वेळ हा मला न नडे ॥ ६७ ॥
सैन्य अरीनें रचिलें रांगा दिसतात दुरुन बहु दाट ।
यांचा टिकाव न दिसे! यांची लावीन वाटतें वाट ॥ ६८ ॥
अमरोत्तम घनगर्जन जूनोपति मजसिं देइ अवसान ।
म्हणुनी वाटे पळतिल मजपुढतीं थोर आणखी सान " ॥ ६९ ॥
ऐसें बोलुन तेणें भरलें अवसान तेथ सर्व जणां ।
प्रायमज दीइफोबस तेथ अला ज्यास सजत थोरपणा ॥ ७० ॥
फिरवुन चहूंकडेला ढाल पुढें हळुच पाउलें टाकी ।
ऐसा रक्षित सावध असतां शूलें तयास अरि हांकी ॥ ७१ ॥
गोचर्मकृत तयाच्या ढालीवर शूल मेरिआनीस ।
मारीत जरि मधोमध पडलें नच रंध्र चिवट ढालीस ॥ ७२ ॥
भग्न तदग्र जहालें, ढाल धरी दूर दीइफोबस तो ।
अरिच्या शूला तो भी, इकडे हा फिरुन मंडळिंत बसतो ॥ ७३ ॥

सोद्वेग क्रोध तया आला कीं विजय हातचा गेला ।
*दुसरें, शूल करींचा भंगुनियां जातसे विफलतेला ॥ ७४ ॥
ह्मणुनी नौभागाशीं, तंबुंत जायास चालता झाला ।
जों अन्य लढुन गोंधळ करति न तों आणण्यास निज भाला ॥७५॥
हयदमना मेन्तरजा इंब्रिअसा त्यूसरें तदा वधिलें ।
पेदीअमांत जेणें मंदिर रमणीय बांधिलें पहिलें ॥ ७६ ॥
दासीकन्येला त्या प्रायमजेला बघोनियां संधी ।
मेदीसैकास्तीला गृहिं नेलें लग्न लावुनी आधीं ॥ ७७ ॥
रणकारण निघुन, अले ग्रीकांचे पुत्र, त्यांकडे शूर ।
त्राया परतुन येतां मानी पुत्रासमान त्या श्वशुर ॥ ७८ ॥
याच्या कर्णा खालीं तेलामनतनय रोंवि निज भाला ।
घेई उपटुन तों हा पडला, जणुं आशवृक्ष कोसळला ॥ ७९ ॥
पर्वतशिखरीं वाढे दुरुनी जो स्पष्ट दिसत सकलांस ।
तो परशूनें तुटतां, पसरी सर्वत्र कोमलदलांस ॥ ८० ॥
तैसा हा पडतां वर पित्तलमय कवच सक्कणित पसरे ।
त्यूसर नंतर धांवे कवच हरायास मुळिं न तो विसरे ॥ ८१ ॥
हेक्तर उडवी भाला तो याला दुरुन चांगला दिसला ।
ह्मणुनी मारा चुकवी त्यातें अल्पावकाश जरि उरला ॥ ८२ ॥
भाला ऐसा चुकला, परि उरिं तो आम्फिमाकसा लागे ।
आक्तरपौत्र असे हा तीआसज जो बसे न रणिं मागें ॥ ८३ ॥

---

*अभिशापी निज शूला जेणें अरि तो गतासु नच केला । पोप

खालीं पडतां, वरतीं मागोनी शस्त्रभार खणखणला ।
सुश्लिष्ट कवच शिरिंचे हेक्तर काढावया पुढें सरला ॥ ८४ ॥
आजक्ष शूर फेंकुन धांवुनियां जात हेक्तरावरतीं ।
तरि तो तनुस न लागे, कवचावृत होय बहु सुरक्षित ती ॥ ८५ ॥
ढालीच्या गण्डावरि तेणें केला प्रसह्य त्या वार ।
फिरवी तो मागें त्या, गेला सोडुन शवां दुरी फार ॥ ८६ ॥
ग्रीकांनीं तीं ओढुन नेलीं, मग वीर ते अथीनिअन ।
आले मेनिस्थिअस स्टिचिअस हे दोन मित्र अरिंदमन ॥ ८७ ॥
अणि आम्फिमाकसातें ग्रीकांच्या नेति थोर कटकांत ।
आजक्षांनीं नेलें इम्ब्रिअसा तेथ अल्प कालांत ॥ ८८ ॥
द्रंष्ट्रा कराल ज्यांच्या त्या श्वानांच्या जसें मुखांतून ।
सिंहद्वय नेती त्या हरुन अजा गहन काननांतून ॥ ८९ ॥
उचलून उंच वेगें धरुन तसें आज समरिं इंब्रिअसा ।
आजक्षांनी नेलें, हरिलें तत्कवच थोर भरदिवसा ॥ ९० ॥
तों ओइलीअसात्मज जो चिढला आम्फिमाकसावरुन ।
मानेपासुन सोडवि तच्छिर अणि दूर देई फेंकून ॥ ९१ ॥
चेंडूपरि गर्दीतुन शिर गेलें सरळ लांब घडघडत ।
अणि थोर हेक्तराच्या पुढतीं धुरळ्यांत जाउनी पडत ॥ ९२ ॥
नेप्चूना दुःख मनीं झालें रणविहत नातवा करतां ।
ग्रीकांच्या नौदेशीं तंबूंतुन दिसतसे अतां फिरतां ॥ ९३ ॥
ग्रीकां चिढवुन अवथी त्रायस्थां संकटांत घालाया ।

शूर इदामिनिअस, मग मार्गीं मिळे शूल चतुर वीरा या ॥ ९४ ॥
समरागत मित्रापाशिं होता तंबूंत दूरच्या गेला ।
जंघांत क्षत झालें शूलाचें ज्या ह्मणून सेवेला ॥ ९५ ॥
इतर स्नेह्यांनीं ज्या होतें अणिलें करून सायास ।
त्याचा क्षतलेपनाविधि सांगे हा कुशल शस्त्रवैद्यास ॥ ९६ ॥
परते मग तेथोनी कारण लढण्या धरी मनीं आस ।
त्यातें नेप्‌चून वदे काढी स्वर जेविं भूप थोआस ॥ ९७ ॥
आन्द्रीमन सुत जो कीं इतोलिअनास लाधला राजा ।
कालिदानिं प्ल्युरनिं ज्या देवासम मानितात जन कुलजा ॥ ९८ ॥
"कोठ इदामिनिअस हे ! ग्रीकसुतांची बिभीषिका वाणी ।
जी त्रोजनांस निंदुनि पर्यायें आत्मकृतिस वाखाणी !" ॥ ९९ ॥
वदत इदामिनिअस तो क्रीतनपति " परिस वचन थोआस ! ।
मम अल्प समजुतीला पात्र दिसे एकही न दोषास ॥ १०० ॥
रणचतुर सर्व आह्मीं धैर्यध्वंसि न कुणास भय नाडी ।
आलस्य प्रेमें अथ कोणीही घोर कलह नच सांडी ॥ १०१ ॥
निःसंशय परि हें कीं, अवडे त्या सर्व शक्ति जोव्हातें ।
' अर्गासाहुन दूरी ग्रीक मरावे विनिंद्य अरिहातें '! ॥ १०२ ॥
परि हे थोआस कसा पहिल्यानें वीर शूर होतास ।
करितां अन्य उपेक्षा होतासी धीर देत समयास ॥ १०३ ॥
उत्तेजन दे आतां सकलांतें, तूंच अज न सर मागें !" ।
नेप्‌चून धराकंपक उत्तर त्या द्यावया असें लागे ॥ १०४ ॥

" आज इदामिनिअस जो बुध्या दावील शिथिलता समरीं ।
जावो कधिं नच नर तो त्रायांतुन आपुल्या फिरून घरीं ॥ १०५ ॥
श्वान शवाशीं त्याच्या खेळत हर्षें बसोत या काळीं ! ।
परि ये शस्त्रा उचलीं शीघ्र कृतीची अतांच वेळ अली ॥ १०६ ॥
तर मग अमुचा होइल कांहीं उपयोग आज दोघांचा ।
दुस्तर सदैव लोकीं होतो समवाय भीरुहृदयांचा ॥ १०७ ॥
आम्हीं तर दोघेही जाणतसों युद्ध केविं शूरांशीं " ।
ऐसें बोलुन गेला देव निघोनी रणांत कार्याशीं ॥ १०८ ॥
वीर इदामिनिअस परि गेला रमणीय थोर तंबूंत ।
दोन करीं शूल धरी घाली बहुमूल्य कवच निज तनुंत ॥ १०९ ॥
वेगें निघे रणातें धांवे सौदामिनी जशी गगनीं ।
सॅटर्नात्मज जीतें धरुन करीं भ्रमवि जों असे रजनी ॥ ११० ॥
भयसूचना करी तो आलिम्पसशिखरिं बसुन मर्त्याशीं ।
भासुर तेज तियेचें स्पर्धा याच्या करीत कवचाशीं ॥ १११ ॥
तंबूशीं या भेटे सहचर सच्चरित मेरिआनीस ।
आणाया शूल अला मागुन जायास कीं लढाईस ॥ ११२ ॥
प्रबल इदामिनिअस त्या " बोले हे ! चपल मेरिआमीस ! ।
मोलसजा ! प्रिय मित्रा ! येसि असा परत कां अखेरीस ! ॥ ११३ ॥
संग्राम कलह सोडिशि, झालें का क्षत तनूंत तुज अज रे ? ।
पीडा शूलाग्र करी किंवा संदेश आणिशि मजासि बरें ? ॥ ११४ ॥
तंबूंत उगिच बसणें अवडेना, जातसें लढाईस " ।

त्यातें उत्तर देई परतोनी सुज्ञ मेरिआनीस ॥ ११५ ॥
* परिस इदामिनिअस हे! क्रीतनमन्त्रिन्! मला हवा भाला ॥
ह्मणुनी तंबुंत आलों न्यायातें एक जर नव मिळाला ॥ ११६ ॥
होता मज जवळी तो झाला भग्नाग्र मारितां अरिला।
जो दीइफोबसाच्या ढालीवर लागला सरासरिला " ॥ ११७ ॥
वदत इदामिनिअस तो क्रीतनमंत्री "तुला मिळेल तिथें ।
तंबूमाजी जा तूं दिसतिल तुज एकवीस शूल जिथें ॥ ११८ ॥
भिंतीवर टेंकोनी ठेवियले म्यां हरोनि अरिकरिंचे ।
झाले रणांत हत ते; लढणें जवळून काम शक्तीचें ॥ ११९ ॥
निश्चित कथितों तुज कीं तें मीं जवळून युद्ध चालवतों ।
भाले, ढाली, कवचें उरिंचीं शिरिंचीं सदैव बाळगतों "॥ १२० ॥
त्यातें उत्तर देई परतोनी सुज्ञ मेरिआनीस ।
नौकेंत आणि तंबुंत सांठविल्या वस्तु लुटुनियां अरिस॥ १२१ ॥
पडल्या दूर परी त्या, येतिल माझ्या मुळीं न हातास ।

---

* इदामिनिअसाच्या सरस, साध्या व हृदयग्राही प्रश्नांस मेरिआनीस यानें जें उत्तर दिलें आहे तें, **पोप**महाराजांनीं असें ग्रथित केलें आहे.

हा कथिल दुःख माझें शूल करीं अग्ररहित जो दीन ।
ढालींत अग्र ज्याचें अरिच्या रुतुनी बसे पराधीन ॥

येथें पहिल्या चरणाच्या दुसऱ्या अर्धाबद्दल जर " शूल करींचा असून मुखहीन " असें म्हटलें असतें तर विरोधाभास अलंकार साधला असता तथापि **पोप**चे दोन्ही चरण फार रसभरित आहेत यांत संशय नाहीं.

शौर्य न खचित विसरलों राहतसें समरिं पुढतिं समयास ॥ १२२ ॥
दुसऱ्या ग्रीकांचें कधिं लढतां साहाय्य समरिं घेतांना ।
कोणी न मजसिं पाहिल ऐसें मम शौर्य विदित सकलांना " ॥१२३॥
वदत इदामिनिअस तो क्रीतननायक तयास कीं परत ।
" ठावा तुझा पराक्रम करसी जो तूं सदैव समररत ॥ १२४ ॥
तूं का हवास साऱ्या गोष्टी या मजसिं आज सांगाया ।
नौदेशस्थ निघालों सारे, समजा दबा अज धराया ॥ १२५ ॥
येथें दिसून येतें धैर्य नरांचें विशेष जें असतें ।
भ्याड असो शूर असो, दोघांचें सत्व सारखें कळतें ॥ १२६ ॥
भ्याडाचा वर्ण बघा, जाय फिरोनी, नुरे असे जसला ।
शान्त नसे हृदय उरीं, कम्पें आराम त्या मिळे कसला ! ॥ १२७ ॥
बैठक पहिली बदलुन आतां तो भिउन उकिरडा बसतो ।
धडकी उरांत भरते आणि तो मृत्युप्रतीक्षणा करतो ॥ १२८ ॥
लागे वाजायातें दांतखिळी त्यांत बहुत जोरानें ।
होई असें न परि कीं पालटला लवहि वर्ण शूरानें ॥ १२९ ॥
तो एकवार बसतां धरुन दबा इतरवीर सह असतां ।
भीषण घातक कलहीं, उत्सुक मिसळावया दिसे बघतां ॥ १३० ॥
असल्यावेळीं तर मग कोणिहि निन्दील तव न धैर्यबला ।
समज श्रम रणिं करतां तुजला लांबून घाव जर बसला ॥ १३१
अथवा जखम जहाली तुज आल्यावरतिं हातघाईला ।
शस्त्र न दुखविल मागुन मानेला वा तसेंच पाठीला ॥ १३२ ॥

परि तें उरांतुनी वा पोटांतुनि निघुन पार जाईल ।
कारण रणमुखिं जाउन धैर्यें अग्रेसरांत लढशील ॥ १३३ ॥
जाऊं चल या गोष्टी अपण न बोलूं अजि प्रमत्त जसे ।
नाहींतर एकादा निन्दुन अमुचें उगीच करिल हंसें ॥ १३४ ॥
अजि तूं तंबुंत जाउन दृढ भाला आण जा लढाईस " ।
हें वच ऐकुन जाई मार्सासम चपल मेरिआनीस ॥ १३५ ॥
तंबुतुनी आणि भाला, समरीं जाया निघे युयुत्सु तदा ।
निघत इदामिनिअस तो तत्संगें जावया रणा भयदा ॥ १३६ ॥
नरहन्ता मार्स जसा घेउन तनया भया रणीं शिरतो ।
सुत शक्तिमान त्यासह जायाचा त्रास मुळिं न मनिं धरतो ॥१३७॥
भिववी दृढ हृदयांच्या वीरां जे श्रेस येत सोडून ।
एफिरिअन यां बाहति बाहति ते फ्लेजिअन जयां दुरुन॥ १३८ ॥
यांतें अथवा त्यांतें यश देती देति परि न दोघांस ।
दोघे वीर तसे हे जात रणीं सज्ज करुन कायांस ॥ १३९ ॥
बोलतसे वचन असें अन्यांप्रति वीर मेरिआनीस ।
" ड्यूकालिअनज सांगें, शिरणें ये कुठुन तव पसंतीस ॥ १४० ॥
डावी बाजू बरवी, मध्य बरा वा, बरी वदें उजवी ।
ग्रीक चमूंतें कोठें संग्रामीं मदत वाटते न हवी ? " ॥ १४१ ॥
वीर इदामिनिअस तो क्रीतननायक वदे तया उलट ।
नौदेशाच्या मध्यें करती साहाय्य दोन थोर भट ॥ १४२ ॥
आजक्षद्वय, अणि तो ट्यूसर धन्वी दुजा समरशूर ।

हे हेक्तरास देतिल पीडा प्रायमसुतास भरपूर ॥ १४३ ॥
हेक्तर अनलस योद्धा आहे विक्रान्त, परि तयालाही ।
समररताला जाइल कठिण तयां जिंकण्यास लवलाहीं ॥ १४४ ॥
कैसे मग जाळाया होतिल रे हे समर्थ नौकांस ? ।
सॅतर्नेजें न जाणों टाकियली वर मशाल समयास ॥ १४५ ॥
खाई सीरीसफला, पित्तलमय दुखवितो जया भाला ।
चेंची प्रस्तर ज्याला, मर्त्या आजक्ष नाटपे त्याला ॥ १४६ ॥
अकिलीसा अंबरेल न लढला जर धरुन एक ठायास ।
पळतां लढला तर तो या लागीं कोठला बधायास ? ॥ १४७ ॥
जाऊं बरवी वाटे सेनेची बाजु आज मज डावी ।
समजेल, कीर्ति अन्या द्यावी कीं आपणास जोडावी " ॥१४८॥
ऐसें हा वदला मग मार्सासम चपल मेरिआनीस ।
मार्ग क्रमुं लागे तों पोंचति हे इष्टभार्गि मदतीस ॥ १४९ ॥
वीर इदामिनिअस हा दिसला अरिला प्रचण्ड अग्नि जसा ।
विचित्र कवचावृत तनु सहचर दिसला तसाच तो सहसा ॥१५०॥
अरि संमर्दीतिल भट उत्तेजन देत एकमकांस ।
चालुन यांवर, देती नौदेशीं पेटवून कलहास ॥ १५१ ॥
पुरमार्गांत असावा धुरळा बहु एक दिवशिं जमलेला ।
सुटुनी वात, उठावें वादळ वेगांत तीव्र वेळेला ॥ १५२ ॥
धूळीचें पटल तदा उठतें तैसें उठे अतां समरीं ।
दोन्ही पक्षाचे भट उत्सुक कापावया शिरें भारी ॥ १५३ ॥

मांसोद्भेदक भाले, सजले रोमांच जेंवि समराचे ।
ढालींचें तेज उठे उरिंच्या शिरिंच्या प्रमृष्ट कवचांचें ॥ १९४ ॥
दिपति न नयन कुणाचे ? मोद कुणा कष्ट बघुन वीरांचे ? ।
×त्रास न कुणास होतो ? त्याचें मन शूर होय धीराचें ? ॥१९५॥
सॅतर्नेज कष्टविती दोघे, घेवोनि भिन्न पक्ष नरां ।
त्रोजन आणि हेक्तर ज्यातें इच्छीत जोव्ह विजय खरा ॥ १९६ ॥
अप्रत्यक्ष तशानें अकिलीसातें मिळे ह्मणा विजय ।
ग्रीक्रांचा नाश पुरा व्हावा ही बुद्धि नव्हति त्या अदय ॥ १९७ ॥
परि एवढीच मति कीं, थेटिसतनया मिळो बहू मान ।
ग्रीकां इकडे आणी देउन नेप्चून पूर्ण अवसान ॥ १९८ ॥
जरठ समुद्रजलांतुनि आला बाहेर जपुन गुप्तपणें ।
कठिण मनीं त्या वाटे ग्रीकां त्रोजनजितां अतां बघणें ॥ १९९ ॥
जोव्हावरि कोप धरि; दोघांची जाति एक वंश तसा ।
+ अग्रज जोव्ह ह्मणोनी, ज्ञानानें श्रेष्ठ तो असे सहसा ॥ १६० ॥
नेप्चून याच करतां देई साहाय्य यां न उघडपणें ।
परि मनुजरूपधारी साधी अवसान चोरुनी भरणें ॥ १६१ ॥
दोन्हीं पक्षांवर हे ठेविति संग्रामकलहबन्धन तें ।
दुर्भेद्य, सुदृढ, नाशक दोघांतें जें अनुक्रमें नडतें ॥ १६२ ॥

× युद्धस्य कथा रम्या.

+ वडिल भावाचा अपराध केला तर धाकट्या भावास एरिन्निस या शिक्षा करीत असा जुना समज होता.

जानु तदा कितिकांचे वीरांचे सदृढ खिळखिळे झाले ।
ग्रीकां अवसान बहू वीर इदामिनिअसा मुळें आलें ॥ १६३ ॥
त्रायस्थांवर धांवति; पळती ते त्या न सोसवे हूस ।
कारण तेणें वधिला वीर भला समरिं ओथ्रिओन्यूस ॥ १६४ ॥
होता काबिससीं हा प्रायमगृहिं तोंच वृत्त या राणिंचें ।
कळलें ह्मणुनी आला; चिंतुनियां श्रेष्ठ अर्जन स्त्रीचें ॥ १६५ ॥
प्रायमजा कासान्द्रा, तिज शुल्कावीण मागतो जेता ।
ग्रीकां त्रायांतोनी हांकिन हें वचन होतसे देता ॥ १६६ ॥
असल्या विक्रान्तास्तव नतिपूर्वक वृद्ध नृप ह्मणे 'होय' ।
विश्वासें हा लढतां, दिसत इदामिनिअसा बरी सोय ॥ १६७ ॥
नेम धरी भाल्याचा, हाणी त्यावरतिं फिरुन डौलानें ।
भाला उदरीं रुतला मध्यावर कठिण कवचभेदानें ॥ १६८ ॥
उठला ध्वनि तो पडतां, मग हा गर्वोक्ति करितसे सहसा ।
"स्तविलें सर्वांहुन तुज असतें मी अधिक ओथ्रिओन्यूसा ॥ १६९ ॥
दार्देनिअनप्रायमनृपतिप्रीत्यर्थ हातिं धरिलेंस ।
दुहिता मिळवायाचें कार्य तुवां तें न तडिस नेलेंस ॥ १७० ॥
इतुकें देउं करुन तुज, आहे अमुच्या करीं पुरे करणें ।
एत्रिअसात्मज दुहिता चार्वङ्गी शक्य तुज असे मिळणें ॥ १७१ ॥
अर्गोसाहुन अणुं तिज करशिल जर नाश तूं इलियमाचा ।
परि नौकांशीं आहे केला तव बेत आज लग्नाचा ॥ १७२ ॥
कारण आह्मीं नाहीं अगदीं वाईट मेव्हणे कांहीं" ।

वीर इदामिनिअस मग ओढी त्या पाय धरुन लवलाहीं ॥ १७३ ॥
रणभूच्या बाहेरी नेतां, त्या वरतिं आशिअस धांवे ।
अश्वांपुढतीं चाले ध्यायातें सूड वाटतां जावें ॥ १७४ ॥
सहचर सूत तयाचा ठेवितसे नित्य जवळ अश्वांस ।
लागतसे कीं त्यांचा खांद्यातें दीर्घ शीतल श्वास ॥ १७५ ॥
याचे मनांत होतें मारावें कीं इदामिनिअसास ।
परि तेणें तें जाणुन फेंकियलें त्याजवरतिं शूलास ॥ १७६ ॥
हनुच्या खालीं शिरला, शूल निघाला पुढें गळ्यांतून ।
अणि तो पडला खालीं विपिनीं जणुं ओकवृक्ष उमळून ॥ १७७ ॥
वृक्ष जसा सागाचा अथवा तो उंच देवदारूचा ।
नौकार्थ दारुखण्डन होतां लागून घाव परशूचा ॥ १७८ ॥
पडला वीर रथाच्या अश्वांच्या तो पुढें रणांत तसा ।
चावीत दांत अपुले, रुधिरमयी धूळ चघळुनी सहसा ॥ १७९ ॥
पहिली ही शुद्धि परी तत्सूताची नसे अतां उरली ।
शत्रु करांतुन पळण्या, वळवाया अश्व नाहिं जी पुरली ॥ १८० ॥
त्या वीर आन्तिलोकस मध्यावरि मारि तीव्र निज भाला ।
उदराच्या मध्यावर कवचा भेदून पार जो आला ॥ १८१ ॥
धापा टाकित पडला वीर तदा रचित आसना वरुन ।
नेस्तरज आन्तिलोकस नेई ग्रीकांकडेस हय, ह्मणुन ॥ ॥ १८२ ॥
मग दीइफोबसाला आशिअसावरुन राग बहु आला ।
जवळी येउन टाकी वीर इदामिनिअसावरी भाला ॥ १८३ ॥

त्यास समोरुन दिसला, ह्मणुनी तो नीट चुकवितां आला।
ढाल धरी दक्षपणें रक्षी मध्यें स्वकीय अंगाला ॥ १८४ ॥
पित्तलमय पत्र्यांनीं शोभे गोचर्मरचित ही ढाल।
दोन मुठी तिज सजती; आड हिच्या लपुन वांचवी हाल ॥ १८५ ॥
भाला वरुनी जाई; ढालीवरि निसटतां जरा घांसे।
खणखणित ध्वनि होई भाल्याचा वार परि न राणें नासे ॥ १८६ ॥
हिप्पाससतनयातें लागतसे दूर हिप्सिनाराला।
यकृद्देशीं लागे खालिं उराच्या, सवीर्य भूपाला ॥ १८७ ॥
जानु लुले पडले मग, गर्वोक्ती करित दीइफोबस तो।
"आशिअसाचा उरला घ्यायाचा सूड मज न अज दिसतो ॥ १८८ ॥
हेदीसपुरद्वारीं जातां त्या खचित हर्ष होईल।
अध्वोपदेश करण्या दिधला नर तो पथास दावील" ॥ १८९ ॥
ऐसें तो वदला तें झोंबे ग्रीकांस गर्वयुत वचन।
त्यांतून आन्तिलोकस चिढला; त्याचें जरी सखेद मन ॥ १९० ॥
मित्रा तो न उपेक्षी, धांवुन रक्षीत ढाल वर धरुन।
त्याचे दोघे स्नेही नौदेशा त्यास नेति उचलून ॥ १९१ ॥
एक अलास्तर दुसरा तो मेसिस्त्यूस एफिअसतनय।
वीर इदामिनिअस परि सोडीना शौर्य जाणुनी समय ॥ १९२ ॥
कित्येकां त्रायस्थां मलिन तमिस्रेंत जळत लोटाया।
रण पतन सुखद मानी ग्रीकांचा नाश राणें नको व्हाया ॥ १९३ ॥
आल्काथोअस दिसला; ज्याचा प्रिय जनक ईसिएतास।

अन्कैसीसाचा हा होता जामात विदित सकलांस ॥ १९४ ॥
त्याची ज्येष्ठ सुता जी, ती हिप्पोदेमिआ तयास वरी।
पितरांनीं वाढविलें माया अनिवार करुन जीस घरीं ॥ १९५ ॥
इतकी गुणसंपन्ना नव्हती स्त्री अन्य तुल्यवय असुन।
सुज्ञत्व अतुल जीचें, लोकीं जी श्रेष्ठ सौष्ठवेंकरुन ॥ १९६ ॥
त्रायप्रसिद्ध पुरुषें वरिलें या कारणें जयें तिजशीं।
आल्काथोअस लढतो राणिं तो आतां इदामिनिअसाशीं ॥ १९७ ॥
तन्नयनांवर उठवी पटल तमाचें अखण्ड नेप्चून।
निगडित गात्रांस करी; होई तो समरजित अतां ह्मणुन ॥ १९८ ॥
वळुं न शके पळुं न शके; जणुं राहे स्थाणु वृक्ष वा अचल।
वीर इदामिनिअस मग रोवीं भाला उरीं करें प्रबल ॥ १९९ ॥
पित्तलमय कवच फुटे, पूर्वीं तत्तनुस राक्षिलें जेणें।
होऊन भग्न पडतां केला ध्वनि कठिण घोरतम तेणें ॥ २०० ॥
वीर पडे, ध्वनि होई, तद्धृदयीं शूल रुतुनियां जाई!।
शूलाग्र हलत राही, धडधडतें हृदय एवढें काई! ॥ २०१ ॥
त्या उद्धत शस्त्राचा तेथें आवेग सर्वही सरला।
वीर इदामिनिअस मग ऐसें साश्चर्य गर्ववच वदला ॥ २०२ ॥
" हे दीइफोबसा! तूं करतोसी गर्व; काय लाभ भला।
जें न्याय्य तेंच ह्मणतों; घेतों बळि तीन समरिं एकाला ॥ २०३ ॥
रे! मन्दभाग्य तूंही मज पुढतीं येउनी उभा राहें।
ह्मणजे कळून येइल, आलेला येथ मी कसा आहें ॥ २०४ ॥

मैनस जोव्हतनय तो, झाला जो कीतनाथ विख्यात ।
द्यूकालिअन तयाला झाला निष्पाप पुत्र जगतांत ॥ २०५ ॥
त्यानें मज जन्म दिला, कीर्ती बहुजननृपाल मीं झालों ।
तुजला, त्वत्ताताला, त्रायस्थांला अरिष्टसा आलों " ॥ २०६ ॥
ऐसें तो वदला रणिं संशयिं परि पडत दीइफोबस तो ।
त्रोजन गांठावा का एकादा वळुन कोणि जरि दिसतो ॥ २०७ ॥
कीं एकला असोनी अनुभव येईल समरिं तो घ्यावा! ।
ऐसा विचार करतां त्यास सुचे ईनिआस शोधावा ॥ २०८ ॥
सेनापश्चाद्भागीं, स्वस्थ उभा तो तयास आढळला ।
प्रायम मान न दे त्या असुनी तो शूर ह्मणुन जो रुसला ॥ २०९ ॥
जाउन जवळ उभ्यानें बोले हा वचन त्यास हें तिखट ।
" त्रोजनमन्त्रिन्! तूं अज राखावा मेहुणा तुझा सुभट ॥ २१० ॥
कर्तव्याचि हें तूझें अब्रूची चाड जर तुला आहे ।
हे! ईनिआस! आतां करणें साहाय्य मेहुण्या पाहे! ॥ २११ ॥
तेणें तर निज मंदिरिं केला मोठा तुला लहानाचा ।
त्याच्या जीवा घेई शूल अतां त्या इदामिनिअसाचा " ॥ २१२ ॥
ऐसें तो वदतां या आलें अवसान बहुत हृदयांत ।
धांवत युयुत्सु समरीं वीर इदामिनिअसावरी जात ॥ २१३ ॥
नाजुक मुलाप्रमाणें भीति इदामिनिअसास वाटेना ।
जागीं निश्चल राहे पर्वतिं जेवीं वराह हालेना ॥ २१४ ॥
स्वबलीं विश्वास धरी, पाहे कुरणांत वाट लोकांची ।

चालुन येतां ते, हा पुलकित करि पाठ रांठ केंसाची ॥ २१५ ॥
नयनांत अग्नि झळके, रागानें दन्त बहुत पाजळवी ।
राहुन सन्मुख धैर्ये लोकां श्वांना बराच तो अडवी ॥ २१६ ॥
वीर इदामिनिअस हा तेविं बघे वाट ईनिआसाची ।
तो आला चालोनी, परताया बुद्धि नाहिं परि याची ॥ २१७ ॥
मागें पाहुन मारी मोठ्यानीं थोर सहचरां हांका ।
आस्केलाफस तैसा आफारीअस दिसे तया बांका ॥ २१८ ॥
रणशूर दीइपैरस तैसा तो जवळ मेरिआनीस ।
अणि निपुण आन्तिलोकस होता तेथेंच सज्ज मदतीस ॥ २१९ ॥
प्रार्थितसे यां लागीं योजोनी फार हें करुण वचन ।
“ मित्रांनो इकडे या ! द्या मज साहाय्य ! मिळुन सर्वजण ॥२२०॥
भय वाटे मजवरतीं चालुन हा येतसे ईनिआस ।
कोण निवारिल यातें समरीं प्रबलास शत्रुदमनास ॥ २२१ ॥
ज्वानींत वीर आला ! याच्याहुन अधिक कोण साहसिक ।
पाहिलें वय मज यावें, धैर्य अतांचें पुरे, नको अधिक ॥ २२२ ॥
मग मिळता त्यातें जय, अथवा मिळता क्षणांत तो मजला ” ।
ऐसें तो वदतां ते निश्चय करिती मनांत एक भला ॥ २२३ ॥
जवळी उभे रहाती स्कंधावर ठेवुनी तदा ढाली ।
तों सोबत्यांस आणी इकडे रणिं धीर ईनिआस बली ॥ २२४ ॥
तो आजिनार, पारिस सेनानी अन्य दीइफोबस हा ।
त्यातें अनुसरती जणुं मेषा तत्कुल पया पिण्यास पहा ॥ २२५ ॥

चित्तांत हर्ष जेवीं मग होतो फार मेषपालांस ।
मागुन येतां सहचर पाहुनि त्यां तेंवि ईनिआसास ॥ २२६ ॥
करिती सर्व तुमुल मग त्या आल्काथोअसा सभोंवार ।
सजती करांत भाले कवचांचा क्षुब्ध अंगिं तो भार ॥ २२७ ॥
दल संभारांतोनी धरती नेमून एकमेकांस ।
थोर इदामिनिअस अणि मार्सासम अन्य तो ईनिआस ॥ २२८ ॥
दोघे प्रसिद्ध लोकीं शूलांनीं मांस बघति फाडाया ।
तो ईनिआस फेंकी शूल इदामिनिअसास माराया ॥ २२९ ॥
दिसला समोरुनी त्या ह्मणुनीयां वार चुकवितां आला ।
व्यर्थ करांतुन सुटला शूल धरित्रींत कांपतां रुतला ॥ २३० ॥
वीर इदामिनिअस मग ईनोमासास वार उदरिं करी ।
शूल मधोमध जाई कवचा भेदून आंत दूरवरी ॥ २३१ ॥
अंत्ररसातें चाखी शूल, पडे वीर धुळिंत जो हरला ।
हस्तपुटें गच्च धरी कवळोनी पतित वीर अवनितला ॥ २३२ ॥
भाला उपटुनि घेतां आला परतुन इदामिनिअसास ।
नाहीं परंतु आलें अतिसुन्दर कवच तें हरायास ॥ २३३ ॥
कारण त्यावर चाले शूलांचा मार तो चहूंकडुन ।
त्याच्या पायांमाजी स्नायुंत उरली न शक्ति बहुकरुन ॥ २३४ ॥
भाल्या मागुन जाणें शक्य नसे यास परत ओढाया ।
दुसऱ्याच्या भाल्याच्या अथवा तो वार समरिं चुकवाया ॥ २३५ ॥
एकस्थलिं राहोनी, लढतां तो चुकवि वेळ घाताची ।

पायांतें झेंपेना सहज रणांतून कृति पळायाची ॥ २३६ ॥
पद काढी हळु हळु तो नेम धरी वरतिं दीइफोबस तो ।
द्वेष असाच तयावर होता, परि नेम धरुनही फसतो ॥ २३७ ॥
मार्सज आस्केलाफस जवळ उभा त्यास लागला भाला ।
स्कन्धा भेदुन जातां वीर झणीं धुळिंत कोसळुन पडला ॥ २३८ ॥
हस्तपुटें गच्च धरी कवळोनी पतित वीर अवनितला ।
अद्यापि न हें कळलें उद्धत मार्सास पुत्र कीं पडला ॥ २३९ ॥
आलिम्पसोच्चशिखरीं हैमघना खालिं आज जो बसला ।
जोव्हेच्छेनें नाहीं घोर रणामाजिं जाउनी गढला ॥ २४० ॥
तैसे तटस्थ होते बसलेले इतर अमर ही फार ।
तों झाला लगट रणीं त्या आस्केलाफसा सभोंवार ॥ २४१ ॥
शिरकवच दीइफोबस हरि जें ओढून ये पसंतीस ।
तोंच घुसे त्यावरतीं मार्सासम चपल मेरिआनीस ॥ २४२ ॥
बाहूंत शूल रोंवी स्पर्शी तत्किरिट पडुन भूमीस ।
उठला ध्वनि खणखण मग, पुढतिं सरे वीर मेरिआनीस ॥ २४३ ॥
गृध्रासम उडि मारुन घेई उपटून शूल निज चिवट ।
सहचर संघामाजी जाई परतून वीर तो निकट ॥ २४४ ॥
पोलैतीस पुढें मग येत रणीं दीइफोबसानुज तो ।
शूलक्षत बंधूची कंबर कवटाळुनी करें धरतो ॥ २४५ ॥
उचलुन भयद रणांतुन नेई होते जिथें हय तयाचे ।
रणभूच्या मागें ते बघताती वाट, कधिं वळायाचें ॥ २४६ ॥

चित्रस्यंदन होता, होता तो सूत ही तिथें चतुर ।
त्यांनीं पुराकडे या नेलें सत्वर रणाहुनी दूर ॥ २४७ ॥
आंतील वीर दुःखित सोडी निश्वास दीर्घ आर्तरवें ।
आर्द्रक्षत बाहूंतुन रुधिर गळे बंद नच कुणा करवे ॥ २४८ ॥
इतर रणा चालविती उठला कल्होळ अनुपशाम्यरणीं ।
मग ईनिआस दावी अपुली कालीतरात्मजा करणी ॥ २४९ ॥
आफारीअस हा मग वळला त्याच्या कडेस सहज जसा ।
भाला तसा तयाच्या गळिं लागुन शीर्ष लोंबलें सहसा ॥ २५० ॥
ढाल तयावर पडली जाड शिरस्त्राण आंत दडपून ।
+प्राणापहारकारक राहे वर मृत्यु घोर पसरून ॥ २५१ ॥
थोआस वळुन आला. पाहतसे त्यास आन्तिलोकस तो ।
तुटुन तयावर पडुनी, त्या लागीं जखम चांगली करतो ॥ १५२ ॥
पाठीवरुनी वाहत मानेशीं जात थोर जी नाडी ।
ती सारी हा तोडी, वीरालागीं धुळींत अणि पाडी ॥ २५३ ॥
प्रिय मित्राच्या पुढतीं व्यर्थ तयें पसरिलें करद्वय तें ।
धांवून आन्तिलोकस जाई त्यावरतिं सोडुनी भय तें ॥ २५४ ॥
तत्स्कंधांतुन काढी कवच परी बघतसे सभोंवार ।
कारण वेढुन यातें त्रोजन करतात यावरी मार ॥ २५५ ॥
ढालीवरतीं याच्या पडती भाले, अपाय परि न घडे ।
कारण नेस्तरतनया राखी नेप्चून जाइ तो तिकडे ॥ २५६ ॥

+ शाश्वत निद्रा त्याच्या मुद्रा नेत्रांवरी करी बसुन। पोप.

वरतीं पडे तयाच्या ' क्षितिं नाहीं ' मार कितिक शस्त्रांचा ।
कारण अरिला सोडुन नव्हता तो वेगळा ह्मणायाचा ॥ २५७ ॥
अरिसंघीं संचरतां, शूल करीं तो कधीं न अचल धरी ।
हस्तें फिरवुन फेंकी; अथवा दृढ मानसीं विचार करी ॥ २५८ ॥
दूरस्था मारावा, किंवा तो जवळच्यास रोंवावा ।
ऐसा विचार करतां आदामासास होतसे ठावा ॥ २५९ ॥
हा थोर आशिआसज लगट करी फार येउनी जवळ ।
पित्तलमय शल तया मारी ढालीवरी बहू प्रबळ ॥ २६० ॥
नेपूचुन नीललोमा, शूलाग्रा क्षीणबल तदा करतो ।
कीं वीर आन्तिलोकस जीवाशीं नाहिंतर रणीं मुकतो ॥ २६१ ॥
शूलाचा भाग तदा राहे ढालींत मोडुनी कांहीं ।
अग्निप्लुष्टाग्र जसें कीलक तें वन्य दारुचें राही ॥ २६२ ॥
धरणीवरतीं राहे बाकीचा लांब भाग तो पडुन ।
तितक्यांत आन्तिलोकस गेला निज मित्रमंडलीं पळुन ॥ २६३ ॥
इच्छी मरण चुकावें, मागुन परि जाइ मेरिआनीस ।
शूलाचा घाव करी सोडुन देऊन वरतिं नाभीस ॥ २६४ ॥
तो गुप्तभाग अवघड खालीं राहून वार वर झाला ।
क्षत येथलें विशेषें पीडा देतें असह्य मर्त्याला ॥ २६५ ॥
पडतां वीर धडफडे शूला भोंवतिं फिरे गरागर तो ।
नेती बैल बलानें गोंवारी दामबद्ध जणुं गमतो ॥ २६६ ॥
क्षतकाय वीर कांपे कांहींशी वेळ, दीर्घता न जिस ।

तो भाला उपटितसे येवोनी जवळ मेरिआनीस ॥ २६७ ॥
नंतर नयन तयाचे टाकियले झांकुनी घन तमानें ।
मग दीइपैरसातें हेलिनसें मारिलें निज करानें ॥ २६८ ॥
तलवार दीर्घ याची बसली जाउन कपालकोनांत ।
शिरिंचें त्राण तिकोनी तुटलें खातां प्रचण्ड आघात ॥ २६९ ॥
भूवरतीं पडतां तें एका ग्रीकें धरोनियां पायीं ।
उचलीलें वरतीं तों नयनां झांकीत तम बहु अपायी ॥ २७० ॥
मग एत्रिअससुताला झालें अतिदुःख मेनिलासाला ।
रणशूर चाल करुनी हेलिनसा भीति घालता झाला ॥ २७१ ॥
हा शूल तीव्र तळपवि, वांकवि तो शृंग वक्र निज धनुचें ।
दोघे धांवति, पहिला रोवुं बघे शूल आंत अरितनुचे ॥ २७२ ॥
ज्यानिर्गत बाण दुजा अरिवर सोडावया जपे फार ।
प्रायमजें उरिं केला बाणाचा कवचविवरिं मग वार ॥ २७३ ॥
कटुशर परत उडे तों. खेळ असा दिसत मळणिच्या जागीं ।
जेव्हां सुपांत लागति माष भराभर उडावयालागीं ॥ २७४ ॥
उडवी तीव्र पवन त्यां पाखडणारा करी जसा जोर ।
त्या मेनिलास कवचा वरुन तसा बाण उडतसे थोर ॥ २७५ ॥
मग एत्रिअससुतातें, रणशूरें वीर मेनिलासानें ।
हस्तीं मारियलें त्या, जेणें धनु उचलिलें असे मानें ॥ २७६ ॥
पित्तलमय शूल तदा हस्ता भेदून चिकटला चापीं ।
सहचरसंघीं परते चुकवाया वीर मरण तें पापी ॥ २७७ ॥

खालीं कर लोंबवुनी पळतां फरफटत शूल भूवरतीं ।
उपटून शूल साधी क्षतरोपण आजिनार जपुन अती ॥ २७८ ॥
या लोकनायकास्तव लोंकर आणी वळून जी दास ।
गोफण करावया, ती आली क्षतबंधनांत कामास ॥ २७९ ॥
मग वीर मेनिलासा माराया जातसे पिसान्दर हा ।
दुर्दैवें त्या नेलें मृत्युकडे मेनिलास ! आज पहा ॥ २८० ॥
चालुन दोघे आले जवळी मग नेम एत्रिअसज धरि !
चुकला नेम, दुरुनियां गेला तो शूल होइ अभय अरि ॥ २८१ ॥
लक्षून मेनिलासा फेंकियला मग पिसान्दरें भाला ।
ढाल निवारी त्याला, आंत न टुपला, धरेवरी पडला ॥ २८२ ॥
भग्नाग्र यास दिसला, विजयाची आस या सुटे भारी ।
काढुन असि रजतखचित एत्रिअसात्मज झणीं करांत धरी ॥२८३॥
धांवे पिसान्दरावर, ढालींतुन परशु एक काढि अरि ।
पित्तलमय सुन्दर तो दण्ड तयाचा करांत लांब धरि ॥ २८४ ॥
जितवृक्षाचा होता केला हा फार फार गुळगुळित ।
एका समयीं दोघे अन्योन्यां घाय करिति अवचटित ॥ २८५ ॥
हयकेशावृत कोनीं शिरकवचाच्या, पिसान्दरें वार ।
केला चूडे खालीं; क्रुद्ध तयें मेनिलास मनिं फार ॥ २८६ ॥
जवळी जाउन मारी अरिमस्तकिं नीट नासिकामूलीं ।
भग्नास्थि वीर पडला, आकुंचित मग करीत तनु अपुली ॥ २८७ ॥
रुधिरासिक्त तयाचे पडले धूळींत नेत्र जेतृपदीं ।

अरिच्या उरिं पद ठेवी, भय न धरी मेनिलास मग अगदीं ॥२८८॥
कवच हरोनी तो करि गर्वाची उक्ति या प्रकाराची ।
"नौदेशा सोडुन अशि तुह्मीं साधाल वाट नगराची ॥ २८९ ॥
वीट न ये आह्मांसह हयदमनांसह तुह्मांस कलहाचा ।
केला कितीक वेळां तुह्मीं राणिं भंग निष्फल तहाचा ॥ २९० ॥
अठवोनियां वदा हो कुठलें दिधलें न दुःख कीं मजला ।
लज्जास्पद तरि कुठलें नाहीं केलेंत कृत्य समयाला ॥ २९१ ॥
भीति न धरिलीत मनीं घनगर्जन पूज्य जोव्ह देवाची ।
तुमच्या तुंगपुरा तो ध्वंसुन दावील रीत कोपाची ॥ २९२ ॥
अधमांनों ! श्वानांनों ! जातां तुमची न काढिली खोडी ।
नेलीत हरुन माझी तरुणी भार्या करून तिशिं गोडी ! ॥ २९३ ॥
केला सत्कार तिनें तुमचा, तरि वित्त हरुन नेलेंत ! ।
नौका जाळूं बघतां ग्रीक जरी अमित ठार केलेत ! ॥ २९४ ॥
उद्धत असाल समरीं ! तुमच्या कलहा पडेल अज आळा ।
हे ! जोव्ह ! सुरनरांहुन गणताती सुज्ञ तुज जगत्पाळा ॥ २९५ ॥
घडती सदैव साऱ्या गोष्टी या खचित रे तुझ्या हातें ।
बघ सौख्य कितिक देशी समरीं या उद्धत त्रोजनांतें ॥ २९६ ॥
करतात साहसी हे नाश रणीं वीट यां न कलहाचा ।
संग्राम नाश करतो, लोकां ठाऊक, उभय पक्षांचा ॥ २९७ ॥
× निद्रा निर्भर, रतिसुख, नर्तन निर्दोष, सुरस तें गान ।
असुनी रुचिर विषय हे सेवुनि अतिमात्र विटुन जाय मन ॥ २९८ ॥
लोकां या विषयांचा लोभ सुटे, परि कधीं न युद्धाचा ।

× ही आर्या सुभाषितरूप आहे.

तरि हे त्रोजन पाहीं युद्धाचा वीट यां न ये साचा" ॥ २९९ ॥
ऐसें बोलुन तेणें अरिचें तें रुधिरमय कवच हरिलें ।
पुढतीं चालुन जातां ठेवाया जपुन सहचरां दिधलें ॥ ३०० ॥
योद्ध्यांत समरमुखिं तो गेला मिसळून वीर अज फिरुन ।
पैलीमेनिसज मग आला हार्पेलिअन पळत म्हणुन ॥ ३०१ ॥
प्रियजनकासह आला त्रायपुरीं हा करावया समर ।
घेई यावरतिं उडी. तेणें परि बघितलें न निज नगर ॥ ३०२ ॥
तो एत्रिअससुताच्या ढालीवर मारि जवळुनी भाला ।
पित्तलमय शस्त्रांतुनि दवडुं न शकला म्हणून परत अला ॥३०३॥
सहचरसंघीं शिरला हेतु मनिं कीं चुकेल मग मरण ।
फिरतां चहूंकडे तो पाही मारील शूल कुणि कृपण ॥ ३०४ ॥
ऐसा परतुन जातां वर सोडी बाण मेरिआनीस ।
तो आरपार गेला लागुनियां प्रथम दक्षिण कटीस ॥ ३०५ ॥
हाडाच्या खालीं शर शिरला मूत्राशयांत बहु खोल ।
तेथेंच वीर सोडी सहचरहस्तांत जीव बहु मोल ॥ ३०६ ॥
धरणीवर तनु पसरुनि तो राहे पडुनियां जिवाणुं जसें ।
तों त्याचें कृष्ण रुधिर गळुनी धरणीस सहज भिजवितसे ॥ ३०७॥
*पुढल्या कार्यीं गुतले ते पाफ्लागोनिअन जन उदार ।

---

*घालति तत्स्यंदनिं त्या ते पाफ्लागोनिअन जन उदार ।
रणभूवरुनी चाले स्मशान यात्रा हळू हळू फार ॥ १ ॥
कष्टी जनक तयाचा (नाहीं जनकत्व हा ! अतां उरलें !) ।
स्वारींत शोकमय या चाले त्याचें जरी न पद उचलें ॥ २ ॥

तच्छव रथांत घालुनि खेदें नेती पुरा हळू फार ॥ ३०८ ॥
त्यांसह जनक तयाचा गेला अश्रूजलास गाळीत ।
मृतपुत्राचा नाहीं सूड कुणी घेतला लढाईत ॥ ३०९ ॥
याच्या निधनावरुनी आलासे क्रोध बहु पारिसास ।
पाफ्लागोनिअनांचा होता हा पाहुणा तद्गृहास ॥ ३१० ॥
ह्मणुनी रागानें हा सोडितसे बाण एक पितळेचा ।
आतां तेथें होता एक युकीनार वीर तेजाचा ॥ ३११ ॥
याचा भविष्यवादी होता तो वृद्ध पोलिइदस पिता ।
कारिन्थीं वास करी साधी श्रीमन्त, शूर, लोकहिता ॥ ३१२ ॥
नौकेंत युवा बसला असतां ठाऊक नियति घातक ती ।
त्या वृद्ध पोलिइदसें, कथिली होती तयास उघड अती ॥ ३१३ ॥
घोर व्याधि जडोनी त्या येइल मंदिरांत कीं मरण !
अथवा त्रोजनहस्तें नौदेशीं तो मरेल करुन रण ॥ ३१४ ॥
तेणें ह्मणुन चुकविला करतिल जो +दण्ड एकियन यास ।
*व्याधित्रास चुकविला, न लगे मागून दुःख चित्तास ॥ ३१५ ॥

उद्रेकें अश्रुजला गाळी; हे येथ काय कामाचे ? ।
रडतो, व्याया सूड न शकला पाहून निधन तनयाचें ॥ ३ ॥ पोप॰

\+ अगमेम्नन यांचा सार्वभौम राजा होता. त्यानें लढाईचें आमंत्रण केल्यावर हा आला नसता तर त्याला दण्ड द्यावा लागता.

*व्हावें शस्त्रेंचि रणीं वीरांचें गलित न वपु रोगानें ।
सकलां मर्त्यजनांतें सुख द्यावें नित्य नव पुरोगानें ॥ १ ॥ मोरोपंत.

दंष्ट्रा अणि कर्ण अशा दोघांचा मध्य रोंखुनी भाला ।
पारिस मारी त्याला गेला तज्जीव त्यजुन गात्रांला ॥ ३१६ ॥
घोर भयंकर तिमिरें ग्रासोनी टाकिलें तया समरीं ।
ज्वलदग्निसम असे ते दोघे लढले. न भय कुणीहि धरी ॥ ३१७ ॥
जोव्हाप्रिय हेक्तर तो, जाणेना वृत्त मुळिं असें घडलें ।
ग्रीकांनीं नौदेशीं त्याचे जन कापितां कसे पडले ॥ ३१८ ॥
जय आला ग्रीकांना मिळण्याच्या आज खचित रंगाला ।
भूकंपक नेपचूनें इतकें उत्तेजिलें असे यांला ॥ ३१९ ॥
आपण ही लावितसे या कार्यीं शक्ति आपुली भारी ।
हेक्तर करि शौर्य तिथें प्रथम शिरे तो जिथें तटद्वारीं ॥ ३२० ॥
ढाली असतां हातीं ग्रीकांचे व्यूह ही तिथें फुटले ।
प्रोतीसिलास ठेवी ओढुन नौयान तें तिथें अपुलें ॥ ३२१ ॥
आजक्षाचें होतें सागरतीरीं तिथेंच नौयान ।
परि तेथिल तट भिंती होत्या मुळिं ठेंगण्या अणि लहान ॥३२२॥
अश्वारूढ तिथें हे चालविती घोर समर या कालीं ।
सेना लोक्रिअनांची थिअनांची ती जमा तिथें झाली ॥ ३२३ ॥
बेओशिअन पहुडले घेउन ईपीअनांस नांवाशीं ।
आयेओनिअनांनीं केली बहु लगट हेक्तरापाशीं ॥ ३२४ ॥
सारे क्रोधें घुसले; परि न तया घालवावया शकले ।
+अग्नि ज्वालेच्या सम हेक्तर गति हे निरोधितां थकले ॥ ३२५ ॥

+ व्यूहीं सहसा सात्यकि शिरला जैसा दवाग्नि शुष्कवनीं । मोरोपंत.

होते वीर समरशिरिं निवडक ते नेमके अथीनिअन ।
पेटिअसात्मज होता नृप मेनिस्थिअस अधिप रिपुदमन ॥ ३२६ ॥
स्टिचिअस फिदास होते; अणि फैलीअससुत तसाच मेजीस ।
ड्राशिअसासह आला उत्सुक बहु आम्फियन लढाईस ॥ ३२७ ॥
ईपीअनवीरांचें होतें याच्याकडेस अधिपत्व ।
पोदार्सीस मिदन हे नेती थिअनां रणीं अचलसत्व ॥ ३२८ ॥
त्या ओइलीअसाचा हा दासीपुत्र ठाउका मिदन ।
ओळखती फैलेसिंत यातें आजक्षबन्धु ह्मणुन जन ॥ ३२९ ॥
तो भूप ओइलीअस जनक तयाचा फिरून लग्न करी ।
रमणीय ईरिओपिस शोधुन आणीतसे घरीं नवरी ॥ ३३० ॥
माता सावत्र घरीं, तीच्या बंधूस वधितसे रीस ।
करुनी मनुष्यवध हा राहे सोडून जन्मभूमीस ॥ ३३१ ॥
फैलेसींत वसतसे तो पोदार्सीस नृप इफिक्लसज ।
थिअनांतें रणिं नेती बेओशिअनां विरुद्ध हे आज ॥ ३३२ ॥
तो ओइलीअसात्मज विश्रुत आजक्ष वीर समरांत ।
तेलामनतनयाला आजक्षाला न सोडुनी जात ॥ ३३३ ॥
झाले न वेगळे हे थोडा ही वेळ दूर समरांत ।
ते कृष्ण वृषभ जैसे जोडीनें चालतात शेतांत ॥ ३३४ ॥
ते सारख्या बलाचे ओढिति संश्लिष्टसंधि नागर तो ।
इतक्यांत शृंगमूला वाटोळा घर्म विपुल तो सुटतो ॥ ३३५ ॥
मध्यें वृषद्वयाच्या असतो धूर्दण्ड फार गुळगुळित ।

हलरेषा स्पष्ट उठति क्षेत्रा फाडून फाळ जों सरत ॥ ३३६ ॥
तैसे जवळी असती दोघे संयुक्त एकमेकांच्या ।
तेलामनजा मागुन झुंडी लढती रणांत सैन्याच्या ॥ ३३७ ॥
जेव्हां अवयव याचे कष्टानें भिजुन जाति घर्मानें ।
तेव्हां तद्धस्तांतुन उचलुन भट घेति ढाल सन्मानें ॥ ३३८ ॥
त्या ओइलीअसाच्या पुत्रातें लोक्रिअन न अनुसरती ।
कारण चित्त तयांचें अस्थिर; एक स्थलीं न लढुं बघती ॥ ३३९॥
हयकेशालंकृत तीं कवचें शिरिंचीं तयापशीं नव्हतीं ।
होत्या न गोल ढाली, भाले नव्हते म्हणून अडचण ती ॥३४०॥
यासह हे येथ अले चापावर सर्व भिस्त ठेवून ।
पिळदार गोफणींचे उर्णामय भार थोर घेऊन ॥ ३४१ ॥
यांच्या मारें यांनीं ट्रोजनपंक्तींस पूर्वीं भेदियलें ।
विचित्रकवचावृत तनु दोघे आजक्ष समर करित भलें ॥ ३४२ ॥
ट्रोजन सैन्या घेउन हेक्तर झगडा करीत रणिं यांशीं ।
मागुन लोक्रिअनांनीं सोडियल्या यांजवरतिं इषुराशी ॥३४३ ॥
होते हे लपलेले, ट्रोजन पाहूं तयांस नच शकले ।
युद्ध सुचेना त्यांतें लागुन शर सर्व फार गोंधळले ॥ ३४४ ॥
ट्रोजन खचित परतुनी जाते सोडून नौप्रदेशास ।
सोसुन हानि इथोनी जाते हे पळुनियां इलियमास ॥ ३४५ ॥
परि हेक्तरास बोले जवळी जाऊन पालिदामास ।
" हेक्तर ! उपदेशानें चित्त तुझें कोठलें वळायास ॥ ३४६ ॥

कारण ईशें तुजला इतरांहुन अधिक साहसी केलें ।
म्हणसी सदैव म्हणुनी ज्ञान तुला अधिक पाहिजे असलें ॥३४७॥
सकळ कळाव्या तुजला गोष्टी हें घडुन काय येईल ! ।
समरीं पटुत्व एका, नृत्यीं इतरास देव देईल ॥ ३४८ ॥
वीणाज्ञान कुणातर ज्ञान कुणा तें अगाध गानाचें ।
*अथवा स्थैर्यविशिष्ट प्रज्ञा स्थापील हृदयिं अणिकाचे ॥ ३४९ ॥
हित तेणें बहुतांचें, रक्षण समयास होत नगरांचें ।
प्रज्ञावन्तचि जाणें प्रज्ञेचें मोल काय तें साचें ॥ ३५० ॥
जें दिसतें उत्तम मज तेंच तुला मी समग्र बोलेन ।
सेना वलयाकारा तुजला वेढुन लढे, तुज कळे न ॥ ३५१ ॥
बसले स्वस्थ त्रोजन लंघुन तट कांहिं, लढति परि कांहीं ।
हे थोडे, परि अरिची नौभागीं दिसत अधिक संख्या ही ॥ ३५२ ॥
प्रथम सरोनी मागें जमवीं तूं सकल सैन्यनायक ते ।
पुढतीं काय करावें, करुनी सुविचार ठरवुं तें पुरतें ॥ ३५३ ॥
देईल देव यश तर नौदेशावर चढून जावें वा ।
सोडुन नौदेशा वा जावें अक्षत घरा त्यजुन हेवा ॥ ३५४ ॥
भय वाटे ग्रीक अतां बसतिल फेडून कालचें उसनें ।
नौभागीं एक असे पुरुष जया तृप्ति कधिं न समरानें ॥ ३५५ ॥
राहुन तटस्थ आतां चालूं देईल रण न संभव हा " ।
या उपदेशें झाला वाटे संतोष हेक्तरास महा ॥ ३५६ ॥

---

* नहि सर्वविदः सर्वे.

सत्वर रथांतुनी तो घेउनि उडि भूवरी, करि वचास ।
" शूरोत्तमांस समरीं ठेउन घे येथ, पालिदामास ! ॥ ३५७ ॥
स्वारां आज्ञा देउन लवकर येईन येथ परतून " ॥
ऐसें बोलुन धांवे; किरिटिं पिसें शुभ्र शोभती दुरुन ॥ ३५८ ॥
त्रोजन सैन्यांतोनी अरडोनी ऊर्ध्वहस्त जों फिरतो ।
वाटतसे बघतां तों सरतो जणुं शैल वनिं हिमावृत तो ॥ ३५९ ॥
देखे मग पॅन्थौसज वीर सभोंवार पालिदामास ।
धांवुन जमले सारे परिसोनी दीर्घ हेक्तरवचास ॥ ३६० ॥
धौरेयांत फिरोनी हेक्तर शोधीत थोर वीरांस ।
तो कोठ दीइफोबस, अणि हिर्तांकसज वीर आशिअस ॥३६१॥
आदामास तसा तो व्हावा सुत कोठ आशिआसाचा ।
नृप हेलिनस दिसेना होता सामर्थ्यवान जो साचा ॥ ३६२ ॥
कांहीं यांतिल दिसले अक्षत केवळ अजून नव्हते जे ।
उरले सजीव ऐसें ओळखुं येई मुखावरिल तेजें ॥ ३६३ ॥
नौभागीं हे झाले आंत तटाच्या अणीक आढळले ।
शस्त्राहत कितिक तसे कितिक गतासू धरेवरी पडले ॥ ३६४ ॥
हेलनपाति त्या दिसला, पारिस समरांत वामबाजूस ।
उत्तेजन देत असे याया उत्साह संकटिं चमूस ॥ ३६५ ॥
जाउन जवळ तयाच्या निंदाव्यंजक करीत वचनास ।
" पारिस ! नरापसद ! हे ! आकृति सुंदर तुझी दिसायास ! ॥३६६॥
सांगें सतीत्वनाशक ! स्त्रीलंपट शोध करुन सायास ।

तो कोठ दीइफोबस, आणि हिर्तासकसज वीर आशिअस ?॥३६७॥
आदामास तसा तो कोठें सुत सांग आशिआसाचा ।
वद हेलिनस आणिक तो कोठें सामर्थ्यवान नृप साचा! ॥ ३६८ ॥
कोठें रणिं आहे तो सांग बरें वीर ओथ्रिओन्यूस? ।
इलियम नष्ट कराया आतां फावेल खचित शत्रूस ॥ ३६९ ॥
त्याचा विनाश ठरला; निःसंशय पतन आज पावेल! " ।
सुरसुन्दर पारिस तो उत्तर या देत सहज रंगेल ॥ ३७० ॥
" हेक्तर! हेतु दिसे तव द्याया मज दोष मी अदोष जरी ।
माझ्या कडुन उपेक्षा होइल दुसऱ्या कधीं, अतां न परी ॥ ३७१ ॥
इतकेंच सांगतों कीं भीरुप्रसवा न अगदिं मम माता ।
नौदेशीं चालविलें युद्ध तुवां मित्र येउनी मिळतां ॥ ३७२ ॥
तेव्हां पासुन आहों ग्रीकांसह येथ लढत सतत बरें ।
तूं सोधिशी जयानां ते झाले मित्र नष्ट तव जबरे! ॥ ३७३ ॥
त्यांतील दीइफोबस, आणि तो बलवन्त नृपति हेलिनस ।
शूलक्षतहस्त अतां आले परतून सोडुन रणास ॥ ३७४ ॥
सॅतर्नसुतें यांचें टाळियलें मरण आयत्या समया ।
तें राहो! हो पुढतीं तेथ, चलें जेथ जीव कथि हृदया ॥ ३७५ ॥
दृढ निश्चय मनिं धरुनी जाऊं मागें न घेउं आपण रे ।
तोटा पराक्रमाचा तुज नच लढशिल करून जर पण रे ॥ ३७६ ॥
धीरा! परमोदारा! खर्चूं बल आमुचें असेल तसें ।
शक्तीच्या बाहेरी लढणें रणिं उत्सुका हि शक्य नसे " ॥ ३७७ ॥

ऐसें बोलुन वीरें बन्धूचें चित्त वळविलें नीट ।
संग्रामकलह पेटे, तेथें ते जाति निघुनियां धीट ॥ ३७८ ॥
फाल्कीस तेथ लढतो लढतो तो शूर पालिफीतीस ।
आर्थीअस तेथ लढे तेथ लढे वीर सेब्रिआनीस ॥ ३७९ ॥
आस्केनिअस व पामिस, मारिस हिप्पोतिअनज या समयीं ।
आस्केनिएंतुनी हे आले साहाय्य द्यावया विजयी ॥ ३८० ॥
आला त्यांसह योद्धा येथें विक्राळ पालिदामास ।
नंतर यां जोव्हानें दिधला उत्साह रणिं लढायास ॥ ३८१ ॥
सारे समरीं घुसती भूपृष्टीं चण्डवेग कीं पवन ।
उत्साह ज्यास देतो जोव्ह नभीं मेघगर्जना करुन ॥ ३८२ ॥
निर्घोष घोर करुनी भेटे जाउन महासागरास ।
संक्षुब्ध ऊर्मिमाला करताती मुखर सागरजलास ॥ ३८३ ॥
होय तरंगाकुल मग सागर तो धवल सकल फेंसानें ।
मागुनची ऊर्मि तदा लोटी पुढचीस फार वेगानें ॥ ३८४ ॥
त्रोजनदलपंक्ति तशा उठुनी समरीं अतां क्रमें पाहीं ।
अधिपातें अनुसरती आवृत तनु ती करून कवचांहीं ॥ ३८५ ॥
प्रायमज हेक्तरानें, कर्तनकार्यांत मार्सतुल्यानें ।
अग्रेसरत्व घेउन धरिली तनुपुढतिं ढाल शौर्यानें ॥ ३८६ ॥
पितळेचे पत्रे त्या ढालीवर दाट बसविले असती ।
केली चिवट अधीं जी चर्मावर चर्म चढवुनी पुरती ॥ ३८७ ॥
थोर कपोलप्रान्तीं चमके शिरकवच मधुन जें हलत ।

पद टाकुन तो पुढतीं अरिसेना व्यूह भेदण्या बघत ॥ ३८८ ॥
येतां असा पहाती ग्रीक रहाती परी मुळीं अभय ।
समराह्वान तयाला देई आजक्ष पाहुनी समय ॥ ३८९ ॥
" भो हेक्तर ! ये जवळी ग्रीकां ऐसा कशास भिववीशी ? ।
जोव्हाभिशापजित तरि जाणति हे ग्रीक समरयुक्तीशीं ॥ ३९० ॥
आत्मा तव आस धरी नौका आजी लुटावया सकळ ।
हांकाया परतुन तुज आह्मां आहेत कर गड्या सबळ ॥ ३९१ ॥
नगर जनाकीर्ण तुझें अस्मत्कर नष्ट झटिति करतील ।
तूझ्या स्वतांविषयिं मी कथितों ही वेळ जवळ येईल ॥ ३९२ ॥
जेव्हां जोव्हादि सुरां करुण वचें त्वां सविनय विनवावें ।
वारू सुलोम तव कीं श्येनाहुन अधिक जवन ते व्हावे ॥ ३९३ ॥
ह्मणजे ते तुज लागीं, नेतिल नगरास तव सुरक्षित रे ।
धूळीच्या पटलानें जेव्हां जाइल भरून रण सारें " ॥ ३९४ ॥
ऐसें तो वदला तों उजव्या बाजूस जात खग उडुन ।
गगनांत उंच वेगें चढला तो होय गरुड शुभशकुन ॥ ३९५ ॥
ह्मणुनी ग्रीक महारव करिती, उत्साह त्यां बहू भरला ।
हेक्तर कुलज तयाला उत्तर द्यायास शब्द हे वदला ॥ ३९६ ॥
" काय विकत्थनशीला ! आजक्षा ! बोललास वाचाला ।
इच्छा करितों कीं मीं व्हावें पुत्रासमान जोव्हाला ॥ ३९७ ॥
ह्मणजे जूनोनें मज जन्म दिला जणुं असें जनें गावें ।
पूज्य जनांस अपाले आणि मिनर्वा तसाच मीं व्हावें ॥ ३९८ ॥

दिवसावसानसमयीं ग्रीकांचा नाश आज मी करिन ।
सरसकटांत तुझा मी वध केल्याविण न मुळिंच राहीन ॥ ३९९ ॥
मच्छूलाच्या पुढतीं येतां तव सुतनु तो विदारील ।
ग्रीकांच्या नौदेशीं येथें ती मग तशीच राहील ॥ ४०० ॥
त्रायस्थांचे असती येथें कुतरे अनेक विहग अज्ञ ।
+मांसवसादानानें त्यांतें करशील तुष्ट रे सहज " ॥ ४०१ ॥
ऐसें वदुनी गेला पुढतीं तो करुन अरिवरी चाल ।
सहचर मागुन गेले स्वार तसे करुन शब्द जंजाल ॥ ४०२ ॥
इकडे ग्रीकांनींही केला रणनाद शौर्य ज्यां ठावें ।
सुचविति मूळारंभीं त्रोजन वीरोत्तमें रण करावें ॥ ४०३ ॥
उभय दलांमाजि तदा मोठा कल्होळ भयद जो उठला ।
जोव्हद्युतिमत्स्थाना पोंचे व्यापुन समग्र गगनाला ॥ ४०४ ॥

+ संस्कार रहित अरिचें प्रेत घोर पक्ष्यांच्या स्वाधीन करण्याची हौस वीरांस सर्वत्र सारखीच दिसत आहे. **राम म**कराक्षाला ह्मणतात:—

स्वाशिताश्चापि मांसेन गृध्रगोमायुवायसाः ।
भविष्यन्त्यद्यवै पाप ! तीक्ष्णतुण्डनखांकुशाः ॥ १ ॥ रामायण.

अर्थः—अरे पाप्या, तीक्ष्ण चंचू व नखरूप अंकुश ह्यानीं युक्त असलेले गृध्र, कोल्हे व काक पक्षी आज तुझ्या मांसानें चांगलेच तृप्त होतील.

सर्ग १४ वा.

जूनोनें केलेली जोव्हाची वंचना.

सारांशः—रणकल्होळ श्रवण करतांच **नेस्तरास** भीति वाटून तो **अगमेम्नना**-कडे जावयास निघतो. मार्गांत **दायोमीद** व **युलिसीस** भेटून संकटाची परमावधि झाली ह्मणून सांगतात. **अगमेम्नन** रात्रौ पलायन करावें असें सुचवितो. **युलिसीस** त्याचा जोरानें निषेध करतो. रणांत तुह्मांस जखमा झाल्या असून-ही तुह्मीं इतरांस उत्तेजन देण्याचें काम करा असें सुचवितो. तें त्यांस मानवतें. **जोव्हाचा त्रोजनांकडे** ओढा आहे हें जाणून, **जूनो जोव्हास** फसविण्याचा बेत करते. **व्हीनस** जवळून वशीकरणसमर्थ रशना घेऊन येते. व **जोव्हास** भुलवून **स्वापाचे** साहाय्यानें गाढ निद्रेंत मग्न करून ठेविते. त्याचा फायदा घेऊन **नेप्चून ग्रीकांस** मदत करतो. **आजक्ष हेक्तरास** विशाल दगड मारून जखमी करतो. **त्रोजन** त्यास रणांतून नेतात. पुष्कळ चकमकी उडतात.

कालमानः—मागील दिवस पुढें चालू.

स्थलमानः—समरभूमि, इदाचल इ०

नेस्तर या समयाला होता सेवींत पानसौख्याला ।
तत्कर्णीं चुकवोनी नाहीं कल्होळ उठुन हा शमला ॥ १ ॥
मग एस्क्युलेपिअसजा बोले तो तीव्र शब्द लागून ।
"मेकाअन ! मनि विचरें, येती गोष्टी कशा अतां घडुन ॥ २ ॥
ग्रीकांच्या नौभागीं करती जे तरुण वीर रणनाद ।
अधिकाधिक तो वाढे ! अधिं परि घे श्यामलासवास्वाद ॥ ३ ॥

मंदोष्ण स्नानजला हेकामीदी क्षणांत ती अणिल ।
रुधिरक्लिन्न तुझें क्षत दक्षपणानें धुवून काढील ॥ ४ ॥
जातों मी बुरुजांवर, बघतों आणि काय वृत्त हें आहे " ।
ऐसें बोलुन अपुल्या तनयाची ढाल कोठ तें पाहे ॥ ५ ॥
तंबूत अश्वदमनें ठेवियलें जिस थ्रासिमेदासें ।
पित्तलमय आयुध हें दिधलें जनकें सुता उपायनसें ॥ ६ ॥
एक करें ही उचलुन अन्य करें शूल, तीक्ष्ण अग्र जया ।
तंबूच्या बाहेरी येतां दिसतो कृती अनन्वित या ॥ ७ ॥
घाबरले ग्रीक रणीं ! त्रोजन उद्धत तयांस पळवीती ।
ग्रीकांचे तट पडले ! पडला वृद्धास मग विचार किती ॥ ८ ॥
जैसा अपार सागर नील दीसे शान्त वीचियोगानें ।
सुचवी निरर्थ सुटतिल वात महाजवन तीव्र वेगानें ॥ ९ ॥
अणि जों न जोव्ह धाडी उच्छृंखल वात चण्ड, तों जल तें ।
मागें पुढें न हलतें उदधिंत राहे प्रशान्त निश्चल तें ॥ १० ॥
तैसा चिंतन करतां वृद्ध दिसे शांत संशयीं पडुन ।
विमनस्का त्या लागीं, काय करावें न येतसे कळुन ॥ ११ ॥
जावें ग्रीक चमूशीं किंवा नृप एत्रिअसज शोधावा ।
करितां विचार वाटे बरवें कीं नृपति समरिं गांठावा ॥ १२ ॥
उभयदलांतिल इकडे चालविला प्राणनाश वीरांनीं ।
कवचावृत तनुवरतीं मार करीती सनाद शस्त्रांनीं ॥ १३ ॥
नौदेशाहुन आले क्षततनु जोव्हप्रसाद ते राजे ।

युलिसीस, तैदिअससुत, अगमेम्नन त्यांत नृप विराजे ॥ १४ ॥
हे नेस्तरास भेटति; तीरावर जरठ जलधिच्या धवल ।
होत्या नौका याच्या ओढुनियां ठेविल्या तिथें सकल ॥ १५ ॥
येथुन रण दूर असे नौका आल्या सयोध जलिं भारी ।
प्रथम अल्या त्या ओढुन ठेवियल्या दीर्घ पुलिनिं दूरवरी ॥ १६ ॥
नौपृष्ठभागिं होता रचिलेला एक थोर रुंद तट ।
नौका साऱ्या येथें मावतना ठेविल्या जरी निकट ॥ १७ ॥
तीर अफाट असोनी गर्दी केली ह्मणून लोकांनीं ।
भरली जागा सारी व्यापियली दोन जी भूशिरानीं ॥ १८ ॥
मधल्या आखाताच्या तीरावर लाविल्या अतां रांगा ।
एकी मागें दुसरी नौका लावून सजविती जागा ॥ १९ ॥
टेंकून शूल भूवर होते हे सर्व जण इथें फिरत ।
रणसंभ्रमास बघतां उरिं हृदया दुःख होतसे सतत ॥ २० ॥
पाहून नेस्तराला ग्रीकांचे जीव हृदयिं घाबरती ।
त्यालागीं अगमेम्नन बोलतसे प्रथम शब्द हे नृपती ॥ २१ ॥
" हे नेलिअसज ! नेस्तर ! ग्रीकां तूं थोर अससि वैभव रे ! ।
जीवध्वंसक समरा सोडुन कां येथ येसि सांग बरें ॥ २२ ॥
भय वाटे कीं उद्धत हेक्तर आतां करील तो पुरतें ।
त्रायस्थांत तयें जें भाषण केलें, खरें भयावह तें ॥ २३ ॥
आह्मांस मारल्याविण नौकांतें आग लाविल्याविण रे ।
परतेन इलियमा नच , हेंच तयाचें सगर्व भाषण रे ! ॥ २४ ॥

+गोष्टी सकल अतां या हळु हळु कैशा खऱ्या ठरूं बघती ।
अकिलीसासम दुसरे ग्रीक कसे राग मजवरी धरती ॥ २५ ॥
देवानों ! हेंच पहा नौदेशीं यांस रण नको आहे ! ”
वदत जिरेनिअन तदा नेस्तर सरदार मग नृपाला हें ॥ २६ ॥
“ गोष्टी अशा खरोखर घडुनी या आज येत आहेत ।
घनगर्जन जोव्हाही गति यांची फिरवितां नसे येत ॥ २७ ॥
होती भिस्त तटांवर कीं ते दुर्भेद्य रक्षितिल नांवा ।
निर्भय आम्हीं राहूं; परि ते पडले; न मार्ग अजि ठावा ॥ २८ ॥
संग्राम करिति साग्रह आतां हे सकल वीर नौकांशीं ।
बघतां तुजही न दिसे ग्रीकां अरि पळवि कवण भागाशीं ॥२९॥
समरांत निर्विशेषें ग्रीकांचा आज होत संहार ।
करिती आक्रोश रणीं तो जाई गगन भेदुनी पार ॥ ३० ॥
चिंतन उपाय सुचवी, कैसें होइल करूं विचार चला ।
माझें मत न असें कीं आह्मीं जावें समस्त समराला ॥ ३१ ॥
क्षत झालें ज्या वीरा त्या नाहीं उचित खचित संगर हें ! ” ।
अगमेम्नन यालागीं नृपवर मग नीट देत उत्तर हें ॥ ३२ ॥

---

* पोपकवानें हेंच भाषांतर असें केलें आहे.

ग्रीकांच्या हें हृदयीं लिहिलेलें वच असेल रक्तानें ।
समर न करतील कुणी ! भूपावर रुसाति काय कोपानें ? ॥ २५ ॥
काय बवाया जगलों शोकाकुल जें पडेल दृष्टीस ? ।
प्रत्येक ग्रीकाचा काय नवा बनत आज अकिलीस ! ॥ २६ ॥

" नौपश्चाद्भागीं हे, नेस्तर ! लढतात वीर या समया ।
वाया तट ते गेले. खंदकही व्यर्थ रक्षण कराया ॥ ३३ ॥
ग्रीकांस कष्ट झाले, चित्तीं दुर्भेद्य तट तयां गमले ।
नौकांचें वीरांचें करतिल रक्षण असें मनीं आलें ॥ ३४ ॥
अर्गासाहुन दूरी ग्रीकां यावें समरण अपयश हें ।
त्या सर्वशक्ति जोव्हा दुःखद बहु वृत्त आज केंवि सहे ॥ ३५ ॥
मजला ठाउक होतें ग्रीकां साहाय्य बहु तयें दिधलें ।
त्रायस्थांस सुरांसम देतो तो मान हें अतां कळलें ॥ ३६ ॥
शौर्य स्तंभित करुनी बांधियले आमुचे तयें हात ।
ह्मणतों कीं व्या खालीं नौका ओढून आज इतक्यांत ॥ ३७ ॥
सन्निध असति जलाच्या त्या ढकलूं आधिं सर्व जलधिजलीं ।
स्वस्थपणानें राहूं नागर टाकोनियां समुद्रतलीं ॥ ३८ ॥
वाट बघूं जोंवर ती सर्वत्र भ्रांतिजनक रात्र पडे ।
त्रोजन रण सोडोनी देतिल हें पाहुं जर अजून घडे ॥ ३९ ॥
मग घेऊं ओढुनियां नौका जालिं सकल तेवढ्या कालीं ।
टाळायातें संकट पळत्याला लाज कोठुनी आली ! ॥ ४० ॥
रात्रींच्या समयीं तर उचित नरा सर्वथा पलायन रे ! " ।
पळणें बरवें; होणें अरिकरगत रणिं परन्तु कधिंच न रे ! ॥ ४१ ॥
युलिसीस सुज्ञ बोले वचन तया पाहुनी तिरस्कारें ।
" कां एत्रिअसज गेली वाणी ही सोडुनी त्वदोष्ठां रे ॥ ४२ ॥
नष्टा ! होई नायक जावोनी सारहीन सैन्याचा ।

आह्मां तूं अधिप नको, आह्मांवर लोभ अमित जोव्हाचा ॥ ४३ ॥
त्यानें आह्मां केलें सोसक वृद्धांस आणि तरुणांस ।
कष्टद रण करुं आधीं नंतर आव्हान देउं मरणास ॥ ४४ ॥
आह्मीं यदर्थ केले कष्ट बहू त्राय तें त्यजा ह्मणसी ! ।
सेवून मौन राहीं ! कां हें ग्रीकांस वचन ऐकवसी ! ॥ ४५ ॥
असलें वचन नराच्या निर्गत होऊं नये मुखांतून ।
काम न हें सुज्ञाचें, ज्ञानानें इतर ज्याहुनी न्यून ॥ ४६ ॥
मग दण्डधर नृपाची गोष्ट नको ज्यास बहुत जन मानी ।
ग्रीकांनीं तर तुजला मानियलें खचित आज सकलांनीं ॥ ४७ ॥
बोलुन दाखविलेंसी मत त्याचा मी निषेध करिन अज ।
चाले रण तों कथिसी नौका जलधींत लोटण्यास मज ॥ ४८ ॥
ह्मणजे त्रायस्थांचे पूर्ण मनोरथ अधीक होतिल ते ।
मिळुनी विजय तयांतें, होइल अमुचें अनिष्ट मग भलतें ॥ ४९ ॥
जलधींत लोटतानां नौका हे ग्रीक रण न करतील ।
लागून लक्ष्य मागें देतिल सोडून समर दुःशील ॥ ५० ॥
मग तूझा जननायक ! सकलां उपदेश फार जांचेल " ! ।
अगमेम्नन नृवर वदे " तूझें युलिसीस वच न सोसेल ॥ ५१ ॥
मर्मा भेदित गेलें; इच्छा नसतां न धरिन आग्रह हो !
नौका लोटुं नका; परि, उपदेशाची उणीव येथ न हो ॥ ५२ ॥
वृद्धें वा तरुणें अज केला जर याहुनी अधीक बरा ! ।
दुःख न होइल मजला होइल चित्तास मोद उलट खरा " ॥ ५३ ॥

दायोमीद तयाला बोले रणशूर " हा पहा नर तो ।
दूर नको शोधाया, उपदेशें जर विचार तव फिरतो ॥ ५४ ॥
दोष न द्या ! व्हा न कुपित ! कीं सर्वांहुन लहान येथ असें ! ।
परि तात जन्म घेई थोर कुलीं गर्व हा मनांत वसे ॥ ५५ ॥
थीबीं त्या मत्ताता मातीचा ढीग आज झांकितसे ।
प्रोथ्यूसा तीन तनय झाले लोकप्रसिद्ध शूर तसे ॥ ५६ ॥
प्ल्यूरनिं वास तयाचा कधिं कालीं तुंग कालिदनिं झाला ।
मेलास आग्रिअस आणि तैसा तो ईनियुस तृतीय भला ॥ ५७ ॥
हाच पितामह माझा शौर्यें होता जनांत विख्यात ।
स्वपुरीं राहतसे हा निर्वासन दुःख सोशि परि तात ॥ ५८ ॥
अर्गासीं वास करी, इच्छा जोव्हादि सर्व अमरांची ।
अद्रास्तसदुहिता ती भार्या याची सुरेख लग्नाची ॥ ५९ ॥
त्याचा हर्म्य विभवयुत, शेतें शस्यद महान तीं विपुल ।
कळप पशूंचे अगणित, वृक्षांच्या वाटिका तशा अतुल ॥ ६० ॥
ग्रीकांत चतुर नव्हता शूली दुसरा रणांत विख्यात ।
तुह्मां हवें कळाया सारें हें जर असत्य नच यांत ॥ ६१ ॥
वदतों विचारपूर्वक नाहीं मी भीरु हीनकुल खास ।
मन मोकळें करोनी देतों मत तें न योग्य वादास ॥ ६२ ॥
या तर चला लढाया, क्षतकायां भाग हेच आह्मांस ।
शस्त्रांच्या आटोक्या राहुन बाहेर रक्षुं जीवास ॥ ६३ ॥
नाहीं तर क्षतावर होइल दुसरें भयप्रद क्षत तें ।

उत्तेजन देउनियां उत्साहें सैनिकां अणूं भरतें ॥ ६४ ॥
सुखवावयास जीवा रण विन्मुख दूर जे अतां बसले ’’ ।
ऐसें तो वदला तें समजाया लक्ष्य यानिं बहु दिधलें ॥ ६५ ॥
वचन प्रमाण मानुनी चालुन जाया त्वरा करिति सर्व ।
अगमेम्नन नृपति तयां नेत रणीं सोडुनी अतां गर्व ॥ ६६ ॥
पृथ्वीकंपक नव्हता पाहत हें लक्ष्य सोडुनी सकल ।
गेला यांशीं होउन वृद्ध जयाची तनू जराविकल ॥ ६७ ॥
अगमेम्नन नृपतीचा उजवा कर धरुनियां तया वदला ।
“ हे एत्रिअसज आतां अकिलीसा होतसेल हर्ष भला ॥ ६८ ॥
त्याचें हृदय अमर्षण; नाहीं अल्पहि तया दया माया ।
डोळे निवतिल त्याचे ग्रीकां पाहुन मृतां व पळत्यां यां ॥ ६९ ॥
मरुंदे असाच याला ! याची शोभा अशीच देव करो ! ।
देवांचा तुजवरचा असला तर कोप आज सर्व सरो ॥ ७० ॥
त्रोजननायक आतां समरतलीं धूलिपटल उठवून ।
पळतां नौदेशाहुन पडतिल दृष्टिस तुझ्या इथें दुरुन ॥ ७१ ॥
ऐसें बोलुन तेणें केला रणि जावयास रणनाद ।
नवगुणित सहस्रांच्या रणघोषाची न या पुढें दाद ॥ ७२ ॥
साधे न दशसहस्रां, ऐसें नेपचून आज ओरडला ।
संग्राम कलह करण्या ग्रीकां उत्साह फार हृदयिं अला ॥ ७३ ॥
हैमासन जूनोनें सारें हें बघितलें स्वनयनांनीं ।
आलिम्पसावरोनी बन्धूतें ओळखी मुदें मानी ॥ ७४ ॥

याचें होतें नातें दीराचें याशिवाय तें हिजशीं ।
श्रमतो रणिं इष्ट गमे, जोव्हद्वेष्टीस तृप्ति होत तशी ॥ ७५ ॥
पाहे तों जोव्ह दिसे बसलेला तिज इदाद्रिच्या शिखरीं ।
जोव्हालागीं कैसें फसविन हा ती विचार कठिण करी ॥ ७६ ॥
युक्ति तिला उत्तम ही सुचली कीं अज इदाद्रिवर जावें ।
उत्तम वेष करावा होइल जर लुब्ध जोव्ह तर बघावें ॥ ७७ ॥
रुचिरतनूशीं ऐशा पहुडावें शयनिं जर तया वाटे ।
होतां मग्न विलासीं, जावें साधून कार्य निज वाटे ! ॥ ७८ ॥
निद्राप्रयोग नंतर नयनपुटांवर करून टाकावा ।
तन्मन दक्ष, अनवहित होउन खासा जुळेल मग कावा ॥ ७९ ॥
वासगृहा ती गेली, रचिलें जें व्हल्कनें तिच्या तनयें ।
द्वाराग्रकाष्ठिं होती गुप्त कडी, उघडितां सुरां हि न ये ॥ ८० ॥
प्रविष्ट येथुन होउन लावी ही द्वार गच्च चकचकित ।
परिमलयुत पीयूषें स्नात करी देह आपुला ललित ॥ ८१ ॥
आणि सुधामय लावी तनुला अनुलेपनें सुवासिक तीं ।
सौख्य तियेला झालें दुमदुमतां वास मंदिरांत अती ॥ ८२ ॥
पित्तलमयभूमीच्या जोव्हायतनांत सुटुन सौरभ तें ।
द्यौ पृथ्वी हीं दोन्हीं भरुनी सर्वत्र जाहलें घुमतें ॥ ८३ ॥
सामोद द्रव्यांनीं करुनी अनुलिप्त केश विंचरि ते ।
स्वकरें शिरिंच्या अलकां अमृतमयां मग जपून सांवरि ते ॥ ८४ ॥
थोर सुधासुखद झगा नेसोनी निज कलेवरा झांकी ।

ज्या सूचिकर्मचतुरा थोर मिनर्वा शिंवी पुरा नाकीं ॥ ८५ ॥
केलें ज्यावरतिं तिनें सुन्दर विणकाम वेलबुट्टीचें ।
हेमाच्या बंदानी होता तो बद्ध उरिं सजे तीचे ॥ ८६ ॥
गुंडाळी निज कटिला रशना जिस शोभतात रुंद दशा ।
घाली सविद्ध कर्णीं आणुन भूषा त्रिरत्न जडित अशा ॥ ८७ ॥
सौष्ठव किति तनुला ये ! पांघरितां विरल वरुनियां वसन ।
रविच्या समान उज्ज्वल सुन्दर नवघटित वेधि जें नयन ॥ ८८ ॥
घाली पदीं वहाणा, येई बाहेर अशि कृताभरणा ।
इतर सुरांतुन काढुन व्हीनसला पुसत धरुन आढ्यपणा ॥ ८९ ॥
" प्रियवत्से ! करशिल का जें कांहीं कार्य तुजसिं सांगेन ।
कीं अपुली रुसशिल तूं करण्याचें आणुनी मनीं तें न ? ॥ ९० ॥
ग्रीकांची मीं वाली त्रायस्थांची रणांत जाशि असशी " ।
तिजला व्हीनस बोले जोव्हसुता " सांग काय तें मजशीं ॥ ९१ ॥
सॅतर्नजे ! तुझें मीं, हे जूनो ! कां न वचन मानीन ? ।
साध्य जनां शक्य मला असलें करणीय कार्य तर करिन " ॥ ९२ ॥
देवी जूनो वदली धरुनी स्वमनांत कपटभावाशीं ।
" सुरनर करशी जेणें जित, तो मोह सुभग दे माशीं ॥ ९३ ॥
पृथ्वीप्रान्तीं जातें जेथें सुरजनक ओशिअनस वसे ।
मजला वाढवणारी टेथिस माता अतां तिथेंच असे ॥ ९४ ॥
पृथ्वी अणखी सागर यांच्या खालीं प्रक्रुद्ध जोव्हानें ।
सॅतर्नातें दिधलें लोटुन पूर्वीं प्रचण्ड वेगानें ॥ ९५ ॥

ऱ्हीएंतुन तंव्हा मीं येता मजला हिनेंच बाळगिलें ।
केलें सज्ञान मला त्यां अज भेटावयास मनिं अणिलें ॥ ९६ ॥
मोडुन येतें त्यांचे दोघांचे कलह रोजचे बाळे ।
आलिंगनविधि कुठला ! त्यांचे पर्यंक जर निरानिराळे ॥ ९७ ॥
इतका रुसवा यांचा मृदुलवचें घालविन करुन समजी ।
प्रीतिसमागम यांचा आणिन घडवून एक शयनिं अजी ॥ ९८ ॥
होईन मीं तयांतें दोघातें पूज्य आणि आवडती " ।
हास्यप्रिय ती व्हीनस झाली याच्या पुढें असें वदती ॥ ९९ ॥
" जी तूं निद्रा घेशी जोव्हाच्या सर्वशक्ति बाहुवरी ।
त्या तूझ्या विनतीचा भंग नसे उचित होय शक्य तरी" ॥१००॥
काढी स्तनांशुकांतुनि व्हीनस ती बुद्दिदार मग रशना ।
चित्राग जी सदोदित सत्वर फसवी नरां व अमरांना ॥ १०१ ॥
*चित्ताकर्षक सारे होते गुण हींत नित्य भरलेले ।
काम, प्रीति, चतुरवच, सहज विमोहन जगांत जें पहिलें ॥१०२॥

---

* पोप महाराजांनीं एकीच्या तीन आर्या होतील असें भाषांतर केलें आहे.
चित्ताकर्षक सारे होते गुण हींत नित्य सारमय ।
संकल्प सौम्य, तैसें प्रेमाचें वेड, शाठ्य तें सदय ॥ १ ॥
औत्सुक्य विलासांचें, जागृत तो दाह सतत देहाचा ।
हृदयग्राही वाणी आणी विश्वास सानुनय साचा ॥ २ ॥
मौन करी जें भाषण, तें वाक्सामर्थ्य आणि नयनांचें ।
जाईल कां न यांनीं तें औदासीन्यही विरक्तांचें ॥ ३ ॥

सुज्ञ नराचें मनही येतें न्यायास चोरुनी यांनीं ।
तीच्या करिं ठेवोनी बोले ही तिजशिं मधुर शब्दांनीं ॥ १०३ ॥
" घे ही स्तनांशुकीं तव ठेवावी सर्वसंग्रही रशना ।
होईल इष्टसाधन, इच्छा धरिल्यास जरि मनीं नाना " ॥ १०४ ॥
ऐसें ती वदली मग, जूनो हंसली विशालनयना ही ।
ठेवी स्तनांशुकीं ती, व्हीनस जाई गृहास लवलाहीं ॥ १०५ ॥
आलिम्पसावरोनी जूनो सत्वर निघे सहर्ष तदा ।
पायेरिआ वलांडी आणि ती ईमेथिआ तशी फलदा ॥ १०६ ॥
पर्वततुंग हिमावृत मार्गीं थ्रेसांत लागले तिजला ।
तच्छृंगावरुन पळे पायीं स्पर्शी तदा न भूमितला ॥ १०७ ॥
एथासाहुनि आली उतरोनी फेनयुक्त जलधीशीं ।
तेथुन थोआसपुरा लेम्नासा लावितां न अवधीशीं ॥ १०८ ॥
मृत्यूचा बन्धु तिला भेटतसे स्वाप त्या धरून करें ।
बोले " हे स्वाप ! अजी असशी तूं ईश सुरनरांचा रे ॥ १०९ ॥
परिसें विनंति माझी वळुं दे तव चित्त अल्प आज तरी ।
त्वत्कृति कृतज्ञतेनें अठविन मागून खचित जन्मभरी ॥ ११० ॥
माझा प्रीतिसमागम, जोव्हाशीं आज जाहल्या वरतिं ।
त्याच्या उज्वल नयनां ठेव पुटीं मिटुन घट्ट नीट अति ॥ १११ ॥
अविनाशी हैमासन अर्पिन तुजला न लावितां उशिर ।
भूषवितां जें माझ्या तनयानें व्हल्कनें दिसे रुचिर ॥ ११२ ॥
तें पादपीठ देइन मीं तुज, ठेवून पाय त्या वरतीं ।

मानेल मनाला तेव्हां पुरवीं अन्नाशनावरील रति" ॥ ११३ ॥
*मधुर स्वाप वदे तिस, " जूनो ! सॅतर्नजे अगे देवि ! ।
इतरा अमरा कोणा निद्रा आणीन सांगशिल तेविं ॥ ११४ ॥
सकलांचा उत्पादक ठाउक कोणास उदधि जलमय न ।
जवनौघा त्याच्या ही निद्रा आणीन यांत संशय न ॥ ११५ ॥
जाया परि न शकें मीं नुसता सॅतर्ननंदना जवळ ।
निद्रा कैंचि अणिन मग; त्याच्या आज्ञेविणें मला न बळ ॥११६॥
अधिंच तयानें मजला धास्ती घालून ठेविली आहे ।
हर्क्यूलीसें त्राया लुटिलें, तुज वृत्त विदित नच कां हें ॥ ११७ ॥
त्या समयीं जलमार्गें गेला तो दूर इलियमाहून ।
जोंव्हा तेव्हां निद्रा अणिली वर सेक सारखा करुन ॥ ११८ ॥
त्याच्या विरुद्ध होतिस चित्तीं योजित उपाय कपटाचे ।
जलधींत तीव्र वारे काय न ते उठविलेस जोराचे ॥ ११९ ॥
नंतर मित्रांतोनी त्यातें नेलेंस उचलुनी कासा ।
जागृत होउन कोपें तेणें अमरांस फेंकिलें सहसा ॥ १२० ॥
सर्वांहुन मजवरतीं रोष तयाचा, म्हणून सोधि मज ।
जलधिंत देता फेंकुन पातिता मजला क्षणांत कीं सहज ॥ १२१ ॥
जिंकी सुरां नरां ती राखी पळत्या निशा मला समया ।
आंवरि तो निज कोपा, इच्छीना तो निशेस दुखवाया ॥ १२२ ॥

---

*स्वापाचे हातून राक्षसांस संमोहित करण्याचें कार्य इंद्रानें योजिलें होतें.
निद्रां चोवाच गच्छत्वं राक्षसान्संप्रमोहय । रामायण.

आता मज तूं कथिशी फिरुनी हें भयदकृत्य करण्यास " ।
जूनो विशालनयना प्रत्युत्तर देतसे असें त्यास ॥ १२३ ॥
हे ! स्वाप ! आणिसी कां असले चित्तांत सांग कुविचार ।
समजसि का जोव्हाचा त्रायस्थांवरतिं कोप तो फार ? ॥ १२४ ॥
इक्र्यूलीसावरुनी वाटे का राग तुजवरी झाला ? ।
सौंदर्यदेवता मग देइन ती धाकुटी बरें तुजला ॥ १२५ ॥
रात्रंदिन तूं धरिशी जीचा अभिलाष ती तुला मिळतां ।
पासैथीआ प्रमदा, लावावें लग्न उशिर नच करतां " ॥ १२६ ॥
ऐसें ती वदली मग झाला स्वापास मोद मनिं भारी ।
उत्तर देई तिज " ये. स्तिक्षजलाची पवित्र शपथ करीं ॥ १२७ ॥
एका हस्तें स्पर्शीं सफल धरित्रीस, सागरा इतरें ।
होतील खालचे मग साक्षी सॅतर्नमुख्य सुर सारे ॥ १२८ ॥
मग धाकुटी मला तूं देशिल सौन्दर्यदेवता खचित
पासैथीआ माझी होउन देईल सौख्य मज अमित " ॥ १२९ ॥
ऐसें तो वदला मग जूनो वच मान्य करित धवल करा ।
घेई तो सांगे ती शपथ तदा स्मरुन मुख्य त्या अमरां ॥ १३० ॥
तार्तारसभागाच्या खालीं वसतात अमर जे तितन ।
त्यांच्या नांवानें ती शपथ करोनी करीत तीं गमन ॥ १३१ ॥
ईंब्रस, लेम्नास पुरें सोडुन येती इदाद्रिशिखरास ।
अभ्रावृत राहोनी मग बघति सरिझयप्रदेशास ॥ १३२ ॥
ही जन्मभूमि मोठ्या वन्य पशूंची प्रसिद्ध लोकांत ।

मग लेक्तसात आली. तें स्थल सोडून सागरा जात ॥ १३३ ॥
भूमीकडेस वळती पदभारें विपिनशिखरही हाले ।
चुकवाया जोव्हाची दृष्टि, पुढें स्वाप मार्ग नच चाले ॥ १३४ ॥
वाढे इदाद्रिवरतीं तुंग तरू एक देवदारूचा ।
जलदांला जो भेटे गर्वानें भेद करुन वायूचा ॥ १३५ ॥
त्या वरतीं हा चढुनी; घनशाखापटलिं न च दिसे लपतां ।
पर्वतवासि खगाचें रूप धरी, जो सुरांस आवडता ॥ १३६ ॥
ह्मणती ज्या सुर कालिसस, नर देती नाम ज्या सिमिन्दिस तें ।
जूनो इदाद्रिशिखरा जातां गार्गेरसा, पतिस दिसते ॥ १३७ ॥
तिज बघतां क्षणिं पडली कामाची तन्मनावरी च्छाया ।
प्रथम प्रीतिसमागमकालिं जशी ती तशीच या समया ॥ १३८ ॥
शय्यारोहणविधिला होतें मत तेधवां न पितरांचें ।
तीच्या पुढें उभा अजि राहुनियां तीस बोलला वाचे ॥ १३९ ॥
" आलिम्पसावरोनी जूनो ! घाईंत येथ कां येसी ? ।
रथ नाहीं हय नाहीं, व्हाया आरूढ काय गे घेसी ! " ॥ १४० ॥
कपटोपायां चिंतुनि जूनो उत्तर तयास देत असे ।
"पृथ्वीप्रान्तीं जातें जेथें सुरजनक ओशिअनस वसे ॥ १४१ ॥
मजला वाढवणारी टेथिस माता अतां तिथेंच असे ।
त्यां भेटाया माझें होइल उत्सुक न चित्त आज कसें ? ॥ १४२ ॥
मोडुन येतें त्यांचें दोघांचे कलहयुक्त ते चाळे ।
आलिंगन विधि कुठला? त्यांचे पर्यंक जर निरानिराळे ! ॥ १४३ ॥

एकामेकांवरतीं यांचा आहे असा बरें रुसवा ।
स्रोतोयुक्त इदातलिं ठेवियले अश्व जावया थकवा ॥ १४४ ॥
आलिम्पसावरोनी आज अलें ध्यावयास तव मत रे ।
भेटेन ओशिअनसा त्याविण, होशील कुपित तर न बरें" ॥१४५॥
* घनवाहक जोव्ह वदे " जूनो जाशील तेथ इतक्यांत ।
परि ये! शयनीं पडुनी होऊं ये मग्न अधिं रतिसुखांत ॥ १४६ ॥
झाल्या सुरांगना त्या, झाल्या त्या मानवांगना पाहीं ।
त्यांनीं मद्हृदयावर केलि असे प्रेमवृष्टि कितिकांहीं ॥ १४७ ॥
तेव्हां परन्तु इतका झालों जित गे कधींच मीं नाहीं ।
इक्सायनभार्येवर झालों मीं लुब्ध फार लवलाहीं ॥ १४८ ॥
पिरिथौस तिला झाला मागुन सुरसुज्ञ चांगला तनय ।
दानाईवर आला आक्रैशिअसात्मजेवरी समय ॥ १४९ ॥
झाला पर्श्यूस तिला पुत्र बहु ख्यात सर्व लोकांत ।
फिनिक्ससुतेवरतीं झालों आसक्त अल्प कालांत ॥ १५० ॥
न्हादामान्थस मैनस या दोघां जन्म मग तिनें दिधला ।
सेमीली मनिं भरली आल्क्मीना लावि मजसिं नाद भला ॥ १५१ ॥
दे जन्म बाकसातें पहिली स्त्री जेधवां अला समय ।
हर्क्यूलीस दुजीच्या उदरीं विक्रान्त ये तसा तनय ॥ १५२ ॥
भुलवी सीरीस तशी लातोना, तूंहि भुलविलेंस मज ।

---

* जोव्ह वदे त्या कार्या कुठला तरि इतर दिवस तूं साधीं ।
सोत्कंठ प्रेमाला सोसेना क्षणभरी विलंब कधीं ॥ पोप.

कालीं या सर्व परी नव्हतें औत्सुक्य आजचें समज ॥ १५३ ॥
प्रणयातुर तुजवर मी सुरस मला काम आज तो ग्रासी " ।
देवी जूनो बोले हृदयीं योजून थोर कपटासीं ॥ १५४ ॥
" निष्त्रप सॅतर्नज ! हे ! तोंडांतुन शब्द काढिसी कसला ! ।
शयनींचा धरिलासी या स्थलिं तूं रतिसुखाभिलाष भला ॥ १५५ ॥
हें शिखर इडागिरिचें उघडें ! येथें मनांतलें न घडे ।
अमुची निद्रावशता कोणाच्या दृष्टिला न काय पडे ! ॥ १५६ ॥
आणि इतर सुरांना जाउन सांगीतलें तयें तर रे ! ।
शयनोत्थिता कशी मीं जाऊं हर्म्यांत तव इथून बरें ॥ १५७ ॥
तें सर्वथैव अनुचित ! अणिलेंसी तेंच परि मनीं जर तूं ।
जर तेंच तुजसिं माने व्हल्कनकृत शयन मंदिरांत रतूं ॥ १५८ ॥
केलिं सुरक्षित दारें पुत्रें लावून थोर अडसर ते ।
कण्ठाश्लेषप्रणयी तूं तर चल तेथ हें बरें दिसतें " ॥ १५९ ॥
घनवाहक जोव्ह वदे " हे जूनो ! तुज नको बरें भय तें ।
सुर वा नर वा कोणी पाहिल हें आणिसी मनीं भलतें ॥ १६० ॥
ऐसा सुवर्ण घन मीं पसरुन टाकीन भोंवतीं छान ।
×कीं त्यांतुन तीव्रनयन रवि हि बघाया शकेल आतां न" ॥१६१॥

× पराशर व सत्यवती यांची कथा महाभारतांत आहे. अशा प्रसंगीं पराशरानें असेंच धुकें उत्पन्न केलें होतें.

दिव्यज्ञान मुनि ह्मणे " सुंदरि मज अङ्गसंग दे; हरितें ।
त्वद्रूप मन्मनातें; कामज्वर नुरवि तिळहि देह रितें " ॥ १ ॥

ऐसें बोलुन जोव्हें, वेढियलें बाहुवलयिं कान्तेसीं ।
दिव्य धरेनें घाइंत ठेवियलें रचुन पर्णशय्येसीं ॥ १६२ ॥
हिमसिक्त सरसिजांनीं मार्दवयुत पीतशा कुसुंभांनीं ।
+शय्या उभारिली क्षणिं कितिकांनीं नील पीत पुष्पानीं ॥१६३॥
हिजवरतीं तीं पडलीं. झांकी त्यांलागिं मग सुवर्ण घन ।
हिमबिन्दुसेक निर्मल गाळुनि करि सिक्त सहज सुखशयन ॥ १६४॥
गार्गेरस शिखरावर निद्रित मग जाहला असा तात ॥
कवटाळी भार्येसीं निद्रा प्रेमाभिभूत हस्तांत ॥ १६५ ॥
मधुर स्वाप निघाला ग्रीकांच्या थोर नौप्रदेशाला ।
नेप्चूना त्या ठायां धांवत जाउन निरोप कथण्याला ॥ १६६ ॥
जवळ उभा राहोनी बोले त्या चतुर शब्द आतां हे ।
" नेप्चूना ! आतां तूं ग्रीकां साहाय्य देउनी पाहें ॥ १६७ ॥
कांहीं वेळ तरी त्यां देईं यश, जोव्ह सुप्त जों राहे ।
निद्रावगुंठनें अज वेढुन मी ठेविलें तया आहे ॥ १६८ ॥
जूनोनें त्या केलें ठकवोनी प्रेमसुप्त या समया " ।

ती त्यास ह्मणे " दोहीं तीरीं सर्वत्र विप्र आहेत ।
दिवसा रविप्रकाशीं, तुमचा कैसा घडेल हा हेत ? " ॥ २ ॥
करि अंधकार तेथें, निर्मुनि तो योगिराज नीहार ।
त्यावरुनि, मनिं ह्मणे ती, दुर्लभतर होय हा जनीं हार ॥ ३ ॥

मोरोपंत.

+ मिल्टन कवीनें **आदम** व **ईव्ह** यांच्या वैवाहिक लतामण्डपांतिल पुष्पशय्येचें वर्णन असेंच केलें आहे. पॅराडाईस लॉस्ट पुस्तक ४ थें पहा.

ऐसें बोलुन समरीं इतरां वीरास जाइ भेटाया ॥ १६९ ॥
ग्रीकांस चेतवाया नेप्चूना अधिक देतसे धीर ।
समरशिरीं येवोनी प्रार्थियले ग्रीक जमवुनी वीर ॥ १७० ॥
" ग्रीकांनों! प्रायमजा देतों जय अर्जुनही हेक्तरास ।
नौका धरुनी ह्मणजे त्यानें न्यावें हरून सुयशास ॥ १७१ ॥
वाटे त्यास असेंची, करि तो गर्वोक्ति तीस कारण तें ।
अकिलीस नौप्रदेशीं बसला. तद्हृदय कोपमय जळतें ॥ १७२ ॥
आह्मीं बाकीचे जर देऊं साहाय्य एकमेकांस ।
नाहीं खचित तयाचें आतां पडणार कार्य आह्मांस ॥ १७३ ॥
परि या करा कथिन जें, ढाली घ्या थोरल्या अतां स्वकरीं ।
उत्तम जे नामांकित मोठाले वीर ते चला समरीं ॥ १७४ ॥
कवचें भासुर शिरिं तीं भाले ज्यांचे करांत आयत ते ।
समरशिरीं मीं येइन; हेक्तर पाहील वाट नच गमतें ॥ १७५ ॥
दुर्दम जो वीर रणीं असुनी धरितो लहान करिं ढाल ।
तेणें ती भीरूतें देउनियां घ्यावि करिं दुजि विशाल " ॥ १७६ ॥
ऐसें तो वदला; हें घेती ऐकून देउनी कान ।
आज्ञा प्रमाण मानिति राजे, जन थोर आणखी सान ॥ १७७ ॥
अगमेम्नन एत्रिअसज, अणि तो युलिसीस तैदिअसज तसा ।
सैन्याचा व्यूह रचिति, अंगें क्षत गणति आपुलिं न सहसा ॥ १७८ ॥
सारे शोध कराया फिरती सैन्यांत वीर सर्वभरी ।
शस्त्रें पालटती मग, घेती जे शूर ते विशाल करीं ॥ १७९ ॥

न्यूनबलातें देती वाइट, आणि सज्ज सकल होत जन ।
जाती चाल करोनी; राही नेप्चून समरशिरिं जवन ॥ १८० ॥
भयदकरीं गच्च धरी वज्रासम कठिण एक तलवार ।
जिस थबके अरि पाहुनि नाश करी बहु जिचा प्रबल वार ॥१८१॥
त्रोजन वीरांच्या तों हेक्तर लावीत पंक्ति मग इकडे ।
नेप्चून नीलकेशी हेक्तर हे उभय करिति रण निधडे ॥ १८२ ॥
ग्रीकांतें पहिल्यानें, दुसऱ्यानें त्रोजनांस भर दिधली ।
ग्रीकांच्या नौदेशीं तंबुवरी जलधिवीचि आदळली ॥ १८३ ॥
आरोळी उभयदलीं उठली या समयिं फार जोराची ।
होत्ये न गर्जना अशि तीरस्पर्शें कधीं समुद्राची ॥ १८४ ॥
तो चण्डवेग वाहे ज्या समयीं वात बोरिआसाचा ।
पर्वतदरिंत न उठतो पटपट रव एविं वन्य अनलाचा ॥ १८५ ॥
पवन न निर्घोष करी तेथ असा ओकवृक्षपर्णचयीं ।
जेथ विशेष तयाचा होत असे वेग सर्वदा विजयी ॥ १८६ ॥
ग्रीक त्रोजन ऐशी आरोळी उठविती प्रचण्ड रणीं ।
आणी अन्योन्यांवर घुसुनी अति भयद दाविती करणी ॥ १८७ ॥
भाल्याचा प्रथम धरी आजक्षावरतिं नेम हेक्तर तो ।
होता दक्षिण बाजुस, याचा हा नेम परि न अजि चुकतो ॥ १८८॥
ढालीचा बंद जिथें असिच्या बंदावरून वरि जात ।
शस्त्र तिथें लागे परि बंदांनीं चर्म रक्षिलें आंत ॥ १८९ ॥
हेक्तर कोपा चढला हस्तांतुन शस्त्र सुटत कीं फुकट ।

मित्रसमूहीं परतुन गेला चुकवावया मरण विकट ॥ १९० ॥
नौकांतें टेंकावे द्याया बहु दगड तेथ अणलेले ।
पायांखालिं चमूच्या लोळति किति तें न आज गणलेलें ॥ १९१ ॥
पळत्या वधण्या यांतिल आजक्षें उचलिला भला दगड ।
ढालीच्या मध्यावर मानेशीं हाणिला बराच जड ॥ १९२ ॥
गरगर दगड फिरे तो, निसटुन तेथून भूवरी सभर ।
जोव्हाचें वज्र तसें पडतां सर्वत्र करित अपकार ॥ १९३ ॥
आघातें तरुवर ही ओक पडे क्षणिं समूळ भूमिवर ।
दुर्गन्धि गन्धकाची सुटतां उद्भ्रान्तचित्त होत नर ॥ १९४ ॥
बलवन्त हेक्तराची स्वारी धूळींत आशिच मग पडली ।
शूल गळाला करिंचा, ढाल शिरस्त्राण तनुवरी नुरलीं ॥ १९५ ॥
चित्रित कवच तयाचें पितळेचें पडुन वरतिं खणखणलें ।
ग्रीकांचे पुत्र तसे आरोळी मारुनी पुढें घुसले ॥ १९६ ॥
या ओढाया बघती, शल्य वरी फेंकिती असंख्यात ।
लांबून शक्य नव्हतें, जवळुन मारावया न हे धजत ॥ १९७ ॥
जननायका सभोंवतिं जमले परि वीर धीर ते फार ।
तो ईनिआस पहिला लिसिअननृप सर्पिदन, आजिनार ॥ १९८ ॥
ग्लाकस होता तेथें, होता तो वीर पालिदामास ।
त्यजिलें नच अन्यांनीं, ढालीच्या आड रक्षिती त्यास ॥ १९९ ॥
संग्रामांतुन याला नेलें उचलुन करीं सहचरांनीं ।
रण पश्चाद्भागीं तंव त्याचे हय सज्ज पाहिले यांनीं ॥ २०० ॥

चित्रस्यंदन होता, होता तेथें:तसाच तो सूत ।
*नगरातें त्या नेती, दुःखें कण्हतो, व्यथेस ये ऊत ॥ २०१ ॥
जोन्होत्पन्ना झान्थस वाहे सावर्त दीर्घ वेगानें ।
तिजला एका ठाया होता झाला उतार दैवानें ॥ २०२ ॥
स्यंदन तेथें येतां घेती ते उतरुनी तया खालीं ।
त्यावरतीं सिंचिति जल, सोडी तो श्वास, शुद्धि त्या आली ॥२०३॥
डोळ्यांनीं वरतिं बघे, गुडघे टेंकोनियां उभा राहे ।
ओके अशुद्ध भारी, खालिं पडे त्या न वेदना साहे ॥ २०४ ॥
नयनांच्या पटलावर तत्क्षणिं फिरुनी तमस्विनी पसरे ।
कारण शस्त्राघातें होउनियां शक्ति विजित सर्व सरे ॥ २०५ ॥
हेक्तर जातां बघुनी **ग्रीक** तदा **त्रोजनांवरी** पडले ।
युद्ध मनावर घेवुनि पुढतीं झुंझार वीर बहु घुसले ॥ २०६ ॥
आजक्ष ओइलीअन भाला करिं घेत देवदारूचा ।
क्षत करि देह उडीनें ईनप्साच्या उदार सूनुचा ॥ २०७ ॥
विख्यात **सात्निअस** तो घाली ज्या **नाइआद** जन्माला ।
या जलदेवीसंगें जनक तदा **सात्निओतटीं** रमला ॥ २०८ ॥
मेंढ्या राखित असतां दोघांवर हा भला प्रसंग अला ।

पंतांनीं थोडी भर घालून अश्वांस शाबासकी दिली आहे.

* घेवूनि रथ पळाले **भी**ष्मशरत्रस्त वातसे वाजी ।
घडली त्यांसि पतिचीं चुकवुनि तो प्राणघात सेवा जी **मोरोपंत.**

यांच्या तनया मारी सात्निअसा ओइलीअसज भाला ॥ २०९ ॥
कुक्षींत वार झाला समरीं तो ऊर्ध्वमुख तदा पडला।
ग्रीक त्रोजन यांच्या भोंवतिं जमले प्रसंग घोर अला ॥ २१० ॥
सूड तयाचा घ्याया पॅन्थौसज येत पालिदामास ।
प्रार्थोईनारातें मारी आरीइलोकससुतास ॥ २११ ॥
भाला स्कंधांतोनी दीर्घ तदा पार निघुनियां जात ।
धूळींत वीर पडला धरुनी धरणीस पसरुनी हात ! ॥ २१२ ॥
विजयें गर्व करोनी बोले अरडून पालिदामास ।
" वैय्यर्थ्य शस्त्र नंच दे, वाटे, पॅन्थौसतनयहस्तास ॥ २१३ ॥
ग्रीकानें कोणि तरी त्याचा स्वीकार पाहिजे केला ।
त्याच्यावर टेंकुन तो प्लूतोधानीस वाटतो गेला " ॥ २१४ ॥
ऐसें तो वदला मग झालें ग्रीकांस दुःख जीवास ।
गर्वोक्ति झोंबली त्यां, तेलामनजा विशेष वीरास ॥ २१५ ॥
हा होता जवळ उभा मारी भाला तयास जात्यास।
तिरका वळुनी चुकवी मरणभया तेथ पालिदामास ॥ २१६ ॥
परि आर्चिलोकसाला घाय बसे अन्तिनारतनयाला ।
भवितव्यतेस याच्या अमरांनीं घातिलें विनाशाला ॥ २१७ ॥
अन्तिम अस्थि असे तें जेथें त्या थोर पृष्ठवंशाचें ।
मानेचें अणि जेथें होतें संधान उत्तमाङ्गाचें ॥ २१८ ॥
तेथं घाव करोनी स्नायु तयें दोन तोडिले अगदीं ।
पडतां मुइस स्पर्शिति मुख, शिर, नासापुटें अधीं जलदी ॥ २१९ ॥

भूस्पर्श मागुनी मग होई गुडघ्यांस आणि पायांस ।
आजक्ष वदत नंतर करुनी संबुद्ध पालिदामास ॥ २२० ॥
" करुनी विचार सांगें सत्य असे तेंच पालिदामास ! ।
प्राथोईनाराच्या बद्दल बलि उचित हा वधायास ॥ २२१ ॥
मज गमतें भीरु न हा भीरूंच्या वंशिंजन्म नच याचा ।
वंश तयाचा दिसतो साम्यानें खचित आन्तिनाराचा ॥ २२२ ॥
त्या हयदमनाचा कीं वाटे हा सुत असेल वा भ्राता " ।
ऐसें हा वदला परि होता ठावा तयास हा पुरता ! ॥ २२३ ॥
त्रोजन दुःखित झाले आकामास प्रसिद्ध घे भाला ।
बन्धूच्या वाटोळा फिरतां शस्त्रास फेंकिता झाला ॥ २२४ ॥
बेओशिअना केलें तेणें प्रोमाकसास घायाळ ।
कारण होता ओढित बन्धूतें पाय धरुन जणुं काळ ॥ २२५ ॥
आकामास करी वच अरडोनी मग सगर्व विजयानें ।
" ग्रीक धनुर्धर परिसा ! तृप्ति न तुमची बिभीषक वचानें ॥ २२६ ॥
दुःख श्रम होतिल हो आह्मातें एकल्यां न जाणावें ।
अस्मच्छस्त्राघातें मरण बहूतांस सहज हें यावें ॥ २२७ ॥
मच्छूलविजित कैसा प्रोमाकस सुप्त हा पहा झाला ।
भावाच्या मरणाचें उसनें का फेडवे न भावाला ! ॥ २२८ ॥
ह्यायास सूड मागें बन्धु असावा ह्मणून सकलांस " ।
ऐसें तो वदला परि झालें ग्रीकांस दुःख जीवास ॥ २२९ ॥
पेनील्यूसाचें अति या वेळीं चित्त खवळुनी जाय ।

आकामासावरि तो घुसला. निसटे परन्तु अनपाय ॥ २३० ॥
फोर्बासस्रुता झाला इलिओन्यूसास घोर बहु वार ।
पशुसंपत् बहु याची, आवडता मर्क्युरीस हा फार ॥ २३१ ॥
त्यानें दिधली ह्मणुनी मोठी संपत्ति विपुल ती यातें ।
जननी ऐशा प्रसवे एकुलत्या एक शूर तनयातें ॥ २३२ ॥
भ्रूच्या थोडा खालीं नयनांच्या खोल त्या खवाटींत ।
वार तयाला झाला बुब्बुळ बाहेर पडत मातींत ॥ २३३ ॥
नेत्रांत शूल शिरुनी डोक्यांतुन पार निघत बाहेर ।
दोन्ही कर ताणोनी वीर बसे खालतीं अतां जेर ॥ २३४ ॥
पेनील्यूसें अपुली कादियली तीक्ष्ण दीर्घ तलवार ।
ग्रीवेच्या मध्यावर केला तेणें सवेग तो वार ॥ २३५ ॥
डोकें तुटुनी खालीं पडलें; होतें तसेंच कवच वर ।
भाला कठिण तयाचा नेत्रीं अडकून राहिला सभर ॥ २३६ ॥
पेनील्यूसें डोकें धरिलें उचलोनियां तसेंच करें ।
वाटे तत्करिं सजला अफिणीचा वृक्ष लवुन फलभारें ॥ २३७ ॥
त्रायस्थां तो बोले गर्वानें आरडोन मोठ्यानें ।
"मजसाठीं त्रोजन हो! सांगा जाऊन आज वेगानें ॥ २३८ ॥
इलिओन्यूसाच्या त्या सांगा जाऊन आज पितरांस ।
ह्मणजे तदर्थ करतिल रडुनी आकान्त थोर अज घरास ॥ २३९ ॥
प्रोमाकस भार्या ती आलीजीनार नृपतिची सून ।
येथुन घरास जातां पतिला भेटेल आज कोठून? ॥ २४० ॥

ग्रीकांचे पुत्र अम्हीं नौका येथून फुकट नेऊं न ।
काय दशा ही तुमची! " थांबे तो घोर वचन हें करुन ॥२४१॥
होउन विवर्ण सारे भीतीनें जन इथें तिथें बघती ।
टाळायास विनाशा पळण्या वाटा कुठें जरी असती ॥ २४२ ॥
आलिम्पसवासिनिनों ! वाग्देवीनों ! अतां मला सांगा ।
कवण्या ग्रीकांनीं हो ! लावियल्या लुटुन अज रणीं रांगा ॥ २४३ ॥
करित अवस्थांतर अजि धरणीकंपक बरेंच रणि सहसा ।
तेलामनजें केला आजक्षें वार थोर हिर्तिअसा ॥ २४४ ॥
मिसिअन नृप हा जाणा लोकीं विख्यात गिर्तिआससुत ।
फाल्कीसा मर्मरसा लुटिलें त्या आन्तिलोकसें बहुत ॥२४५॥
मारीत मारिसा अणि हिप्पोतिअनास मेरिआनीस ।
त्यूसर हस्तें मरती तेव्हां प्रोथौस, पेरिफीतीस ॥ २४६ ॥
हैपीरीनारातें नृवरा क्षत एत्रिअसज मग पाडी ।
अन्त्ररसातें प्याया शूला देहांत नेमका धाडी ॥ २४७ ॥
तेथुन आत्मा त्याचा हांकलितां क्षतमुखांतुनी गेला ।
नयनांवर तम पसरे ! नाश असा एत्रिअससुतें केला ! ॥ २४८ ॥
सुत ओइलीअसाचा घेई बहुतेक बलि रणीं अपणा ।
जोव्हें अरिस पळवितां त्या धरणें साधलें न इतर कुणा ॥२४९॥

सर्ग १५ वा.

आजक्षाचा पराक्रम.

जोव्ह जागा होतो व **त्रोजनांची** उडालेली दाणादाण पहातो. **नेप्चून ग्रीकांस** समरीं नेत आहे असें त्यास आढळतें. **जूनोनें** केलेलें कपट उमगतें. त्यास अत्यन्त क्रोध येतो. तो ती लीनपणें भाषण करून शमविते. **जूनो** देवसभेंत जाऊन **जोव्हाविरुद्ध मार्सास** चिथावणी देते. तो बंड करावयास प्रवृत्त होतो. **मिनर्वा** त्याची चांगली कानउघाडणी करते. इरिसमुखानें **जोव्ह नेप्चूनास** समरांतून निघून जाण्यास आज्ञा करतो. तो ती वंद्य मानून रणांतून चालता होतो. त्याचप्रमाणें **अपालोकडून हेक्तरास** पूर्ववत् क्षतरहित व सुदृढ करवतो. आपण पुढें होऊन **अपालो त्रोजनांकडून ग्रीकांच्या** तटांत भेद करवितो. ते आंत घुसतात. व नौकांस आग घालावयास उद्युक्त होतात तरीही **आजक्ष** त्यांचा संहार उडवितो.

कालमानः—मागील दिवस पुढें चालू,

स्थलमानः—नौप्रदेश व समुद्रतीर.

खंदकतर ओलांडुन गेले बहु दूर कृतपलायन ते ।
ग्रीकांच्या हस्तांनीं झाले जित कितिक शौर्ययुत जन ते ॥ १ ॥
रथसन्निध कितिक उभे भीतीनें त्यां विवर्णता आली ।
तों जोव्ह इदाशिखरीं जागृत होऊन पाहतो खालीं ॥ २ ॥
त्रोजन संभ्रमिं पडले, ग्रीकांनीं घातला धुमाकुळ तो ।
नेप्चून यांत होता. हेक्तर समरांत पडुनियां कण्हतो ॥ ३ ॥
सहचर भोंवतिं बसले बहु कष्टद लागला तया श्वास ।

शुद्धीवर नव्हता तो वमन करी मधुन कृष्ण रुधिरास ॥ ४ ॥
ज्यानें यातें केला वार न तो ग्रीक अगदिं लिचपिचित ।
सुरनर जनकाचें मन पाहुन य होतसे दयोपाचित ॥ ५ ॥
जूनोतें निर्भर्त्सक बोलत सक्रोध मर्मभिद्वाणी ।
" हे जूनो ! छलचतुरे ! दुष्टे ! केलिस अकार्य ही करणी ॥ ६ ॥
कपटोपायें तूझ्या, हेक्तर सोडून देतसे समर ।
पळताती दाहि दिशा त्याचे बघ हे पराक्रमी स्वार ॥ ७ ॥
कपटप्रबंधफल तुज भोगावें लागणार पहिल्यानें ।
न कळे मीं तुज लागीं देइन फटके जरी प्रतोदानें ॥ ८ ॥
आठवतें का तुजला ? ठेवियलें लोंबकळत आकाशीं ।
जड ऐरणी तदा मी बांधियल्या गच्च मृदुल पायांशीं ॥ ९ ॥
आणि कनकशृंखलेनें तव कर बांधून मृदुल करकटुन ।
जलदाकुल आकाशीं ठेवियलें तुजसिं उंच टांगून ॥ १० ॥
आलिम्पसवासिसुरां सकलां आली दया तुझी भारी ।
राहुन उभे सभोंवति, सोडवुं शकले तुला न कैवारी ॥ ११ ॥
ज्याला धरिलें त्याला फेंकियलें स्वर्गदेहलींतून ।
त्या श्वासकृच्छ्र होई पृथ्वीवरतीं बराच अपटून ॥ १२ ॥
हर्क्यूलीसनिमित्त क्रोध निवेना मदीय इतक्यानें ।
त्यातें विफल समुद्रीं फेंकियलें त्वां उगीच कपटानें ॥ १३ ॥
केलेंस महावाता वश आणी उत्तराभिमुख पवना ।
नंतर कासपुरा त्वां नेलें त्या विपथ करुन जलयाना ॥ १४ ॥

सोडविलें मीं त्याला, अर्गासा आणिलें तसें परत ।
कष्ट तयाला भारी काढावे लागले पथीं सतत ॥ १५ ॥
या गोष्टीची मी तुज करुनी देईन आज अठवण ती ।
ह्मणजे देशिल सोडुन कपटाची ही तुझी अशी रीती ॥ १६ ॥
तुजला हवें कळाया तत्त्व अतां अनुभवोनियां पीडा ।
कपटप्रयोगमूलक नडते सकलांस मंचकक्रीडा ॥ १७ ॥
दृष्टि सुरांची चुकवुन एकान्तीं दूर येथ आलीस ।
माझें भान हरवुनी क्षणभर संप्राप्तविजय झालीस " ॥ १८ ॥
ऐसें तो वदला परि, देवी जूनो विशालनयना ती ।
वदली सकंप त्याला सविनय करण्यास अभ्यर्थना ती ॥ १९
"व्हा ! हो ! साक्षी आतां धराणि ! स्वर्लोक ! अमित या कालीं ।
अणखी स्तिक्सजलानों ! साक्षी व्हावें अगाध पातालीं ॥ २० ॥
याहोनी सुख भाजां अमरां नाहींच भयद शपथ दुजी ।
तव पुण्य मस्तकाची शुद्धमनें शपथ घेतसें आजी ॥ २१ ॥
औद्वाहिक मंचाची शपथ कधीं घेत मीं नसें सहसा ।
त्याचीही शपथ अतां घेउन मीं स्पष्ट भाव करित असा ॥ २२ ॥
कीं नेप्चूनालागीं माझी अल्पहि चिथावणी नाहीं ।
त्रायस्थांतें छळतो वीराला समरिं हेक्तरालाही ॥ २३ ॥
त्यांच्या शत्रुंस करितो समरीं साहाय्य. मन तसें विनवी ।
अथवा आज्ञापोनी यातें तैसें करावया लावी ॥ २४ ॥
कारण नौभागीं त्या ग्रीकां संकटिं बघून हा द्रवला ।

उपदेशिन जाया या, कथिशिल जलवाह ! तेथ; कथिं मजला" ॥२५॥
ऐसें ती वदली तों सुरनर जनकास अल्प हास्य अलें ।
योजून तीव्र शब्दा तीतें उत्तर तयें असें दिधलें ॥ २६ ॥
"हे देवि ! दीर्घनयने जूनो तूं येथ अज सुरांत वस ।
मम चित्ताशीं जुळवुन घेउन तव चित्त शान्तवृत्ति वस ॥ २७ ॥
फिरविल मानस अपुला ह्मणजे नेप्चून जो विरोध करी।
माझा तूझा त्याचा मानस होईल एक सर्व परी ॥ २८ ॥
ह्मणतेस त्यांत आतां नसलें कांहीं खरोखरी कपट।
आतांचे आतां तर देवसभेच्या निघून जा निकट ॥ २९ ॥
तेथें इरिस अपालो दोघें असती तयांस शोधावें ।
ग्रीकांपाशीं जाउनि नेप्चूना कथिल इरिस सद्भावें ॥ ३० ॥
कीं युद्धा टाकोनी भूपा अपुल्या सुमंदिरा जावें ।
जाऊन अपालोनें उत्तेजन हेक्तरा रणीं द्यावें ॥ ३१ ॥
त्याच्या अंगिं भरावें फुंकोनी बल तयें फिरून नवें ।
क्लेशद मनिंचे तेणें दुःख अतां पार विसरुनी जावें ॥ ३२ ॥
ग्रीकांतें भ्याडासम पळवावें कठिण आणुनी समया ।
अकिलीस पेलिअससुत नौकेमाजी असे तिथें जाया ॥ ३३ ॥
म्हणजें तो निज मित्रा धाडिल पत्रोक्लशास रागानें ।
त्रायपुराच्या पुढतीं हेक्तर मारिल तयास शूलानें ॥ ३४ ॥
तरुण परंतु कितिक ते पत्रोक्लश वधिल आपुल्या हातें ।
मम पुत्र सर्पिदनही त्यांतचि पावेल समरिं निधनातें ॥ ३५ ॥

ज्या वेळीं नंतर मग मारिल अकिलीस हेक्तरा समरीं ।
त्या वेळेपासोनी इच्छा तव मी पुरी करीन खरी ॥ ३६ ॥
म्हणजे त्रोजन घेतिल नौदेशांतून काढुनी पाय ।
ग्रीकांस मिनर्वेच्या उपदेशानें मिळेल तें न्याय ॥ ३७ ॥
कोप न निवेल मम जों वांछा पुरली न पेलिअसजाची ।
ग्रीकां मदत कराया तों ती इच्छा उगीच अमरांची ॥ ३८ ॥
दिधलें वचन तयाला पहिल्यानें हालवून मीं मान ।
जेव्हां थेटिसनें त्या स्पर्शियले जानु करुन सन्मान ॥ ३९ ॥
पुरनाशक अकिलीसा द्यावें म्यां यश जगांत कीं विमल ।
ह्मणुनी मजसीं तीनें प्रार्थियलें तें न करिन मी विफल" ॥ ४० ॥
ऐसें तो वदला वच देवी जूनो परन्तु तें मानी ।
आलिम्पसास गेली तुंग इदागिरिवरून अवसानीं ॥ ४१ ॥
देशाटण करुनि कुणी करितो चिंतन पुन्हा प्रवासाचें ।
विद्युद्वेगें करितो स्मरण मनीं दृष्ट वस्तुंचें साचें ॥ ४२ ॥
अणि सावधान हृदया शीघ्र म्हणे ' येथ, तेथ मी होतों ' ।
स्मरतां जितक्या वेगें परिचित मनिं देश आणितो जो तो ॥ ४३ ॥
तितक्याच मनोवेगें जूनो गेली सभेंत अमरांच्या ।
आलिम्पासिं भरलेली होती ती मंदिरांत जोव्हाच्या ॥ ४४ ॥
अर्पून पानपात्रें सुर तीचा उठुन करिति सन्मान ।
स्वीकारुन पात्रा ती थेमिसला मान देइ, इतरां न ॥४५
कारण पहिल्यानें ही गेली धांवुन करावया मान ।

संबोधुन तिज थेमिस सूचक हें सार्थ करितसे वचन ॥ ४६ ॥
" कां हे ! जूनो ! येथें आलिस ? दिसतेस घाबरी कां गे ! ।
सॅतर्नसुतें पतिनें धास्ती भरली असेल तुज रागें " ॥ ४७ ॥
धवल करा जूनो ती देवी मग देत तिजासिं उत्तर हें ।
" हे देवि ! परिस थेमिस ! वृत्त नको गे पुसूं मला तर हें ॥४८॥
तुजही ठाउक किति तो उद्धत आणि दुष्टही स्वभावानें ।
अमरांच्या भवना जा तोषिव सुर मिष्ट अन्नदानानें ॥ ४९ ॥
गोष्टी या कळतिल तुज जैशा कळतील इतर अमरांस ।
कैशी दुष्कृत्यांची रचित असे जोव्ह थोरली रास ॥ ५० ॥
कोणि बसो सेवाया अन्नातें होउनी मनीं राजी ।
सुरनर कोणि असो तो, हा करि सर्वांस विरस परि गाजी" ॥ ५१ ॥
ऐसें बोलुन देवी जूनो बसली तशीच मग खालीं ।
जोव्हगृहीं अमरांची खिन्न मनीं मंडळी परी झाली ॥ ५२ ॥
जरि सस्मित ओष्ठ तिचे, नव्हती तरि मुखिं मुळींच हर्षकला ।
मध्यें बसुनि वदे ती कोपें उद्देशुनी सुरां सकलां ॥ ५३ ॥
* मतिहीन सर्व आह्मीं जोव्हावर मूर्ख ह्मणुनियां रुसतों ।

---

* होमरच्या काव्यांत सर्व प्रकारचें वाक्चातुर्य दिसून येतें असा पुरातन समज आहे. व तो खरा आहे. त्यांतल्यात्यांत जूनोचें आतांचें भाषण अप्रतिम असें गणलें जातें. ती वरपांङ्गी एक ह्मणत आहे व दुसराच आंतील उद्दिष्ट हेतु घडवून आणित आहे. जोव्हानें काय आज्ञा केली आहे ती इतर देवांस सभेत एकीकडे निवेदन करीत आहे; व ती त्यांनीं पाळलीच पाहिजे

सक्तीनें भक्तीनें वळवाया जवळ बसुनियां झटतों ॥ ९४ ॥
परि तो दूर सरोनी देईना मान अदय आह्मांस ।
कारण ह्मणतो नाहीं माझें बल शक्ति सर्व अमरांस ॥ ९५ ॥
इच्छा ह्मणून जो जो आणिल तो तो अनर्थ सोसावा ।
व्यसनीं आधिंच तेणें सांगा हो! मार्स काय लोटावा! ॥ ९६ ॥
आस्केलाफस मार्से मानियला स्वसुत ह्मणुन लोकांत ।
तोही रणिं हत झाला! प्रियतम जरि अखिल मर्त्यवर्गात" ॥ ९७ ॥
ऐसें ती वदली मग, मासल ऊरूंस गलित हस्तानें ।
थापटुनी मार्स वदे झाला जो खिन्नचित्त दुःखानें ॥ ९८ ॥
"आलिम्पसस्थ सुरहो! देउं नका दोष कुणि मला आतां ।
पुत्रवधाचा घ्याया सूड अरीवरतिं चालुनी जातां ॥ ९९ ॥
ग्रीकांच्या नौभागीं, होउन हतकाय जोव्ह वज्रानें ।
धूलिरुधिरसिक्त शवीं होइन निद्रित जरी कुदैवानें " ॥ ६० ॥

असेंही निक्षून सांगत आहे ! पण दुसरीकडे लागलीच त्यांच्या मनांत **जो**व्हाची आज्ञा पाळण्याविषयीं प्रबळ अनिच्छा उत्पन्न करीत आहे. **जो**व्हाचें सामर्थ्य अगाध आहे हें त्यांच्या लक्ष्यांत आणून त्यांचीं मनें अस्वस्थ करीत आहे ! दुसऱ्याचें उद्धत वर्चस्व ज्यास केव्हांही सहन करवणार नाहीं, त्या **मार्सा**सही तुला सदोदित त्याच्या पदीं लीन होऊन वागलें पाहिजे ह्मणून उपदेश करीत आहे व तो करतां करतांच त्याला उघडपणें बंड करण्यास प्रवृत्त करीत आहे. प्राणांहून प्रिय अशा पुत्राच्या मृत्यूचा नुसता उल्लेख करून **मार्सा**स मोठ्या खुबीनें चिथावून देण्यांत वंचनचातुर्याची सीमाच **जू**नोच्या मार्फत **हो**मरनें दाखविली आहे.

ऐसें वदुनी तेणें केली आज्ञा पलायना व भया ।
होतों कवचावृत मीं तों जोडावें रथास जवन हयां ॥ ६१ ॥
अमरांवरतिं अशानें जोव्हाचा क्रोध तीव्र दुःखमय ।
अधिकचि झाला असता, टाळि मिनर्वा परी कठिण समय ॥ ६२ ॥
सकलसुरां विषयींची तीच्या चित्तास काळजी लागे ।
उडि घेत देहलींतुनि सिंहासन ती त्यजीतसे रागें ॥ ६३ ॥
ताच्छिर कवचा काढी ओढी स्कंधावरोनियां ढाल ।
कठिण करांतुन घेई मोठा भाला न लावितां काल ॥ ६४ ॥
भाला उभा करोनी निर्भर्त्सित उद्धतास मार्सास ।
" क्रोधान्ध! नष्टबुद्धे! समजें तूं आज नष्ट झालास ? ॥ ६५ ॥
वद काय ऐकण्याच्या गेले कामातुनी तुझे कान ?।
बुद्धि क्षीण जहाली लज्जा तुज सांग वाटते कां न ? ॥ ६६ ॥
धवल करा जूनो नें वदली तें ऐकिलेंस का नाहीं ? ।
आलिम्पसस्थ जोव्हाकडुनी आतांच ती अली पाहीं ॥ ६७ ॥
इच्छा तुला स्वतांला आहे का दुःखभार सोसाया ।
दुःखित अंतःकरणें आलिम्पसशिखरिं बद्धकर याया ॥ ६८ ॥
अणशिल शिवाय संकट इतरांवरतीं अशा प्रकारानें ।
त्रायस्थां ग्रीकां तो देइल सोडून जोव्ह रागानें ॥ ६९ ॥
आह्मांवरतीं धांवुन, आह्मां आलिम्पसीं करिल जांच ।
अपराध असो न असो सकलां दण्डील तो एकलाच ॥ ७० ॥
पुत्रावरुनी आला राग तुला, विनवितें अतां सोड ।

बाहुबलें अधिक असे हत झाले ज्या न समरिं कधिं तोड ॥ ७१ ॥
होतिल हत या पुढतीं, जगतीं कुल जाति आशींच मनुजांचीं ।
मृत्युविमोचन करणें गोष्ट दुरापास्त ही असे साची" ॥ ७२ ॥
आसनिं मार्सा बसवी धरुनीयां भाषणीं अशी रीती ।
आव्हान अपालोला, सुरदूतीला व इरिसला करि ती ॥ ७३ ॥
कठिण स्वरें वदे त्यां " आज्ञा करि जोव्ह आज तुह्मांस ।
कीं या इदाद्रिवरतीं जा. आज्ञाभंग हो न आशि आस ॥ ७४ ॥
पाहुन रंग तयाचा वागत जा " गोड वचन हें करुन ।
देवी जूनो जाउन राहे सिंहासनावरी बसुन ॥ ७५ ॥
इकडे दोघें गेलीं निर्झरमय त्या इदाद्रिच्या शिखरीं ।
वन्य पशूंचें होतें ज्या ठायीं जनन नित्य सर्वभरी ॥ ७६ ॥
गार्गेरसोच्चभागीं सॅतर्नेज दिसत यांस बसलेला ।
परिमलयुक्त घनानें नीट सभोंवार जो वेष्टिलेला ॥ ७७ ॥
घनवाहक जोव्हाच्या पुढतिं उभीं राहती तयां बघुनी ।
जोव्ह न कुपित जहाला, भार्याज्ञा पाळिली असें म्हणुनी ॥ ७८ ॥
पहिल्या प्रथम इरिसला उद्देशुन शब्द कठिण हे वदत ।
"आतां त्वरा करोनी चपले जा त्वरितगति अतां पळत ॥ ७९ ॥
नेपूचूना भेटुन या गोष्टी कळवीं न लावितां वेळ ।
* दूतीं कपट नसावें, त्या कार्थि सोडीं रणांतला खेळ ॥ ८० ॥

---

* दूतांचे धर्म रामायणांत विस्तारें करून सांगितले आहेत.
यो हि भृत्यो नियुक्तः सन् भर्त्रा दुष्करकर्मणि ।

देवसभेशीं अथवा जलधिशिं येई त्यजून समरास ।
जर का मद्धच मोडिल सांगें तर कीं विचार करुन अस ॥ ८१ ॥
बलवन्त कितिहि झाला माझ्याशीं तरि विरोध करिल कसा ।
बलवत्तर मी त्यावर घालिन ती झडप वद न कां सहसा? ॥ ८२ ॥
वाडिल वयानेंही मी; मजला भीतात सर्वजण इतर ।
स्पर्धा मजसिं कराया वाटावें यास भय न काय तर ? "॥ ८३ ॥
ऐसें तो वदला मग पवनपदी इरिस मोडि नच वचन ।
उतरे इदाद्रिवरुनी पुण्य त्रायीं करीत ती गमन ॥ ८४ ॥
निःसारुनी घनांतें आकुल गगनास जो प्रसन्न करी ।
त्या पवनें प्रोत्साहित वर्षे हिम जेविं शीघ्र सर्वभरी ॥ ८५ ॥

कुर्यात्तदनुरागेण तमाहुः पुरुषोत्तमम् ॥ १ ॥
यो नियुक्तः परं कार्यं न कुर्य्यान्नृपतेः प्रियम् ।
भृत्यो युक्तः समर्थः संस्तमाहुर्मध्यमं नरम् ॥ २ ॥
नियुक्तो नृपतेः कार्यं न कुर्य्यान्नृपतेः प्रियम् ।
भृत्यो युक्तः समर्थःसंस्तमाहुः पुरुषाधमम् ॥३॥

अर्थः—यजमानानें दुर्घट कार्याकडे योजना केली असतां तें पार पाडून, त्याचे ठिकाणीं प्रेम असल्यामुळें जो सेवक दुसरेंही कार्य शेवटास नेतो तो उत्तम पुरुष होय. कार्याविषयीं योजना केली असतां जो योग्य व समर्थ सेवक राजाचें तेवढेंच कार्य करतो, व दुसरें होण्यासारखें प्रिय कार्य करीत नाहीं त्याला मध्यम पुरुष ह्मणतात. व कार्याचे ठिकाणीं योजना झाली असतां जो योग्य व समर्थ सेवक दक्ष राहून राजाचें कार्य करीत नाहीं त्याला अधम पुरुष ह्मणतात.

तेवीं शीघ्र इरिस ही औत्सुक्यें चालली पुढें पळत ।
नेप्चूनाच्या राहे पुढतिं उभी आणि शब्द हे वदत ॥ ८६ ॥
"हे नीलकेश! आल्यें पृथ्वीकंपक तुझ्या अतां ठाया ।
ईजिसधर जोव्हाचा तुजला संदेश हा निवेदाया ॥ ८७ ॥
आज्ञा तुजला त्याची झाली सोडीं रणांतला खेळ ।
देवसभेशीं अथवा जलधीशीं ये न लावितां वेळ ॥ ८८ ॥
जर मोडशील आज्ञा करशिल अवमान तर विचार कर ।
भय घाली कीं, येइन तेथें तुजशीं करावया समर ॥ ८९ ॥
बोले ' मीं श्रेष्ठ असें तूझ्याहुन सर्वथा बलें करुन ।
वडिल वयानेंही मी मजला असतात सर्वजण भिउन ॥ ९० ॥
याच्या नच भय हृदयीं स्पर्धा मजसीं करावया मानें' " ।।
नेप्चून कुलज तिजला प्रत्युत्तर देत बहुत रागानें ॥ ९१ ॥
" अमरांनों ! तो आहे प्रबल, तरी करित गर्वयुत वचन ।
आत्मसमाना मजला, इच्छा नसतां म्हणे ' बळें धरिन ' ॥ ९२ ॥
आम्हीं हे बंधु तिघे सॅतर्नज ठाउके जगा सकल ।
ऱ्हीआ जननी अमुची, देई आम्हांस जनन नच विफल ॥ ९३ ॥
पहिला जोव्ह, दुजा मी, प्लूतो नरकाधिपाल तिसरा तो ।
लौकिक गाजे जगतीं आम्हीं राज्यें स्वतंत्र चालवतों ॥ ९४ ॥
सम भाग तीन म्हणुनी करुनी त्या सकल वस्तुजाताचे ।
प्रत्येकातें लाधे सन्मानें स्वत्व भिन्न भागाचें ॥ ९५ ॥
टाकुन चिठ्या मिळाला प्रथम मला जरठ जलधिजलिं वास ।

प्लूतोला भाग मिळे अंध तमाची जिथें असे रास ॥ ९६ ॥
अन्तीं जोव्हा लाधे रुंद स्वर्भूमि उंच घनिं मान्य ।
*पृथ्वी तथापि राहे सर्वांचा भाग सुभग सामान्य ॥ ९७ ॥
तैसा आलिम्पसहीं; मग कां सांगेल जोव्ह तें करिन ।
जर शक्तिमान असला निज भागीं स्वस्थ काय राही न ? ॥ ९८ ॥
उचलून हस्त मजला भ्याडासम भिववितां नये कामा ।
सुत दुहितांचा आहे उत्पादक थोर केवळ रिकामा ॥ ९९ ॥
भीषण भाषण करुनी त्यांचा करुंदे तयास अपमान ।
त्यानें कथितां करतिल तीं सेवा अन्य मार्ग जर त्यां न " ॥१००॥

---

*याठिकाणीं नेप्चूननें मोठाच कायद्याचा प्रश्न काढला आहे. जोव्ह, नेप्चून व प्लूतो हे तिघे बन्धू. आपला पिता जो सॅतर्न त्याला पदच्युत करून साम्राज्यांतून घालवून लावल्यावर यांनीं वडिलार्जित स्थावर जंगम मालमत्तेची सम विभागणी करून घेतली व जो तो स्वतंत्रपणें आपल्या विभागांत राज्य करूं लागला. स्वर्ग जोव्हाचे वांटणीस गेला. प्लूतोचे, नरकप्रान्त गेला व नेप्चूनचे, सागरप्रदेश आला. यांनीं पृथ्वी व आलिम्पस हीं तिघांसही उपभोगार्थ सामान्यत्वानें राखून ठेविलीं होतीं. तेथें जोव्हाला एकट्यालाच गडबड करतां यावयाची नाहीं, याचीही सत्ता तेथें आहेच असा त्याचा उद्देश आहे. हें त्याचें ह्मणणें न्याय्य दिसत आहे. आमच्या देशांत हजारों वर्षांपासून या प्रान्तांत तशीच वहिवाट आहे.

विभजेरन् सुताः पित्रोरूर्ध्वं रिक्थमृणं समम्।
बापाचे मागें मुलांनीं स्थावर जंगम मिळकत व कर्ज हीं सारख्या प्रमाणांत वांटून घ्यावीं असें याज्ञवल्क्य ह्मणतो.

पवनपदी इरिस पुसे "भूकंपक ! नीलकेश ! सांग मला ।
सांगूं खरेंच ऐसा निर्दय संदेश तीव्र जोव्हाला ॥ १०१ ॥
अथ त्यांत बदल करशिल ? सुज्ञ दुराग्रह कधीं धरी न मनीं ।
* वडिलां अवमानी त्या करिति फऱ्या दण्ड हें प्रसिद्ध जनीं" १०२
नेप्चून धराकंपक तिजसिं वदे "देवि ! इरिस ! वदसि भलें ।
फार बरें दूताला वस्तूंचें ज्ञान उचित जर असलें ॥ १०३ ॥
या संबंधें झाला परि मम हृदया सखेद संताप ।
कुपित वचें इच्छितसे चिढवाया मजसिं हा अपोआप ॥ १०४ ॥
वांटा समान माझा भवितव्याची असे गति समान ।
संक्षुब्धचित्त परि मी देतों आतां त्वदुक्तिला मान ॥ १०५ ॥
परि एक गोष्ट आणिक सांगुनियां ठेवितों तुला आतां ।
घालून ठेवितों भय देतों सोडून भीड हें वदतां ॥ १०६ ॥
व्हल्कन, मर्क्युरि, जूनो, मी व मिनर्वा अशा सुरांनांही ।
ठकवुन राखिल इलियम आणि तें करणार नष्ट जर नाहीं ॥ १०७ ॥
ग्रीकांस करिल विजयी तर जोव्हें स्मरण खूप ठेवावें ।
त्याचें आणी माझें वैर निरंतर अनंत माजावें ! " ॥ १०८ ॥
पृथ्वीकंपक ऐसें वदुनी ग्रीकांस सोडुनी जाय ।
घेई उडी त्वरेनें धांउन निम्नोदधींत अनपाय ॥ १०९ ॥
ग्रीकांचे वीर तया बाहति. मग जोव्ह तो अपालोस ।

* कनिष्ठ जनांनीं वडिल जनांचा उपमर्द केला ह्मणजे त्याचा सूड घेण्यामध्यें फरीनामक योनीच्या प्राण्याची योजना झालेली होती असा पुरातन समज असे.

वदतो " प्रिय फीबस हे जाउन का हेक्तरांस बघतोस? ॥ ११० ॥
गेला धरावगुण्ठकजलधिंत नेप्चून राग चुकवाया ।
नाहीं तर घोर असा झाला असता अनर्थ समया या ॥ १११ ॥
सॅतर्नाच्या भोंवतिं असती जे देव इतर पातालीं ।
अमुचा कलह भयानक त्यांतें येता कळूनियां खालीं ॥ ११२ ॥
झालें तथापि बरवें त्यास हितावह तसेंच मजला तें ।
भिउनी मद्बाहुबला घेई लावून दोष अपणातें ॥ ११३ ॥
बहु कार्य कठिण होतें घर्मस्रावाविणें न तें घडतें ।
हस्तिं दशालंकृत घे ईजिस फिरवावयास भीतिद तें ॥ ११४ ॥
ग्रीकांच्या वीरांतें सकलांतें पूर्ण टाक भिववुनियां ।
हे ! दूरोत्क्षेपक ! परि सांभाळीं हेक्तरास समरीं या ॥ ११५ ॥
हेलिस्पान्टा जातिल नावांतुन हे पळोनि जों ग्रीक ।
तों शक्ति हेक्तराची वाढिव; याहून तूं न करिं अधिक ॥ ११६ ॥
ग्रीकांच्या तदनंतर होइल केव्हां फिरून विजय कसा ।
शब्दांनीं व कृतीनें तें मी ठरवीन मागुनी सहसा" ॥ ११७ ॥
ऐसें तो वदला मग फीबस मोडी न वचन ताताचें ।
उतरे इदाद्रिवरुनी धरुनीयां मान शीघ्र वेगाचें ॥ ११८ ॥
जेवीं कपोतभक्षक शीघ्रग खग धांवतो ससाणा तो ।
तेवीं भ्रायमजाशीं फीबस धांवून शीघ्र रणिं जातो ॥ ११९ ॥
हेक्तर याला दिसला बसलेला भूमिवरतिं नीट अतां ।
मित्रांतें ओळखितो नुकती त्या चेतना पुन्हां मिळतां ॥ १२० ॥

आतां श्वास न कोंडे थांबतसे घर्म ही सुटायाचा ।
इजिसधर जोव्हाच्या इच्छेनें समय टळत मरणाचा ॥ १२१ ॥
दूरोत्क्षेपक फीबस जावोनी जवळ पुसत त्या वीरा ।
"प्रायमसुत हेक्तर! तूं बससी निर्जीव सोडुनी इतरां ॥ १२२ ॥
होते पीडा तुज का ?" हेक्तर तो क्षीणबल तया वदला ।
" आहेस कोण तूं रे! सन्मुख पुसशी सुरोत्तमा मजला ॥१२३॥
आजक्षें रणशूरें केला उरिं घाय मजासिं दगडानें ।
ग्रीकां मीं नौदेशीं तन्मित्रां मारिलें स्वहस्तानें ॥ १२४ ॥
उद्धत विक्रान्त असें मज रण सोडावयास तो लावी ।
मज वाटलें असें कीं प्लूतो नगरी खरेंच गांठावी ॥ १२५ ॥
दर्शन देते मजला तेथें मृत आप्त मित्र सर्वजण ।
*प्रिय माझ्या प्राणांचें होतें होणार खचित उत्क्रमण" ॥ १२६ ॥
दूरोत्क्षेपक फीबस त्यास वदे " धीर धर फिरून नवा ।
आलों सहाय मी तुज घेउन हैमासि, अन्य कोण हवा ! ॥१२७॥
जोव्हें मज धाडियलें वेगानें मज इदागिरीवरुनी ।
तुजला त्वन्नगरीला रक्षाया संवय मज असे ह्मणुनी ॥ १२८ ॥
पण ये स्वारां देई उत्तेजन निज हयां पिटाळाया ।

---

* पोप कवीनें थोडी भर घालून आसन्नमरण पुरुषाची स्थिति कशी असते तिचें हुबेहुब वर्णन केलें आहे तें असें—

अद्यापि हि वाटतसे भूतें मज पुढुनि हळुच फिरतात ! ।
घोर भयानक गोष्टी नरकांतिल आज नयनिं दिसतात ! ॥

नौभागावर नेऊं त्यांलागीं चाल करुनियां समया ॥ १२९ ॥
परि मीं पुढतीं जातों अश्वांतें पथ सपाट मी करितों ।
ग्रीकांच्या वीरांतें भीतिमुळें लांब दूर पळवीतों "॥ १३० ॥
केलें वचन तयें हें उत्पादक जें सदैव धैर्याचें ।
झालें मन धृष्ट तदा समरीं जायास या नृपालाचें ॥ १३१ ॥
बहुकाल बद्ध जैसा पागेंतिल अश्व पुष्ट खावोनी ।
तोडून बंद निघतां नगरा बाहेर जात नाचोनी ॥ १३२ ॥
सानंद संवकलेला गर्वित गंगाजलांत न्हायाला ।
शोभा शिर उन्नत दे स्कन्धीं आयाळ विखरतां ज्याला ॥ १३३ ॥
गर्वितरूपा त्याला नेती पळवोनि जानु सहज तिथें ।
चरतात अश्वयुवती सुन्दर कुरणांत दृप्त नित्य जिथें ॥ १३४ ॥
तैसा हेक्तर धांवे सत्वर उचलून जानु अणि पाय ।
सुरवचना परिसोनी स्वारां उत्तेजनास दे राय ॥ १३५ ॥
अज वन्य शृंगयुत मृग यांतें धरुं बघति लोक गांवढळ ।
छायाबहुल शिलांनीं रक्षित हीं हातिं लागति न चपळ ॥ १३६ ॥
बहु सारमेय भुंकति, एकुन ये सिंह दीर्घ दाढीचा ।
*झुझत्यां त्यां सकलांतें पळवी तो, सर्व खेळ भीतीचा ॥ १३७ ॥
तैसे ग्रीकांचे हे स्वार बहू चालले पुढें होते ।
द्विमुखांनीं शूलांनीं, असिनीं राणीं वार करित किति हो ते ! ॥१३८॥

---

* सुटला, गरुडें धरिल्या श्येनापासूनि काय तो लावा ।
कीं शरभधृतमृगेश्वरमुक्तेभासींच राय तोलावा ॥ मोरोपंत.

वीरव्यूहीं शिरतां त्यांनीं जों पाहिलें हेक्तरास ।
तों त्यांचें धैर्य पदीं गळुनी झाला तयांस संत्रास ॥ १३९ ॥
ईतोलिअन अनंतर आन्द्रीमन तनय शूर थोआस ।
वदला शूलकुशल त्या स्थिर समरामाजि उपमिति न ज्यास ॥१४०॥
सकल ग्रीकांमाजी नव्हता मंत्री असा कुणी चतुर ।
वाक्पाटव तरुणांनीं दावियलें जरि सभेंत भरपूर ॥ १४१ ॥
" हे देवांनों ! बघतों नयनीं अद्भुत अतां चमत्कार ।
मृत्यूला चुकवोनी हेक्तर उठला फिरून झुंझार ॥ १४२ ॥
तेलामनतनयानें आजक्षें त्यास वधियलें खचित ।
ऐसा चित्तीं सकला आम्हां विश्वास वाटला अमित ॥ १४३ ॥
परि एका देवानें सोडवुनी हेक्तरास वांचविलें ।
जेणें आधिंच केले ग्रीकांचे जानु कितिक समरिं ढिले ! ॥ १४४ ॥
मज वाटे तोच अता देव असे जवळ त्यास राखाया ।
जोव्हावीण समरशिरिं राहिल तो अरिदला कसा खाया ॥१४५॥
परि या करुं आपण तें जें माझ्या आज मानसीं वसत ।
सैनिक जनांस सांगूं नौदेशा जावया अतां परत ॥ १४६ ॥
' आम्हीं उत्तम ' ऐसा अमुच्यांतिल गर्व असत जितक्यांस ।
स्थिर तितक्यांनिं असावें तेणें तरि अडथळा करुं तयास ॥ १४७ ॥
उचलूं वरतीं भाले; म्हणजे क्रोधाकुला सुटेल भय ।
ग्रीकांच्या सैन्यगणीं शिरणें होईल त्यास दुःखमय" ॥ १४८ ॥
ऐसें तो वदला तें घेती जन सावधान ऐकून ।

आज्ञा प्रमाण मानिति सहचर निज नायकांस जमवून ॥ १४९ ॥
भूप इदामिनिअस तो, दोन्ही आजक्ष, मेरिआनीस ।
सैन्यव्यूहा रचिती त्यूसर अणि मार्सतुल्य मेजीस ॥ १५० ॥
चालून हेक्तरावर जाती त्या त्रोजनांवरी अभय ।
ग्रीकांच्या नौदेशा गेला परतून इतर सैन्यचय ॥ १५१ ॥
सरती त्रोजन पुढतीं सैन्याचा व्यूह रचुनियां दाट ।
लांब टिपें टाकोनी हेक्तर दावीतसे तयां वाट ॥ १५२ ॥
चाले पुढें अपालो स्कन्धावर ज्यास मेघ आवरण ।
शोभति ज्यास दशा तें ईजिस भासुर धरी करें अपण ॥ १५३ ॥
जोव्हास व्हल्कनें जें दिधलें करण्यास भंग सैन्याचा ।
तें हा निजकरिं धरुनी नायक अजि समरिं होत लोकांचा ॥ १५४ ॥
अविरल करुन चमूचा व्यूह रणीं जपुन राहिले ग्रीक ।
उभय दलांतुन उठला भीषण रणनाद जो न बारीक ॥ १५५ ॥
ज्यानिर्गत शर झाले शूरकरांतून तीक्ष्ण ते भाले ।
किति रुतले तरुणांच्या वीरांच्या देहिं करुनियां घाले ॥ १५६ ॥
भूमींत कितिक घुसले अरिदेहा स्पर्श जों नसे घडला ।
मांसाशन करण्याचा गेला अजि लोभ सर्व विलयाला ॥ १५७ ॥
जोंवरि करिं ईजिस तें धरिलें स्थिर फीबसें रणामाजी ।
तोंवरि शस्त्रें पडती उभय दलीं वीर पडति ते गाजी ॥ १५८ ॥
हयदमन ग्रीकांच्या सन्मुख राहुन उभा परी समरीं ।
हलवून ईजिसा तो नाद भयंकर रणांत दीर्घ करी ॥ १५९ ॥

स्तंभितधैर्य तदा ते उद्धत निज शौर्य विसरुनी जाती ।
काळोख्या रात्रिस कधिं वन्य पशू दोन विपिनिं संचरती ॥ १६० ॥
वृषभांचा व अजांचा घाला घालोन कळप उधळवती ।
पालक जवळि नसावा ग्रीकांचा भंग तेविं हे करती ॥ १६१ ॥
त्यांस अपालोनें या केलें भयभीत शक्तिहीनांस ।
त्रायस्थां यश दिधलें करुनी विजयी रणीं हेक्तरास ॥ १६२ ॥
एकास एक वधि मग, जों चाले युद्ध फार उत्ताल ।
बेओशिअन नृपाल स्टिचिअस हत होत समरिं जंजाल ॥ १६३ ॥
आर्कीसिलास यासह पडला बलि हेक्तरास समरांत ।
मेनिस्थिअसाचा हा विश्वासू मित्र होय जगतांत ॥ १६४ ॥
आयेसस मीदन यां दोघां मारीत ईनिआस महा ।
त्या ओइलीअसाच्या दासीचा पुत्र होय मीदन हा ॥ १६५ ॥
फैलेसींत वसतसे आजक्षाचा बलाढ्य हा भ्राता ।
सोडीत जन्मभूमिस; केला यानें मनुष्यवध भलता ॥ १६६ ॥
श्रीमन्त ईरिओपिस जननी याची प्रसिद्ध सापत्न ।
त्या ओइलीअसानें केलें वाग्दान जिशिं करुन यत्न ॥ १६७ ॥
तीच्या बन्धूलागीं जीवें परि मारिलें असे यानें ।
आयेससास करिती नायक परि हे अथीनिअन मानें ॥ १६८ ॥
नातू बुकोलसाचा म्हणती जन यास सुत स्फेलसाचा ।
पोलैतीस हरितसे एकिअसप्राण समरशिरिं साचा ॥ १६९ ॥
मेसिस्टिसास मारी थोड्या कालांत पालिदामास ।

क्रोनिअस प्राविण्यें बलि गावे तेथ आजिनारास ॥ १७० ॥
स्कंधीं क्षत करि मागुन पारिस मग दीइओकोअसास ।
धैरेयांतुनि निघुनी होता हा पळत कठिण समयास ॥ १७१ ॥
पित्तलमय शस्त्राचा झाला साद्यंत तीव्र या वार ।
गेले वीर सकल मग कवचें हरग्यांत गुंतुनी फार ॥ १७२ ॥
शूलावरण व खंदक यांचा सोडुन भयद आश्रय ते ।
ग्रीक पळाया लागति जिकडे तिकडे जसें जया सुचतें ॥ १७३ ॥
शिरती आंत तटाच्या झालें त्यांना अवश्य हें सारें ।
हेक्तर रणनाद करी त्रायस्थां चेव हृदयिं फार भरे ॥ १७४ ॥
सांगे " नौदेशा ध्या सोडुन कवचापहार रुधिरमय । "
बोले " येथें न दिसो त्रोजन नौदेश सोडुनी सभय ॥ १७५ ॥
त्यातें तिथेंच मारिन नर नारी असुन त्यास नात्याचीं ।
रचतिल चिता न त्याची कुत्रे मग फाडतील तनु त्याची " ॥१७६॥
ऐसें वदुनी ठेवुनि खांद्यावरतीं कशा हयां पळवी ।
त्रायस्थां भर देई ओरड करतात लोक दीर्घ नवी ॥ १७७ ॥
रथकर्षक अश्वांतें आरोळी मारुनी पुढें करती ।
बलवन्त तो अपालो होता त्याच्या सदैव रणिं पुढतीं ॥ १७८ ॥
फोडीत खंदकाचे कांठ अतां प्रबल सहज पायानें ।
पडले सर्व धडाधड मध्यावर खंदकांत वेगानें ॥ १७९ ॥
या भरणीनें तत्क्षणिं मार्ग वरी रुंद लांब बहु झाला ।
निज बल मापूं बघतां फेंकिल इतकाच दूर नर भाला ॥ १८० ॥

या मार्गानें सरती स्वार, चले पुढतिं थोर फीबस तो ।
हस्तीं ईजिस घेतो ग्रीकांच्या भिंति मोडुनी बसतो ॥ १८१ ॥
मूल पहा एकादें सिकतिल तीराकडे जसें वळतें ।
बाल्योचित चित्रांच्या खेळामाजी क्षणैक जें रमतें ॥ १८२ ॥
अपणाचि चित्रें मग तीं टाकी भंगून हस्तपादांहीं ।
ग्रीकांची भिंत तशी फीबस तूं मोडलिस सलीलच ही ॥ १८३ ॥
श्रम कष्टद सगळे त्वां ग्रीकांचे दवडिलेस रे फुकट ।
त्यां टाकिलेंस भिववुनि, पळताती ग्रीक सर्व सरसकट ॥ १८४ ॥
ऐसा प्रकार होतां नौभागीं ग्रीक कोंडुनी गेले ।
अन्योन्यां उत्तेजुनि सर्वांनीं वरतिं हस्त निज केले ॥ १८५ ॥
नवसिति सकलां देवां, त्यांतुनियां ग्रीकपाल नेस्तर तो ।
नक्षत्राकुल गगनीं हस्त उभारोनियां स्तवा करतो ॥ १८६ ॥
" हे तात ! जोव्ह ! जेणें तुजला यज्ञांत भक्तियुत दानें ।
वृषभाच्या व अजाच्या तोषविलें पुष्ट सक्थिमांसानें ॥ १८७ ॥
कर जोडुन तुज तेणें नेण्या परतुन न विनविलें काय ? ।
म्हटलेंस 'होय' काय न मान्य विनंती करून अनपाय ? ॥ १८८ ॥
त्या साऱ्या गोष्टींची होऊंदे तुजसिं आज अठवण रे ।
दुःखद दिवसा चुकवीं हे आलिंपिअन ! राख निज पण रे ॥१८९॥
त्रायस्थांच्या करवीं ग्रीकांतें कर न आज तूं विजित ! " ।
ही प्रार्थना तयाची झाली जोव्हास तत्क्षणीं विदित ॥ १९० ॥
वृद्धा नेलिअससुता उत्तर तो देत गर्जनारूप ।

जोव्हाचें मन कळतां त्रायस्थां येतसे बहू हुरुप ॥ १९१ ॥
वात प्रचण्ड सुटतां वीची उठतात पर्वतप्राय ।
आकाशा भेटाया सागर तो करुन गर्जना जाय ॥ १९२ ॥
नौका कोठें मिळतां वीची तत्कुक्षिवरति चढतात ।
पार्श्वास्थिभंग करुनी गर्भी प्रलयानुकरण करतात ॥ १९३ ॥
तैसे त्रोजन सारे ग्रीकांच्या भिंतिवर अतां चढती ।
करुन पराजित यांना घोर महा गर्जना अतां करती ॥ १९४ ॥
सोडुन अपुल्या अश्वां नौदेशीं लढति पृष्ठभागांत ।
हस्ताहस्ति घडे मग चकमकती द्विमुख शूल हस्तांत ॥ १९५ ॥
त्रोजन रथांत होते ग्रीक तसे उच्च कृष्ण नौकांत ।
ग्रीक करीं शूल भले, जलयुद्धा योग्य जे विदेशांत ॥ १९६ ॥
होता अग्रिं तयांचे पितळेचा लेप सघन तुळतुळित ।
आंत तटाच्या लढती ग्रीक त्रोजन अतां इथें अमित ॥ १९७ ॥
इकडे तो युरिपैलस अपुल्या तंबूंत शौर्यशील असे ।
यावेळे पावेतों पत्रोक्लश वीर ही तिथेंच बसे ॥ १९८ ॥
संभाषणसामर्थ्यें मुद दे युरिपैलसास रसभरित ।
तीव्र क्षतास लावी रुक्शामक औषधें तिथें अमित ॥ १९९ ॥
नौदेशा बाहेरी ग्रीक त्रोजन रणा करित होते ।
आतां तट भेदोनी आले वेगांत आंत परि होते ॥ २०० ॥
पळतां ग्रीक अरडती, पत्रोक्लश पाहुनी मनीं कण्हत ।
मांडीवर आनत कर अपटोनी शोकयुक्त मग ह्मणत ॥ २०१ ॥

" युरिपैलस हे! मज नच अधिक इथे राहवे तुझ्या पाशीं ।
बाहेर कलह जुंपे, आंत न तुज गरज मम ह्मणेन कशी? ॥२०२॥
सुश्रूषा सेवक तव करिल अतां शोध चांगला करतों ।
अकिलीसा भेटुनियां उत्तेजन त्यास देउनी बघतों ॥ २०३ ॥
साहाय्य देव करतां वळविन तन्मन, कुणी ह्मणावें न? ।
उपदेश सहचराचा साधितसे कार्य काय ठावें न? "॥ २०४ ॥
ऐसें वदत्यालागीं नेलें वाहून दूर पायांनीं ।
स्थैर्ये ग्रीक रहाती केला जरि जोर त्या त्रोजनांनीं ॥ २०५ ॥
थोडे त्रोजन असुनी येथुन त्यां ग्रीक घालवुं न शकति ।
ग्रीकचमूव्यूहा वा त्रोजन भेदूं न शकति धृष्टमति ॥ २०६ ॥
ग्रीकांच्या नौभागीं तंबूंमाजि न शिरावया धजती ।
संग्राम कलह आतां, राहे समतोल वीर जन बघती ॥ २०७ ॥
ज्यास मिनर्वावचनाभ्यासानें साध्य चतुर नौरचना ।
तो करिं लंबक धरुनी बसवी रेखून नाव्यफलकांनां ॥ २०८ ॥
संधि निरंतर घडवी जपुनी जेवीं समान रेषेंत ।
समतोल स्थिर तेवीं आतां समरप्रसंग गति घेत ॥ २०९ ॥
नौका एक धरति कुणि, कुणि धरती दूर जवळ वा दुसरी ।
भोंवतिं जमुनी करती युद्ध अतां वीर ज्यां कुठें न सरी ॥२१०॥
लढतो आजक्षाशीं हेक्तर नौका धरून एक महा ।
आजक्षा जित करुनी नौका जाळूं शके न हेक्तर हा ॥ २११ ॥
आजक्ष हेक्तराचें बल हरण्यातें शके न लेश भर ।

कारण आणुन येथें कथि करण्या एक देव या समर ॥ २१२ ॥
कालीतरास मारी भाला आजक्ष तों कैतिअसजा ।
नौभागा हा होता जात करीं अग्नि घेउनी समजा ॥ २१३ ॥
पडतां हा, ध्वनि झाला; गळत करांतून भूवर मशाल ।
बान्धव धूळींत पडे, हेक्तर नयनीं बघे रणिं विशाल ॥ २१४ ॥
त्रायस्थां भर देई उत्तेजन देत लिसिअनां वचनें ।
नौभागीं अरडोनी भाषण हा करित फार मोठ्यानें ॥ २१५ ॥
" त्रोजन हो ! लिसिअन हो ! तुम्ही दार्देनिअन ! रहा चिकट ।
ऐशा निरुंद मार्गीं लढणें सोडूं नका धरून अट ॥ २१६ ॥
मागें परतुं नका हो ! कैतिअसाच्या सुतास रक्षावें ।
कांहो वदा तयांचें ग्रीकांनीं कवच फाडुनी न्यावें ॥ २१७ ॥
नौदेशीं तो पडला. दिसतो सर्वांस समय जो आला "
ऐसें बोलुन तेणें आजक्षावरतिं फेंकिला भाला ॥ २१८ ॥
गेला नेम चुकोनी; लैकोफ्रन सांपडे तडाक्यांत ।
नामें मास्तर याचा जनक असे सर्वलोकविख्यात ॥ २१९ ॥
आजक्षाचा होता सेवक हा चांगला सिथीरिअन ।
स्वदेशबन्धुस वधुनी राहे जो यापशीं बहूत दिन ॥ २२० ॥
आजक्षाच्या जवळी होता हा रणिं उभा, तसा त्याला ।
मस्तकिं कर्णावरतीं हेक्तर मारीतसे तीव्र भाला ॥ २२१ ॥
नौकेवरुनी खालीं पडला धूळींत उर्ध्वमुख वीर ।
गात्रें विगलित झालीं; बघती आजक्ष होउन अधीर ॥ २२२ ॥

प्रिय बन्धूला वदला “ त्यूसर ! विश्वास्य मित्र मृत झाला ।
मास्तर जनक तयाचा, प्रथम सिथीरा निवास त्या घडला ॥२२३॥
प्रिय पितरांसम ज्याला अपुल्या वाड्यांत मान नित्य दिला ।
पुत्र तयाचा, अमुचा मित्र पहा हेक्तरें रणीं वधिला ॥ २२४ ॥
मरणावह तव कोठें चाप अणी बाण फीबसार्पित रे” ।
ऐसें तो वदला; तें समजुन वच हा पुढें रणांत सरे ॥ २२५ ॥
शरपूर्ण इषुधि घेउन नमित शरासन धरीतसे हातीं ।
त्रायस्थांवरतीं शर सोडी ते अरिस खावया जाती ॥ २२६ ॥
पैसीनार सुताला मारी तो क्लैतसा कुलीनास ।
पॅन्थौसज ज्या आणी निज सहचर ह्मणुन पालिदामास ॥ २२७ ॥
हयरश्मी करिं होत्या, हय हांकायास बसविलें त्याला ।
रथ नेई त्या ठायां, जेथें सैन्यांत संभ्रम उडाला ॥ २२८ ॥
त्रायस्थां मुद झाला हेक्तर चित्तांत हर्ष बहु पावे ।
परि ये यावरि संकट कोणिहि तें काय दूर न करावें! ॥ २२९ ॥
आशा बहु त्या होती, मानेवर बाण मागुनी लागे ।
पडत रथांतुनि खालीं खडखड हय नेति रथ रिता मागें ॥ २३० ॥
हय राखाया आला पाहुन हें त्वरित पालिदामास ।
मग आस्तिनोअसा हें कार्य कथी प्रोतिआअन सुतास ॥ २३१ ॥
सांगतसे ठेवाया अपुले हय जवळ अगदिं नजरेंत ।
लढती धुरीण पुढतीं त्यांमाजी मिसळण्या फिरुन येत ॥ २३२ ॥
त्यूसर शर सोडितसे कवचावृतदेह हेक्तरावरतीं ।

ग्रीकांच्या नौभागीं तत्कृति अजि बंद जाहली असती ॥ २३३ ॥
कारण लढतां त्याला मर्मावर वार जाहला असता ।
अणखी जीव तयाचा यावेळीं खचित तत्क्षणीं जाता ॥ २३४ ॥
प्राज्ञाचें जोव्हाचें लक्ष्य न चुकलें ह्मणोनियां त्यानें ।
रक्षून हेक्तराला त्यूसरयश हरविलें क्षणार्धानें ॥ २३५ ॥
त्यूसर तेलामनसुत होता निर्दोष चाप ओढीत ।
पिळदार तयाची ज्या, तोडोनी त्वरित जोव्ह टाकीत ॥ २३६ ॥
पित्तलमय शर परि तो अन्य दिशेला वळून धनु पडलें ।
त्यूसर बन्धुस वदला तों अंगीं कांपरें तया भरलें ॥ २३७ ॥
"हे देवांनों! अमुचे बेत कुणी देव खचित फंसवितसे ।
मत्करिंचें धनु तेणें हलवोनी पाडिलें क्षणांत कसें ॥ २३८ ॥
दोरी नव्या पिळाची आज सकाळींच बांधिली हातें ।
बहु शर वरुनी सुटतां ह्मटलें सोशील विपुल भारातें ॥ २३९ ॥
तीचे तेणें मध्यें केले तोडून दोन रे तुकडे!"।
तेलामनजें उत्तर आजक्षें हें दिलें तयास खडें ॥ २४० ॥
"मित्रा! अतां असूंदे बाजुस तव चाप आणि अमित शर।
ग्रीकांच्या हेव्यानें यांस करी नष्ट एक कुणि अमर ॥ २४१ ॥
घे भाला दीर्घ करीं स्कंधीं मग ढाल चांगली लाव ।
त्रायस्थांशीं लढ राणें उत्तेजन दे दुजांस, धरिं हांव ॥ २४२ ॥
नौका न हस्तगत त्यां होऊं द्याव्या श्रमाविणें फुकट ।
जित होऊं तरि आह्मीं समर करूं सर्वजण अतां विकट" ॥२४३॥

ऐसें हा वदला; तो ठेवी तंबूंत दीर्घ धनु अपुलें ।
स्कन्धीं ढाल चव्हेरी, लटकवि तो कवच शिरिं जसें रुचलें ॥२४४॥
हयकेशांचा वरतीं हलत तुरा त्रास देत बघत्यास ।
आश्लिष्ट अंग ज्याचें पितळेनें त्या धरीत शूलास ॥ २४५ ॥
समरीं सत्वर जाउन आजक्षाच्या पुढें उभा राहे ।
त्यूसरशर निष्फल ते झाले कळलें असे हेक्तरा हें ॥ २४६ ॥
त्रायस्थां व लिसिअनां आणी उत्साह तो वचें वीर ।
" त्रोजन हो! लिसिअन हो! तुह्मीं दार्देनिअन! धरा धीर ॥२४७॥
वीरोचित दावा हो! मित्रांनों शौर्य आज नौभागीं ।
देखियलें नयनीं मीं वीराग्रणिचे रणीं शर अभागी ॥ २४८ ॥
जोव्हें निष्फल केले जोव्हाची शक्ति कळत सकलांस ।
कळतें कोणा यश दे अपयश तें कोणत्या अनाथास ॥ २४९ ॥
ग्रीकांचें बल नाशुन आह्मां साहाय्य करित आज पहा ।
नौभागीं लगट करा, व्हाल क्षत, बहुत दिसत संभव हा ॥ २५० ॥
दुर्दैवासह धांवुन घालिल घाला जयावरी मरण ।
मरुंदे त्या देशास्तव, लढतां मरत्या न अपयशस्क रण ॥ २५१ ॥
गृह धन दारा पोरें मागें उरतील मग सुखांत रत ।
नौकांसह लावुन द्या ग्रीकां अधिं जन्मभूमिला परत " ॥ २५२ ॥
ऐसें वदुनी तेणें अणिला उत्साह सकल वीरांस ।
इकडे आजक्षानें बहु उत्तेजन दिलें सहचरांस ॥ २५३ ॥
" धिक् ग्रीकानों ! तुह्मां आतांची वेळ मरुन जायाची ।

चांचुनि अथ नौकांची पाळी चुकवावया विनाशाची ! ॥ २९४ ॥
हेक्तर शीर्षकवचधर नौका जर या करील हस्तगत ।
तुझ्मांतें वाटे का पायीं देशास जाउं अज परत ॥ २९५ ॥
हेक्तरवचन नसे का तुझ्मांतें येत येथ ऐकाया ।
उत्साह भरुन सकलां जाळाया कथित सर्व नौका या ! ॥ २९६ ॥
नाच बघाया नाहीं बोलावित तो ! परी लढायास ।
दुसरें अमुचें नच मत, येइल दुसरी न युक्ति कामास ॥ २९७ ॥
मोठी लगट करावी आतां खर्चून सर्व बाहुबल ।
लावून सोक्ष अथवा मोक्ष अतां जन्म करुन घ्या सफल ॥ २९८ ॥
नौभागीं येथ दुरी निष्फळ अति पडुन राहलों भारी ।
हलक्यांच्या हातांनीं होते शिणुनी विटंबना न बरी " ॥ २९९ ॥
ऐसें वदुनी तेणें सकलांतें धैर्य आणि बल अणिलें ।
इतक्यांत हेक्तरानें स्केदिअसा आदरेखुनी वधिलें ॥ २६० ॥
फोकीअननायक हा, जनक जया भूप पेरिमीदीस ।
लाओदामासाच्या प्राणा आजक्ष हरितसे रीस ॥ २६१ ॥
अधिप पदातींचा हा होता कीं पुत्र अन्तिनाराचा ।
ओतस सिलेनिअन जो फैलीअसजास मित्र लोभाचा ॥ २६२ ॥
ईपीअन नृप परि तो पडला बलि थोर पालिदामासा ।
तें बघतां यावरतीं घुसला मेजीस वीर रणिं खासा ॥ २६३ ॥
चुकवी नेम तयाचा तिरकें परि वळुन पालिदामास ।
अवडे न अपालोला जित राणिं पॅन्थौसजास बघण्यास ॥ २६४ ॥

क्रीस्मस झाला क्षत उरिं शूलानें, म्हणुन खालतीं पडला ।
ध्वनि झाला तों हरि हा स्कंधींचा शस्त्रभार जो दिसला ॥ २६५ ॥
यावर दोलप्स पडे लाम्पसकुलजात शूलकुशल असा ।
लाओमीदन याचा आजा लाम्पस पिता प्रसिद्ध तसा ॥ २६६ ॥
उद्धत समरकुशल तो, तुटुनी वर अज पडे करुन लगट ।
मेजीसाची मध्यें शूलानें ढाल वेधि जरि चिवट ॥ २६७ ॥
सीलीअसतटिं शोभे थोर जनाकीर्ण एफिरा नगरी ।
फैलीअसें तिथोनीं अणिली ही ढाल साभिलाष घरीं ॥ २६८ ॥
देइ युफेतीस तया कामा जी आत्मरक्षणीं यावी ।
याच्या तनयाचा ती पहिल्यानें मृत्यु सर्वथा चुकवी ॥ २६९ ॥
हयकेशग्रथित शिरस्त्राणाग्रीं तीव्र मारुनी भाला ।
याचा शिरपेंच तदा भूवर मेजीस उडविता झाला ॥ २७० ॥
सर्वाचि भार शिरींचा भूवर धूळींत कोसळुनि पडला ।
ज्याचा नुकताच रणीं लोहित तो रंग चमकता झाला ॥ २७१ ॥
मेजीस स्थिर राहे, दोलप्साशीं लढे जयाकरतां ।
साहाय्य यास करण्या धांवुनियां येत मेनिलास अतां ॥ २७२ ॥
मेजीसाच्या जवळी घेउनियां शूल करिं उभा राहे ।
दोलप्सा नच दिसला स्कन्धीं क्षत मागुनी करूं पाहे ॥ २७३ ॥
घातजवें शूल तदा दोलप्साच्या निघे उरांतून ।
पडत अधोमुख राणीं तो. दोघे हे घुसति वरतिं धांवून ॥ २७४ ॥
स्कंधींचे पितळेचें कवच तयाचें हरावयाचें यां ।

निज बांधवांस विनवी हेक्तर या समयिं समरिं दुर्जेयां २७५ ॥
हिसितअनाच्या तनया त्या मेलानिप्पसास पहिल्यानें ।
होता पर्कोटिंत हा निज हय घेवून अभय चित्तानें ॥ २७६ ॥
हे ग्रीक दूर होते; त्यांनीं मागून आणिल्या नांवा ।
तेव्हां त्राया येउनि गाजवि हा त्रोजनांत निज नांवा ॥ २७७ ॥
प्रायमभूपाच्या हा जवळ वसे पुत्र ह्मणुन तो मानी ।
हेक्तर निंदी याला बोलुनियां वच कठोर तो मानी ॥ २७८ ॥
"मेलानिप्पस! वद रे! आह्मीं ऐसे प्रमाद कां करुं रे!।
बांधव होतां हत रणिं अद्रव तव हृदय केंवि सांग उरे! ॥२७९॥
दोलप्साच्या शस्त्रां हरण्यास्तव बघसि नच कसे झुजती?।
ये अधिं उचित नसे हें ग्रीकांशीं समरकार्य दुरुन अती ॥२८०॥
आपण वधूं तयांतें अथ ते करतील नष्ट इलियम रे!।
परिणाम साहजिक हा कीं सारा पौरजनसमूह मरे!" ॥ २८१ ॥
ऐसें वदुनी पुढतीं सरुनी त्या मागुनी निघे वीर ।
तेलामनजें ग्रीकां आजक्षेंही असा दिला धीर ॥ २८२ ॥
*" मित्रांनों! पुरुषांसम वागा अभिमान हृदयिं योग्य धरा।
बलवत्संग्रामीं या अन्योन्यांवर अपार लोभ करा ॥ २८३ ॥
अन्योन्या भक्तीनें करिती साहाय्य जे रणांत बरें ।
त्यांतिल मरती त्यांहुन जगती जन अधिक हाच अनुभव रे ॥२८४॥

---

* मान विसरलां? कीं तो सरला? रुसलां अहो सुयोधन हो?।
प्राणरहित हो, परि पळभरि मानरहित कधीं सुयोध न हो ॥ १ ॥ मोरोपंत

चपल पलायनपर जे नर त्यांचें काय रे विचारावें ! ।
यश त्यांतें कां यावें ? त्यांतें कोणी उगाच राखावें ?" ॥ २८५ ॥
ऐसें तो वदला ते उत्सुक होती अरीस हांकाया ।
ठसतां उपदेश मनीं वेढिति येउन सशूल नौका या ॥ २८६ ॥
त्रायस्थां जोव्हानें दिधला उत्साह पुढतिं सरण्यास ।
मग आन्तिलोकसाला बोले रणशूर तो मेनिलास ॥ २८७ ॥
" तुजहून आन्तिलोकस ! नाहीं रे ग्रीक तरुण कुणि अन्य ।
चपल पदांनीं तैसा बाहूंनीं सबल तूं खरा धन्य ॥ २८८ ॥
भारी इच्छा माझी कीं अज हल्ला करून जोराचा ।
त्रोजन वीरांच्या त्वां घ्यावा लचका खरेंच देहाचा ! " ॥ २८९ ॥
ऐसें वदुनी मागें सरला परि धैर्य बहु अलें यास ।
अग्रेसर लढती ते वीर तिथें हा अला लढायास ॥ २९० ॥
भाल्यानें नेम धरी न्याहाळुनि नयनिं नीट सर्वभरी ।
फेंकीत वीर भाला त्रोजन हटले भिवोनियां समरीं ॥ २९१ ॥
व्यर्थ न तच्छस्त्र सुटे हिसितअनाच्या सुतास तें लागे ।
लढतां चूचुकभागीं उरिं मेलानिप्पसास अति रागें ॥ २९२ ॥
पडतां तो ध्वनि उठला, त्यावरतीं शस्त्रभार खणखणला ।
मग वीर आन्तिलोकस उडि घेवुनियां तयावरी पडला ॥ २९३ ॥
हरिण गुहेंतुनि आलें व्याधांनीं नेम रोंखिला दुरुन ।
शस्त्रें क्षत तें झालें पडले ते श्वान वरतिं मग तुटुन ॥ २९४ ॥
अंगें चपल तयाचीं विगलित एकून एक तीं झालीं ।

मेलानिप्पस ! तुजवर तशि पाळी आन्तिलोकसें अणली ॥ २९५ ॥
कवच हराया तूझें श्वानापरि घातली उडी त्यानें ।
हेक्तर धांवुन आला जाउनियां लक्ष तेथ वेगानें ॥ २९६ ॥
रणकुशल आन्तिलोकस तेथ उभा राहिना पळे दूर ।
पशु हिंस्त्र नाश करुनी जन येण्याअधिं पळे जसा शूर ॥ २९७ ॥
आधीं श्वानां मारी, गाईच्या पालकासही हाणी ।
नन्तर पळे, तसा अज नेस्तरसुत पळतसे शूलपाणी ॥ २९८ ॥
हेक्तरमुख्य त्रोजन गर्जोनी करिति शस्त्रसंपात ।
इकडे नेस्तरसुत हा सहचरसंघापशीं अतां जात ॥ २९९ ॥
राहे उभा अणी तो, फिरवोनी तोंड मागुती पाहे ।
क्रव्याद सिंह तैसे त्रोजन घुसले अनेक आतां हे ॥ ३०० ॥
नौभागा धांवोनी जोव्हेच्छा पूर्ण करिति हें गमतें ।
उत्तेजन जोव्ह तयां देई ग्रीकांस भिववितो स्वमतें ॥ ३०१ ॥
भय त्यांचें जोव्ह हरी त्रायस्थां धैर्ययुक्त बहु करतो ।
इच्छितसे कीं व्हावा प्रायमसुत विजययुक्त हेक्तर तो ॥ ३०२ ॥
नौभागीं सर्वभरी उग्रज्वलनाग्नि अशम पसरावा ।
अन्याय्य असुनही त्या थेटिसचा हेतु सर्व पुरवावा ॥ ३०३ ॥
नौकादेशविनिर्गतदहनज्वालेस नयनिं बघण्याची ।
जोव्ह प्राज्ञ मनीं निज होता कीं वाट बघत अज साची ॥ ३०४ ॥
कारण तैसें घडतां त्रायस्थांतें पिटाळुनी परत ।
ग्रीकां द्यावें यश रणिं होतें त्याचें सदैव सिद्ध मत ॥ ३०५ ॥

ही योजना करोनी औत्सुक्यें हेक्तरास देत भर।
' नौदेशा जाळ ' ह्मणे, हेक्तर निज शूर तळपवी फार ॥ ३०६ ॥
तापातें बहु चढुनी मार्सासम कुपित फिरत रणिं जवन।
+कीं तो नाशी गिरिवरि पसरोनी चण्ड अग्नि निबिड वन ॥३०७॥
फेण मुखांतून निघे भ्रूखालीं नेत्र अग्नितें वमती।
कुंभप्रान्तीं हलतां कवच शिरींचें जनांस भिववि अती ॥ ३०८ ॥
जोव्ह नभांतुन याला करुनी साहाय्य देत विजय जनीं।
याचें मरण जवळ हें नियतीनें ठरविलें असे स्वमनीं ॥ ३०९ ॥
इतक्यांत मिनर्वेनें घातक आणून दिवस तो जवळ।
नेमी अकिलीसाचें याच्या नाशास हेतु थोर बळ ॥ ३१० ॥
जेथें उत्तम शस्त्रें घेउनियां वीरभार बहु हाले।
झुंझुनि तेथें व्यूहा हेक्तर भेदावया पुढें चाले ॥ ३११ ॥
आतुर वीर तथापिहि भंग न त्याचा करावया शकला।
रचण्यास चतुष्कोनी व्यूह बरी साधली तयांस कला ॥ ३१२ ॥
हल्ले त्यांचे सोशिति, सागरतीरीं जसा विशाल कडा।
अतिचण्ड वादळाचे सोशी आघात तेथ असुनि खडा ॥ ३१३ ॥
लाटा उसळुनि वरतीं आपटती काय त्यास परि त्याचें।
त्रायस्थांचे सोशिति हल्ले हे ग्रीक समरकुशलांचे ॥ ३१४ ॥
वाटे विस्तव वमुनी वीरगणांवर तुटून हा पडत।
जलदोत्थितवातानें लाट जवें उसळुनी पुढें सरत ॥ ३१५ ॥

+ सुरकटकीं तो तैसा जैसा प्रज्वलित वायुसख रानीं। **मोरोपंत.**

नौकेवरतीं अपटे होई जी मग्न जलतुषारांत ।
गर्जे पवन जवन मग गुरफटुनी उंच दीर्घ शीडांत ॥ ३१६ ॥
नावाडी अति भीती कांपति, कीं मरण भयद जवळि अलें ।
ग्रीकांची वृत्ति तशी रणिं पावे भंग धैर्य नच उरलें ॥ ३१७ ॥
अयुतावधि वृषभांचा कळप चरे त्या जलाढ्य भूमिवर ।
गोंवारी जवळ असे; ज्याच्या चातुर्य अंगिं नच फार ॥ ३१८ ॥
वन्य पशूनें वाधितां मोठासा वृषभ वक्र शृंगांचा ।
अल्प निवारण करण्या उचलेना त्रस्त हस्त वर याचा ॥ ३१९ ॥
कधिं पुढल्या वृषभासह कधिं चाले मार्ग मागल्यासह तो ।
मध्यें उडि मारुनियां एका वृषभास सिंह परि वधतो ॥ ३२० ॥
पळतात इतर भेणें. ग्रीकांवर वेळ येत अद्भुत ती ।
कारण तीचे दोघे, हेक्तर आणि तात जोव्ह हे दिसती ॥ ३२१ ॥
बळि हेक्तरास पडला मिसिनीअन थोर पेरिफीतीस ।
हर्क्यूलीसगृहा या दूतासह धाडि नृप युरिस्थिअस ॥ ३२२ ॥
कोप्रिअसाशीं याचें जनकसुताचें असे खरें नातें ।
हा श्रेष्ठ तनय झाला पितयातें सर्वथैव हीनातें ॥ ३२३ ॥
हा निपुण धांवणारा, मोठा झुंझार चिवट करि समर ।
मिसिनीअनांत नव्हता याच्या सम शाहणा कुणी अपर ॥ ३२४ ॥
यानें परि या वेळीं दिधलें यश सर्व हेक्तरास अज ।
ढालीच्या कांठावर वळतांना पाय पडतसे सहज ॥ ३२५ ॥
शूल निवारण करण्या यानें धरिली करांत ही ढाल ।

पायांतें झांकित जी उपयोगी परि करीत बहु हाल ३२६ ॥
अडखळुनी तिजवरतीं पूर्ण उताणा भूईवरी पडत ।
कुंभप्रान्ति शिरींचें कवच करी शब्द तो वरी उठत ॥ ३२७ ॥
हें हेक्तरास दिसलें, धांवुनियां जवळ तो उभा राहे ।
रोंवुन शूल उरीं मग दावी शतकृत्य मित्रभारा हें ॥ ३२८ ॥
यांतिल एक न आला होण्या मित्रा सहाय समयाला ।
कष्टी मनिं बहु झाले, भ्याले परि हेक्तरास कुलग्याला ॥ ३२९ ॥
नौकावलींत शिरले कीं नौका रक्षतील शेवटल्या ।
पहिल्यानें ज्या ओढुन होत्या रांगेंत सर्व रचलेल्या ॥ ३३० ॥
मागून लोटले जन, पहिली मग रांग यांस ती सुटली ।
तंबूंत सर्व जमले ग्रीकांची जूट परि नसे फुटली ॥ ३३१ ॥
पळण्यास भीति वाटे, वाटे पळण्यास लाज यां भारी ।
अरडोनी अन्योन्यां उत्तेजन देत मंडळी सारी ॥ ३३२ ॥
ग्रीकाधिप नेस्तर मग त्यांतिल सरदार तो जिरेनिअन ।
पितरांची घालुनियां शपथ तया विनवि करुनियां स्तवन ॥ ३३३ ॥
" परिसा मम मित्रानों ! पुरुषासम आज समरिं वागावें ।
ह्मणतील काय दुसरे सन्मानें तें मनांत आणावें ॥ ३३४ ॥
धन, सुत, दारा, पितरें यांतें स्वमनांत आठवा कांहीं ।
ज्याच्या मागुन उरला, मागुनियां जो उरेल त्यालाही ॥ ३३५ ॥
येथें नसती त्यांच्या वतिनें तुह्मांस आज विनवितसें ।
कीं तुह्मीं स्थिर व्हावें वळुनी पळणें न इष्ट होय तसें " ॥ ३३६ ॥

ऐसें वदुनी तेणें प्रत्येका आणिलें बल स्फुरण ।
दूर करीत मिनर्वा ईश्वरनिर्मित तमोघनावरण ॥ ३३७ ॥
दोहोंकडेस पडला नौभागीं समरिं सुप्रकाश भला ।
रणशूर सहचरांसह हेक्तर मग वीर तेथ या दिसला ॥ ३३८ ॥
लढले तेही दिसले स्वस्थ उभे तेहि मागुनी दिसले ।
हे ग्रीकपुत्र बसले आजक्षातें मुळीं न आवडलें ॥ ३३९ ॥
नौकांवरतिं चढोनी धांवाया लांब पाउलें टाकी ।
नौयुद्धदण्ड करिं घे मोठा बावीस हात लढण्या कीं ॥ ३४० ॥
कसरत अश्वांवरची येते करण्यास जेविं एकाला ।
बहुतांतुन निवडुनियां घेतो तो चपल चार अश्वांला ॥ ३४१ ॥
मैदानावरुन तयां नेतो नगराकडेस धांवडुनी ।
नरनारी पुरमार्गीं करिती आश्चर्य फार त्या बघुनी ॥ ३४२ ॥
धैर्यें अभयपणानें उडिनें बदली हयांस पळत्यांस ।
तेवीं आजक्ष उड्या मारित नौकांवरून समयास ॥ ३४३ ॥
रणनाद थोर करितो पोंचे जाऊन उंच आकाशीं ।
ग्रीकां अरडुनि सांगे " रक्षा तंबूस आणि नौकांशीं " ॥ ३४४ ॥
कवचावृत हे त्रोजन जमले तेथें उभा न हेक्तर तो ।
पिंगट गरुड जसा कीं पक्ष्यांवर झडप घालुनी उडतो ॥ ३४५ ॥
बदकांचा बगळ्यांचा हंसांचा दीर्घकंठ अनपाय ।
निर्झरणीतीरावर चरतांना विखरण्यास समुदाय ॥ ३४६ ॥
हेक्तर शूर तसा अज एका नौकेवरी तुटुन पडत ।

सामर्थ्यवान जोव्हें ईर्ष्या अणिली तया असें दिसत ॥ ३४७ ॥
तत्सैन्या त्वेष अला नौदेशीं घोर मातलें युद्ध ।
होतां न खिन्न दोन्ही सेना अश्रान्त झगडती क्रुद्ध ॥ ३४८ ॥
लढतां उभय दलांच्या आले होते मनीं विचार असे ।
ग्रीकांस वाटलें कीं नाश चुके नच, चुके न मरण तसें ॥ ३४९ ॥
त्रायस्थांच्या हृदयीं आत्मा आशा करीतसे उलट ।
नौकांतें जाळुनियां ग्रीकांचे नष्ट करुं अवश्य भट ॥ ३५० ॥
ऐसे विचार यांचे होते लढतां रणांत निकरानें ।
आशा आणि निराशा दोघी लढतात गमत अभिमानें ॥ ३५१ ॥
प्रोतीसिलास आला त्रायातें जींत बसुनि युद्धास ।
त्या नौकेच्या मग तो हेक्तर गांठीत पृष्ठभागास ॥ ३५२ ॥
सुन्दर चपल अशा या नौकेनें त्या न परत पोंचविलें ।
ग्रीक त्रोजन यांच्या नौकेशीं युद्ध मातवित पहिलें ॥ ३५३ ॥
एकामेकां वधिती करिती येवोनियां निकट लगट ।
बाणांची शूलांची बघति न ते वाट दुरुन शूर भट ॥ ३५४ ॥
राहुन जवळ जवळ ते एकमनानें रणांत अज लढती ।
परशू कुठार मोठे दीर्घ असी द्विमुख शूल करिं धरती ॥ ३५५ ॥
खड्ग स्थूल भयंकर, मुष्टि जयां कृष्णवर्ण थोर अशा ।
वीरस्कंधांवरुनी हस्तांतुनि गळति भूमिवरतिं कशा! ३५६ ॥
मग कृष्णभूमिवरुनी वाहुनि जाती प्रवाह रुधिराचे ।
हेक्तर अग्र न सोडी नौकेच्या थोर पृष्ठभागाचे ॥ ३५७ ॥

अन्तिम अग्र करानें धरुनी ईर्प्या अणी त्रोजनांस ।
"आणा विस्तव आणी आज करा हो स्वतांच युद्धास ॥ ३५८ ॥
जोव्हें एक दिला दिन मोलानें सम न ज्यास दिन सारे ।
ईशेच्छा अवमानुन, पूर्वीं आलों इथें परि कसा रे ॥ ३५९ ॥
संकटकाल तरिच तो आह्मांवर येउनी तदा पडला ।
भारी स्वभाव भित्रा वडिलांचा तो अह्मांस बहु नडला ॥ ३६० ॥
नौकांच्या पृष्ठाग्रीं लढण्या उत्सुक सदैव मीं असतां ।
मजला येउं न दिधलें इतरांतें अडविलें कशा करतां ॥ ३६१ ॥
धैर्य पळविलें अमुचें जरि तेव्हां मेघनाद जोव्हानें ।
उत्साह देइ तरि अज आज्ञा आणि करि अम्हांस अभिमानें" ॥३६२॥
ऐसें तो वदतां ते ग्रीकांवर घुसुन जाति वेगानें ।
धरितां टिकाव नच ये आजक्षाही रणांत माऱ्यानें ॥ ३६३ ॥
वाटे पडेन त्याला सरला मागें, धरी दुजी नांव ।
अपुली सोडुन देई त्रायस्थां परि करीत अटकाव ॥ ३६४ ॥
कारण विस्तव आणुन लावाया आग बहुत ते टपले ।
ग्रीकां उत्साह भरी अरडाया यास फार परि पडलें ॥ ३६५ ॥
" परिसा मम मित्रांनों ! ग्रीकांच्या थोर थोर वीरांनों ! ।
पुरुषत्व गाजवाहो उद्धत रणिं आज मार्सपुत्रांनों ॥ ३६६ ॥
करण्या साहाय्य कुणी मागें बसले असें न वाटतसे ।
मृत्यूच्या अणि अमुच्या मध्यें तट फक्त थोर एक वसे ॥ ३६७ ॥
येतां जेथुन सेना आम्हां येईल राखितां समर ।

बुरुजांनीं रक्षित तें जवळी आतां कुठें नसे नगर ॥ ३६८ ॥
इकडे सागर पसरे ! तिकडे ग्रोजन चमू महा भरली ! ।
आम्हीं मध्यें राहुन अमुची ती जन्मभूमि दुर पडली ! ॥ ३६९ ॥
समराचा त्याग अतां करुनी अमुचा निभाव आज नसे ।
*रक्षण अमुचें समरीं केल्याविण थोर यत्न होय कसें ?" ॥३७०॥
ऐसें तो वदला आणि कोपातें फार संगरीं चढला ।
ग्रोजन जो जो दिसला त्या त्यावर फेंकि दीर्घ निज भाला॥३७१॥
ग्रोजन जो उठला तो हेक्तरवचनें धरोनियां धीर ।
नौका जाळायातें वन्हि करें आणि न लावितां उशिर ॥ ३७२ ॥
परि यांतिल वीरांतें आजक्षें फेंकुनी रणीं भाला ।
केलें क्षत अचुक अजी नौकांशीं दोन आणि दश नरांला ॥३७३॥

---

*थोडे उरले रथ गज, धांवा ! श्रमल्याविना न जय जोडे । **मोरोपंत**
या उताऱ्यांतील शेवटला चरण होमरच्या ३७०व्या आर्येतील शेवटल्या चरणाशीं समानार्थ आहे परंतु संधि सांपडल्यास सूत्रमय सिद्धांत गोंवून टाकण्याची पंतांची शैली रसवत्तर आहे हें तेव्हांच दिसून येईल.

सर्ग १६ वा.

पत्रोक्लशाचा पराक्रम व मृत्यु.

सारांशः—शेवटीं **ग्री**कांस साहाय्य करण्याची **अ**किलीसाची परवानगी एका अटीवर **प**त्रोक्लश मिळवितो. ती अट अशी कीं, **ग्री**कांवरचा आलेला घोर प्रसंग टळतांच त्यानें परत यावें. **प**त्रोक्लश **अ**किलीसाचें कवच घालून **मि**र्मिदनांस समरांत नेतो. **आ**जक्षास अगदीं वेळेवर मदत करतो. व **त्रो**जनांस अगदीं जेरीस आणितो. **स**र्पिदनाचा वध करतो त्याचें शव **हे**क्तर व **ग्ला**कस पळवून नेतात; परन्तु हातीं त्याचें कवच लागत नाहीं. **अ**किलीसाजवळ केलेली अट **प**त्रोक्लश रणोत्साहाचे भरांत विसरतो. व **त्रो**जनांचा पुरतटांपर्यंत पाठलाग करतो. **अ**पालो त्यास मूर्च्छा आणतो. व **हे**क्तरहस्तें त्यास मरण प्राप्त होतें. त्यावेळेस **हे**क्तरही रणांत मृत्यू पावेल असें भविष्य करून ठेवतो. हेक्तर **आ**तोमीदनाची पाठ धरतो.

कालमानः—मागलाच दिवस. **स्थल**मानः—नौदेश, रणभूमि व पुरतट.

नौका ध्यायाकरतां यांचें हें समर चाललें इकडे ।
अकिलीसाच्या जवळी पत्रोक्लश लोकनाथ बहुत रडे ॥ १ ॥
गाळी उष्ण जलाला, गिरिवर निर्झर जणूं जलौघाला ।
अकिलीस तूर्णपद त्या पाहुनियां मानसीं बहु द्रवला ॥ २ ॥
बोले "कां रडतोसी ? पत्रोक्लश ! हे ! लहान जशि मुलगी ।
मातेजवळी धांवे घ्याया सांगून राहते न उगी ॥ ३ ॥
वसना पकडी हस्तें, जाऊं नेदी जरी तिला घाई ।
बघुनी तिच्याकडे वरि, रडते घेई न जों तिला आई ॥ ४ ॥

पत्रोक्लशा ! तसा तूं गाळिसि बहु अश्रु आज कोमल रे ।
मिर्मिदनां अथ मजला, आणियलें वृत्त कठिण सांग बरें ॥ ५ ॥
किंवा थियापुरांतिल वार्ता तुज एकल्यास रे कळली ।
मीनीशिअस नृपति तो आक्तरसुत असत का गृहीं कुशली ? ॥६॥
मिर्मिदनांत अजुनही ईआकसतनय पेलिअस वांचे ? ।
यांतिल कुणि मृत होतां गाळुं अम्हीं पूर ते आसवांचे ॥ ७ ॥
करुनी अन्यायातें नौदेशीं ग्रीक मरति अज म्हणुन ।
रडसी तर बोल अतां, मातें कळुं दे न ठेविं लपवून " ॥ ८ ॥
दीर्घ उसासा टाकुन पत्रोक्लश ! देसि यास उत्तर रे ! ।
"अकिलीस ! पेलिअससुत ! वीरोत्तम ! कोप मानसिं न धर रे ! ॥९॥
ग्रीकांतें दुःखाचा भार अतां देतसे व्यथा भारी ।
नौदेशीं क्षत मृत वा पडली बघ शूर मण्डळी सारी ॥ १० ॥
तैदिअसाचा सुत तो क्षत दायोमीद जाहला आहे ।
युलिसीस शूल कुशल हि अगमेम्नन नृपति तेविं अज पाहें ॥११॥
क्षत युरिपैलस झाला भूपति जंघेंत तीव्र बाणांनीं ।
व्हाया व्रणोपशम अज योजियले कुशल वैद्य सर्वांनीं ॥ १२ ॥
परि हे आकिलीसा! तूं द्रवल्याविण सांग राहिलास कसा ! ।
निष्ठुर हृदया! वीरा! कोप तुझा मज शिवो न हा सहसा ॥ १३ ॥
ग्रीकांचा नाश अतां नाहीं जर चुकविलास अदया ! रे ! ।
उत्तरजाता मनुजा कोणा तूं रक्षशील समया रे ! ॥ १४ ॥
सरदार पेलिअस तो नव्हता तव जनक सांगतों खास ।

जननी थेटिस नव्हती, माया सुटते तुझ्या न जीवास ॥ १५ ॥
कठिण शिलांनीं धरिला गर्भ तुझा गढुळ सागराकडुन ! ।
मातेनें का तुजला जोव्हाचा कौल ठेविला कथुन ? ॥ १६ ॥
त्या टाळाया बघसी; सत्वर तर धाड अज निदान मला ।
मिर्मिदनांची सेना मजसह दे शेष कठिण समयाला ॥ १७ ॥
ग्रीकां साहाय्य अतां साधे तर अल्प करुन पाहीन ।
दे मज कवच तुझें तें स्कन्धावर समरिं आज घालीन ॥ १८ ॥
त्रायस्थां होइल कीं मज बघुनी आहवीं तुझा भास ।
पळतां ते, विश्रान्ति श्रान्त ग्रीकां मिळेल व्यायास ॥ १९ ॥
कदनीं पडेल खळ मग. आम्हीं परि सर्व वीर हे ताजे ।
नौदेशांतुन नगरा शत्रूंतें घालवूं श्रान्त अज जे " ॥ २० ॥
एसें तो वदलासे वीर उतावळि फार सानुनय ।
दुर्दैवें परि मरणा अपणांवर घेइ ओढुनी अभय ॥ २१ ॥
दीर्घश्वासा सोडुन वदला आकिलीस तूर्णपद त्याला ।
" धिक् ! धिक् ! पत्रोक्लश ! तूं वदलासी सांग काय समयाला ? ॥ २२ ॥
जो कौल ऐकिला मी त्यालागीं मान देत मी नाहीं ।
मातेनें तद्विषयक जोव्हाचें वचन कथियलें कांहीं ॥ २३ ॥
परि हें दुःख बहुत कटु हृदयीं जीवास खातसे भारी ।
समपदभाग्नृपतीचा सत्तेचा जोर ह्मणुनि भाग हरी ॥ २४ ॥
कायमचें मुळिं दिधलें जें तें घेईल का कुणी परत ।
हें दुःख फार डंवसे सोशितसें ही व्यथा अरे ! सतत ॥ २५ ॥

मजला अर्पायातें ग्रीकसुतांनीं पसंत जी केली ।
प्राकारावृतनगरा लुटुनी जी म्यां हरोनियां नेली ॥ २६ ॥
ती आज मत्करांतुनि अगमेम्नन नृपतिनें कशी हरली ।
जणुं होय मी विदेशी, अशि माझी बहु अकीर्ति जनिं झाली ॥ २७॥
साऱ्या या गोष्टींची गतगोष्टींमाजि आज करुं गणती ।
योग्य खरोखर नाहीं बसणें मनिं रोष सतत धरुन अती ॥ २८ ॥
माझ्या नौकेशीं जों रणिंचा कल्होळ पोंचला नाहीं ।
तों मी कोप न अंवरिन वदलों होतों असेंच शब्दांहीं ॥ २९ ॥
विख्यात कवच माझें स्कन्धीं चढवून सज्ज अज व्हावें ।
रणलुब्धां मिर्मिदनां समरपथें त्वां स्वतां अतां न्यावें ॥ ३० ॥
नौभागावर पसरे त्रायस्थांचें बरेंच घनपटल ।
ग्रीकांतें दुसरिकडे विस्तृत रोधीतसे समुद्रजल ॥ ३१ ॥
उरला त्यांना नाहीं, भूमीचा भाग आज आधार ।
हें त्राय सर्व लोटे येथें अज धाष्ट्यें करुनियां फार ॥ ३२ ॥
कारण पौरजनांतें दृष्टिस पडतें न मच्छिरस्त्राण ।
ना तर सर्व खरोखर पळते हे धूम ठोकुनी जाण ॥ ३३ ॥
मजविषयीं सौम्यपणा धरता जर एत्रिअसज नृप मानी ।
खंदक भरले असते तर त्यांच्या खचित मृतशरीरांनीं ॥ ३४ ॥
बघ तूं तेंच अतां परि येथिल सैन्याबरोबरी लढत ।
दायोमीदाच्या करिं अज न मला शूल तो कुठें दिसत ॥ ३५ ॥
ग्रीकांवरचा सांगें टाळिल रे कोण हा प्रसंग अतां? ।

अगमेम्नना न बघतों निंद्य मुखानें रणांत आरडतां ।। ३६ ।।
नरहन्ता हेक्तर जो त्याचा ध्वनि कर्णि येतसे घुमतां ।
त्रायस्थां धीर अणी, करती रणनाद ते बराच अतां ॥ ३७ ॥
ग्रीकां जिंकित जाती, पत्रोक्लश तूंहि धैर्य चित्तिं धरीं ।
त्यांवर तुटुनी तूं पड नौदेशा राखण्यास अज समरीं ॥ ३८ ॥
उज्ज्वल अग्नीमाजी जाळूं देऊं नको तयां नांवा ।
रोधूं न मार्ग देतां परतें, हा सदुपदेश मानावा ।। ३९ ॥
माझ्या उपदेशाचें सार असें कथुन ठेवितों तुजशीं ।
ग्रीक मला सन्मानें देतिल यश कर रणांत सुकृति अशी ॥ ४० ॥
प्रमदा सुन्दर माझी आतां त्यांनीं फिरून धाडावी ।
बहुमूल्य आज अणखी मजला त्यांनीं उपायनें द्यावीं ॥ ४१ ॥
नौभागांतुन अरिला हांकलुनी ये बरें, तसा परत ।
जूनोपति घनगर्जन देइल वेळेस यश तुला वितत ।। ४२ ॥
त्रायस्थांशीं लढण्या इच्छुं नको एकलाच, मीं नसतां ।
कारण तेणें करशिल माझा तूं मान जनिं उणा आतां ॥ ४३ ॥
रणकंदनहर्षानें त्रायस्थां कापितां पुढें सरुनी ।
इलियमसीमेपाशीं जाउं नको तूं अरीस हटवूनी ॥ ४४ ॥
आलिंपसस्थ कोणी खालीं उतरेल नाहिंतर अमर ।
तुजवर घुसेल, फीबस त्यावर माया करीत अनिवार ॥ ४५ ॥
नौकारक्षण करुनी परतें तूं; झगडुं देइं इतरांस ।
फीबस, जोव्ह, मिनर्वा यां मीं प्रार्थीन आज अमरांस ॥ ४६ ॥

कीं जितके त्रोजन हे, तितक्यां येवो न चुकवितां मरण ।
याच दशेचा लाधो ग्रीकां अनुभव करोन घोर रण ॥ ४७ ॥
मात्र अह्मां दोघांतें करितां यावा अरिष्टनाश अज ।
त्रायाच्या बुरुजांतें देऊं उडवून पार हें समज" ॥ ४८ ॥
या गोष्टींचा करिती ऐसा दोघे तदा बराच खल ।
आतां न राहवे स्थिर, आजक्षा फार नडत शत्रुबल ॥ ४९ ॥
जोव्हाचा मंत्र तया विजित करी तेविं शत्रुचा मार ।
करि नाद कुंभभागीं कवच शिरींचें घडोनियां वार ॥ ५० ॥
शिरिंच्या उत्खचितावर कवचावर मार होतसे सतत ।
वामस्कंध तयाचा उचलुन उचलून ढाल जड दुखत ॥ ५१ ॥
सारे सशस्त्र त्याच्या भोंवतिं गर्दी करूनही त्यास ।
हलवूं शकति न तेथुन कष्टद लागे तया अतां श्वास ॥ ५२ ॥
अङ्गाङ्गांतुन त्याच्या लोटतसे घर्म सारखा भारी ।
श्वासोच्छ्वास कराया शक्ति तया उरलि नाहिं मग समरीं ॥ ५३ ॥
कारण जिकडे तिकडे संकट नव येत संकटावरतीं ।
आलिंपसवासिनि ! हे ! सांगें वाग्देवि ! सर्व वार्ता ती ॥ ५४ ॥
ग्रीकांच्या नौदेशीं अग्नीचा जाहला कसा प्रसर ।
आजक्षाच्या शूला वरतीं हेक्तर करीतसे वार ॥ ५५ ॥
शूलाग्राच्या खालीं असिचा बसला कठीण तो मार ।
पडलें अग्र तुटोनी उडुनी जें दूर खणखणे फार ॥ ५६ ॥
भग्नाग्रशूल हस्तीं हलवी आजक्ष फुकट चकचकित ।

शुद्ध मनीं तो उमगे, ईश्वरकृति बघुन होय भयचकित ॥ ५७ ॥
घनगर्जन जोव्हानें याचे मोडून टाकले बेत ।
त्रोजन विजयी व्हावे होता त्याचा मनांतला हेत ॥ ५८ ॥
शस्त्र न पोंचे ऐशा ठाया गेला निघून तो परत ।
त्रोजन परि इकडे तों नौदेशा आग घालण्या निघत ॥ ५९ ॥
सर्वत्र आग पसरे, नौपश्चाद्भाग कोरडा न उरे ।
जंघा थोपटुनी मग बोले अकिलीस " मांद्य आज पुरे ॥ ६० ॥
अश्वारोहिन्! आतां पत्रोक्लश! तूं त्वरा बहूत करीं ।
नौभागीं पसरतसे शात्रव दीप्ताग्नि ज्या न कुणि अंवरी ॥ ६१ ॥
घेइल नौका अरि अज संधि न आह्मांस दूर पळण्यास ।
अङ्गीं घालीं कवचा, जमविन तितक्यांत सर्व सैन्यास " ॥ ६२ ॥
ऐसें तो वदला मग पत्रोक्लश सज्ज करित निज काय ।
जंघात्राण चढवुनि शोभवि तो सदृढ आपुले पाय ॥ ६३ ॥
ईआकसकुलजाचें चपलपदाचें विचित्र तारकित ।
उरकवच दीर्घ चढवी अंगीं जें होय कठिण चकचकित ॥ ६४ ॥
स्कंधीं खड्ग लटकवी अपुला रजतानुविद्ध तो विकट ।
पित्तलमय ढाल तशी घेई करिं कठिण फार जी चिवट ॥ ६५ ॥
हयकेशांची ज्याला चूडा शोभे असें शिरस्त्राण ।
शिरिं घालितां तयाची मुद्रा दिसुं लागली बहू कठिण ॥ ६६ ॥
बसतील गच्च ऐसें घेई दृढ दीर्घ दोन करिं भाले ।
ईआसेदीसाचें शस्त्र तयानें परी न वाहियलें ॥ ६७ ॥

आयत जड बळकट तें इतरां ग्रीकां न फेंकितां आलें ।
अकिलीसा एकातें सामर्थ्यें सुप्रयोज्य परि झालें ॥ ६८ ॥
तो आशवृक्ष चिरनें तोडियला एक पेलिअनशिखरीं ।
ताता करुनी दिधला शूल जयें मरण अरिस ये समरीं ॥ ६९ ॥
सांगे सत्वर अश्वां रथिं आतोमीदनास जोडाया ।
अकिलीसातें वगळुन सर्वांहुन अधिक मान तो दे या ॥ ७० ॥
अरिचा सोशी घाला निष्ठेचें न्यून पडुं न दे मान ।
अश्व रथा हा जोडी झान्थस आणि बेलिअस पवनजवन ॥ ७१ ॥
हार्पी पोदार्गीला झेफिरसाच्या कडून हे झाले ।
असतां ती चरत पुरा कार्य असें ओशिअनसतटिं घडलें ॥ ७२ ॥
अकिलीसें ज्या अणिलें एइशनांतून एकदां लुटुन ।
पेदाससास संगें घेई त्या बद्ध रज्जुनें करुन ॥ ७३ ॥
हय तो मर्त्य असोनी देत असे साथ नित्य अमरहयां ।
तंबू शोधित गेला नंतर अकिलीस सैन्य जमवाया ॥ ७४ ॥
सज्ज तयानें केलें कवचावृत सकलशूर मिर्मिदनां ।
मांसाशन वृक जैसे शक्ति जयां हृदयिं फार मृगहनना ॥ ७५ ॥
पर्वतभागीं धरुनी शृंगीला फाडफाडुनी खाती ।
दंष्ट्रा सकलांच्या मग रुधिरानें होत लालभडक अती ॥ ७६ ॥
निर्झरणीजल पंकिल चाटित जातात लांब जिव्हांनीं ।
वमती भूवर बिन्दू रुधिराचे सांखतात जे रानीं ॥ ७७ ॥
कळप करोनी धांवति, हृदयींचा धीर अल्पहि न सरतां ।

उदरांस ओढ लागे लोंबति जीं खालतीं पुढें पळता ॥ ७८ ॥
मिर्मिदनांचे नायक तैसे रणिं धांवुनी पुढें सरले ।
ईआसेदीसाचा भृत्य जिथें सर्व हे तिथें जमले ॥ ७९ ॥
अकिलीस तेथ होता ईर्ष्या आणीत थोपटून हयां ।
उत्तेजन देत तसा ढाली घेउन अले सुयोध तयां ॥ ८० ॥
जोव्हप्रिय अकिलीसें नौका पन्नास आणिल्या त्राया ।
प्रत्येकिंत भट होते तेथें पन्नास फलकिं बैसाया ॥ ८१ ॥
यांतें समरा न्याया विश्वासू पांच अधिप नेमियले ।
मेनिस्थिअस करितसे एकाभागांत आधिपत्य भलें ॥ ८२ ॥
जोव्हज नद वाहतसे स्पर्किअस श्रेष्ठ विमलजल भुवरी ।
पेलिअसाची कन्या पाहुन अभिलाष मानसांत धरी ॥ ८३ ॥
रमणीय पालिदोरा याशीं रमे अल्पकाल अमराशीं ।
स्पर्किअसें मग दिधला हा मेनिस्थिअस शूर सुत तिजशीं ॥ ८४ ॥
लोकीं वार्ता अशि कीं मोठा विख्यात पेरिईरीस ।
त्याचा सुत बोरस जो लावि हिशीं लग्न धरुन रीतीस ॥ ८५ ॥
ज्यानें उपायनें तिस वैवाहिक समयिं अणुन बहु दिधलीं ।
त्याचा पुत्र भला हा म्हणती जन गोष्ट सत्य जरि नसली ॥ ८६ ॥
मेनिस्थिअस अतां तो चढवुन उरकवच येतसे समरीं ।
दुसऱ्याभागाचें तो यूदोरस वीर आधिपत्य करी ॥ ८७ ॥
फैलाससुतेला झाला चौर्यरतें पुर्वि पालिमीलेला ।
अधिगत जीनें केलें विभ्रमयुत सुभग नृत्यलीलेला ॥ ८८ ॥

मृगयाव्यसनी देवी घेई धनु जी करीं सुवर्णाचें ।
ती दायाना ठाउक, गायकगण मंदिरीं तिच्या नाचे ॥ ८९ ॥
आर्गसमर्दन मर्क्युरि तेथें हिस सहज दुरुनियां बघत ।
प्रीति तियेवर जडली वरच्या गेला क्षणीं महालांत ॥ ९० ॥
एकान्तीं तिज घेउनि मर्क्युरि होता पडोनियां शयनीं ।
यूदोरस चपल तिला झाला सुत वीर हा प्रसिद्ध जनीं ॥ ९१ ॥
ऐलिथिया ती त्याला आणितसे प्रसवदेवता जगतीं ।
तेव्हां बिंब रवीचें पाही तो भ्राजमान विशद अती ॥ ९२ ॥
ईचिक्ल्यूस तयाच्या नेई जननीस आक्तरज पाहीं ।
देई उपायनें तिस, वैवाहिक निज गृहांत मग कांहीं ॥ ९३ ॥
फैलास वृद्ध त्याला वाढवि गृहिं फार फार काळजिनें ।
शिक्षण देई त्याला प्रेमें पुत्रा परीस भक्तीनें ॥ ९४ ॥
मीमालसज पिसान्दर झाला अधिपति तृतीय भागाचा ।
पत्रोक्लशाविणें नच यासम कुणि नेम धरित भाल्याचा ॥ ९५ ॥
फीनिक्स वृद्ध अधिपति झाला तेव्हां चतुर्थ भागाचा ।
लाअर्क्यूसज आला पंचम घेऊन भाग सैन्याचा ॥ ९६ ॥
नामें प्रसिद्ध लोकीं शौर्यानें युक्त आल्किमीदन तो ।
साधिप सैन्या जमवुन त्यातें अकिलीस बोध हा करतो ॥ ९७ ॥
" तुम्हीं मिर्मिदनानों ! विसरूं नका बोललां बिभीषक तें ।
नौदेशीं त्रायस्थां हौसेनें घातलेंत भय भलतें ॥ ९८ ॥
बसलों होतों रुसुनी तेव्हां ऐसा दिलात दोष मला ।

' कोपरसें अत्युग्रें जननीनें काय पोषिलें तुजला ॥ ९९ ॥
इच्छेविरुद्ध अदया नौदेशीं ठेविलेस सहचर ते ।
जलयानीं बैसोनी आम्हीं जाऊं घरा भराभर ते ॥ १०० ॥
घातक कोपानें तव चित्त ग्रासून टाकिलें सर्व ' ।
ऐसें फिरुन फिरुन मज वदलां करुनी सभेंत बहु गर्व ॥ १०१ ॥
तें गुरुकार्य पुढें ये, वाटे ज्याविषयिं हौस तुम्हांतें ।
त्रायस्थांशि लढा हो ! हृदयीं बहु बाळगून शौर्यातें " ॥ १०२ ॥
ऐसें वदुनी त्यानें प्रत्येका धैर्य आणिलें सबल ।
नृपवचना परिसोनी सैन्याची पंक्ति दाटली सकल ॥ १०३ ॥
उच्च प्रासादाच्या भिंति कुणी रचित नीट दगडांनीं ।
बलवत्पवनजवाच्या पासुन रक्षण करावया भवनीं ॥ १०४ ॥
जितके प्रस्तर अविरल बसवी व्हायास संधि दृढ भारी ।
अविरल तितकिं चिकटती ढाली कवचें रणांत तीं सारीं ॥ १०५ ॥
ढाली ढालिंस लोटिति, कवचें कवचां, अणी भट भटांस ।
+ चूडा हयकेशांच्या चिकटति जाऊन अन्य चूडांस ॥ १०६ ॥
घनदाट समरिं इतकें चिकटोनी सैन्य जें उभें राहे ।
आतोमीदन आणी पत्रोक्लश यांस वाटतें बाहे ॥ १०७ ॥
उभयांचीं एक मनें त्यांचे दिसतात भिन्न जरि काय ।
पटगृहिं जाया धांवे इकडे अकिलीस उचलुनी पाय ॥ १०८ ॥

+ चूडा हलती, पवनें येती लहरी जशूं समुद्रास । पोप.

खजिन्याच्या पेटीचें उघडी तो रुंद दार जाऊन ।
बघण्यास फार सुन्दर बाहेरुन जी तशीच आंतून ॥ १०९ ॥
पवनाच्छादक वस्त्रें चित्रित पडदे तिच्यांत बहु भरुन ।
होती थेटिसनें ती प्रेमाची दिधलि खूण ह्मणवून ॥ ११० ॥
पेटींत एक होता प्याला ज्याचें विचित्र बहु काम ।
कोणी सुरा न त्यांतुन इतरानें चाखिली कधीं श्याम ॥ १११ ॥
जोव्हेतरा सुराला तर्पण केलें न त्यांतुनी त्यानें ।
बाहेर काढुनी त्या वासित सौगन्धिकें करी मानें ॥ ११२ ॥
स्फटिकाभ विमल उदकें पेला तो मग धुवोनियां काढी ।
प्रक्षाली निज हस्तां श्यामल मदिरा तयांत आणि वाढी ॥ ११३ ॥
मदिरासंतर्पण करि जोव्हाचें लक्ष्य वेधण्या सुमती ।
उघड्या जागेंत उभा राहोनी विनवि करुनि मुख वरतीं ॥ ११४ ॥
" दादोनीअन नृपते ! हे पेलास्जिअन ! जोव्ह ! वससि दुरी ।
सान्निध्यें तव असती सीलैनामें सदा तव पुजारी ॥ ११५ ॥
शय्या भूमितलाची सिद्धांची त्या अधौतचरणांची ।
करितां स्तव तव कर्णीं वाणी मम पोंचली विपन्नाची ॥ ११६ ॥
ग्रीकां दण्डुन माझा केलास त्वां बहूत सन्मान ।
ह्मणुनी अधिक विनंती करितों ती सर्व आज तूं मान ॥ ११७ ॥
राहीन नौसमूहीं मित्रा धाडीन सहचरां समरीं ।
मिर्मिदनांस तयाच्या संगें देइन, जयी तयांस करीं ॥ ११८ ॥
हे जोव्ह ! दीर्घगर्जन ! तद्हृदयीं धैर्य अमित आणावें ।

मन्मित्र एकला रण करतो हें कळुन हेक्तरा यावें ॥ ११९ ॥
मार्सवधोचित मत्कर करण्या साहाय्य त्या नकोत रणीं ।
साहाय्य करिन मीं तर करिल कळूंदे विचित्र किति करणी ॥१२०॥
अक्षत कवचासह त्या सहचर घेऊन थोर विजयरता ।
नौदेशांतिल शमतां प्रळय, तया येउंदे इथें परता " ॥ १२१ ॥
ऐशा शब्दें प्रार्थी, जोव्हें तें ऐकिलें तदा कानीं ।
अर्धी नाकारोनी अर्धी तो पूर्ण विनति परि मानी ॥ १२२ ॥
नौदेशांतिल कलहप्रळया मिटविल, न परत येईल ।
संतर्पण करुनी हा जोव्हा प्रार्थीत वीर सच्छील १२३ ॥
तंबूंत फिरुन गेला पेटिंत ठेवावयास तो प्याला ।
बाहेरी येवोनी फिरुन उभा राहता तदा झाला ॥ १२४ ॥
कारण चित्तांमाजी इच्छा भारी करित ही वास ।
ग्रीकांशीं त्रोजन हे लढतां नयनीं मिळो बघायास ॥ १२५ ॥
पत्रोक्लशा बरोबर सैनिक जे सज्ज होउन निघाले ।
सक्रम चालुन जाती घालति त्या त्रोजनांवरी घाले ॥ १२६ ॥
मार्गाच्या बाजूला गांधिल माशा बऱ्याच वसतात ।
त्यांतें टवाळ पोरें देति चिथावुन उगाच कोशांत ॥ १२७ ॥
त्रास तयांतें देतां कितिकांतें सारखी व्यथा होते ।
लावी नकळत त्यांतें पथिक धक्का, काय घडत मग हो तें ! ॥१२८॥
हृदयीं धाष्टर्य धरोनी राखायातें पिलांस घुसतात ।
तैसें धाष्टर्य धरोनी घुसती हे मिर्मिदन अज रणांत ॥ १२९ ॥

नौदेशीं सुरु झाला प्रळय तया कोण झटिति शमवील ।
पत्रोक्लश मित्रांतें अरडुन भर देतसे वीर्यशील ॥ १३० ॥
"हे वीर मिर्मिदन हो! अकिलीसाचे उदार सहचर हो !।
थोर पराक्रम दावा, धैर्याचा रणिं तुम्हांस विसर न हो ! ॥१३१॥
जाइल आह्मां कडुनी ग्रीकोत्तम पेलिअसज आदरिला ।
जाणेल एत्रिअसज ग्रीकोत्तम कीं उगाच बिथरविला "॥ १३२ ॥
ऐसें बोलुन तेणें प्रत्येका धैर्य आणिलें सबळ ।
ग्रीकांवरतीं त्रोजन पडले तुटुनी क्षणांत ते सकल ॥ १३३ ॥
ग्रीकांच्या नौकांतुन घुमला रणनाद घोर या समया ।
बघते झाले त्रोजन मीनीशिअसात्मजास वीरा या ॥ १३४ ॥
तो आणि त्याचे सहचर सजती दैदीप्यमान कवचांनीं ।
सर्वांचें मन झालें सत्वर अस्वस्थ फार अवसानीं ॥ १३५ ॥
पंक्तींत अव्यवस्था झाली सर्वत्र फार सैन्याच्या ।
समजति पार निघाला चित्तांतुन कोप पेलिअसजाच्या ॥ १३६ ॥
झाला मित्र अतां तो ह्मणुनी टाळावया विनाशाला ।
कवण्या मार्गें येइल, तें जो तो लागला पहायाला ॥ १३७ ॥
प्रोतीसिलास होता अपुल्या नावेंत मागल्या भागीं ।
तेथें त्रोजन जमले संघाची शक्ति मिळविण्यालागीं ॥ १३८ ॥
मध्यें त्याच्या फेंकीं पत्रोक्लश समुरुनी तदा भाला ।
पैरीक्मीसालागीं क्षत झालें; वीर दुरुन हा आला ॥ १३९ ॥
वाहे आक्सिअस नदी आमिदनीं तेथला असे वीर ।

आश्विक पीओनिअनीं घेउनि आला धरोनियां धीर ॥ १४० ॥
उजव्या स्कंधीं त्याला वार मिळुन तो धुळींत कण्हत पडे ।
पीओनिअन तयाचे सहचर पळतात पळवि मन तिकडे ॥ १४१ ॥
कारण शूर तयांचा नायक पत्रोक्लशास बळि पडला ।
हांकुनयां तो विझवी नौदेशीं अग्नि जो तया दिसला ॥ १४२ ॥
अर्धी नांव जळाली त्रोजन पडती उडून घोटाळा ।
जमुनी नौभागीं हे ग्रीक पुन्हा करिति संभ्रम निराळा ॥१४३ ॥
शिखरावरुन गिरीच्या जोव्ह करी नष्ट सत्वरी जलदा ।
दिसुं लागति उंचवटे, कंदर सेतू दऱ्या बऱ्याच तदा ॥ १४४ ॥
स्वर्गापावेतों झणिं पसरे नभ विशद मग अमर्याद ।
शात्रव पावक करुनी नष्ट तसा ग्रीक करिति रण विशद ॥ १४५ ॥
रण सोंपलें न येथें; ग्रीकांनीं त्रोजनांस पूर्णपणें ।
नव्हतें हांकुनि दिधलें, नौभागीं इष्ट त्यां असे लढणें ॥ १४६ ॥
झालें अवश्य म्हणुनी तेथुन परतून जाति लढतांना ।
सैन्याधीशांत पहा मारी एकास एक पळतांना । १४७ ॥
मीनीशिअसज रागें रोंवी आरीइलोकसा भाला ।
गेला पार निघोनी होता जंघेंत प्रथम जो शिरला ॥ १४८ ॥
परि अस्थि भग्न झालें वीर पडे भूवरी अधोवदन ।
थोआसातें गावे वार उरीं जेथ ढाल धरिति जन ॥ १४९ ॥
गात्रें विगलित झालीं, हें जाणा कार्य मेनिलासाचें ।
आम्फिक्लस धांवुन ये, पडला दृष्टीस फैलिदीसाचे ॥ १५० ॥

रोंवी शूल तयाच्या पादाग्रीं जेथ जाड पोटेरी ।
तेणें तुटले स्नायू, भरलें तम नयनिं, येउनी घेरी ॥ १९१ ॥
आतिम्निअसा शूलें, नेस्तरसुत वधित आन्तिलोकस तो ।
कुक्षींत शूल शिरतां वीर पुढें पडत तो जनां दिसतो ॥ १९२ ॥
होता जवळ शवाच्या मारिस त्या बन्धुवरुन कोप अला ।
अणि आन्तिलोकसावर गेला धांवून धरुनियां भाला ॥ १९३ ॥
परि आधिंच त्याचे ते कर गळुनी स्पर्श करित भूमीस ।
कारण शूलें स्कंधीं वार करी थ्रासिमेदीस ॥ १९४ ॥
निखळे हाड तिथोनी वीर पडे शस्त्र भार खणखणतां ।
नयन तमोवृत झाले एरिबसाचे गृहास अजि जातां ॥ १९५ ॥
ऐसें बन्धुद्वय हें मारी बन्धुद्वयास समरांत ।
दोघे जित हे सहचर सर्पिदनाचे प्रसिद्ध लोकांत ॥ १९६ ॥
जाणा सुत हे दोघे ख्यात जनीं आमिसोदारसाचे ।
जेणें अजित किमीरा वाढविली मूळ जी विनाशाचें ॥ १९७ ॥
क्लीओब्यूअस गावे आजक्षा समरिं ओइलीअसजा ।
जीवन्त हातिं आला होउन संभ्रांत वीर हा समजा ॥ १९८ ॥
मग मुष्टिबद्ध असिचा तद्ग्रीवेवरतिं करुनियां वार ।
शक्ति तयाची विगलित आजक्षें केलि समरिं आनिवार ॥ १९९ ॥
झाला समग्र आसि तो स्नात तदा विपुल उष्णरुधिरानें ।
धूमल मृत्यूसंगें कठिण बसे नियति, नयनिं धीरानें ॥ १६० ॥
पेनील्यूस व लैकन दोघे युद्धात गुंतले निकट ।

व्यर्थ तयांनीं भाले फेंकियले; नेम जाति मुळिं फुकट ॥ १६१ ॥
धांवति अन्योन्यांवर काढुन बाहेर ह्मणुन तलवारी ।
शिरकवचाच्या कोनीं लैकन मारीत घाव जड भारी ॥ १६२ ॥
भंगे मुष्टि असीची. मग पेनील्यूस पुढतिं राणिं सरला ।
कर्णाखालीं यातें ग्रीवेवर वार करित सरळ भला ॥ १६३ ॥
असि सारा आंत शिरे चर्माग्रीं अल्प चिकटुनी राहे ।
अवयव विगलित झाले, खालीं शिर लोंबतें कसें पाहें ॥ १६४ ॥
उजव्या स्कंधीं मारी आकामासास मेरिआनीस ।
होता चढत रथीं हा तों यानें गांठिला अखेरीस ॥ १६५ ॥
पडला रथांतुनी तो, नयनांवर येतसे तमःपटल ।
रोंवि इदामिनिअस मग भाला निज एरिमासमुखिं चपल ॥ १६६ ॥
मेंदूतें स्पर्शोनी शस्त्र निघालें तसेंच खालून ।
शुभ्रास्थि तुटुन गेलें, गेले ते पार दांत निखळून ॥ १६७ ॥
नयन अशुद्धें भरले, आली मग दीर्घ जांभई त्याला ।
आलें रक्त मुखांतुन, नाकपुड्यांतून त्याच समयाला ॥ १६८ ॥
मृत्यूच्या कृष्णघनें टाकियलें ग्रासुनी तयालागीं ।
ग्रीकांचे नायक हे ऐसे वीरांस मारती जागीं ॥ १६९ ॥
जैसे नाशक वृक ते तुटुनी पडतात कोंकरांवरतीं ।
कळपांतुन ओढिति त्यां, पर्वतभागांत जीं सदा चरती ॥ १७० ॥
पळती जिकडे तिकडे सावध नसतां क्षणैक अजपाल ।
वायां न संधि दवडति खाती वृक त्यां न लावितां काल ॥ १७१ ॥

मेषशिशू मरति असे कारण त्यां धैर्य हृदयीं मुळिं नाहीं ।
ग्रीक वृकांसम तैसे त्रायस्थांवरतिं घुसति लवलाहीं ॥ १७२ ॥
भयद पलायन त्यांतें आठवलें, धैर्य विसरले सर्व ।
क्षत हेक्तरास शूलें करण्या आजक्ष चित्तिं करि गर्व ॥ १७३ ॥
गोचर्मांची धरुनी हेक्तर करिं ढाल समरशिरिं असत ।
सीत्कार बाण करिती, करिती फूत्कार शूल तें बघत ॥ १७४ ॥
आधिंच कळलें त्या कीं दुसऱ्या पक्षाकडेस जय वळला ।
परि तो तेथें राहुनि रक्षितसे प्रिय अशा सहचरांला ॥ १७५ ॥
*वात प्रचण्ड उठवी जोंव्ह, तदा जलद विशद आकाशीं ।
आलिम्पसाकडोनी जाती धांवून अमरलोकांशीं ॥ १७६ ॥
तैसे त्रोजन आतां नौभागाहून पळति घाईनें ।
आक्रोश दीर्घ करुनी ओलांडिति खंदका न सोईनें ॥ १७७ ॥
त्रोजन खंदाकिं अडकुनि इच्छेच्या उलट राहिले जागीं ।
नेती परंतु वाहुन शस्त्रांसह अश्व हेक्तरालागीं ॥ १७८ ॥
त्रोजन वीरां सोडुन हेक्तर गेला पळून अवसानीं ।
इतरांचे रथ त्यजिले खंदाकिं भग्नाग्रदण्ड अश्वांनीं ॥ १७९ ॥
ग्रीकां उत्तेजुनियां पत्रोक्लश पाठलाग धूम करी ।
त्रोजन विकीर्ण झाले वाटा गेल्या भरून दूरवरी ॥ १८० ॥
उठलीं चक्रें धुळिचीं टढशाफ हय परतले पुरपथानें ।
नौदेशांतिल तंबुंस देती सोडोनियां अति भयानें ॥ १८१ ॥

---

* कुरुकटक जलदपटलाचि, सुटतां अर्जुनसमीर वितुळे तें । मोरोपंत.

त्रोजनसैन्य पळतसे संभ्रम मातोनियां पुढें जिकडे ।
पत्रोक्लश हय फिरवी वचन बिभीषक करोनियां तिकडे ॥ १८२ ॥
पाहुन तयास भेणें पडति कितीएक ते रथाखालीं ।
किति एक उलटले रथ सकलां वेळा अनिष्ट बहु झाली ॥ १८३ ॥
अमरांनीं पेलिअसा प्रेमें होते दिले तुरग जवन ।
ते खंदकावरोनी उडि घेतां लाविती अतां पळ न ॥ १८४ ॥
पाठ धरी पत्रोक्लश माराया हेक्तरास तो पाहे ।
अधिकाधिक दूर तया तेथुन तों नेत अश्वयुग राहे ॥ १८५ ॥
वेगें वर्षाव करी, जोव्ह वरोनी यदा शरत्कालीं ।
झंझावात तदा करि धरणीतें त्रस्त त्या नभाखालीं ॥ १८६ ॥
होवोनी कुपित गमे काढितसे राग मानवां वरतीं ।
करुनी निर्णय उलटा न्यायातें हद्दपार जे करती ॥ १८७ ॥
शासन करील ईश्वर सुचला नाहीं विचार हा ज्यांस ।
ज्यांस न येई करतां सत्तेचा सदुपयोग सभ्यांस ॥ १८८ ॥
त्यांच्या अपराधास्तव अतिवृष्टी जोव्ह करितसे तीनें ।
येउन पूर नद्यांतें लागति त्या वाहण्या त्वरित गतिनें ॥ १८९ ॥
जाती नगां दुभंगुनि ऐसे मोठे प्रवाह वेगाचे ।
वाहत वाहत जातां मिळती जाउन जला समुद्राचे ॥ १९० ॥
कृषिकर्में चालविण्या जाती होऊन मंद जन सकल ।
भीती चित्तीं, परिसुनि जितका निर्घोष शब्द उत्ताल ॥ १९१ ॥
त्रायस्थांच्या अश्वा तितका उत्ताल शब्द करिति अज ।

पहिली पंगत अरिची पत्रोक्लश काढि कापुनी सहज ॥ १९२ ॥
नौदेशा वीरांतें उरल्यांतें आणि हांकुनी परत ।
जाऊं नेदी नगरा उत्सुक जरि सर्व जावया पळत ॥ १९३ ॥
मध्यें नौदेशाच्या आणि नदीच्या तयांस कोंडीत ।
नंतर तटासभोंवतिं बहुतांवर सूड घेत करुन जित ॥ १९४ ॥
प्रोनोअसास भाला मारि उरीं जेथ तो धरी ढाल ।
उघडा भाग उराचा होता तेथें क्षतें करी हाल ॥ १९५ ॥
गात्रें विगलित झालीं, पडतां तो शस्त्रभार खणखणला ।
ईनप्ससुतावरतीं मग घाला थेस्टरावरी पडला ॥ १९६ ॥
पिण्ड करोनी तनुचा बसला होता रथांत भयभीत ।
रश्मि गळाल्या करिंच्या पत्रोक्लश जवळ जात बहु मुदित ॥१९७॥
उजव्या गालांतोनी भाला दन्तावलींत रोंवुनियां ।
शूल धरोनी हातीं काढि रथांतून त्यास ओढुनियां ॥ १९८ ॥
लाब शिला जलिं शिरते तीवर बसुनी जसा कुणी नर तो ।
गळ रज्जुबद्ध टाकुनि काढी मत्स्या जलांतुनी वर तो ॥ १९९ ॥
ओढी व्यात्तमुखा त्या भाल्यानें हा तसा रथांतून ।
फेंकी भूवर, अपटे वीर अधोमुख तिथें क्षणीं पडुन ॥ २०० ॥
पडतां, जीव तयाक्षणिं गेला सोडून दूर वीराला ।
मग एरियालसावर घेउन जड दगड हस्ति हा घुसला ॥ २०१ ॥
साधुन मध्य कपाळीं हाणुनियां दगड दोन करि तुकडे ।
घातक मरण तयाला व्यापितसे वीर भूमिवरतिं पडे ॥ २०२ ॥

आम्फोतीरस दुर्दम, तो ईपाल्तीस, एरिमास तसा ।
दामास्तर सुत चवथा तिलिपोलीमस न जय्य जो सहसा ॥ २०३ ॥
ऐक्यूस, एकिअस आणि वीर युइप्पस अभिज्ञ पैरिस तो ।
रणशौण्ड पालिमीलस अर्ग्यूसज वर्ण्य जो सदा गमतो ॥ २०४ ॥
इतक्या सर्वांची हा सुफल धरेवरतिं घालुनी रास ।
मीनिशिअसज समरीं पत्रोक्लश विजित करित थोरांस ॥ २०५ ॥
विगलित परिकर सहचर जित झाले सर्पिदन बघे त्यांस ।
विनवी तो अरडोनी मोठ्यानीं अमरसम लिसिअनांस ॥ २०६ ॥
" धिक्कार ! लिसिअनांनों ! पळतां कोठें ? अतां प्रयत्न करा ।
प्रतिबंध यास करतों ह्मणजे हा कोण तें कळेल जरा ॥ २०७ ॥
त्रायस्थांची यानें केली आहे बरीच नासाडी ।
शूरांचे बहुतांचे अवयव विगलित करून त्यां पाडी " ॥ २०८ ॥
ऐसें तो बोलुनियां, घेइ रथावरुनियां उडी खालीं ।
पत्रोक्लशही भूवर घेत उडी बघुन या तया कालीं ॥ २०९ ॥
कुटिल नखाचे जैसे वक्रानन गृध्र भयद ते थोर ।
क्रोधें चीत्कारोनी दीर्घ शिलेवरतिं लढति चिढखोर ॥ २१० ॥
तैसे अन्योन्यांवर धांवति हे सतत दीर्घ अरडून ।
सॅतर्नजास कुटिला यांची आली दया दुरुन बघुन ॥ २११ ॥
बोले निज भार्येला आवडत्या त्या विदग्ध भगिनीला ।
"हा ! धिक् ! हा ! धिक् ! आतां काय करावें खरेंच नियतीला ॥२१२॥
मीनीशिअसज आतां पत्रोक्लश विजित करित सर्पिदना ।

कैसें उचंबळोनी प्रेम पित्याचें व्यथा करीत मना ! ॥ २१३ ॥
लोकीं प्रियतम मम जो तो टाकी काळजींत मज दुहेरी ।
भयद रणांतुन काढुन यातें उचलून लांब करुं फेरी ? ॥ २१४ ॥
लिसिआवासि धनाढ्यां माजी ठेवूं ? कसें करूं आतां ? ।
मीनीशिअसज हस्तें करवूं जित अथ त्यजोनियां ममता"? ॥२१५॥
देवी विशाल नयना, जूनो वदली "कसें तुझें वचन ? ।
भयदा सॅतर्नसुता ! आहे कैसें कळे तुझें न मन ॥ २१६ ॥
मरणविमोचन करसी मर्त्यांचें काय रे विधिहतांचें ।
कर तैसें. इतरांचें परि मत अनुकूल नाहिं अमरांचें ॥ २१७ ॥
दुसरी गोष्ट तुला मी पुसतें तीचा करीं विचार मनीं ।
सर्पिदनास सुरक्षित पोंचवुं बघशी कशास तद्भवनीं ? ॥२१८ ॥
दुसरा सुर एकादा सुत अपुला पोंचवील मग कां न ? ।
अमरांचे बहुतांचे लढती सुत येथ धरुन अवसान ॥ २१९ ॥
प्रायमनगरी भोंवतिं जमले आहेत अमित हे तरुण ।
त्यां नेतां, अमरांवर होशिल तूं क्षुब्ध फार निष्करुण ॥ २२० ॥
तरिही तो प्रिय तुज जर, त्याची वाटे तुला दया हृदयीं ।
उत्ताल विग्रहीं तर होऊं दे विजित यास शुभ समयीं ॥ २२१ ॥
मीनीशिअस सुता दे यश तूं पत्रोक्लशा अतां समरीं ।
जीवात्मा सर्पिदना सोडिल त्या समयीं एक गोष्ट करीं ॥ २२२ ॥
मृत्यु स्वाप तयाला लिसिआपर्यंत धाडिं संगतिला ।
मग आप्त मित्र करतिल सन्मानें स्वस्थचित्त मृतविधिला ॥ २२३ ॥

बांधवतिल कबर वरी, स्तंभ यशाचा; घडावया स्मरण ।
वीरा मान न दुसरा आल्या त्याला रणांतलें मरण"॥ २२४ ॥
ऐसें जें ती वदली, सुरनरजनकास मान्य तें झालें ।
रक्ताचे बिन्दु तयें लाल धरेवरतिं फार गाळियले ॥ २२५ ॥
*मान सुताचा केला, पत्रोक्लश आज ज्यास वधणार ।
त्रायाच्या भूमिवरी राहिल तद्देश दूर परि फार ॥ २२६ ॥
दोघे जवळी येती; मग वीरा थ्रासिमीलसा लागीं ।
मित्रा सर्पिदनाच्या, पत्रोक्लश हाणि जागच्या जागीं ॥ २२७ ॥
अवयव विगलित झाले, उदरीं क्षत जाहलें अधोभागीं ।
पत्रोक्लशावरी धरि नेम चुके सर्पिदन किति अभागी ॥ २२८ ॥
अकिलीसाच्या लागे भाला पेदाससास अश्वास ।
कण्हतां धूळिंत पडतां, गेला तत्प्राण टाकितां श्वास ॥ २२९ ॥
शेष दुजे हय दोघे उधळति, मोडे धुरा क्षणीं सहसा ।
गुरफटती हय रश्मिंत, बाजूचा हय पडे धुळींत तसा ॥ २३० ॥
आतोमीदन यावरि योजितसे युक्ति एक बहु नामी ।
मांसल मांडीवरची लावी तलवार झटदिनीं कामीं ॥ २३१ ॥
पुढला मृत हय कापी, केल्याविण अल्पही न आळस तो ।
अन्य हयां सोडवुनी धरुनी रश्मी करांत मग बसतो ॥ २३२ ॥
मग हे फिरुनी फिरुनी चालविती जीवभक्षका कलहा ।
सर्पिदनाचा चुकला भाल्याचा नेम, काय योग पहा ॥ २३३ ॥

---

*शोक सुताचा केला, पत्रोक्लश आज ज्यास वधणार । पोप.

पत्रोक्लशा न लागे, वामस्कंधावरून जरि जात ।
घेवून शूल धांवे फुकट न तो सोडि हलवुनी हात ॥ २३४ ॥
उरिं लागे शूल जिथें झांकी हृदयास बरगडी मधली ।
वीराची स्वारी ती भूमीवर धाडकन तदा पडली ॥ २३५ ॥
ओकाचा वृक्ष पडे, सागाचा देवदारुचा अथवा ।
नौकार्यास्तव ज्यांना तोडिति हाणून परशु वरतिं नवा ॥ २३६ ॥
पडला तसा रथाच्या अश्वांच्याही पुढें उताणा तो ।
चावुनि दांत कडाकड, रुधिरानें सिक्त मृत्तिका खातो ॥ २३७ ॥
सिंह जसा वृषभातें, वधितो येऊन दुरुन कळपांत ।
पिंगट उदात्त दर्शन, मर्दितसे वृषभ मत्त पंजांत ॥ २३८ ॥
दंष्ट्रान्तर्गत मरतो वृषभ बिचारा क्षणांत तडफडतां ।
पत्रोक्लशशस्त्रक्षत लिसिअन नृप हा तसा मरे आतां ॥ २३९ ॥
मरतां मरतां बोले जिवलग मित्रास मारुनी हांका ।
"वीरवरा ! समय कसा, प्रियमित्रा ! ग्लाकसा ! अला बांका ! ॥२४०॥
उचित तुला वीराला, करण्या रणिं आज थोर विक्रम रे ।
उत्तालयुद्धयोगें करणें विध्वंस हा खरा क्रम रे ॥ २४१ ॥
पहिल्यानें सर्वभरी, लिसिअन मुख्यांस विनवुनी सांग ।
सर्पिदनाच्या भोंवतिं युद्ध कराया करीं तया भाग ॥ २४२ ॥
तूं शूलहस्त झगडें माझ्या करतां; दुजें न कारण रे ।
नौदेशीं पडलों मीं करितां करितां भयाण अज रण रे ॥ २४३ ॥
हरतील कवच माझें ग्रीक तरी केवढी तुला लाज ।

अवमानें शेष तुझे दूषित दिन जावया घडे काज ॥ २४४ ॥
*सतत श्रमुनी तें कर जेणें सोत्साह सैन्य हें वागे "।
ऐसें वदतां त्याच्या नासापुटिं नयनिं मरण दिसुं लागे ॥ २४५ ॥
अरिच्या उरिं देउनि पद पत्रोक्लश उपटि शूल रुतलेला ।
त्यासह बरगडि आली; जोर जसा काढण्या तयें केला ॥ २४६ ॥
तत्प्राणासह काढी शूलाचें अग्र वीर बाहेर ।
मिर्मिदनांनीं धरिले त्याचे हय होति जे न रणिं जेर ॥ २४७ ॥
सोडून रथ धन्याचा उत्सुक जे जावया दुरी पळती ।
मित्रस्वरास परिसुनि कष्टी ग्लाकस मनांत होइ अती ॥ २४८ ॥
कारण समर्थ नव्हता त्यातें साहाय्य अज करायास ।
बाहु करीं धरुनि परी चेंपी, होती तयास आयास ॥ २४९ ॥
क्षत झालें दुःसह त्या ट्यूसरशर लागतां वरी तिखट ।
मित्रां रक्षित होता ध्याया घुसतां पुरा विशाल तट ॥ २५० ॥
दूरविमुक्तशरा तो प्रार्थि अपालोस " हे नृपा ! परिसें ।
लिसिआ संस्थानीं वा वससी त्रायांत हें कुणा न दिसे ? ॥२५१॥
सर्वत्र ऐकुं शकसी तूं आर्तप्रार्थना सदा सहज ।
मजवरिं हें आलें बघ दुःख तरी केवढें असह्य अज ॥ २५२ ॥
क्षत झालें पीडाकर सर्व भरी लागल्या करास कळा ।
रुधिरस्नान न अंवरे झाला हा स्कंध बधिर जड सगळा ॥२५३॥
भाला स्थिर धरवेना, अरिशीं लढवे पुढें न सरुनि मज ।

*स्वजनां देउन भर रणिं मृतसंख्येमाजि वाल भर रागें । पोप.

रणिं शूर वीर पडला जोव्हात्मज सर्पिदन अशी समज ॥२५४॥
साहाय्य निज सुतासहि जोव्ह करीना, कसा चमत्कार ।
क्षत हें बरें करोनी नृपते! वांचीव यातना फार ॥ २५५ ॥
देई शक्ति विपुल मज देतों भर लिसिअनां सहचरांस ।
लढवीन आग्रहें त्यां शत्रूशीं लढुन राखिन शवास " ॥ २५६ ॥
ऐसें प्रार्थितसे तों फीबस त्या देत मान परिसून ।
शमवी कळा तयाच्या टाकी क्षत रुधिर सर्व सुकवून ॥ २५७ ॥
देई शक्ति तयाला; सारें हें ग्लाकसा कळून अलें ।
मानी सुख कीं ईशा अभ्यर्थित वाक्य सकलही रुचलें ॥२५८॥
सर्वभरी जावोनी, लिसिअनमुख्यांस देत तो धीर ।
सर्पिदनास्तव लढण्या केले त्यानें तयार रणिं वीर ॥ २५९ ॥
टाकुनियां लांब पदें भेटे जावोनियां त्रोजनांस ।
तो आजिनार जेथें, पॅन्थौसज आणि पालिदामास ॥ २६० ॥
भेटून ईनिआसा, भेटे जाऊन हेक्तरालाही ।
जवळ उभा राहोनी बोले लागून शब्द त्या कांहीं ॥ २६१ ॥
" हेक्तर! हे! आज तुवां, मित्रा पुरतें उपेक्षिलें समरीं ।
मरती त्वदर्थ सगळे, देशीं मित्रां त्यजून दूरवरी ॥ २६२ ॥
करण्या साहाय्य तयां इच्छा तूझी परी अतां नाहीं ।
झाला विलुप्तजीवित लिसिअन नृप सर्पिदन कसा पाहीं ॥ २६३ ॥
लिसिआ रक्षिलि जेणें, न्यायानें आणि विकट शौर्यानें ।
मारिलें त्या जित केलें, पत्रोक्लशहस्तविधृत शूलानें ॥ २६४ ॥

मित्रांनों ! जा जवळी येऊंदे राग मानसीं याचा ।
नच तर हरून नेतिल त्याच्या समरांत मिर्मिदन कवचा ॥ २६५ ॥
आणि शवाची करतिल फार अपेष्टा धरून सूड मनीं ।
कारण आम्हीं ग्रीकां नौदेशीं मारिलें असे कदनीं " ॥ २६६ ॥
ऐसें तो वदतां त्या त्रायस्थां दुःख होत दुःसह तें ।
असुनि विदेशी होता आधारस्तंभ थोर नगरातें ॥ २६७ ॥
आलें त्यासह दल बहु त्यामाजी हा बलाढ्य बहु वीर ।
म्हणुनी ग्रीकांवरतीं गेले चालून हे धरुन धीर ॥ २६८ ॥
सर्पिदनास्तव होउन हेक्तर हा क्रुद्ध, होतसे पुढतीं ।
ग्रीकां मीनीशिअसज पत्रोक्लश देत भर रणांत अती ॥ २६९ ॥
आजक्षां तो बोले होते बहु जरि मनांत उत्सुक ते ।
"आजक्षांनों ! अरिचें द्यावें दल हांकलोनियां पुरतें ॥ २७० ॥
पावाल हर्ष तेणें होतां त्याहून शूरतर व्हाल ।
शूरांत शूर होतां तुह्मीं वीरांत वीर जंजाल ॥ २७१ ॥
ज्यानें ग्रीकांचा तट भेदियला प्रथम धीट वीरानें ।
तो शूर सर्पिदन अज पावतसे पतन दीर्घ कालानें ॥ २७२ ॥
इच्छा मनिंची ही कीं आज तयाचा करून अपमान ।
स्कंधींचें कवच हरूं, रक्षुं बघे त्याचि उडवुं या मान " ॥ २७३ ॥
ऐसें तो वदला परि होते हे सज्ज अरिस हांकाया ।
उभय दलांनीं अपुल्या ठेवियल्या पंक्ति रचुन या समया ॥ २७४ ॥
त्रोजन लिसिअन इकडे, मिर्मिदनांसहित एकियन तिकडे ।

झगडति शवा सभोंवति, अरडति तेणें दुजांस भीति पडे ॥२७५ ॥
शस्त्रें खणखण वाजति, पसरि निशा जोव्ह तो रणावरतीं ।
प्रियपुत्राविषयींच्या कलहा यावी भयाण ती भरती ॥ २७६ ॥
ग्रीकां विलोलनयनां त्रोजन देती बरेच हांकून ।
मिर्मिदनांतिल झाला मृत नृप, नव्हता रणांत जो न्यून ॥ २७७ ॥
आगाक्लीसज हा कीं ईपीज्यूसाह्व होय सुज्ञमति ।
थोर जनाकीर्ण पुरी बुदिअम, तेथिल उदार हा नृपति ॥ २७८ ॥
बान्धववध करुनि पुरीं, गेला सोडून निज पुरा अपण ।
आला पेलिअसाला थेटिसला शरण धरुन नम्रपण ॥ २७९ ॥
अकिलीसाच्या सह ते देती धाडून इलियमास तया ।
त्रायस्थांशीं लढण्या होइल उपयोग योग्य त्या समया ॥ २८० ॥
होता धरित शवा हा हेक्तर मारीत त्यास दगड अतां ।
लागे दगड कपालीं, पिंजे जें कवचही वरी असतां ॥ २८१ ॥
उन्मुख पडे शवावर आत्मध्वंसक अलें तया मरण ।
पत्रोक्लशास झालें मित्रवधाचें बरेंच दुःख पण ॥ २८२ ॥
अग्रेसर वीरांतुन घुसला हा श्येन जवन जणुं उडुन ।
जो द्रोणकाक वायस इत्यांदिस लावि दूर पळवून ॥ २८३ ॥
आश्विक पत्रोक्लश हे ! त्रायस्थांवरतिं लिसिअनांवरतिं ।
जाशी बा धांवोनी ! मित्रवधें क्रोध येत तुजसिं अति ॥ २८४ ॥
स्थेनीलासा मारी ऐथीमीन्यूसजा तदा दगड ।
तद्ग्रीवेचे स्नायू गेले भंगून असुन बहुत जड ॥ २८५ ॥

हेक्तर अणि वीर दुजे अग्रेसर भिउन परतती मागें ।
इतकाच लांब जातो शूल कुणी फेंकिला जरी रागें ॥ २८६ ॥
जितका खेळत असतां बहुतांनीं लांब फेंकिला भाला ।
जितका ध्वंसक अरिवरि शूरांनीं थोर विजयलाभाला ॥ २८७ ॥
तितका भाग रणींचा त्रोजन हरतां अले क्रमून अतां ।
ग्रीक तयां हांकति तों ग्लाकस लिसिअनप फिरतसे पळतां ॥२८८॥
हेलासस्थास वधी बाथिक्लीसास चाल्कनसुतास ।
मिर्मिद्नांत धनाची होता भोगीत थोर हा रास ॥ २८९ ॥
अवचित वळुनी मागें ग्लाकस मध्यें तयास उरिं मारी ।
तो पाठलाग करतां गावे हातांत नेमका भारी ॥ २९० ॥
शूल तया लागुन तो पडतां ध्वनि दीर्घ होतसे सहज ।
ग्रीकांस दुःख झालें पावे कीं थोर वीर पतन अज ॥ २९१ ॥
त्रोजन मुदित जहाले संभ्रम करिती तया सभोंवार ।
ग्रीक न युद्ध विसरले नेती अरिवरतिं सर्व दलभार ॥ २९२ ॥
त्रायस्थांतिल एका वीरा मारीत मेरिआनीस ।
लाओगोनस पडला ओनीतरसुत न धरुन भीतीस ॥ २९३ ॥
जनक तयाचा होता पूज्य पुजारी उदार जोव्हाचा ।
देवापरि वंद्य जनां त्यावर ये काल पुत्रविरहाचा ॥ २९४ ॥
कानाच्या खालीं अणि जबड्याच्या वरतिं लागला वार ।
गात्रांस जीव सोडी पसरे त्याच्या वरून तम फार ॥ २९५ ॥
ढालीनें तनु रक्षुन चालुन ये पुढति मेरिआनीस ।

त्यावरतिं ईनिआसें धरिलासे नेम योग्य अवधीस ॥ २९६ ॥
तें त्यानें पाहोनी भाल्याचा नेम चुकविला सहज ।
वांके खालीं तों तें वरुनी शूलाग्र भूंत रुतत अज ॥ २९७ ॥
हलतां अग्र दुजें वर शूलाचा जोर खरचुनी जाय ।
ही ईनिआसकरधृत शूलाची वाट जाहली काय ! ॥ २९८ ॥
कांपत धरणींत शिरे, शूल सुटे व्यर्थ तत्करांतून ।
मग ईनिआस बोले गेला जो मानसांत तापून ॥ २९९ ॥
"जर शूल लागता तुज खचित अरे ! परिस मेरिआनीस ! ।
असती नर्तक तरि ही करता उपशम तुझा अखेरीस "॥ ३०० ॥
परत तयाला बोले, शूली विख्यात मेरिआनीस ।
"आहेत अडचणी बहु ऐशा या ईनिआस! गोष्टीस ॥ ३०१ ॥
पाडाव तुझा करण्या येतिल तितक्या अनेक वीरांचा ।
आहेस शूर परि तूं करशिल उच्छेद काय सर्वांचा ? ॥ ३०२ ॥
आहेस मर्त्य तूंही तुजवरतीं नेम नीट मी धरिला ।
मध्यें तनुवर केला शूलाचा घाय अचुक जर पहिला ॥ ३०३ ॥
असुनी शूर बहुत तूं, असुनी तुजला घमेंड शक्तिची ।
देशील कीर्ति मजला, आत्मा प्लूतोस; गोष्ट रीतीची " ॥ ३०४ ॥
ऐसें तो वदला मग मीनीशिअसज तयास उत्तर दे ।
"वाक्पाटव मित्रा कां असुनी तूं शूर करिशि फार वदें ॥ ३०५ ॥
त्रोजन शवा न देतिल निंद्यवचें कधिंहि मेरिआनीस ! ।
* मान वचा नच देतिल जैसा ते थोर समरिंच्या कृतिस ॥३०६॥

* शोभे समरींच तसा न भटांच्या भाषणीं महायास. **मोरोपंत.**

पहिल्यानें बहुतांचा उदरीं संग्रह करील भू न कशी ! ।
युद्धाचा हस्तांशीं उपदेशाचा प्रसंग शब्दांशीं ॥ ३०७ ॥
+ ह्मणुनी अवश्य नाहीं शब्दाला शब्द उगिच वाढवणें ।
नलगे वाग्युद्ध मला समरींचें युद्ध पाहिजे करणें " ॥ ३०८ ॥
ऐसें वदुनी तेणें धरिलासे सरळ मार्ग युद्धाचा ।
याचे मागुन जाई संग्रह सुरसम अनेक वीरांचा ॥ ३०९ ॥
पर्वतदरींत उठतो ध्वनि जो लांकूड तोडण्याचा तो ।
जैसा घुमतां घुमतां ऐकाया लांब दूरवर जातो ॥ ३१० ॥
शस्त्रध्वनि उठला तो तैसा अज दूरवरहि ये कानीं ।

+ रामानीं असेंच ह्मटलें आहे.

कत्थसे किं वृथा रक्षो बहून्यसदृशानि ते ।
न रणे शक्यते जेतुं विना युद्धेन वाग्बलात् ॥

अर्थः—हे राक्षसा ! तुला न शोभणाऱ्या अशा पुष्कळ वल्गना उगाच कशाला करीत आहेस ? युद्धावांचून नुसत्या वाणीच्या जोरावर शत्रूचा पराभव होणें शक्य नाहीं.

कर्ण ह्मणे राजसुता ! बहु न वदें, बाहुपौरुष प्रकटीं ।
विक्रमरहितें वचनें शोभति न जनीं, जसीं मुखें नकटीं ॥ १ ॥
अस्मन्मानस तव भुजपौरुष देखावया असे लोल ।
बोल प्रहार; बोलें मोल तयाचें नव्हे; दुजें फोल ॥ २ ॥ **मोरोपंत.**

शस्त्रप्रहार हेच तुझे बोल कर; प्रहारांचें मोल बोलांनीं होणार नाहीं. प्रहारांहून इतर सर्व बोल फोल आहेत. हें **कर्णाचें** भाषण **पत्रोक्लशाच्या** भाषणाप्रमाणें उत्तम आहे.

दोघे अन्योन्यांतें मारिति, असिनीं व दीर्घ शूलांनीं ॥ ३११ ॥
ढालींचें चर्म तसें पित्तलमय वलय खणखणा वाजे ।
सर्पिदना वळखाया शकति न जन असति पूर्ण शोधक जे ॥३१२॥
डोक्यापासुनि वरुनी तळव्यापर्यंत सारखा खालीं ।
शस्त्रांनीं रुधिरानें धुळिनें गेला भरून या कालीं ॥ ३१३ ॥
वीर शवाच्या भोंवतिं, जमति वसंतीं बहूत त्या माशा ।
आर्द्र पयःकुंभावर गोंगावति पण्यवीथिकेंत जशा ॥ ३१४ ॥
तैसे वीर बहूपरि सर्व शवाच्या सभोंवतीं जमले ।
उद्धत कलहावरुनी जोव्हानें फिरविले न नयन भले ॥ ३१५ ॥
ऐसें त्यातें बघुनी पत्रोक्तश निधनकार्य मनिं आणी ।
सर्पिदनातें वधुनी हेक्तर दावो प्रशस्य निज करणी ॥ ३१६ ॥
स्कंधावरिल तयाच्या घेवो काढून शीघ्र कवचास ।
अथवा युद्धप्रसरें बहुतां होवोत कष्ट वीरांस ॥ ३१७ ॥
ऐसा विचार करतां निश्चय तन्मानसांत हा शिरत ।
"अकिलीसाच्या दूतें न्यावें या त्रोजनांस हटवीत ॥ ३१८ ॥
नगरतटापावेतों हेक्तर अज सजन हांकिला जावा ।
बहुतांचा जीव तयें लढतां लढतां सलील तो घ्यावा ॥ ३१९ ॥
भीरु भया म्हणुन तयें हेक्तर हृदयांत शिरविलें प्रथम ।
चढुनी रथांत निज घरि पळण्याचा मार्ग जो असे अधम ॥३२०॥
उपदेशी त्रायस्थां पळण्यातें, ज्या जसें रणीं सुचलें ।
जोव्हाचें काय कसें आहे परिमाण तें तया कळलें ॥ ३२१ ॥

लिसिअन शूर असूनही नाहीं तेथें मुळींच कुणि उरले ।
वळले सर्व पळाया मृत झाला भूप म्हणुन भय पडलें ॥ ३२२ ॥
भूवरि भूपशव पडे, त्यावरतीं इतर बहु शवें पडलीं ।
संग्रामकृति भयंकर जोव्हानें बहुत काळ मातवली ॥ ३२३ ॥
मीनीशिअसज हरि मग पित्तलमय थोर सर्पिदनकवच ।
नौदेशा तें न्याया मित्रापर्शि देत काढितां न वच ॥ ३२४ ॥
जोव्ह अपालोस वदे " प्रिय फीबस ! तूं अतां पुढें जावें ।
सर्पिदनाचें शव अज राशींतुन ओढुनी अधीं घ्यावें ॥ ३२५ ॥
वरचें अशुद्ध सारें काढोनी धुवुन पूर्ण त्या न्यावें ।
दूर नदीवर तेथें त्यास जलस्नान नीट घालावें ३२६ ॥
कफन अनश्वर घालुन अमृतें त्या लिप्त आंत ठेवावें ।
मृत्यु स्वाप असे ते ' बन्धु जुळे ' तत्करांत त्या द्यावें ॥ ३२७ ॥
लिसिआ संस्थाना त्या नेतिल ते करुन नीट सोबतिला ।
मग आप्त मित्र करतिल सन्मानें स्वस्थचित्त मृतविधिला ॥ ३२८ ॥
बांधवतिल कबर वरी, स्तंभ यशाचा घडावया स्मरण ।
वीरा मान न दुसरा, आल्या त्याला रणांतलें मरण " ३२९ ॥
ऐसें तो वदतां तें सादर फीबस करीतसे श्रवण ।
उतरुन इडाद्रिवरुनी संग्रामस्थानिं पातला प्रवण ॥ ३३० ॥
शस्त्रांच्या मार्गांतुन सर्पिदना नेइ दूर काढून ।
दूर नदीवर नेउन ठेवी त्या स्नान नीट घालून ॥ ३३१ ॥
कफन अनश्वर घालुन अमृतानें लिप्त आंत ठेवि तया ।

मृत्यु स्वाप असे जे बन्धु जुळे त्यांपशीं तया द्याया ॥ ३३२ ॥
वाहक चपल बरे हे, त्या न्याया योग्य लक्ष लावून ।
लिशिआ संस्थानीं या त्यांनीं नेलें सविनय वाहून ॥ ३३३ ॥
इकडे पत्रोक्लश निज अश्वांलागीं बरेंच धांवाडित ।
आतोमीद्न संगें घेउनियां पाठ शत्रुची धरित ॥ ३३४ ॥
त्रोजन लिसिअन पळती त्यांच्या हा वीर लागला मागें ।
त्वां घेतलास अपुला हतबुद्धे! नाश करुनि कां सांगें ॥ ३३५ ॥
अकिलीसादिष्ट दिशा धरिली असती जरी खरी यानें ।
मरणाच्या दुर्नियतिस जाता चुकवुन घरा बहु सुखानें ॥ ३३६ ॥
परि मनुजांच्याहूनी इच्छा ती प्रबल होय जोव्हाची ।
पळवि बलिष्ठा समरीं, देवुनियां स्फूर्ति आधिं युद्धाची ॥ ३३७ ॥
नेई तद्यश हरुनी. जेणें तुज धैर्य हृदयिं अज दिधलें ।
पत्रोक्लश! तेणें तुज मरणपथा ईश्वरें अतां अणिलें ॥ ३३८ ॥
अधिं कोण कोण मागुन तुज बळि पडले अशा प्रसंगास ।
अद्रास्तस, ईचीक्लस, आतोनोअस तसाच पेरिमस ॥ ३३९ ॥
एपिस्तर, एलासस, मेलानिप्पस व मूलिअस शूर ।
आणि पिलार्तीस असे हत होतां पळति इतर बहु दूर ॥ ३४० ॥
उच्चद्वाराच्या त्या त्रायातें ग्रीक जिंकिते खचित ।
होता सशूल गर्जत पत्रोक्लश वेळ पाहुनी उचित ॥ ३४१ ॥
तुंग तटावर फीबस इच्छी वाईट बसुन परि याचें ।
त्रायस्थां भर देई पत्रोक्लश उगिच यापुढें नाचे ॥ ३४२ ॥

प्राकारावर चढण्या यत्न तयें तीन वेळ जो केला ।
तो तीन वेळ वेगें निष्फलतेलागिं फीबसें नेला ॥ ३४३ ॥
अपुल्या अमरकरांनीं त्याची मग धोपटीतसे ढाल ।
चवथ्यानें पत्रोक्लश धांवतसे करुन जावया चाल ॥ ३४४ ॥
दूरक्षेपक फीबस निर्भर्त्सक बोलला तया वचन ।
" परतें ! जोव्हज ! आतां पत्रोक्लश ! धरिं उगाच आग्रह न ! ॥३४५॥
ठरलें नाहिं असें कीं त्रायस्थांची विशाल ही नगरी ।
तूं व तुझा बलवत्तर जिंकिल आकिलीस एकवार तरी " ॥ ३४६ ॥
ऐसें तो वदला मग शमवाया कोप फीबसाचा तो ।
पत्रोक्लश दूरवरी माघारा परतुनी तदा जातो ॥ ३४७ ॥
इकडे स्कीअनगोपुरिं हेक्तर निज अश्व थांबवुन धरतो ।
जनसंमर्दीं जावें, आणि लढावें न वा मनीं ह्मणतो ॥ ३४८ ॥
किंवा आंत तटांच्या जन जमवाया निदेश धाडावा ।
ऐसा हा विचरे तो फीबस बनला विदग्ध वीर नवा ॥ ३४९ ॥
आशिअसाच्या रूपा धरुनी राहे उभा तया जवळी ।
हा होय हेक्तराचा मातुल लोकीं प्रसिद्ध वीर बळी ॥ ३५० ॥
त्या थोर हेक्युबेचा भ्राता सोदर दिमास जनक जया ।
फ्रिजिएंत वास जो करि, संगरिअसतीरिं शान्तिच्या समया ॥ ३५१ ॥
त्याचें रूप धरोनी फीबस बोले " कशास हेक्तर हे !
थांबविसी रणकंदन, शोभत नाहीं मुळीं तुला तर रे ॥ ३५२ ॥
जितका निर्बल तुजहुन, तितका मी प्रबल आज जर असतों ।

रणविन्मुखा तुला मग सांग कसा लब्धहानिला बघतों ! ॥ ३९३ ॥
पत्रोक्लशावरी ने दृढशफ हय चपल, ये परी आतां ।
दैवें तयास वधशिल, फीबस आहे तुला यशोदाता " ॥ ३९४ ॥
ऐसें बोलुन सुर तो शिरुनी गर्दींत मिसळुनी जाई ।
सूता सांगे हेक्तर " न्यावे हय मारुनी करुनि घाई " ॥ ३९५ ॥
धांवुन पुढें अपाले गेला गर्दींत मिसळुनी पार ।
ग्रीकांत उडवि संभ्रम यश मोठें त्रोजनांस दे फार ॥ ३९६ ॥
हेक्तर करुन उपेक्षा सोडी ग्रीकांस आज इतरांस ।
त्यां हा मुळिंच वधीना शोधी पत्रोक्लशास एकास ॥ ३९७ ॥
त्यावर चालवि निज हय, पत्रोक्लश घे उडी रथाखालीं ।
वामकरीं धरि भाला, इतर करीं दीर्घ दगड या कालीं ॥ ३९८ ॥
खडबडित शुभ्र ऐसा हस्तें कवळून उंच तो उचली ।
शक्ति बहू खरचोनी फेंकी तद्दृष्टि फार नच चुकली ॥ ३९९ ॥
हेक्तरसन्निध पडला व्यर्थ नसे फेंकिला करांतून ;
सूतातें लागतसे नीट कपाळावरी जरी दुरुन ॥ ३६० ॥
प्रायमनृपतीच्या हा दासीचा पुत्र सेब्रिआनीस ।
हयरश्मी करिं धरितां झाला क्षत या अनिष्ट संधीस ॥ ३६१ ॥
चुरलें भ्रुकुटीद्वय तें, अस्थींला घाव सोसला नाहीं ।
निखळुन पडे पदाग्रीं नयनांचें युगुल धुळिंत तें पाहीं ॥ ३६२ ॥
पाणबुड्यासम पडला रथिच्या तो आसनावरुन खालीं ।
आणी अस्थिस सोडुनी गेला तज्जीवही तया कालीं ॥ ३६३ ॥

परि पत्रोक्लश ! त्याला निर्भर्त्सक बोललास हें वचन ।
“ हे देवांनों! आहे चपल खरा हा मनुष्य, हो ज्वान ॥ ३६४ ॥
पोंहे किति चपळपणें ! मत्स्याकुल सागरांत हा असता ।
मौक्तिक शुक्तिस शोधित, बहुतांलागीं खचीत तोषविता ॥ ३६५ ॥
नौकेंतुन घेतां उडि असतां संक्षुब्ध फार सागर तो ।
तैसा रथावरोनी उडि घेउन पोंहतो भराभर तो ॥ ३६६ ॥
निःसंशय भरलें हें त्रोजनदल थोर पोंहणारांनीं !” ।
ऐसें वदुनी गेला मृतसूतावरतिं वीर अभिमानी ॥ ३६७ ॥
वेग धरी सिंहाचा कळपाची जो करीत नासाडी ।
होतां क्षत ज्यास उरीं अवसानीं धैर्यही जया सांडी ॥ ३६८ ॥
तूं गांठिलास उडिनें पत्रोक्लश ! सूत सेब्रिआनीस ।
उतरे खालीं हेक्तर उडि घेउन शीघ्र याच संधीस ॥ ३६९ ॥
दोघे जणुं सिंह तसे, सूताच्या भांडती शवासाठीं ।
चवताळुनियां जाती क्षुधित जसे हतमृगार्थ गिरिकंठीं ॥ ३७० ॥
सूतशवाकरतां हे झगडति दोघे अतां रणस्वामी ।
हेक्तर, मीनीशिअसज पत्रोक्लश वीर अन्य रणधामीं ॥ ३७१ ॥
पित्तलमय शस्त्रांनीं अन्योन्यां फाडण्यास हे बघती ।
हेक्तर धरि अरिमस्तक सोडीना वीर जोर करित अती ॥ ३७२ ॥
ग्रीक त्रोजन नंतर झाले कलहांत गूढ मग अमित ।
पूर्वानिल झगडतसे, जैसा कीं दक्षिणानिलासहित ॥ ३७३ ॥
पर्वतदरींत हलती विस्तृत तरु बीच, आश, कर्नल ते ।

शाखा सशब्द घर्षति भंगति तरु रव करोनि निष्फळ ते ॥ ३७४ ॥
ग्रीक त्रोजन तैसे झगडुनि रणिं देहभंग करतात ।
निंद्या पलायनेच्छा कोणाच्याही शिरे न चित्तांत ॥ ३७५ ॥
अगणित शूलांनीं रणिं विद्धतनू पडत सेब्रिआनीस ।
ज्यानिर्गत शर तैसे नर पडले, कोण करिल गणतीस ॥ ३७६ ॥
याच्या भोंवतिं लढती त्यांच्या ढालीवरी दगड पडले ।
वीरांच्या तनुंवरतीं ढीगांवर ढीग केवढे बसले ॥ ३७७ ॥
वीर धुळींत गढोनी, आश्विक विद्येस विसरुनी निजला ।
शस्त्राशस्त्री चाले, जों रवि तो गगनमध्यतालिं चढला ॥ ३७८ ॥
समतोल समर राहे अमित जरी वीर पावले पतन ।
गगनपथा आक्रमतां करुं लागे पश्चिमेस रवि गमन ॥ ३७९ ॥
ग्रीकांची मग झाली नियतीच्याही विरुद्ध रणिं सरशी ।
स्वजनावृत मृत सूता, ओढिति ढकलून वरिल शस्त्रांशीं ॥ ३८० ॥
स्कन्धींचें काढुनियां घेती ते कवच जड व चकचकित ।
त्रायस्थांविषयीं मग पत्रोक्लश चित्तिं अहित योजीत ॥ ३८१ ॥
त्यांवर जाई धांवत मार्सासम यत्न तीनदां करुन ।
गर्जे घोर भयंकर नउ वीरां तीनदां तसें वधुन ॥ ३८२ ॥
अमरांसम चवथ्यानें केला अभियोग रणिं तुवां लढतां ।
तेव्हां रे पत्रोक्लश ! मृत्यु तुझा व्यक्त जाहला परता ३८३ ॥
फीबस तुजला गांठी, गर्दीतुन पाहिलास येतां न ।
कारण आवृत होता दाट तमानें जयास उपमा न ॥ ३८४ ॥

लपुन उभा मागोनी, खांदे आणि रुंद पाठ यांवरतीं ।
देई चापट बघुनी भोंवळ नयनांस फिरवि गरगर ती ॥ ३८५ ॥
डोक्यावरुनी खालीं फीबस पाडीतसे शिरस्त्राण ।
चतुरस्त्र शब्द करुनी अश्वपदांखालिं घडघडे जाण ॥ ३८६ ॥
धूलीनें रुधिरानें लांब तुरा लडबडे तसा खालीं ।
होउं दिलेलें नव्हतें ऐसें जें पुर्विंच्या कधीं कालीं ॥ ३८७ ॥
तें हें कवच तुऱ्याचें मळलें मातींत पडुनियां खालीं ।
अकिलीसातें रक्षित होतें चमकून जें सदा भालीं ॥ ३८८ ॥
शिर कवच तेंच जोव्हें दिधलें अज हेक्तरास घालाया ।
आला खराच याच्या नाशाचा काळ जवळ या समया ॥ ३८९ ॥
दीर्घच्छाय करींचा विस्तृत दृढ तीक्ष्ण मोडला भाला ।
पडली ढाल सवेष्टन स्पर्शी जी शोभवीत पादतला ॥ ३९० ॥
जोव्हज फीबस काढी सोडोनी लागलेंच उरकवच ।
मस्तक झालें जड बहु अल्प हि तो शिथिलगात्र करि न वच ॥३९१॥
त्रोजन यूफोर्बस जो पॅन्थौसज शूलकुशल रणरुचिर ।
अश्वारोहणनिपुणा चपला ज्या जोड कुणि नसे इतर ॥ ३९२ ॥
तो शूलहस्त धांवे, रोंवी तत्स्कंधमध्यि निज भाला ।
विंशति वीरां आधीं लकटुन अश्वांवरून जो आला ॥ ३९३ ॥
युद्धकला शिकतांची झाली करणी प्रसिद्ध अशि ज्याची ।
तेणें हे ! पत्रोक्लश ! केली तुज जखम आधिं शूलाची ॥ ३९४ ॥
झालास तूं न जित परि; गेला गर्दींत वीर तो परत ।

काढून शूल घेई, अससि जरी तूं अशस्त्र समरांत ॥ ३९५ ॥
शूलप्रहार याचा, खावुनि हस्तप्रहार अमराचा ।
सहचरसांधिं मिसळुनी पत्रोक्लश चुकवि समय मरणाचा ॥३९६॥
शूलाहत पत्रोक्लश परते हें हेक्तरा जसें दिसलें ।
घेऊन धांव तेणें सैन्यव्यूहा बरेंच भंगियलें ॥ ३९७ ॥
शूल तयाला मारी वेगानें ऊरुसंधिच्या खालीं ।
शूलाग्र पार उपटे, वीरतनू खालतीं तशी आली ॥ ३९८ ॥
ध्वनि झाला तो पडतां, ग्रीकांतें दुःख जाहलें भारी ।
अश्रान्त सूकराशीं निकरानें सिंह ह्मणति युद्ध करी ॥ ३९९ ॥
पर्वतशिखरावरतीं दोघे हे धृष्ट मांडिती कलहा ।
दोघे तृषार्त असतां भांडण ओढ्यावरून होत महा ॥ ४०० ॥
धापा टाकित असतां सिंह तया जेंवि जित करि बलानें ।
प्रायमसुत हेक्तर तो तेविं करी यास विजित भाल्यानें ॥ ४०१ ॥
मीनीशिअसज पडला पत्रोक्लश विगतजीव अज समरीं ।
बहुतां इतरांसह या वधुनी हेक्तर सगर्व वचन करी ॥ ४०२ ॥
" पत्रोक्लश निःसंशय अस्मत्पुरनाश चित्तिं आणिलास ।
नौकेमाजी घालुन अमुच्या मग बायकांस नेतास ॥ ४०३ ॥
स्वातंत्र्यकाल यांचा मत्ता! तूं खचित नष्ट करतास ।
अनुभवतास अनंतर गांवीं जाऊन मृदुल सौख्यास ॥ ४०४ ॥
परि त्यांतें रक्षाया हेक्तरहय धांवले पहा समरीं ।
मी शूलकुशल आलों हेक्तर चुकवावया गुलामगिरी ॥ ४०५ ॥

त्रोजनमुख्य अतां मीं पाहिन तुज गृध्र आज खातील ।
हे! दु:खभाक्! तुझ्या त्या अकिलीसामाजि काय हांशील! ४०६॥
मागें राहुन आपण केलें साहाय्य तुज तयें नाहीं ।
निघतेवेळीं तुजला सांगितल्या गोष्टि थोरल्या कांहीं ॥ ४०७ ॥
'अश्वारोह कुशल हे! पत्रोक्लश येथ परत येइं न रे ।
रक्तानें भरलेल्या हेक्तरवस्त्रांस फाडल्याविण रे' ॥ ४०८ ॥
एविं तयें निःसंशय कथुनी मूर्खास तुजसिं वळवीलें "।
सोडुन निश्वास तदा उत्तर पत्रोक्लशें तयास दिलें ॥ ४०९ ॥
" अजुनहि हेक्तर! घेंई करुनी तूं थोर दृप्त वचन अज ।
सॅतर्नज जोव्ह अणी फीबस तुज देति यश असें समज ॥४१०॥
त्यांनीं स्कंधींचें मम हरिलें तें कवच, करुन विजित मला ।
त्वत्सम वीसांची वद काय कथा मजसिं आज रणकुशला ॥ ४११ ॥
मच्छूलविजित सारे झाले असते विलुप्तजीवित रे ।
विध्वंसक नियतीनें, वधिलें मज फीबसें तसें न नरें ॥ ४१२ ॥
यूफोर्बस मग वेधी, शेवटिं लुटिसी असा क्षतास मज ।
कथिन तुला गोष्ट दुजी तीवर तूं कर विचार नीट अज ॥४१३॥
आयुर्वृद्धि न बघशिल; जवळ अली मृत्युसहित तव नियति ! ।
ईआकसकुलसंभव मारिल अकिलीस तुजसिं तो नृपति" ॥ ४१४ ॥
या तो ऐसें वदतां; मृत्युच्छाया तयावरी पसरे।
हेदीसाप्रति जाई जीव तयाचा न जो तनूंत उरे ॥ ४१५ ॥
दुर्दैव कीं तयातें गेलीं सोडून शौर्य यौवन हीं ।

तो मरतां हेक्तर त्या उद्देशुन शब्द बोलला कांहीं ॥ ४१६ ॥
" पत्रोक्लश ! कथिलें त्वां नाशक मज हें भविष्य तूं सहज ।
अकिलीस थेटिसज वद मच्छूलांकित मरेल कां न अज" ॥४१७॥
ऐसें बोलुन चेंपी अरिची तनु शूलविद्ध पादतलें ।
उपटून शूल ढकली शव अरिचें भूमिपतित वीर बलें ॥ ४१८ ॥
आतोमीदन होता ईआसेदीस भूपसेवक तो ।
त्यालागीं माराया धांवुनियां जात बहुत उत्सुक तो ॥ ४१९ ॥
पेलिअसा हय दिधले प्रीतीचें दान म्हणुन अमरांनीं ।
पळवोनी त्यालागीं नेलें समयास कठिण या त्यांनीं ॥ ४२० ॥

सर्ग १७ वा.

पत्रोक्लशाच्या शवाकरितां केलेले मेनिलासाचे पराक्रम.

सारांशः—यूफोर्बस, **प**त्रोक्लशाचें कवच हरण करीत असतां, **मे**निलासाचे हस्तें मृत्यु पावतो. **हे**क्तर पुढें सरतो. पण **आ**जक्ष येतांच मागें सरतो. **ग्ला**कस त्याकरतां त्याची निर्भर्त्सना करतो, ह्मणून तो **प**त्रोक्लशाचें कवच घालून **प**त्रोक्लशाचें शव हरण करण्याकरतां युद्ध चालवितो. **आ**तोमीदन अकिलीसाच्या रथाचें चांगलें रक्षण करतो. परंतु शेवटीं **ग्री**क मागें सरूं लागतात. **आ**जक्षही भय पावतो. तथापि **मे**रिआनीस व **मे**निलास हे दोघे पराक्रम करून **प**त्रोक्लशाचें शव आपल्या छावणींत हार खाऊनही नेतात.

कालमानः—अठाविसावा दिवस, संध्याकाळ.

स्थलमानः—त्रायापुढील समरभूमी.

त्रोजनविजित न चुकवी पत्रोक्लश दृष्टि मेनिलासाची ।
अग्रेसरांत आला सिद्धि करोनी समग्र शस्त्रांची ॥ १ ॥
त्याच्या भोंवति फिरतो, वत्साभोंवतिं जशी फिरे गाय ।
प्रथमप्रसूतिभीता हंबारव करुन थकुन जी जाय ॥ २ ॥
पत्रोक्लशासभोंवतिं घिरट्या घालीत मेनिलास तसा ।
फिरवी ढाल गरागर त्यातें राखावयास हा सहसा ॥ ३ ॥
शूल धरी सज्ज पुढें माराया जर कुणी तसा आला ।
पॅन्थससुत मग धांवे करिं धरुनी आशदारुमय भाला ॥ ४ ॥
पत्रोक्लशास पडतां पाहुनियां धीर यांस बहु आला ।
राहुनियां जवळ उभा शब्द असे वदत मेनिलासाला ॥ ५ ॥

"जोव्हप्रसाद नृपते ! जाईं हे मेनिलास ! तूं परत ।
सोड शवां, राहूं दे, युद्धांतिल लूट सोड ही सुमत ॥ ६ ॥
माझ्याविण इतरानें त्रायस्थें वा तदीय मित्रानें ।
पत्रोक्लशास केला शूलाचा वार कुणि न कुशलानें ॥ ७ ॥
त्रायस्थां दावाया नेऊंदे हें विशाल वैभव रे ! ।
करुनी प्रहार तुज अथ घेइन तव जीव मी उगाच बरें" ! ॥ ८ ॥
मग वदत पीतकेशी क्रोधानें मेनिलास वीर तया ।
"हे तात! जोव्ह! सांगें गर्वोक्तिस काय नाहिं सीमा या! ॥ ९ ॥
चित्रव्याघ्र हि न करी गर्व, न करि सिंहही निज बलाचा ।
ध्वंसक सूकर वनिंचा तेंवि न तो धैर्ययुक्त हृदयाचा ॥ १० ॥
परि पॅन्थससुत करिती यांहुनियां गर्व अधिक शूलाचा ! ।
निन्दुन मज अणवितसे हैपीरीनार समय समराचा ॥ ११ ॥
मजसीं काय ह्मणाला? 'सकल ग्रीकांत अधम तूं फार!' ।
नाहीं बलवन्तें त्या ज्वानीचें भोगिलें तदा सार ! ॥ १२ ॥
नाही पायीं गेला, आठवतें ! आपुल्या घरालागीं ।
सुखवाया पितरांतें कान्तेतें जी रडे गृहिं अभागी ॥ १३ ॥
खेळशि युद्ध मजसिं तरि, तेंवि तुझ्या करिन शक्तिचा नाश।
परि बोध तुला करितों बहुजनसंघांत जा शिर हताश ॥ १४ ॥
जों न दुखापत झाली तों द्यावा कलह मजसिं सोडून ।
* तो एक मूर्ख समजे उमजे जो सरळ गोष्ट मागून" ॥ १५ ॥

---

* ही आर्या सुभाषितरूप आहे.

हींत वर्णिलेल्या पुरुषास रामदासांनीं वर्णिलेल्या पढतमूर्खांत स्थान बरेंच वर मिळेल.

ऐसें हा वदला परि त्याचें मन नाहिं त्या मुळें वळलें ।
त्यानें उलटचि झाला उत्तर हें चोख एधवां दिधलें ॥ १६ ॥
" जोव्हप्रसाद नृपते ! गमतें तूं खचित मेनिलास अरे ! ।
बन्धुवधाचें करशिल संमार्जन योग्य नाहिं काय बरें ! ॥ १७ ॥
ज्या शतकृत्याचा तूं आजवरी गर्व करित आलास ।
कीं त्याच्या पितरांतें लावियलें शोक फार करण्यास ॥ १८ ॥
वैवाहिक नव मंदिरिं तद्भार्येला दिलेंस वैधव्य ।
त्यांच्या दुःखाचा मी उपशम करणार हेंच भवितव्य ॥ १९ ॥
कवच अणी शिर तूझें नेइन मी पॅन्थसास दावाया ।
फ्रान्तिस परमोदारा तद्भार्या ती बघेल नच वायां ॥ २० ॥
कष्टद विक्रम अथवा सभय पलायन पडेल नजरेला ।
यांतिल एकाचा तो आश्रय विजयार्थ पाहिजे केला !" ॥ २१ ॥
ऐसें ह्मणुनी तेणें ढालीचा मध्य साधिला नीट ।
केला घाव परी त्या शूलाचें अग्र मोडिलें धीट ॥ २२ ॥
पित्तलमय शूलाचा नंतर मग वार मेनिलास करी ।
जोव्हानें प्रार्थोनी, अरिच्या गळभागिं नेम झटुन धरी ॥ २३ ॥
रोंवी शूल तिथें अणि घाली वरि भार पुष्ट हस्ताचा ।
ग्रीवेंतुन शूल निघे, पडला अरि, शब्द होत शस्त्राचा ॥ २४ ॥
वाजे कवच खणाखण, भरले रुधिरांत अलकही सरल ।
शृंगारदेवतांसम विभ्रम होते करीत जे सकल ॥ २५ ॥
होते भूषित पूर्वीं रजतानें जे तसेच हेमानें ।

तेच शिरोरुह झाले धूलीनें मलिन, सिक्त रुधिरानें ॥ २६ ॥
कृषिकर्मकुशल कोणी क्षेत्री क्लेशा न गणुनियां अमित ।
जितवृक्ष एक लावी पावे विस्तार तो जसा रुजत ॥ २७ ॥
एकान्त स्थलिं लाधे भूगतजलसेक सर्वदा विशद ।
येति कळ्या शुभ्र वरी सुन्दर त्या हलवि पवन तो सुखद ॥ २८ ॥
परि येतां जोराचा आकस्मिक तेथ वादळ्या वारा ।
उपटुन समूळ पडतो विस्तृत त्या सांवरीत थोर धरा ॥ २९ ॥
शूली पॅन्थससुत तो यूफोर्बस तेविं पावला पतन ।
एत्रिअसात्मज मग हरि तत्कवचा मेनिलास तो जवन ॥ ३० ॥
पर्वत पुष्ट तसा तो स्वबलावरि सिंह भिस्त ठेवून ।
चरत्या कळपांतुनही उत्तम गोजीस नेत उचलून ॥ ३१ ॥
पहिल्यानें मान तिची मोडितसे धरुन तीव्र दंतांनीं ।
नंतर तुकडे करुनी चघळितसे आंतडीं रुधिर पिउनी ॥ ३२ ॥
अरडति गोप दुरोनी, लागति भुंकावयास तीं कुतरीं ।
त्यावर जाति न धांवुनि, पालटती वर्ण वदनिंचा भितरीं ॥ ३३ ॥
तैसा कुणी न धजला जायाला पुढतिं मेनिलासाच्या ।
मग एत्रिअसज हरता राशि अरीच्या खचीत शस्त्रांच्या ॥ ३४ ॥
केला याचा मत्सर थोडासा फीबसें परी खचित ।
अणि हेक्तरास त्यानें मार्ससमानास चिढविलें अमित ॥ ३५ ॥
सैकोनीसाग्रणिचें मेन्तीसाचें धरोनियां रूप ।
त्यालागीं बोलतसे कांहींसे शब्द यावया हुरुप ॥ ३६ ॥

" हेक्तर ! आतां ऐसा धांवत सुटलास तूं खरा इकडे ।
धरिसी पाठ तयाची कोणाच्या जें न कधिंहि हस्तिं पडे ॥ ३७ ॥
अकिलीसाचें हययुग मर्त्यांतें का बधेल वीराचें ? ।
यन्माता अमरस्त्री त्या आकिलीसास तें बधे साचें ॥ ३८ ॥
पत्रोक्लशव रक्षी धैर्यानें मेनिलास तो अजित ।
यूफोर्बसास जेणें त्रोजनमुख्यास मारिलें त्वरित ॥ ३९ ॥
पॅन्थसतनया त्या बध सोडाया युद्ध आज भाग पडे " ।
ऐसें वदुनी गेला जिकडे संग्राम कष्टमय तिकडे ॥ ४० ॥
परि जीव हेक्तराचा दुःखानें दडपुनी तदा गेला ।
निरखुन नंतर पाहे सैन्याच्या दीर्घ समरिं रांगेला ॥ ४१ ॥
कवचा हरतां एका, भूपतिता तों दुजा तसा पाहे ।
ज्याच्या क्षतांतुनी बहु वाहत तें रक्त सारखें राहे ॥ ४२ ॥
अग्रेसरांत धांवे घेउनि मग शस्त्रभार चकचकित ।
व्हल्कनसंदीप्ताग्निज्वालेसम उच्च शब्द करि अमित ॥ ४३ ॥
परि एत्रिअससुताच्या समरीं हा अरडतां अला ध्यानीं ।
अपुल्या परमोदारा जीवातें वदत सभय शब्दांनीं ॥ ४४ ॥
" हा ! धिक् ! कैसा जाऊं सोडुन पत्रोक्लशा सकवचाला ।
माझ्या नांवा करतां येथें जो पडत कठिण समयाला ॥ ४५ ॥
ग्रीक कुणी मज पळतां पाहिल का ? वाटतें मला भय तें ।
मीं एकटाच अथवा लज्जेस्तव रण करूं रुधिरमय तें ? ॥ ४६ ॥
भय वाटे हेक्तर कीं त्रोजन घेऊन मजासिं वेढील ।

विक्रान्त वीर आला हेक्तर घेऊन सैन्य निज अखिल ॥ ४७ ॥
परि कां जीव अतां मम करित असे वाद फार याविषयीं ।
प्रतिकूल दैव असतां लढण्या इच्छूं नये विषमसमयीं ॥ ४८ ॥
त्यांतुन ज्या वीराशीं ईश्वर साहाय्य करितसे समरीं ।
त्याशीं युद्ध करी जो अपुला आपण विनाश तोच करी ॥ ४९ ॥
ह्मणुनी ग्रीक न कोणी पळतां पाहून मजासि हांसेल ।
कारण ईशप्रेरित हेक्तर हा समरिं चालवी खेल ॥ ५० ॥
रणशूराचा येइल आजक्षाचा जरी ध्वनी कानीं ।
प्रतिकूल दैव तरिही परतुन करुं आह्मीं समर दोघांनीं ॥ ५१ ॥
अकिलीसाच्या करतां न्याया शव हें अह्मां जपून हवें ।
रक्षुं न शकेन कवचा; संकट जें न्यून तें पतकरावें" ॥ ५२ ॥
ऐसा विचार करि तों हेक्तर घेऊन येत थोर बळ ।
परते हा शव सोडुन सिंह जसा दीर्घकूर्चधर चपल ॥ ५३ ॥
शूलें वा आक्रोशें, नर आणि श्वान ज्यास घालवती ।
धडकी उरीं भरोनी ज्याच्या हृदयीं करी न धृति वसती ॥ ५४ ॥
इच्छा नसतां लवकर गोठ्यांतुन तो पळे वनांत जसा ।
पत्रोक्लशास सोडुन पळत दुरी सभय मेनिलास तसा ॥ ५५ ॥
पळतां थांबे जेथें सहचर गण त्यास भेटला येतां ।
पाहतसे जर दिसला तेलामनसुत तयांत तो जेता ॥ ५६ ॥
आजक्ष तो तयाला डाव्या बाजूस चालतां दिसला ।
लढण्या चेव अणित तो होता बोलून निज सहचरांला ॥ ५७ ॥

फार अपालोनें त्या होतें भिववून सोडिलें आज ।
तिकडे धांवत गेला घाई करुनी तसाच हा सहज ॥ ५८ ॥
जवळ उभा राहोनी बोले आजक्ष ! ये असा इकडे ! ।
मित्रा! रक्षूं चल रे ! पत्रोक्लशशवास रणिं तिकडे ! ॥ ५९ ॥
अकिलीसातें देऊं नेउन निर्वस्त्र जरि मिळेल शव ।
घेउन बसला हेक्तर कवच तयाचें प्रकाशमान नव " ॥ ६० ॥
ऐसें वदला तो मग आजक्षा चेव येतसे सहज ।
अग्रेसरांत शिरला गेला मागून मेनिलास अज ॥ ६१ ॥
कवच हरोनी इकडे हेक्तर पत्रोक्लशास ओढितसे ।
+'शीर, धडाहुन शूलें करिन निराळें' मनांत म्हणत असें ॥ ६२ ॥
' न्यावें धड हें नुसतें त्रायीं घालावयास कुतऱ्यांस ' ।
आजक्ष तों तिथें ये घेउनि करिं ढाल तुल्य बुरुजास ॥ ६३ ॥
हेक्तर मागें परतुन सहचरसंघांत चालता झाला ।
होउन आरूढ रथीं त्रोजनकरिं देत शीघ्र कवचाला ॥ ६४ ॥

+ पुढें हेक्तराच्या शवाची अकिलीसानें जी निर्दयपणें विटंबना केली तिच्याबद्दल वाचकांचे मनांत तिरस्कार उत्पन्न होऊं नये अशी होमरनें येथें तजवीज करून ठेविली आहे. हेक्तराच्या मनांतून पत्रोक्लशाचे शवाची जी विटंबना करावयाची होती तिचें प्रायश्चित्त म्हणूनच एवढी विटंबना हेक्तराच्या शवाची अकिलीसानें केली. हेक्तरानें पत्रोक्लशाचें शव फरफटवीत नेलें; व शिर कापून धड तेवढें त्रायपुरीच्या तटावर ठेवून क्षुधार्त श्वान व गृध्र यांस खावयास घालण्याचा त्याचा बेत होता.

न्यायाला नगराला तच्छौर्याची सुरेख खूण नवी ।
आजक्ष ढाल अपुली मीनीशिअसात्मजावरी फिरवी ॥ ६५ ॥
सिंही घिरट्या घाली रागें जैशी पिलांस राखाया ।
ज्यांतें न्याया, वरतीं पारधि झटतात झडप घालाया ॥ ६६ ॥
शक्ति तिची लोंकांतें बघणाऱ्यांतें बरेंच भय घाली ।
नेत्रां भिंवया लपविति ज्या ती ओढोनियां धरी खालीं ॥ ६७ ॥
पत्रोक्लशासभोंवतिं घिरट्या आजक्ष हा तशा घाली ।
राहे उभा कडेला दुःखित नृप मेनिलास या कालीं ॥ ६८ ॥
हिप्पोलोकससुत तो ग्लाकस लिसिअननृपाल रागानें ।
निन्दीत हेक्तराला ताडोनी कठिण तीव्र वचनानें ॥ ६९ ॥
"हेक्तर! रुचिराकृति तूं असतां नाहींस मुळिंच रणचतुर ।
कीर्ति तुझी निष्कारण! झालासी कां पलायनीं चूर! ॥ ७० ॥
त्रायांत जन्मले जे त्यांचें साहाय्य एकल्यांचें तूं ।
राखायाचा राज्या नगरा, साधेल काय तव हेतू! ॥ ७१ ॥
ग्रीकांसह लढण्याला लिसिअन कोणी अतां न जाईल ।
सतत लढावें अरिशीं त्याचे उपकार कुणि न मानील ॥ ७२ ॥
सांगें! अकीर्तिकर हे! संघीं कां राखिलेंस भलत्यास ।
ग्रीकांस कां गृहागत अतिथि तुझा सर्पिदन बलि दिलास ॥ ७३ ॥
होता सजीव तेव्हां आश्रय तुजला तुझ्या पुराला जो ।
खाती श्वान तया तरि, हांकिसि नच, जीव तव न कां लाजो! ७४
एक तरी लिसिअन तो माझें जर आज वचन ऐकेल ।

मीं त्या म्हणेन ' जा घरिं ' नाश तुझें त्राय पूर्ण पावेल ॥७५॥
अरिशीं वीर लढति जे चित्तीं आणून देशकार्यास ।
त्यांचें निश्चित निर्भय बल असतें जर अतां त्रोजनांस ॥ ७६ ॥
पत्रोक्लशास तर अम्हि नेलें असतें क्षणीं इलियमास ।
न्याया प्रायमनगरा समरांतुन उचलुनी हवें यास ॥ ७७ ॥
म्हणजे ग्रीक अम्हांला देतिल आणून सर्पिदनकवच ।
त्रायामाजी आणूं आम्हीं वीरास त्या न शंका च ॥ ७८ ॥
तत्सूत विहत झाला होता ग्रीकांत शूर सर्वांत ।
सेवक याचे तरिही करताती लगट समरिं गर्वांत ॥ ७९ ॥
आजक्षाच्या पुढतीं जाण्यातें तूं परी न धजलास ।
अधिकाचे शूराचे पाहुनियां नयन तूं पळालास " ॥ ८० ॥
तापा चढून सत्वर हेक्तर देई तयास उत्तर तें ।
" ग्लाकस उद्धत वच हें त्वत्समवीरा कसें बरें सजतें ॥ ८१ ॥
गणिलें खरेंच मित्रा ! लिसिअन वीरांत सुज्ञतम तुजला ।
देतों परंतु दूषण बुद्धिस मी सर्वथा तुझ्या अजला ॥ ८२ ॥
पुससी आजक्षाच्या पुढतीं जाण्यास कां न मी धजलों ।
झगडाया न कचरलों, अश्वांच्या संभ्रमा न मीं भ्यालों ॥ ८३ ॥
*ईजिसधर जोव्हाचें, शासन अनुलंघ्य होय सकलांस ।
शूराही जो पळवी, मळवी यश जो हरून विजयास ॥ ८४ ॥

अनुकूल दैव असतां न समर्थ करावयासिं हानि यम ।
होतां तें प्रतिकूल प्रबलहि दुर्बलाचि होय हा नियम ॥ मोरोपंत.

दुसऱ्यावेळिं तयाला आपणाचि लावि युद्ध करण्याला ।
परि, ये तूं मन्मित्रा ! जवळुन विक्रम मदीय बघण्याला ॥ ८५ ॥
पत्रोक्लशास रक्षिति त्या ग्रीकांसह करून मी समरा ।
शत्रूत्साहा भंगिन, ह्मणसि तसा अथ दिसेन मी भितरा " ॥ ८६ ॥
ऐसें वदुनी मग तो त्रायस्थां देत अरडुनी धीर ।
" दार्देनिअन ! त्रोजन ! लिसिअन हो ! आयका तुह्मीं वीर ॥८७॥
पारुष्य दाखवा हो ! मित्रांनों ! शौर्य आपुलें अठवा ।
अकिलीसाचें सुन्दर घालुन मी कवच दाखविन विभवा ॥ ८८ ॥
पत्रोक्लशास वधुनी आणियलें तें करून मीं हरण" ।
ऐसें वदुनी गेला धांवत हेक्तर त्यजून भयद रण ॥ ८९ ॥
गांठीत सहचरांला कांहीं टाकून दूर दूर पद ।
होते अकिलीसाच्या कवचातें नेत जे पुरा भयद ॥ ९० ॥
शोकप्रद समराच्या राहुनियां दूर कवच तो घाली ।
न्याया जुनें पुरातें मित्रातें देत वीर त्या कालीं ॥ ९१ ॥
अकिलीसाचीं शस्त्रें करि धारण तो समस्त अविनाशी ।
स्वर्गांतिल अमरांनीं दिधलीं प्रेमें तदीय पितयाशीं ॥ ९२ ॥
वृद्धपणा त्या येतां देई तो सर्व भार पुत्रास ।
पुत्र न वृद्ध जहाला धारण परि करुन त्याच शस्त्रांस ॥ ९३ ॥
अकिलीसाच्या कवचा घाली हा जोव्ह तें बघे दुरुन ।
अपुल्या जीवाशीं तो बोलतसे शब्द मान हलवून ॥ ९४ ॥
" हा ! मन्दभाग्य ! नाहीं मरण तुझ्या येत रे ! विचारांत ।

आलें जवळ तुझ्या तें! चढविशि अविनाशि कवच अंगांत ॥ ९५ ॥
तत्स्वामी शूरोत्तम, ज्या बघुनी कांपतात जन इतर ।
तन्मित्रा त्वां वधिलें सुजना शूरा करोनियां समर ॥ ९६ ॥
योग्यायोग्य न बघतां, स्कंधींचें कवच थोर हरिलेंस ।
त्वत्करगत करितों मीं उद्धत जय शीघ्र योग्यवेळेस ॥ ९७ ॥
कारण समरांतोनी जेव्हां तूं निज गृहास जाशील ।
अंगांतुनि हीं शस्त्रें ॲन्ड्रोमाकी तुझी न उतरील " ॥ ९८ ॥
सॅतनर्ज हें बोले चढवोनी कृष्णवर्ण वर भिवया ।
परि हेक्तराङ्गि बसलें नीटपणें कवच रुचिर या समया ॥ ९९ ॥
भयदें वीरें मार्से अङ्गीं त्याच्या जपून बसवीलें ।
त्याचे अवयव आंतुन शक्तीनें सर्व तेधवां भरिले ॥ १०० ॥
मित्रांकडेस गेला, अरडोनी शोधि वीर सकलांस ।
कवचा बघुनी झाला अकिलीसाचा तयांस रणिं भास ॥ १०१ ॥
त्यांच्यांत मिसळुनी हा प्रत्येका चेव आणि शब्दांनीं ।
मेस्थ्लीस तेथ होता, ग्लाकस, मीदन तसाच अभिमानी ॥ १०२ ॥
आस्तीरोपीअस तो, हिप्पोथोअस व थर्सिलोकस तो ।
दैसीनार व फोर्किस तो ईन्नोमस तसा क्रोमिअस तो ॥ १०३ ॥
उत्सुक सविनय यांतें यासमयीं शब्द तीव्र हे वदला ।
"परिसा मन्मित्रांनों! भोंवतिं येथें असंख्य जे जमलां ॥ १०४ ॥
तुम्हां मेळविलें मीं तुमच्या नगरांतुनी न शोभेला ।
आजि बायकां मुलांला अमुच्या राखाल कठिण वेळेला ॥ १०५ ॥

ऐसा विचार करुनी, देतों धनधान्य बहुत तुह्मांस ।
*करुनी उपासमर मीं माझ्या लोकांस देतसें त्रास ॥ १०६ ॥
प्रत्येकाची तुमची इच्छा परि मी बरीच पुरवितसें ।
एकानें तरि यावें! जावें समरांत सरळ पाहुं कसें ॥ १०७ ॥
जगणें किंवा मरणें दोहोंतुन एक आज पतकरणें ।
रणिंचें रहस्य परिसा जगणें किंवा क्षणांतही मरणें ॥ १०८ ॥
वीर तथापि कुणी जर ओढिल पत्रोक्लशास विहतास ।
आणी त्रायस्थांच्या करिल स्वाधीन करुन आयास ॥ १०९ ॥
लावील शरण याया आजक्षाशीं लढून वीराशीं ।
अर्धी घेउन देइन शेष तया युद्धलब्धधनराशी ॥ ११० ॥
वदणें नलगे कीं त्या माझ्या इतुकीच कीर्ति मिळणार"।
ऐसें तो वदला तों ग्रीकांवर चाल करित दलभार ॥ १११ ॥
गर्दी दाट जहाली, आशा बहु मानसांत वीरांस ।
घेउं हिराहुन अरिच्या, आजक्षाच्या करांतुन शवास ॥ ११२ ॥
मूर्ख खरे! तो बसला हरुनी असु रणिं तदर्थ कितिकांचे ।
आजक्ष मेनिलासा उद्देशुन शब्द बोलला वाचे ॥ ११३ ॥
" जोव्हप्रसाद नृपते! प्रियसुहृद् ! मेनिलास हे! मजशीं ।
समरांतून सुरक्षित जाऊं आह्मीं पुरा न आस अशी ॥ ११४ ॥

---

* ही अन्नाची ओशाळगत बाबा! फार कठिण आहे. रावणानेंही आपल्या सैनिकांस असेंच बजाविलें आहे.

भर्तृपिण्डस्य कालोऽयं निर्वेष्टुं साधु युध्यताम् । रामायण.

पत्रोक्लशदेहाची नाहीं मज काळजी मुळीं आतां ।
त्रायपुरींतिल कुक्कुर खग ते होतील तृप्त ज्या खातां ॥ ११५ ॥
माझें आणी तूझें मस्तक होईल नष्ट ही भीति ।
हेक्तरसेनाघन हा ग्रासी च्छायातमांत समर किति ॥ ११६ ॥
ऐकेल कुणि अतां तर ये तूं ग्रीकोत्तमांस बोलाव " ।
ऐसें तद्वच मानी धरुन मनीं मेनिलास सद्भाव ॥ ११७ ॥
अरडोनी मोठ्यांनीं, ग्रीकां मारीत दीर्घ तो हांका ।
" ग्रीकांच्या मुख्यांनों! मित्रांनों ! समय येतसे बांका ॥ ११८ ॥
जननायक हो! ज्यांनीं सेवियली सार्वजनिक ती मदिरा ।
अगमेम्नन पाचारी, तद्भ्राता मेनिलास त्यां वीरां ॥ ११९ ॥
जोव्हकृपेनें लाधे समरीं सकलांस कीर्ति सन्मान ।
ह्मणुनी आतां कुणितरि धांवुन यावें धरून अवसान ॥ १२० ॥
प्रत्येका शोधाया न शकें मी, पेटला महाकलह ।
पत्रोक्लश होइल कीं त्रायीं श्वानांस खेळ अज अहह!" ॥ १२१ ॥
ऐसें तो वदला तें ऐके आजक्ष ओइलीअन तो ।
पहिल्यानें निघुन पुढें समरपथें चालतां दुजां दिसतो ॥ १२२ ॥
निघत इदामिनिअस अणि मार्सासम शूर मेरिआनीस ।
हा कवचवाह त्याचा त्यासह बहु चालले लढाईस ॥ १२३ ॥
ग्रीकांचें रण जागृत केलें ज्यांनीं तयांस कोण गणी ? ।
त्रोजन आरंभति रण नेता हेक्तर सधैर्य सैन्यगणीं ॥ १२४ ॥
जोव्होत्पन्ना वाटे दीर्घ नदी तों तिच्या मुखापाशीं ।

गर्जुन समुद्रवीची झगडति येउनं तिच्या प्रवाहाशीं ॥ १२५ ॥
वीची द्दप्त तटांवर उसळुन पडतात भंग पावून ।
करिती तट आक्रोश त्रोजन करती तसाच गर्जून ॥ १२६ ॥
सरति पुढें त्यां बघतां सज्ज उभे ग्रीक एकचित्तानें ।
मीनीशिअससुताच्या भोंवतिं संभ्रम करीत शौर्यानें ॥ १२७ ॥
रक्षण करण्या अपुलें पित्तलमय धरिति थोरल्या ढाली ।
त्यांच्या शिरकवचांतें सॅतर्नेज लपवि धूमिकापटलीं ॥ १२८ ॥
मीनीशिअससुताचा अणि याचा द्वेष अल्पही नव्हता ।
होता प्रिय सहचर कीं अकिलीसाचा सजीव जो असतां ॥ १२९ ॥
त्रायपुरांतिल अरिच्या श्वानांचें भक्ष्य हा अतां व्हावा ।
ऐसा विचार याच्या सहजचि मग मानसांत जड जावा ॥ १३० ॥
त्याचें रक्षण करण्या मित्रा उत्साह म्हणुन अणि समरीं ।
त्रायस्थांनीं ग्रीकां लावियलें स्थान सोडण्यास परी ॥ १३१ ॥
शव सोडुनियां मागें सरले कीं अरि वधील भाल्यानें ।
इच्छा सफल न झाली, ओढित शव हे परंतु अभिमानें ॥ १३२ ॥
गेला न समय बहु तों जमवी आजक्ष त्यांस घाईनें ।
अकिलीसाच्या नंतर सौंदर्यें ख्यात हा जनीं कृतिनें ॥ १३३ ॥
अरिसैन्याची पुढली फोडोनी रांग चालला वीर ।
गमला वराह वनिंचा ज्याचें विख्यात बल तसा धीर ॥ १३४ ॥
श्वानां अणि तरुणां जो लावि पिटाळून पर्वतावरुन ।
थोर पराक्रम केला आजक्षें उलट धरुन अभिमान ॥ १३५ ॥

पत्रोक्लशा सभोंवतिं जमला होता बराच शत्रुगण ।
नगरा शव नेवोनी होता हरणार यश समरनिपुण ॥ १३६ ॥
हिप्पोथोअस ठाउक लीथससुत जो रणांतला वीर ।
पाय धरोनी ओढी शव तो हृदयांत आणुनी धीर ॥ १३७ ॥
गुल्फास दोर बांधी त्रोजन सुख पावले असें बघुन ।
त्यावर संकट आलें कोणीही तें दिलें न उडवून ॥ १३८ ॥
गर्दींतुन येउनियां तेलामनसुत तयास वार करी ।
पित्तलमय शिरकवचा भंगोनी जाय शूल दूरवरी ॥ १३९ ॥
वीरांच्या बाहूचें बल मोठें फोडि कठिण मस्तक तें ।
कवचाच्या कोनीं जें क्षत झालें आर्द्र तें कसें सुकतें ॥ १४० ॥
रक्तमयाची आंतुन मेंदूची भयद लागली धार ।
तेणें शक्ति तयाची गळुनी गेली क्षणांत ती पार ॥ १४१ ॥
पत्रोक्लशपद देई टाकुन भूवर फिरून पसराया ।
आणि शवावर त्याच्या उन्मुख पडला पुन्हा नच उठाया ॥१४२॥
परि जन्मभूमि याची फलदा ती दूर लारिसा राहे ।
पितरांनीं वाढविलें फेडायाचें तसेंच ऋण आहे ! ॥ १४३ ॥
अल्पायु वीर पडला होतां आजक्षशूलहत समरीं ।
आजक्षावर हेक्तर भाल्याचा नीट नेम दुरुन धरी ॥ १४४ ॥
पाहुन समोरुनी त्या चुकवी हा मरण भयद थोडचानें ।
इफितसजा स्केदिअसा झाला परि वार त्याच भाल्यानें ॥ १४५ ॥
पॅनोपीआसिं होता फोकीअन भूप हा तदा वसत ।

त्या अज गळास्थिमध्यप्रान्तीं अरिशूल जाउनी बसत ॥ १४६ ॥
पित्तलमय शस्त्र निघे स्कंधांतुन अगदिं शेवटीं फार ।
वीर पडे ध्वनिहि उठे शस्त्रांचा खणखणे वरी भार ॥ १४७ ॥
फीनप्ससुता हाणी नंतर आजक्ष फोर्किस्नालागीं ।
हिप्पोथोअस रक्षण होता हा करित मागल्याभागीं ॥ १४८ ॥
उदराच्या मध्यावर वार करी फोडि चिवट कवचपुट ।
अन्त्ररसा चाखाया शस्त्र रुते आंत तें नसे फुकट । ॥ १४९ ॥
धूळींत वीर पडला हस्ततलें धरुन दीर्घ भूमितला ।
अग्रेसरसंगतिनें हेक्तरही परतला असून भला ॥ १५० ॥
ग्रीकांनीं अरडोनी नेलिं शवें आज दूर दोघांचीं ।
हिप्पोथोअस अणखी फोर्किस पडले रणांत जे त्यांचीं ॥ १५१ ॥
स्कंधावरुनी त्यांच्या घेती काढून थोर कवचातें ।
ग्रीकांनीं त्रायस्थां नगरा हांकून लाविलें असतें ॥ १५२ ॥
त्रोजन इतके भ्याले, ग्रीकां यश विक्रमें खचित मिळतें ।
जोव्हाच्या मनिं नसतां कसचें हें फीबसास आवडतें ! ॥ १५३ ॥
ईपैतिससुत ठावा लोकां जो सुज्ञ पेरिफास भला ।
दूत ह्मणोनी करितां नृपसेवा वृद्ध जो असे झाला ॥ १५४ ॥
तद्रूप धरुन वदला फीबस तो चतुर ईनिआसास ।
"प्रतिकूल दैव असतां मिळविति जय जे, न ते तुह्मीं खास ॥१५५॥
हे ईनिआस ! कैसें सांगा राखाल मग इलियमास ।
शूर प्रबळ अरि असे, गणना ज्याच्या न थोर सैन्यास ॥ १५६ ॥

अनुकूल जोव्ह आहे! दानाइंस तो न करिल अज विजयी।
यश तुह्मां देइल तो, नच कां लढतां! व कांपतां समयीं" ॥१५७॥
ऐसें तो वदला परि पुढतीं त्या बघुन ईनिआस असा।
जाणे कीं फीबस हा, बोले बाहून हेक्तरा सहसा ॥ १५८ ॥
" धिक्! धिक्! त्रोजन नृप हो! मित्रांनों! परत इलियमा आलों।
हेक्तर हे! आज कसे भीतीनें अधिक विजित रणिं झालों ॥१५९॥
आतांच एक सुर कुणि माझ्या राहोनियां उभा जवळ।
सांगे अनुकूल असे आह्मांतें जोव्ह जो असे प्रबळ ॥ १६० ॥
ग्रीकांवर तुटुन पडूं नेऊं पत्रोक्लशा न देउं तया"।
ऐसें तो वदला अणि घेइ उडि तो पुढें त्यजून भया ॥ १६१ ॥
जमले सारे ठायीं ग्रीकांच्या राहिले मग समूर।
आरिस्बाससुताला क्षत करि तो ईनिआस रणशूर ॥ १६२ ॥
लीओक्रैतस ऐसा लैकोमेदीसमित्र रणिं पडला।
त्यातें पडतां पाहुन लैकोमेदीस फार कळवळला ॥ १६३ ॥
जाउन जवळ उभा तो राहुन फेंकीत शूल चकचाकित।
हिप्पासिसतनयातें लागत तो एपिसाअना त्वरित ॥ १६४ ॥
यकृद्देशाखालीं क्षत झाला नृपति, शक्ति सर्व गळे।
पीओनिआतुनी त्या आला होता रणांत गर्वबळें ॥ १६५ ॥
याहून अन्य न झाला आस्तीरोपीअसास तुल्यबल।
आस्तीरोपीअस या पडतां पाहुन पुढें करी चाल ॥ १६६ ॥
फार मनीं कळवळला; ग्रीकांशीं युद्ध यास आवडलें।

मनिंचें कोड असें त्या पुरवाया नाहिं आज सांपडलें ॥ १६७ ॥
पत्रोक्लशासभोंवतिं होते हे ग्रीक बहुत जमलेले ।
ढाली करीं धरोनीं ज्यांनीं भाले तयार रणि केले ॥ १६८ ॥
आजक्ष सकल वीरां भेटुन उत्साह देत लढण्यांशीं ।
परतूं देइ न कोणा, जाऊं देई न सोडुन शवाशीं ॥ १६९ ॥
करण्या विशेष विक्रम समरशिरीं म्हणत कुणिहि जावो न ।
करणें निज संरक्षण, जवळुन लढणें, प्रशस्त पथ दोन ॥ १७० ॥
आजक्षाचा ऐसा होता आदेश म्हणुनियां धरणी ।
रुधिरें ओली झाली; लीलेनें वीर करिति ही करणी ॥ १७१ ॥
प्रेतें त्रायस्थांची आणी त्यांच्या अनेक मित्रांचीं ।
ग्रीकांचींही तेथें गेलीं मिसळून एकमेकांचीं ॥ १७२ ॥
करणें निजसंरक्षण ग्रीकांनीं ठेविलें तदा ध्यानीं ।
म्हणुनी मेले नाहीं जन त्यांचे थोरल्या प्रमाणांनीं ॥ १७३ ॥
उभय दलींचे लढले वीर रणीं विपिनिं जणुं दवानल ते ।
रविहि सुरक्षित नव्हता ! निर्भयता उरत कुठुन चंद्रातें ! ॥ १७४ ॥
समरींची धूळ उठे टाकी झांकून सर्व गगनास ।
मीनीशिअससुताच्या भोंवति वीरां दिसे न लढण्यास । १७५ ॥
ग्रीक त्रोजन लढले इतर ठिकाणीं सुखें उजेडांत ।
सूर्यप्रभा विसर्पण पावे त्यांच्यावरून गगनांत ॥ १७६ ॥
धरणीवरतीं नव्हता मेघ कुठें तेविं अद्रिच्या शिखरीं ।
थांबुन थांबुन लढती आघाता दुरुन चुकविती समरीं ॥ १७७ ॥

मध्यें समराच्या जे होते त्यांचेच जाहले हाल ।
झांकी तम नयनांतें माते सर्वत्र युद्ध जंजाल ॥ १७८ ॥
शस्त्रें विद्ध जहाले होते बहु शूर तेच अवधीस ।
तो दूर आन्तिलोकस होता तो थ्रासिमेदीस ॥ १७९ ॥
पत्रोक्लश हत झाला वार्ता नव्हती तयांस ही ठावी ।
ह्मणती त्रायस्थांची लढुनी हा वाट चांगली लावी ॥ १८० ॥
पळती पळविति मारिति सहचर यांचे दुरून तें बघती ।
आणी स्वस्थ मनानें या भागीं हे झटोनियां लढती ॥ १८१ ॥
नौदेशीं यां होता ऐसा उपदेश नेस्तरें केला ।
परि इकडे दिवसभरी मोठा संग्राम मातुनी गेला ॥ १८२ ॥
ईआसेदीसाच्या मित्राच्या वीर हे शवा करतां ।
लढतां त्यांचे भिजले घर्मानें नयन तेंवि कर आतां ॥ १८४ ॥
थकुनी गेले, मळलीं जंघा, जानू तसेच ते पाय ।
दोहोंकडील ओढिति वीर शवा तें बघा कसें काय ॥ १८४ ॥
देतो भृत्या कोणी कमवाया चर्म थोर वृषभाचें ।
चरबीनें भिजलेलें करिं घेती ताणुं लागती साचें ॥ १८५ ॥
करिती वर्तुल मोठें सर्व उभे दूर दूर राहून ।
चर्मीतिल ओलावा जाउनियां स्निग्धपण चढे वरुन ॥ १८६ ॥
बहु जेविं जोर लावुन ओढिति चोहोंकडून ताणून ।
दोहोंकडील ओढिति वीर शवा तेविं जोर लावून ॥ १८७ ॥
त्रायस्थांच्या होतें चित्तीं नेणें तया इलियमास ।

नौदेशातें न्याया ग्रीक तसे करिति दीर्घ सायास ॥ १८८ ॥
ऐसा शवासभोंवतीं दोघांनीं घातला धुमाकूळ ।
मार्स तयाला पाहुन ह्मणता निर्दोष ही कृति समूळ ॥ १८९ ॥
ह्मणती हेंच मिनर्वा जरि असता राग तिज बराच अला ।
पत्रोक्लशासभोंवतिं वीरांची जोव्ह झुजवि अशि माला ॥ १९० ॥
पत्रोक्लश हत झाला अकिलीसा वृत्त अजुन नच कळलें ।
त्रायतटांच्या खालीं नौदेशाहून दूर हे लढले ॥ १९१ ॥
आलें न चित्तिं याच्या कीं झाला मित्र हत रणांत अज ।
त्रायद्वारा पोंचुन येइल जीवन्त परत हा समज ॥ १९२ ॥
लागेल पुर लुटाया त्याच्याविण हें न चित्तिं कधिं आलें ।
निज मातेजवळुनियां होतें ऐकून बहुत ठेवियलें ॥ १९३ ॥
जोव्हाचे जे कळले तिजला उद्देश ते तया कथि ती ।
त्यांतील परि न तीनें सांगितले जे अतर्क्य भयद अती ॥ १९४ ॥
इतुकें मोठें संकट जें आतां घडुनियां रणीं आलें ।
प्रियतममित्रमरण हें सहज तिनें गुप्त सकल ठेवियलें ॥ १९५ ॥
इकडे शवासभोंवतीं लढती घेऊन शूल करिं सतत ।
कापाकापी करती ग्रीक कुणी शब्द हे गमे वदत ॥ १९६ ॥
" सुहृदांनों ! अनुचित कीं नौदेशा परतणें अम्हांस अतां ।
उघडो कृष्ण धरा मुख देतांना जांभई अम्हांकरतां ! ॥ १९७ ॥
हेंच असे अधिक बरें. या त्रायस्थांस अश्ववाहांस ।
नेऊं देणें शव परि कीर्तिसवें हें न उचित आम्हांस " ॥१९८ ॥

इकडे ऐसें वाटे त्रोजन कुणि शब्द हे अतां म्हणत ।
" सुहृदांनों ! पुरुष पहा झाला हा विजित वीर समरहत ॥ १९९ ॥
तैसे सारे आम्हीं व्हायाचे नष्ट ही जरी नियति ।
तरिही कोणी एकहि जाउं नका परत त्यजुनि समरक्षिति " ॥२००॥
ऐसें कोणी वदुनी प्रत्येका देतसे रणीं भर तो ।
लढतां वीर असे ते शस्त्रांचा भार फार खणखणतो ॥ २०१ ॥
निष्फल वायुपथानें चढला ध्वनि उंच जेथ आकाश ।
ईआसेदीसहयां इकडे रडण्यास मिळत अवकाश ॥ २०२ ॥
पहिल्याप्रथम बघति ते वाहक झाला धुळींत तो पतित ।
नरहन्तृ हेक्तराचा वार तयातें गतासु रणिं करित ॥ २०३ ॥
आतोमीदन हांकी तो दायोरीसतनय अश्वांस ।
कठिण कशाघात करी उच्चारुनि शब्द दावि कोपास ॥ २०४ ॥
चुचकारी हळु शब्दें, नौदेशा जावया तयां न रुचे ।
लढती ग्रीक पुढें रणिं तेथें ही जावया तयां न सुचे ॥ २०५ ॥
स्त्रीच्या पुरुषाच्या वा कबरीशीं स्तंभ तो असे अचल ।
स्वस्थ उभे त्या सम हे स्थिर रथ ठेवून असुनही चपल ॥२०६॥
घालीत मान खालीं निश्चल ठेवून दृष्टि भूमिकडे ।
त्यांच्या नयनपुटांतुन अश्रूजल कढत भूमिवरतिं पडे ॥ २०७ ॥
सूत हवा त्यांलागीं, झाला जो शोक तो न त्यां अवरे ।
आयाळ मलिन झाली धूबैंदावरुन खालिं जी विखरे ॥ २०८ ॥
शोकाकुलां तयांला पाहुन सॅतनर्जा दया आली ।

अपुल्या जीवाशीं तो बोले घालून मान निज खालीं ॥ २०९ ॥
" हा! दैवहत हयांनों! तुह्मां दिधलें कशास पेलिअसा ? ।
तो मर्त्य, अमर तुह्मीं, वृद्धदशात्रासही तुह्मां न तसा ॥ २१० ॥
हतभाग्यांच्या संगें लावियलें दुःख भोगण्यालागीं ।
श्वासोच्छ्वास करोनी फिरति किती जीव या धराभागीं ॥ २११ ॥
त्या सर्वांत दिसेना दुःखी कुणि खचित माणसा इतका !
राहो हें! तुह्मीं त्या प्रायमजा हेक्तरास वाहुं नका ॥ २१२ ॥
आणीन तशि न वेळा दिधलें जरि कवच यास तें हरुन ।
गर्व फुकाचा करुं दे. जानुंत तुमच्या भरीन बल फिरुन ॥ २१३ ॥
नौदेशा न्या परतुन या आतोमीदना रणांतून ।
त्रायस्थां यश देणें आहे करण्यांत शत्रुवध अजुन ॥ २१४ ॥
जों ग्रीक नौप्रदेशा जातिल, अस्तास सूर्य जों खालीं ।
पसरेल पुण्य तम जों, तों हा चालेल घात या कालीं " ॥ २१५ ॥
ऐसें वदुनी तेणें दिधलें बल अमित थोर अश्वांस ।
तत्काळ धूळ झाडिति हलवुन आयाळ सज्ज होण्यास ॥ २१६ ॥
त्रायस्थांच्या आणी ग्रीकांच्या मधुन नेति शीघ्र रथ ।
आतोमीदन लढला त्रायस्थांशीं धरून समरपथ ॥ २१७ ॥
प्रियतम मित्र हरवला झालें मनिं दुःख यास फार जरी ।
कलहंसीं गृध्र तसा घाली रथ अरिचमूंत आज तरी ॥ २१८ ॥
त्रोजन सेनासंघा जाई भेदीत हा रणीं सहज ।
करि पाठलाग ज्यांचा पळतां, त्यां हा रणांत वधि न अज ॥ २१९ ॥

शक्य तदा हें नव्हतें पुण्यरथीं एकटाच होता हा।
अश्वांस कोण हांकिल शूलें मारिल अरीस कोण पहा ॥ २२० ॥
ईमनपौत्र तयाला लाअर्क्यूसज तदा बघे नयनीं।
ज्या नाम आल्किमीदन येउन रथनिकट वदत अभिमानी॥ २२१ ॥
"कवण्या देवानें रे ! आतोमीदन ! तुला दिला मंत्र।
मूर्खत्व ज्यांत भरलें ! नेलें हरुनी कुठें तुझें तंत्र ? ॥ २२२ ॥
त्रायस्थांशीं लढशी समरशिरीं एकलाच तूं असतां ! ।
हत झाला मित्र तुझा, हेक्तर करि गर्व तत्कवच हरतां" ॥२२३॥
दायोरीसज बोले आतोमीदन तयास परतून।
"ग्रीकांत आल्किमीदन ! अमरहयां कोण ठेविल धरून ॥२२४॥
दिसतोस एक तूं मज, पत्रोक्लश अन्य होउनी गेला।
अमरांसम सर्वांतें ज्यानें उपदेश योग्य तो केला॥ २२५ ॥
नियतीनें मृत्यूनें केलें तत्रापि हस्तगत त्याला।
रश्मि करीं तूं घेई, घेई उचलून या प्रतोदाला॥ २२६ ॥
उतरुन रथांतुनी या खालीं लढण्यास मी पुढें जातों "।
ऐसें तो वदला मग रथिं चढला चपल आल्किमीदन तो ॥ २२७ ॥
रश्मिद्वय उचलि करीं धरि मग तो सारखा प्रतोद करीं।
आतोमीदन खालीं घेत उडी बघत तें दुरून अरी॥ २२८ ॥
तो हेक्तर मग बोले जवळिल वीरास ईनिआसास।
" त्रोजनमन्त्रिन् ! बघ यां अकिलीसाच्या प्रवीण तुरगांस ॥२२९॥
हे ! ईनिआस ! त्यांतें हांकि कुणी सूत ज्या न चतुरपण।

*इच्छिसि तरि जावोनी धरिन तयांतें खचीत करुन पण ॥ २३० ॥
आह्मीं रणांत घुसतां टिकतिल हे काय रे समोरून"? ।
ऐसें तो वदला तें अन्कैसीसज करी ' बरें ' ह्मणुन ॥ २३१ ॥
स्कन्धावरि बांधितसे जाडें गोचर्म, शुष्क, बळकट तें ।
पितळेचे ज्यावरतीं पत्रे विस्तीर्ण बसविले होते ॥ २३२ ॥
दोघे सज्ज असे ते गेले चालून रणपथें वीर ।
आरीतसास झाला क्रोमिअसा जावया रणा धीर ॥ २३३ ॥
दीर्घग्रीव हयां हरुं मारुन सूतास धरिति आशा ही ।
मूर्ख खरे! परताया नव्हतें दैवांत यांचिया कांहीं ॥ २३४ ॥
आतोमीदनहस्तीं पडुनी निर्व्रण तयां न असतां ये ।
जोव्हातें प्रार्थोनी मेळविलें धैर्यबळ बरेंच तयें ॥ २३५ ॥
मग आल्किमीदनाला करि तो विश्वास्य सहचरा वच तें ।
" ठेवीं न आल्किमीदन ! मजपासुन दूर हय अता परते ॥ २३६ ॥
जवळी इतके ठेवीं कीं पृष्ठा स्पर्श करिल तच्छ्वास ।
प्रायमसुत हेक्तर हा करुनी दावील घोर कृत्यास ॥ २३७ ॥
अकिलीसाच्या अश्वांवरतीं आरूढ वीर होईल ।
आह्मां दोघां वधुनी ग्रीकांचे वीर सर्व पळवील ॥ २३८ ॥
हें एक घडुन अणविल किंवा पावेल मरण पहिल्यानें " ।
ऐसें वदुनी हांका ग्रीकां मारीत उच्च शब्दानें ॥ २३९ ॥
" आजक्षद्वय तुम्हीं ! ग्रीकाधिप ! मेनिलास ! परिसावें ।

---

* 'आह्मां न्याहो येउन ' करिति अशी आपणांस अश्व खुण । पोप.

शूरोत्तम वीरांनीं अरिच्या सैन्यास परत हांकावें ॥ २४० ॥
हटवुन अरीस, करतिल करणारे तेच रक्षण मृताचें ।
जीवन्ताच्या अमुच्या कोण निवारण करि प्रसंगाचें ॥ २४१ ॥
शोकद समरांतुनियां हेक्तर अणि ईनिआस बघ येती ।
त्रायस्थांत तयांना उत्तम पद सर्व लोक अज देती ॥ २४२ ॥
परि साऱ्या गोष्टी या अवलंबुन असति जोव्हहस्तांत ।
*शूलक्षेप करिन मी वाहिल तो जोव्ह काळजी तात" ॥ २४३ ॥
ऐसें वदुनी तेणें तळपवुनी दीर्घ फेंकिला भाला ।
आरीतसकरिं होती ढाल तियेवर बराच आदळला ॥ २४४ ॥
तेथें न शूल थांबे, जाई भेदून कमरबंदाला ।
तीव्र व्रण करि रुतुनी त्याचें तें निशित अग्र उदरतला ॥ २४५ ॥
झालें प्राप्त कुणाला निर्भर तारुण्य ह्मणुन जो प्रबल ।
वन्यवृषाशीं खेळे घेउन करिं परशु पाहतां सकल ॥ २४६ ॥
धृष्ट पशूच्या मस्तकिं शृंगांच्या मागुनी गदा हाणी ।
वेगें स्नायू तुटती, वृष पडतो, उडुन भूमिवरतिं झणीं ॥ २४७ ॥
तैसा पडे उडोनी उन्मुख भूवरतिं वीर सत्वर तो ।
अंत्रांत शूल रुतुनी हलतां तज्जीव शक्तिसह जातो ॥ २४८ ॥
हेक्तर मग नेमुन धरि त्या आतोमीदनावरी भाला ।
दिसला समूर त्याला पुढतीं वांकून चुकवि शस्त्राला ॥ २४९ ॥
भूमिंत शूल रुतला, राहे वरि अन्य अग्र हलत पहा ।
अन्तर्गत वेगा जणुं टाकी खपवून शूल दृढतर हा ॥ २५० ॥

---

* आहे निकट निज गदा, जगदाद्य दयाळु देवही जागा । मोरोपंत.

नंतर दोघेजण हे लढते काढून दीर्घ तलवारी ।
दोघे आजक्ष अले गर्दी वाटेंत असुनही भारी ॥ २९१ ॥
परिसून मित्रवाणी येउन दोघांस दूर ते करिती ।
हेक्तर मागें सरला परते तो ईनिआस भिउन अती ॥ २९२ ॥
गेला क्रोमिअस दुरी सोडुन आरीतसास समरांत ।
जो तेथ पडुन होता होउन घायाळ वीर हृदयांत ॥ २९३ ॥
आतोमीदन याचें कवच हरी मार्स तुल्य जो वीर ।
गर्वोक्ति करित थोडी मिळवी जय भूप धरुनियां धीर ॥ २९४ ॥
"मीनीशिअसजनिधनें झाला संक्षोभ बहुत चित्ताला ।
न्यूनपराक्रम वीरां वधुनी तो आज खचित घालविला" ॥ २९५ ॥
ऐसें वदुनी ठेवी रुधिरमयी स्वरथिं लूट उचलून ।
रुधिरें गेले सारे याचे तों हस्तपाद माखून ॥ २९६ ॥
चढतां रथीं गमे हा सिंह बसे वृषभ एक भक्षून ।
पत्रोक्लशावरोनी दुःखद रण मातलें अतां फिरुन ॥ २९७ ॥
भूवर येत मिनर्वा स्वर्गाहुन आज उतरुनी खालीं ।
देई भर कलहाला. सांगे तिज जोव्ह ह्मणुन ती आली ॥ २९८ ॥
हेतु तयाचा होता ग्रीकां उत्साह समरिं बहु यावा ।
ती घेत नीललोहित झांकाया निज तनूस मेघ नवा ॥ २९९ ॥
सुरधनु नभिं पाडोनी मनुजांतें स्पष्ट जोव्ह सुचवीत ।
मातेल घोर रण अथ वात भयंकर सुटेल तो शीत ॥ २६० ॥
कामें जन थांबाविती, ढोरेंही पावती बहु त्रास ।

तेविं हिला पाहोनी ग्रीकांच्या भीति पडत सैन्यास ॥ २६१ ॥
पहिल्यानें ती बोले एत्रिअसाच्या सुतास शूरास ।
होता जवळचि तेथें कांहींसें करित तो मेनिलास ॥ २६२ ॥
फीनिक्सरूप धरुनी तद्वाणीचें करून अनुकरण ।
उत्तेजन देत तया शौर्यानें चालवावयास रण ॥ २६३ ॥
" होइल अपकीर्ति तुझी, खचित तुला अज कलंक लागेल ।
श्वानां जर फाडाया त्रायीं अकिलीसमित्र गावेल ॥ २६४ ॥
स्वजनां उत्तेजन दे, चालव रे समर, करुनियां धीर " ।
देई तिज परतोनी उत्तर हें मेनिलास नरवीर ॥ २६५ ॥
" फीनिक्स ! तात ! तुझें परिणत वय जननही पुरातन रे ! ।
हे ! वृद्ध मनुज ! आहे वांछित हें एक मम मनांत खरें ॥२६६॥
देउ मिनर्वा बल मज शस्त्रांचे घाव समरिं वाराया ।
राहिन नेट धरुन मग समरीं पत्रोक्लशास रक्षाया ॥ २६७ ॥
त्यानें मरुनी मातें मित्रातें अज असह्य दुःख दिलें ।
बल हेक्तरास आहे, अग्नीचें समरिं जें जनां दिसलें ॥ २६८ ॥
शूलें हत्या करितो आणी ती थांबवून कधिं न धरी ।
कारण जोव्ह तयाला देतो यश नित्य आपला समरीं " ॥ २६९ ॥
ऐसें तो वदला मग झाला आनंद बहु मिनर्वेला ।
कारण सर्वां आधीं प्रार्थी हा तिजासिं जाणुनी वेला ॥ २७० ॥
स्कंधीं तिनें तयाच्या अणिलें बल तेंवि रुचिर जानूंत ।
अणि धैर्य मक्षिकेचें हृदयीं भरिलें तसेंच अनुभूत ॥ २७१ ॥

* अंगावरुनी देतां हांकुन जी धांवुनी पुन्हां चावे ।
जिस रक्त मानवाचें आवडतें अधिक तें जसें खावें ॥ २७२ ॥
असलें धाष्ट्र्य तियेतें त्याच्या हृदयांत आणुनी भरलें ।
पत्रोक्तशसन्निध मग तेणें जाऊन शस्त्र करिं धरलें ॥ २७३ ॥
त्रायस्थांत समयिं या होता राणिं एइशनज पोदीस ।
जो शूर हेक्तराच्या होता हेतु प्रसन्न वृत्तीस ॥ २७४ ॥
मिष्टान्नाशनसमयीं होता श्रीमन्त सोबती हाच ।
पाडीत कमरबंदीं त्याच्या परि मेनिलास अज खांच ॥ २७५ ॥
मारी शूल तयाला गेला तो आरपार मग निघुन ।
तो पडतां ध्वनि झाला, त्या नेई मेनिलास ओढून ॥ २७६ ॥
मित्रातें दावितसे; फीबस तो हेक्तरापशीं गेला ।
धरि रूप त्या नृपाचें वास जयें आबिदासपुरिं केला ॥ २७७ ॥
फीनप्स आशिआसज, होता प्राघूर्णकांत त्या प्रिय हा ।
तद्रूपधर अपालो बोले ज्याचें असह्य तेज महा ॥ २७८ ॥

---

*जळफळतो जीव जिचा वाटे गेला भरून सर्वभरी ।
व्यर्थ जिला हांकावें; रुधिराची आस जी फिरून धरी ॥ १ ॥
वातापासुन झाली आकाशीं उष्णतेस जी कन्या ।
तल्लख पंखां ताणुन उडते अश्रांत दांडगी वन्या ॥ २ ॥
वळते, तुटुनी पडते, रागानें त्रस्त होत झुंझार ।
दंश करोनी लावी सोसाया वेदना दुजां फार ॥ ३ ॥

पोप.

" ग्रीकांत कोण तुझी भीति अजी बाळगील हेक्तर रे ! ।
भ्यालास मेनिलासा, होता जो भ्याड वीर अजवर रे ! ॥ २७९ ॥
त्रायस्थांच्या करिंचें नेतो शव एकला कसा पाहें ।
एइशनाच्या तनया पोदीसा मारिलें तयें आहे ॥ २८० ॥
विश्वास्य शूर होता मित्र तुझा फार फार आवडता ! " ।
हेक्तरहृदया ग्रासी दुःखाचा लोट तो असें वदतां ॥ २८१ ॥
उज्ज्वल शस्त्रा घेउनि हेक्तर गेला रणांत धांवुनियां ।
उचलुन ईजिस टाकी जोव्ह घनें मग इदाद्रि झांकुनियां ॥ २८२ ॥
विद्युत्प्रकाश पाडी मेघांची गर्जना बहू करवी ।
हलवी पर्वत, देई त्रायस्थां विजय शत्रुतें पळवी ॥ २८३ ॥
पेनील्यूस जहाला नायक तो मुख्य आज पळत्यांचा ! ।
स्कंधाग्रीं चुटपुटता वार जहाला तयास भाल्याचा ॥ २८४ ॥
नाचत होता पुढतीं, त्यां भेटे तोंच पालिदामास ।
शूलें तयास वेधी वांशित जो आंत कठिण हाडास ॥ २८५ ॥
क्षत झाला लिइतस करिं आलिक्त्रायनज मनगटावरतीं ।
हेक्तर शूल तयाला मारुन पळवीत सहज दूर अती ॥ २८६ ॥
गेल्यावर दूर बघे थांबोनी वीर तो सभोंवार ।
कंप भरे सर्वांऽगीं अरिशीं झुजण्यास आज या फार ॥ २८७ ॥
हेक्तर मार्गे लागे नेम इदामिनिअसें तदा धरला ।
हाणीत चूचुकावर त्यालागीं तीक्ष्ण आपुला भाला ॥ २८८ ॥
वक्षस्त्राणावरतीं लागुनियां अग्र तीक्ष्णही तुटलें ।

त्रोजन अरडति मोर्दे, हेक्तर हाणीत शस्त्र मग अपुलें ॥ २८९ ॥
थ्रूकालिअनसुताला हाणी मग रणिं इदामिनिअसाला ।
होता रथा जवळ तो, थोड्यानें नेम परि असे चुकला ॥ २९० ॥
कोईरानस समरीं त्या करि साहाय्य योग्य अवधीस ।
आणितसे ज्यालागीं अरिशीं लढण्यास मेरिआनीस ॥ २९१ ॥
लिक्तसपुराहुनी हा आला समरांत करुन घाईस ।
नौका सोडुन भूवर वीर उभा लढत मेरिआनीस ॥ २९२ ॥
पडुनि बळी रणिं त्यानें त्रायस्थां यश अजी दिलें असतें ।
कोईरानस हांकी अश्व अणी चुकवि मरण तें परतें ॥ २९३ ॥
साहाय्य थोर केलें टाळियली घोर वेळ ही ज्यानें ।
नरहन्तृहेक्तराच्या हस्तीं जीवित गमाविलें त्यानें ॥ २९४ ॥
दंष्ट्रास्थींच्या खालीं लागे शूलाग्र तीक्ष्ण कानांशीं ।
जिव्हेंत टुपुन जाई, टाकी निखळून सकल दंतांशीं ॥ २९५ ॥
पडला रथांतुनी तो च्युत झाल्या रश्मि त्याच अवधीस ।
उचलुन करिं त्यालागीं बोले मित्रास मेरिआनीस ॥ २९६ ॥
"हांकुन अश्वां न्यावें नौदेशातें इदामिनिअसा ! रे ! ।
बघतोस ग्रीकां कीं मिळण्या जय नीट लक्षण न सारें" ॥ २९७ ॥
वचन इदामिनिअस हें, परिसोनी अश्व नौप्रदेशातें ।
हांकी त्वरा करोनी ग्रासी भय बहु तदीय चित्तातें ॥ २९८ ॥
विसर न जोव्हा पडला आजक्षाचा व मेनिलासाचा ।
त्रायस्थां जरि दिधला क्षणिक तयें अंश आज विजयाचा ॥ २९९ ॥

तेलामनज स्वजनां लागे आजक्ष वीर बोलाया ।
" हा धिक् ! जोव्ह करितसे साहाय्य ट्रोजनां अशा समया ॥३००॥
सर्वांत मूर्ख जो कुणि त्याला ही गोष्ट कळुन येईल ।
शस्त्रें अमोघ होती, सोडो तीं भ्याड मूर्ख दुःशील ॥ ३०१ ॥
बोलूं काय अधिक मीं, लावित त्या जोव्ह खचित मार्गास ।
अमुचीं शस्त्रें भूवर पडुनी देतात अयश सर्वांस ॥ ३०२ ॥
या हो ! तथापि सगळे! काढूं शोधुन युक्ति अज कांहीं ।
आम्हीं शवास हरतां मोद करावा घरांत सर्वांहीं ॥ ३०३ ॥
आज खरोखर आम्हां येथें पाहून दुःख ते करती ।
' नरहन्तृहेक्तराच्या पुढती टिकतील नच,' असें म्हणती ॥ ३०४ ॥
कोणी सहचर जवळी होता मज पाहिजे अतां बरवा ।
अकिलीसातें जाउन माझा सांगावया निरोप हवा ॥ ३०५ ॥
दुःखद वृत्त न कळलें त्या कीं प्रिय मित्र जाहला मृत तो ! ।
परि ऐसा मज कोणी माणुस अमुच्यांत आज नच दिसतो ॥ ३०६ ॥
कारण अश्वांसह जन गेले बुडुनी तमांत अज सारे ।
हे जोव्ह ! तात ! अवरीं तम रणिं सर्वत्र दाट जें पसरे ॥ ३०७ ॥
ग्रीकां त्यांतुन सोडव होऊंदे स्वच्छ चांगलें गगन ।
व्हावी कृपा अह्मांवर दिसुंदे आह्मांस उघडितां नयन ॥ ३०८ ॥
×अणि नंतर मारावें आह्मां सर्वांसही उजेडांत ।
याहुन अधिक न देईं नाहीं इच्छा तुझी जरी तात " ॥ ३०९ ॥

× हें आजक्षाचें जोव्हापाशीं मागणें त्याच्या बाण्याला धरून आहे.

ऐसें तो वदतां क्षणिं करुणा तातास येत रडत्याची ।
टाकोनी तम नाशुन विखरी गगनांत राशि मेघांची ॥ ३१० ॥
सूर्यप्रकाश पडला झालें दर्शन समग्र समराचें ।
आजक्ष वदत वेधुन शूराचें लक्ष्य मेनिलासाचें ॥ ३११ ॥
जोव्हप्रसाद ! टाकीं सर्व भरीं मेनिलास ! हे ! नजर ।
नेस्तरज आन्तिलोकस दिसतो जीवन्त समरिं आज जर ॥३१२॥
सांगे त्या ' धांवत जा ! अकिलीसातें कळीव वृत्त खरें ! ।
कीं त्वन्मित्र जहाला, रणिं मृत हें वृत्त परिस शोकद रे " ॥३१३॥
ऐसें तो वदला तें ऐकतसे मेनिलास रणशूर ।
मग तो धांवत गेला, गोठ्यांतुन सिंह जेविं भेसूर ॥ ३१४ ॥
पीडा त्यानें केली श्वानांतें माणसांस रात्र भरी ।
ज्यांनीं सक्त पहारा केला गोमांस हरुं दिलें न परी ॥ ३१५ ॥
मांसाशनोत्सुकानें केले हल्ले कितीक सिंहानें ।
लाभ न कांहीं झाला टोंचिति जन त्या दुरून शूलानें ॥ ३१६ ॥
आसक्त अंतरीं तो परि वाटे भीति त्या मशालींची ।
होतां प्रभात खेदें आपणची वाट धरित तों वनिंची ॥ ३१७ ॥
तेवीं खेदें गेला टाकुन शव मेनिलास रणशूर ।
ग्रीक तयाला अरिकरिं टाकुन पळतील वाटलें दूर ॥ ३१८ ॥
दोघे आजक्ष तयें प्रार्थियले तेविं मेरिआनीस ।
"ग्रीकाधिप होता किति पत्रोक्लश सुजन तें पुसा स्मृतिस ॥ ३१९ ॥
असतां जीवन्त सदा जाणे घ्यावें कसें बरें ह्मणुन ।

आज पराभव पावे नियतीच्या आणि मृत्युच्या कडुन " ॥ ३२० ॥
तो पीतकेश नृपवर गेला मग मेनिलास हें वदुन ।
सर्व दिशांनीं शोधी गरुड जसा नीट लक्ष्य लावून ॥ ३२१ ॥
ह्मणती दृष्टि जयाची तीक्ष्ण असे सर्व थोर विहगांत ।
उंचावरुन बघे हा तरि न लपूं शकत शशक झुडपांत ॥ ३२२ ॥
झडप तयावर घाली धरुनी तज्जीव करितसे हरण ।
जोव्हप्रसाद ! नृपते ! बघासि तसा मेनिलास ! तूं प्रवण ॥ ३२३ ॥
अगणित सहचरगाणीं तूं टाकिशी अजि दृष्टि तीव्र सर्व भरी ।
बघसी सजीव कोठें सन्नृप नेस्तरज सांपडेल जरी ॥ ३२४ ॥
दिसला लवकर तो या समराच्या दीर्घ वाम बाजूस ।
उत्साह सोबत्यांतें देत उभा जो गुरूंस व लघूंस ॥ ३२५ ॥
त्याच्याजवळ उभा मग राहोनी मेनिलास त्या वदत ।
" ये परिस आन्तिलोकस ! जोव्हप्रिय ! दुष्ट वृत्त जें घडत ! ॥३२६॥
घडलें नसतें जर हें तर झालें चांगलें किती असतें ! ।
ग्रीकांवरतीं क्षोभे देव असें विचरतां तुला दिसतें ॥ ३२७ ॥
जय मिळतो त्रायस्थां, पत्रोक्लश होत नष्ट झुंझार ! ।
ग्रीकां त्याचा गेला लागुनियां नाद सारखा फार ॥ ३२८ ॥
तूं परि अकिलीसातें लवकर जाऊन सर्व हें कळव ।
आणिल बघ जर जावुन नौदेशा परत शस्त्रहीन शव ॥ ३२९ ॥
त्याचें कवच हरोनी हेक्तर समरांत सर्वभर फिरके "
हें वृत्त आन्तिलोकस ऐके, अणि वीर मानसीं चरके ! ॥ ३३० ॥

*शब्द मुखीं उमटेना अश्रूंनीं जात भरुनियां नयन ! ।
द्रव पावे स्वर कण्ठीं स्तंभित होऊन करि न निर्गमन ! ॥ ३३१ ॥
तरि आज्ञा मोडि न तो मित्राची वीर मेनिलासाची ।
लेओदोकस होता सहचर सेवा करीत अश्वांची ॥ ३३२ ॥
त्याजवळी काढुनियां देई तो स्थूल आपुलें कवच ।
दुःखार्ता रडत्या त्या नेती वाहून शीघ्र पाय नच ॥ ३३३ ॥
अकिलीसा जावोनी दुसरा दुर्वृत्त कवण हें सांगे ।
नरवीर आन्तिलोकस जातां हुरहूर पिलिअनां लागे ॥ ३३४ ॥
साहाय्य यांस करणें नव्हतें हे मेनिलास ! तुज रुचत ।
जाशी स्वतां म्हणोनी पत्रोक्लश समरिं जेथ तो पडत ॥ ३३५ ॥
दिधला तिकडे लावुन तेणें तो अधि थ्रासिमेदीस ।
नंतर आजक्षाशीं जाउनियां वीर करित उक्तीस ॥ ३३६ ॥
"धाडुन दिलें " वदे " त्या जायातें पळत नौप्रदेशाला ।

---

* पत्रोक्लश मृत झाला, अर्थात त्याचा हा विरह कायमचा झाला. तें वृत्त ऐकून झालेल्या दुःखाचें वर्णन ज्या वरील शब्दांनीं होमरनें केलें आहे, त्याच शब्दांनीं शकुन्तलेच्या अल्पकालिक, पुढें होणाऱ्या (जो 'यास्यति' या शब्दावरून व्यक्त होत आहे) विरहानें कण्वास झालेल्या दुःखाचें वर्णन कालिदासानें केलें आहे त्याची येथें वाचकांस आठवण होईलच. तुलनेच्या कामापुरते दोन चरण दिले आहेत.

यास्यत्यद्य शकुन्तलेति हृदयं संस्पृष्टमुत्कण्ठया ।
कण्ठः स्तंभितबाष्पवृत्तिकलुषश्चिन्ताजडं दर्शनम् ॥

कालिदासकृत शाकुन्तल.

अकिलीसा भेटाया येइल परतून परि दिसे न मला ॥ ३३७ ॥
अतिरिक्त कोप त्याचा आहे जरि खचित हेक्तरावर तो ।
त्रायस्थांशीं कैसा शस्त्रांविण वीर तो अतां लढतो ॥ ३३८ ॥
योजूं उपाय उत्तम नेतां येईल शव अह्मांस जयें ।
त्रायस्थांच्या हातुन मरण अल्यानें अह्मां न कामा ये ॥ ३३९ ॥
तेलामनज तयाला उत्तर आजक्ष देतसे उलट ।
गोष्टी सर्व खऱ्या तूं वदलासी मेनिलास निष्कपट ॥ ३४० ॥
वांकुन खालीं उचलीं शव तें तूं आणि मेरिआनीस ।
समरांतून दुरी न्या आह्मीं लढुं चित्तिं अणुन अवधीस ॥ ३४१ ॥
नामें समान अमुचीं, दोघांचें वीर्यही समान तसें ।
हेक्तर आणि त्रोजन यांशीं आलों करीत युद्ध कसें ॥ ३४२ ॥
साहाय्य फार केलें एकांमेकांस राहुनी जवळ " ।
ऐसें तो वदला मग उचलिति शव निज करांत ते प्रबळ ॥ ३४३ ॥
त्रोजन सैनिक अरडति बघतां ग्रीकांस उचलितां शव तें ।
घुसती श्वान जसे कीं व्याध क्षतसूकरावरी पळते ॥ ३४४ ॥
त्यातें फाडायातें औत्सुक्यें एकदां उडी घेती ।
अंगावर सूकर मग उलटुनि निज शक्ति जोखुनि बघे ती ॥ ३४५ ॥
येती सकल परत ते सर्व दिशांनीं पळोनियां जाती ।
तैसे त्रोजन लढती जूट करोनी जरा पुढें घुसती ॥ ३४६ ॥
करिती वार असींनीं किंवा त्या द्विमुख थोर भाल्यांनीं ।
आजक्षद्वय परि ते उलटुन पडती तयावरी मानी ॥ ३४७ ॥

मुखवर्ण जाय फिरुनी, एकातेंही न होतसे धीर ।
न्याया शव ओढोनी पुढती लढला न एकही वीर ॥ ३४८ ॥
नौदेशा उचलुन शव नेति रणांतून फार उत्साहें ।
मागून कलह पेटे वाटे कीं स्तोम अग्निचा आहे ॥ ३४९ ॥
जो वाढतां क्षणांतचि भक्षाया सहज लागतो नगर।
क्षय पावति किंतिक गृहें ज्वाला विझवुं न शके कुणी प्रखर ॥३५०॥
वाहे जोर करुनियां मधुनी गर्जोनि केवढा वारा ! ।
याच्या मागुन तैसा वीरांचा घोळका दिसे सारा ॥ ३५१ ॥
सारें बळ खरचोनी गिरिवरतीं काम खेचरें करिती ।
नौबन्धनार्थ नेती ओढुनियां दारुखण्ड थोर अती ॥ ३५२ ॥
किंवा बहाल मोठें, परि पथ असतो बराच तो विषम ।
आंतून जीव त्यांचा घाईनें श्रान्त होतसे परम ॥ ३५३ ॥
घर्में भिजून जातां होतो त्यां आणखी बहु त्रास ।
शव नेतां उचलोनी अनुभव आला तसाच दोघांस ॥ ३५४ ॥
आजक्षांनीं मागुन केला प्रतिबंध चांगला अरिस ।
तट थोर लांकडाचा अडवि जलौघास योग्य संधीस ॥ ३५५ ॥
क्षुब्ध नद्यांची गति ही कुण्ठित होते तया पुढें सर्व ।
परते जलौघ फिरुनी समभूवर वळत सोडुनी गर्व ॥ ३५६ ॥
तटभेद शक्य नाहीं, वेग नद्यांचा खराच तो फुकट ।
आजक्षांनीं तैसें लावियलें अरिस जावया उलट ॥ ३५७ ॥
इतुकें झालें तरिही त्रोजन मागून सारखे जाती ।

दोन विशेषें त्यांतुन हेक्तर आणि ईनिआस धीट अती ॥ ३५८ ॥
काकांचा व बकांचा कळप श्येना पुढें भयें पळतो ।
आलें मरण सुचविण्या कर्कश किलकिल रवा जसा करतो ॥ ३५९ ॥
त्या हेक्तरास आणि त्या बघुनी शूरास ईनिआसास ।
करती आक्रोश तसा पळतां हे **ग्रीक** त्यजुनि युद्धास ॥ ३६० ॥
सुन्दर सुन्दर कवचें **ग्री**कांचीं गळति कितिक पळत्यांचीं ।
बाहेर आंत खंदक भरला परि गति खुटे न युद्धाची ॥ ३६१ ॥

सर्ग १८ वा.

अकिलीसाचा शोक व व्हल्कनकृत नवीन कवच.

सारांशः—थेटिस अकिलीसाचें सांत्वन करिते. व व्हल्कनाकडून नवें कवच आणण्याचें त्यास वचन देते. जूनोच्या आज्ञेवरून अकिलीस समरप्रवेश करतो. पत्रोक्लशाचें शव सोडवून आणतो. व त्याच्या प्रेतविधीची तयारी करितो. व्हल्कन अकिलीसाकरतां कवच व ढाल घडवतो.

कालमानः—एकुणतिसावा दिवस व त्याची रात्र.

स्थलमानः—अकिलीसाची छावणी, व व्हल्कन मंदिर.

वैरानल पेटविती ऐसा हे वीर जों दळीं उभय ।
तों दूत आन्तिलोकस अकिलीसा जवळ पोंचला सभय ॥ १ ॥
उच्चाग्रभाग त्याची नौका तीच्या समूर जो बसुनी ।
दिसती त्या गोष्टींचें चिन्तन करि मानसांत फिरफिरुनी ॥ २ ॥
निज चित्तास विचारी सोडुनियां दीर्घ एक निश्वास ।
हा! धिक्! एकियनां अरि देई हांकून दीर्घकेशांस !॥ ३ ॥
नौदेशाप्रत येती धांवत! संभ्रम किमर्थ हा उडत! ।
देवांनीं मज वरतीं संकट कां आणिलें असें बहुत ॥ ४ ॥
कथिलें भाविष्य मागें मातेनें दुःखदायि हें सतत ।
जीवन्तपणीं पाहिन, मिर्मिदनश्रेष्ठ एक समररत ॥ ५ ॥
ज्यातें त्रोजनकर ते सूर्यालोकीं न उरवातिल जगतीं ।
मीनीशिअसज झाला मृत राणिं ! माझी अशीच होत मती ॥ ६ ॥

मोठा दुराग्रही तो ! कथिलें मीं 'शात्रवाग्नि विझवून ।
नौदेशा परतावें, रण नलगे हेक्तरासवें' म्हणुन ॥ ७ ॥
ऐसें मनिं चिंतन तो होता जों करित तोंच नेस्तरज ।
येउन निरोप सांगें दुःखद गाळून अश्रु उष्ण अज ॥ ८ ॥
"हा धिक्! पेलिअसज! हें! शोकावह वृत्त ऐकशिल भलतें ।
घडलें नसतें जर हें तर किति रे ! सौख्य जाहलें असतें ! ॥ ९ ॥
पत्रोक्लश पडला रणिं! लढतो अरि मिळविण्या अशस्त्र शव ।
त्या थोर हेक्तरानें नेलें तत्कवच हरुन जणुं विभव" ॥ १० ॥
ऐसें तो वदला मग शोकाचा कृष्ण वर्ण घन उठुनी ।
तद्वदनच्छवि टाकी क्षणिं एका पार सर्व झांकूनी ॥ ११ ॥
दों हातीं घेउनि तो राख तदा आपुल्या शिरीं घाली ।
ललित मुखातें मळवी लोळवि राखेंत चोल तो खालीं ॥ १२ ॥
वीर पडे धरणीवर लोळाया धुळिंत गडबडां लागे ।
टाकी केश विखरुनी होते जे बांधिले करें मागें ॥ १३ ॥
अकिलीस व पत्रोक्लश यांनीं हरिल्या लढून ज्या दासी ।
शोकाकुलहृदया त्या आक्रंदोनी करीत खेदासीं ॥ १४ ॥
अकिलीसाच्या भोंवतिं जमल्या धांवून उघडुन द्वार ।
अङ्गें विगलित करिती घेतां बडवून ऊर बहुवार ॥ १५ ॥
करि शोक आन्तिलोकस अकिलीसाच्या करां करीं धरुन ।
होता भीत गळा हा असिनें घेईल समयिं कापून ॥ १६ ॥
दुःखार्तस्वर काढी, गाळी बहु अश्रुजल महाशय तो ।

अकिलीसाचा दारुण वाढे तो शोक, जो न आंवरतो ॥ १७ ॥
वृद्ध पित्यासन्निध अज सागरतलिं होति वंद्य तन्माता ।
याच्या शोका ऐकुन करुं लागे ती विलाप बहु आतां ॥ १८ ॥
जलदेवता तयास्थलिं जमल्या तीच्या सभोंवतीं सकल ।
नेरीअसदुहिता त्या होत्या तितुक्या अल्या तिथें विकल ॥ १९ ॥
थेलीइआ व थोआ, ग्लाकी अणि हेलिआसिमो, थोई ।
दोतो, प्रोतो, दोरिस आयीरा, मेलिता, आम्फिथोई ॥ २० ॥
ती येत सिमोदोकी, लिम्नोरीआ तशीच नेसीआ ।
आगावी, फेरूसा, पॅनीपो व स्पिओ व आक्तीआ ॥ २१ ॥
मग येत दिनामेनी, देक्सामेनी, व कालिआनासा ।
विख्यात आंफिनोमी ती आप्स्यूदीस येतसे सहसा ॥ २२ ॥
नेमर्तीस तशी ती क्रीमीन व कालिआनिरा आली ।
गॅलातीआ, मीरा, आमाथीआहि धांवती झाली ॥ २३ ॥
आयेनेसा धांवे ओरिथिआ राहिली न हिमधवल ।
आयेनिरा हि आली. नेरीअसजा अल्या अशा सकल ॥ २४ ॥
सुन्दर विवर तयांनीं गेलें सारें क्षणांत तें भरुन ।
+सगळ्या एका समयीं लागति घेण्यास ऊर बडवून ॥ २५ ॥
थेटिस ते शोक करी "भगिनींनो ! वृत्त आयका कानीं ।
माझें दुःख किती तें तुमच्या येईल सर्व ही ध्यानीं ॥ २६ ॥
हा! धिक् ! दैवहता मी आहें ही थोर पापिणी कसली ।

+ ही शोक करण्याची पद्धत आमच्या देशांत कांहीं भागांत चालू आहे.

साधुन कुयोग वीरा धीरा जी प्रसवुनी अशी बसली! २७ ॥
निर्दोषा वीरवरा तनया जगीं मीं खराच जन्म दिला ।
भूनें जसा तरुस, जो लागे दिवसानुदिवस वाढीला ॥ २८ ॥
वाढविला हो तो मी सुफल क्षेत्रांत बाल वृक्ष जसा ।
त्रायस्थांशीं लढण्या धाडियलें त्यास इलियमां सहसा ॥ २९ ॥
भेटेल फिरुन नच तो पेलिअसाच्या सुरम्य भवनांत ।
पाहिल रविप्रकाशा तों हा वांचेल थोर दुःखांत ॥ ३० ॥
त्याच्याकडेस गेलें तरि तो उपयोग अल्पही नाहीं ।
जाइन तथापि मीं जर नयनीं पुत्रास पोटभर पाहीं ॥ ३१ ॥
राहे समरा सोडुन. बघतें त्या दुःख होतसे काय " ।
बोलून शब्द ऐसे विवरांतुन ती निघोनियां जाय ॥ ३२ ॥
सगळ्याजणी मिळोनी गेल्या तीच्यां बरोबरी रडत ।
उदधि दुभंगुन यांतें वाट करी रुंद आणखी वितत ॥ ३३ ॥
त्रायाजवळी येतां उतरति तीरावरी क्रमें सर्व ।
मिर्मिदनाच्या नौका तेथें पसरून करिति बहु गर्व ॥ ३४ ॥
त्यांच्या मध्यें होता दुःखी अकिलीस वीर तो आतां ।
माता पूज्य तयाची राहे जवळी उभी तिथें जातां ॥ ३५ ॥
मस्तक पुत्राचें करिं धरुनी मारीत दीर्घ आरोळी ।
त्यातें उद्देशुन वच बोले ती शोकयुक्त मग भोळी ॥ ३६ ॥
" तनया ! रे ! कां रडसी ? सांगें तुज दुःख कोणतें गाजी ? ।
लपवुं नको. तें सांगें जोव्हानें हेतु पुरविले आजी ॥ ३७ ॥

दोन्हीं कर उचलोनी पूर्वीं त्वां प्रार्थिलें तसें झालें ।
नौदेशीं त्वद्भावें ग्रीक अकिर्तीस मिळवुनी बसले " ॥ ३८ ॥
तूर्णपदें अकिलीसें दिधलें सोच्छ्वास तिजसि उत्तर तें
" अम्बे ! दिधलें सारें आलिम्पसवासिनें नृपें मातें ॥ ३९ ॥
परि त्यांत सौख्य कुठुनी? पत्रोक्लश मित्र मृत असे झाला ।
प्रिय सर्वांहुनि होता माझ्या शीर्षाहुनी सदा मजला ॥ ४० ॥
त्याला मी अन्तरलों ! वधुनी त्या कवच हेक्तरें हरिलें ! ।
वस्तु न अद्भुत दुसरी; कवच तसें नाहिं कोणि पाहियलें ॥ ४१ ॥
ज्याचा अहेर केला पेलिअसातें उदार अमरांनीं ।
ठेवियलें सन्मानें मर्त्यांच्या जेधवां तुला शयनीं ॥ ४२ ॥
होतें बरवें बहु जर अमरांसह राहतीस उदधिजलीं ।
तेविं बरें पेलिअसें असती जर मर्त्य अंगना वरिली ॥ ४३ ॥
होऊन लग्न गेलें झाला परिणाम घोर संततचा ।
तव हृदयावर घाला आतां पडणार पुत्रशोकाचा ॥ ४४ ॥
येउनियां परत घरा तुजला भेटेल तो न फिरुन अज ।
' जगलास कां फुकाचा ' पुसतें संक्षुब्ध मन सदैव मज ॥ ४५ ॥
कोणा भेटुं न तें दे भाला मम जों न हेक्तरा मारी ।
पत्रोक्लशवधपातक पुसण्यातें हा न दण्ड त्या भारी " ॥ ४६ ॥
थेटिस वदली त्यातें खालीं गाळून अश्रुंचा पूर ।
"अल्पायुता वरिल तुज येइल मग मरण जें नसे दूर ॥ ४७ ॥
माझ्या तनया ! ह्मणसी तैसा जर सूड आज घेशील ।

मागून हेक्तराच्या तुजला ग्रासील दैव दुःशील " ॥ ४८ ॥
दीर्घोच्छ्वासा सोडुन उत्तर अकिलीस देतसे तिजला ।
"मग लागलाच मरुं दे! ज्यांही कां रक्षिलें न सुहृदाला ! ॥४९॥
तो मृत होत विदेशीं जन्माची भूमि दूर सोडून ।
माझी अठवण केली तेणें ' वारीन मरण मीं ' ह्मणुन ॥ ५० ॥
परि हा ! आतां मीं कधिं जन्माची भू न नयनिं पाहीन ।
पत्रोक्लशास झाली रक्षक माझी अगाध मैत्री न ॥ ५१ ॥
दुसरे माझे सहचर हेक्तरकरविजित जाहले अमित ।
नौदेशीं बसलों मी भूमीला भार होउनी खचित ! ॥ ५२ ॥
मत्सम युद्धविशारद नाहीं ग्रीकांत वीर कुणि अन्य ।
उपदेशाया असती कितिक तरी बुद्धिचे असामान्य ॥ ५३ ॥
मर्त्यांचा अमरांचा मोडाया कलह पातला समय ।
तो कोप नष्ट करुं दे जो करि सुज्ञांसही सदा अदय ॥ ५४ ॥
मधुनिष्यंदाहुनही जिव्हेला गोड अधिक जो लागे ।
मळवी मन, कृष्ण जशी अंतरिं उद्भूत धूम्रधारा गे ॥ ५५ ॥
अगमेम्ननें नृपानें आणियला कोप मजसिं असलाच ।
उद्वेग बहुत झाला ! गतगोष्टीस्मरण करितसे जांच ॥ ५६ ॥
गेल्याचा शोक वृथा ! चित्तोद्रेकास शमविण्यास हवें ।
परि आतां जातों मी हेक्तर पाहिन जरी मला गावे ॥ ५७ ॥
मित्राचा घातक तो भेटायातें हवा मला समरीं ।
जोंव्हादि अमर मज मग देउत गे मरण इच्छितात तरी ॥ ५८ ॥

हर्क्यूलीसाचें बल झालें असमर्थ मरण चुकवाया ।
सॅंतर्नज जोव्हाचें गेलें तें प्रेम सर्वही वायां ॥ ५९ ॥
दैव तया विजित करी; जूनोचा कोपही तया नडला ।
तैसा पडेन मींही ! दैवीं जर मरणकाल जवळि अला ॥ ६० ॥
परि आतां मिळवूं दे मजला यश थोर वैभवाकार ।
दार्देनिअन त्रोजन नारींतें रडवुं दे अतां फार ॥ ६१ ॥
दीर्घश्वासा सोडुन पुसवूं दे अश्रु कोमल करांनीं ।
म्हणजे कळेल त्यां किति करितों अल्पांत कार्य रणिं मानी ॥ ६२ ॥
म्हणुनी अडवुं नको तूं मजसीं समरास आज जातांना ।
ममता मजवर करसी वळवूं शकशी न तूं मदीय मना" ॥ ६३ ॥
रजतपदी थेटिस त्या वदली देवी " खरेंच हे तनया ! ।
म्हणती न वाउगें जन मित्रातें तारितां कुणी समया ॥ ६४ ॥
पित्तलमय शस्त्रास्त्रें त्रायस्थांजवळ असति उज्ज्वल तीं ।
स्कन्धीं जीं चढवोनी हेक्तर रणिं मिरवितो असें म्हणती ॥ ६५ ॥
फार न भोगिल सुख हें मृत्यु तयाचा अला असे जवळ ।
मार्साधिष्ठितकंदनिं मिसळुं नको आधिं खरचुनी स्वबळ ॥ ६६ ॥
येतें परत इथें तों होइल जों सुप्रभात रव्युदयीं ।
व्हल्कनकृतकवचा मी तुझ्याकरतां अणीन त्या समयीं" ॥ ६७ ॥
ऐसें वदुनी वळुनी जलधिज भगिनींस बोलली " जावें ।
विस्तृत सागरतलिं त्या, वृद्ध पित्याला तसेंच भेटावें ॥ ६८ ॥
मंदिरिं जाउन त्यातें स्वस्थपणें सर्व वृत्त हें सांगा ।

जातें मीं दूर जिथें पसरति आलिम्पसाद्रिच्या रांगा ॥ ६९ ॥
शिल्पी तेथें व्हल्कन; देइल तनयास कवच तर बघतें " ।
ऐसें ती वदली तों सर्वजणी गांठिती जलधितल तें ॥ ७० ॥
रजतपदी थेटिस ती गेली आलिम्पसास कवचार्थ ।
तेथें नेण्यातें तिज झाले तत्पद भराभर समर्थ ॥ ७१ ॥
हेलिस्पान्टा जवळी नौदेशा ग्रीक पोंचले परत ।
हेक्तर मागें लागे स्वर्गी दवडून गर्जना वितत ॥ ७२ ॥
पत्रोक्लशव अजुनी अकिलीसाच्या प्रचण्ड मित्रांनीं ।
नेलें न दूर होतें जेथें पोंचे न शस्त्र यत्नांनीं ॥ ७३ ॥
स्वार, पदाति फिरोनी करण्या तें हरण लागले मागें ।
प्रायमसुत हेक्तर तो धांवे मागून अग्निसा रागें ॥ ७४ ॥
धरि तीन वेळ हेक्तर शव तें ओढावयास पायांनीं ।
त्रायस्थां उत्तेजन देत असे आरडून शब्दांनीं ॥ ७५ ॥
आजक्षबन्धुनीं परि बलद्दप्तातें तयास परतविलें ।
तरि तो हेतु न सोडी; स्वबलाचें प्रस्थ फार माजविलें ॥ ७६ ॥
जनसंमर्दि घुसे कधिं, कधिं थांबे, आरडे कधीं मधुन! ।
परि तो कांहीं केल्या गेला नाहींच परतुनी ह्मणुन! ॥ ७७ ॥
रात्रीं करुन पहारा राखिति जन मृत जसें जनावर तें ।
हांकायास न शकती दूर परी त्या क्षुधार्त सिंहातें ॥ ७८ ॥
आजक्षवीर दोघे समरिं तसे सारखे जरी टपती ।
दूर शवाच्या पासुनि दवडाया हेक्तरास नच शकती ॥ ७९ ॥

नेलें असतें त्यानें हरण करोनी शवासह यशाही ।
परि येत वायुवेगें घेउन संदेश इरिस ती कांहीं ॥ ८० ॥
आलिप्पसावरोनी आली ती पेलिअससुताजवळ ।
' जोव्हादींच्या नकळत व्हावें सन्नद्ध अरि दिसे प्रबळ ' ॥ ८१ ॥
जूनोचा हा त्यानें कथण्या संदेश त्यास ती वदत ।
" रे ऊठ ! पेलिअसजा ! भीषण तुजहून अन्य जन नसत ! ॥८२॥
पत्रोक्लशास राखीं नौदेशीं रण तदर्थ बहु जुपलें ।
दारुण विग्रह मातें, राखी शव पक्ष एक बाहुबलें ॥ ८३ ॥
दुसरा पक्ष त्रोजन, नेण्यातें शव बघे इलियमास ।
हरण्या शव सर्वांहुन लागतसे अधिक हेक्तरा आस ॥ ८४ ॥
मृदुलग्रीवेवरुनी करुनी शिर वेगळें रणामाजी ।
शूलावर रोंवोनी हेक्तर इच्छीत ठेवण्या आजी ॥ ८५ ॥
निद्रा न अधिक सेवीं, उठ रे ! आदर मनीं जरा धर रे ।
त्रायीं पत्रोक्लश हा श्वानां होईल फार सुखकर रे ! ॥ ८६ ॥
होतां भ्रष्ट असें शव तुज नच लागेल काय लांछन रे ! " ।
तिजला अकिलीसें त्या उत्तर दिधलें असें तदा नृवरें ॥ ८७ ॥
" हे देवि ! इरिस ! तुजला दूतीचें कृत्य कोण कथि अमर ? " ।
इरिस तया उत्तर दे " जूनोनें धाडिलें मला नृवर ! ॥ ८८ ॥
जोव्हस्त्री सन्मान्या धाडी जोव्हास कळविल्याविण रे ।
आलिम्पसवासीनें कोण्याही जाणिलें न तें अमरें " ॥ ८९ ॥
चपलपदें अकिलीसें दिधलें उत्तर " रणास जाउं कसा ! ।

त्यांच्या जवळ कवच. मम माता ह्मणते 'न आधिं जाइं तसा ॥९०॥
नयनीं बघशिल आधीं आलेली परत येथ रव्युदयीं ।
व्हल्कनकृत कवचातें तूझ्या करतां अणीन मीं समयीं' ॥ ९१ ॥
ठाउक नाहीं दुसरें कवच कुणाचें बसेल अंगांत ।
आजक्षाची आहे ढाल परी तो असेल समरांत ॥ ९२ ॥
राखी पत्रोक्लशशव मारुनि अरिभार तीव्र शूलानें "।
चपलपदी इरिस वदे " ठावें कीं कवच हरियलें त्यानें ॥ ९३ ॥
जाऊन खंदकाशीं देईं दर्शन अरीस तूं नुसतें ।
त्रोजन भयभीत तदा देतिल सोडून समर बघुं जर तें ॥ ९४ ॥
श्रान्त ग्रीकसुतां मग खाया गावेल दम जरा वेळ ।
राहेल थांबुनी तों जीवध्वंसी रणांतला खेळ" ॥ ९५ ॥
ऐसें वदुनी गेली इरिस, तसा उठत वीर अकिलीस ।
स्कन्धावरतिं मिनर्वा ईजिस फेंकीत याच अवधीस ॥ ९६ ॥
हेमघनें भूषवि शिर दीप्त करी ज्योत वरतिं उज्ज्वल ती ।
दूर द्वीपा जलधिंत अरि अवरोधी धरून रोष अती ॥ ९७ ॥
विद्वेष्य समरिं लढती येउन आंतील लोक बाहेर ।
धूर चढे आकाशीं येतां ती रात्र होत अंधेर ॥ ९८ ॥
पेटति थोर मशाली एकी मागून एक झळझळित ।
त्यांचा प्रकाश पसरे निकटस्थां खूण संकटीं करित ॥ ९९ ॥
लोक कदाचित कोणी बसुनी नौकांत तेथ येतिल ।
अरितें द्याया हांकुन वेळेला समर घोर करतील ॥ १०० ॥

अकिलीसशिरावरची ज्वाला पसरे तशीच आकाशीं ।
सोडुन तट तो गेला पुढतीं राहे उभा खंदकाशीं ॥ १०१ ॥
ग्रीकांत मिसळला नच, पाळी उपदेश वंद्य मातेचा ।
इकडुन घोष तयाचा, तिकडुन मग उठतसे मिनर्वेचा ॥ १०२ ॥
त्रोजन गोंधळले बहु; समजा अरि वेढि एक नगरास ।
वाजे दीर्घ तुतारी ध्वनि जैसा स्पष्ट रिझवि कर्णास ॥ १०३ ॥
ईआकसकुलजस्वर तैसा तो स्पष्ट पडतसे कानीं ।
सर्वांचा जीव तदा गेला मग घाबरून अवसानीं ॥ १०४ ॥
सुन्दर आयाळींचे हय वळुनी नेत रथ अतां परत ।
पुढलें दुःख तयांला आलें कळुनी असून समररत ॥ १०५ ॥
अकिलीसशिरीं ज्वाला पेटविली जी पुरा मिनर्वेनें ।
पाहियली सूतांनीं, घाबरले येति वळखुं चर्येनें ॥ १०६ ॥
रणनाद तीन वेळा अकिलीसें खंदकापशीं केला ।
त्रायस्थांचा आणी मित्रांचा संघ घाबरुन गेला ॥ १०७ ॥
द्वादश वीरोत्तम रणिं झाले मृत चेंगरून समरांत ।
त्यांचेच शूल शिरले आतां त्यांच्याच दीर्घ उदरांत ॥ १०८ ॥
शस्त्रांच्या माऱ्याच्या बाहेरी ग्रीक त्या शवा नेती ।
तिरडीवर चढवोनी न्याया त्या मित्र जवळ बहु येती ॥ १०९ ॥
दुःखें जाति बरोबर, जाई मागून चपल अकिलीस ।
ऊष्णाश्रुबिन्दु गाळी बघुनी मित्रास शोच्य अवधीस ॥ ११० ॥
निज रथ हय देवोनी ज्या तेणें धाडिलें पुरा समरीं ।

त्याची तनु शूलांच्या आघातें शीर्ण दिसत सर्वभरी ॥ १११ ॥
येउन परत तयाला मित्र मिळाला सजीव तो नाहीं।
जूनो विशालनयना अस्ता दवडी रवीस, परि पाहीं ॥ ११२ ॥
इच्छा नव्हती त्याची तेव्हां जायास सागरा परत।
×तरि अस्ता रवि गेला. थांबविती ग्रीक समर कलहरत ॥ ११३ ॥
ट्रोजन सोडुन कलहा देती सोडोनियां हय रथांचे।
संमेलन भरताती ट्रोजन जमुनी सभेंत वीरांचें ॥ ११४ ॥
सारे उभे सभासद कोणालाही न बसविलें खालीं।
अकिलीसाची पाहुनि मूर्ति तयां भीति फार मनिं भरली ॥ ११५ ॥
कष्टद विग्रह सोडुन होता तो दूर; राग बहु त्यास।
नंतर पॅन्थस सुत तो लागे वदण्यास पालिदामास ॥ ११६ ॥
भूत भविष्य तयाला समजे, होता बरा शहाणा तो।
जो मित्र हेक्तराचा नाहीं ठाऊक आज कवणा तो? ॥ ११७ ॥
जन्म तयांचें झालें एका रात्रींत ह्मणुन तुल्य वय।
उत्कृष्ट एक मंत्री; वीर दुजा लढुन मिळवि रणीं विजय ॥ ११८ ॥
पहिला यांतिल करितो सेनेला बोध आज विस्तारें।

× रवीची अस्तमनवेला झाली नव्हती म्हणून तो अस्तास जावयास नाखुष होता. रवीचा अस्त होऊन पुण्यतिमिराचें सर्वत्र आवरण पडतों हेक्तराचा विजय होईल असें जोव्हानें हेक्तराला वचन दिलें होतें. म्हणून विजयी हेक्तराला आळा घालण्याचा दुसरा मार्ग नसल्यामुळें रवीलाच अस्तमनकाल होण्या पूर्वींच अस्तास जावयास जूनोनें लावलें.

" करितां विचार चित्तीं आणावे उभय पक्ष सुज्ञ नरें ॥ ११९ ॥
कथितों उपाय मीं कीं जाऊं परतून आज नगरास।
नौदेशीं बसुनी कां बाहूं पुण्य प्रभातकालास ॥ १२० ॥
दूर तटाच्या पासुन आह्मी आहोंत येथ अज सारे।
होता बसला रुसुनी अजवरि अगमेम्नन‌ावरी हा रे ॥ १२१ ॥
ग्रीकांच्या सह लढणें होतें तों कार्य फार तें सुकर।
नौदेशाशीं रात्री घालवितां मौज वाटली फार ॥ १२२ ॥
होती आस मनीं कीं टाकूं जिंकून सर्वही नांवा।
परि ऐकुन भय वाटे अकिलीसाच्या खरेंच अज नांवा! ॥ १२३ ॥
ग्रीक त्रोजन होते वरित जिथें यश व अयश दुःशील।
तज्जीव उग्र आहे रणभूवर तो तिथें न राहील ॥ १२४ ॥
आतां युद्ध करिल तो जिंकाया नगर आणखी नारी।
आह्मीं जाऊं नगरा, तुमचें मन तें वळो वळेल तरी ॥ १२५ ॥
हेंच करायास हवें, अमृतमयी रात्रि ही अतां पसरे।
*अकिलीसाचे ठेवी थांबवुनी यत्न घोर तीच बरें ॥ १२६ ॥
जर तो उद्यां सकाळीं येइल धांवुन सशस्त्र या ठाया।
आणी आह्मीं दिसलों तर कृति त्याची कळेल त्या समया ॥१२७॥

* ग्रीक व त्रोजन यांचें युद्ध रात्र पडली कीं थांबत असे. तसें राम व रावण यांचें युद्ध थांबत नसे असें खालील श्लोकावरून दिसतें ॥

नैव रात्रिं न दिवसं न मुहूर्तं नच क्षणम्।
रामरावणयोर्युद्धं विराममुपगच्छति ॥ रामायण.

जो नर हातुन सुटला तो नर गांठिल मुर्दें इलियमास ।
त्रोजन परंतु पुष्कळ होतिल गृध्रांस अन्न खायास ॥ १२८ ॥
असलें वृत्त नको तें अमुच्या कानावरी कधीं याया ।
रक्षिल अह्मां सभागृह, लपतां जाऊन रात्रिच्या समया ॥ १२९ ॥
बळकट बुरूज तेवीं रक्षण करतील गोपुरें दिवसा ।
द्वारांच्या लांब फळ्या लावुन घेऊन गच्च आंत बसा ॥ १३० ॥
बुरुजांवरी उद्यां परि, झाली नाहीं प्रभात तों सर्व ।
सन्नद्धकाय जमुनी बघुं तो येईल करुन जर गर्व ॥ १३१ ॥
तेव्हां तटासभोंवतिं अमुच्याशीं युद्ध त्या पडेल जड ।
नौदेशातें जाइल गर्वित हय नाचवुन जरी सवड ॥ १३२ ॥
आंत शिरायातें परि नाहीं घेणार कधिं तदीय मन ।
ध्वंसिल कोठुन तें मग खातिल उलटे तयास ते श्वान" ॥ १३३ ॥
क्रोधें उत्तर देई हेक्तर तो सावमान मग यास ।
मजला रुचेल ऐसें वदसि न तूं मुळिंच पालिदामास ॥ १३४ ॥
व्याया कोंडुन नगरीं, जायातें परत बोध तूं करशी ! ।
बुरुजांत कोंडमारा काय पुरेसा न जाहला म्हणसी ! ॥ १३५ ॥
पित्तल, सोनें आहे प्रायमनगरींत फार भरलेलें ।
स्फुटिताक्षर मनुजानें ऐसें वर्णन तिचें सदा केलें ॥ १३६ ॥
अमुच्या घरांतलें धन सारें तें नष्ट जाहलें आतां ।
मीओनिआ अणी ही फ्रिजिआ भरली असेल तें विकतां ! ॥ १३७ ॥
आला प्रसंग तैसा कोप नडे सर्वशक्ति जोव्हाचा ।

सॅतर्नजें अतां परि मज दिधला भाग अज गुरु यशाचा ॥१३८॥
ग्रीकां सागरतीरीं कोंडाया समय जवळ अज अणिला।
तेव्हां मूर्खा! कैसा ऐसा उपदेश तूं अम्हां कथिला! ॥ १३९ ॥
त्रोजन कोणि न मानिल, मीही तैसें करूं न देईन! ।
परि या सारेजण अज वागा जैसे तुम्हां अज कथीन ॥ १४० ॥
जाउन कंपूंत अतां घ्याहो उरकून नीट भोजन तें।
ठेवा नीट पहारा दक्षपणें घ्या करून रक्षण तें ॥ १४१ ॥
जिनगीवर कोणाचा राहे जर जीव आज अडकून।
सारी गोळा करुनी टाकुन द्या ती जनांस वांटून ॥ १४२ ॥
उपभोग एक घेवो त्रोजन तीचा, परी न हे ग्रीक।
होऊं सन्नद्ध उद्यां नौदेशीं कलह मातवूं अणिक ॥ १४३ ॥
समरोद्यत तेथ जरी आला तेव्हां असेल अकिलीस।
जाइल कठिण तयाला समरेच्छा सांगतों अखेरीस ॥ १४४ ॥
नांव नको पळण्याचें देइन त्या तोंड नेट मी धरुन।
कीर्ति मला लाभो अथ नेवो ती कीं खुशाल तो हरुन ॥ १४५ ॥
मार्स सखा दोघांचा तो करितो घात घातकाचा ही" !।
ऐसें हेक्तर बोले स्तविति त्रोजन तयास टाळ्यांहीं ॥ १४६ ॥
मूर्ख बिचारे! यांची अक्कल हरिली खरी मिनर्वेनें!।
हेक्तरबोध विनाशक संमति त्या देति हे प्रशंसेनें ॥ १४७ ॥
सांगे बोध हिताचा, नावडता ह्मणुन पालिदामास!।
भोजन उरकुन घेती त्रोजन ते स्वस्थ रात्रिसमयास ॥ १४८ ॥

रात्रभरी ग्रीक परी करिती ते शोक पत्रोक्लशाचा ।
त्यांतुन अकिलीस करी शोक, नसे ज्यास अल्प शम साचा ॥ १४९॥
ध्वंसककर मित्राच्या ठेवुन उरिं मधुन सोडि निश्वास ।
जणुं सिंह कूर्चधर तो दीर्घ करी शावकार्थ शोकास ॥ १५० ॥
चोरीत पारधी ज्या मृगहिंसक निबिड त्या वनांतून ।
सिंह बहू दुःख करी बघतां येऊन विपिनिं मागून ॥ १५१ ॥
बहुत दऱ्यांतुनि जातो, शोधुनियां पायलाग काढीत ।
बघतो दिसेल जर तो, आलासे क्रोध तीव्र या अमित ॥ १५२ ॥
टाकुन तसा उसासा मिर्मिदनां बोलतो तदा वीर ।
" हा धिक् व्यर्थ दिलें म्यां वचन तया दिवशिं द्यावया धीर ! ॥ १५३॥
वीरा मीनीशिअसा सांगितलें मीं दिवाणखान्यांत ।
त्राया ध्वंसुनि विजया तव सुत आणीन ओपसा परत ॥ १५४ ॥
देईन त्यास वांटुन योग्य तसें बहुत युद्धलुब्ध धन ।
पुरवी मनोरथांतें सकलांतें जोव्ह मानवाच्या न ॥ १५५ ॥
दोघे निज रुधिरानें, सिंचू ही त्रायभूमि विधिमत हें ।
मम तात पेलिअस अणि जननी थेटिस न फिरुन मज पाहे ॥१५६॥
धरणी करील धारण येथें समरांत मम अतां देह ।
तूझ्या मागुन शिरतों पत्रोक्लश ! भूत या न संदेह ॥ १५७ ॥
परि आधिं हेक्तराचीं शस्त्रें अणि मुंडकें इथें अणिन ।
अन्त्यक्रिया तुझी मीं त्यांविण रे सांग अज कशी करिन ? ॥१५८॥
त्यानेंच तुला वधिलें, याचा घेणें असे मला सूड ।

त्रोजनसुत बारा मीं शूर असे बघुन बांधतो घूड ! ॥ ९९ ॥
तूझ्या चितेपुढें या सकलां प्रेमें करीन अर्पण रे ।
तों येथें पडुन रहा. त्रायांतिल हा बघें युवतिगण रे ॥ १६० ॥
दार्देनिअनप्रमदा रात्रभरी गाळतील अश्रुजला ।
यांतें आम्हीं हरिलें विक्रमयोगें, कशी न स्मृति तुजला ॥ १६१ ॥
स्फुटिताक्षरा गिरा ज्यां त्यांचें पुर नाशिलें मनुष्यांचें ।
हें वृत्तभूषणावह आठव, आहे बरेंच तेव्हांचें " ॥ १६२ ॥
ऐसें वदुनी तेणें, स्थालीखालीं करावया जाळ ।
सांगितलें मित्रांतें घालविल्यावीण अल्पही काळ ॥ १६३ ॥
पत्रोक्लशतनुवरचे रुधिराचे डाग धुवुन काढाया ।
मोठें पात्र तयानीं अग्निवरी ठेविलें तया समया ॥ १६४ ॥
ओतून आंत पाणी सारिति खालीं बरेंच जळवण तें ।
भाण्डोदरास कवळी विस्तव, उसळे तयांत जल कढतें ॥ १६५ ॥
मंजुलनाद निघे, तों त्यांनीं या स्वच्छ काढिलें धुवुन ।
अभिषिक्त करिति तत्तनु परिमल तैलें बरींच आणून ॥ १६६ ॥
नउ वर्षांचें आणुन मलम जुनें तत्क्षतांत ते भरती ।
त्या मग ठेविति खालीं शय्येवर जपुन अस्तरावरतीं ॥ १६७॥
शीर्षादि अवयवांतें क्षौमें गुंडाळती सशोक जन ।
घालिति वरून दुसरें आच्छादन दीर्घ, शुचि, न जें मलिन ॥१६८॥
आकिलीसाजवळ बसुन करिती मग शोक पत्रोक्लशाचा ।
भगिनीला भार्येला जूनोला जोव्ह वदत ही वाचा ॥ १६९ ॥

" शेवटिं विशालनयने ! जूनो ! त्वां हेतु साधिला अपला ।
प्रोत्साहन अकिलीसा देउन बाहेर काढिलास भला ॥ १७० ॥
तूझ्यापासुन झाला ग्रीकांचा जन्म वाटतो खचित " ।
तेव्हां विशालनयना देवी जूनो वदे तया कुपित ॥ १७१ ॥
" सॅतर्नात्मज ! कैशी त्वां केली उक्ति आज दुस्ततम ।
कपट न ज्याला ठावें तोही साधील मनुज हें काम ॥ १७२ ॥
नश्वर नर हें साधी; मीं तर देवी अमर्त्य जागिं आहें ।
जन्में श्रेष्ठपणा मज याचा मी गर्व सारखा वाहें ॥ १७३ ॥
त्यांतुन तव भार्या मी, असती तूं भूप सर्व अमरांचा ।
नाहीं शकणार कशी घ्यायातें सूड त्या ट्रोजनांचा " ॥ १७४ ॥
ऐसें दोघें वदती. गेली रजताद्रि थेट थेटिस ती ।
व्हल्कनमंदिरिं आली होतें विख्यात जें सुरांत अती ॥ १७५ ॥
अमलिन पित्तलमय जें तारासंकुल विचित्र तें त्यानें ।
रचिलें अपणाकरतां स्वर्गीं मोठें स्वतांच खञ्जानें ॥ १७६ ॥
तेथें दिसला तो तिज करतांना काम नीट भात्याशीं ।
घर्मानें डवडवुनी होता घडवीत वीस पात्रांशीं ॥ १७७ ॥
भिंतीशीं निज मंदिरिं होतीं ठेवावयास त्यास हवीं ।
लावी प्रत्येकाच्या चक्रें करुनी बुडास सुबक नवीं ॥ १७८ ॥
स्वर्गीं सभेंत जावीं, तीं कीं चालोनियां अपोआप ।
आणि घरा परतावीं अद्‌भुत हीं नयनरुचिर दुष्प्राप ॥ १७९ ॥
झालीं सारीं पुरतीं; बसवायाच्या मुठी अतां उरल्या ।

त्यांसाठीं घडवि खिळी ज्यांच्या नाहीं प्रमाण जगीं मूल्या ॥१८०॥
कारागिरींत ऐसा गेला होता गढून तो कुशल ।
रजतांघ्रि तेथ गेली थेटिस तों मार्ग चालुनी विपुल ॥ १८१ ॥
सितवस्त्रावृत केरिस सुन्दर भार्या बघे तदा तिजला ।
करुन करालंबन जी बोले " कां भेटिचा सुयोग अला ? ॥१८२॥
आयतरशने ! नव्हता पाठ तुझा फिरुन फिरुन येण्याचा ।
अशि ये, स्वीकार करीं अन्नाचा अल्प आतिथेयाचा " ॥ १८३ ॥
ती दिव्य देवता हें वच करुनी जाउं लागली पुढतीं ।
सुन्दर विचित्र ऐसें थेटिसला देत थोर आसन ती ॥ १८४ ॥
पद ठेवाया तिवई ठेवी आणून सुन्दर लहान ।
बोलावी स्वपतिस मग होतें ज्या बहुत शिल्पविज्ञान ॥ १८५ ॥
" व्हल्कन ये इकडे अधिं ! थेटिसचें आज कार्य तुजजवळ " ।
व्हल्कन विश्रुत बोले "देवी ही पूज्य मानिती सकळ ॥ १८६ ॥
सन्मान्येनें मजला संकट समयीं खरेंच वांचिवलें ।
निष्त्रप जननीनें मम नाश करायास कपट योजियलें ॥ १८७ ॥
मी खञ्ज ह्मणुन होती छपवायातें मला तदा बघत ।
दुःख यदा भोगाया पडलें असतें बरेंचं चित्तांत ॥ १८८ ॥
युरिनोमी आणि थेटिस दोघींनीं घेतलें मला पदरीं ।
जलधीची दुहिता ती युरिनोमी ख्यात होय सर्वभरी ॥ १८९ ॥
नउ वर्षें त्यांच्यांशीं शिकलों मीं काम कितिक पितळेचें ।
गंडक, कंकण, दुसरे जिन्नस खिळिचे तसे कुशलतेचे ॥ १९० ॥

असतां गुहेंत भोंवतिं जलधीचा ओघ फेनमय वाजे ।
अमरां ठाउक नव्हतें वृत्त असें मम नरांस अथवा जें ॥ १९१ ॥
थेटिस अणि युरिनोमी दोघिंस या मात्र ठाउकें सारें ।
त्यांनीं मज राक्षियलें; भेटे त्यांतील एक काय खरें ? ॥ १९२ ॥
मद्‌गृहिं थेटिस आली जीनें मज संकटांत वांचिवलें ।
तीचे उपकार अतां फेडुन अज पाहिजेत टाकियले ॥ १९३ ॥
ठेवीं तिच्या पुढें अधिं थोडा आहार आतिथेयाचा ।
बाजूला तों ठेविन भात्या आणि भार सर्व यंत्रांचा" ॥ १९४ ॥
ऐसें वदुनी उठला ऐराणिपासुन विचित्र तो गोळा ।
खालीं पद लंगडती वरचा जों फिरत भाग वाटोळा ॥ १९५ ॥
यंत्रें भात्या ठेवी अग्नीपासून दूर तीं फार ।
पेटिंत रजताच्या तो यंत्रांचा शोभतो बरा भार ॥ १९६ ॥
काढी पुसून अपुलें मुख, कर, ती मान, तो भिसाळ उर ।
अंगांत चोल चढवी, हस्तीं अणि राजदण्ड धरि चतुर ॥ १९७ ॥
द्वारांतुन बाहेरी आला तों ज्या सुवर्णमय दासी ।
दिसती सजीव जणुं त्या वेष्टिति येऊन थोर राजासीं ॥ १९८ ॥
होतें ज्ञान तयांला, होतें त्यां चांगलें शहाणपण ।
बल होतें त्यांलागीं, वाचेचें ही तयांस आभरण ॥ १९९ ॥
कैसें काम करावें शिक्षण हें त्यांस होय अमरांचें ।
ऐशा दासी गेल्या गुंतुन करण्यास काम भर्त्याचें ॥ २०० ॥
सिंहासनिं थेटिस ती होति तिथें भूप जात लंगडत ।

करुनी करावलंबन तिजलागीं विनययुक्त तो वदत ॥ २०१ ॥
" आयतरशने ! थेटिस ! आलिस कां देवि ! आमुच्या भवना ? ।
फिरफिरुनी येण्याची आवड नव्हती तुझ्या खरीच मना ! ॥२०२॥
विदित मनोरथ करिं तव मन्मन सांगे तयांस पुरवाया ।
सामर्थ्य मजसिं असतां ईप्सित जाइल कधीं न तव वायां " ॥२०३॥
नंतर थेटिस नयनीं आणोनी आसवें तया वदत ।
" व्हल्कन ! जोव्हें दिधलें दुःख महा तें मला न सोसवत ॥२०४॥
तितुकें न देवतांनीं आलिम्पसिं सोशिलें असेल कदा ।
जलधिज नारी भारी त्यांतिल मी एक शोचनीय सदा ॥ २०५ ॥
ईआकसजाच्या मज पेलिअसाच्या अधीन एकलिला ।
करितां, इच्छा नसुनी, मर्त्याशीं केलि मंचकीं लीला ॥ २०६ ॥
क्लेशद वार्धक्यानें पीडित तो पिचत मांदिरीं पडला ।
याहुन मजवर अणखी दुःखाचा कठिण हा प्रसंग अला ॥ २०७ ॥
झाला पुत्र मला तो निपजे विख्यात सर्ववीरांत ।
वाढविलें मी त्याला वृक्षाला सुफल जेविं शेतांत ॥ २०८ ॥
त्रायस्थांशीं लढण्या नौकेंतुन धाडिलें इलियमास ।
तो न मिळेल फिरुन मज येउनियां पेलिअसमंदिरास ॥ २०९ ॥
सूर्यप्रकाश पाहुन राहिल जीवन्त तों असा व्यथित ।
त्याच्याकडेस गेलें तरि नाहीं साधणार कांहिं हित ॥ २१० ॥
प्रेमानें अर्पियली ग्रीकसुतांनीं तयास जी प्रमदा ।
अगमेम्ननें हरोनी नेली ती परत सौम्य अणि सुखदा ॥ २११ ॥

तिजसाठीं दुःखानें त्याचा झुरणीस लागला जीव ।
ग्रीकां त्रोजन कोंडिति त्याची आली तया न कधिं कींव ॥ २१२ ॥
द्वाराच्या बाहेरी ग्रीकां पद अरि न देइ टाकून ।
ग्रीकांतिल वृद्धांनीं पाहियलें त्या बरेंच विनवून ॥ २१३ ॥
देऊं केले त्यांनीं उत्तम उत्तम बरेच नजराणे ।
त्याच्या मनीं न आलें टाळाया नाश तो रणा जाणें ॥ २१४ ॥
पत्रोक्लशास तेणें दिधलें घालावयास निज कवच ।
संगति सैनिकजन ते देवुन धाडी रणांत करुन वच ॥ २१५ ॥
दिवसभरी लढले ते स्कीअननिर्गत्त पथांत शौर्यानें ।
त्राय खरोखर त्यांनीं अणिलें असतें करांत नेमानें ॥ २१६ ॥
परि तेथ अपालोनें मीनीशिअसात्मजास त्या वधिलें! ।
अग्रेसरास मारुन तेणें मग हेक्तरास यश दिधलें ॥ २१७ ॥
विध्वंस असा केला. जानूंशीं तव ह्मणून मीं आलें ।
अल्पायुषी सुता मम कर तूं साहाय्य जर तुला झालें ॥ २१८ ॥
सुन्दर कवच शिरींचें जंघांचें कवच ज्या बरे फांसे ।
त्राण उराच्या करतां अणखी दे त्या करून तूं खासें ॥ २१९ ॥
जें जें त्याचें होतें तें तें त्रायस्थ करित हस्तगत ।
तन्मित्र विहत झाला. लोळे अकिलीस भूवरी सतत!" ॥ २२० ॥
व्हल्कन उत्तर देई " धीर धरीं स्वस्थ तव करीं हृदय ।
इच्छितसें कीं यावें त्याचें चुकवावया मरण अदय ॥ २२१ ॥
त्याच्या दुर्दैवाचे यावे मज घाव वारण्या साचे ।

निःसंशय मज साधे तैसें ओतींव काम कवचाचें ॥ २२२ ॥
त्याच्या करतां सुन्दर मी देतों एक आज घडवून ।
जो जो बघेल मानव तो तो आश्चर्य करिल फिरफिरुन" ॥ २२३ ॥
ऐसें ह्मणुनी तिजला तेथें सोडून जात भात्यांशीं ।
ठेवून विस्तवाशीं आज्ञा करि त्यांस काम करण्याशीं ॥ २२४ ॥
झाले क्षणिं सुरु भाते नव्हता वीसांत एकही कमती ।
भट्टी प्रदीप्त झाली वाऱ्याची इष्ट होतसे भरती ॥ २२५ ॥
जेव्हां जशी व जितकी होती त्या पाहिजे विभिन्न जिथें ।
तेव्हां तशी व तितकी वाऱ्याची झोत सुटत इष्ट तिथें ॥ २२६ ॥
केव्हां काम करी तो केव्हां तें थांबवूनियां बसत ।
जैसें मानवलें त्या तैसें तो काम करित हस्तगत ॥ २२७ ॥
पित्तल, वंग, रजत मग घाली भट्टींत तेंवि कांचन तें ।
ठोकुन ऐरण बसवी काष्ठाच्या ठोकळ्यावरी स्वमतें ॥ २२८ ॥
एके हातिं अयोघन घेउन चिमटे धरी दुजा हातें ।
घडवी दीर्घ सघन जड पहिल्यानें ढाल हस्तिं धरण्यातें ॥ २२९ ॥
भूषित तदंग करुनी वाटोळी रेघ वर्तुलाकार ।
रेखीतसे तिहेरी चमके कांचनमयी वरी फार ॥ २३० ॥
तेथून शेवटाला पट्टा जोडी निरुंद रजताचा ।
ढालीचा भाग असा घडवी तो जाड पांच पदरांचा ॥ २३१ ॥
चातुर्यें कोरियलीं त्यानें चित्रें वरी बहू छान ।
पृथ्वी, स्वर्ग, जलधि, रवि भास्वर, तो पूर्ण चंद्र अम्लान ॥ २३२ ॥

नक्षत्रें रेखी जीं शोभविती भाग थोर गगनाचा ।
तो पुञ्ज कृत्तिकांचा, रोहिणिंचा आणि उज्ज्वल मृगाचा ॥२३३॥
सप्तर्षींचा तैसा अथवा ह्मणतात ज्यांस वेनांचा ।
वळुनी बघती त्या जो पाठ धरी पुंज उज्ज्वल मृगांचा ॥ २३४ ॥
परि यांत एकल्याही ठावा सागरजलावगाह नसे ।
स्फुटिताक्षर मनुजांचीं नगरें तो दोन वरतिं रेखितसे ॥ २३५ ॥
एकांत उत्सवानें लग्नसमारंभ सारखा चाले ।
निघत नवोढा कन्या, वरगृहिं जाया, वरात हळु चाले ॥ २३६ ॥
ती मिरवे नगरांतुन दीप्ति पडे थोरल्या मशालींची ।
मंगल गाणीं ह्मणती वैवाहिक गोड गोड चालींची ॥ २३७ ॥
नर्तक जन तरुण तदा धरिती मार्गीत घेर गमतीचा ।
ध्वनि मंजुल त्यांत मिळे सनईचा वा दुजा तुतारीचा ॥ २३८ ॥
*द्वारीं उभ्या पुरंध्री पाहुन आनंद पावती हृदयीं ।

---

* या वरातीचें वर्णन वाचून रघूच्या ७ व्या सर्गातील अजाचे वरातीच्या वर्णनाची आठवण वाचकांस होईल. तें वर्णन विस्तृत आहे. येथें पुरंध्रींच्या मनाच्या स्थितीचें वर्णन करण्याकडे होमरनें एक ओळ खर्च केली आहे. परंतु कालीदासानें तेथें ११ श्लोक खर्च केले आहेत. त्यांतील एक मासल्याकरितां दिला आहे. पुरसुंदरी अजदर्शनपिपासेनें आकुल होत्सात्या नयनमुखानें तद्दर्शनपान करूं लागल्या तेव्हां इतर विषयांकडे त्यांचें मन वळलेंच नाहीं. तसेंच कर्णादि इतर इंद्रियें स्वतंत्रपणें आपले व्यापार करण्यास असमर्थ झाल्यामुळें सर्वात्मभावानें कुतूहलेंकरून जणुं काय चक्षुःप्रवेश करितीं झालीं.

ता राघवं दृष्टिभिरापिबन्त्यो नार्यो न जग्मुर्विषयान्तराणि ।
तथाहि शेषेन्द्रियवृत्तिरासां सर्वात्मना चक्षुरिव प्रविष्टा ॥

इकडे जन दुसरिकडे करिती संभ्रम सभेंत या समयीं ॥ २३९ ॥
वाद उपस्थित झाला विषय असे देय दण्ड विहताचा ।
*एक उपन्यास करी, दिधला मी सर्वभाग दण्डाचा ॥२४० ॥
अन्य निषेध करोनी सांगे मजला न लाभला कांहीं ।
दोघे ह्मणाति करावा वादाचा अंत येथ संभ्यांहीं ॥ २४१ ॥
दोघां लोक स्तविती, त्या अथ या बाजुचे जसे बसले ।
मागें मागें फिरुनी लोकांतें दूत सारतां दमले ॥ २४२ ॥
बसले पवित्र मण्डलिं मृष्टशिलेवरतिं तेथ जन वृद्ध ।
करिं राजदण्ड घेउनि सज्ज उभे ते वकील सम्मृद्ध ॥ २४३ ॥
राहुन उभे असे ते करिति समर्थन तदा स्वपक्षाचें ।
तॅलेन्त दोन होते तेथें मध्यावरी सुवर्णाचे ॥ २४४ ॥
निज अर्थ सिद्ध करिल जो, त्यातें देण्यांत सर्व येणार ।

---

* सैतानाच्या भुलथापांस फसून जाऊन, खाण्यास निषिद्ध म्हणून परमेश्वरानें बजावून ठेवलेल्या ज्ञानवृक्षाचें फळ **आदम** व **ईव्ह** यांनीं चाखल्यावर त्यांनां या आज्ञाभंगाच्या पातकाबद्दल नंदनवनांतून घालवून लावल्यावर देवदूत **आदमाला** पुढील काळाचें मायामय चित्रदर्शन करवीत आहे असा भाग **मिल्टननें** आपल्या ' **पॅराडाइस लॉस्ट** ' नामक काव्यामध्यें आणिला आहे. त्याचा विस्तार करतांना **होमर**कृत इलियडमधील जो हा सर्वोत्कृष्ट भाग,ज्यांत हें **अकिली**साच्या ढालीचें वर्णन आलें आहे, तो **मिल्टननें** आपल्यापुढें ठेविला असावा हें खास. अथवा ज्याअर्थी अनेकवेळां **होमर**मधील ओळीच्या ओळींतील अर्थ **मिल्टननें** उचलला आहे त्याअर्थी त्यानें **होमर**च्या काव्यांतील शब्दार्थांचा अपहार करून चोरी केली असें न म्हणतां **होमर**बद्दल त्यानें आपली पूज्यबुद्धि व्यक्त केली असें म्हटलें पाहिजे. **पॅराडाइस लॉस्ट**. पुस्तक ११ वें पद्य.

दुसरिकडे नगर असे जेथ दलें उभय चमकती फार ॥ २४५ ॥
सांगे अरि दोन अटी; ' लुटुनी पुर यथेच्छ करुं नाश ' ।
दुसरी कीं ' पुरिचें धन अर्ध विभागूं न करुन अवकाश ' ॥२४६॥
परि सर्व नागरिकजन झाले नव्हते अटींस या राजी ।
छाप्याचा बघती जर गुप्तपणें बेत साधला आजी ॥ २४७ ॥
प्रिय दारा तेविं मुलें शत्रुवरी सतत ठेविती नजर ।
त्यांत जराग्रस्त असे होते जन ज्यां न झेंपलें समर ॥ २४८ ॥
तरुण निघाले पुढतीं मार्स मिनर्वा रणास नेति तयां ।
नेसून हैमवसनें कवचें अंगात घालुनी समया ॥ २४९ ॥
फांके प्रभा सभोंवतिं देवांच्या सारखी प्रदीप्त अती ।
उंच न देवां इतुके साधारण उंच नागरिक दिसती ॥ २५० ॥
आले एका ठायीं छाप्याची सोय त्यां बरी दिसली ।
जेथ नदीतीरावर जलपानानें गुरें सदा रमलीं ॥ २५१ ॥
सशस्त्र तेथें दडले, ठेवुनियां दोन हेर ते पुढतीं ।
ठेविति जे पाळथ जर अरिचे वृष आणि अज अजा दिसती ॥२५२॥
लवकराचि कळप आले, संभाळति ज्यांस दोन अजपाळ ।
कपट न ज्यांतें कळलें वाजवुनि वेणु घालविति काळ ॥ २५३ ॥
यांतें ओळखुनी ते गेले धांवून सर्व यांवरतीं ।
हिमशुभ्र सर्व अज ते तेविं बलीवर्द कापण्या झटती ॥ २५४ ॥
अजपाल त्यांत पडले; ऐके अरि निज सभेंत गडबड ती ।
स्वार जवन हयांवर होउनियां पाठलाग मग करती ॥ २५५ ॥

आले लवकर तेथें; झाले हे सज्ज जन उभय दलिंचे ।
वीरांतें सांपडलें तीर नदीचें रणास सोईचें ॥ २५६ ॥
एकामेकांवरतीं वार भयंकर करीत शूलानें ।
कलह, क्षोभ, नियति हीं धिंगाणा घालितात कोपानें ॥ २५७ ॥
एका सजीव धरिती, झाला नुकताच ज्यास रणिं वार ।
दुसऱ्या तसाच ओढिति अक्षत जो दावि शौर्य अनिवार ॥ २५८ ॥
फरफटविति तिसऱ्यातें होउन मृत जो रणांत अज पडला ।
नियतीच्या वस्त्रावर रक्ताचा लाल रंग अति चढला ॥ २५९ ॥
तरिही जिकडे तिकडे लढती जीवन्त मानवांसम तीं ।
हत झाले रणिं त्यांची ओढुनियां हांकिती शवें परतीं ॥ २६० ॥
रेखि मउ क्षेत्र तसें; नागर ज्यावरतिं तीनदां फिरला ।
माती सुपीक ज्यांतिल शोभवि भूभाग वितत रुंद भला ॥ २६१ ॥
हांकिति जोडी वळवुन हलकर्षक फिरति इकडुनी तिकडे ।
परतुनि टोंका जातां तेथें माणूस त्यांस दृष्टि पडे ॥ २६२ ॥
मधुर मधूचा प्याला करिं त्यांचे देतसे पुढें सरुनी ।
तांडा उत्सुक फिरतो दुसऱ्या टोंकास जावया वळुनी ॥ २६३ ॥
मागें भूभाग दिसे नागरलेला अतीव तो काळा ।
हा भाग सर्व दिसतो मोठा सुंदर विचित्र आणि विरळा ॥ २६४ ॥
रेखी तसेंच तीवर, शेत जिथें धान्य बाधलें फार ।
जें तीव्र कोयत्यांनीं, कापिति जन, भूवरी पडे भार ॥ २६५ ॥
हलरेषा साधोनी जाती लागून सारख्या रांगा ।

पेंढ्या बांधित येती फिरती जन तीन मागल्या आंगा ॥ २६६ ॥
त्यांच्या मागुन पुरविति कांहिं मुलें बन्द घेउनी हातीं ।
करधृतदण्ड धनी तो राशीजवळुन बघे सहर्ष कृती ॥ २६७ ॥
ओकच्छायेखालीं तेथोनी दूर कांहिं चाकर ते ।
भोजन तयार करती कामकऱ्यांतें जसें तयां रुचतें ॥ २६८ ॥
बाळि मग महोक्ष देती मिसळति मांसांत बायका यव ते:।
भोजन सिद्ध जहालें मजुरांची वाट वाटतें बघतें ॥ २६९ ॥
रेखी अन्य ठिकाणीं द्राक्षांची वाटिका बहू रुचिर ।
फलभार सुवर्णाचा जीतें करि विनत सर्वदा सुचिर ॥ २७१ ॥
वेलींचे पुञ्ज परी होते दिसण्यांत बहुत काळसर ।
रजताच्या दण्डाचा होता आधार त्यांस सर्वभर ॥ २७० ॥
वाटोळा सर्वभरी खंदक होता बराच खणलेला ।
कुंपण होती बहु दृढ वंगमयी सारखी चंहुकडेला ॥ २७२ ॥
एकचि पथ तिस होता द्राक्षांच्या जेथ अवचया करिती ।
कोमलहृदय कुमारी तरुण तसे मुदित कितिक ते जमती ॥२७३॥
मिष्टफळांतें जमवुनि विणलेल्या टाकिती करंडींत ।
वाद्य करीं घेवुनियां मध्यें बटु बैसला बहू मुदित ॥ २७४ ॥
वीणानादें तो करि गायन मधुरस्वरांत सविलास ।
दुसरे अरडति नाचति तालावर करुनियां पदन्यास ॥ २७५ ॥
रेखी कळप वृषांचा ज्यांचीं शृंगें उभीं वरी सरळ ।
हेमाच्या वंगाच्या होत्या गाई परी तिथें सकळ ॥ २७६ ॥

हंबारुनी व्रजांतुन निघती बाहेर जावया कुरणा ।
जल्पे निर्झर जेथें हलवि जिथें पवन मंद वेत्रगणा ॥ २७७ ॥
हेमाचे गोंवारी चार आणि श्वान नउ तसे चपल ।
जाति बरोबर तो त्यां अडविति पथिं सिंह दोन अमितबल ॥२७८॥
गर्जून सिंह धांवति नेती ते म्होरक्यास ओढून ।
हंबरडे तो नेतां धांवति सायास तरुण मागून ॥ २७९ ॥
श्वानहि सोडवुं बघती; वृषभाचें चर्म सिंह सोडवती ।
पीती रुधिर तसें, तीं चघळुन चघळून आंतडीं खाती ॥ २८० ॥
दवडति अंगावरतीं व्यर्थ श्वानांस दुरुन गोपाल ।
सिंहास ते न चावति भुंकति जवळून चुकविती काळ ॥ २८१ ॥
रेखी व्हल्कन अणखी एक वनान्तीं सुरम्य गुरचार ।
शुभ्र अजाव्रज सुन्दर, उटजें जेथील दृष्टिला रुचिर ॥ २८२ ॥
व्हल्कन शोभवि तिजला कोरुनियां थाट वरतिं नाचाचा ।
विस्तृतनोससिं झाला मागें पूर्वी अशा प्रकाराचा ॥ २८३ ॥
दीदालसें रचियला रमवाया रुचिर, एरिआद्नीस ।
घेवुन करांत नाचति तरुण मनोहारिणी कुमारींस ॥ २८४ ॥
*वैवाहिक गोधन ज्यां देते रूपास कितिकजण भुलुन ।

---

* आदायार्षस्तु गोद्वयम् । याज्ञवल्क्य
एकं गोमिथुनं द्वे वा वरादादाय धर्मतः ॥
कन्याप्रदानं विधिवदार्षो धर्मः स उच्यते ॥ १ ॥ मनु.
वराकडून दोन गाई घेऊन त्यास कन्येचें दान करावें असें सांगणारीं हीं वर दोन स्मृतिवचनें दिलीं आहेत. या प्रकारचे लग्नविधीस आर्षविधि म्हणतात.

क्षौमावृत त्या विलसति, चमकति ते मसृण चोल घालून ॥२८५॥
त्या तरुणींच्या कण्ठीं शोभति मृदु हार थोर सुमनांचे ।
तलवार सुवर्णाची तरुणांच्या कमरबंदिं ती नाचे ॥ २८६ ॥
कौशल्यें मधुन मधुन घेती सारीं गरागरां फिरकी ।
बघतो चाक फिरवुनी जणुं तो कुंभार घडवितां मडकीं ॥ २८७ ॥
मधुनी परस्परांच्या नर्तक मग जाति आपल्या जागीं ।
गर्दी होत जनांची नर्तनचातुर्य पाहण्यालागीं ॥ २८८ ॥
अङ्गें स्वाधिन ज्यांचीं ऐसे मग पुरुष उठति इतक्यांत ।
दाविति कौशल्य जनां कसरत करतां प्रशस्य ते गात ॥ २८९ ॥
रेखि तशी ढालीच्या प्रान्तावर वितत ओशिअनस नदी ।
+वाहत पूर्णजवानें संथपणा जींत दिसत नच अगदीं ॥ २९० ॥
ऐशी करुनी झाली जाड अणी जड विशाल ही ढाल ।
घडवि उरस्त्राण जया अग्नीहुन तेज शोभवी लाल ॥ २९१ ॥
घडवी कवच शिरींचें कुंभप्रान्तावरी बसेल असें ।
नानालंकृतिनें तें शोभे, चूडा जयावरी विलसे ॥ २९२ ॥
घनवर्धनीय आणुन वंग तयें घडविले बरे फांसे ।

तो होमरच्या वेळेस प्रचारांत असावा असें दिसतें. यांत कन्याविक्रयाचें मूळ असल्यामुळें हल्लीं हा विधि आमचेकडे निषिद्ध मानलेला आहे.

+होमरनें या ढालीवर अतिशय साध्या शब्दांत फार रमणीय व भव्य असे चित्रपट काढिले आहेत. त्यावेळच्या लोकस्थितीचें दर्शक म्हणून यांस ऐतिहासिक महत्त्व आहे.

करुनी श्रम हे+ व्हल्कन घडवी विख्यात कवच रुचिर असें ॥२९३॥
अकिलीसाच्या मग ते जननीच्या ठेवि पुढतिं उचलून ।
आलिम्पसावरोनी श्येनासम जाय ती जवें निघुन ॥ २९४ ॥

\+ याची करामत मयासुरा सारखी होती हें सांगावयास नको.
देवांनींहि करावा ज्याच्या स्वेष्टार्थ नवस भात्यातें ।
अनृणत्वार्थ मयासुर निर्मुनि दे दिव्य नव सभा त्यातें ॥ १ ॥
स्थळ तें जळ, जळ तें स्थळ भासे; जीमाजि रत्नसारसभा ।
खाण्डव वन दहन करतांना याचे प्राण वांचविल्या बद्दल अर्जुनास मयानें देवदत्त शंख दिला होता.
दे देवदत्तशंख स्वत्रात्या अर्जुनास दास मय । मोरोपंत.

सर्ग १९ वा.

अकिलीस व अगमेम्नन यांचें पुनः सख्य.

सारांशः—**थेटिस** आपल्या पुत्रास कवच आणून देते. **प**त्रोक्लशाचें शव चांगल्या स्थितींत जशाचें तसेंच राखण्याचें **थेटिस** कबूल करते. **अकि-लीस** व **अगमेम्नन** यांचें पुनः सख्य होतें. **अकिलीस** युद्धास जावयास अधीर होतो. सेनेचें भोजन होई तों **युलिसीस** त्यास मोठ्या कष्टानें थांबवून घेतो. **अकिलीस** शोकनिमग्न होत्साता अन्नास स्पर्शही करीत नाहीं. **जोव्हाज्ञेनें मि**नर्वा त्याचे अंगीं सामर्थ्य आणण्याकरतां स्वर्गाहून खालीं उतरून येते. युद्धास सिद्ध झाल्यावर **प**त्रोक्लशाचे मृत्यूवरून आपल्या अश्वांची निर्भर्त्सना करतो. त्याबरोबर त्यांतून एकास दैविक चमत्कारानें मनुष्यवाणी फुटून तो **अ**किलीसाचें मरण जवळ आलें असें भविष्य वर्तवितो व न डगमगतां **अकि-**लीस युद्धास जातो.

कालमानः—तिसावा दिवस.

स्थलमानः—समुद्रतीर.

सागर जलांत झाली कुंकुमरशना उषा तदा प्रकट ।
द्याया प्रकाश इच्छी बहुविध त्या सुरनरांस सरसकट ॥ १ ॥
थेटिस आलि नौदेशा व्हल्कनकृत घेउनी उपायन तें ।
मित्रशवावर पडुनी तत्सुत करि शोक तो शिरें विनतें ॥ २ ॥
सहचर विविध तयांचे त्यांच्याभोंवतिं जमोनियां रडती ।
राहे उभी तयाच्या जवळी देवी अणी धरी कर ती ॥ ३ ॥

बोले " प्रियतनया! या राहूं दे, ठेव या असाच जरा।
ईशाज्ञेनें मृत हा होउन आह्मांस शोक दे जबरा ॥ ४ ॥
व्हल्कनकृत शस्त्रें घे मनुजस्कन्धा न लागलीं पाहीं "।
नंतर त्याच्यापुढतीं शस्त्रें ठेवुन उभी तिथें राही ॥ ५ ॥
त्यांची घडण विलक्षण, करती तीं शब्द भूवरी पडतां।
मिर्मिदनां कंप भरे त्यांतें पाहूं शके न एक अतां ॥ ६ ॥
त्यां परि बघतां तत्क्षणिं चढला अकिलीस फार कोपाला।
भयद पुटीं चमकति ते नयन जशी दीप्त अग्निची ज्वाला ॥ ७ ॥
घेतां उपायनें करिं पावे आनंद थोर चित्तांत।
निज मातेला बोले " अंबे! शस्त्रें अलीं मम हतांत ॥ ८ ॥
काम नव्हे मनुजांचें, घटना साधेल फक्त अमरांस।
होतों सन्नद्ध अतां वाटे परि भीति फार चित्तास ॥ ९ ॥
मीनीशिअससुताच्या अंगीं शूलक्षतें बहू असती।
त्यांमाजी शिरतिल गे, गेलों तर, माक्षिका क्षणांत अती ॥ १० ॥
पडतील आंत कृमि मग होइल बहु नाश तच्छरीराचा।
जीव नसे त्यामाजी येइल दुर्गन्धि, कुजुन तें, साचा " ॥ ११ ॥
थेटिस रजतांघ्रि वदे तनया ही काळजी नको तुजसीं।
मीं संघ मक्षिकांचा हांकिन जो खाइ नष्ट वीराशीं ॥ १२ ॥
राहिल शरीर याचें आज जशाचें तसेंच, वर्षानें।
याहुन दिसेल बरवें ऐसें जरि कथुं शकें न नेमानें ॥ १३ ॥
ग्रीकां सभेंत जमवीं सांडीं अगमेन्मनावरिल राग।

सन्नद्धकाय होईं दावाया शक्ति शत्रुला लाग ॥ १४ ॥
ऐसें वदुनी तीनें शौर्यें भरिलें तदीय मग हृदय ।
पत्रोक्लश नासापुटिं ओती द्रव एक अल्प अमृतमय ॥ १५ ॥
माणिक्य वर्ण घाली आंत सुधा; हेतु शव न बिघडावें ।
अकिलीस मनीं आणी सागरतीरावरोनियां जावें ॥ १६ ॥
तेथुन अरडत जातां ग्रीकांचे वीर जाहले जागे ।
सारे सभेंत जमले राहति नौदेशीं नित्य जे मागें ॥ १७ ॥
ते कर्णधार आले, रोंखिति जलमार्ग तेहि अज जमले
सर्व सभेला गेले नौकांतिल सूप तेहि नच उरले ॥ १८ ॥
कारण भीषण समरा सोडुन जो दूर अजवरी बसला ।
आकिलीस भूपवर तो वीरांचा श्रेष्ठ समरिं अज आला ॥ १९ ॥
युलिसीस तैदिअससुत दोघे हे मार्सदास तेथ अले ।
लंगडतात बिचारे त्यांचा तो भार सोशिती भाले ॥ २० ॥
देती व्यथा क्षतें त्यां, जाउन अग्रासनावरी बसले ।
आला क्षतांग शेवटिं अगमेम्नन भूपपद जया सजलें ॥ २१ ॥
त्या अन्तिनारतनयें केला ज्या वार तीव्र शूलानें ।
जमतां ग्रीक उठोनी बोले आकिलीस शब्द मोठ्यानें ॥ २२ ॥
" एका पोरीवरुनी केला बहु कलह जीव तोडोनी ।
हे एत्रिअसज ! दोघे गेलों दुःखार्तचित्त होवोनी ॥ २३ ॥
लिर्नेसस जित केलें त्या दिवशीं हें बरें जरी घडतें ।
दायानेनें तिज कीं एकशरें मारिलें तदा असतें ॥ २४ ॥

इतके ग्रीक कशाला धरिते विस्तृत धरा रणीं दातीं ।
बसलों असतां रुसुनी पडले हे सर्व शत्रुच्या हातीं ॥ २५ ॥
त्रायस्थ आणि हेक्तर यांचें बहु फावलें परी यानें ।
तूझा माझा कलह स्मरतिल हे ग्रीक बहुत दुःखानें ॥ २६ ॥
गत गोष्टी विसरूं या. पडले जे कष्ट त्यां कसें करणें ? ।
दुर्वार्य्यसमयिं बरवें चित्तक्षोभास आंवरुन धरणें. ॥ २७ ॥
मत्क्रोध नष्ट करतों बुद्धया रुसणें न उचित सतत मज ।
लवकर या एकियनां देउन भर नेउं समरिं अज सहज ॥ २८ ॥
त्रायस्थांवर चालुन जातों अणि पाहतों कसें काय ।
नौदेशीं इच्छिति का दवडाया रात्र पसरुनी पाय ॥ २९ ॥
मच्छूलाचा मारा चुकवुन जो जो पळेल दूर अज ।
तो तो गुढघे मोडुन ईशस्तव करिल हाच मम समज " ॥ ३० ॥
ऐसें तो वदला तों ग्रीकां आनन्द होत चित्तांत ।
पेलिअसात्मज कोपा सोडुनि कीं येत आज समरांत ॥ ३१ ॥
अगमेम्ननन्नृपतीनें भाषण केलें तयावरी उचित ।
मध्यें तो नच आला स्वस्थाना वरुन बोलला व्यथित ॥ ३२ ॥
ग्रीकांच्या वीरांनों! परिसा हो मद्वचास मित्रांनों! ।
बोलाया उठतां मीं व्यत्यय आणा न मार्सदासांनों! ॥ ३३ ॥
कोणी जर ऐकेना तर वक्ता काय करिल हो चतुर! ।
कलकल होतां येइ न ऐकाया, बोलण्यास वा मधुर ॥ ३४ ॥
स्पष्ट स्वर वक्त्याचा लोकांतें सारखा असुन नसुन ।

पेलिअसाच्या पुत्रा उद्देशुन बोलतों अतां दुरुन ॥ ३५ ॥
परि तुह्मीं ग्रीक दुजे ध्या हो समजुन मदर्थ सादर तो ।
ग्रीकांनीं किति वेळा मज हें सांगून पाहिलें ह्मणतों ॥ ३६ ॥
मज निंदिलें बहूनीं; परि माझा दोष सागतों नाहीं ।
जोव्हाचा, नियतीचा दोष असे यांत खचित तो कांहीं ॥ ३७ ॥
एरिन्निस अणखी तीं दोषी आहे बऱ्याच अंशानें ।
काळोखांत फिरे ती, भरिलें मन्मन तिनेंच खेदानें ॥ ३८ ॥
अकिलीसाचा ह्मणुनी वांटा नेला करून मी हरण ।
पण यांत काय केलें? घडवितसे सर्व देवता अपण ॥ ३९ ॥
एटी दुष्ट बरें ही! जोव्हाची क्लेशदायिनी कन्या ! ।
मानवशिरांवरुन जी चाले परि भूस नच शिवे धन्या ॥ ४० ॥
पडली कोमलचरणा ! मनुजांची दुःखदायिनी कुठली ! ।
*एकाची तिजपाशीं मोठ्याचीही गती जरा खुटली ॥ ४१ ॥
ह्मणतात जोव्ह आहे साऱ्याही सुरनरांत बलवान ।
त्याहि हिनें त्रास दिला ! जूनोचें कपट ठाउकें त्या न ॥ ४२ ॥
जाति स्त्रीची पडली ! मागें ही गोष्ट एकदां झाली ।
हर्क्यूलीसाची ती जननी थीबांत राहण्या आली ॥ ४३ ॥
नामें ती आल्क्मीनी त्याच्या खेपेस कीं गरोदर जी ।
गर्वोक्ति जोव्ह करि ही. 'मन कांहीं मजासिं बोलवित आजी ॥ ४४ ॥
देवांनों ! देवींनों! द्याहो तुह्मि चित्त सर्व ऐकाया ।

* अकिलीसाला उद्देशून हा नाजुक टोमणा आहे.

प्रसवाधिष्ठात्री जी आहे लोकांत विदित ऐलिथिया ॥ ४५ ॥
ती जन्मा अज आणिल मानव, तो सार्वभौम गाजेल ।
अमुच्या कुलांतला तो असतांना अन्यथा न निपजेल' ॥ ४६ ॥
कपट मनीं आणोनी जूनो त्यातें तदा असें वदली ।
' खोटें ठरेल वच तव ! मजासिं हवी सत्यता अतां पटली ॥४७॥
आलिम्पसवासिन् ! हे ! विधिपूर्वक शपथ नीट तूं घेई ।
सम्राट् होइल तो ज्या मर्त्य स्त्री जन्म अज पदीं देई ॥ ४८ ॥
उत्पत्ति मात्र त्याची अमरांपासून पाहिजे झाली ' ।
जोव्हास कपट तीचें कळलें नच ती यदा असें वदली ॥ ४९ ॥
घेउन शपथ यथास्थित, मागुन मूर्खापरीस त्या झालें ! ।
जूनोनें उठुनी मग आलिम्पसशिखर सोडुनी दिधलें ॥ ५० ॥
पर्स्यूससुताची भार्या स्थेनिलसाची धरून गर्भास ।
होती अर्गासीं ती येतां हातास सातवा मास ॥ ५१ ॥
तेथें जूनो जाउन घडवुन आणीतसे सुखप्रसव ।
झाले नव्हते तेव्हां मास मुळीं गर्भिणीस इष्ट नव ॥ ५२ ॥
टाकी लांबणिवरतीं आल्कमीनीच्या प्रसूतिचा समय ।
ऐलिथियेला अडवी; जाई जोव्हाकडेस मग अभय ॥ ५३ ॥
बोले ' विद्युत्कारक जोव्ह तुला गोष्ट एक कळवितसें ।
पर्स्यूससुतें आजी घेतियला जन्म त्या युरिस्थिअसें ॥ ५४ ॥
ग्रीकांवरतीं तेणें राज्य करावें असें असे उचित ' ।
ऐसें ती वदली परि याच्या मनिं दुःख जाहलें उदित ॥ ५५ ॥

केली शपथ तियेची अठवण होतां बराच तो चिढला ।
कलहप्रिय एटीचा रुचिर शिरोभाग मग तयें धरिला ॥ ९६ ॥
शाप वदे जोरानें 'ज्याअर्थीं दुःख देत सकलां ही ।
त्याअर्थीं स्वर्गींचें आलिम्पासिं हिज मिळो न सुख कांहीं ' ॥ ९७ ॥
ऐसें वदुनी तेणें गरगर फिरवून लोटिलें तिजला ।
ताराकुल गगनांतुन गांठी ती अवनिच्या अपारतला ॥ ९८ ॥
तेव्हांपासुन लावी मनुजांचे आपसांत ती कलह ।
जोव्हाच्या चित्तातें राहे लागून सारखा दाह ॥ ९९ ॥
इर्क्यूलीसाकरवीं करवितसे कष्ट तो युरिस्थिअस ।
एटी कारण झाली. जोव्ह झुरे शोच्य बघुन हे दिवस ॥ ६० ॥
जोव्ह असा फसला हा ! मी ही फसलों तसाच कीं ह्मणतों ।
नौदेशीं ग्रीकांचा हेक्तर करि नाश तो पुढें बघतों ॥ ६१ ॥
मूर्खपणा जो केला शकलों नच दोष तो सुधाराया ।
शिक्षा मज बहु झाली ! जोव्हें मद्बुद्धि हरिलि त्या समया ॥ ६२ ॥
तूझी समजी करतों देउन तुजला बरेच नजराणे ।
ईर्ष्या इतरां अणुनी इष्ट असे आज आहवीं लढणें ॥ ६३ ॥
तंबूंत तुझ्या जाउन युलिसीसें देउं जें तुला केलें ।
तें मीं पाहिन कीं मद्भृत्यांनीं तुजकडे अजी नेलें ॥ ६४ ॥
घाई सुटली तुजला जाया समरांत आज धांवून ।
नर थांबशिल जरा तर अणतिल मद्भृत्य सर्व जाऊन ॥ ६५ ॥
ह्मणजे बघशिल तूं कीं देउन तें मी करीन तव समजी " ।

अकिलीस देतसे मग उत्तर नृप लागलेंच त्यास अजी ॥ ६६ ॥
" हे एत्रिअसज ! नृपते ! अगमेम्नन ! कीर्तिकर ! पुढें बघुं तें ।
देशिल उपायनें वा घेशिल ठेवुनि जसें मला जुळतें ॥ ६७ ॥
परि आतां सर्वांनीं आणूंया मानसांत संग्राम ।
बोलुन काळ दवडणें व्यर्थ असे, तें न साधितें काम ॥ ६८ ॥
* अज गुरुकार्य कराया जातो अकिलीस रणशिरोभागीं ।
त्रायस्थांच्या रांगा शूलानें तीव्र फोडण्यालागीं ॥ ६९ ॥
ऐसें मनांत आणुनि द्यावी मज साथ नीट समरांत " ।
युलिसीस त्यास देई उत्तर मग कुशल जो उपायांत ॥ ७० ॥
"असशी तूं शूर खरा सुरसम अकिलीस, तरि असे आज ।
उपवासी ग्रीकांतें नेउं नको इलियमाकडे सहज ॥ ७१ ॥

---

* इतके दिवस रुसून बसल्यामुळें रोज वीरसभा भरत त्यांत अकिलीस अंग ठेवीत नसे; सिंहनाद श्रवण करून बाहुस्फुरण करीत असले तरीही कोणाचे नजरेस न पडतां तो आपल्या नौकांत स्वस्थ बसून सारखा रागानें जळत होता व अङ्गीं सामर्थ्य असूनही नौकांस आग घालावयास निघालेल्या हेक्तरादि वीरांचा प्रतिकार करीत नव्हता; पण आतां त्याची समजी झाली. रणांत न जाण्याचें कारणच उरलें नाहीं; ह्मणून अकिलीस ग्रीकांस आपण होउन सांगत आहे कीं हा पहा मी रणांत जात आहें ! या प्रसंगीं पंतांच्या एका आर्येची आठवण होते. १२ वर्षें वनवास व एक वर्ष अज्ञातवास काढल्यावर प्रथम रणप्रसंगीं—व तोही कौरवांशीं आलेला—अर्जुनाचे मनाची स्थिति काय झाली असेल ती पंतांनींच वर्णन करावी. पंत ह्मणतात.

उठल्या उत्साहाच्या त्या श्रान्त श्रीमदुदधिवर लहरी । धेनुहरण विराटपर्व.

त्रायस्थांशीं आहे लढणें तें बहुत समय चालेल ।
ईश्वर सहाय दोघां होइल, संभ्रम बराच मातेल ७२ ॥
ग्रीकां कथिं सेवाया नौदेशीं अन्न मद्य उत्तम रे ।
अन्नमय प्राण तसा ह्मणताती प्राणमय पराक्रम रे ॥ ७३ ॥
सूर्यास्तापावेतों लढणें नच शक्य करुन उपवास ।
मनिं आलें तरि नच ये वीराच्या समरिं बल अवयवांस ॥ ७४ ॥
होती विगलित गात्रें, त्यां करि वश ती क्षुधा पिपासाही ।
जानू फसविति फिरतां; भुक्तान्ना ठाउकें न हें कांहीं ॥ ७५ ॥
विगतश्रम तो होतो मद्याच्या मधुर आणि मित पानें ।
दिवसभरी रणिं लढतो अरिशीं तो सहज अतुल शौर्यानें । ॥ ७६ ॥
तद्हृदयीं धीर वसे, शत्रु पळे दमुन तों, न तो दमतो ।
ह्मणुनी कथितों अजि ये स्वस्थाना दवड वीरगण अधिं तो ॥ ७७ ॥
उरकुन घेण्या भोजन सकलांतें त्वां ह्मणून सांगावें ।
अगमेम्ननें नृपानें नजराणे तों सभेंत आणावे ॥ ७८ ॥
होतील मुदित सारे ग्रीक तयांतें बघोनियां नयनीं ।
तूंही तैसा होशिल पाहुन तें सांग कां न हृष्ट मनीं ॥ ७९ ॥
ग्रीकांच्या मध्यें त्या येउनियां घेउंदे नृपा शपथ ।
'नाहीं आक्रमिला मी तीचा चुकुनहि कदापि शयनपथ ॥ ८० ॥
तिजशिं न युक्त जहालों पत्नीशीं रीत असुनही पतिची' ।
तूझ्या आत्म्याला मग शान्ति मिळो पूर्ण आज हृदयींची ॥ ८१ ॥
तंबूंत मेजवानी देउन करुंदे तया तुझी समजी ।

पूर्णपणें होइल तव नीट समाधान ज्या उणें न अजी ॥ ८२ ॥
अजपासुन अन्याशीं न्यायानें एत्रिअसज वागत जा ।
करुनी अपराधातें करितां समजी नं चुकतसे राजा ” ॥ ८३ ॥
अगमेम्नन नृवर तया बोले “ मज मोद जाहला बहुत ।
लाअर्टीसज ! हे ! तव ऐकियली उक्ति सर्वथा उचित ॥ ८४ ॥
नजराण्यांची तूं अज पद्धतिनें घेतलीस नांवानिशी ।
वाहुन शपथ कथिन हें, ठेवुनियां ईश्वरास साक्षीशीं ॥ ८५ ॥
मन माझें तेंच कथी मिथ्या करणार नाहिं मी वचन ।
अकिलीसा थांबव तूं ना तर तैसाच करिल रणगमन ॥ ८६ ॥
लागेल वेळ बहुत न, तुह्मीं सारे इथें असेच रहा ।
नजराणे तंबूंतुन अणतिल ते स्वस्थचित्त सर्व पहा ॥ ८७ ॥
सख्य करायाचें अज, काम करीं एक नीट युलिसीस ! ।
घ्यावे ग्रीकांतिल ते निवडुनियां तरुण लोक मदतीस ॥ ८८ ॥
नौदेशांतुन येथें नजराणे सर्व आज आणावे ।
जे जे देऊं केले अकिलीसा काल घेउनी नांवें ॥ ८९ ॥
आणाव्या ललना त्या; नंतर मग सांग तालथीबिअसा ।
जोव्हा, सूर्या द्याया बलि तूं सोधुन वराह आण कसा ” ॥ ९० ॥
ऐसें उत्तर दे त्या, बोले अकिलीस “ एत्रिअसतनया ।
अगमेम्नन ! देतिल ते लक्ष इथें मागुनी उचित समया ॥ ९१ ॥
समरीं विराम पडतां निवतां माझा जरा रणोत्साह ।
मागुन तें करुं इकडे स्वजन पहा विकलकाय हे अहह ! ॥ ९२ ॥

जित केलें त्यांलागीं प्रायमजें हेक्तरें असें कळतें ।
जोव्हें यश त्या दिधलें, कथिसी करण्या अह्मांस भोजन तें ॥९३॥
ग्रीकांच्या पुत्रां मी देतों उत्साह युद्ध करण्यास ।
सूर्यास्तापावेतों लढुंया काढून सर्व उपवास ॥ ९४ ॥
आधीं मज अपमानाचा घेणें उगवून सूड पूर्णपणें ।
मग शिष्टभोजनाचा थोर समारंभ योग्य तो करणें ॥ ९५ ॥
जलकण अन्नलवहि तो माझ्या उतरेल नच घशाखालीं ।
मन्मित्राची काया समरहताची पहा तिथें पडली ! ॥ ९६ ॥
तंबूंत देहलीच्या सन्मुख सर्वी क्षतांग मित्र दिसे ।
सहचर भोंवतिं बसुनी करताती शोक थोर भरुन पिसें ॥ ९७ ॥
मजला भोजन नलगे, कर्तन घनघोर पाहिजे मजला ! ।
रक्ताचा स्राव रुचे ! क्षतवीरांचा विलाप तोहि भला " ॥ ९८ ॥
युलिसीस सुज्ञ बोले " ग्रीकोत्तम ! वीर ! पेलिअसतनय ! ।
माझ्याहुन अससी तूं श्रेष्ठ, तुझें विदित शौर्य कीर्तिमय ॥ ९९ ॥
परि माझें तूझ्याहुन अधिक असे कांहिंसें शहाणपण ।
आधीं जन्मा आलों ह्मणुन मला ज्ञान अधिक तें जाण ॥ १०० ॥
होऊं दे नियमन तव, माझ्या परिणाममधुर शब्दांनीं ।
संतृप्त वीर होतिल थोड्या वेळांत लढुन अभिमानी ॥ १०१ ॥
शूलांच्या वर्षावें समरक्षेत्रास ये बरें पीक ।
झुलतीं जोव्ह धरी परि नियतीचीं पारडीं कमी अधिक ॥ १०२ ॥
होतो फार न ह्मणुनी वीरांतें लाभ सर्व काळ भला ।

जठर रिकामें ठेउनि रडणें ग्रीकां न उचित समयाला ॥ १०३ ॥
एकावर एक असे आले हे वीर पडत अमित रणीं ।
विश्रान्ति केविं मिळते शौर्याची राहतां रणीं करणी ॥ १०४ ॥
जो जो मरेल त्याला देणें लागेल मूठमाती ती ।
धैर्यानें एकचि दिन करणें रणि शोक, योग्य रीती ती ॥ १०५ ॥
द्वेष्य रणीं जगले जे त्यांना तें पान आणि अशन हवें ।
सन्नद्धकाय होउन लढतिल येतां तयांस धैर्य नवें ॥ १०६ ॥
दुसऱ्या निमंत्रणाची वाट बघाया न सैनिकां लावीं ।
राहून नौप्रदेशीं दुःखें त्यां लागतील भोगावीं ॥ १०७ ॥
त्रायस्थांसह लढण्या जाऊं सारे मिळोनियां समरा" ।
ऐसें वदुनी नेई सहचर निज घोर शत्रुसंहारा ॥ १०८ ॥
फैल्यूसाचा होता तनय तिथें श्रेष्ठ वीर मेजीस ।
ते पुत्र नेस्तराचे, आणि तो थोआस मेरिआनीस ॥ १०९ ॥
क्रीअनसुत त्यांत असे लैकोमेदीस फार विख्यात ।
मेलानिप्पस शेवटिं येतां तंबूंकडे तदा जात ॥ ११० ॥
सांगायाची खोटी, तरुणांनीं काम साधिलें समजा ।
अगमेम्नन नृपतीच्या तंबूंतिल वस्तुंची विशेष मजा ॥ १११ ॥
देऊं केलेल्या ते तिवया बाहेर आणिती सात ।
वीस अतिप्रभ पेले द्वादश हय सुस्वरूप विख्यात ॥ ११२
वामा सुरूप, ज्यांची संख्या झाली असे तदा सात ।
गौरकपोला रुचिरा होती ब्रैसीसजा तशी त्यांत ॥ ११३ ॥

युलिसीस पुढतिं चाले करुनी टॅलेन्त वजन हेम दहा ।
मागुन नजराणे करिं घेउनियां चालतात तरुण पहा ॥ ११४ ॥
मध्यें सभेंत आणुन ठेविति रांगेंत सर्व नजराणे ।
अगमेम्नन नृपतीला पडलें बोलावयास मग उठणें ॥ ११५ ॥
सुरवाणीसम ज्याची वाणी तो तेथ तालथीबिअस ।
जवळ उभा नृपतीच्या हस्तें सूकर धरोनियां बलिस ॥ ११६ ॥
घेई सुरी करीं तो काढोनी एत्रिअसज मग नृपती ।
असिच्या म्यानापाशीं लटके जी सतत सर्व जन बघती ॥ ११७ ॥
सूकर शिरिंचे पुढले कापुनियां केश हस्त उचलि वरी ।
ग्रीक स्थानीं बसतां जोव्हाची प्रार्थना नमून करी ॥ ११८ ॥
वाणी मधुर नृपाची परिसति जन योग्य लक्ष लावून ।
विस्तृत नभाकडे नृप पाहुनियां प्रार्थि हात जोडून ॥ ११९ ॥
" साक्षी पहिला होवो जोव्ह सदा श्रेष्ठ जो सुरोत्तम तो ।
पृथ्वीस, रविस मागुन कोपाच्या देवतांस ही धरतों ॥ १२० ॥
शिक्षा करिति नरां त्यां शपथ जनीं जे असत्य घेताती ।
' ब्रैसीसजेस नाहीं प्रमदेला म्यां धरीयलें हातीं ॥ १२१ ॥
मंचकसुख अथवा तें कांहीं दुसरें मनीं न मीं अणिलें ।
तंबूंत आजवर मीं तीतें अस्पृष्ट खचित ठेवियलें ॥ १२२ ॥
खोटें यांतिल कांहीं असलें तर अमर कुपित हे सकल ।
घेती असत्य शपथा त्यांची शिक्षा करोत तत्काल" ॥ १२३ ॥
ऐसें वदुनी तेणें चिरला शस्त्रें गळा वराहाचा ।

भिरभिरुनी खालिं पडे प्राणी तो विगतजीव कायमचा ॥ १२४ ॥
मग तालथीबिअस त्या फेंकी उचलून सागरामाजी ।
मत्स्यां खाद्य मिळालें. बोले अकिलीस होउनी राजी ॥ १२५ ॥
"हे जोव्ह तूंच आणिसी मनुजांवर मालिका अरिष्टांची ।
नातर मज चिढवाया धजती का मूर्ति एत्रिअसजाची ॥ १२६
माझी इच्छा नसतां हरिता बाला न खाचित मूर्ख नृप! ।
ग्रीकांचें बहुतांचें इच्छी परि मरण जोव्ह तो अकृप ॥ १२७ ॥
परि जा उरका भोजन आम्हां समरांत आज जायाचें" ।
ऐसें वदुनी नृप तो कार्य सभेचें पुरें करी साचें ॥ १२८ ॥
सारे गेले निघुनी अपुल्या नौकेंत अन्न सेवाया ।
परि सर्व मिर्मिदन ते लागति आतां उपायनें न्याया ॥ १२९ ॥
अकिलीसाच्या तंबुंत ठेविति ते सर्व वस्तु मग जपुन ।
सुस्थानीं सुंदरिंनां बसविति नेऊन मान देऊन ॥ १३० ॥
सूतांनीं हय नेले हांकुनि ते नीट अश्वशालेला ।
ब्रैसीसजा तिथें अलि हैमी व्हीनस जियेस उपमेला ॥ १३१ ॥
पत्रोक्लशतनु तीतें शूलक्षत तेधवां तिथें दिसली ।
तीवर टाकुनि अपुला देह तदा कण्ठ मोकलुन रडली ॥ १३२ ॥
हस्तांनीं उर बडवी ! ग्रीवा मुख घेइ फार ताडून ।
देवींसमान ती स्त्री करि हा स्वमुखें विलाप मागून ॥ १३३ ॥
" पत्रोक्लश ! हे ! माझ्या कष्टी जीवास तूं विसावा रे ! ।
तंबूंतुन गेलें मीं होतासी तेधवां सजीव बरें ॥ १३४ ॥

परि आतां मीं आलें बघण्या जननायका ! मृता तुजला ! ।
एका मागुन दुसरा मजवर पडण्या अनर्थ कां टपला ॥ १३५ ॥
× मातापितरांनीं ज्या दिधलें मज त्यास मीं पुरीपुढतीं ।
शूलक्षतास नयनीं देखियलें; प्रथम हेंच दुःख अती ॥ १३६ ॥
बन्धु प्रियकर माझे शूर तिघेजण तसेच सोदर ते ।
एकादिवशीं तेही मृत्यूचा मार्ग जाहले धरते ॥ १३७ ॥
रडुं दिधलें त्वां न मला, अकिलीसें जेधवां पतिस वधिलें ।
मैनीसाचें तेणें केलें उध्वस्त नगर तें पहिलें ॥ १३८ ॥
सांगितलेंस मला कीं ' अकिलीसाची करीन तुज राणी ।
नेउन थियापुरीं तुज घालुन नौकेंत तोडि जी पाणी ॥ १३९ ॥
करिन विवाहोत्सव मग मिर्मिदनां अणुन मेजवानीला ' ।
रडतें कोमल ऐसा गेलासी सोडुनी जवानीला "॥ १४० ॥
*ऐसें रडतां वदली, तिकडे बसल्या दुजा स्त्रिया रडत ।
पत्रोक्लशनिधन तयां केवळ अपुलें निमित्त सांपडत ॥ १४१ ॥
पाहूं गेलें असतां जी ती निज दुःख आठवुन रडली ।
अकिलीसाच्या भोंवतिं ग्रीकांची वृद्ध मंडळी जमली ॥ १४२ ॥
सेवाया अन्न तया विनविति परि तो रडून नाकारी ।
" ऐका विनंति माझी होइल का मान्य ती कुणास तरी ॥ १४३ ॥
पानाशन करण्यातें मजला कोणीच आज विनवुं नका ! ।

× आईबापांचे संमतिशिवाय मुलींचें लग्न होत नसे असें यावरून दिसतें.
*इकडे स्त्रिया दुजा त्या काढिति हेलास हेल तो सतत. पोप.

दारुण दुःख अतां जें ग्रासी तें मजासिं आज सोडिल का? ॥१४४॥
सूर्यास्तापावेतों थांबुन मीं जर बघेन सोसवलें "।
ऐसें वदुनी तेणें अन्य नृपां दूर घालवुन दिधलें ॥ १४५ ॥
दोघे एत्रिअसज ते नेस्तर युलिसीस राहिले जवळ ।
आणि इदामिनिअस तो तैसा फीनिक्स वृद्ध तो प्रबळ ॥ १४६ ॥
करुनी सायास तदा अकिलीसाचें करीत शान्तवन ।
समरमुखीं शिरल्याविण झालें नाहीं प्रफुल्ल तद्वदन ॥ १४७ ॥
पत्रोक्लशास अठवुन बोले सोडून सतत निश्वास ।
"हे मन्दभाग्य! माझा प्रियतम तूं मित्र खचित होतास ॥ १४८ ॥
पक्वान्नांनीं भरुनीं पात्र बरें आणितास मजकरतां ।
संभ्रमयुत आयासें, माझ्या तंबूंत बसुन मीं असतां ॥ १४९ ॥
त्रायस्थांशीं होते ग्रीक तदा लढत, तें तुला काय! ।
परि आतां तूं येथें पडलासी होउनी विकलकाय ॥ १५० ॥
पार्श्वी सज्ज असुनही शिवलों नाहीं जलास अन्नास ।
मज नाद लागला तव याहुन मोठें न दुःख कथिल्यास ॥ १५१ ॥
पितयाच्या निधनाची वार्ता नाहीं अधीक दुःखद ती ॥
मत्समतनयाभावें गाळी अश्रू थियापुरांत अती ॥ १५२ ॥
लढतों असा विदेशीं त्रायस्थांशीं, तयास कारण ती ।
हेलन एक जहाली मानियली निंद्य जी जनें जगतीं ॥ १५३ ॥
बरवा शोक पित्याचा पडलें तान्निधन वृत्त कानीं जर ।
सैरासीं सुत नांदे अजवर जीवन्त जो असेल तर ॥ १५४ ॥

नीआतोल्मस तो सुरसुंदर मजासिं फार आवडता ।
आशा हृदयीं होती गमलें आधीं मरेन रणिं आतां ॥ १५५ ॥
हयसंकुल दुर राहिल माझें अर्गास फार आवडतें ।
पालन मत्तनयाचें तूझ्या वरतीं खचीत मग पडतें ॥ १५६ ॥
जाउन थियापुराला सैरासाहुन तयास अणतास ।
दाखवतास तयाला माझ्या त्या तुंगशिखर हर्म्यांस ॥ १५७ ॥
मम वस्तुजात सगळें, सेवकजन थोर मालमत्ता ती ।
दाखवितास तयातें ! बोलावी गोष्ट काय आतां ती ॥ १५८ ॥
तो भूप पेलिअस मज पूर्णपणें रुग्ण जाहला गमतें ।
जीवन्त असुन नुसता वार्धक्यीं हाल सोशितो परते ॥ १५९ ॥
समजुन सिद्ध असे तो मद्विषयक अशुभ वृत्त ऐकाया ।
हळुची कळेल यातें पडली कीं मम रणांत मृत काया " ॥ १६० ॥
ऐसें वदतां रडला दुःखानें वृद्ध काढिती हेल ।
घरचा संग्रह निज जे अठवुनि ह्मणती फिरून न दिसेल ॥ १६१ ॥
रडत्यां ऐशा देखुन आली सॅतर्नजा दया भारी ।
आणि मिनर्वेस वदे " तनये ! स्वजनास विसरसी समरीं॥ १६२ ॥
अॅकिलीसाविषयींची सोडुनियां काळजी कशी देशी ।
गेला मित्र ह्मणोनी बसला तो शोक करित नौदेशीं ॥ १६३ ॥
भोजन दुसरे करिती; श्रान्त तरी हा करीत उपवास ।
*जा ! गे ! तद्हृदयावर सिंचुन ये गोड आज अमृतरस॥ १६४ ॥

---

* रामविरहानें सीता लंकेमध्यें अन्नपानादि वर्ज करील व कांहीं तिच्या

होइल आनंद तया पीडिल त्यातें क्षुधा न वेळेला " ।
ऐसें भाषण करुनी धाडुन तो देतसे मिनर्वेला ॥ १६५ ॥
औत्सुक्यें धांवे ती हार्पी गगनांत जेविं पक्षधरी ।
स्वर्गांतुनि अलि खालीं सज्ज जिथें ग्रीक जावया समरीं ॥ १६६ ॥
अकिलीसाच्या हृदयावरतीं सिंचीत गोड अमृतरस ।
कीं ती क्षुधा न बाधो पीडाकर कधिं तदीय गात्रांस ॥ १६७ ॥
गेली ती परतोनी ताताच्या सर्व शक्तिच्या भवना ।
नौभागांतुन इकडे वीर निघाले करावया कदना ॥ १६८ ॥
पडतात हिमशलका जोव्हाकडुनी धरेवरी खालीं ।
आकाशशुद्धिकारक वाहे जों बोरिआस शीत बली ॥ १६७ ॥
तैशीं नौदेशांतुन शस्त्रें बाहेर पडत चमकत तीं ।
शिरकवचें उज्ज्वल तीं, ढालींची रांग दिसत गण्डवती ॥ १६८ ॥
त्राणें उरिंचीं झळकति, भाले ते कठिण आशवृक्षाचे ।
पसरे प्रभा तयांची टाकी जी पृष्ठ भरुन गगनाचें ॥ १६९ ॥
दीप्तिवितानाखालीं वाटे जणुं ही धरा मुदें हंसते ।
वाजति खुर अश्वांचे, सेनेचें पदहि जाड जड पडतें ॥ १७० ॥
सन्नद्धकाय शोभे मध्यें अकिलीस वीर आभिजात ।

जीवाला अपाय होईल ह्मणून क्षुधा व तृषा यांची पीडा सीतेला होऊं नये म्हणून ब्रह्मदेवानें इंद्राचे हस्तें तिजकडून पायसान्न भक्षण करविलें होतें.

एतदत्स्यासि मद्धस्तान्न त्वां बाधिष्यते शुभे ।
क्षुधा तृषा च रंभोरु वर्षाणामयुतैरपि ॥ रामायण.

नेत्र स्फुलिंग वमती वाजति त्याचे कडाकडा दांत ॥ १७१ ॥
टोंचीत दुःख हृदया झाला त्याचा प्रवेश आंत खरा ।
त्रायस्थांवर कोपुन वीर निघाला लढावया समरा ॥ १७२ ॥
व्हल्कन देवें त्याला शस्त्रें प्रेमें अणून दिधलीं जीं ।
जिथलीं तिथेंच चढवी अङ्गावर भूप हा विशाल अजी ॥ १७३ ॥
गुंडाळुन जंघांच्या भोंवतिं तें त्राण; लावि मग फांसे ।
घाली त्राण उरींचें स्कंधीं असि लटकवून ठेवितसे ॥ १७४ ॥
ढाल विशाल धरी करिं सघन जिची शशिसम प्रभा पसरे ।
गिरिवर जणुं रिक्त स्थलिं अग्निज्वाळा चरे न जी अंबरे ॥१७५ ॥
तृणचय भक्षी सारा, करितां दुर्लक्ष अल्प गोंवारी ।
दर्यावर्दी बघती मत्स्याकुल सागरांत कैवारी ॥ १७६ ॥
इच्छा नसतां त्यांतें देई वाहून दूर वादळ तें ।
मित्र न जवळी दुसरे विझवाया धांवुनी जरी शकते ॥ १७७ ॥
अग्निज्वाला तेव्हां चढती अनिरुद्ध उंच सविलास ।
तैशी अकिलीसाच्या ढालीची दीप्ति चढत गगनास ॥ १८० ॥
हयकेशयुक्त चूडा ज्यावर तें त्राण मग शिरीं चढवी ।
चमकाया जें लागे रात्रीं कीं चांदणी नभांत नवी ॥ १८१ ॥
तत्कोनीं हेमाचे व्हल्कनकृत गुच्छ करिति लखलख ते ।
अकिलीस वीर पाहे शस्त्रांनीं केविं तत्तनू सजते ॥ १८२ ॥
गात्रें मोकळिं असती, पाहे, वा गोलिं सर्व जखडून ।
वाटलिं तीं पंखांपरि नेति नृपाला हवेंत उचलून ॥ १८३ ॥

बाहेर शूल काढी पैतृक मग जाड, जड, व बळकट तो ।
ग्रीक न कोणी दुसरा करिं ज्या उचलून तळपवूं शकतो ॥ १८४ ॥
अकिलीस वीर परि तो कैसा उचलून मारणें, जाणें ।
शिखरीं पेलिअनाच्या वाढतसे आशवृक्ष सरळपणें ॥ १८५ ॥
याच्या पितया करतां तोडुनियां चिरन तो घरा आणी ।
भाला घडवुन देई वीरां जो मरण घोर होय रणीं ॥ १८६ ॥
शृंगारिति अश्वां मग आतोमीदन व आल्किमस शूर ।
शोभति हे अश्वांचे केविं पहा कण्ठ भूषणें दूर ॥ १८७ ॥
अश्वां रथास जोडुन, तन्मुखिं घालिति लगाम सुन्दर ते ।
रंगित रथाकडे मग घेती ओढूनियां करें स्थिर ते ॥ १८८ ॥
आतोमीदन नंतर धरि निज हस्तीं प्रतोद उज्वल तो ।
बसतां गच्च करीं तो सारथि सावध रथीं क्षणीं बसतो ॥ १८९ ॥
सन्नद्धकाय मागुन झाला आरूढ वीर अकिलीस ।
शस्त्रास्त्रांनीं चमके दीप्तिंत जणुं लोपवीत हा रविस ॥ १९० ॥
पितयाच्या अश्वांतें आज्ञा करि घेउनी मुखें नांवा ।
"पोदार्गीसज! दोघे झान्थस! अणि बेलिअस, चला धांवा ॥ १९१ ॥
ग्रीकांच्या कटकातें आणा स्वामीस परत अनपाय ।
टाकाल संपतां रण त्या मृत पत्रोक्लशा परी काय!" ॥ १९२ ॥
धूर्बद्ध चपलपद त्या झान्थस तो उत्तरार्थ हें वदला ।
ग्रीवा लोंबे खालीं; वलयांतुन केशभार पाघळला ॥ १९३ ॥
झाडिति केश धरेला, जूनोनें त्या दिली असे वाणी ।

"आज तरी तुज आणूं अकिलीसा ! परत, कठिण जरि करणी ॥ १९४॥
परि येत चालला तव खचित अतां दिवस घातकी जवळ ।
दोष न अमुचा कांहीं; दोषी तव देव, दैव तें प्रबळ ॥ १९५ ॥
पत्रोक्लशकवचातें त्रायस्थांनीं हरोनियां नेलें ।
परि त्यांत आळसाचें आह्मीं नच काम अल्पही केलें ॥ १९६ ॥
लाटोनातनयानें समरमुखीं मारिलें तया, समया ।
आणी यश दिधलें त्या भूपाला हेक्तरास शौर्यमया ॥ १९७ ॥
झेफिरसाच्या वेगें आह्मीं धांवावया सदा शकतों ।
याहून लोक ह्मणती अधिक कुणी चपल कधिं न आढळतो ॥ १९८॥
दैवें निश्चित केलें करिल तुला विजित देव आणि नर " ।
ऐसें वदतां त्याचें धरिती मुख कलहदेवता प्रखर ॥ १९९ ॥
त्यावर कोपा चढुनी बोले अकिलीस "झान्थसा ! कां रे ? ।
कथितोस भावि मरणा ! नलगे कथणें ! मला विदित सारें ॥ २०० ॥
प्रिय पितरां सोडोनी दूर इथें दैविं नेमिलें मरण ।
त्रायस्थांस पुरेसें करुनीयां कदन मी त्यजीन रण " ॥ २०१ ॥
ऐसें तो वदला मग हांकी अपुल्या हयांस समरमुखीं ।
अरडे मोठ्यांनीं तो. दृढशफ हय पळति; हा बघून सुखी ॥२०२॥

सर्ग २० वा.

देवांचें युद्ध व अकिलीसाचा पराक्रम.

सारांशः—युद्धांत सामिल होण्यास इतर देवांना जोव्ह परवानगी देतो व ते आपआपल्या पक्षास जाऊन मिळतात. ईनिआस अकिलीसाशीं युद्ध करतो. नेप्चून त्याचें रक्षण करतो. अकिलीस हेक्तराच्या एका बन्धूचा वध करतो. त्यारागानें हेक्तर अकिलीसाशीं युद्ध करतो. अपालो मध्यें पडतो म्हणून तो वांचतो. अकिलीस ट्रोजनांचा संहार करतो.

कालमानः—मागील दिवस पुढें चालू.

स्थलमानः—स्कामन्दरतट व स्कामन्दरजल.

ऐसे पेलिअसज ! हे भोंवतिं तव सजाति सज्ज एकियन ।
नौदेशातें व्यापिति होत पुरेसें जयां न कधिं कदन ॥ १ ॥
इकडे समरोत्सङ्गीं ट्रोजन जमले; बघून जोव्ह तयां ।
थेमिसला कथि कीं "तूं पाचारीं देव सर्व समया या ॥ २ ॥
शोधुन उपत्यकांतें जे जे आलिम्पसावरी वसती ।
त्यांस निमंत्रण तूं कर " गेली ती धरुन वेग तेथ अती ॥ ३ ॥
सर्वांतें करिं आज्ञा जमण्यातें जोव्हमंदिरामाजी ।
स्रोतोवहा अल्या त्या, नव्हत्या स्थानांतरीं कुणीहि अजी ॥ ४ ॥
परि ओशिअनस तेथें नाहीं ती एक तेवढी आली ॥
जलिंची वा शाद्वलयुत वनिंची वा देवता न कुणि चुकली ॥ ५ ॥
घनवाहक जोव्हाच्या मंदिरिं हीं आसनांवरी बसलीं ।
जीं व्हल्कनें तयाला दारुमयीं करुन चांगलीं दिधलीं ॥ ६ ॥

मंदिरिं ऐशीं जमलीं, आला नेप्चून सागरांतून ।
मध्यें येउन बसला जोव्हाचा हेतु घेतसे पुसुन ॥ ७ ॥
" विद्युत्कारक ! कां रे ! अमरां त्वां फिरुन जोव्ह ! बोलविलें ।
ग्रीकत्रोजनविषयक वाटे असती विचार चालविले ॥ ८ ॥
संदीप्त आज होइल त्यांचा कलहाग्नि फिरुन समरांत " ।
घनवाहक जोव्ह तया बोले " सारें तुला असे ज्ञात ॥ ९ ॥
जाणासि बोलविलें कां; करतों चिंता खरेंच मर्त्यांची ।
आलिम्पसीं बसोनी, बघतां पुरविन हौस आत्म्याची ॥ १० ॥
त्रायस्थांत मिळावें तेविं ग्रीकांत आज इतरांनीं ।
दोघां साहाय्य करा, करणें जैसें स्वतंत्र मन मानी ॥ ११ ॥
अकिलीस एकला जर त्रायस्थांशीं अला लढायाला ।
त्रोजन थोडा वेळहि टिकतिल त्याचे पुढें कसे अजला ॥१२॥
पूर्वीं ज्यातें बघुनी होउन भयभीत जे पळाले ते ।
सुहृदाच्या निधनें जो क्रुद्ध तयाचे न होति हे जेते ॥ १३ ॥
नियतीस झुगारोनी फोडिल हा तट अशी मला भीति " ।
सॅतर्नज जोव्ह असें वदुनी रण चेतवीत भयद किति ! ॥ १४ ॥
भिन्न मनें सर्वांचीं. धांवति सुर सकल करुन रणवेशा ।
जूनो आणि मिनर्वा, मर्क्युरि, नेप्चून जात नौदेशा ॥ १५ ॥
क्रूर प्रबल असा तो व्हल्कन गेला तिथेंच लंगडत ।
अवयव सारे खालीं धांवत असतां बरेच धडपडत ॥ १६ ॥
मार्स मिळे त्रायस्थां, फीबस तो तेविं शूर कूर्चधर ।

शरसंधानकुशल ती दायाना जीस रुचतसे समर ॥ १७ ॥
व्हीनस हास्यप्रिय ती लाटोना आणि थोर झान्थसही ।
सुर येण्याच्या आधीं ग्रीकांतें गर्व वाटला कांहीं ॥ १८ ॥
कारण कीं रणिं आला वेळेला त्यक्तसमर अकिलीस ।
त्रोजन भीती बघण्या नेत्रांनीं दुरुन समरभूमीस ॥ १९ ॥
तेथें शस्त्रावृत तनु मार्ससम पेलिअसज त्यां दिसला ।
आलिम्पसस्थ आला अमरांचा संघ योग्य समयाला ॥ २० ॥
कलहाचें दैवत तें उत्तेजन देत सर्व सैन्याला ।
अरडे खूप मिनर्वा तीरीं त्याचा प्रतिध्वनि उठला ॥ २१ ॥
कधिं खोल खंदकाशीं अरडे राहुन उभी तटा आड ।
दुसऱ्या बाजुस अरडे मार्स तदा झटुनियां जिवापाड ॥ २२ ॥
झंझासम घोष करी त्रायस्थां चेतवी पुरींतून ।
दीर्घ सिमोइसतीरावरुनी कधिं जात शूर धांवून ॥ २३ ॥
अथवा उंच चढाया त्यास मिळे भूमि*कालिकोलोनी ।
धन्य खरी अमरांची दोघां उत्तेजिती रणीं सरुनी ॥ २४ ॥
रण जुंपलें भयंकर, गर्जे नभिं तो पिता सुरनरांचा ।
नेप्चून धरा कांपवि, हलत शिरोभाग मग भूधरांचा ॥ २५ ॥
शृंगें, पाद सनिर्झर गेलीं बहु हांदरुन इदाद्रीचीं ।
ग्रीकांच्या नौकांचीं हललीं अङ्गें विशालकुक्षींचीं ॥ २६ ॥
त्रायपुरी डळमळली, प्लूतो झाला सकंप पातालीं ।

---

* त्राय व समुद्रतीर यांमधील एक उंच टेंकडी.

आरडला, भ्याला तो आला सिंहासनावरुन खालीं ॥ २७ ॥
नेप्चून, वाटलें त्या, पृथ्वीचें करित अज विदारण तो ।
गमलें त्यास शिरावर अवनीचा भार खचित कोसळतो ॥ २८ ॥
कुत्सित भयद तयाचे दिसतिल मग हर्म्य अज नरां अमरां ।
ज्यां पाहुनियां सकलां येइ सदा सर्वकाळ वीट खरा ॥ २९ ॥
ऐसा गोंधळ झाला कारण आले रणांत हे अमर ।
राहे समूर फीबस नेप्चूनाच्या, धरून हातिं शर ॥ ३० ॥
मार्साशीं नीलाक्षी लढण्या उठली तशी मिनर्वा ती ।
जूनोशीं दायाना झुंझतसे समरिं धरुन गर्वा ती ॥ ३१ ॥
मृगयाव्यसनी देवी यत्करिं शोभे धनू सुवर्णाचें ।
फीबसभगिनी ती ही जाणे संधान नीट बाणांचे ॥ ३२ ॥
रक्षक लाटोनेशीं झगडे मर्क्युरि रणांत जो ज्ञाता ।
आवर्तवती झुंझे निर्झरिणी व्हल्कनासवें आतां ॥ ३३ ॥
झान्थस नांव सुरांनीं, स्कामन्दर हें दिलें तिस नरांनीं ।
हें आपसांत केलें भांडण, देऊन चित्त अमरांनीं ॥ ३४ ॥
प्रायमसुत जो हेक्तर, त्यावर अकिलीस जावया पाहे ।
* तर्पण मार्साचें त्या तद्रुधिरें समरिं साधणें आहे ॥ ३५ ॥
पेलिअसाच्या तनयावर धांवुन येत ईनिआस रणीं ।
उद्दीपक जो फीबस त्याची आहे खरेंच ही करणी ॥ ३६ ॥
प्रायमतनयाचा मग काढुनियां स्वर लिकाअनाचा तो ।

---

* कृतक्षणः काल इव प्रजाक्षये । रामायण.

रूप तयाचें धरुनी जोव्हज फीबस तयापशीं जातो ॥ ३७ ॥
*वदतो " ट्रोजनमंत्रिन् ! कोठें तव भाषणें बिभीषक तीं ।
हे ! ईनिआस ! दिधलीं त्वां जीं वचनें करून पान अती ॥ ३८ ॥
ट्रोजन मुख्यांना तूं येण्या विश्वास काय वदलासी ।
अकिलीसाशीं करणें मजला कीं समर पेलिअसजाशीं " ॥ ३९ ॥
उत्तर उलट तयाला देतांना ईनिआस मग वदला ।
" नसतां मनांत माझ्या प्रायमजा ! कथिशि हें कशास मला ॥४०॥
गोष्टी नव्हत फुकाच्या लढणें अभिजात पेलिअसजाशीं ।
हा न प्रसंग पहिला, करण्याचा युद्ध निकट त्याच्याशीं ॥ ४१ ॥
मागें एकावेळीं, माझ्या पाठीस लागला होता ।
अगणित गोकुल अमुचें, अणिला त्यावर तदा तयें गोता ॥ ४२ ॥
लिर्नेसस, पेदासस दोन्ही उध्वस्त करुनि जो आला ।
माझ्या मागें लागुन मारूं पाहे करांतला भाला ॥ ४३ ॥
जोव्हें मज रक्षियलें देउन बल मग मदीय गात्रांस ।
झालों असतों वश मी अकिलीसा, सोसुनी बहु त्रास ॥ ४४ ॥
मागें त्याच्या होती द्याया यश तेधवां मिनर्वा ती ।

---

* अङ्गदाचें पळत्या वानरांस उद्देशून केलेलें भाषण पहा.
विकत्थनानि वो यानि भवद्भिर्जनसंसदि ।
तानि वः क्व नु यातानि सोदग्राणि हतानिच ॥ १ ॥
अर्थः—जनसमाजामध्यें तुह्मीं ज्या फुशारक्या मारल्या, त्या कोणीकडे गेल्या ? तोंडांतून काढतांक्षणींच नष्ट झाल्या कीं काय ? रामायण.

लेलीगन व त्रोजन यां माराया करींत कावा ती ॥ ४५ ॥
उत्तेजन अकिलीसा देई उचलावया तदा भाला ।
चुकवुन मरण तयाला रक्षाया देव जवळ बघ बसला ॥ ४६ ॥
शस्त्र, शिवाय तयाचें, साधितसे लक्ष जाउनी सरळ ।
अकिलीसाशीं लढणें शक्य न ह्मणुनी नरां अतां सकळ ॥ ४७ ॥
मानवमांसातें तो केल्याविण विद्ध येत नत्र परत ।
द्याया जय तुल्य मला होइल जर एक सुर सहायरत ॥ ४८ ॥
तर रणिं मज जित करणें कार्य तया सुलभ कधिं न जाईल ।
तत्तनु पित्तलमय हा गर्व तयाचा घरींच राहील "॥ ४९ ॥
त्यातें भूप अपालो जोव्हज वदला " सुरांस तूं विनवीं ।
व्हीनससंभव अससी कथिती जन गोष्ट ही असे न नवी ॥ ५० ॥
+जोव्हाची दुहिता ती तूझी प्रत्यक्ष जाहली जननी ।

+ अङ्गदाचें पळत्या वानरांस उद्देशून भाषण.

आत्मनस्तानि विस्मृत्य वीर्याण्यभिजनानि च ।
क्व गच्छत भयत्रस्ताः प्राकृतो हरयो यथा ॥ १ ॥
साधु ! सौम्या निवर्तध्वं किं प्राणान्परिरक्षथ ।
नालं युद्धाय वै रक्षो महतीयं बिभीषिका ॥२॥

अर्थः—आपल्या मोठ्या कुलाचा व वीर्याचा विसर पडून यःकश्चित् हलक्या मर्कटांप्रमाणें भीतीनें गांगरून जाऊन कोणीकडे पळत आहांत ? भले वीर हो ! तुम्हीं परत फिरा. या राक्षसाला आमच्याशीं युद्ध करण्याचें सामर्थ्य नाहीं. याची ही नुसती भेवडावणी आहे ! रामायण.

हीनपदस्थ तयाची माता आहे सुविदित सकल जनीं ॥ ५१ ॥
कोठें जोव्होत्पन्ना! कोठें ती जरठजलधिदेवसुता! ।
शूल तुझा पित्तलमय चालव त्याच्यावरी अतां पुरता! ॥ ५२ ॥
उद्धत बिभीषकानें तद्वचनें तूं न डगमगें आज" ।
ऐसें वदुनी तेणें आणिला नृपहृदयिं धीर तो सहज ॥ ५३ ॥
समराग्रीं चालतसे होउन सन्नद्धकाय तो अमर ।
अकिलीसाच्या वरतीं अन्कैसीसज निघे नृपालवर ॥ ५४ ॥
धवलकरा जूनो त्या पाहुनियां मिळवि अमर ते सकळ ।
बोले " परिस मिनर्वे ! तूं ही नेप्चून! भूप हे ! प्रबळ ॥ ५५ ॥
कैशा गोष्टी घडती याचा अपुल्या मनीं विचार करा ।
अकिलीसावर धांवे सज्ज पहा ईनिआस अभय खरा ॥ ५६ ॥
देई उत्साह तया फीबस मागून, या पुढें आतां ।
त्यातें परतुन लावूं, अकिलीसा राखुं या रणीं लढतां ॥ ५७ ॥
अमुच्यांतिल एक अजी त्याच्या सान्निध रणांत राहून ।
देऊं बल त्या मोठें म्हणजे धैर्यीं पडो न तो न्यून ॥ ५८ ॥
कळुं दे कीं त्यातें सुर करती साहाय्य जेवढे प्रबळ ।
जे कोणी त्रायस्थां रक्षति त्यांच्या श्रमां न येत फळ ॥ ५९ ॥
आलिम्पसस्थ आम्हीं रणसंग्रामार्थ पातलों वरुन ।
अकिलीस रणिं रहावा अगदीं अनपाय हेतु हा धरुन ॥ ६० ॥
तज्जन्मदिवशिं विणिला प्राक्तनपट नियतिनें तयांतील ।
भवितव्य तेवढ्या त्या गोष्टी भोगावयास पडतील ॥ ६१ ॥

माता यास प्रसवे तेव्हांची वेळ ती धरायाची ।
आम्ही आलों ऐशी वार्ता कळवा कुणी तया साची ॥ ६२ ॥
होइल भयभीत जरि दिसला रणिं सुर विरुद्धपक्षाचा ।
प्रगटपणें सुरदर्शन गणताती हेतु जन अनर्थाचा" ॥ ६३ ॥
नेप्चून धराकम्पक बोले " जूनो न कोप अति बरवा ।
कारण काय तयाला? आहे का तो अवश्य तरि अथवा? ॥ ६४ ॥
इतर सुरां झुझवावें ऐशी इच्छा नसे मुळींच मम ।
सामर्थ्यवान आह्मीं दुसरे समरांत वाटती नरम ॥ ६५ ॥
याहुन रणपथ सोडुन दुरुनी करुंया निरीक्षण रणाचें ।
करणें युद्ध खरोखर ह्मटलें तर कार्य होय मनुजांचें ॥ ६६ ॥
परि जर मार्स करिल रण, फीबस अथवा रणांत जाईल ।
अकिलीसा जर अडवुनि त्यातें जर का लढूं न देईल ॥ ६७ ॥
तर मात्र कलह मोठा तत्क्षणिं आह्मीं करूं तयांसह तो ।
अस्मद्बाहुबलाचा त्यांस तडाका न खचित रणिं सहतो ॥ ६८ ॥
येथील सर्व अटपुन सारे आलिम्पसास जातील ।
आणी इतर सुरांच्या संघीं तत्काल सर्व मिळतील" ॥ ६९ ॥
हें वदुन नीलकेशी अमर निघे उच्चभूमिवर जाया ।
तेथें हर्क्यूलीसें रचिला तट आत्मरक्षण कराया ॥ ७० ॥
साहाय्यं मिनर्वेचें त्रायस्थांचें तयास बहु झालें ।
जेव्हां मगर पिटाळी तेव्हां येथें पळावया आलें ॥ ७१ ॥
येथें नेप्चून बसे घेउनियां इतर अमर शेजारीं ।

पसरी यांच्या स्कंधावरुनी तेव्हां अभेद्य घन भारी ॥ ७२ ॥
दुसरिकडे सजली ती शृंगांनीं जेथ कालिकोलोनी ।
धन्वी फीबस बसला मार्सातें जवळ तेथ घेवोनी ॥ ७३ ॥
दोहोंकडेस बसले असले सुर मनिं उपाय योजीत ।
त्यांची इच्छा नव्हती करण्या आरंभ त्या रणीं अहित ॥ ७४ ॥
परि जोव्ह वरतिं बघुनी देई उत्साह कलह करण्यास ।
रण सर्व भरुन गेलें इकडे, स्थल मुळिं न उरत वीरांस ॥ ७५ ॥
अश्वांच्या टापांचा उठला ध्वनि, खणखणाट शस्त्रांचा ।
उभय दलें भिडतांना भूवर अनुनाद उठतसे साचा ॥ ७६ ॥
विक्रान्त वीर दोघे मध्यें समरांत येति मग जवळ ।
अकिलीस एक योद्धा अणि दुसरा ईनिआस तो प्रबळ ॥ ७७ ॥
उत्सुक लढण्या दोघे; भय घालित ईनिआस परि आला ।
त्राण शिरींचें हलवी, धरुनी करिं ढाल, फिरवितो भाला ॥ ७८ ॥
अकिलीस घुसत पुढतीं, घेत उडी सिंह जेविं घातुक तो ।
ज्यातें वधण्या जमतो समयाला ग्राम सर्व उत्सुक तो ॥ ७९ ॥
तुच्छ करोनी त्यांतें पहिल्यानें सारखा पुढें चाले ।
तों त्यातें तरुण कुणी करिती क्षत तीक्ष्ण रोंवुनी भाले ॥ ८० ॥
जृंभाविदारितानन मागें वळुनी बराच सांवरतो ।
फेंस निघे दंष्ट्रांतुन, जीव उरीं कोपयुक्त गुरगुरतो ॥ ८१ ॥
दोहों कुशींवरी निज जंघांवर पुच्छ दीर्घ अपटून ।
फिरुन झटापट करण्या नीट तयारी बघे तदा करुन ॥ ८२ ॥

क्रौर्ये दिशा न्यहाळी; शक्ति तया फिरुनियां पुढें ढकली ।
कांहीं जणांस बघतो माराया छान संधि सांपडली ॥ ८३ ॥
किंवा होतां गर्दी येइल का बघत वेळ मरण्याची ।
अकिलीस ईनिआसावरतीं करिं चाल तेविं धैर्याची ॥ ८४ ॥
दोघे जवळी आले तेव्हां अकिलीस वदतसे त्यास ।
" कां ईनिआस! ऐशा गर्दींतुन येशि युद्ध करण्यास ॥ ८५ ॥
मजशीं गांठ असे रे! धरलीशी आस मानसीं कुठली? ।
प्रायम नृपतीबद्दल करण्याची राज्य हांव कां सुटली? ॥ ८६ ॥
वधिलेंस समज मजला; प्रायम तुज राज्य काय देईल ? ।
पुत्र तयाला असती! आहे स्थिर तो न अचल होईल ॥ ८७ ॥
वधिलेंस समज मजला! त्रोजन देतील काय शेत तुला ।
शोभे जयास कुंपण ज्याची दुसऱ्या न येत कधिंच तुला ॥ ८८ ॥
त्वां नीट नागरावें द्राक्षलता आंत विपुल लावाया ।
परि आशा मजला कीं जाइल जड गोष्ट तुजसिं साधाया ॥ ८९ ॥
वाटे कीं भाल्यानें तुजला मागें पिटाळुनी दिधलें ।
खालीं इदाद्रिवरुनी गोसंघांतून दूर हांकियलें ॥ ९० ॥
होतास एकला तूं त्याचें तुज काय रे! नसे स्मरण ? ।
सुटलास पळत जो तूं मागें वळुनी न पाहिलेंस पण ॥ ९१ ॥
लिर्नेससांत शिरशी, त्यातें उध्वस्त टाकिलें करुन ।
साहाय्य मिनर्वेनें, जोव्हानें मज दिलें तदा मधुन ॥ ९२ ॥
हरिल्या स्त्रिया तिथोनी, नाहीं स्वातंत्र्य राहिलें त्यांस ।

जोव्हानें व सुरांनीं राखियलें तुजसिं कठिण समयास ॥ ९३ ॥
वाटे न रक्षतिल तुज, चुकला तव हा खरेंच अदमास ।
प्रार्थितसें, परतावें ! जावें गर्दींत, करिं न युद्धास ॥ ९४ ॥
झाली इजा न जों तुज तों दे मजसह विरोध टाकून ।
तो एक मूर्ख समजें उमजे जो गोष्ट फक्त मागून " ॥ ९५ ॥
परत तयाला उत्तर देत असे ईनिआस या समया ।
" हे पेलिअसज ! मजला मनिं न अणावा विचार भिववाया ॥९६॥
मीं काय बाळ तान्हें, तो मी अज घाबरेन शब्दांनीं ।
निंदाया मज येतें घालाया धाक तेविं अवसानीं ॥ ९७ ॥
कुल कुठलें दोघांचें आहे दोघांस ठाउकें वाटे ।
मातापितरें ठावीं ऐकियलें वृत्त जनमुखावाटे ॥ ९८ ॥
तोंडावरुनी नकळे माझें तुज, मज तुझें, जरी सकळ ।
सागरदैवत थेटिस जननी तव, पेलिअस पिता प्रबळ ॥ ९९ ॥
अन्कैसीस पिता मम जननी व्हीनस ह्मणून गर्व मज ।
तूझीं किंवा माझीं रडतिल पितरें असें दिसे सहज ॥ १०० ॥
बोलून पोरकट वच आह्मीं होऊं न वाटतें दूर ।
अपुलीं कुळें जनांला बहुतांला असति आज महशूर ॥ १०१ ॥
तरिही इच्छिसि अज तूं जाणाया सर्व सत्य इतिहास ।
ऐकें; जोव्हें अणिला दार्देनस आधिं भूप जन्मास ॥ १०२ ॥
दार्देनिआ तयानें सुन्दर विख्यात वसविली नगरी ।
स्फुटिताक्षर मनुजांची इलियम होती तदा न सौख्य करी ॥ १०३ ॥

लोकां इदागिरीचा बहुनिर्झर रुचत दीर्घ पायथरा ।
ह्मणुनी वसते झाले धरुनी त्याचा सुरम्य तो असरा ॥ १०४ ॥
दार्देनसास झाला एरिक्थोनिअस एकला तनय ।
ज्याच्या ऐसा नव्हता सधन दुजा मर्त्य ज्या असे विनय ॥ १०५ ॥
तीन सहस्र जयाच्या अश्वा कुरणांत सर्वदा चरती ।
खिल्लारें बहु त्यांचीं आनंदें सर्वकाळ बागडती ॥ १०६ ॥
चरतां ऐशां देखुनि कामातुर बोरिआस तो झाला ।
आयाळ नीळ शोभे ऐसें तो अश्वरूप धरुन अला ॥ १०७ ॥
त्यांच्या तनुंवर घाली अवगुंठन दीर्घ आपुल्या तनुचें ।
गर्भवती त्या झाल्या द्वादश वडवा फल प्रसूतीचें ॥ १०८ ॥
ज्यांचे पाय धरेवर पडतां उडि शस्यबन्धनीं घेती ।
धान्यकणां खातांना जाति न मोडून शस्यकांडें तीं ॥ १०९ ॥
केला त्यांनीं कैसा लीलेनें खेळ सागरावरतीं ।
जरठोदधि पृष्ठावर झाल्याविण मग्न जालें सदा पळती ॥ ११० ॥
एरिक्थोनिअसाला झालासे पुत्र नाम ज्या त्रास ।
त्रायस्थ नृपति तो हा देई मग जन्म तीन पुत्रांस ॥ १११ ॥
ऐलस, आसेराकस, सुरसुन्दर गानिमीद तो तिसरा ।
मनुजांत खचित नव्हता याच्यासम दर्शनीय एक जरा ॥ ११२ ॥
जोव्हा मदिरा द्याया नेलें उचलुन तयास अमरांनीं ।
स्वर्गीं वास घडाया सुन्दरता हेतु येतसे ध्यानीं ॥ ११३ ॥
लाओमीदन झाला ऐलसला पुत्र, पांच फिरुन तया ।

प्रायम, तैथोनस आणि लाम्पस, तो क्लैतिअस बऱ्या समया ॥११४॥
मार्साची जो शाखा झाला तो शूर पुत्र हिसितअन ।
आसेराकस देई जन्म सुता कापिसास तो सुजन ॥ ११५ ॥
अन्कैसीस तयाला; सुत झालों त्यास मी; अशी माला ।
देई तो प्रायमनृप जन्म सुताला तसा हेक्तराला ॥ ११६ ॥
असल्या वंशाचा मज रक्ताचा तेविं, फार अभिमान ।
देतो जोव्ह अयश यश, इच्छा त्याची बलिष्ठ तूं मान॥ ११७ ॥
शाब्दिक आह्मां नलगे बालिश बालांसमान भांडण हें ।
मध्यें उभे अपण तों पसरतसे भोंवतीं बघें रण हें ॥ ११८ ॥
शक्य असे दोघांतें बहुत शिव्यांचा करावया मार ।
+शंभर वल्हीं जियेवर ऐशी नौका न वाहि तद्भार ॥ ११९ ॥
मनुजांची भाषा ही लवचिक आणि उचित भिन्न वादांस ।
नाना प्रकार त्यांचे, शब्द तरी कितिक! अन्त नच त्यांस ॥ १२० ॥
शब्द हवा तो वद तूं, येइल तोडीस तोड तव कांनीं ।
आम्हांस कलह नलगे, नीट करावा सदा बायकांनीं! ॥ १२१ ॥
राग तयांना येतां करताती कलह जीव तोडून ।

+ शिव्यांचें परिमाण ठरावण्यास नौका हें माप घेण्यांत ईनिआसाचे भाषणांत जरा मार्मिकता आली आहे; कारण हे ग्रीक मोठमोठ्या नौका घेऊन लढावयास आले होते. एकएक पुष्प वेंचून लाखोली वहाणाऱ्या स्त्रीयेसच लाखोली हें शिव्यांचें माप जसें पूर्णपणें पटेल तसें नौकाभर शिव्यांचें माप नौका घेऊन कष्टानें उदधि वलांडून येणाऱ्या ग्रीकांसच पटेल.

रस्त्यावरतीं येती चिढविति खोटें खरें बहू वदुन ॥ १२२ ॥
सुचतात सर्व गोष्टी राग तयां एकवार जर आला ।
*शब्दांनीं मजला तूं भिववुं न शकशील, काढ तूं भाला ! ॥१२३॥
×मी धीर वीर आहें ! ये पाहूं जोखुं आज अवसान ”।

---

*केवळ मनोरथानें **कर्णा** तूं शूर न प्रतापानें । **मो**रोपंत.

× **कर्ण** ह्मणे आलों बळ दावायास स्वयें पहायास । **मो**रोपंत.

११८–१२४ आर्यांत ईनिआसानें समरमुखीं येऊन उगाच बडबड करणाऱ्या वीरांचा चांगलाच समाचार घेतला आहे. परंतु प्राकृत मनुष्यांमध्येंही आधीं शिव्यागाळ होऊन मग मारामारी सुरू होते. त्याप्रमाणें वीर, ते केवढेही पराक्रमी असोत, लढाईस प्रारंभ करण्यापूर्वी यथास्थित तोंडसुख घेतात. त्याशिवाय पुढें होणाऱ्या समरचमत्कारांस शोभाच येत नाहीं. व उत्तम कवी ज्याप्रमाणें रोमहर्षण युद्धाचें वर्णन नानातऱ्हेच्या सर्वथैव उचित अशा अलंकारिक भाषेंत करतात त्याप्रमाणें युद्धारंभाच्या प्रास्ताविक गालीमय भाषणांचेंही वर्णन तशाच भाषेंत करतात. **शत्रुघ्ना**सारखा वीर **कुशा**सारख्या बालवीराशीं युद्ध करण्यास लाजत नाहीं. उलट “ओठांच्यावरचाहि जार अजुनी नाहीं तुझ्या वाळला ”या शब्दांत त्याची निंदा करीत आहे. यांत कवींचा दोष नाहीं. ते फक्त मनुष्यस्वभावाचें वर्णन करितात. म्हणून जसें शस्त्रयुद्धाचें तसें वाग्युद्धाचेंही त्यांस वर्णन केलेंच पाहिजे. **कर्णा**सारख्या महारथ्याची युद्धरचनेच्या आधींची प्रस्तावना पहा. **कर्ण** भीमास ह्मणतो.

तूवरका! औदरिका! टाकुनि आलास कां महानस रे ! ।
भ्याडा! अणिकांत सरो दुसरा, वीरांत, काम हा, न सरे ॥ १ ॥
बहु अशन–सूद–ताडन–पंडित तूं रणमखीं न कोविद रे ! ।

ऐसें वदुनी तेणें फेंकियला शूल तीव्र न लहान ॥ १२४ ॥
लागे ढालीवरतीं जीतें पाहून वाटते भीती ।
शूलघातें घुमली ढाल तदा शूर शत्रुच्या करिं ती ॥ १२५ ॥
मग पोलिअससुतानें भीतीनें धरिलि आड करिं ढाल ।
गमलें त्यास अरीचा शूल तया करिल विद्ध जंजाल ॥ १२६ ॥
मूर्ख ! न उमजे कीं जी ईश्वर वस्तू नरास देत असे ।
‡ तीचा भंग करोनी नासाया बल नरास येइ कसें ॥ १२७ ॥

भीरु जयश्रीस तसे कन्येला वर नको जसे विदुरे ॥ २ ॥
मजसीं भिंडसी भ्याडा! सिंहासीं जेंवि विप्रताप ससा ।
बाळा ! तपोवनाश्रित हो तूं रणभीरु विप्र तापससा । ३ ॥
किंवा हो अनुजाश्रित तोचि तुझें करिल आजि अस्वनन ।
मूढा ! मृगें शिरावें मृगराजवनीं त्यजूनि न स्ववन ॥ ४ ॥ **मो**रोपंत.

या शिवाय समरांत युद्ध चालू झाल्यावरही मध्येंच पुन्हा वाक्पाटव दाखविण्याची ही तऱ्हा रामायणांत दिसून येते. हनुमन्तानें **रा**वणाचे कानशीलांत एक झणझणीत चपराक दिली. त्या भयंकर प्रहारानें रावण कोलवंडला तरी उठून म्हणतो.

साधु वानर वीर्येण श्लाघनीयोऽसि मे रिपुः । **रा**मायण.

अर्थ:–हे वानरा! शाबास! तूं माझा रिपु आहेस तरीहि पराक्रमामुळें मला स्तुत्य आहेस. त्यावर कपिराज म्हणतात.

" धिगस्तु मम वीर्यस्य यत्त्वं जीवासि रावण ! " **रा**मायण.

अर्थः–एवढी चपराक खाल्ल्यावरही तूं जीवन्त आहेस तर धिक्कार असो माझ्या वीर्याला !

‡ कोण तयातें मारिल ज्यातें जगदीश तो परम कवच । **मो**रोपंत.

ढालींत सरळ शिरला तीव्र तदा शूल ईनिआसाचा ।
प्रतिबंध त्यास तो करि पत्रा आंतिल जाड हेमाचा ॥ १२८ ॥
ईशानें तो दिधला पूर्ण कृपा करुनिया तया दान ।
पत्रे दोन वरिल परि गेले भंगुन असून अवसान ॥ १२९ ॥
उरले तीन अजुनही केले ते व्हल्कनें मुळीं पाच ।
बाहेरुन पितळेचे दोन तयें बसविले नच उगाच ॥ १३० ॥
वंगाचे आंतुनियां होते मग जाड बसविले दोन ।
मधला हेमाचा जो होता तो शूल धरित अडवोन ॥ १३१ ॥
दीर्घच्छाय करींचा भाला अकिलीस फेंकि मागून ।
अरिच्या ढालीवरतीं लागतसे नीट मध्य साधून ॥ १३२ ॥
पत्रा शेवटचा तो होता पातळ वरून पितळेचा ।
गोचर्म वरतिं पातळ, शूल शिरे आंत, गूण वेळेचा ॥ १३३ ॥
ढाल चुरोनी गेली चोरितसे अंग ईनिआस भयें ।
धरुनी अवसान तदा धरिली उचलून भग्न ढाल तयें ॥ १३४ ॥
पृष्ठावरुनी गेला शूल, रुते खोल मग धरेमाजी ।
तद्वेग पुरोगामी ढालीचें वलय फोडितो आजी ॥ १३५ ॥
शूलापासुन सुटतां स्तब्ध उभा वीर ईनिआस भयें ।
नयनीं विषाद पसरे त्याच्या एका क्षणांत निरतिशयें ॥ १३६ ॥
कारण गेलें त्याच्या जवळोनी शस्त्र थोडकें चुकुन ।
त्यावर धांवुन गेला असितें अकिलीस दीर्घ उपसून ॥ १३७ ॥
आरोळी भयद करी; घेत करीं ईनिआस मग दगड ।

आढळती पुरुष अतां तैशा दोघांस झेंपता न जड ॥ १३८ ॥
परि एकला असोनी त्यानें उचलोनियां करीं धरिला ।
शिरकवचा वर अथवा ढालीवर मारिता तदा अरिला ॥ १३९ ॥
ढालीनें आजवरी टाळियला नाश कितिकदां याचा ।
अकिलीस आज घेता असिनें तो जीव ईनिआसाचा ॥ १४० ॥
नेप्चून धराकंपक पाहे परि वेळ ही तदा दुरुन ।
तत्क्षणिं इतर सुरांतें बोलतसे शब्द कांहिं अरडून ॥ १४१ ॥
"तुम्हीं परिसा सुर हो ! होइल मज दुःख खचित फार अतां ।
जाइल महेच्छ भूपति हेदीसा ईनिआस रणिं पडतां ॥ १४२ ॥
अकिलीस करिल जित त्या मूर्खाला फीबसें दिली भर ती ।
त्याच्यावरचें संकट टाळाया परि शके न तीव्र मति ॥ १४३ ॥
*कां रे ! अनागसें या दुसऱ्यासाठीं अरिष्ट सोसावें ? ।
कष्ट खरे दुसऱ्याचे याच्या वांट्यास ते कसे यावे ? ॥ १४४ ॥
विस्तृत नाकीं वसती देव तयां करित वस्तु अर्पण हा ।
या हो वांचवुं याला मारिल अकिलीस यास समरिं पहा ॥ १४५ ॥
येईल कोप जोव्हा; तो वांचावा अशीच विधिघटना ।
दार्देनसवंशक्षय होउं नये खण्ड पडुन संताना ॥ १४६ ॥
जोव्हा बहु सुत झाले ज्यांचा जगिं दीर्घ वंशविस्तार ।
त्यांतुन दार्देनसकुल जोव्हाचें लाडकें म्हणा फार ॥ १४७ ॥
प्रायमवंशाचा बहु जोव्हातें फार येत तिटकारा ।

*हेलन परत द्यावी असें याचें मत होतें म्हणून हा दोषी नव्हता.

हें राज्य ईनिआसा त्रायस्थांचें मिळेल भूपवरा ॥ १४८ ॥
होतील पुत्र जेत्या पौत्र तसे राज्य भोगितिल मागें" ।
जूनो विशालनयना उत्तर त्या द्यावया असें लागे ॥ १४९ ॥
" धरणीकंपक ! तूझा तूंच करीं रे विचार चित्ति अज ।
वीरास ईनिआसा राखूं वा देउं सोडुनी सहज ॥ १५० ॥
तो शूर खूप आहे, जिंकिल अकिलीस पेलिअसज तया ।
मी व तशीच मिनर्वा वाहुन बसलों अनेक शपथा या ॥ १५१ ॥
अमरांविरुद्ध जातों त्रायस्थांतें करूं न कधिं मदत ।
चुकवुं न अनर्थ आह्मीं त्रायपुरी सर्वही जरी जळत ! ॥ १५२ ॥
ग्रीकांच्या पुत्रांना लावूं दे आग सर्व नगरास ।
भक्षोत ज्वाला त्या, रक्षेचीही पडो पुढें रास" ॥ १५३ ॥
ऐसें वच ऐकोनी गेला नेप्चून समर लंघून ।
शूलांच्या मारांतुन आला उद्दिष्टभागिं धांवून ॥ १५४ ॥
अकिलीस जेथ होता जेथ तसा ईनिआस विख्यात ।
अकिलीसाच्या नयनां तेथ तमें तो करीत अंतरित ॥ १५५ ॥
शूलें विद्ध जहाली होती जी ढाल ईनिआसाची ।
तींतून शूल उपटी ज्या दांडी सजत आशवृक्षाची ॥ १५६ ॥
अकिलीसाच्या पायापुढतीं ठेवून शूल नंतर तो ।
उचलून ईनिआसा घेउन वर लोटुनी पुढें सरतो ॥ १५७ ॥
अश्वांच्या वीरांच्या रांगा लंघून ईनिआस चले ।
देती आधार तदा अमराचे हात त्यास सदृढ भले ॥ १५८ ॥

पश्चाद्भागीं आला समरीं जेथें बहू जनां त्रास ।
काकोनीस जिथें ते बसले होऊन सज्ज लढण्यास ॥ १५९ ॥
नेप्चून धराकंपक राहुन त्याच्यापशीं उभा वदला ।
"हे! ईनिआस कवण्या देवें तुज खूळ लाविलें अजला! १६० ॥
लढसी अकिलीसाशीं तुझ्याहुन फार अधिक शूराशीं! ।
अधिक असे प्रिय जो जनिं सकलांशीं शक्तिमान अमरांशीं ॥ १६१
येइल समूर जेव्हां रणिं तो, तेव्हांच जात जा परत ।
प्लूतोपुरास नातर जाशिल विधिच्या विरुद्ध जरि असत ॥ १६२ ॥
नियतिनियोगें जेव्हां अकिलीसा मरण समरिं येईल ।
तेव्हां निर्भयचित्तें उचित तर प्रखर समर करशील ॥ १६३ ॥
कारण दुसरा कोणी ग्रीक नसे शक्त तुज वधायास" ।
मृदुल वचें या सारा हेतु निवेदी मनांतला त्यास ॥ १६४ ॥
तेथें त्यातें सोडुन अकिलीसाच्या पुढील तम सारी ।
तेव्हां स्पष्टपणें त्या दिसली मागील ती कथा सारी ॥ १६५ ॥
जीवा महाशया निज बोले तेव्हां सखेद नृप फार ।
"हे देवांनों! बघतों नयनीं हा केवढा चमत्कार! ॥ १६६ ॥
भाला भूवर पडला! धरिला ज्यावरतिं नेम तो नाहीं! ।
इच्छियलें त्या वधण्या! सत्य वदे ईनिआस तो कांहीं ॥ १६७ ॥
गर्व वृथा केला नच त्यानें कीं मी सुरांस आवडतों ।
जाऊं दे गेला तर! माझ्याशीं तो कसा पुन्हा लढतो ॥ ६८ ॥
पुढतीं उभा न राहिल घ्याया अनुभव कसें मदीय बळ ।

मानिल आनंदचि तो कीं टळलें प्राप्त मरण जें जवळ ॥ ६९ ॥
परि ये ग्रीकां देतों उत्तेजन अज्ञ करावया समर ।
जातों चाल करुन मग बघतों त्रायस्थ ते कसे इतर" ॥ १७० ॥
ऐसें वदुनी जाउन देई उत्साह सैनिकांस असा ।
" ग्रीकांनों पुढतिं सरा ! त्रायस्थांतें भिऊं नका सहसा ॥ १७१ ॥
वीराशीं वीर लढो, जुंपाया पाहिजे भलें समर ।
शूरास एकल्यातें इतकें काई न शत्रुबल फार ? ॥ १७२ ॥
सर्वांशीं लढण्याचें साधिल का मार्स असुनियां अमर ।
त्या शूर मिनर्वेसहि सर्वांशीं शक्य काय हो समर ॥ १७३ ॥
संग्राम केवढा हा अरिचें दळ पसरलें पुढें फार ।
परि मी शिकस्त करतों, अल्पहि नाहीं प्रमाद करणार ॥ १७४ ॥
*हातांनीं, पायांनीं, शक्तीनें साध्य तें अतां करिन ।
सेनाभेद करोनी जातां मी, होय खिन्न कां अरि न" ? १७५ ॥
ऐसें बोलुन तेणें स्वजनां उत्साह आणिला समरीं ।
त्रायस्थां घ्याया भर हेक्तर निर्भर्त्सना बरीच करी ॥ १७६ ॥

---

* साधेल जें बलानें, उत्साहें शक्य जें रणांत मला ।
शिकवील बुद्धि जें जें, तें तें हा करिल हस्त सुदृढ भला ॥ १ ॥
सगळा हा, ग्रीकांनों ! तुमचा अकिलीस आज हा सगळा ! ।
हा हस्त अरिस भिवविल ! अरिचें दल आटवील चिरुन गळा ॥ २ ॥ पोप.
* न मथितिल खला तरी हे भुज केले व्यर्थ काय गा पीन ! ।
मोरोपंत.

अकिलीसावरतीं मी जाइन ऐसें कथून तो वदला ।
" ओजन ! उदार जन हो ! आकिलीसाला उगाच कां भ्यालां ? ॥ १७७ ॥
अमरांशीं लढण्याचें मजला साधेल खचित शब्दांनीं ।
शूलानें नच झेंपे असती बलवन्त अमर अभिमानी ॥ १७८ ॥
अकिलीसाचे सारे नाहीं होणार शब्द कधिंच खरे ।
कांहीं पूर्ण करिल तो कांहीं उरतिल अपूर्ण, नाहिं बरें? ॥ १७९ ॥
उज्ज्वल लोहासम जरि असला तो वीर कठिण शौर्यबलें ।
त्याच्यावर मी जातों त्याचे कर दहनतुल्य जरि असले" ॥ १८० ॥
उत्तेजन त्यां द्याया वदला तो हें; तयें भले वीर ॥
जाया रणास उचलति भाले निज करिं धरोनियां धीर ॥ १८१ ॥
बल सर्व एकवटलें रणनादें समरभूमि ती भरली ।
मग जवळ हेक्तराच्या फीबस येऊन बुद्धि सुचवि भली ॥ १८२ ॥
" हेक्तर ! अकिलीसाशीं समराग्रीं कधिं लढूं नको सहसा ।
गर्दीत गोंधळ होतो तेथें त्या गांठिं अचुक समरिं कसा ! ॥ १८३ ॥
नाहींतर दुर्दैवें तुजला लागेल चांगला घाव ।
लागेल वार असिचा, तूझा मग तो कसा वद निभाव " ॥ १८४ ॥
ऐसें तो वदला मग हेक्तर गर्दींत मिसळला पार ।
अमराच्या वाणीतें परिसुनि आश्चर्य मानि तो फार ॥ १८५ ॥
आयस्थांवर तुटुनी पडला अकिलीस वीर अमितबल ।
ओत्रिन्त्यूसज गावे त्यास पुढें इफितिअन मग नृपाल ॥ १८६ ॥
जलदेवता तयाची झाली नाइस मनोरमा जननी ।

ओत्रिन्त्यूसापासुनि सुत झाला तिजशिं हा प्रसिद्ध जनीं ॥ १८७ ॥
मोलसिं इदाप्रदेशीं नगरध्वंसक नृपाल राजा हा ।
त्यावर हेक्तर धांवे मध्यें शिरिं शूल हाणि तीव्र पहा ॥ १८८ ॥
शकलें दोन जहालीं पडला नृप शस्त्रभार खणखणला ।
पाहुन तें विजयी नृप हेक्तर करि गर्वयुक्त वचनाला ॥ १८९ ॥
" ओत्रिन्त्यूसज! आतां खालीं समरांत आज पडलासी ।
आजवरी लोकांतें भिववित तूं सर्व काल आलासी ॥ १९० ॥
मृत्यु तुला परि गांठी, जन्माचें राहिलें दुरी स्थान ।
मीनाश्रय हैलस तें पित्रागत नगर रम्य व लहान ॥ १९१ ॥
जैजीअन सरसीशीं हर्मस सावर्त नद जिथें वाहे " ।
गर्वें हा बोले तों घेरि अली इफितिअन नृपा पाहें ॥ १९२ ॥
चक्रें नेति रथाचीं ग्रीकांचे अश्व ओढुनी वरुनी ।
रणभागीं मग त्याचीं अङ्गें गेलीं मुळींच चिरडोनी ॥ १९३ ॥
देमोलीअन नंतर अकिलीसाच्या अला तडाक्यांत ।
हा अन्तिनारसंभव रणकारक म्हणुन लोकविख्यात ॥ १९४ ॥
वार कपालीं झाला, त्राणें प्रतिबंध मुळिंच केला न ।
भंग तयाचा झाला; भेदितसे शूल आस्थिस लहान ॥ १९५ ॥
मेंदू दूषित झाला, असुनी हा शूर वीर जित झाला ! ।
हिप्पोदामासावर घाला मग मृत्युचा कठोर अला ॥ १९६ ॥
उतरुन रथावरोनी होता तो दूर पळुनियां जात ।
अकिलीसाचा भाला पाडी क्षत मागुनी तदंगांत ॥ १९७ ॥

श्वासाच्या सह झाला जेव्हां उत्सर्ग तेथ जीवाचा ।
+ तेव्हां अरडे, त्याहुन हंबारव मंद वध्य वृषभाचा ॥ १९८ ॥
भक्तें पुजिला जातो जेव्हां नेप्चून हेलिकोनिअन ।
तेव्हां वृषभा ओढुन नेती आधीं प्रदक्षिणेस जन ॥ १९९ ॥
हंबरडे वृषभ भयें पृथ्वीकंपक मनांत मुद पावे ।
हिप्पोदामासें त्या, प्राणोत्क्रमणसमायिं तेविं अरडावें ! ॥ २०० ॥
आत्मा शूर तयाचा अस्थींतुन निघुन चालता झाला ।
नंतर हेक्तर मारी प्रायमजा पालिदोरसा भाला ॥ २०१ ॥
प्रीति कनिष्ठावरतीं या तनयावरतिं बहुत जनकाची ।
असुनी चपळ तया जो समरातें जाउं देत नव्हताची ॥ २०२ ॥
तारुण्यसहज मौर्ख्यें गेला चापल्य समरिं दावाया ।
समरशिरीं तों धांवे जों जाई जीव निघुन तो वाया ॥ २०३ ॥
अकिलीस शूल अपुला हाणी खर्चून बल अमंद तिथें ।
पाठीवर त्या मध्यें, बांधिति कवचा सवलय बंद जिथें ॥ २०४ ॥
नाभींतुन शूल निघे कण्हतां जानूंवरी पडे वीर ।
नयनांवरतिं तमाचें पटल उठे सर्वही गळे धीर ॥ २०५ ॥
अंत्रें सारीं गळुनी येति करीं वीर वांकतां खालीं ।
नजरेस हेक्तराच्या बन्धूची दुःस्थिती तदा आली ॥ २०६ ॥

+हेलिसींत नेप्चूनाचे मंदिरांत दरवर्षी एक वृषभ बळी देत असत; त्यास वधण्याचे आधीं स्थंडिलाभोंवतीं फिरवतांना जर त्यानें हंबरडा फोडिला तर बलिग्रहण झालें असें लोक समजत.

लोळे धरणीवरतीं ! नयनांवर वृष्टि करितसे तम तें ।
लांब कुठें जावोनी लढणें त्यातें सुचे न उत्तम तें ॥ २०७ ॥
अकिलीसावर धांवे पसरत कीं जात अग्निची ज्वाला ।
देखे अकिलीस तया येतांना घेउनी करीं भाला ॥ २०८ ॥
मारुन उडी करी तो गर्वाचें वचन " जवळ हा नर तो ।
जेणें प्रियमित्रवधें मज्जीवा दंशिलें असें धरतों ॥ २०९ ॥
समरपथीं गांठाया भीति नको आज एकमेकांची " ।
मग धृष्ट हेक्तरावर लावी तो दृष्टि पूर्ण कोपाची ॥ २१० ॥
बोले " ये जवळ असा, ह्मणजे तूं जवळ मृत्युच्या येशी ! " ।
हेक्तर उत्तर त्यातें देत असे धृष्ट पूर्ण आवेशी ॥ २११ ॥
" हे ! पेलिअसज ! कां रे ! भिववाया मजाशीं करिशि तूं आस ।
मीं काय पोर आहें जाइन तो भिऊन आज शब्दांस ॥ २१२ ॥
निंदा भर्त्सन हीं अज केविं करावीं कळे मला नीट ।
न्यून असे मद्बल तें जाणें कीं अधिक असशि तूं धीट ॥ २१३ ॥
होणें जाणें पुढलें ईश्वरचरणीं विनम्र असणार ।
असुनी न्यून बलें मी कां तुजला समरिं नाहिं वधणार ? ॥ २१४ ॥
शूलें मारिन तुजला ! माझेंही शस्त्र तीव्र बघ आहे ! " ।
ऐसें वदुनी हाणी शूल तयातें पलास परि पाहें ॥ २१५ ॥
शूल तयाचा धांवे अकिलीसाच्या कडेस नेमानें ।
तो मंद फुंकरानें लावी परतून ती तिथें मानें ॥ २१६ ॥
चरणांसमूर पडला येउनियां परत हेक्तराच्या तो ।

त्यातें वधण्या उत्सुक अरडुनि अकिलीस धांवुनी जातो ॥ २१७ ॥
परि त्यास अपालोनें, अमरें नेलें हरून दूरवरी ।
अकिलीसाच्यावर अणि ठेवियलें पसरुनी धुकें भारी ॥ २१८ ॥
भाला करिं घोळोनी धांवे अकिलीस तीन वेळ, तरी ।
दाट धुक्याला वेधी; चवथ्यानें धांवुनी प्रयत्न करी ॥ २१९ ॥
तेव्हां सुरसा गमला; त्यातें चिढवावयास हें वदला ।
" कुतऱ्या ! फिरुन अतां तूं चुकवुन गेलास योग्य मरणाला ॥२१०॥
संकट येतां जवळी राखियलें फीबसें परी तुजला ।
शिरतोस शूलघोषीं तेव्हां ह्या प्रार्थितोस देवाला ॥ २२१ ॥
कोणी देव कधिंहि जरि येउन साहाय्य करिल समरिं मज ।
केव्हांना केव्हां तरि लाविन तव अन्त मी असें समज ॥ २२२ ॥
आतां तथापि जातों त्रोजन जे शक्य ते वधायास ! " ।
ऐसें वदुनी फेंकी द्रायप्सावरतिं तीव्र शूलास ॥ २२३ ॥
मध्यें मानेवरतीं रुततां याच्यासमूर तो पडला ।
त्यातें तेथें सोडुन अडवी देमूकसास वीराला ॥ २२४ ॥
फैलीतरजा शूरा क्षत झालें चपल जानुंच्या खालीं ।
बाहेर शूल निघतां वरतीं तलवार येउनी पडली ॥ २२५ ॥
जीव तयाचा गेला, अकिलीसा दोन वीर मग दिसले ।
लाओगोनस आणी दार्देनस ते बिआसपुत्र भले ॥ २२६ ॥
दोघा वार करोनी दोघां ओढीतसे रथाखालीं ।
भाला लागे एका, दुसऱ्या तलवार लागती झाली ॥ २२७ ॥

त्रास अलास्तरसुत तो त्यातें समरीं समूर मग दिसला ।
टेंकून ढोंपरांतें पाहे जर ठेवुनी अटी निभला ॥ २२८ ॥
" सोडीं जीवन्त मला! मारुं नको सदय! समवयस्काला! " ।
मूर्ख! न जाणे कीं हा कोणालाही कधीं नसे वळला ॥ २२९ ॥
तो काय सदय होता? मृदु नव्हता; उग्र तो जनां ठावा ।
जानूंतें कवटाळी इच्छा कीं विनतिनें नृप वळावा ॥ २३० ॥
अकिलीसें रोंवियली मोठी तलवार मग यकृद्भागीं ।
यकृताचा गोळा तो पडला बाहेर जागच्या जागीं ॥ २३१ ॥
शोणित कृष्ण गळालें, गेला तेणें भरोनियां ऊर ।
काळोखी नयनांवर येउनियां जीव जातसे दूर ॥ २३२ ॥
मूलिअसाच्या जवळी धांवुन अकिलीस मग उभा राहे ।
मारीत शूल कर्णीं कर्णांतुन अन्य तो निघूं पाहे ॥ २३३ ॥
मग अन्तिनारतनया मारी ईचीक्कसा शिरावरतीं ।
मध्यें तलवार शिरे पित्तलमय मूठ जीस बहु जड ती ॥ २३४ ॥
रुधिरें तप्त जहाली, तो च्यूकालिअन मग पुढें दिसला ।
मिळतात कोंपराशीं स्नायू जे त्यांत रोंवि हा भाला ॥ २३५ ॥
हस्त गळाला खालीं बघत उभा वीर वाट मरणाची ।
अकिलीसानें असिनें कापियली मान नेमकी त्याची ॥ २३६ ॥
मस्तक कवचासह तें दूर उडालें कणा तसा तुटला ।
वाहे वसा तयांतुन देह धरेवरतिं पडुन राहियला ॥ २३७ ॥
पैन्यूससुतावर मग धांवे अकिलीस रिग्मसावरतीं ।

येउनियां थ्रेसाहुन शूलाचा वार खात तीव्र अती ॥ २३८ ॥
उदरांत शूल रुतला वीर पडे धाडकन रथाखालीं ।
आरीइथोअसाची पृष्ठीं तनु विद्ध तेधवां झाली ॥ २३९ ॥
वळवीत अश्व असतां अकिलीसें मारिला तया भाला ।
पडला रथांतुनी तो गेले उधळोन अश्व समयाला ॥ २४० ॥
*उज्ज्वल अग्नि जसा तो शुष्कदरींतून पर्वतीं पसरे ।
भक्षी निबिड वनातें, ज्वालांतें नाचवीतसे वारें ॥ २४१ ॥
सर्व दिशांनीं धांवे येउन अकिलीस शूल आज तसा ।
कोपन देव जणूं हा वध्यांमागून धांवतो सहसा ॥ २४२ ॥
कृष्ण धरित्रीवरतीं वाहति मोठे प्रवाह रुधिराचे ।
ऐसे घोर पराक्रम अकिलीसाचे प्रचण्ड वीराचे ॥ २४३ ॥
शेतांत पीक आलें, आणोनी धान्य कापिती सगळें ।
मळणी कुणी यवांची काढाया करवुनी सपाट खळें ॥ २४४ ॥
रुंद कपाळें ज्यांचीं जोडितसे वृषभ ते धुरेखालीं ।
जे पदिं चुंधडितां ती यवराशी मउच पाहिजे झाली ॥ २४५ ॥
अकिलीसाचे तैसे चुंधडती हय शवें अणी ढाली ।
रुधिरानें रंगुनियां गेले अक्षाग्र सर्वही खालीं ॥ २४६ ॥
वलयें रथासनाला होतीं त्यांवरतिं सांचलें रुधिर ।
अश्वांच्या टापांनीं वरतिं उडे तें न लागतां उशिर ॥ २४७ ॥

* भीम करी वीरांचें वृक्षांचें मथन वातसा वाटे ।
निर्मावा जेविं वनीं दहनें तो पथ नवा तसा वाटे ॥ १ ॥ मोरोपंत.

*चक्रांच्या नेमीही शिंतोडे उडविती तसेच वर ।
शोणितासिक्त करें हा आतुर मिळवावयास यश नृवर ॥ २४८ ॥

---

*दुस्तर रक्तनदी हे, वाहवित्ये द्विरदही, बहुचि खोल ।
हा शोणितमांसाचा झाला सर्वत्र दुर्गम चिखोल ॥ मोरोपंत.

सर्ग २१ वा.

स्कामन्दर नदीच्या जलांतील युद्ध.

सारांशः—अकिलीसाला पाहून **ट्रोजनांची** पळापळ होते. कांहीं नगराकडे पळतात. कांहीं नदीकडे पळतात. त्यांच्यावर **अकिलीस** तुटून पडतो. **लिका-अन** व **आस्तीरोपीअस** यांस मारतो. व **पत्रोक्लुशास** बळी देण्याकरितां १२ **ट्रोजनांस** सजीव पकडून ठेवितो. **स्कामन्दरतटिनी** सर्वभर वाढून वीचींनीं अकिलीसावर हल्ला करिते. **सिमोइस** तीस साहाय्य करिते. **नेप्चून** व **पलास** अकिलीसाला साहाय्य करतात. **जूनोचे** चिथावणीवरून **व्हल्कन** नद्यांचें पाणी आटवितो. हें युद्ध संपल्यावर देव आपसांत थोडेसें युद्ध करतात व **आलिम्पसास** परत जातात. **अकिलीस ट्रोजनांचा** संहार सुरू करतो. **आजिनार** त्याच्याशीं दोन हात करतो. परंतु त्यास घनान्तरित करून **अपालो** वांचवितो. **अपालो आजिनाराचें** रूप धारण करून **अकिलीसाला** गुंतवून ठेवतो, तों नगरांत जाऊन लपण्यास **ट्रोजनांस** अवकाश मिळतो.

कालमानः—मागील दिवस पुढें चालू.

स्थलः—**स्कामन्दर** नदीचा प्रवाह व तिचे कांठ.

तेव्हां ते पळतांना निर्झरिणीच्या तटासमीप अले ।
आवर्तवती झान्थस सजलि जिथें जोव्हजा विशुद्ध जलें ॥ १ ॥
अरिसंघ येथ फुटला; एक धरी मार्ग नीट नगराचा ।
ग्रीकांचा पळत्याचा होता पथ आदल्याच दिवसाचा ॥ २ ॥
अभिजात हेक्तरें त्यां लावियलें दूर सभय पळवून ।
त्याच अतां मार्गानें येती हे परत पळत अज्ञ भिउन ॥ ३ ॥

प्रतिबंध यांस करण्या जूनोनें पसरिला पुढें घन तो ।
दुसरा भाग सरिज्जालिं शिरला; मागें पुढें न कुणि बघतो ॥ ४ ॥
रजतासमान उज्ज्वल फिरती आवर्त तेथ खोल जलीं ।
पडतां जलांत ऐशा, ध्वनि झाला आणि नदी तयें फुगली ॥ ५ ॥
गुणगुणती तट भोंवतिं अरडुन जन पोंहतात सर्वभरी ।
फेऱ्यांत भोंवऱ्याच्या सांपडती कितिक, भीति ज्यांस वरी ॥ ६ ॥
दहनें भय पावोनी, शलभ जसे गगनिं उंच उडताती ।
जाती नदीपथें तों मागें ज्वाला प्रसार होत अती ॥ ७ ॥
एका ठायीं सपदि स्तोम बघोनी भयें जलीं पडती ।
आज तसे अकिलीसा भिउनी हय जन नदींत हे भरती ॥ ८ ॥
आवर्तवती झान्थस गेली नादें भरोनि सर्वभरी ।
जोव्हज वीर तटावर ठेवित निज शूल तीव्र जो भारी ॥ ९ ॥
तटिंच्या पिचुलांमाजी गेला तो लपुन शूल मग सारा ।
टाकी उडी जलीं नृप घेउनि असि, साम्य पावुनी अमरा ॥ १० ॥
योजी विनाश चित्तीं, सर्व दिशांनीं करी प्रहार तदा ।
करती विलापरव ते, ज्यां झाली जखम दुःसहा भयदा ॥ ११ ॥
दाल्फिन मत्स्य भयंकर, मिळती ते खात सुटत लघु मासे ।
त्यांच्या हातुन सुटती, पळती ते मार्ग धरुन अदमासें ॥ १२ ॥
सुन्दर बंदर शोधिति आश्रय जो, योग्य होय नौकास ।
त्यांत शिरोनी दडती आंतिल विवरांत कठिण समयास ॥ १३ ॥
तैसे सरित्तटांच्या विवरीं त्रोजन लपून अज वसती ।

चालवितां कर्तन जलिं अकिलीसाचे कठोर कर दमती ॥ १४ ॥
ह्मणुनी द्वादश निवडुन नृप धरि जीवन्त त्यांतले तरुण ।
पत्रोक्लशनिधनाचा घेण्यातें सूड बघत निष्करुण ॥ १५ ॥
या नष्टचेतनांला उचली हा जेविं बाल हरिणांस ।
मागें जखडुन बांधी बंदांनीं मग तदीय हस्तांस ॥ १६ ॥
हे बंद बांधलेले होते त्याच्याच चोळण्यालागीं ।
स्वाधीन सोबत्यांच्या त्यांस करी न्यावयास नौभागीं ॥ १७ ॥
आणिक वधाया वीरां गेला धांवोनियां पुन्हा नृपति ।
गांठी लिकाअनाला प्रायमजा तो जलांत शीघ्रगति ॥ १८ ॥
पितयाच्या क्षेत्रांतुन छापा घालून एक रात्रीस ।
नेलें होतें याला अकिलीसें मानितां न विनतीस ॥ १९ ॥
शाखा न्यग्रोधाच्या होता तोडित अरा करायाला ।
अकिलीस तयावरतीं घाली तेव्हां अचिन्त्य परि घाला ॥ २० ॥
नौकांमाजी घालुन विकिलें नेऊन यास लेम्नासीं ।
जेसन तनयें दिधलें यातें त्याच्या अमोल मोलासीं ॥ २१ ॥
सोडवि देउन मूल्या प्राघूर्णक एइशन तया तिथुन ।
आरिस्बीतें धाडी त्यातें बहु वस्तुदान मग करुन ॥ २२ ॥
तेथुन गुप्तपणें तो जनकगृहाला पळोनियां गेला ।
लेम्नासाहुन येतां काळ तयानें सुखांत बहु नेला ॥ २३ ॥
अकरा दिवस जहाले भोगितसे सौख्य मित्रसहवासें ।
बाराव्या दिवशीं असा अरिच्या करिं गावला अनायासें ॥ २४ ॥

हेदीसपुरा याला धाडिल अकिलीस, दैवयोग कसा ! ।
अकिलीसा हा दिसला आतां निस्त्राण वस्त्रहीन तसा ॥ २५ ॥
ढाल करांत न होती, शूलहि फेंकुन दिला असे यानें ।
गात्रें विगलित झालीं, पळतां तनु गेलि भिजुन घर्मानें ॥ २६ ॥
सक्रोध आपल्याशीं बोले आकिलीस " काय हें नवल ! ।
देवांनों ! काय तरी नयनांनीं पाहतों पुढें अचल ॥ २७ ॥
म्यां वधिले त्रोजन ते गाढ तमांतून खास उठतील ।
निर्घृण समया चुकवुन आला हा परत पुरुष दुःशील ॥ २८ ॥
म्यां टाकिलें तयाला होतें नेऊन दूर लेम्नासीं ।
प्रतिबंध करित सकलां, त्या उदधीनें न अडविलें यासीं ! ।
परि ह्मणतों आतां कीं शूलाग्राची बघेल हा चव ती ।
ह्मणजे कळेल येथुन येइल जर परत फिरुन हा जगतीं ॥ ३० ॥
अथवा दिसेल जर ती ठेविल धरणी धरून या जवळ ।
धरिते सफल धरित्री पोटीं प्रबलासही करून बळ " ॥ ३१ ॥
ऐसा विचार करतां राहे हा स्वस्थ तों लिकाँअन तो ।
जानू स्पर्श कराया येतांना जवळ त्यास मग दिसतो ॥ ३२ ॥
दुर्दैवी मरणातें चुकवायाची धरी मनीं आस ।
अकिलीस दीर्घ उचली शूल करीं क्षत तया करायास ॥ ३३ ॥
धांवे खालुन परि हा वांकुन जानूंस गच्च कंवटाळी ।
मांसाशनलोलुप तो शूल वरोनी सरे अशा काळीं ॥ ३४ ॥
भाला भूंत रुते तो, जानूंतें हा धरीत एककरें ।

विनवी वीरालागीं धरुनीयां तीव्र शूल तो इतरें ॥ ३५ ॥
सोडीना, गच्च धरी, प्रार्थितसे यास फार विनयानें ।
" हे अकिलीस! तुझे मीं जानू कवटाळिले बहू मानें ॥ ३६ ॥
तुजला विनवितसें मी; मानावें तें करून आज दया ।
आलों शरण तुला मीं देउं नको मरण मज अशा समया ॥ ३७ ॥
जोव्हाप्रिय! तुजसह मी फल तें सीरीसदत्त चाखियलें ।
जेव्हां क्षेत्रीं मजला बलयोगें धरुनियां तुवां हरिलें ॥ ३८ ॥
नेउन विकिलेंस मला दूर विदेशीं प्रसिद्ध लेम्नासीं ।
मद्विरहा सोसाया पडलें पितयास तेविं मित्रांसीं ॥ ३९ ॥
शंभर वृषभांचें तुज तेव्हां आणून मोल मीं दिधलें ।
आतां व्हाया सुटका तिप्पट देईन मोल जरि पडलें ॥ ४० ॥
त्राया आल्यापासुन आजचि माझी प्रभात बारावी ।
बहु कष्ट काढिले मीं! दैवें कां ही पुन्हां दशा यावी! ॥ ४१ ॥
पडलों करांत तव हा, जोव्ह करी मम खचीत तिटकारा ।
ह्मणुनी त्यानें मजला दिधलें तूझ्या करांत भूपवरा! ॥ ४२ ॥
लाओथोई माझी माता आल्तीसजा जनीं ख्यात ।
लेलीगन वीरांचा नृप हा आल्तीस पूज्य जगतांत ॥ ४३ ॥
संपन्न देश याचा पेदासस सात्निओजलेंसिक्त ।
कन्या वरी तयाची प्रेमें प्रायम नृपाल अतिरिक्त ॥ ४४ ॥
कान्ता अनेक होत्या नृपतीलागीं हिच्या शिवाय तया ।
परि हीच्या पोटीं त्या झाले सुत दोन भिन्न मग समया ॥ ४५ ॥

दोघांलागीं परि तूं दिसतें आतां खचीत वधणार ।
समरशिरीं केलासी शूलाचा पालिदोरसा वार ॥ ४६ ॥
सुरसम वीर असा तो झाला जित, मी असा अलों हातीं ।
मजवरि संकट आलें, विधि मज नेई तुझ्याच जवळ अती ॥४७॥
अणखी गोष्ट तुला मी कथितों दुसरी मनांत ठेव तिला ।
तो शूर सौम्य तूझा मित्र पहा हेक्तरें असे वधिला ॥ ४८ ॥
सोदर मी न तयाचा माता अमुच्या विभिन्न कीं जाण ।
घ्यायास सूड ह्मणुनी माझा घेऊं नको बरें प्राण " ॥ ४९ ॥
प्रायमसुत त्यालागीं प्रणता हे शब्द बोलला कांहीं ।
उत्तर कठिण मिळालें ज्यामाजी सौम्यता मुळीं नाहीं ॥ ९० ॥
"रे मूर्ख ! खण्डणीचें बोलुं नको ! काढणें नको नांव ।
त्रायस्थां न वधावें बहु दिन हा राखिला मनीं भाव ॥ ९१ ॥
नाहीं का कितिकांना धरुनी विकिलें न मारितां वद रे ! ।
चालविलें हें तों मीं पत्रोक्लश दैवहतक जों न मरे ॥ ९२ ॥
परि आतां समजावें त्रोजन जर सांपडे कुणी हातीं ।
दुर्दैव खचित समजें नाहीं टळणार मरण, जें पुढतीं ॥ ९३ ॥
हें स्पष्ट त्यांतुनी कीं प्रायमतनयां क्षमा मुळीं नाहीं ।
+ मित्रा ! मरून जा तूं ! कां रे रडतोस ? अर्थ नच कांहीं ! ॥९४॥

+ नानाप्रकारें दीनवचन करून जीवदान देण्याकरतां अकिलीसाची प्रार्थना लिकाअनानें केली. परंतु ती सर्व व्यर्थ गेली. त्याचा जीव आकिलीसानें घेतलाच ! " अरे ! मी तुझ्या पंक्तीला बसून एकवेळ भोजन केलें

पत्रोक्लश मेला ना ? तूझ्याहुन काय अधिक तो नव्हता ? ।
बघ केवढा असें मीं मोठा सुन्दर पराक्रमी ज्ञाता ॥ ९९ ॥

होतें. एवढ्यानें जो स्नेह संपादित झाला असेल त्याकरतां तरी मला मारूं नको " असें ह्मणून पायीं लागलेल्या **लि**काअनाचा जीव घेण्यापूर्वी त्याला ' **मि**त्रा ' ही पदवी देऊन **अ**किलीसानें अगदीं हृदयविदारक व औपरोधिक भाषण केलें आहे. त्यांत व्याजोक्ति कितितरी भरलेली आहे ! कितितरी तिचें विपरीत लक्षण आहे ! ! खुळा बिचारा **लि**काअन ! अरे ! एकदां पंक्तीला बसून भाकरीचा तुकडा मोडल्यानें का रे कोठें मैत्री संपादन होते ?

याप्रमाणें पतन पावलेल्या वीरास उद्दिष्ट असलेलें वक्रोक्तियुक्त व विनोदात्मक पण फार सरस भाषण **हो**मरनें आणखी थोड्या प्रसङ्गीं विजयानें गर्वित अशा वीराचे तोंडीं घातलेलें आहे. पृष्ठ ३९० आर्या १६९–१७३ पहा. **ओ**थ्रिओन्यूस हा **प्रा**यमाजवळ जाऊन म्हणाला कीं मला जर आपली सुस्वरूप मुलगी **का**सान्द्रा स्त्रीधन घेतल्याशिवाय देशील तर **ग्री**कांस **त्रा**यांतून हांकून लावतों. संकटाचे वेळीं **प्रा**यमानें होय म्हटलें. परंतु **ओ**थ्रिओन्यूस हा **इ**दामिनिअसाचे हस्तें पतन पावला. तेव्हां त्यास उद्देशून **इ**दामिनिअस म्हणतो "शेवटीं तुला **प्रा**यमाची मुलगी मिळाली नाहींच ! **त्रा**याचा नाश तूं अजून करून टाक म्हणजे आम्हीं **प्रा**यमाची मुलगी धरून आणून तुझें लग्न तिच्याशीं लावून देतों. बरें ती नाहीं मिळत तर राहूंदे. आम्हीं आमच्या इथल्या एका भल्या मोठ्या नौकेशीं तुझें लग्न लावून देण्याचा बेत केला आहे. आमच्या अङ्गीही मेव्हण्याचा भलेपणा आहे ! " केवळ स्वतांचें कल्याण करावयाच्या हेतूनें **ओ**थ्रिओन्यूस असत्पक्षीं लढावयास आला म्हणून उपहासास पात्र झाला.

आणखी एक उदाहरण याच मासल्याचें आहे तें पहा. पृष्ठ. ५१५ आर्या. ३६४—३६७

अभिजात तात माझा, देवी माता मला तशी प्रसवे ! ।
परि मृत्यु दैव अथवा माझ्यानें एकही न तें चुकवे ॥ ९६ ॥
रव्युदयीं, मध्याह्नीं, नेम न कांहींच, अस्तमनसमयीं ।
घेईल जीव माझा कोणितरी शस्त्र चालवुन विजयी ॥ ९७ ॥
हाणील शूल अथवा ज्यानिर्गत शर हळूच सोडील " ।
ऐसें हा वदला तों गात्रें झालीं तदीय बहु शिथिल ॥ ९८ ॥
भाला सोडुन देई ! खालीं पसरोनियां करां बसला ।
आकिलीसें असि काढुन केला त्या तीक्ष्ण वार एक भला ॥ ९९ ॥
मानेवरी गलास्थित शिरली जाऊन खोल तलवार ।
वीर पडे हातांचा पायांचा भुवि करोन विस्तार ॥ ६० ॥

हेक्तराच्या रथाचे अश्व त्याचा सूत जो सेब्रिआनीस तो पत्रोक्लशावर हांकून नेत होता. पत्रोक्लशानें त्याच्यावर मोठा दगड जोरानें फेंकिला; त्या-सरसें त्याचें अंग चुरून तो रथाखालीं पाणबुड्याप्रमाणें पडला व मेला. तें पाहून पत्रोक्लश म्हणतो. "अरे वा ! हा तर अट्टल पोंहणारा आहे ! पहा ! पहा ! कशा बुड्या मारीत आहे ! महासागराच्या तळीं बुडून हा मोत्यें काढता व पुष्कळांस खूष करता ! मला वाटतें हें त्रोजनदल अशाच पाणबुड्यांनीं भरलेलें असावें".

सारथिनें रक्षावा स्वरथीं, राजा जसा अमात्यानें ।

या कर्णपर्वांतील आर्येंत सांगितलें आहे त्याप्रमाणें आपलें कर्तव्य करीत असतां जो सारथि मृत्यु पावला त्याची निर्भर्त्सना पत्रोक्लशासारख्या वीरांनीं करावी कीं नये हें चिंत्य आहे. तथापि रण हें मदकारक आहे. व विजयी वीरांस तर अधीकच आहे. हेंही लक्षांत घेतलें पाहिजे.

रुधिर गळालें खालीं तेणें भूभाग बहुत तो भिजला।
अकिलीसानें तो मग धरुन पदीं नदिंत फेंकुनी दिधला ॥ ६१ ॥
इच्छा कीं वाहुन तो जावा खालीं बराच वेगानें।
बोले लागुन त्याला कांहीं मग वचन फार गर्वानें ॥ ६२ ॥
"तेथ रहा मत्स्यांशीं शोपुनियां क्षत पितील जे रुधिरा।
माता रडेल नच तव शवयानीं ठेउनी तुला रुचिरा ॥ ६३ ॥
सावर्त स्कामन्दर नेइल तुज सागरोदरालागीं।
वीचींतुनी उडोनी जाइल कुणि शफर विमलतलभागीं ॥ ६४ ॥
ह्मणजे लिकाअनाची शुभ्रवसा खावया मिळेल तया।
त्रोजन हो! आज मरा! जों नाहीं पोंचलां तुह्मीं त्राया ॥ ६५ ॥
तुह्मीं पुढें पळा हो! मागुनियां चालवीन कर्तन मीं।
रजतमयावर्तें जी शोभे तटिनी न ती मुळीच कमी ॥ ६६ ॥
गोबळि तुह्मीं तिजला आजवरी देत नाहिं का आलां?।
दृढशफहयही पुष्कळ आवर्तीं लोटिलेत समयाला ॥ ६७ ॥
तरिही अशाप्रकारें येइल दुर्वृत्त मरण तुह्मांला।
पत्रोक्लशमरणाचा द्यावा लागेल पूर्ण मोबदला ॥ ६८ ॥
ग्रीकांचें नाहीं का कर्तन केलेंत खूप नौभागीं।
केलेंत कर्म अनुचित नसतां मी तेथ अडविण्यालागीं" ॥ ६९ ॥
ऐसें तो वदला मग राग नदीला बराच हृदयिं अला।
विचरे " अकिलीस कसा देइल सोडोनियां स्वयत्नांला ॥ ७० ॥
ह्मणजे त्रायस्थांचा सहजीं येईल चुकवितां नाश "।

अकिलीस शूल करिं मग घेई उचलून बघुन अवकाश ॥ ७१ ॥
पेलीगनतनयावर आस्तीरोपीअसावरी धांवे ।
मूळ कुळाचें ज्याच्या आक्सिअसाशीं खरोखरी गावे ॥ ७२ ॥
आसीसामीनसजा ज्येष्ठा सद्बुंध पेरिबीआ जी ।
तीसह सावर्त तदा झाला रममाण नद सुखामाजी ॥ ७३ ॥
त्याच्या कुलजावर अज धांवे अकिलीस त्या वधायास ।
वरतिं जलाच्या येउन तरुण उभा ठाकला लढायास ॥ ७४ ॥
करिं दोन शूल तो धरि, धैर्य दिलें झान्थसें तया फार ।
कोपे कीं अकिलीसें मारियले तरुण वीर अनिवार ॥ ७५ ॥
पळतां जलांत मारुनि, नाहीं केली दया तयांवरतिं ।
दोघे आले जवळी तेव्हां अकिलीस वदत तूर्णगति ॥ ७६ ॥
" कोण कुठिल पुरुष तूं कीं तूं मजसीं लढावया धजसी ? ।
मद्बल विरोध करती ते झाले पुत्र मंदभाग्यासीं " ॥ ७७ ॥
पेलीगनज तयाला बोले अभिजात " पेलिअसतनया !
कुल माझें पुसशी तूं ? आलों मी दुरुन येथ रणसमया ॥ ७८ ॥
पीओनिआ सफल बहु माझी जाणें निवासभू दूर ।
सेना तेथिल अणिली वीरांची शूलधर इथें शूर ॥ ७९ ॥
त्राया आल्याला मज आहे अजची प्रभात अकरावी ।
आक्सिअसापासोनी माझी उत्पत्ति थोर समजावी ॥ ८० ॥
ओती जो धरणीवर पाण्याचा ओघ फार सुन्दर तो ।
त्याच्याच पोटचा सुत पेलीगन तात शूलधर मम तो ॥ ८१ ॥

परि आतां अकिलीसा ! अभिजाता ! ये करूं जरा समर " ।
वाक्य बिभीषक ऐसें परिसुन अकिलीस शूल उचलि वर ॥ ८२ ॥
आस्तीरोपीअस तो होता परि उभयहस्तकुशल खरा ।
उचलुन दोन्ही भाले नेम धरी तो वधावया नृवरा ॥ ८३ ॥
ढालीवर एकातें मारी परि पूर्ण ती नसे फुटली ।
हेमानें वांचविली. अमराची देणगी कशी न भली ? ॥ ८४ ॥
दुसऱ्यानें हाणोनी कोंपर उजवें करीतसे क्षत तें ।
बाहेर काळसर मग आलें बहु रुधिर धरुन वेगातें ॥ ८५ ॥
अरिदेहभक्षणोत्सुक वरुनी धरणींत रुतत परि भाला ।
अकिलीस करित शूलें आस्तीरोपीअसावरी घाला ॥ ८६ ॥
इच्छित तया वधाया चुकुनी परि शूल उच्च तटिं रुतत ।
काढुन असितें, तुटुनी अरिवरतीं पेलिअसज हा पडत ॥ ८७ ॥
अकिलीसाचा पाहे दृढहस्तें शूल शत्रु उपटाया ।
हलवीत तीन वेळां गेले परि सर्व यत्न ते वायां ॥ ८८ ॥
चवथ्यानें वांकोनी निश्चय उपटावया पुन्हां करि तो ।
अकिलीस जवळुनी परि असिघातें जीव सत्वरी हरि तो ८९ ॥
नाभीशीं उदरावर हाणियलें शस्त्र एकवार तयें ।
भूवर अंत्रें पडलीं आला अंधेर नयनिं मृत्युभयें ॥ ९० ॥
जातां जीव तयाचा बसत उरावरतिं वीर अकिलीस ।
शस्त्रां हरुनी बोले करुनी ऐसा सगर्व उक्तीस ॥ ९१ ॥
" पडुन असा तूं राहीं नदजा ! रण कठिण जोव्हजा सह रे ! ।

त्वज्जनक दीर्घ नद तर जोव्हकुलीं जनन हो मदीय बरें ॥ ९२ ॥
ईआकसजें मजला जन्म दिला मिर्मिदननृपें पाहें ।
त्यातें जोव्हें दिधला, थोर नदांहून जो प्रबल आहे ॥ ९३ ॥
आहे जवळी तूझ्या निर्झरिणी रक्षणार्थ शक्य तरी ।
सॅतर्नज जोव्हाशीं लढणें तिज सर्वथा अयोग्य परी ॥ ९४ ॥
आचीलोअस नृप तो स्पर्धा त्यासह कधीं न रणिं करित ।
तो ओशिअनस मोठा याच्या पुढतीं मुळीं नसे टिकत ॥ ९५ ॥
उदधींचा व नद्यांचा, वापींचा, सर्व निर्झरांचा तो ।
असुनी उगम, तयाच्या शक्तीचा योग फुकट कीं जातो ॥ ९६ ॥
घनगर्जन जोव्हाचें ऐसें तें वज्र त्यास धाक भरी " ।
ऐसें वदुनी तेणें उपटुनियां शूल घेतला स्वकरीं ॥ ९७ ॥
जीव तयाचा हरुनी टाकि तिथें वाळवेंत वीरास ।
श्यामल जल मग त्यातें वाहुनियां नेत त्या सुमारास ॥ ९८ ॥
जमले भोंवतिं त्याच्या उद्यमरत मीन आणि जलव्याल ।
अल्पांशें चाखोनी खाती तन्मूत्रपिंड बहुकाल ॥ ९९ ॥
पीओनिअन स्वारांवर मग अकिलीस घेतसे धांव ।
सावर्तनदीमार्गें पळण्याची ज्यांस सुटलि बहु हांव ॥ १०० ॥
कारण अकिलीसानें शूरोत्तम भूप मारिला यांचा ।
संग्रामीं त्या गावे वार असीचा बराच जोराचा ॥ १०१ ॥
मग थर्सिलोकसाला, मिदनाला, आस्तिपैलसाला तो ।
ओफीलेस्तीसाला, ईनियुसाला व नेससाला तो ॥ १०२ ॥

थ्रेसिअसाला तेवीं सर्वांला वधित चपल आकिलीस ।
दुसऱ्या पीओनिअनां वधिलें असतें तसेंच भरतीस ॥ १०३ ॥
पाहुनियां हें परि तीला राग नदीला बराच मग आला ।
आवर्तमुखें बोले धरुन नराच्या क्षणांत रूपाला ॥ १०४ ॥
"आकिलीस ! अधिक बल तव, परि तूं कृति करिशि अधिक अनुचित रे! ।
करिती स्वतां तुला ते समरीं साहाय्य देव हेंच खरें ॥ १०५ ॥
सॅतर्नजें तुला या त्रायस्थां मारण्यास नेमियलें ।
तर आज जलांतुन त्यां काढुनियां पाहिजे तुवां वधिलें ॥ १०६ ॥
अमितशवांनीं माझे गेले जलमार्ग बुझुनियां सारे ।
उघड्या विस्तृत भूवर दुष्कर साहस न दाखविशि कां रे ? ॥ १०७ ॥
चोंदुनियां ते जातां सागरिं जल केविं सांग ओतावें ।
कर्तन करिशी क्रोधें त्यातें परिमित मुळीं न का व्हावें ॥ १०८ ॥
परि ये थांब जरासा जाउं बघे शुद्धि मम नृपा पाहें " ।
उत्तर देतां यावर भाषण अकिलीस करित आतां हें ॥ १०९ ॥
" स्कामन्दर निर्झरिणि ! इच्छित तव जोव्हजे ! घडेल खरें ।
त्रायस्थांनीं आपण होउनि तह मोडिला न काय बरें ! ॥ ११० ॥
त्यांचें करीन कर्तन जों मी नच कोंडिलें पुरांत तयां ।
जों मीं न हेक्तराची नीट परीक्षा बघीतली समया ॥ १११ ॥
× मारिन, मरेन अथ तों नीट समूरा समूर राहून " ।

× तें मारतील मज कीं त्यांला मारीन मीं; स्वबळ जाणें । मोरोपंत.
अहंवास्यरणे मृत्युरेषवा समरे मम । त्रिशिराराक्षसाचें भाषण.
अरावणमरामं वा जगद्रक्ष्यथ वानराः । रामाचें भाषण. रामायण.

ऐसें वदुनी घुसला त्रायस्थांवरतिं राग आणून ॥ ११२ ॥
सावर्त स्कामंदर वदत अपालोस " जोव्हजा ! पाहें ।
हा ! धिक् ! रौप्यधनुष्का ! जोव्हाज्ञा त्वां न पाळिली कां हे ? ॥११३॥
त्यानें तुजला कथिलें त्रायस्थां हो सहाय तों आज ।
रव्यस्त जों न झाला भूवर जों पसरलें न तम सहज " ॥ ११४ ॥
ऐसें हा वदतांना होता अकिलीस जो तटावरतीं ।
मारी उडी जलीं तो मोठा विख्यात शूलकुशल अती ॥ ११५ ॥
घुसाळि पुढें निर्झरिणी, आला तिस पूर, होत कलुष जल ।
कल्लोल बहुत उठले ! झाले संक्षुब्ध तेहि अज सकल ॥ ११६ ॥
अकिलीसकरहतांच्या राशी नेल्या अनेक ढकलून ।
उभयतटीं राशी त्या वृषसम गर्जून देइ फेंकून ॥ ११७ ॥
परि जे त्रोजन होते उरले जीवन्त, त्यांस विवरांत ।
ठेवोनी रक्षितसे अणि अकिलीसास घालि धोक्यांत ॥ ११८ ॥
त्यातें तरंग वेष्टिति ढालीवर उसळलें अशंक जल ।
त्रास तयाला झाला राही तत्पद न भूमिवर अचल ॥ ११९ ॥
वृक्ष प्रवृद्ध होता तेथें परि एक उंच एल्माचा ।
त्यातें करीं धरी हा तों तो उपटे समूळ परि साचा ॥ १२० ॥
कोसळला तट सारा, शाखांनीं ओघ अडवुनी धरिला ।
तरु आडवा पडे तो कुणि तरि जणुं सेतुबंध हा रचिला ॥ १२१ ॥
त्यावरुनी समभूतें गांठाया धांव घेत अकिलीस ।
उचली पाउल सत्वर हृदयीं कांहीं धरून भीतीस ॥ १२२ ॥

बलवन्त सुर न थांबे; मागोनी ऊर्मि भिववि त्या काळीं।
त्रोजन नाश चुको अणि भूप बसो स्वस्थ हेतु हा पाळी ॥ १२३ ॥
भाला जितका जातो दूर बळें करुन फेंकिला असतां।
तितकें अंतर तोडी आतां अकिलीस पद पुढें पडतां ॥ १२४ ॥
वेग तयाचा होता जितका तो नित्य कृष्ण गरुडाचा।
जो प्रबल शकुनघाती, सर्वांच्याही पुढें उडायाचा ॥ १२५ ॥
तैसा हा अजि धांवे वाजतसे कवच खणखणां भयद।
सरके तिरपा वळुनी, जल जाई जेथ भूप ठेवि पद ॥ १२६ ॥
भूपाची पाठ धरी निर्झरिणी गर्जना प्रचण्ड करी।
मालाकार कुणी तो दांडे भूमींत खणुन सर्व भरी ॥ १२७ ॥
त्यांतून निर्झराचें आणुन लावीत पाणि शेताला।
सुखवीत सिंचुनी जल उद्यानांतील वृक्षरोपांला ॥ १२८ ॥
करिं पावडें धरोनी व्हायातें पथ जलास भू उकरी।
टाकी काढुन कांहीं मध्यें पडुनी जलौघ अडवि, तरी ॥ १२९ ॥
वाहे प्रवाह वेगें, तळिंच्या संक्षुब्ध होति त्या गारा।
घसरे उतरणिवरुनी, जल्पक रव उठत मंदमंद बरा ॥ १३० ॥
मार्ग न केला तों जल धांवे होउन जसें अनावर तें।
अकिलीसातें गांठुन ओघानें जल तसें पुढें सरतें ॥ १३१ ॥
मर्त्य मनुष्याहूनी असताती प्रबलतर सदा अमर।
अकिलीस चपलपद तो पाहतसे आटपेल ओघ जर ॥ १३२ ॥
किंवा शकतिल जर त्या स्वर्गीतिल सर्व अमर पळवाया।

तों दीर्घ वीचि उठती तत्स्कंधा स्पर्शण्यास नच वायां ॥१३३॥
उद्विग्नचित्त भूपति पायांनीं तो पुढें उड्या मारी ।
जोव्हजनद्युमींनीं तज्जानू अन्ति दमविले भारी ॥ १३४ ॥
पायां खालिल लागे वाळु सराया जशीं पदें टाकी ।
तेव्हां आकिलीस वरी पाहुन करुणा विनम्र आशि भाकी ॥ १३५ ॥
" हे तात! जोव्ह! आतां बुडतों मीं या कठीण समयास ।
वांचविना सुर कोणी एकहि मज आज दैवहीनास ! ॥ १३६ ॥
याच्याशिवाय दुसऱ्या कसल्याही संकटास सोशीन ।
स्वर्गीं असतीं जीं कुणि मातेसम त्यांत अन्य दोषी न ॥ १३७ ॥
' फीबसाविसृष्टबाणें त्रायतटाखालतीं तुझें मरण ' !
मिथ्या ऐसें कथुनी आश्वासन मज दिलें तिनें कृपण ॥ १३८ ॥
फार बरें शूरातिल शूरें जर हेक्तरें अतां वधिलें ।
*शूरा शूरें वधिलें ! युक्ताचि सर्वस्व समरिं जरि हरिलें ! ॥१३९॥
परि आतां निश्चित कीं येइल मज मरण अपयशास्कर तें ।
पोर गुराख्याचें जणुं वाहुन ओघांत बुडुनियां मरतें ! " ॥ १४० ॥
ऐसें तो वदला मग आलीं नेप्चून आणि मिनर्वा तीं ।
नररूपांतें धरुनी प्रेमें येउन धरीत त्या हातीं ॥ १४१ ॥
धीर तयातें द्याया बोले नेप्चून भूमिकंपक तो ।
" हे पेलिअसज नलगे भय, विस्मय वा उगाच मी ह्मणतों ॥१४२॥

---

* याच्या तोडीची खऱ्या वीराच्या बाण्याला शोभेल अशी आजक्षाची एक जोव्हास प्रार्थना आहे ती पहा पृ० ५५१ आर्या. ३०९.

प्रबल सुरांतुन आह्मीं आलों तूझे सहाय हे प्रबल ।
जोव्हाच्या संमतिनें मीं व मिनर्वा अलों न हें विफल ॥ १४३ ॥
हरवावें तुज ऐसें नाहीं ठरलें दिसे अह्मां उघड ।
बघशील तूंच कीं हें निसरुन जल अल्पहि न उरेल नड ॥१४४॥
सुचना एक करितसें दृष्टी देऊन आज परिणामीं ।
जीवविनाशक समरा सोडुं नको ऐक गोष्ट ही नामी ॥ १४५ ॥
नगरतटांत अरीच्या उरलेल्या कोंड आज सैन्याला ।
हेक्तरवध करुनी जा नौभागा, विजय तुज अह्मीं दिधला" ॥१४६॥
ऐसें तीं बोलोनी गेलीं परतून फिरुन अमरांशीं ।
ईशाज्ञाप्रेरित हा गेला चालून फिरुन समराशीं ॥ १४७ ॥
जिकडे पहाल तिकडे होती रणभूमि सर्व जलमय ती ।
वाहति कवचें सुन्दर; तरुणांचीं हीं शवें किती तरती ! ॥ १४८ ॥
जानूंत मिनर्वेनें याच्या भरलें असे अगाध बल ।
ह्मणुनी समुरी पाहे जल त्या हा तोडुनी निघे चपल ॥ १४९ ॥
स्कामन्दर अशिथिलबल अकिलीसावरतिं होउनी कुपित ।
जलवृद्धि करुन बोले, हेतु चिढावी सिमोइस त्वरित ॥ १५० ॥
" प्रियभगिनि ! आज आपण अमरांनीं मानवास अडवुं चल ।
प्रायम नगरीचा हा करिल अजी नाश भूप कीं प्रबल ॥ १५१ ॥
त्रोजन त्यातें समरीं कांहींही अडथळा न करतात ।
साहाय्य मज करावें आणावा पूर अल्प कालांत ॥ १५२ ॥
साऱ्या झऱ्यांस फुगवुनि उठवावी दीर्घ लाट अज वरतीं ।

वृक्षांचा दगडांचा उडवुन संक्षोभ दे क्षणांत अती ॥ १९३ ॥
ह्मणजे या उन्मत्ता वेगें प्रतिबंध ये करूं कांहीं ।
विजयी नृप तो करि कृति अजवर जी केलि थोर अमरांहीं ॥१९४॥
वाटे तया न राखिल त्याचें बल तें तशीच सुन्दरता ।
तीं शोभिवन्त कवचें पंकीं रुततील विवरतालिं आतां ॥ १९५ ॥
मीं वाळवेंत याला गाडिन यावरतिं गाळ ओतून ।
पंकीं रुततां त्याच्या ग्रीकां मिळतिल न अस्थि शोधून ॥ १९६ ॥
थडगें तेंच तयाचें, बांधाया काय गरज तें अन्य ।
उत्तरकार्य तयाचें करतिल हे ग्रीक जेधवां धन्य " ॥ १९७ ॥
ऐसें वदुनी गर्जुन अकिलीसावरतिं धांव ती मारी ।
रास शवांची उडवी त्यावरतीं फेन रुधिरमय मारी ॥ १९८ ॥
लोहित वारि नदीचें चढलें तत्काल जोव्हजेचें तें ।
वेष्टीत पेलिअसजा; जूनोचें हृदय बघुन हें चेते ॥ १९९ ॥
आरडली मोठ्यांनीं, अकिलीसाविषयिं वाटली भीति ।
नेइल एकादी त्या वाहुन! ही खोल तरि असेल किति! ॥ १६० ॥
प्रियपुत्रातें बोले तत्कालीं व्हल्कनास " उठ तनय!
व्हल्कन! बरोबरीची तूं अणि झान्थस रणांत कष्टमय ॥ १६१ ॥
साहाय्य तूं करोनी दाखव अपुली पराक्रमज्वाला ।
उठवीन नोतसाच्या झेफिरसाच्या प्रचण्ड वाताला ॥ १६२ ॥
ह्मणजे अनल विनाशक कटकीं अरिच्या भयाण पसरून ।
त्रायस्थांचीं कवचें आणि शिरें भस्म करिल जाळून ॥ १६३ ॥

झान्थसतटिंचीं झाडें जावोनी शीघ्र आधिं जाळ करीं ।
जळतांना त्यां फेंकीं त्याच्या अंगावरी क्षणांत तशीं ॥ १६४ ॥
देईं न दाद तयाच्या विनतीला वा बिभीषका वचना ।
घेईं न आंवरोनी आधीं अपुल्या उगाच कीं ज्वलना ॥ १६५ ॥
परि मीं करीन अरडुन खूण तदा अंवर दाहबल तव तें "।
ऐसें ती वदली तों व्हल्कन, निज तेज दाखवी नुकतें ॥ १६६ ॥
पहिल्यानें समरांगाणिं लावुनियां आग ती शवें भाजी ।
अकिलीसानें होतीं वीरवधें पसरिलीं तिथें ताजीं ॥ १६७ ॥
सुकुन रणांगण गेलें जळ लागे आटुनी अतां जाया ।
जैसा शरदृतूंतिल वारा सुकवीत सर्वभू समया ॥ १६८ ॥
जेणें थोर मळ्याच्या स्वामिस आनंद होतसे फार ।
तैशीं शवें जळुनियां संगर नयनांस होत तुष्टिकर ॥ १६९ ॥
*नंतर त्यानें अपुल्या ज्वाला त्या चढविल्या नदीवरतीं ।

---

* नंतर त्यानें अपुल्या ज्वाला त्या चढविल्या नदीवरतीं ।
बोरूंची बेटें मग भक्ष्यस्थानीं समग्र तीं पडती ॥ १ ॥
प्रसरणशील ज्वाला कांठांनीं धांव घेति कुटिलगति ।
जळतात वृक्षराजी, राखेच्या राशि पुढतिं बहु उठति ॥ २ ॥
आतां प्रफुल्ल कमलें पिचुल अणी दग्ध जाहलीं सारीं ।
सैप्रस, एल्म न उरलीं होतीं चक्राकृती तिथें भारी ॥ ३ ॥
प्रियजल थोर लवाळे अग्निंत पडतांच करिति सीत्कार ।
मग वीचि पेट घेति टाकिति धांपा असंख्य ते शफर ॥ ४ ॥

एल्मतरू व लवाळे, पिचुल तसे जळुन सर्व ही जाती ॥ १७० ॥
कमळें दग्ध जहालीं ! बोरू अणि विविधजाति तृण इतर !
निर्झरिणीतटिं होतीं रुजलेलीं जीं सुरम्य चित्तहर ॥ १७१ ॥
मीन व्याल जलींचे होवोनी त्रस्त संभ्रमें पळत ।
आवर्तीं व जलौघीं होते अवगाह करित जे सतत ॥ १७२ ॥
श्रान्त खरोखर झाले व्हल्कननिश्वास लागतां त्यांस ।
पोळे तटिनीचें बळ, ती लागे त्या असें वदायास ॥ १७३ ॥
" तुजशीं अमर न कोणी व्हल्कन ! हे ! कधिं बरोबरी करिल ।
अग्निमयाशीं तुजशीं मी कधिं झगडेन वाक्य हें विफल ॥ १७४ ॥
सोडून विग्रहा दे ! अकिलीसा हांकुदे ट्रोजनांस ।
मजला भांडण नलगे किंवा व्हाया सहाय कोणास " ॥ १७५ ॥
ऐसें ती वदली तों गेली होती बरीच पोळून ।
सुन्दर निर्झर तीचे होते ते कढत ऊन होऊन ॥ १७६ ॥

पिळवटले व्याल तसे होती त्यां मरणवेदना फार ।
उडति वरी, बुडति जलीं, खवल्यांचे क्षुद्र मत्स्य बहुवार ॥ ५ ॥
अथवा तडफडताती, पोटें वरतीं करोनियां पडती ।
ऐसें होतां होतां तटिनी आम्लान मुख करी वरतीं ॥ ६ ॥
धांपा टाकीत वदे भक्षक अमरास फार नम्रपणें ।
" हे व्हल्कन ! तूझ्याशीं शक्य नसे रे कुणास कधिं लढणें ॥ ७ ॥
मूर्च्छित झाल्यें ! पडल्यें ! युद्ध न झेंपे ! अल्यें तुला शरण ! ।
ट्राय पडो ! दैव तसें ! दाहक शस्त्रांस अंवर आज पण ॥ ८ ॥

पोप.

कढई खालीं होतो जाळ जसा तीस येइ शीघ्र कड ।
करि पुष्ट सूकराच्या आंत वसेला शिजावयास नड ॥ १७७ ॥
शुष्केन्धन अधिक जळे अधिकाचि तों ऊत येत सर्व भरी ।
कड ये जला तसा उत अङ्गा लागून उष्णता भारी ॥ १७८ ॥
जाती निर्झर आटुन वाहुं शकेना पुढें नदी साच ।
गेली निरुद्ध होउन, वाफेचा ताप भयद करि जांच ॥ १७९ ॥
व्हल्कनबल ऊर्जस्वल तिजला ऐसें अनेकधा नडलें ।
जूनोतें शीघ्र अतां विनवी योजून नम्र शब्द भले ॥ १८० ॥
" हे जूनो ! तव सुत कां माझ्या हा निर्झरांस वद छळतो ? ।
इतरांहुन अधिक मला त्या योगें त्रास केवढा पडतो ॥ १८१ ॥
त्रायस्थांतें करिती बहु जे साहाय्य अमितबल अमर ।
त्यांहून काय झाल्यें दोषी मी अधिक ? सांग होय तर ॥ १८२ ॥
आज्ञा करशिल तूं तर मीही सरत्यें रणांतुनीं मागें ।
मग अपुल्या तनयातें छळ माझा थांबवावया सांगें ॥ १८३ ॥
आणी कथितां घेत्यें शपथ अशी कीं पुढें कधीं फिरुनी ।
त्रायस्थांवरचें मी संकट टाळावया न अणिन मनीं ॥ १८४ ॥
सगळें त्राय जरी तें पेटे लागून आग भयद तरी ।
ग्रीकांनीं त्यालागीं नासावें ! भीति मी मुळीं न धरीं " ॥ १८५ ॥
धवलकरा जूनो हें ऐकुन वच लागलेंच कथि तनया ।
"प्रियतनय! हस्त अंवरीं व्हल्कन हे! योग्य हें अशा समया ॥१८६॥
मर्त्य मनुष्यांकरतां छळणें अनुचित निरर्थ अमरांस " ।

ऐसें ती वदली तों व्हल्कन शमवीत अग्निदाहास ॥ १८७ ॥
वारि झऱ्यांचें झुळझुळु वाहाया लागलें अतां विमल ।
आणि थोर झान्थसाचें जित झालें समरिंचें प्रचण्ड बल ॥ १८८ ॥
स्वास्थ्य मिळे या दोघां जूनोनें राग आंवरुन धरिला ।
इतर सुरांमाजी परि दुःखावह कलह जुळुनियां आला ॥ १८९ ॥
त्यांचीं मनें न जुळती कल झाला अज विरुद्ध सर्वांचा ।
संक्षुब्ध युद्ध करती भरला पृथ्वींत नाद कलहाचा ॥ १९० ॥
स्वर्गास मात गेली, झालें आकाशही प्रतिध्वान्त ।
पाहुन हें जोव्हाच्या आनंदाला दिसे न मुळिं अन्त ॥ १९१ ॥
कोणी न अमर कोपन बसले समरांत दूर दूर तदा ।
मार्स मिनर्वेवरतीं धांवत जाऊन उक्ति करि भयदा ॥ १९२ ॥
" अमरांच्या कलहीं तूं कांगे पडतेस सांग अविनीते ! ।
किति धृष्ट होसि आतां धडपडतो जीव कां असा कथिं तें ॥ १९३ ॥
मजसीं माराया त्वां दायोमीदास उठविलें! स्मरसी ? ।
काय न मजवरतीं तूं हस्तानें शूल लावुन दिलासी ? ॥ १९४ ॥
मन्मांस रुचिर तेणें काढियलें ओरखाडुनी भारी ।
त्याची हानि भरोनी काढाया दण्ड तुजसिं आज करीं " ॥ १९५ ॥
ऐसें वदुनी तेणें तिजवरतीं फेंकिला असे भाला ।
त्या ईजिसावरी परि त्याचा तो घाव लागता झाला ॥ १९६ ॥
जोव्हाचें वज्रचि तें, होतें जें कीं अभेद्य आजवरी ।
त्यावर मार्साचा हा लागतसे शूल रुधिरसिक्त परी ॥ १९७ ॥

मागें सरुनी तीनें समभूच्या वरिल दगड उचलीला ।
काळे विशाळ असले शेतांच्या असत पूर्वि सांधीला ॥ १९८ ॥
मानेवर दगड असा मार्साच्या मारिला तिनें आतां ।
गात्रें विगलित झालीं व्यापि बिघे सात मार्स रणिं पडतां ॥१९९॥
मळले केश तयाचे, धूळिंत तत्कवच पडुन खणखणलें ।
ह्मणुन मिनर्वा हंसुनी बोले त्या वचन हें सदर्प भलें ॥ २०० ॥
" मूर्खा ! तुला न कळला अधिक बलाचा कसा मला गर्व ।
माझ्या शक्तीशीं कां अपुली तूं शक्ति लढविसी सर्व ? ॥ २०१ ॥
मातेची एरिन्निस वाइट तव जी करावया टपत ।
तीचें कार्य करविशी माझ्या हस्तें पहा अकस्मात ॥ २०२ ॥
राग तियेला आला ग्रीकां त्वां सोडिलें प्रसङ्गाला ।
साहाय्य त्रायस्थां करिशी, जरि ते न मानिति तहाला " ॥ २०३ ॥
ऐसें बोलुन तीनें फिरवुनियां घेतले ज्वलन्नयन ।
जोव्हसुता व्हीनस त्या धरुन करें दूर करितसे गमन ॥ २०४ ॥
कण्हतां वरचेवर बहु आयासें येतसे तया तकवा ।
तत्काल मिनर्वेला वदली जूनो बघून रंग नवा ॥ २०५ ॥
" हा धिक् ! ती गे फिरुनी ईजिसधर जोव्हसंभवे ! पाहें ।
जीवध्वंसक मार्सा नेत रणांतून दूर ही आहे ॥ २०६ ॥
पाठ हिची जा धर तूं उद्धत आहे खरीच ही जगतीं " ।
ऐसें ती वदली मग गेली मागुन मुदें मिनर्वा ती ॥ २०७ ॥
घेउन उडी तियेवर हाणी मुष्टी तिच्या उरावरतीं ।

जानू तिचे गळाले झालें तद्धृदय धैर्यहीन अती ॥ २०८ ॥
फलद धरित्री वरतीं दोघेजण पडुन राहिलीं आतां ।
वाक्यें तीक्ष्ण अशीं मग बोले ती गर्व यामुळें करतां ॥ २०९ ॥
" करण्या विरोध मजसीं मार्स अला, त्या सहाय होण्यास ।
आली व्हीनस निर्भय! तितके त्रायस्थमित्र कां नसत ? ॥ २१० ॥
ग्रीकांशीं लढतांना असतें इतकेंच धैर्य जर त्यांचें ।
फार बरें मग होतें ! आटपतें कार्य कधिंच समराचें ! ॥ २११ ॥
सुघटित नगरी इलियम आह्मी केव्हांच नाशिली असती " ।
ऐसें ती वदली मग जूनो हंसली दुरून मंदगती ॥ २१२ ॥
बोलत धरणीकंपक तेथ अपालोस " आज फीबस रे !
आह्मींच दूर कां रे ! अनुचित हें ! मिसळतां रणीं दुसरे ! ॥२१३॥
पित्तलमय भूमीच्या जोव्हाच्या मंदिरा कसें जावें ! ।
गेलों जर लढल्याविण लज्जास्पद रे ! कसें न हें व्हावें! ॥ २१४ ॥
आरंभ तूं करावा ! जन्मानें तूं लहान मजहून ।
वडिलास उचित हें नच बसल्यें मी जर बरेंच अनुभवुन ॥ २१५ ॥
मूर्ख खरा दिसतोसी ! तूझें निर्बुद्धि वाटतें हृदय ।
बहु कष्ट काढिले या इलियमिं तो विसरशी कसा समय ॥ २१६ ॥
जोव्हाकडुनी आलों लाओमीदननृपाकडे जेव्हां ।
वेतन ठरवुन खपलों; होता का अमर अन्य वद तेव्हां ॥ २१७ ॥
नृप देखरेख करितां बांधुनियां सतट एक ती नगरी ।
त्रायस्थांतें दिधली, विस्तृत, सुन्दर, अभेद्य केविं तरी ॥ २१८ ॥

हे फीबस ! तेव्हां तूं नाहीं का वृषभ राखिले त्याचे ! ।
धरणीतला पदांनीं होते ताडीत वक्रशृंगांचे ॥ २१९ ॥
थोर तृणावृतभागीं बहुत दऱ्यांतून त्या इदाद्रिवरी ।
त्यांतें चरावयातें नेलेंसी त्वां कितकि वेळ तरी ॥ २२० ॥
घटकांनीं आणियली मागुनियां वेळ जों पगाराची ।
लाओमीदन भूपें धरिली तों रीत शुद्ध कपटाची ॥ २२१ ॥
' देईन घालवोनी' घालुन भय हें पगार बुडवीला ।
आणि 'हात पाय बांधुन' वदला ' नेईन दूर विक्रीला ' ॥ २२२ ॥
'पित्तलमय शस्त्रांनीं दोघांचे कान खचित कापीन ' ।
आह्मीं परतुन आलों निरुपायें, क्रुद्ध असुनही दीन ॥ २२३ ॥
बक्षिस देऊं केलें! मोडियलें वचन! राग बहु आला ।
त्या करतां का तूं अज, करतोसी तुष्ट दुष्ट लोकांला ? ॥ २२४ ॥
आह्मांसह नच झटसी त्रायस्थांतें समूळ नासाया ।
मोडिति तह जे त्यांची पोरें कान्ता विनीत माराया " ॥ २२५ ॥
दूरक्षेपक फीबस बोले या परत "भूप ! नेप्चून ! ।
सुज्ञ न ह्मणशील मला तुजसह जर झगडलों अतां झटुन ॥ २२६ ॥
आणी ' ह्मणशिल तें कां? ' तर सारें मर्त्य मानवां करतां ।
पर्णासम भर येतो ज्यांलागीं एकवार खाद्यरतां ॥ २२७ ॥
ज्यांतें पुन्हां बघावें तों अपुले विगतजीव आढळती ! ।
साधें तितुकें सत्वर, सोडूं हें युद्ध दुःखदायि अती ॥ २२८ ॥
घेतील अन्त करुनी भांडुनियां आपसांत मानव ते " ।

ऐसें वदुनी, फीबस मार्गें जायास तत्क्षणीं परते ॥ २२९ ॥
भ्याला हा काकाशीं करण्यातें दोन हात राणि हळुची ।
बोले यातें भगिनी दायाना स्वामिनी वनीं पशुंची २३० ॥
" दूरक्षेपक ! पळशी नेप्चूना विजय पूर्ण कां देशी ।
यश झालें सुलभ तया, मूर्खा ! धनु फुकट हातिं धरिलेंशी ॥ २३१ ॥
कानीं पडेल फिरुन न गर्वाचें तातमंदिरीं वचन ।
अमरां जें विदित पुरा 'नेप्चूना हार जाशिल कदा न' " ॥ २३२ ॥
ऐसें ती वदली परि उत्तर फीबस तिला मुळीं न करी ।
जोव्हाप्रियेस ठाउक शरसंधांनीं तियेस तुष्टि खरी ॥ २३३ ॥
ह्मणुनी तिजलागीं ही बोले लागून "काय दैवहते ! ।
धीट अशी तूं होसी माझ्याशीं समरिं आज लढण्यातें ॥ २३४ ॥
चापधरा तूं असशी माझ्याशीं तुल्य बल तुझें नाहीं ।
नारीमाजी सिंही केली जोव्हें तुला जगीं पाहीं ॥ २३५ ॥
स्त्री तूं हवि ती वधिशी ! वन्य पशूंला मृगांस जा मार ! ।
बरवें हें, नच परि तें अधिक बलाशीं प्रशस्य कीं समर ॥ २३६ ॥
परि ये पुढें अशी तूं व्हावें इच्छिसि जरी रणज्ञान ।
करिशी विरोध मजशीं माझें तुजला कळेल बलमान ॥ २३७ ॥
ऐसें वदून तीनें दोन्ही येऊन मनगटें धरिलीं ।
आणी दक्षिणहस्तें स्कंधींचे चाप पाडिले खालीं ॥ २३८ ॥
कर्णप्रान्तिं धनूचे देई तिजला हंसून फटकारे ।
भोंवतिं नाचे आपण गळती शर तीव्र पटपटां सारे ॥ २३९ ॥

देवी रडत पळाली श्येनभयें बदक कीं शिलाविवरीं ।
असतां विरुद्ध विधि, नच एकातें अन्य वरुनियां मारी ॥ २४० ॥
रडत तशी ही गेली, मागें टाकून आपले बाण ।
अर्गासघातकी तो, लाटोनेला वदे तदा अपण ॥ २४१ ॥
"हे लाटोने ! तुजसह नाहीं मी अगदिं युद्ध करणार ।
जोव्हाच्या भार्यांशीं मजला जाईल समर जड फार ॥ २४२ ॥
अमरांत धृष्ट असशी; तेव्हां तूं गर्व हा यथेच्छ करीं ।
कीं जिंकिलेंस मजला, बलयोगें ही प्रशस्य गोष्ट खरी " ॥ २४३ ॥
ऐसें तो वदला मग लाटोना वक्रचाप तें उचली ।
गोळा करीत शर जे पडले धूळींत सर्वभर खालीं ॥ २४४ ॥
घेउन ही दुहितेच्या मागुनियां जावयास ती लागे ।
आलिंपसास पोंचे तों माता राहिली जरा मागें ॥ २४५ ॥
पित्तलमय भूमीच्या जोव्हाच्या मंदिरांत तनया ती ।
जावोनी ताताच्या जानूंशीं बसुन रडत परुष अती ॥ २४६ ॥
लोळे धरणीवरतीं रम्य सुधामय झगा तिचा आतां ।
सॅतर्नज तात तिचा जवळी येऊन पुसतसे हंसतां ॥ २२७ ॥
"स्वर्गीं वास करोनी कोण तुला सांग गे छळी तनये ! ।
साहस करुनी जेणें केलें दुष्कर्म वाटतें अभयें " ॥ २४८ ॥
शोभे मुकट जिला तो मृगयेची स्वामिणी तया वदत ।
"धवळकरेनें मजला जूनोनें पीडिलें असे सतत ॥ २४९ ॥
हे तात ! ही तुझी ना भार्या जी झुजवि नित्य अमरांस ? " ! ।

ऐशा गोष्टी करिती दोघें बोलून एकमेकांस ॥ २९१ ॥
गेला परंतु इकडे निघुनीयां इलियमास फीबस तो ।
त्रायस्थांचे पुरतट राखाया जाउनी तिथें बसतो ॥ २९२ ॥
विधिच्या विरुद्ध अथवा ग्रीक तया टाकितील पाडून ।
शाश्वत देव दुजे ते गेले आलिंपसास परतून ॥ २९३ ॥
कांहीं कुपित मनीं तों, दुसरे बहु गर्व करित ते बसले ।
मेघग्राहक ताताजवळी हे अमर सर्व तों जमले ॥ २९४ ॥
इकडे अकिलीसानें त्रायस्थां मारिलें हयांसकट ।
दग्ध पुरींतुन उठतो धूमाचा स्तोम वर नभीं विकट ॥ २९५ ॥
स्वर्गीं अमरां भेटे यांवर जे कोप करिति अभिमानी ।
कष्टद सकलां होती केला ह्मणुनी विलाप पौरांनीं ॥ २९६ ॥
अकिलीस आज तैसा झाला या त्रोजनांस कष्टद तो ।
प्रायम उच्च तटांवर चढुनी त्यातें दुरूनियां बघतो ॥ २९७ ॥
त्रोजन विकीर्ण करुनी केला संभ्रम तयें रणीं घोर ।
उरलें बल न तयांना झालें भूपास दुःख मनिं थोर ॥ २९८ ॥
उतरुनि खालीं नृप ये आज्ञा करण्यास रक्षिवर्गास ।
ठेवाया दक्षपणा होता हा या अवश्य समयास ॥ २९९ ॥
"हातीं गच्च धरोनी ठेवा उघडीं अतां पुरद्वारें ।
शिरतील आंत येउन पळतां घाईत येथ जन सारे ॥ २६० ॥
आकिलीस जवळ आला त्यांलागीं अज पिटाळुनी पुढतीं ।
आतां मजला वाटे येइल घडुनी नृशंस समरिं कृती ॥ २६१ ॥

सारे तटांत येतां नीटपणें बंद तीं करा द्वारें ।
याची अघोर करणी ! मजसिं भयें कापरें बरेंच भरे "॥ २६२ ॥
ऐसें तो वदला मग रक्षक ते दीर्घ उघडती द्वारें ।
अर्गल निघतां झालें स्थान सुरक्षित जनांस परभारें ॥ २६३ ॥
घेउनि उडी तयांला भेटाया पुढतिं जाय फीबस तो ।
होतो नाश बहुत जो पाहिन जर येत चुकवितां ह्मणतो ॥ २६४ ॥
लोक तृषाप्लुष्ट तसे समरांतुन धूलिमलिनकाय अले ।
उच्चतटांच्या नगरद्वारीं शिरण्यास त्यास मानवलें ॥ २६५ ॥
मागें लागुन आला हातीं अकिलीस घेउनी भाला ।
उत्साह हृदयिं भरला यश मिळवाया सदाह हा टपला ॥२६६॥
उच्चतट त्रायपुरा ग्रीकांनीं खचित जिंकलें असतें ।
जर आजिनारतनया चिढवीलें फीबसें अतां नसतें ॥ २६७ ॥
निर्दोष शूर मोठा हा जाणा आजिनार अभिजात ।
देऊन धीर याला आपण सन्निध असावया जात ॥ ३६८ ॥
बीचतरूला टेंकुन यातें हा वांचवावया पाहे ।
आपण मात्र तमानें आवृततनु सर्वकाल रणिं राहे ॥ २६९ ॥
नगरध्वंसक दिसला जैसा अकिलीस आजिनाराला ।
तद्हृदय अंधकारित होउन तो स्तिमित राहता झाला ॥ २७० ॥
विश्वास दीर्घ सोडुनि अपुल्या जीवास बोलला वचन ।
"हा ! खचित दैवहत मीं ! अकिलीसा पुढतिं पळति हे स्वजन ॥२७१॥
तैसा पळेन मी जर तर मातें तो धरील खचित असा ।

दिसतें शिवाय हें कीं मजला म्याडास वधिल हा सहसा॥ २७२ ॥
समभू इदाद्रिवरची गांठुन सत्वर लपेन झाडींत ।
संध्याकाळीं करिन स्नान तिथें मी नदींत मग विहित ॥ २७३ ॥
घर्मातें धुवुनी मी त्राया येइन फिरोनियां परत ! ।
परि हे विचार कां मी आणावे आज येथ चित्तांत ? ॥ २७५ ॥
रणभूवरतीं जातां मजला पाहील कीं खरोखर हा ।
आणी मागें धांवुन धरिल मला त्वरितगति नृपाल महा ॥ २७५ ॥
दैवातें मरणातें चुकवायाचें अशक्य मग दिसतें ।
सकल नरांहुन याचें आहे कीं श्रेष्ठ विदित भुजबल तें ॥ २७६ ॥
नगराच्या पुढतीं मीं गेलों चालुन तयावरी समजा ।
पित्तलमय शूलानें भेद्य असे तनु तदीय; काय मजा ! ॥ २७७ ॥
आत्मा एकचि तींतहि, ह्मणती आकिलीस अमर मुळिं नाहीं ।
सॅतर्नज जोव्ह परी देतो त्या अधिक यश जरा कांहीं" ॥ २७८ ॥
ऐसें ह्मणुनी तेणें ठेवियलें एकवटुन निजबल तें ।
आकिलीसाची बघतां वाट तयाचें सवीर्य मन जळतें ॥ २७९ ॥
चित्रव्याघ्र जसा तो निबिड वनांतून धांव घेवोनी ।
व्याधावरतीं पडतो भीतिवह श्वानशब्द ऐकोनी ॥ २८० ॥
त्रस्त न चित्तीं होतो, दूर कुठें पळुन शूर नच जातो ।
अंगा क्षत होइल अथ ताडिल कोणी, कळून हें बसतो ॥ २८१ ॥
शूलें विद्ध असुनही झोंबी देई न सोडुनी धीट ।
पाडो ! पडो ! तयाला लढण्याचा तो नये कधीं वीट ॥ २८२ ॥

अभिजात अन्तिनारज आज्ञ तसा आजिनार नच पळतो ! ।
अकिलीसाशीं धैर्यें करण्यातें दोन हात अज बघतो ॥ २८३ ॥
सर्वभरी सम आतां धरुनी निज ढाल दक्ष वीर करीं ।
अरडोनी भाल्यानें अकिलीसावरतिं सरळ नेम धरी ॥ २८४ ॥
बोले " हे अकिलीसा ! खचित तुझ्या मानसांत ही आस ।
कीं ही त्रोजन नगरी टाकिन जाळुन करून सायास ॥ २८५ ॥
मूर्खा ! जाणसि का रे ! होइल मग केवढा अनर्थ तरी ।
आहोंत वीर आह्मीं तेथें विक्रान्त अमित सर्वभरी ॥ २८६ ॥
प्रिय पितरें आणि कान्ता पोरें अमुचीं तिथें तयां करतां ।
इलियम राखूं आह्मीं ! करशिल तव नियति पूर्ण येथ अतां ॥२८७॥
उपयोग काय ? असशी वीर भयानक तसाच जरि धीर " ।
ऐसें तो वदला अणि फेंकी निज शूल त्यावरी वीर ॥ २८८ ॥
जंघाग्रीं जानूच्या खालीं रुतला, न चुकत तो भाला ।
ध्वनि झाला खणखण तो लागोनी शस्त्र तेथ कवचाला ॥ २८९ ॥
पित्तलमय शूल तसा परत उडाला न आंत रुतला तो ।
सुरक्षित कवचानें अज पूर्णपणें तो निवारिला जातो ॥ २९० ॥
अकिलीस धांव घेई माराया समरिं आजिनारास ।
परि न अपालोनें त्या मिळुं दिधलें यश विशुद्धसमयास ॥ २९१ ॥
दूर तयातें नेउन झांकोनी त्या धुक्यांत ठेवियलें ।
स्वस्थपणें अकिलीसा जायातें ह्मणुन परत लावियलें ॥ २९२ ॥
लोकांपासुन दूरी नेलें योजून कपट अकिलीसा ।

रूप तयानें धरिलें गमला तो आजिनार भूपतिसा ॥ २९३ ॥
पायांशीं या दिसतां, त्याची धांवून वीर पाठ धरी ।
वाटे थोडें अंतर उरलें तरि भूप येतसे न करीं ॥ २९४ ॥
घेतात धांव दोघे क्षेत्रां उल्लंघितात धान्यमय ।
स्कामन्द्रोपकंठीं दोघे पळतात भागति न पाय ॥ २९५ ॥
त्यास अपालोनें अज योजुनियां कपट ठकविलें खास ।
धांवत असतां त्याला वाटे कीं हा अलाच हातास ॥ २९६
तितक्यांत त्रोजन हे शिरले नगरांत या पराभूत ।
भरलें नगर तयांनीं, जमले हे सर्वजण अनाहूत ॥ २९७ ॥
असतां पळत कुणीही नगराबाहेर थांबला नाहीं ।
कोण पळे, कोण मरे, अन्योन्यां कुणि पुसे न कधिं कांहीं ॥२९८॥
ज्यातें पळवुनि नेलें जानूंनीं श्रान्तचपल पायांनीं ।
आनंदानें आतां धावुनियां नगर गांठिलें त्यांनीं ॥ २९९ ॥



सर्ग २२ वा.

हेक्तरवध.

सारांशः—ट्रोजन सर्व नगरतटाच्या आंत सुरक्षित रहातात. परंतु हेक्तर पित्याची विनंति अमान्य करून हट्टानें तटांचे बाहेर युद्धास सज्ज उभा राहतो. मातेच्याहि विनवण्या फुकट जातात. अकिलीस येतांच भयानें हेक्तर पळ काढतो. अकिलीस पाठीस लागतो. अशा स्थितींत हेक्तर नगराला तीन प्रदक्षिणा घालतो. मिनर्वा अकिलीसाला साहाय्य करण्यास धांवते. दीइफोबसाचें (हेक्तराच्या बन्धूचें) रूप घेऊन ती हेक्तरापुढें जाऊन 'मी साहाय्य करण्यास आलों' ह्मणून सांगते; परंतु आयत्या वेळेस दगा देऊन अदृश्य होते व अकिलीस हेक्तराचा वध करतो. त्याचें शव रथास बांधून अकिलीस जमिनीवरून फरफटवीत नेतो. हेक्तराची भार्या व मातापितरें अनिवार शोक करतात.

कालमानः—तिसावा दिवस पुढें चालू.

स्थलमानः—ग्रीकांची भिंत व ट्रायतट यांच्या मधील भूमि.

ऐसे लोक खरोखर शिरले नगरांत जे भयत्रस्त ।
छावे जणुं हरिणाचे पळताती घाबरुन अजि समस्त ॥ १ ॥
घर्मा जिरविति बसुनी, शमविति तृष्णा कुणी जला पिउनी ।
करिती श्रमापहारा, सुन्दर वप्रांस कोणि टेंकूनी ॥ २ ॥
ग्रीक तटांशीं येती स्कन्धांवरि लटकवून निज ढाली ।
परि हेक्तरास आतां नाशक तन्नियति चांगलिच नडली ॥ ३ ॥
बाहेर इलियमाच्या द्वाराशीं ठेवि त्यास आणून ।
फीबस अकिलीसातें बोलतसे तों बरेंच अरडुन ॥ ४ ॥

" पेलिअसाच्या पुत्रा ! कां मम धरतोस पाठ अमराची ।
होशी चपल तरी तव मर्त्याची जाति होय मनुजाची ॥ ५ ॥
अजुनी तुला न कळलें पळतां मी कीं असें मुळीं अमर ।
चवताळतोस कां तूं ? त्रोजन सोडून देशि कां सभर ? ॥ ६ ॥
केलेंस त्यां पराजित, दडले सगळे विकीर्ण नगरांत ।
इकडे काय करिशि तूं ? अमरा मज वधिशी ही नको मात ॥ ७ ॥
कोपाविष्ट तयाला बोले आकिलीस चपल तूं आज ।
दूरक्षेपक ! मजला खासें तूं ठकविलेंस रे सहज ॥ ८ ॥
आखिल सुरांमाजि नसे तुझ्या सम कोणि नाश करणारा ।
मजला तटाहुनी दुरी ऐसा नेलास काय परभारा ॥ ९ ॥
यांतिल अनेक जन त्या गेले असते न इलियमा खास ।
दांतीं धरा धराया असतें मीं लाविलें असंख्यांस ॥ १० ॥
यश मम हें त्वां नेलें केलें त्यांचें तसेंच रक्षण रे ।
कारण तुजला नव्हती दण्डाची भीति तथ्य हेंच खरें ॥ ११ ॥
हातीं असतें माझ्या तर तुजला खचित दण्डिलें असतें " ।
ऐसें ह्मणुनी तत्क्षणिं पुरमार्गानें सगर्व तो परते ॥ १२ ॥
धांवे विजयी हय तो बक्षिस जो शर्यतींतलें मिळवी ।
जैसा रणभूवरतीं गर्वमदें आपुल्या रथा फिरवी ॥ १३ ॥
तैसा आकिलीस अतां जानू अणि उचलि आपुले पाय ।
पाहे प्रायम त्याला ! रणिं धांवे दृप्त दीप्तिमत्काय ॥ १४ ॥
उगवे शरदृतूच्या उज्ज्वल नक्षत्र मध्यरात्रीस ।

मृगशीर्षश्वान अशी देती संज्ञा तयास गणतीस ॥ १५ ॥
याचा प्रकाश मोठा ! तापद दुश्चिन्ह हें नरांस परी ।
पित्तलमय कवच तसें चमके उरिं वीर धांवतां समरीं ॥ १६ ॥
दुःखावेशें, वृद्धें पिटिलें अपुलें कपाळ हातांनीं ।
हात वरी उचलुन मग, केला आक्रोश फार मोठ्यांनीं ॥ १७ ॥
विनवी प्रियपुत्राला होता जो राहिला पुरद्वारीं ।
अकिलासारीं लढण्या उत्सुकता बाळगी रणीं भारी ॥ १८ ॥
करुणस्वर काढोनी वृद्ध वदे यास पसरुनी हात ।
" माझ्या प्रियतनया ! रे ! जाउं नको एकला अज रणांत ॥ १९ ॥
हेक्तर ! हे ! जाउं नको दुसरे जन घेतल्याविणें आज ।
पेलिअसात्मजजनित तूं विधिला पाचारशील कीं सहज ॥ २० ॥
आकिलीस तुझ्याहूनी अधिक खरा शूर रणिं मला दिसतो ।
दुष्ट ! असो अमरां प्रिय तितका, जितका असे मला प्रिय तो ॥२१॥
ह्मणजे सत्वर याला खातिल कीं श्वान आणि ते विहग ।
जाईल हृदयांतुन मम दुःखद पीडा निघून पूर्ण मग ॥ २२ ॥
यानेंच तनय माझे वधिले रणिं दूरदेशिं वा विकिले ।
त्रोजनपुरांत शिरले त्यांत कुठें अन्य तनय नच दिसले ॥ २३ ॥
शूर लिकाअन पहिला, दुसरा कीं वीर पालिदोरस तो ।
लाओथोई त्यांची जननी नारींत मान जिस असतो ॥ २४ ॥
अरिच्या कटकीं जर ते असातिल जीवन्त तर बरें एक ।
पित्तल सुवर्ण देउन सोडवुनी आणिन लाडके लेंक ॥ २५ ॥

हातांतलें असे तें; आजा त्यांचा नृपाल आल्तीस ।
दुहितेस ठेवि देउन बहु वस्तू ज्या अल्या पसंतीस ॥ २६ ॥
असतिल जर का मृत ते लोळत हेदीसमंदिरांत, तर ।
माझ्या जीवा होइल, त्यांच्या जननीस दुःख मग फार ॥ २७ ॥
अकिलीसानें तुज नच केलें जित ह्मणुन वांचलास जर ।
तर जें इतरां स्वजनां होइल मग दुःख तें नसे प्रखर ॥ २८ ॥
आंत तटाच्या येईं मम तनया ! राखिं नर अणी नारी ।
प्रियजीवातें मुकुनी अकिलीसातें कृतार्थ तूं न करीं ॥ २९ ॥
आतां दया करावी मजवरतीं दग्धजीवितावरतीं ।
बुद्धिभ्रष्ट न झालों जों मी अद्यापि सौख्यहीन अती ॥ ३० ॥
वृद्धावस्थेच्या त्या उंबरठ्यावरतिं तात जोव्ह अज ।
दुर्विधिविलसितयोगें माझा तो करिल अन्त कीं सहज ॥ ३१ ॥
पुढलें दुःख कठिण रे ! माझे मुलगे रणांत पडतील ! ।
ओढील अरि मुलींना आणी बंदींत त्यांस ठेवील ! ॥ ३२ ॥
लुटुन महाल तयांचे धरणीवर अर्भकांस अपटील ।
ग्रीक भ्रष्ट करांनीं नंतर माझ्या सुनांस हरतील ॥ ३३ ॥
शेवटला मी बहुधा ! बलि त्या क्रव्याद सारमेयांस ।
प्रासादीं बाळगिलें सहभोजिंस ज्यांस भवनपालांस ॥ ३४ ॥
तेच पुरद्वारीं मग खचितचि फाडून टाकतिल मजला ।
करुनी क्षत शूलें कुणि माझ्या जेव्हां हरील जीवाला ॥ ३५ ॥
पीउन माझ्या रुधिरा द्वारीं पडतील मत्त होउन ते ।

शूलक्षतें मरावें तरुणें समरांत, त्यास हें सजतें ॥ ३६ ॥
येतां मृत्यु असा रणिं होइल जें सर्व त्यास भूषण तें ।
पलितशिरा श्वानांनीं भ्रष्ट करावें कसें मला पण तें ॥ ३७ ॥
दाढी धवल, दुजे मग भलते अवयव तसेच वृद्धाचे ।
त्यांनीं भ्रष्ट करावे ! करुणास्पद अधिक नच अधन्याचें " ॥ ३८ ॥
ऐसें बोलुनियां तो उपटितसे वृद्ध धवल केशांला ।
चित्तास हेक्तराच्या वळवायातें न तरि हि तो शकला ॥ ३९ ॥
आली त्याची माता तेथें तों रडत रडत दुसरिकडे ।
अश्रुजलानें भिजवी वक्षःस्थल टाकुनी अतां उघडें ॥ ४० ॥
दुसऱ्या हस्तें दावी गलित स्तन आपुले अणी रडत ।
मर्मस्पृक् कांहींसे शब्द तयाला मुखें असे वदत ॥ ४१ ॥
"प्रियपुत्रक! हेक्तर हे!यां सर्वां मान दे अतां कांहीं ।
माझ्यावरी स्वतांवर काय दया तूं करीत अज नाहीं ! ॥ ४२ ॥
करण्या उगी तुला मीं असलें कधिं लाविलें स्तनापाशीं ।
तर तें स्मरुनी तनया ! नगर तटा आड हो लढायाशीं ॥ ४३ ॥
समरमुखीं न लढावें दुर्दैव्या ! वधिल अरि दुरी तुजला ।
तिरडीवर ठेउन तुज गाळिन मी सांग केविं अश्रुजला ॥ ४४ ॥
प्रियतनया ! तुज ज्या मीं जन्म दिला बघ तिची अशी गत ही ।
अश्रूजलांत माखिल भार्या स्त्रीधनवती कशी पाहीं ॥ ४५ ॥
दोघांतें सोडोनी जाउनियां फार दूर पडशील ।
ग्रीकांच्या नौभागीं खातिल ते श्वान तुजसिं दुःशील " ॥ ४६ ॥

प्रियतनयातें ऐसें दोघांनीं विनविलें रडें अणुन।
परि चित्त हेक्तराचें अल्पहि वळलें मुळीं नसे ह्मणुन ॥ ४७ ॥
वाट बघे हेक्तर तो आकिलीसाची प्रचण्ड वीराची।
विषपुष्ट घोर अहि जणुं वाट बघे विवरिं जेविं मनुजाची ॥ ४८ ॥
कोपाविष्ट जसा तो लावितसे टक करून वेंटाळें।
हेक्तर अशाम्य कोपें तेविं हलेना तिथून धैर्यबळें ॥ ४९ ॥
उन्नत बुरुजांवरतीं टेंकुनियां ठेवि दीर्घ ढाल निज।
होत्साता क्रुद्ध मनीं आत्म्यातें प्रश्न पुसत हा आज ॥ ९० ॥
" हा ! धिक् ! नगरद्वारा जाउं कसा आंत मी शिरायास !।
पहिल्याप्रथम मला तो बघतां निन्दील पालिदामास ॥ ९१ ॥
तेणें बोधियलें मज जेव्हां उठला रणांत अकिलीस।
' त्रोजन नेई परतुन नगरातें या भयाण रात्रीस ' ॥ ९२ ॥
परि मीं न ऐकिलें तें ! फार बरें ऐकिलें तदा असतें !।
जांचक हट्टानें मीं लोकांतें नाशिलें असें दिसतें ॥ ९३ ॥
त्रोजननरनारींचें आतां वाटे मला किती भय तें।
यःकश्चित् एक कुणी मजला बोलेल येउनी भलतें ॥ ९४ ॥
' गर्वबलानें अपुल्या नाशियलें समरिं हेक्तरें स्वजनां ! '।
ऐसें मजला ह्मणतिल ! होइन विजयी तरीच सौख्य मना ॥ ९५ ॥
आकिलीसा मारोनी समरांतुनियां हवें पुरा जाया !।
पुररक्षणार्थ व्हावें मृत समरीं आज कीर्ति मिळवाया ॥ ९६ ॥
आतां उलटें समजा ढाल अणी कवच ठेविलें खालीं।

शूल तटावर ठेउन, गांठिन आकिलीस वीर थोर बली ॥ ५७ ॥
देइन वचन असें कीं, ' देऊं हेलन पतीस परतून ।
देऊं सारें अणिलें स्त्रीधन जें पारिसें तदा हरुन ॥ ५८ ॥
कारण हाच जहाला सर्वस्वी खचित हेतु कलहाचा ।
अणखी ग्रीकां देऊं नगरींतिल अंश अर्ध वित्ताचा ॥ ५९ ॥
त्रोजनवृद्धां करवीं आधीं मी घेववीन शपथ अशी ।
कीं ते लपवाछपवी केल्याविण काढतील धनराशी ॥ ६० ॥
करतिल विभाग तेथें दोन बरोबर न लावितां वेला ।
परि कां विचार ऐसा चित्तीं मी पाहिजे अतां केला ॥ ६१ ॥
गेलों त्याच्या जवळी; नाहीं अलि जर तयास मुळिंच दया ।
अवमानुन मजलागीं मारिल उघड्यास तर अशा समया ॥ ६२ ॥
नसतां जवळ कवच मम, होइन मीं मग अनाथ जणुं अबला !
बोलेन दुरुन जर मी, नाहीं तें चालणार समयाला ॥ ६३ ॥
ओकच्छायेमाजी थोर शिलेवर बसून भाषण जें ।
तरुणांशीं तरुणी त्या करिती तें त्यांस एकल्यांस सजे ॥ ६४ ॥
यासीं युद्ध करावें बरवा हा मार्ग एकची उरला ।
शक्य तरी सत्वर मग जाणूं यश जोव्ह देइ कोणाला " ॥ ६५ ॥
तेथें राहुन ऐसा केला तेणें विचार, परि जवळ ।
आशमया शूलातें हलवित अकिलीस पातला प्रबळ ॥ ६६ ॥
मार्सासम तो दिसला ! चमके उरिं कवच थोर दीप्तीचें ।
उज्ज्वल अग्नि जसा कीं, बिंब नवोदित जसें असे रविचें ॥ ६७ ॥

ऐसा येतां पाहुनि कंप बहू हेक्तरास मग भरला ।
तेथें न राहवे त्या द्वारा सोडून धांवता झाला ॥ ६८ ॥
पदिंच्या चापल्यावर, ठेवुन विश्वास घुसत अकिलीस ।
जवनतम श्येन जसा गिरिवर धरण्या निघे कपोतीस ॥ ६९ ॥
तिरपी ती धांवतसे, परि हा चीत्कार करुन जोरानें ।
घाली झडप फिरोनी उत्सुक धरण्या तियेस वेगानें ॥ ७० ॥
उत्सुक वीर तसा हा मागोनी सारखा अतां पळतो ।
नगर तटाखालुनियां हेक्तर धांवावया पुढें निघतो ॥ ७१ ॥
होउन भयभीत तदा देई गात्रांस चपल गति फार ।
आलोकभूमिवरुनी सरले जव धरुनि वीर अनिवार ॥ ७२ ॥
राजपथें ते जाती पवनेरित जेथ तरु उदुंबर तो ।
सावर्त स्कामन्दर तेथ पथीं सुखद दृष्टिला पडतो ॥ ७३ ॥
दोन तयाचे निर्झर जाती दोहोंकडेस वाहत ते ।
एकांतिल उष्णजलीं वाफ उठोनी वरी सदा जाते ॥ ७४ ॥
तैसेंच दिसुन येई अग्निवरी पात्र ठेवितां कढत ।
हिमसेकासम शीतल दुसऱ्यांतिल जल असे उन्हाळ्यांत ॥ ७५ ॥
*गारांपरि सुखद अती तुहिनापरि विशद इष्ट सकलांस ।

---

* वाल्मीकीनें दोनच ओळींत तमसातीर्थाचें फार रसभरित वर्णन केलें आहे तें पहा.

अकर्दममिदं तीर्थं भरद्वाज निशामय । रमणीयं प्रसन्नाम्बु सन्मनुष्यमनो यथा ॥१॥

अर्थः—भरद्वाज ! हें तीर्थ अगदीं कर्दमरहित व रमणीय असून त्याचें पाणी आंत कोठेंही असलेलें केर दिसेल इतकें स्वच्छ आहे, जसें कांहीं सज्जनांचें मनच.

येथेंच संगमावरि नारीजन येतसे धुवायास ॥ ७६ ॥
द्रोणी सुन्दर दगडी रुंद अशा ठेविल्या इथें असती ।
भार्या नागरिकांच्या दुहिता वा धरिति चित्तिं आवड ती ॥ ७७ ॥
ह्मणुन धुवाया येती शान्तीच्या समयिं रम्यवसनें तीं ।
ग्रीकांचे पुत्र परी तेथें निज सैन्य आज हे नेती ॥ ७८ ॥
मार्गें या हे जाती, एक पळे, अन्य लागला मागें ! ।
पळणारा शूर खरा, त्यातें परि शूरतर धरूं लागे ॥ ७९ ॥
नव्हतें सावज धरणें ! किंवा गोचर्म मिळविणें आतां ! ।
जें देति पारितोषिक लावुन पण रोजचा कुणी पळतां ॥ ८० ॥
अजि जीव हेक्तराचा लावुन पण धांवतात हे वीर ।
जिंकायास परस्पर धांवति हय जणुं धरोनियां धीर ॥ ८१ ॥
जेव्हां अश्वारूढां केली द्यायास देणगी असते ।
मोठी तिवई किंवा वामा रुचिरा तयांस ती मिळते ॥ ८२ ॥
हा सर्व खेळ करती मृतवीरांच्या सदैव नांवानें ।
तेव्हांच्या अश्वांसम धांवत हे सुटत जवन वेगानें ॥ ८३ ॥
प्रायमनगरीभोंवति दोघेही तीन वेळ अज फिरले ।
पाहति अमर वरोनी; मनुजपित्यानें दुजांस मग ह्मटलें ॥ ८४ ॥
" हा ! धिक् ! प्रियवीराच्या मागें लागे, तया बघें नयनीं ।
फिरतो तटांसभोंतीं क्षोभे मम हृदय हेक्तरावरुनी ॥ ८५ ॥
बहु वृषभांच्या जंघा काढुन जेणें मला बळी दिधल्या ।
असलों इदाद्रिशिखरीं मंदिरिं वा तरिहि पोंचत्या झाल्या ॥ ८६ ॥

त्या परमोदाराच्या लागे पाठीस आज अकिलीस ।
प्रायमपुरीसभोंवतिं घाली घिरट्या करून घाईस ॥ ८७ ॥
या अज तुह्मीं सुर हो! याचा मनिं चांगला विचार करा।
अकिलीसाच्या हस्तें जिंकवुं का वांचवूं तया नृवरा " ॥ ८८ ॥
बोले तया मिनर्वा देवी उलटून नीलनयनांची ।
" ही काय गर्जकाची वाणी त्या मेघवाह ताताची ! ॥ ८९ ॥
गर्जक! हे इच्छिसि का मर्त्याचा मृत्यु टाळण्या आज ।
ठरवून ठेविलें जें विधिनें त्याला नसे कधिं इलाज ॥ ९० ॥
तूं राख त्या हवा तर ! संमत इतरांस तें सुरांस नच ! " ।
घनवाहक जुपितर त्या उत्तर देतां असें करीत वच ॥ ९१ ॥
" धीर धरीं, नच वदलों, परमार्थें मी त्रितोनिये ! तनये ! ।
आहे मनांत तुजशीं वागावें सर्वदा सदय हृदयें ॥ ९२ ॥
वाटेल तें करावें लावुं नको अल्पही उशीर तया ! " ।
ऐसें वदुनी तेणें उत्तेजन तिज दिलें अशा समया ॥ ९३ ॥
आधींच सज्ज होती, घेत उडी एक मग मिनर्वा ती ।
आलिम्पसावरोनी उतरुन खालीं अली रणावरतीं ॥ ९४ ॥
इकडे अकिलीसानें धरलीसे पाठ हेक्तराची ती ।
तैशी श्वान धरितसे निबिड वनीं हरिणशावकाची ती ॥ ९५ ॥
गुल्मांतुनी दरीच्या त्यातें बाहेर काढि लावून ।
मग तें दडतें पळतां हळुचि जाळींत भीत होऊन ॥ ९६ ॥
भक्ष्य मिळे तों धांवुन अश्रान्त श्वान माग काढितसे ।

अकिलीसाचें पळतां हेक्तर शकला न चुकवुं लक्ष तसें ॥ ९७ ॥
नगरद्वारापाशीं बुरुजाच्या जवळ जात हेक्तर तो ।
वाटे बहुवार तया आंतुन साहाय्य काय कुणि करतो ॥ ९८ ॥
टाकिल शस्त्र कुणीतरि आंतोनी ह्मणुन जात जवळून ।
तितक्यावेळ तया रणिं वळवुन अकिलीस घेइ जाणून ॥ ९९ ॥
आपण असुन तटाशीं त्यातें समराङ्गणाकडे हांकी ।
स्वप्न जणूं कुणि पाहे, एक पळे पाठ धरित दुसरा कीं ॥ १०० ॥
पळवेना एकाला दुसऱ्याला तेविं त्यास धरवेना ।
निज मरण हेक्तरानें टाळियलें अपण हें न ह्मणवेना ॥ १०१ ॥
ऐन प्रसङ्गि याला केलें साहाय्य फीबसें प्रथम ।
उत्तेजन या दिधलें, तेवीं चापल्य जानुंतें परम ॥ १०२ ॥
दुसऱ्यानें अकिलीसें लांबविलें मरण, त्यास कारण हें ।
वीरांनीं इतर तया मारावें ही न युक्ति त्यास सहे ॥ १०३ ॥
ह्मणुनी मान हलवुनी त्यांलागीं शस्त्र टाकुं देई न ।
नाहीं तर शस्त्रांनीं वधिता त्या वीर धांवुन नवीन ॥ १०४ ॥
आणि हरता यश याचें मग हा येता यशें जनीं दुसरा ।
ऐसें होतां आले चवथ्यावेळेस जेथ दिसत झरा ॥ १०५ ॥
तेव्हां जोव्हें धरिली हेमाची आपुल्या करांत तुला ।
ठेवीत लक्ष्य देउन दोघांच्या पारड्यांत मृत्यूंला ॥ १०६ ॥
एकांत हेक्तराचा, अकिलीसाचा दुजांत वीराचा ।
होते आजवरी हे गढुनी झोंपेंत, खर्च काळाचा ॥ १०७ ॥

मध्यें तुला धरोनी तोली तो मृत्यु हेक्तराचा तो ।
खालीं तळास जाउन हेदीसाप्रति बुडोनियां जातो ॥ १०८ ॥
त्यातें फीबस सोडी नीलाक्षी उठुनि मग मिनर्वा ती ।
येउन अकिलीसाच्या जवळ उभी जाहली तया वदती ॥ १०९ ॥
"जोव्हप्रिया ! अतां मज अकिलीसा ! आस थोर अभिजाता ! ।
ग्रीकांच्या सौभागीं नेउं महा कीर्ति परतुनी जातां ॥ ११० ॥
रणलोलुपास मारूं आतां या हेक्तरास कीं खचित ।
अमुच्या हस्तांतुन या शक्य पलायन न तें अतां दिसत ॥ १११ ॥
फीबस तो जोव्हाच्या चरणीं लागून आज जरि थकला ।
तरिही हा पळुं न शके; थांब जरा, अङ्गि आण नविन बला ॥ ११२ ॥
तुझ्यासह येतें मीं आणिन युद्धा समूर मी त्यास" ।
ऐसें वदे मिनर्वा, वीर मुदें मान देत वचनास ॥ ११३ ॥
पित्तलमयाग्रशूलावरतीं टेंकोनियां उभा राहे ।
देवी या सोडोनी गांठाया हेक्तरास मग पाहे ॥ ११४ ॥
गात्रें तिचीं न दमती न पडे कधिंही तसाच आवाज ।
धरि दीइफोबसाचें रूप अणी जवळ जातसे आज ॥ ११५ ॥
लागुन तयास बोले " प्रियबन्धो ! घेरिलें तुला अरिनें ।
प्रायमनगरीभोंवतिं तुह्मीं पळतां बऱ्याच घाईनें ॥ ११६ ॥
परि ये आपण थांबूं दोघांनीं घालवूं तया परत " । ।
द्याया उत्तर हेक्तर उलटुन ऐसें तदा तया वदत ॥ ११७ ॥
बन्धूंमाजी गणिलें श्रेष्ठ तुला दीइफोबसा ! खचित ।

ज्या जन्म हेक्युबेनें प्रायमभूपें दिला जगीं प्रथित ॥ ११८ ॥
परि आतां अधिकचि तूं झालासी मान्य या प्रसंगाला ।
येसि पुरा बाहेरी पाहुन नयनीं पुढें असा मजला ॥ ११९ ॥
साहस मदर्थ करसी! दुसरे जों स्वस्थ राहिले जागीं! " ;
उत्तर देत मिनर्वा नीलाक्षी उलट मग तयालागीं ॥ १२० ॥
" मत्प्रियबन्धो ! मजला, तातानें आणि पूज्यजननीनें ।
जांनूतें कवटाळुनि विनवोनी पाहिलें सदुक्तीनें ॥ १२१ ॥
सहचर माझे भोंवति दमले घेण्यास ठेवुनी मजला ।
ऐसा सकलांलागीं भीतीनें कंप तत्क्षणीं भरला ॥ १२२ ॥
दुःखोद्वेगें परि मम झालें आंतून चित्त तें व्यथित ।
ये चल दोघे आपण औत्सुक्यें युद्ध चालवूं त्वरित ॥ १२३ ॥
घ्यावा न आंखडुन कुणि अपुला वेळेस हात शूलाचा ।
ह्मणजे कळेल आह्मां विक्रम कैसा रणांत वीराचा ॥ १२४ ॥
दोघां वधुनी नेइल नौभागीं रुधिरसिक्त लूट तरी ।
अथवा अमुच्या हस्तें होइल तो विजित लढुनियां समरीं" ॥१२५॥
ऐसें वदुन मिनर्वा नेई त्यातें पुढें कपट करुन ।
येतां जवळ जवळ ते, हेक्तर करि वच जरा पुढें सरुन ॥ १२६ ॥
" हे पेलिअसज ! आतां नाहीं पळणार मी तुझ्या पुढतिं ।
प्रायमनगरीभोंवतिं, फिरलों मी तीन वेळ शीघ्रगति ॥ १२७ ॥
येतां तुला बघोनी जाग्यावरतीं मला न राहवलें ।
+ मारीन खचित तुजला, किंवा आतां मरेन हेंच भलें ॥ १२८ ॥

+ मारीन त्यास अथवा त्याच्या हातें मरेन! हो भावी ।
कोणातरि प्रकारें, सत्कीर्ति जगत्रयांत शोभावी ॥ १ ॥ मोरोपंत.

साक्षी अमरां ठेऊं, बघतिल ते नीट जे ठराव करूं ।
घेईन जीव तूझा; जोव्हें यश मज दिलें ह्मणून धरूं ॥ १२९ ॥
तरिही दुष्टपणें तव नाहीं करणार मुळिंच अपमान ।
आकिलीस! हे! तुझें मी घेइन तें कवच विभ्राजमान ॥ १३० ॥
ग्रीकांलागीं नंतर तूझें शव मी करीन रे परत ।
आणि तसें तूंहि करीं" तेव्हां आकिलीस वीर त्या वदत ॥ १३१ ॥
"हेक्तर नरापसद हे! बोलें भाषा न तूं ठरावांची ।
मैत्री विश्वास्य नसे मनुजांशीं विपिनिं कधिंच सिंहांची ॥ १३२ ॥
वद काय कोंकरांचें आणि वृकांचें असेल एकमत ! ।
करण्या परस्परांचें अहित मनीं चिंतितात तीं सतत ॥ १३३ ॥
आह्मां शक्य नसे रे! सख्य कराया तसें असें समज ।
कुठले ठराव मग ते? कुणि तरि पावेल पतन एक अज ॥ १३४ ॥
रुधिरें तर्पण करुनी दुसरा मार्सास तोषविल वीर ।
आठव विक्रम अपुला! अणिला तुज पाहिजे अतां धीर ॥ १३५ ॥
आतां न फिरुन सुटशिल, मच्छूलें जिंकि तुज मिनर्वा ती ।
*शूलें वधिलें त्वां जे सहचर माझे तयां नसे गणती ॥ १३६ ॥
दुःख दिलेंसी भारी! त्याचा वचपा निघेल तुज वरतीं!" ।

---

* हतो भ्राता च येषां वै येषां च तनयो हतः ।
वधेनाद्य रिपोस्तेषां करोम्यश्रुप्रमार्जनम् ॥१॥ रामायण.

अर्थः—ज्यांच्या भ्रात्याचा व पुत्राचा वध झाला आहे, त्यांचे अश्रू शत्रूच्या वधानें आज पुसून टाकीन. रावणाचें भाषण.

ऐसें वदुनी तेणें तळपवुनी शूल फेंकिला पुढतीं ॥ १३७ ॥
अभिजात हेक्तरें त्या पाहुनियां टाळिलें समोरून ।
बसला खालीं तैसा गेला भाला निघोनियां वरुन ॥ १३८ ॥
उपटून मिनर्वेनें अकिलीसा परत आणुनी दिधला ।
करणी गुप्त अशी परि कळुं न दिली हेक्तरास जनपाला ॥ १३९ ॥
हेक्तर नंतर बोले अभिजाता पेलिअसज तनयास ।
" सुरतुल्या अकिलीसा! कथितों मीं तूं खराच चुकलास॥ १४० ॥
जोव्हाकडुनी तुजला कळलें नच दैव मम कसें आहे ।
कळलें ह्मणुनी वदसी, अससी वाचाट केवढा पाहें ॥ १४१ ॥
शब्दांच्या चातुर्यें पाहसि मजसीं रणांत भिववाया ।
ह्मणजे विस्मृतियोगें जाइल मम धैर्यबल अतां वायां ॥ १४२ ॥
पृष्ठीं पळतां माझ्या कधिं न च तूं रोंवाशिल तुझा भाला ।
उरिं खोंचशील पुढुनी, ईश्वर तुजला सहाय जर झाला ! ॥ १४३ ॥
परि आतां तूं माझा पित्तलमय शूल चुकव ये परत ! ।
इच्छित पुरवीं, माझा स्वीकारीं शूल तूं शरीरांत ॥ १४४ ॥
जाइल बरेंच हलकें त्रायस्थां समर तूं रणीं पडतां ।
झालासी व्याधि तयां केवळ तूं प्रबळ दुःखमय आता ! " ॥१४५॥
ऐसें वदुनी तेणें तळपवुनी शूल फेंकिला पुढतिं ।
अकिलीसाच्या ढालीवरतीं लागे धरून शीघ्र गति ॥ १४६ ॥
भाला परि परत उडे, हेक्तर चिढला तयास कारण हें ।
शस्त्रकरांतुनि सुटलें गेलें परि फुकट तें तया न सहे ॥ १४७ ॥

खिन्न उभा राहे कीं, दुसरा भाला तयापशीं नव्हता ।
मग दीइफोबसाला भाला द्यायास हांक मारि अतां ॥ १४८ ॥
आरडला मोठ्यानीं, परि तो होता कुठें तया जवळ ।
तेव्हां मनांत उमगे हेक्तर हें नीट वीर अज सकळ ॥ १४९ ॥
बोले " हा ! धिक्! मरण्या केलें आह्वान मजासिं अमरांनीं ।
तो वीर दीइफोबस, गमला मज जवळ धांवतो मानी ॥ १५० ॥
ठकवून मज मिनर्वा गेली; तो वीर राहिला आंत ।
दुःखद मरण पुढें ये! दूर नसे तें! चुके न ही मात ॥ १५१ ॥
पूर्वींच हवें होतें सौख्यद हें व्हावयास जोव्हास ।
त्याच्या दूरक्षेपक पुत्रा होती अशीच ती आस ॥ १५२ ॥
अनुकूल तोच होता कारण मज राखिलें पुरा त्यानें ।
परि अज उलट पहा ती घेतियली शीघ्र केविं दैवानें ॥ १५३ ॥
× कातरता अयशस्कर तीनें नाहीं मला तरी मरणें! ।
+ मरतों विक्रम करुनी पुढल्या पिढिनें सदैव जो गाणें!" ॥ १५४ ॥

× मरण रुचे वीराला, न रुचे क्षणमात्र अपयशें मळणें । मोरोपंत.

+ हें हेक्तराचें भाषण फार मिनतवारीचें आहे. त्यानें केलेला पराक्रम पुढल्या सहस्र पिढ्या गात रहातील असा चिरसंस्मरणीय आहे. रामरावणांचा पराक्रम वर्णन करणारें रामायण ज्याप्रमाणें पर्वत व नद्या जोंपर्यंत भूतलावर आहेत तोंपर्यंत लोकांत प्रसार पावून अस्तित्वांत राहील त्याप्रमाणें हेक्तर व अकिलीस यांच्या पराक्रमांचें वर्णन करणारें इलियडही राहील.

यावत्स्थास्यन्ति गिरयःसरितश्च महीतले । तावद्रामायणकथा लोकेषु प्रचरिष्यति ।

ऐसें वदुनी तेणें काढिलि बाहेर तीक्ष्ण तलवार।
होती लटकत खालीं, दीर्घ अणी जाड जडहि अनिवार ॥ १९५ ॥
खरचून सर्वबळ निज घुसला पुढतीं वरून गरुड जसा।
उतरे घनांतुनी जो उचलाया कोंकरूं व भीरु ससा ॥ १९६ ॥
हेक्तर तसाच घुसला तळपवुनी तीक्ष्ण दीर्घ तलवार।
अकिलीसही निघाला, तद्हृदयीं धैर्य येतसे फार ॥ १९७ ॥
सुन्दरकृतिची धरि तो ढाल पुढें राखण्यास उर अपुला।
शिरकवच चतुष्कोनी हलवी, पसरीत भय न ज्यास तुला ॥१९८॥
हयकेशांच्या चूडा लावियल्या व्हल्कनें चतुष्कोनीं।
त्या आतां ढालीवर हलतां सर्वत्र जाति पसरोनी ॥ १९९ ॥
हेस्परसाचा तारा, प्रकाश मोठा नभोङ्गणीं ज्याचा।
अपरात्रीं चमकतसे उडुगणिं जणुं हलत गोल तेजाचा ॥ १६० ॥
अकिलीसाच्या करिंच्या शूलाचें अग्र तेविं चमकतसे।
अकिलीस शूल तळपवि निरखुन हेक्तरवपूस बघत कसें! ॥ १६१ ॥

हेक्तराला विजय प्राप्त झाला असता तर रावणवधाच्या वेळीं रामानें केलेलें भाषण जसें रामाला शोभलें तसें हेक्तरालाही शोभलें असतें. राम ह्मणतो.

> अद्य कर्म करिष्यामि यल्लोकाः सचराचराः।
> सदेवाः कथयिष्यन्ति यावद्भूमिर्धरिष्यति ॥

अर्थः—चराचर प्राणी व देव यांसकट सर्वलोक, पृथ्वी आहे तोंपर्यंत ज्याची प्रशंसा करीत रहातील असें कर्म मी आज करीन. **रामायण.**

कीं कोठें त्यावरतीं करतां येईल वार अनुकूल ।
पुष्कळ अंग तयाचें राखितसे कवच रुचिर आणि अतुल ॥ १६२ ॥
पत्रोक्लशास वधिलें हरुनी तत्कवच घेतलें त्यानें ।
स्कन्धां ग्रीवेपासुनि ठेवि दुरि अस्थि जेथ बहुमानें ॥ १६३ ॥
तेथ दिसे भाग तया जीवध्वंसा न जेथ अवकाश ।
आकिलीस तेथ रोंवी औत्सुक्यें शूल योजुनी नाश ॥ १६४ ॥
ग्रीवेंत पार शिरलें अग्र तरी दण्ड दीर्घ शूलाचा ।
पित्तलभारें जड बहु फोडीना श्वासमार्ग तो साचा ॥ १६५ ॥
ह्मणजे शब्दोच्चारें देउं शके परत वीर उत्तर तो ।
आकिलीस गर्ववच करि हेक्तर धूळींत जों तसा पडतो ॥ १६६ ॥
" हेक्तर ! लुटिलेंसी त्वां जेव्हां पत्रोक्लशास समरांत ।
तेव्हां अपणालागीं कां रे गणिलेंस भीतिरहितांत ! ॥ १६७ ॥
तेथें मी नव्हतों रे ह्मणुनी भ्यालास तूं मला नाहीं ।
तुझ्याहुन शूर असा होता नरवीर मागुती पाहीं ॥ १६८ ॥
मूर्खा ! तो हा बघ रे ! जानू तव खिळखिळे जयें केले ।
तुज तोडतील कुतरे ! गृध्रहि फाडून खातिल भुकेले ॥ १६९ ॥
परि माझ्या मित्राचा प्रेताविधि ग्रीक नीट करतील ! " ।
त्यातें उत्तर देई हेक्तर तो क्षीणबल विनयशील ॥ १७० ॥
" माझ्या जीवाची अणि तव जानूंची तशीच पितरांची ।
शपथ तुला घालोनी करितों ही विनति मान्य करिं साची ॥ १७१ ॥
ग्रीकांच्या नौभागीं असती जे श्वान त्यांकडून मला ।

फाडूं नकोस देऊं पित्तल आणि हेम घेइं मोबदला ॥ १७२ ॥
देईल तात माझी जननी सन्मान्य तीहि देईल ।
तें घेवोनी मम शव धाड घरा; हें न काय करशील? ॥ १७३ ॥
ह्मणजे त्रायांतिल मज नरनारी ठेवितिल चितेवरतीं "।
अकिलीसें त्यास दिलें उत्तर परतून सावमान अती ॥ १७४ ॥
" मज्जानूंची मजला घालोनी शपथ वंद्य पितरांची ।
कुतऱ्या! विनति नको करुं! कृत्यें केलिंस तशींच तूं साचीं ॥ १७५ ॥
मन माझें भडकोनी मजला प्रबलास भाग पाडील ।
कच्चें चावुन खाया मांस तुझें, हाच हस्त फाडील! ॥ १७६ ॥
तूझ्या डोक्या जवळुन कुतऱ्यांतें नाहिं कोणि हांकाया! ।
दसपट आणूंदे त्यां धन अथवा वीसपट मला द्याया १७७ ॥
देवोत रोख कांहीं, अणखी देऊं करोत तें कांहीं ।
भारंभार प्रायम देवो मज हेम! इष्ट तें नाहीं ॥ १७८ ॥
जीनें जन्म दिला तुज तिरडीवर ती न तुजसिं ठेवील ।
कसला शोक करिल ती! गृध्र आणि श्वान तुजसिं खातील" ॥ १७९ ॥
प्राणोत्क्रमप्रसङ्गीं देई हेक्तर तयास उत्तर तें ।
" होतें ओळखिलें तुज! होतें कळलें अधींच हें परतें ॥ १८० ॥
आज नशीबीं माझ्या नव्हतें रे! खास वळविणें तुजला ।
कारण हृदयीं आत्मा तव आहे कठिण लोहमय कसला! ॥ १८१ ॥
कर तूं विचार अपुला! तूझ्यावर अमर कुपित होतील ।
होईन मींच कारण; पारिस, फीबस तुलाच वधतील ॥ १८२ ॥

स्कीअननगरद्वारीं होइल तव अन्त खास शूराचा ।
ऐसें तो वदतांक्षणीं मरणच्छायेंत लोपला साचा ॥ १८३ ॥
तारुण्यशक्ति सोडुन करितांना शोक वक्रदैवाचा ।
+ हेदीसाप्रति गेला गात्रांतुन जीवें उठुनियां त्याचा ॥ १८४ ॥
आकिलीस बोलला मग उद्देशुनियां मृतासही त्यास ।

+ झालें. शेवटीं हेक्तर पतन पावला! आकिलीसानें त्याचा वध केला हें खरें. परंतु अंगांत असलेल्या अलौकिक बलाचा कितीसा उपयोग त्यास करावा लागला! मिनर्वा जर मध्यें दीइफोबसाचे रूपानें येऊन हेक्तरास न ठकवती, तर या प्रचण्ड वीरांचें युद्धकौशल्य पहावयास मिळालें असतें. रामायणामध्यें राम व रावण यांच्यामध्यें कोणी देव न पडल्यामुळें त्यांच्या बलाचा उत्कर्ष पहावयास मिळाला व ह्मणूनच खालील अपूर्व तऱ्हेनें त्यांच्या पराक्रमांचें वर्णन वाल्मीकीस करतां आलें.

सागरं चाम्बरप्रख्यमम्बरं सागरोपमम् ।
रामरावणयोर्युद्धं रामरावणयोरिव ॥ १ ॥

अर्थः—सागर आकाशासारखा व आकाश सागरासारखें आहे असें ह्मणतां येईल. परंतु रामरावणयुद्ध रामरावणयुद्धासारखेंच आहे. त्यास दुसऱ्या कोणाचीही उपमा देतां येणार नाहीं. या शब्दांनीं हेक्तर व आकिलीस यांच्या युद्धाचें वर्णन होमरला करतां आलें नाहीं त्यास कारण देवांचें मध्यें पडणें हें होय. भारती युद्धामध्यें, एक तरी देव मध्यें पडत असे ह्मणून कौरवपक्षांतील कर्ण, भीष्म, द्रोण यां सारख्या वीरांस अपयश आलें. पाण्डवांचा पक्षपाती जो कृष्ण त्याचीच ही कामगिरी होती. दुर्योधन कृष्णशिष्टाईचे वेळेस हेंच ह्मणतो. याचिया कुविद्या कौटाळें। पांडव झुंझ बांधिति काळें। याचेनि महिमान आगळें। पांडवाह्मनि सर्वथा ॥ १ ॥ सुभानंद स्वामीकृत उद्योगपर्व.

" मर ! जा ! विधिवश होइन, जेव्हां अवडेल जोव्हमुख्यांस" ॥ १८५ ॥
ऐसें वदुनी तो मग, घेइ शवांतून शूल उपटून ।
ठेवुन बाजूला त्या स्कंधांतिल कवच घेत काढून ॥ १८६ ॥
ग्रीकांचे पुत्र दुजे भोंवतिं जमले बरेच धांवून ।
*आश्चर्य करिति सारे भव्य अणी रुचिर मूर्ति पाहून ॥ १८७ ॥
क्षत हेक्तरास केल्याविण न उभा राहिला तिथें एक ।
पार्श्वस्थांस बघोनी ग्रीकांचा ह्मणत वाक्य कुणि लेंक ॥ १८८ ॥
" आश्चर्य केवढें हें ! नौभागा घातिली जयें आग ।
त्या हेक्तरास आतां स्पर्श सुखें करिति हें कसें सांग " ॥ १८९ ॥
ऐसें वदून कोणी करितो क्षत त्यास फार जवळून ।
ग्रीकांत उभा राहुन बोले आकिलीस कवच तें हरुन ॥ १९० ॥
" मित्र अहो ! नरवर हो ! ग्रीकांचे भूप हो ! अह्मां विजयी ।
अमरांनीं केलें, अज या वीरा करुन जित अशा समयीं ॥ १९१ ॥
यानें विनाश केला जितका केला मिळून सकलांनीं ।
परि या सशस्त्र जाउन निरखूं नगरा धरून धीर मनीं ॥ १९२ ॥
त्रायस्थांचे कैसे आतां आहेत बेत कळतिल ते ।

---

* शान्तरश्मिरिवादित्यः निर्वाण इव पावकः ।
बभूव स महाबाहुर्व्यपास्तगतजीवितः ॥ १ ॥ रामायण.

अर्थः—महाबाहु इंद्रजित गतप्राण होऊन त्याची हालचाल बंद झाल्यावर किरणरहित असलेला सूर्यच कीं काय अथवा शांत झालेला पावकच कीं काय असा दिसूं लागला.

आतां नाहीं हेक्तर! असतिल पुरिं कीं, भिऊन पळतिल ते ॥१९३॥
परि कां या गोष्टींचा चालविला मीं विचार चित्तांत ।
नौभागीं पत्रोक्लश, पडला आहे तसाच शत्रुहत ! ॥ १९४ ॥
अजुनी न शोचिला ग्यां किंवा पुरिला निखातभूमींत ।
राहीन जीवलोकीं तों मी त्या बाळगीन कीं स्मृतिंत ॥ १९५ ॥
हेदीसा गेल्यावर होत मृतांचें जनांस विस्मरण ।
तेथेंही मित्राची ठेविन मी मानसांत आठवण ॥ १९६ ॥
परि या ग्रीकांनों अज, तरुणांनों विजयगीत या गाऊं ।
नौभागातें परतुन घेउनियां यास आज या जाऊं ॥ १९७ ॥
अह्मि नेतों विजयश्री ! अभिजाता हेक्तरास अजि वधिलें ।
ज्यातें त्रायस्थांनीं देवापरि नित्य नगरिं पूजियलें !" ॥ १९८ ॥
ऐसें बोलुन योजी अनुचित कृति फार हेक्तराविषयीं ।
पादस्नायूंस तयें पाडियलें च्छिद्र पादतलिं उभयीं ॥ १९९ ॥
बांधुन रथास ठेवी चर्माच्या आंत रज्जु ओंवोनी ।
ठेवितसे तन्मस्तक खालीं फरफटविण्यास भूवरुनी ॥ २०० ॥
घेऊन कवच अपुलें झाला आरूढ निज रथामाजी ।
मारी कशा हयांतें कटकांत धांवडावया सहजीं ॥ २०१ ॥
होतें मनांत ह्मणुनी त्यांनींही ठोकिली तदा पळ ती ।
वीराचें शव मागें जातां फरफटत धूळ उडत अती ॥ २०२ ॥
केशकलाप तयाचा लोळे धरणीवरून मार्गांत ।
भरलें धुळिंत तयाचें मस्तक जें सुभग पूर्वि सर्वांत ॥ २०३ ॥

व्हाया अपमान तया अरिच्या करिं जुपितरें असे दिधलें ।
जन्मप्रदेशिं ह्मणुनी तच्छिर सारें धुळींत बहु भरलें ॥ २०४ ॥
फेंकुन शिरोवगुण्ठन उपटोनी केश रडत तज्जननी ।
कारण पुत्र तियेनें ऐशा दुःस्थितिंत पाहिला नयनीं ॥ २०५ ॥
दीन स्वर काढितसे प्रिय त्याचा जनक आर्तहृदय अतां ।
शोकग्रस्त जहाले नगरीं सर्वत्र लोक हें बघतां ॥ २०६ ॥
ह्मणजे क्षणांत झालें आतां यासारखें ह्मणा बहुत ।
कीं सारें इलियमपुर अंतर्दाही वरून धूमसत ॥ २०७ ॥
मोठ्या कष्टांनीं त्या वृद्धातें लोक आटपूं शकले ।
पाहे दुःखाकुल तो द्वारांतुन धांवण्यास जर आलें ॥ २०८ ॥
कर्दमिं लोळत विनवी प्रत्येका हांक मारुनी नांवें ।
"थांबा ! प्रिय मित्रांनों ! जाऊंद्या ! मज न धरुन ठेवावें ॥२०९॥
ग्रीकांच्या नौभागा नगरा बाहेर चाललों आजी ।
दुःखें पिडलों तरिही त्यातें विनविन करावया समजी ॥ २१० ॥
आहे प्रमत्त भारी मोठा तो साहसी तसा आहे ।
मान वया देतो का, वार्धक्यावरतिं सदय का पाहे ! ॥ २११ ॥
आहे असाच त्याचा जनक घरीं, भूप पेलिअस ज्यानें ।
देऊन जन्म याला वाढविलें प्रेमयुक्त भावानें ॥ २१२ ॥
तो नाशहेतु झाला त्रायस्थां मजासिं आणि विशेषानें ।
प्रथमवयीं वधिले मम तरुण कितीतरि रणांत कीं त्यानें ॥ २१३ ॥
केला न दुःखितें मीं इतका त्यांचाहि शोक सकलांचा ।

परि आज हेक्तराचा होत मला शोक अधिक एकाचा ॥ २१४ ॥
हेदीसाप्रति नेइल त्याचें तें दुःख खचितची मजला ।
कां न बरें तो मेला माझ्या हातांत वीर समयाला ! ॥ २१५ ॥
झालें असतें अमुचें शोकें रडतां तरी समाधान ।
*माझें, तन्मातेचें, ज्यांच्या पासून विदित तज्जनन "॥ २१६ ॥
वदुन असें वृद्ध रडे करिती आक्रोश सर्व नागरिक ।
त्रोजननारींमाजी शोक करी हेक्युबा पुढें अधिक ॥ २१७ ॥
+" रे माझ्या तनया ! अज दुःखी मीं वाचलें कशाला रे ! ।

---

* हुरहुर बहु खोटी रे ! उर ! उर न क्षणहि, काळजा ! तडक ।
असु हो ! निधाचि, न चुका पुत्रप्रस्थानकाळ, जा तडक ॥ १ ॥
हतभाग्यास मज मरण कैंचे धात्या ! अगा दयालो हे ! ।
ऐसें करणें होतें तरि घडिलें उर कशास बा ! लोहें ॥ २ ॥

दुर्योधनाचे मरणानंतर धृतराष्ट्रानें केलेला विलाप पंतानीं वर्णन केला आहे, त्यांतल्या दोनच आर्या वर घेतल्या आहेत.

+" हा ! धिक् ! कां ईशें मम लांबविला प्राणयुक्त उच्छ्वास ! ।
दुःखक्षम होउन मी पाहें तव शोकविषय मरणास ॥ १ ॥
आनन्दहेतु पितरां होतासी गर्वहेतु हेक्तर रे ! ।
राष्ट्रां ललामहेतु ! त्रायातें त्राणहेतु ! तूं तर रे ॥ २ ॥
मोठें सुखास तैसें नगरीच्या तूं यशास कारण रे ! ।
नायक वीर तिचा तूं, देव तिचा तूंच! काय हें पण रे ॥ ३ ॥
स्थित्यन्तर घातक हें ! एका दिवसांत केविं रे घडलें ।
शव नष्टसंज्ञ होसी ! मृण्मय कीं खण्ड थण्ड तें उरलें ॥ ४ ॥ पोप.

दुःखें सोशिलिं बहु मीं तुजचि अलें मरण शेवटाला रे ॥ २१८ ॥
* रात्रंदिन होतासी गर्वा मज हेतु सर्व नगरांत ।
त्रायीं नरनारींतें हितकर होतासी हें असे ख्यात ॥ २१९ ॥
ह्मणुनी तुजलागीं तीं देवापरि नित्य भजत कीं असत ।
जीवन्तपणीं त्यांचें होतासी यश महा असें ह्मणत ॥ २२० ॥
आतां त्या तुजला परि विधियोगें मरण येउनी ग्रासी!" ।
ऐसें वदुनी रडली. हेक्तरभार्या न येथ समयाशीं ॥ २२१ ॥
नव्हतें हें तिज कळलें, नव्हतें कुणिं आज कळविलें तिजला ।
सांगेल दूत कैसा नगराबाहेर कान्त कीं पडला ॥ २२२ ॥
होती विविक्त मंदिरिं बसलेली विणित भव्य चित्रपट ।
होती वीण दुहेरी, तीवरि भरि रंग विविध आणि दाट ॥ २२३ ॥
तेथील सुकेशींतें दासींतें ठेवि ती असें कथुनी ।
कीं ठेवा अग्निवरी कढई त्रिपदी. मधेंच येऊनी ॥ २२४ ॥
हेक्तर येइल परतुनि समरांतुन, त्यास घालणें स्नान ।
मूर्ख पहा ही कुठली! ठावें तिजला न हें वर्तमान ॥ २२५ ॥
आज मिनर्वेनें त्या आकिलीसाच्या करें विजित केलें ।
स्नानविलेपनकार्यांपासुन त्या दूरवर असे नेलें ॥ २२६ ॥
बुरुजावरुन तियेनें ऐकियेलें स्पष्ट दीर्घ रोदन तें ।
कंप भरे अङ्गिं तिच्या खालिं पडे दीर्घसूत्रवेष्टन तें ॥ २२७ ॥

---

* हा ! वत्सा ! धैर्यनिधे ! हा वत्सा जनमनोहराऽकारा ! ।
हा ! वत्सा ! कुलतिलका ! हा ! वत्सा ! सर्व सद्गुणाधारा ! ॥१॥ सुभद्राविलाप.

दासींस सुकेशींतें बोले तत्क्षणिं "पुढें अशा या गे ।
कृत्यें काय जहालीं बघतें दोघी चला न व्हा मागें ॥ २२८ ॥
पूजार्ह श्वश्रूचा स्वर कानीं मम अला अतां वाटे ।
उरिं उडतां हृदय पहा येतें बाहेर जणुं मुखावाटे ॥ २२९ ॥
अवयव जड मम झाले! प्रायमजांवरतिं येत संकट तें ।
राहो वृत्त अहह! मम कर्णांपासून दूर हें परतें ॥ २३० ॥
भीतें कीं अकिलीसें एका अज हेक्तरास राणिं वधिलें ।
समरांतुन नेउन त्या विक्रम सोडावयास लावियलें ॥ २३१ ॥
वीराच्या संघीं तो नाहीं कधिं लपुन राहिला मागें ।
जाई अजिंक्यविक्रम शत्रुवरी धांव घेउनी रागें" ॥ २३२ ॥
ऐसें वदुनी गेली प्रासादांतून पुढतिं धांवून ।
धडधड करि हृदय उरीं; धांवे उद्‌भ्रान्तचित्त ही दुरुन ॥ २३३ ॥
परिजन मागुन जाई; बुरुजावर पोंचली जनसमूहीं ।
पाहे तटासभोंवतिं दिसला पति तेविं अदय शत्रूही ॥ २३४ ॥
नगरा पुढुनी त्यातें ओढुन हय शीघ्र नेति नौभागा ।
अंधेरी नयनांवर येउन ती पडत मागल्या आंगा ॥ २३५ ॥
मोहपरायण झाला जीव तिचा दीर्घ टाकितां श्वास ।
पडलें शिरप्रसाधन पुष्पस्रक् केशबंध समयास ॥ २३६ ॥
अवगुंठन हेमाचें पडलें खालीं; तियेस तें प्रथम ।
व्हीनसनें दिधलें त्या लग्नाच्या सोहळ्यांत कीं परम ॥ २३७ ॥
एइशानप्रासादीं वैवाहिक धन बरेंच देऊन ।

त्यावेळीं घरिं अपुल्या हेक्तर गेला तियेस घेऊन ॥ २३८ ॥
होत्या बऱ्याच जवळी जावा तैशा अनेक ज्या नणदा ।
पडता सांवरती त्या आला तिज मृत्युतुल्य मोह यदा ॥ २३९ ॥
होतां प्रबोध तिजला, जीवाला चेतना जरा येतां ।
त्रोजन नारींतें ती बोले स्फुंदून हुंदके देतां ॥ २४० ॥
"हेक्तर ! मी हतभागी ! दोघांचें दैव एकची आहे ।
त्रायीं प्रायममंदिरिं तूं, मी थीबांत उपजलें पाहें ॥ २४१ ॥
स्वच्छाय प्लाकसिं मीं एइशनाच्या सुरम्य हर्म्यांत ।
होतें लहान केवळ घालविले दिवस तेथ बाल्यांत ॥ २४२ ॥
हतभाग्यानें मजला वाढविलें या अशा अभागीला ।
फार बरें नच देता जनन जरी तो खरेंच असलीला ! ॥ २४३ ॥
हेदीसमंदिराला धरणीतालिं एकलाच तूं जासी ।
गर्हित दुःखामाजी विधवा ही टाकतोस सांग कशी ! ॥ २४४ ॥
त्यजितोस बाळ तान्हें ! मुलगा हा जन्म अपण ज्या दिधला ।
त्याचें हित हे हेक्तर ! मृत तूं करशील काय समयाला ? ॥२४५॥
अथवा त्याच्यानेंही काय तुझें हित जगांत करवेल ? ।
ग्रीकांच्या कष्टद या समरांतुन बाळ काय वांचेल ? ॥ २४६ ॥
जरि वांचला तरी त्या काढावे कष्ट लागतिल भारी ।
सीमा चिन्हें हलवुन क्षेत्रें घेतील हरुन जन सारीं ॥ २४७ ॥
त्या समकालीनांचें सुख तव विरहें न त्यास मिळणार ।
उद्विग्न चित्त राहिल, गालां भिजवील अश्रुजल फार ॥ २४८॥

पडल्यास गरज जाइल पितयाच्या मित्रमंडळिंत बाळ ।
अवगुंठन एकाचें दुसऱ्याचा चोळ धरिल तत्काळ ॥ २४९ ॥
कांहिंस दया सुटोनी देतिल याला लहानसा प्याला ।
भिजतील ओंठ त्यानें, रुचिला परि आर्द्रभाव तो कुठला! ॥ २५०॥
त्यातें तसाच कोणी भोगित जो सौख्य उभय पितरांचें ।
ढकलिल पानावरुनी चापट मारून एक जोराचें! ॥ २५१ ॥
परुषाक्षर त्यालागीं तेव्हां बोलेल निंद्य हें वचन ।
*'होउ महामारी तुज!' बाप तुझा करित येथ भोजन न! ॥२५२॥
मग येइल रडत घरा तेथोनी पुत्र आस्तिआनक्ष ।
माता अनाथ विधवा याचा घेऊं शकेल का पक्ष! ॥ २५३ ॥
पूर्वीं हाच खरोखर पितयाच्या अंकिं जाउनी बसत ।
अजमेद पुष्टिकर आणि केवळ तें अस्थिसार जो खात ॥ २५४ ॥
बालोचित रोदन तें थांबुनियां झोंप त्यास जर आली ।
मिष्टान्नपूरितोदर बाळ निजे मंचकीं न कधिं खालीं ॥ २५५ ॥

---

* पित्याच्या अभावें होणारा छल व तो पाहून त्याच्या अनाथ विधवा मातेला होणारें दुःख यांचें याहून सरस वर्णन विरळा. हा हेक्युबेनें केलेला विलाप **वा**ल्मीकिकृत **ता**राविलाप किंवा **म**ण्डोदरीविलाप या दोहोंहूनही करुणरसानें अधिक पुष्ट झालेला आहे. **का**लिदासानें वर्णिलेला **र**तिविलाप व **पं**तांनीं वर्णिलेले **सु**भद्राविलाप व **उ**त्तराविलाप हे सर्व वाचकांनीं एकवार वाचून याशीं तुलना करून पहावी म्हणजे हा हेक्युबेनें केलेला विलाप तितकाच सरस आहे असें आढळून येईल.

धात्रीच्या हस्तांची मृदुशय्या करित लाउनी लक्ष ।
पितृविरहें काढिल तो कष्ट अतां विविध आस्तिआनक्ष ॥ २९६ ॥
हें आडनांव दिधलें त्रायस्थांनीं तयास तें प्रथम ।
तूं पुररक्षक असतां होतें सारें यथार्थ तें परम ॥ २९७ ॥
सरपटणारे आतां कीटक खातील आज तुजलागीं ।
पितरांपासुन दूरी उघडा आहेस पडुन नौभागीं ॥ २९८ ॥
याच्या आधीं तुजला खाउनियां श्वान तृप्त होतील ।
सुन्दर सुभग झगे तव कामाला सांग काय येतील ॥ २९९ ॥
पडले भवनीं ते हे नारींनीं जे त्वदर्थ गुंफियले ।
उपयोग काय त्यांचा नाहीं जर तूं कधींच वापरिले ॥ २६० ॥
त्रोजन नरनारींच्या पुढतीं जाळीन घालुनी रास ।
ह्मणजे होइल तूझा केलासा मान योग्य समयास " ॥ २६१ ॥
ऐसें बोलुन रडली होउनियां शोकविव्हला भारी ।
करिती शोक तसाची तीसह तेथील इतर त्या नारी ॥ २६२ ॥

सर्ग २३ वा.

पत्रोक्लशाच्या सन्मानार्थ मर्दानी खेळ.

सारांशः—अकिलीस निद्रित असतां स्वप्नामध्यें पत्रोक्लश दृश्य होऊन त्याचा प्रेतविधि करण्यास सांगतो. त्याप्रमाणें तो मोठ्या समारंभानें करतो.

कालमानः—सर्गारंभीं तिसावा दिवस सरतो. त्या रात्रीं पत्रोक्लश अकिलीसास स्वप्नांत दिसतो. एकतिसावा दिवस चिता रचावयास लागणारीं लांकडें तोडण्यांत जातो. बत्तिसाव्या दिवशीं दहनक्रिया होते. व तेतिसाव्या दिवशीं मर्दानी खेळ होतात.

स्थलमानः—समुद्रतीर.

ऐसा शोक करित हे होते नगरांत लोक सर्वभर ।
हेलिस्पान्टा गेले नौभागा ग्रीक परत वीरवर ॥ १ ॥
जो तो अपुल्या नौकेमाजी जायास वेगळा झाला !
अकिलीसें नाहिं दिलें मिर्मिदनांतें तिथून जायाला ॥ २ ॥
बोले रणप्रियांला अपुल्या अकिलीस थोर मित्रांला ।
"जवनहयांसह तुह्मीं मित्र अहो ! मिमिर्दन बरे आलां ॥ ३ ॥
दृढशफ हय न रथांचे सोडावे, तेच घेउनी जावे ।
पत्रोक्लशमरणास्तव जावुनि जवळी तयास शोचावें ॥ ४ ॥
मान असाच मृताचा शोक करावा खरेंच पोटभर ।
सोडुन मग हय आह्मीं भोजन करुं सर्व जमुन पुष्टिकर " ॥ ५ ॥
ऐसें तो वदला मग करिती तेथें विलाप सर्वजण ।

चाले आकिलीस पुढें मागुन हांकिति हयांस जन अपण ॥ ६ ॥
घालिति शवासभोंवति शोकाकुल ते प्रदक्षिणा तीन ।
देती तयांस झाली थेटिस मग शोकलालसा दीन ॥ ७ ॥
अश्रुक्लिन्न जहाले पुलिन, तसा शस्त्रभारही भिजला ।
मोठ्या रणाधिपास्तव औत्सुक्यें गाळितात अश्रुजला ॥ ८ ॥
पेलिअसाच्या तनयें केलासे शोक परि अतोनात ।
मित्राच्या थण्ड उरीं संहारक ठेवुनी तदा हात ॥ ९ ॥
"स्वस्ति असो पत्रोक्लश ! आतां हेदीसमंदिरीं तव रे ।
दिधलीं वचनें तुजला पुरतीं पाळीन सर्व आज बरें ॥ १० ॥
ओढीत हेक्तराला आणुन देईन खाद्य कुतऱ्यांस ।
तुझ्या चितेपुढें आणि कापिन मी द्वादश त्रोजनांस ॥ ११ ॥
होतां तूझा वध मज होता कीं राग एवढा आला !"
ऐसें तो वदला अणि दुष्कृतिच्या चालवी विचारांला ॥ १२ ॥
मांडीत हेक्तराच्या थण्ड शवाचे बरेच तो हाल ।
मित्राच्या तिरडिपुढें हेक्तरशव ठेवि ओढुन नृपाल ॥ १३ ॥
नंतर सारे अपुलीं कवचें काढून ठेविती खालीं ।
अश्व रथाचे सोडुन वीरांची मंडळी तिथें जमली ॥ १४ ॥
आकिलीस मेजवानी देई त्यां सुखद और्ध्वदेहिक ती ।
परशूनें निजवीले धरणीवर वृषभ ज्यां नसे गणती ॥ १५ ॥
कापून टाकलेले होते त्यांचे गळे तया कालीं ।
में में करणारे अज आणि अजा तेथ कितिक तीं पडलीं ॥ १६ ॥

अग्नींत भाजण्यातें आणिले बहु शुभ्रदन्त सूकर ते ।
मेदोमय होते ते पडलेले सर्वभर जनानुमतें ॥ १७ ॥
वीरशवाच्या भोंवति वाहति बहु पाट रक्त रुधिराचे ।
अकिलीस खिन्न तरिही बाळगितां मरण चित्तिं मित्राचें ॥ १८ ॥
अगमेम्ननाकडे त्या ग्रीकाधिप अन्य नेति वळवून ।
येतां तंबुकडे यां पाहतसे भूपमुख्य जवळून ॥ १९ ॥
दूतांतें सांगतसे ठेवाया पात्र एक अग्निवरी ।
इच्छी स्वच्छ कराया देइल अकिलीस अंग धुवुन जरी ॥ २० ॥
होतें शोणितमय तें, ऐकेना परि न किमपि अकिलीस ।
उलटें बोले " घेतों जोव्हातें शपथ करुन साक्षीस ॥ २१ ॥
मुख्य श्रेष्ठ असे जो साऱ्या स्वर्गस्थ त्या सुरांमाजी ।
प्रक्षालनादि विधि मी नाहीं घेणार खचित आधिं अजी ॥ २२ ॥
प्रथम चितेवर ठेविन पत्रोक्लशव, रचीन गवत वर ।
*उपटून केश माझे शमविन मम हा असह्य दुःखभर ॥ २३ ॥
या जीवलोकिं असतां दुःख असें मजसि फिरुन होइल न ।
घेऊं आतां सारें भोजन सर्वत्र मिळुन उरकून ॥ २४ ॥
नृवर ! उद्यां कर आज्ञा आणाया लांकडें वनांतून ।
सांगें तयां रचाया व्हावा उपभोग त्या मृता ह्मणुन ॥ २५ ॥
दुर्भेद्य तमामाजी सहजपणें तो क्षणांत उतरेल ।

---

*हिन्दू लोकांत "पितॄणां तृप्तिहेतवे "केला जात असलेला हा वपनविधिच म्हणावयाचा.

अश्रान्त अग्नि इकडे त्यातें जाळुन उगीच बैसेल ॥ २६ ॥
नयनां पुढुनी होतां नाहींसा, लोक विमुख होऊन !
येतील परत अपुल्या कामावर जावयास ते फिरुन " ॥२७॥
ऐसें तो वदला तें ऐकुनियां मान्य करिति सर्व जण ।
आसक्तिपूर्व करिती भोजन जन सज्ज जें नसे कृपण ॥ २८ ॥
त्यांनीं ठेवियली ती कांहींहि न आज यांत कमतरता ।
पानाशनोत्सवेच्छा घेती पुरवून सर्व जण आतां ॥ २९ ॥
तंबूमाजी जाती निद्रासुखसेवनार्थ सकल जन ।
पेलिअसाचा सुत परि संगें घेऊन सर्व मिर्मिदन ॥ ३० ॥
सागर गर्जुन जेथें भिजवी आस्फालनें स्वतीरास ।
तेथें निर्मल ठायीं पडुनीयां करितसे विलापास ॥ ३१ ॥
मधुमय निद्रा तत्स्थलिं तन्नेत्रीं हळुच अभिनिवेश करी ।
अभिभूत करुनि भूपा बसवितसे स्वाम्य पूर्ण त्यांजवरी ॥ ३२ ॥
चिंता शमल्या सर्वहि होत्या गांजित तदीय चित्तास ।
होते थकले जानू पळतां त्या हेक्तरा धरायास ॥ ३३ ॥
आतां स्वप्नीं झाला पत्रोक्लश दृश्य मन्दभाग्य तया ।
स्वर तोच नेत्र तेची, आकारहि तोचि रुचिर वळखाया ॥ ३४ ॥
सर्वांशीं तोच गमे, वस्त्रेंही तींच आज पांघरिला ।
येउन जवळ उशाशीं अकिलीसा या करीत उक्तीला ॥ ३५ ॥
* " निजसी अकिलीस ! कसा ! मातें विसरोनियां कसा जाशी ? ।

+ मृतांचे आत्मे स्थित्यंतर पावून कांहीं संस्कार होई तों तसेच ओळख

नाहीं उपेक्षिलें मज असतां जीवन्त, कां मग मृताशीं ॥ ३६ ॥
स्थापीं स्मशानभूमिंत, जाइन हेदीसमंदिरीं ह्मणजे ।
भूतें मला मृतांचीं अडविति साकार मार्गि हें समजें ॥ ३७ ॥
पार नदीच्या मजला देती त्यांच्यांत मिसळुनी नच तीं ।
हेदीस द्वाराशीं आहें मीं भ्रमण करित दमुन अती ॥ ३८ ॥
देई कर तूझा मज परिस विनंती पुन्हां न भेटेन ।
अग्नि दिल्यावर मज रे ! हेदीसाहुन न फिरुन परतेन ॥ ३९ ॥
तेथें गेल्यावरतीं होउन जीवन्त शक्य भाषण न ।
प्रियतम जनांस सोडुन चालविणें आत्मगत तिथें मनन ॥ ४० ॥
हें दूष्य दैव माझें आलें वांट्यास जन्म काळीं जें ।
नेई मातें हरुनी ! तूतेंही; स्वस्थ खचित अज न निजें ॥ ४१ ॥
त्रायतटाखालीं तव सुरसम अकिलीस ! नेमिलें मरणें ।
अणि एक मागणें मम, समजे तें सांगणें, तुवां करणें ॥ ४२ ॥
जर ऐकशील तर तूं ठेवीं एकत्र आस्थि तव व मम ।
दोघे तूझ्या भवनीं प्रेमानें वाढलों पुरा परम ॥ ४३ ॥
मीनीशिअस अणी नृप मुलग्याला ओपसाहुनी मजला ।
कारण मनुष्यवध मीं केला होता सदोष समयाला ॥ ४४ ॥
मूर्खपणानें वधिलें होतें म्यां आम्फिदामासतनया ।

ठेवून रहातात; कांहीं विधि करून घ्यावयाचे आहेत असें त्या देहविरहितांसही माहीत असतें व तें करून घ्यावें अशी त्यांची इच्छा असते. असे पुरातन समज होते.

इच्छा नव्हती माझी झाला तो द्यूतहेतु कोपाया ॥ ४५ ॥
माझा स्वीकार नृपें पेलिअसें आदरें तदा केला ।
तूझा सहचर ह्मणुनी वाढविलें अणुनियां योग्यतेला ॥ ४६ ॥
ह्मणुनी अस्थि रहाव्या दोघांच्या त्याच एक कबरींत ।
तव जननीनें दिधलें हेमाचें पात्र ह्मणुन चकचकित " ॥ ४७ ॥
त्यातें द्याया उत्तर बोले अकिलीस " मित्रवर कां रे ! ।
आलासी मज जवळी सांगसि हें कार्य सादरें सारें ॥ ४८ ॥
संपादिन गोष्टी या जैशा आज्ञापिल्या तुवां मजशीं ।
ये तूं जरा जवळ ये ! मारूं दे तुज मिठी अतां सरशी ॥ ४९ ॥
ह्मणजे शोक कराया आह्मां फावेल पोटभर आज " ।
ऐसें वदुनी तेणें स्नेहानें हस्त पसरिले सहज ॥ ५० ॥
मित्र न सांपडला तों, गेलें तें भूत जल्पना करितां ।
शिरुनी भूमिंत झालें तेव्हां अदृश्य धूम्र जणुं विरतां ॥ ५१ ॥
अकिलीस होत जागा खडबडुनी फार विस्मयाकुल तो ।
टाळी वाजवि हस्तें आणी हे शब्द दुःखमय वदतो ॥ ५२ ॥
" हेदीसाच्या भवनीं आत्मा साकार तो खरा राहे ।
हा ! धिक् ! त्यापरि नाहीं स्पृश्य असा देह हें कसें पाहें ? ॥ ५३ ॥
होतें जवळ उभें तें रात्रभरी भूत पत्रोक्लशाचें ।
आर्तस्वरांत कांहीं शोकाकुल बोललें मला वाचे ॥ ५४ ॥
मातें सांगुन गेलें करणें जें जें मला अमुक अमुक ।
आश्चर्य थोर ! दिसलें तें त्याच्या सारखें कसें अचुक ! " ॥ ५५ ॥

ऐसें तो वदला मग सर्वांतें शोकलालसा आली ।
रडति शवापुढतीं जन अरुणाङ्गुलि ती प्रभात तों झाली ॥ ५६ ॥
अगमेम्नन इकडे मग देई लावून अश्वतर चपल ।
संङ्गें सेवक धाडी; ईर्ष्यायुत जाहले तदा सकल ॥ ५७ ॥
उठवून अणिक पाठवि त्यांसह तो वीर मेरिआनीस ।
ज्यास इदामिनिअस नृप पोषितसे भृत्य ह्मणुन पंक्तीस ॥ ५८ ॥
दारुच्छेदक परशू रज्जू पिळदार घेति हातांत ।
आपण मागुन चालति मार्गीं जों अश्वतर पुढें जात ॥ ५९ ॥
चढले चढाव भारी आले उतरून उतरणी बहुत ।
सरलपथां क्रमिति किति! वक्रपथां क्रमिति परि न ते चुकत ॥ ६० ॥
बहुनिर्झर अद्रि इदा, त्याच्या शिखरावरील रानांत ।
जातां ते ओकतरू बुरुजासम उंच त्यां तिथें दिसत ॥ ६१ ॥
तीव्राग्रपरशुघातें त्यांची करिती बरीचशी तोड ।
पडतां वाजति बहु तरु, नंतर ते ग्रीक चालविति फोड ॥ ६२ ॥
भारे उन्नत बांधुन देती लावून खेंचरांवरतीं ।
प्राणी ते भूमीला दुखविति चेंपून शफ कठीण अती ॥ ६३ ॥
निबिड अशा गुल्मांतुन समभूवर जावया त्वरा त्यांस ।
दारूच्छेदक सारे घेती खोडें करांत समयास ॥ ६४ ॥
कारण तसेंच त्यांतें सांगुन ठेवींत मेरिआनीस ।
ज्यास इदामिनिअसनृप पोषितसे भृत्य ह्मणुन पंक्तीस ॥ ६५ ॥
नंतर ठेविति खण्डें तीरावर सर्वही व्यवस्थेनें ।

अकिलीसें योजियलें बांधाया कबर परम पटुतेनें ॥ ६६ ॥
पत्रोक्लशा व त्याही दोघा होईल एक सौख्यकर ।
वेळांत अल्प त्यानीं काष्ठांच्या राशि घातल्या सभर ॥ ६७ ॥
नंतर सारे मिळुनी एका ठायास जाउनी बसले ।
आज्ञावच अकिलीसें मिर्मिदनां लागलेंच सांगितलें ॥ ६८ ॥
शस्त्रास्त्रें घेउनियां, जोडा हय आपुल्या रथांलागीं ।
सारे उभे रहाले शस्त्रास्त्रें नीट चढवुनी जागीं ॥ ६९ ॥
वीर रथावरि चढले सूतहि जाऊन बैसले पुढतीं ।
घोडेस्वार निघाले, निघत पदाती जयां नसे गणती ॥ ७० ॥
पत्रोक्लशास मध्यें नेती वाहून थोर सहचर ते ।
कापून केश अपुले प्रिय जन वाहति तदा शवावर ते ॥ ७१ ॥
झांकोनी केशांनीं गेलें शव सर्व अल्प कालांत ।
पत्रोक्लश मस्तक पथिं चाले अकिलीस धरुन हातांत ॥ ७२ ॥
दुःख करी कीं धाडी हेदीसाच्या गृहास मित्राला ।
होतें अकिलीसानें दावियलें स्थल तिथें जमाव झाला ॥ ७३ ॥
खालीं शव ठेवोनी काष्ठें रचुनी करीत ते रास ।
चपलपदें अकिलीसें ठेवियली स्मृति यथार्ह समयास ॥ ७४ ॥
दूर चितेहून उभा, कापी निज पीतवर्ण केशांला ।
स्पर्किअसास्तव तेणें वाढविलें करुनियां प्रयत्नांला ॥ ७५ ॥
कृष्णांबुधीकडे मग पाहुनियां शोकयुक्त नृप वदला ।
“ स्पर्किअस व्यर्थ किं रे, तात तुला नवस बोलला असला ! ॥ ७६ ॥

' कीं प्रियदेशाला हा येइल जेव्हां रणातुनी परत ।
तेव्हां अर्पिल कापुन केश तुला हे बरेच अणि वितत ॥ ७७ ॥
शतमेध करिल नंतर कापिल तैसेच मेष पन्नास ।
उगमाशीं जेथ असे वृक्षांची राजि रुचिर नयनांस ॥ ७८ ॥
तूझें स्थंडिल वासित जेथें, तेथें करील हें सारें ' ।
हें वृद्ध बोलिला परि नाहीं केलेंस मान्य नवसा रे ॥ ७९ ॥
अणि आतां निश्चित कीं जाइन नच जन्मभूमिला परत ।
संगें न्याया अर्पिन सारे पत्रोक्लशास हे वितत " ॥ ८० ॥
ऐसें वदुनी तेणें मित्रकरीं केश ठेविले जपुन ।
सर्वांमध्यें तेव्हां उद्‌भवली शोकलालसा ह्मणुन ॥ ८१ ॥
अस्ता गेला असता रवि यांचा येथ रडति जे बसुनी ।
केलें आकिलीसें परि भाषण अगमेम्ननास जवळूनी ॥ ८२ ॥
" हे एत्रिअसज तूझें ऐकति हे ग्रीक सर्वही वचन ।
ह्मणुनी आतां येथुन देईं तूं घालवून सर्व जन ॥ ८३ ॥
शोक पुरेसा व्हाया शक्य असे, वेळ कांहिं गेल्यास ।
इतर जनांतें सांगें भोजन करण्यास सिद्ध समयास ॥ ८४ ॥
आहे शव अमुच्याशीं राखूं तें फार आज काळजिनें ।
अधिपति मात्र असूं दे विलपनकृति साधुं सर्व संमतिनें " ॥ ८५ ॥
अगमेम्नन नृवर असें ऐकुन वच घालवीत लोकांस ।
ते गेले नौभागा, उरले ते सतत करिति शोकास ॥ ८६ ॥
रचीति चिता ते काष्ठें एकावर एक नीट डाळोनी ।

शत पाउलें चितेची लांबी रुंदी धरून मोजोनी ॥ ८७ ॥
ठेविति शव राशिवरी कार्य असे खचित फार दुःखाचें ।
भूवर आपटती पद आणिति असे वृषभ वक्र शृंगांचे ॥ ८८ ॥
पीन अजा आणोनी त्यांच्या काढून घेति चर्मांस ।
करुनी सिद्ध यथाविधि लाविति आंतील भाग कार्यास ॥ ८९ ॥
अकिलीसें सर्वहि त्या बलिंतिल काढोनियां वसा कांहीं ।
माखी मित्रशवातें पायांपासून वरतिं, डोक्याही ॥ ९० ॥
बलि सर्व चर्म काढुन वाटोळे ठेवि नीट लावून ।
तिरडीवर टेंकोनी ठेवी घट तैल आणि मधु भरुन ॥ ९१ ॥
उच्च ग्रीवा ज्यांच्या ऐसे हय चार फेंकि तीवरतीं ।
सोडी निश्वास, तिथें सहभोजी श्वान पाहुनी पुढतीं ॥ ९२ ॥
होते नउ ते सारे, त्यांतिल दोघांस कापुनी वाही ।
त्रोजन बारा तैसे वर रचि कापून तीक्ष्ण शस्त्रांहीं ॥ ९३ ॥
चित्तांत भूप चालवि कृत्यें बहु घोर सर्व काल अशीं ।
कालायस तीव्र सबल अग्नीतें योजि दहन कार्याशीं ॥ ९४ ॥
हेतु मनीं कीं त्यानें ध्यावें यांवरतिं करुन पोषण तें ।
मोठ्यानीं अरडोनी मित्राशीं करित अल्प भाषण तें ॥ ९५ ॥
" स्वस्ति असो पत्रोक्लश ! आतां हेदीसमंदिरीं तव रे ।
दिधलीं वचनें तुजला पुरतीं पाडीन सर्व आज बरें ॥ ९६ ॥
तूझ्या चितेपुढें अज कापिन मी द्वादश त्रोजनांस ।
तव देहासहित तयां जाळिल तो अग्नि अज अनायास ॥ ९७ ॥

जाळीन हेक्तरा नच, देइन त्या खाद्य उचित कुतऱ्यांस "।
वचन बिभीषक ऐसें वदला भूपति खरेंच समयास ॥ ९८ ॥
परि न शवाच्या भोंवतिं त्या खाया लागले तदा कुतरे।
कारण जोव्हसुतेनें व्हीनसनें हांकिलें तयांस खरें ॥ ९९ ॥
रात्रंदिवस शवाच्या होती जवळी उभी; अणी सतत।
सुरभि विलेपन लावी पूर्ण सुधामय सुरम्य जें असत ॥ १०० ॥
ह्मणुनी न ओरखाडे पडले तत्तनुस ओढुनी नेतां।
डोक्यावरि आकाशीं घन पसरी कृष्ण, फीबस विजेता ॥ १०१ ॥
व्याप्त शवानें स्थल जें त्यावर पडली ह्मणोनियां च्छाया।
नाहींतर भानूच्या तापानें सुकुन जाति तत्काया ॥ १०२ ॥
अवयव वाळुन जाते झाल्या असत्या शिराहि तडतडित।
पत्रोक्लशशव इकडे घेइ चितेवर न पेट हें दिसत ॥ १०३ ॥
अकिलीसानें ह्मणुनी आणिले निज मनिं विचार मग दुसरे।
विनवीत बोरिआसा झेफिरसा दोन जे जगीं वारे ॥ १०४ ॥
ठेवियलें नवसोनी करण्यातें यज्ञ मग तदर्थ तयें।
हेमाच्या पात्रांतुन तर्पणजल ओति वरतिं तो विनयें ॥ १०५ ॥
आमंत्रण त्यांस करी येउन जाळावया झणीं शव तें।
अविलंबें काष्ठांनीं घ्यावें जाळोनि तेविं अपणातें ॥ १०६ ॥
ऐके इरिस तयाची नम्र विनंती ह्मणोनियां उठुनी।
पवनांकडे निघाली करण्याचें दूत कार्य योजूनी ॥ १०७ ॥
झेफिरसासह होते जमलेले सर्व ही घरीं वारे।

होते करिते तिथें ते आनंदें भोजनोत्सवा सारे ॥ १०८ ॥
इरिस त्वरा करोनी प्रस्तरमय देहलिंत उभी राहे ।
प्रत्येक उठुनि तिजला बोलावी नयनिं जो तिला पाहे ॥ १०९ ॥
ती परि तेथ बसाया नाकारुन बोलली असें वचन ।
" न लगे आसन, कारण सागरिं करणें पुन्हा मला गमन ॥११०॥
इथिओपिअन तया स्थलिं करती शतमेध अज सुरांकरतां ।
मजला भाग बळीचा आहे मिळणार तेथ मी जातां ॥ १११ ॥
विनवीत बोरिआसा झेफिरसा यावयास अकिलीस ।
कीं तेथ पेटवावी थोर चिता रचिलि उचित अवधीस ॥ ११२ ॥
पत्रोक्लशशव वरतीं ठेवुनियां ग्रीक सर्व हे रडती ।
ह्मणुनि चिता रचिलेली करणें अज होय निरवशेषा ती" ॥ ११३ ॥
ऐसें वदुनि खरोखर तेथोनी इरिस चालती झाली ।
पुढतिं घना घालोनी घाईनें मण्डळी मग निघाली ॥ ११४ ॥
वाहत वाहत वेगें जलधीशीं संभ्रमांत ते आले ।
सर्वत्र घोष पसरे, ऊर्मि वरी उठुनि जलधिजल हाले ॥ ११५ ॥
सुफल त्रोदा गेले आणी ते पोंचले चितेवरतीं ।
घग्ध्वनियुक्त जळाया लाविति अग्नीस, ते प्रचण्ड अती ॥ ११६ ॥
फिरति चितेच्या भोंवतिं कर्कश रव करुन तेथ रात्रभरी ।
ज्वाला हलवुन सोडिति, मग पेला पेलिअसज हातिं धरी ॥ ११७ ॥
हेमाच्या भांड्यांतिल घेई ओतून आंत मधु मदिरा ।
सादर ओतुन खालीं टाकी भिजवून भूमि ती रुचिरा ॥ ११८ ॥

पत्रोक्लशपितरांतें तर्पितसे मारुनी तदा हांका ।
चाले चितेसभोंवतिं कण्हतां दुःखार्त वीर हा बांका ॥ ११९ ॥
मित्राच्या अस्थींतें जाळी अकिलीस शोक बहु करुन ।
परिणीतसुतास्थीतें पेटवितां रडत जनक जणुं बसुन ॥ १२० ॥
वेळीं ल्यूसिफरानें येवोनी पाडिला प्रकाश तदा ।
पसरे प्रभात सागरिं कुंकुमवसना सुरूप अणि सुखदा ॥ १२१ ॥
झाली चिता विवर्णा ज्वाला गेल्या विझोनियां सकल ।
वारे निघोन गेले जाया स्वगृहा करून कृति सफल ॥ १२२ ॥
थ्रेशिअनाम्बुनिधीच्या मार्गें जातां उचंबळे जल तें ।
गेला खवळुन अम्बुधि, जल ज्याचें भयद गर्जना करतें ॥ १२३ ॥
दूर चितेपासोनी गेला आकिलीस भागला भारी ।
पडतांच भूमिवरतीं गांठी निद्रा तयास सौख्यकरी ॥ १२४ ॥
दुसरे तथापि जन ते आकिलीसा भोवतीं तदा जमती ।
त्यांची गडबड होतां जागा हा होतसे तदा नृपती ॥ १२५ ॥
त्यातें कर कुणि देतां बसला राहून तो तयां वदला ।
" हे एत्रिअसज ! नृपते ! तुह्मीं ग्रीकाग्रणी इथें जमलां ॥ १२६ ॥
पहिल्यानें वच माझें मान्य करावें अवश्य जें सुकर ।
अर्धि अग्निदग्ध तितुकी विझवुं चिता मद्य ओतुनी सभर ॥ १२७ ॥
* नंतर साऱ्या जमवूं जपुनी पत्रोक्लशास्थि निवडून ।

---

* याप्रमाणें अस्थिसंचय करण्याचा हिंदुलोकांत प्रघात आहे. परंतु त्यांच्यावर कबर न बांधतां त्या गंगेंत टाकण्यांत येतात.

त्याहीं वळखूं येतिल, मध्यें होता चितेवरी ह्मणुन ॥ १२८ ॥
होते प्राणी दुसरे गेले ते जळुन सर्व बाजूस ।
रचितां भेद न केला हा हय अणि तो ह्मणाल माणूस ॥ १२९ ॥
मित्राच्या अस्थि अतां ठेवूं घालून हैमपात्रांत ।
देउं वसेचे जाडे मग थर बाहेर एक अणि आंत ॥ १३० ॥
हेदीसमंदिराला जाणें मागुन असे बरें मजला ।
इच्छा माझी ह्मणुनी बांधा हो कबर योग्य समयाला ॥ १३१ ॥
मोठी फार नसावी, रुंद असावी तशीच बेताची ।
परिसा एकियनांनों! उंच हवी ती खरेंच दोघांची ॥ १३२ ॥
नौभागीं सर्वांनां मागें सोडुन खचीत जाईन!" ।
ऐसें तो वदला, तें मानिति ते, जरि करीत घाई न ॥ १३३ ॥
अधिं अग्निदग्ध तितुकी विझविति मद्यें चिता क्षणीं सभर ।
भस्माची राशि तशी बसली चेंपून खालतीं प्रखर ॥ १३४ ॥
नंतर साऱ्या जमविति जपुनी पत्रोक्लशास्थि ते रडत ।
सन्मित्राच्या अस्थी ठेविति घालून हेमपात्रांत ॥ १३५ ॥
देति वसेचे जाडे मग थर बाहेर एक अणि आंत ।
मसृण क्षौमपटीं त्या ठेविति तंबूंत झांकुनी वितत ॥ १३६ ॥
पाया घेती घालुन रेखुनियां क्षेत्र थोर कबरीचें ।
मृण्मय रास रचिति वर कार्य मुळीं असत अल्प अवधीचें ॥ १३७॥
ऐशी कबर रचोनी गेले ते ग्रीकमुख्य नृप परत ।
अकिलीस घेइ ठेवुनि लोक दुजे जे सभेंत मग बसत ॥ १३८ ॥

नौभागांतुन अणवी मोलाचीं पारितोषिकें भारी ।
पेले, तिवया, वाजी, वृषभांचे संघ, थोर अश्वतरी ॥ १३९ ॥
तनुमध्या वनिता, तशिं शस्त्रें लखलखित तीक्ष्ण लोहाचीं ।
पहिल्यानें योजितसे शर्यत कीं चपल सबल अश्वांची ॥ १४० ॥
पहिल्यातें देउं करी ललना निर्दोष जी क्रियाकुशल ।
द्वाविंशति मापांची त्रिपदी जिस मूठ आणि रम्य तल ॥ १४१ ॥
दुसऱ्या तुरगी द्याया देउं करी, फक्त जिस सहा वर्षें ।
दम्या गर्भवती ती नाचे मधुनी बरीच जी हर्षें ॥ १४२ ॥
तिसऱ्यातें देउं करी त्रिपदी ती रम्य चार मापांची ।
अग्निस्पर्शें नाहीं झाली जी मलिन अशि नवी साची ॥ १४३ ॥
करि देउं हेम चवथ्या टॅलेन्तें दोन पूर्ण वजनाला ।
करि देउं पांचव्यातें पात्र दुहेरी न अग्नि ज्या शिवला ॥ १४४ ॥
ताठ उभा राहोनी ग्रीकांतें करितसे असें वचन ।
" हे एत्रिअसज! दिसतें क्रीडाङ्गणिं पारितोषिकार्थ धन ॥ १४५ ॥
ग्रीकांनों बघतें ते वाट रथींची बराच कीं वेळ
आह्मीं ग्रीकांनीं बहु केला समरीं परार्थ बहु खेळ ॥ १४६ ॥
पहिलेंच पारितोषिक न्यावें तंबूंत मिळवुनी अज मी ।
माझे हय इतरांतें भासविती धांवण्यांत फार कमी ॥ १४७ ॥
जोडी अमर दिली ती नेप्चूनें मम पित्यास पेलिअसा ।
पितयें मजला दिधली; राहिन मी स्वस्थ बसुन येथ असा ॥ १४८ ॥
कारण सबल नियन्ता आहे समरीं गमाविला त्यांनीं ।

केश जयांचे चोळी लावुन जो स्निग्ध तैल हस्तांनीं ॥ १४९ ॥
काढी धुवून नंतर, ओतोनी वरतिं बहुत विमल जल ।
त्यासाठीं खेदानें रडति उभे राहुनी असे विकल ॥ १५० ॥
लोळति धुळींत चूडा यांस उभे ठेवि दुःख हृदयींचें ।
ह्मणुनी अन्य तुह्मीं जन मिळवा यश या सुलभ्य संधीचें ॥ १५१ ॥
रथ असती सुरचित आणि हय ज्यांचे वाटतात सुदृढ जयां ।
त्यांचें काम असे हें." वदत असें पेलिअसज वचन तयां ॥१५२॥
उठले रथी चपल मग. यूमेलस अश्वकुशल तो नृवर ।
आड्मीतससुत लोकीं होता विख्यात शूर जो चतुर ॥ १५३ ॥
दायोमीद अनंतर उठुन अला तैदिअसज तो वीर ।
त्रासाचे अश्व तयें अणिले जोडुन धरोनियां धीर ॥ १५४ ॥
जे घेतले हरोनी पूर्वीं समरांत ईनिआसाचे ।
समयास अपालोनें जीवित परि रक्षिलें असे त्याचें ॥ १५५ ॥
तो एत्रिअसज नंतर उठुनि अला तेथ पीतकेशांचा ।
लावुन जोडी सुन्दर आणी नृप मेनिलास रथ साचा ॥ १५६ ॥
अगमेम्नन नृपतीची घोडी तीमाजि एक ईथी ती ।
बीजाश्व अन्य तैसा पोदार्गस, मिळुन दोन हीं दिसती ॥ १५७ ॥
अन्कैसीसज नृप तो ईचीपोलस जनांत विख्यात ।
अगमेम्ननास देई घोडी परितोषदान जन ह्मणत ॥ १५८ ॥
वातत्रस्त इलियमा जाणें तेणें न त्यास मग पडलें ।
राहुन घरांत अपुल्या करणें आनंद, कृत्य हें उरलें ॥ १५९ ॥

सिकियानें वास्तव्य करी जोव्हानें ज्यास धन दिलें विपुल ।
त्याची जोडी घोडी ही ईथी धांवण्यांत जी कुशल ॥ १६० ॥
नेस्तरज आन्तिलोकस चवथा आतां पुढें असे सरला ।
सुन्दर आयाळीच्या शृंगारी निज सुरम्य अश्वांला ॥ १६१ ॥
चपलपदें आकिलीसें रथ त्याचा ओढुनी पुढें अणला ।
तेव्हां तात तयाचा, जवळ उभा राहता असे झाला ॥ १६२ ॥
उपदेश करि हिताचा पुत्राला लांबलचक सुज्ञाला ।
"हे आन्तिलोकसा ! तूं नेप्चूना अवडसी व जोव्हाला ॥ १६३ ॥
आश्विक विद्येंत तुला तरुणाला निपुणता दिली त्यांनीं ।
गरज नसे मोठीशी तुज शिकवावें तियेंत इतरांनीं ॥ १६४ ॥
इष्टस्थाना कैसें जावें तें जाणसी सुरक्षित रे ।
मंद जरा परि तव हय शक्य असे कीं प्रसंग अज गुदरे ॥१६५॥
इतरांचे तुरग चपल तुजहुन परि पेंच त्यांस नच कळती ।
परि लाडक्या अतां ये, आठव युक्ति प्रयुक्तिची सुकृती ॥ १६६ ॥
नाहींतर हातांतुनि जातिल हीं पारितोषिकें सुटुन ।
*युक्तीनें, न बलानें, च्छेदक लांकूड टाकि फोडून ॥ १६७ ॥
नौका वातोत्क्षिप्ता नाविक जलिं चालवीत युक्तीनें ।
एक रथी दुसऱ्यातें हरवितसे युक्तिनें न सक्तीनें ॥ १६८ ॥
'रथ हय उत्तम माझे' ज्यास असा भरवसा मनीं वाटे ।
इकडुन तिकडे फिरतो, त्याचे हय जाति सोडुनी वाटे ॥ १६९ ॥

---

*बुद्धिर्यस्य बलं तस्य.

त्यातें न आंवरी तो, परि जो नर जाणतो उपाय बरे।
त्याचे अश्व असूं दे असले जर हीनबल खरोखर रे ॥ १७० ॥
इष्टस्थानावरतीं ठेवुनियां दृष्टि मारि तो वळसा।
जातां निरुंद पथिं तो, चुकत नसे वळविणें रथा सहसा ॥ १७१ ॥
करिं चर्मरज्जु धरतो, पुढल्यावर लक्ष ठेवितो स्थिर तो।
इष्ट स्थान तुला परि आहे सुव्यक्त ह्मणुन दाखवितों ॥ १७२ ॥
ह्मणजे चूक न करशिल; काष्ठ असे एक तेथ सुकलेलें।
लांब असे हात भरी, उंच पुढें वाटतें सदा ठेलें ॥ १७३ ॥
अविनष्ट अजुन आहे लार्चाचें वा असेल ओकाचें।
पर्जन्यमलिन नच तें; दोन तिथें दगड शुभ्र रंगाचे ॥ १७४ ॥
मार्ग जरा रुंद असे मण्डल परि सर्व ही सपाट असे।
स्मारक चिन्ह मृताचें असती ते दगड हे न शक्य कसें ?॥१७५॥
इष्टस्थल गतकालीं न्यायातें अश्व होय धांवडुन।
सांप्रतचें इष्टस्थल आकिलीसें तेंच नेमिलें ह्मणुन ॥ १७६ ॥
येतां यांजवळ जवळ घे तूं रथ आणि अश्व जवळ तव।
डाव्या कडेस नंतर आसानिं तूं तोल आपुला फिरव ॥ १७७ ॥
उजव्या बाजूच्या मग अश्वाला लाव हळुच चाबूक।
शिथिल लगाम करोनी इर्ष्या तूं आण समायिं त्यां अचुक ॥ १७८ ॥
इष्ट स्थाना जवळुन नेई डावीकडील अश्व तव।
चक्रांचा मध्य जणूं घांशी स्तंभास हें जनां दिसव ॥ १७९ ॥
घांसावें स्तंभां नच घेशिल दुखवून आपुले हय रे।

तुकडे पडुन रथाचे, अरिला आनंद तुजसिं लाज बरें ॥ १८० ॥
तरि माझ्या प्रिय पुत्रा! ठेवुनियां ध्यान सावधान रहा।
इष्ट स्थलास जाशिल होइल तव कीर्ति बा! जनांत महा ॥ १८१ ॥
तुजला धरील अथवा जाइल पुढतीं असा न मग उरला।
अद्रास्तसनृपतीचा हांको मागून कोणि अश्व भला ॥ १८२ ॥
× उत्पत्ति दिव्य त्याची फुकट! कथा तीच तेथ जर आले।
लाओमीदनहय ते, ज्यांचें पोषण सुरेख जरि झालें" ॥ १८३ ॥
नेस्तर ऐसें वदला; बसला जावोनियां निज स्थानीं।
पुत्रा सांगुन झालें प्रस्तुत सारें रहस्य संधानीं ॥ १८४ ॥
सुन्दर आयाळींच्या अश्वां शृंगारि मेरिआनीस।
टाकिति भूवरतिं चिठ्या होउन रथिं रूढ योग्य संधीस ॥ १८५ ॥
घोळी अकिलीस चिठ्या; पहिला नेस्तरज सोडतिंत आला।
दुसरा यूमेलस तो, तिसरा तो मेनिलास वीर भला ॥ १८६ ॥
त्याच्या नंतर ठरला जायाचा शूर मेरिआनीस।
वीरोत्तम तैदिअसज जायाचा ठरतसे अखेरीस ॥ १८७ ॥
राहति उभे क्रमानें इष्ट स्तंभास दावि अकिलीस।
समभूवर दुर दिसला, तेथ परीक्षक अला पसंतीस ॥ १८८ ॥
सुरसुन्दर जो जाणा सत्वर फीनिक्स जाउनी बसला।
अकिलीसाचा होता जो का रणिं कवचवाह नित्य भला ॥ १८९ ॥

× नेप्चूनानें भूमिंत त्रिशूल मारून हा घोडा निर्माण केला अशी कथा आहे.

वृत्तान्त निवेदाया ठेवुनियां लक्ष या हयांवरतीं ।
सारे प्रतोद अपुले एकाक्षणिं ते उगारुनी धरिती ॥ १९० ॥
मारून रश्मि पृष्ठीं उत्तेजन देति सतत शब्दानें ।
नौभागांतुन गेले समभूमीवरुन पळत वेगानें ॥ १९१ ॥
संक्षोभित धूळि उडे अश्वांच्या तेधवां उराखालीं ।
झंझावातासम ती अथवा मेघासमान ती दिसली ॥ १९२ ॥
अनिलश्वासें झाली अश्वांची पाथिं विकीर्ण आयाळ ।
स्पर्शिति धरणिस रथ कधिं, घेति उडी वरतिं कांहिंसा काळ॥१९३॥
वाहक रथिं ताठ उभे विजयोत्सुक्यें उरीं उडे हृदय ।
उठवून धूळ पळती हांकिति उत्साह भरुन पुढतिं हय ॥ १९४ ॥
नंतर उलटुन आले हय आतां सागराकडे परत ।
शर्यतिचा पथ आला संपत तों मौज चांगली दिसत ॥ १९५ ॥
अश्वांच्या गतिलागीं ताण पडे पूर्ण धांवतां आज ।
फेरीससुताचे हय चापल्यें अणिति वाहुनी सहज ॥ १९६ ॥
त्रायांतिल हय नंतर दायोमीदास आणिति दुसऱ्यानें ।
दोघांमध्यें अंतर न बहु, जवळून पळति वेगानें ॥ १९७ ॥
बघतां वाटे मागुन चढतो हा काय त्या रथावरतीं ।
यूमेल्सांसदेशीं अश्वांचे श्वास उष्णता अणती ॥ १९८ ॥
मागून पळत होते त्यावरतीं टेंकुनी शिरें निज तीं ।
जाता पुढें अतां वा करता जय संशयित खरेंच अती ॥ १९९ ॥
राग अपालेला परि आला मनिं बहुत तैदिअसजाचा ।

पाडी प्रतोद खालीं होता चमकत तदीय करिं साचा ॥ २०० ॥
याच्या नयनांतुन मग कोपाकुल अश्रुवृष्टि गळुं लागे ।
कारण दिसे तया कीं जाति पुढें ते बरेच जे मागें ॥ २०१ ॥
नाहीं प्रतोद ह्मणुनी त्याच्या अश्वां इजा बहू झाली ।
कृति निंद्य अपालोची दुरुन मिनर्वेस चांगली दिसली ॥ २०२ ॥
गांठून लोकपाला देई त्याच्या प्रतोद ती हातीं ।
त्याच्या हयांस ईर्ष्या आणुन रागें चले जरा पुढतीं ॥ २०३ ॥
आझीतसतनयातें देवी गांठीत राग मनिं धरुन ।
तुरगींची मोडि धुरा, तत्क्षणिं त्या पळति मार्ग सोडून ॥ २०४ ॥
मधला दाण्डा वेगें धरणीवर लागलाच आपटला ।
चक्रांच्या जवळी जें आसन त्यावरुन वीर हा पडला ॥ २०५ ॥
फापसलें बाहुवरि तोंडावरि आणि नासिकाद्वारीं ।
अणखी कपाळ गेलें भ्रूदेशा जवळ चेंगरुनि भारी ॥ २०६ ॥
साश्रू नयन जहाले सरस स्वर होत गळिं निरुद्ध अतां ।
दायोमीदें अपुले वरतीं हय उडविले पुढें जातां ॥ २०७ ॥
कीर्ति मिनर्वेनें त्या दिधली अश्वांस देउनी बल तें ।
मागून पीतकेशी आला नृप मेनिलास हें दिसतें ॥ २०८ ॥
परि भूप आन्तिलोकस पितयाचे अश्व खूप धांवडवी ।
बोले " पुढें पळा हो ! करण्या दोघांस अज शिकस्त हवी ॥२०९॥
दायोमीदहयांशीं स्पर्धा करण्यास सांगतों मी न ।
त्यांस मिनर्वेनें बल दिधलें यश सारथ्या अज कमी न ॥ २१० ॥

एत्रिअसात्मज हय हे सत्वर गांठून मागूनी टाका ।
ईथी घोडी असुनी गेलि पुढें हा कलंक घेउं नका ॥ २११ ॥
तुह्मीं उत्तम असुनी कांहो ठरवून घेतसां हीन ।
एक तुह्मांला कथितों खोटें ठरणार यांत किमपिहि न ॥ २१२ ॥
नेस्तर तुमच्यावर मग नाहीं देणार लक्ष नृप कांहीं ।
अल्पार्घ पारितोषक मिळतां नेस्तर वधील लवलाहीं ॥ २१३ ॥
याहो त्वरा करोनी शक्य असे तेवढें अतां धांवा ।
संयत पथिं पुढतिं कसें जावें तो अचुक जाणतों कावा ”॥ २१४ ॥
ऐसें तो वदला मग फार धन्याचें तयांस भय पडत ।
कांहीं वेळ ह्मणोनी अधिक जवें अश्व ते पुढें पळत ॥ २१५ ॥
पुढला निरुंद पथ तो पोंकळसा आन्तिलोकसा दिसला ।
भगदाड भूंत होतें हेमन्तीं मार्ग हा प्रवाहाला ॥ २१६ ॥
वाहुनियां पथ गेला मार्गीं पडला निरुंदसा नाला ।
टाळून चक्रभंगा नेत तिथें एत्रिअसज निज रथाला ॥ २१८ ॥
परि आन्तिलोकसानें सोडुन पथ दृढशफां हयां नेलें ।
बाजुस त्यां वळवोनी, धाडस थोडें तयें अतां केलें ॥ २१८ ॥
त्याचे मागें लागे भीतीनें एत्रिअसज त्या अरडे ।
“हय अंवरिं आन्तिलोकस ! अविचारें हांकितोस कां इकडे ॥२१९॥
पथ हा अरुंद येथें, बाजूचा रुंद दिसतसे छान ।
मारुन रथास टक्कर दोघांचें करवशील नुकसान” ॥ २२० ॥
ऐसें तो वदला मग, अधिकचि हांकीत आन्तिलोकस तो ।

ह्माणी प्रतोद अणखी; जणुं नाहीं ऐकिलें असा दिसतो ॥ २२१ ॥
बलवन्त तरुण अपुल्या शक्तीचा करिति मिळुन अदमास ।
तेव्हां स्कंधावरुनी फेंकिति वलयें करून जोरास ॥ २२२ ॥
जितकीं दूर तदा तीं वलयें जातात आज हे तितके ।
दोघे समान पळती, पुढतिं परी एन्त्रिअसज तो न टिके ॥ २२३ ॥
आपण होउन तेणें थांबविलें हांकणें मुळींच हयां ।
कां कीं कठिणशफांची टक्कर होईल मार्गिं या समया ॥ २२४ ॥
रथ दोघांचे सुरचित तत्क्षणिं खालीं तसे उलटतील ।
झटतां जयार्थ दोघे धूळीमाजी खरेंच पडतील ॥ २२५ ॥
तो वीर पीतकेशी त्यालागीं चिढविण्या असें वदला ।
"नच अन्य आन्तिलोकस तुजविण कुणि मर्त्य दुष्ट जगिं झाला ॥२२६॥
चल नीच ! उगिच ह्मटलें ग्रीकांनीं सुज्ञ सुज्ञ रे तुजला ।
तुज लोक पारितोषिक देतिल देऊन शाप समयाला " ॥ २२७ ॥
ऐसें वदुनी तेणें अश्वां उत्तेजनार्थ वच केलें ।
" दुःखित अन्तःकरणें थांबु नका ! पाहिजे पुढें गेलें ॥ २२८ ॥
गुढघे पाय तयांचे दमतिल, तुमचे परी न लवकर ते ।
कारण त्या दोघांचें सरलें बल, धावतां कसें उरतें ?" ॥ २२९ ॥
ऐसें तो वदला मग फार धन्याचें तयांस भय पडत ।
कांहीं वेळ ह्मणोनी अधिक जवें अश्व ते पुढें पळत ॥ २३० ॥
गेले जवळी पुष्कळ; ग्रीक तया पाहती सभेंतून ।
पळती हे पुढतिं तशी धूळ उठे वरतिं फार भूवरुन ॥ २३१ ॥

प्रथम इदामिनिअस या अश्वां क्रीतननृपाल तो वळखी ।
क्रीडाङ्गणिं नव्हता तो, वेधगृहीं जो बसोनियां निरखी ॥ २३२ ॥
अश्वां उत्तेजन तो देई तें हा दुरून ऐकतसे ।
हय दर्शनीय कोणी जात पुढें हें बघे नृपाल तसें ॥ २३३ ॥
लोहित पिंगल त्याचा वर्ण असे सर्व इतर अंगाचा ।
चंद्राकृति शुभ्र टिळा सजवितसे भाग रुंद भाळाचा ॥ २३४ ॥
ताठ उभा राहोनी ग्रीकां उद्देशुनी करी वचन ।
" मित्र अहो ! ग्रीकांचे नायक हो ! सर्व मुख्य मुख्य जन ! २३५
मज एकल्यास येती वळखाया अश्व वा तुह्मांसहि ते ? ।
अश्व निराळेच पुढें धांवति ऐसें मला अतां दिसतें ॥ २३६ ॥
वाहक ही अन्य दिसे ! झाल्या मग काय वाजिनी विजयी ! ।
समभूवरुनि दुखापत कोठें तरि जाहली तया समयीं ॥ २३७ ॥
इष्ट स्तंभा वळसा घालुन जातां मला प्रथम दिसल्या ।
दिसति पुढेंहि न आतां ! समभूवरतिं खचित नच लपल्या ॥२३८॥
बघतों सर्वभरी मी निरखोनी मज तरी न त्या दिसती ।
इष्ट स्तंभा वळसा घालाया वाहका प्रयास अती ॥ २३९ ॥
तेव्हां बहुतकरोनी त्याच्या हस्तांतला लगाम गळे ।
घेउं न शकला वळसा वाजिनिंचें युग्म त्यास मग न वळे ॥२४०॥
पडला वीर असावा, गेला रथ सोडुनी असावा तो ।
जोडी वाजिनिंची ती गेली उधळोनियां असें ह्मणतों ॥ २४१ ॥
तुह्मीं उठुन बघा तरि, मजला वळखूं न येतसे नीट ।

इंतोलिअन असावा येत असे वीर जो पुढें धीट ॥ २४२ ॥
दायोमीद तनय हा तैदिअसाचा तुरंगदमनाचा"।
क्रोधें आजक्ष वदे त्यातें सुत ओइलीअस नृपाचा ॥ २४३ ॥
'उगिच इदामिनिअस कां! बडबडसी ज्यास अन्त मुळिंच नसे।
पळतात वाजिनी त्या नर्तक बघ दूर हें दिसे न कसें ॥ २४४ ॥
ग्रीकांत नससि कांहीं सर्वांहुन तूंच अज लहान वयें।
तव मस्तकांतुनी नच नीटपणें बघति नयन वस्तु तयें ॥ २४५ ॥
बोलत नुसता सुटसी! झालें नाहीं अवश्य तें तुजला।
तुझ्याहुन अधिक बरे येथें आहेत याच कार्याला ॥ २४६ ॥
पूर्वी होत्या, अजुनी यूमेलसवाजिनी पुढें असती।
यूमेलस येत पुढें धरुनी आतां लगाम निज हातीं" ॥ २४७ ॥
क्रोधें क्रीतननायक त्यातें उत्तर असें करी उलट।
"अपभाषणकुशल खरा निंदक आजक्ष! अससि थोर खट ॥२४८॥
दुसऱ्या कामांमाजी ग्रीकांहुन इतर अससि तूं न्यून।
रूक्षस्वभाव अससी! पण ये ठेवूं अर्धीच लावून ॥ २४९ ॥
त्रिपदीचा, पेल्याचा लावुन पण, नेमुं नृप तिराईत।
अगमेम्नन कथिल खरें कोणाचे अश्व जाहले विजित ॥ २५० ॥
तितुकें शिकावया तूं वरच्या वस्तू दुजांस देशील"।
नंतर आजक्ष उठे द्याया उत्तर तयास दुःशील ॥ २५१ ॥
निःसंशय दोघांचें जुपलें असतें बरेंच भांडण तें।
उठुनी अकिलीस परि ऐसें तेव्हां करीत भाषण तें ॥ २५२ ॥

" अधिक इदामिनिअस हे ! नलगे आजक्ष कलह अनुचित हा ।
सक्रोध दुष्ट ऐसें वच न करावें, उगाच येथ रहा ॥ २९३ ॥
ठेवाल नांव तुह्मी ऐशा गोष्टी करील जर दुसरा ।
क्रीडाङ्गणिं बैसोनी तुरगांवर दृष्टि द्या इथून जरा ॥ २९४ ॥
विजयोत्सुक हय सारे येतिल इतक्यांत पुढुन धांवून ।
तेव्हां प्रत्येकाला पहिला दुसरा दिसेल हय बसुन " ॥ २९५ ॥
ऐसें तो वदला तों तैदिअसाचा अला जवळ तनय ।
स्कंधावरी प्रतोदा टाकुन पळवीतसे सवेग हय ॥ २९६ ॥
मण्डळ करतां पुरतें वाटे उचलून धरित हय वरतीं ।
धूलीचे कण उठती मळविति ते वाहकास सभर अती ॥ २९७ ॥
वंगसुवर्णसुशोभित रथ करि तुरगानुगमन घडघडत ।
चक्रांच्यावलयांची मृदुल धुलीमाजि खूण नच पडत ॥२९८॥
ऐसे पळत अले ते मध्यें क्रीडाङ्गणीं अला नृवर ।
ग्रीवेचा व उराचा घर्म हयांचा धरा भिजवि सभर ॥ २९९ ॥
भास्वद्रथांतुनी नृप खालीं मारोनियां उडी उतरे ।
टेंकि धरेवरतिं कशा; आणि पुढें स्थेनिलस तसाच सरे ॥ २६० ॥
स्वकरांत पारितोषिक वामा धरुनी उदार मित्रांला ।
देई न्याया पटगृहिं, ताशि ती त्रिपदी सुरेख दिसण्याला ॥ २६१ ॥
अपणाचि सोडी निजहय तों मागुन येत आन्तिलोकस तो ।
हरवीत मेनिलासा कपटें, न जवें, न दूर जो असतो ॥ २६२ ॥
समभूवरतिं धन्याला नेतें जें चक्र दूर वाहून ।

चालुन निकट रथाच्या हयपुच्छा स्पर्शी करित मागून ॥ २६३ ॥
घडघडतां जवळोनी अंतर जितकें तयांत व हयांत ।
तितक्याच अंतरानें झाला अज मेनिलास नृवर जित ॥ २६४ ॥
फेंकावें वलय कुणी अणि तें धांवून जातसे जितकें ।
दोघांमाजी अंतर होतें तें प्रथम पाडिलें तितकें ॥ २६५ ॥
परि तेणें वेगानें अन्तर मागून तोडिलें कांहीं ।
कारण आली तेव्हां ईथीला शक्ति वाजिनीला ही ॥ २६६ ॥
अङ्गण अणखी असतें लांब तरी टाकता तया मागें ।
करता न संशयित कृति, तिसरा परि या बरोबरी न तगे ॥२६७॥
भाला जितका जातो, तितका मागून मेरिआनीस ।
आला, कारण त्याचे होते सर्वांत मंद हय गतिस ॥ २६८ ॥
तोही शिवाय नव्हता हांकाया शर्यतिंत हयां चतुर ।
येतां आद्मीतससुत रेंगाळत शेवटीं दिसे दूर ॥ २६९ ॥
अश्व पुढें रथ मागें स्वस्थ असा त्यास बघत आकिलीस ।
तेव्हां दयार्द्रचित्तें ग्रीकांतें करित उचित उक्तीस ॥ २७० ॥
" उत्तम शेवटिं येतो हांकुन इढशफ हयांस, हें न भलें ।
या उक्तदान दुसरें, दायोमीदास द्या परी पहिलें" ॥ २७१ ॥
ऐसें तो वदला तें सर्वांतें मान्य जाहलें वचन ।
ग्रीकांतें मानवतां देतो या वाजिनी अतां जवन ॥ २७२ ॥
नेस्तरज आन्तिलोकस अकिलीसाप्रति करीत वच अनयें ।
" ठरवीं नृप ! वागत हा न्यायें अथवा खरेंच अन्यायें ॥ २७३ ॥

हे अकिलीस! जरी तूं आतां करशील वच पुरें अपुलें ।
तर मात्र राग तूझा येइल हें तूं मनांत उमग भलें ॥ २७४ ॥
मम पारितोषिकातें बघसि हराया मला पुरें कळलें।
कारण दुखावले हय त्याचे तो चतुर असुन न च निभले ॥२७५॥
तेव्हां अमरांलागीं प्रार्थाया पाहिजे तयें होतें ।
शेवटिं यायाचें तें येतें नशिबीं तदीय मग हो तें ॥ २७६ ॥
त्याची येइ दया तुज; किंवा तूझ्या मनास जर आलें ।
तर तूझ्या तंबुंत बहु पित्तल आहे सुवर्ण भरलेलें ॥ २७७ ॥
ढोरें अनेक असती, दृढशाफ हय तेविं चारुतर ललना ।
यांतिल कांहीं घेउन प्रीतीनें दान यास तूं कर ना! ॥ २७८ ॥
ह्मणजे याच्यानंतर गातिल हे ग्रीक धन्यवाद तव ।
सोडीन मी न माझें; त्याच्या प्रीत्यर्थ कलह करिन नव ॥ २७९ ॥
मजसह बाहुबलानें लढण्या इच्छी, तयें पुढें यावें ।
ऐसें तो वदतां त्या आकिलीसें सहजची मनिं हंसावें ॥ २८० ॥
तो वीर आन्तिलोकस होता तन्मित्र फार आवडता ।
ह्मणुनी उत्तर देतां बोले आकिलीस त्यास उलट अतां ॥ २८१ ॥
“कथितोस आन्तिलोकस! कीं दे यूमेलसास अज घरचें ।
आतां तसेंच करतों; देतों त्या कवच काठिण वक्षाचें ॥ २८२ ॥
आस्तीरोपीअस तो रणिं येतां जें हिरावलें त्याचें ।
पितळेचें आहे तें शोभवि ज्या वलय एक वंगाचें ॥ २८३ ॥
त्याचें मूल्य अमित तें.” ऐसें तो वदत भूप या समया ।

तंबूंतून इथें तें कथि आतोमीद्नास आणाया ॥ २८४ ॥
त्यानें जाउन अणिलें, यानें यूमेलसास तें दिधलें ।
ज्यानें आनंदानें केलें स्वीकृत करांत जों आलें ॥ २८५ ॥
परि मेनिलास उठला त्याच्या चित्तास गोष्ट ही लागे ।
अणि अन्तिलोकसावर गेला वाटे जळोनियां रागें ॥ २८६ ॥
करिं दूत दण्ड देई ग्रीकांतें स्वस्थ ऐकण्या सांगे ।
सुरसुंदर वीर तसा बोलाया मेनिलास तो लागे ॥ २८७ ॥
" रे भूप ! आन्तिलोकस ! आले तुज ह्मणत सुज्ञ आजवरी ।
केलेंस काय परि तूं ! केलिस मम नष्ट कुशलता सारी ॥ २२८ ॥
अश्वांस दुखविलेंसी अपुले नेतां पथांत हय पुढतीं ।
असंती ते न्यून बहु ! ग्रीकांचे येथ अग्रणी असती ॥ २८९ ॥
त्यांनीं येऊन पुढें न्याय करावा खरेंच दोघांचा ।
मज पक्षपात नलगे ! काढिल ही ग्रीक कुणि तरी वाचा ॥ २९० ॥
' त्या आन्तिलोकसाला फसवी तो मेनिलास खोट्यानें ।
नेई व पारितोषिक तुरगी त्याची घरास अभिमानें ॥ २९१ ॥
होते हीन तुरंगम जरि त्याची कुशलता असे सबल ' ।
या हो ! करितों याचा आता येथें निकाल मीं सकल ॥ २९२ ॥
वाटे कीं ग्रीक कुणी नाहीं देणार दोष मज कांहीं ।
कारण करीन अज मी आहे जें न्याय्य तेवढें पाहीं ॥ २९३ ॥
जोव्हप्रसादनृपते ! येथें ये आन्तिलोकसा आतां ।
माझी विनंति परिसें रथ तुरगांच्या उभे पुढें असतां ॥ २९४ ॥

घेई प्रतोद करिं तो अश्वां जो पळवि दूर सुखनम्य ।
हस्तानें स्पर्शावे ते तूझे चपल आज हय दम्य ॥ २९५ ॥
नेप्चून जगद्व्यापक सुर त्याची तूं करोनिया शपथ ।
सांगें 'बुद्ध्या नच वा कपटें नच अडविला मदीय रथ' " ॥२९६॥
त्या सुज्ञ आन्तिलोकस बोले " अज तूं जरा धरीं दम रे ।
तुजहुन लहान आहें वर्षांनीं मेनिलास ! खचित बरें ॥ २९७ ॥
अससी वडील मजला, अससी तूं श्रेष्ठ, जाणसी फार ।
दोष कसे तरुणांचे, चित्त जयांचें विलोल अनिवार ॥ २९८ ॥
नाहीं विचारबल त्यां, शान्ति धरी तूं ह्मणोनियां हृदयीं ।
मजसिं मिळाले हय जे देइन ते तुजसिं खचित या समयीं ॥२९९॥
घरचें दुसरें कांहीं याहुन जर मागशील मोलाचें ।
बहुत सुखानें तुजला देइन मी कार्य नच विलंबाचें ॥ ३०० ॥
तुझ्या मनांतुनी परी उतरावें मीं असें न इच्छितसें ।
जोव्हप्रसादनृपते ! अमरांशीं करिन पाप सांग कसें ? " ॥ ३०१ ॥
ऐसें तो वदला; मग नेस्तरसंभव उदार तो वीर ।
आणून मेनिलासा देत असे वाजिनी बहू रुचिर ॥ ३०२ ॥
तेणें तदीय चित्तीं पसरतसे हर्ष, जेविं हिमसलिल ।
संवृद्धक्षेत्रिं सदा सुन्दरकण शस्यमंजरीवरिल ॥ ३०३ ॥
झाला असा खरोखर तव चित्ता मोद मेनिलासा रे ! ।
त्यातें उलट असे तो बोलतसे शब्द मधुर हे सारे ॥ ३०४ ॥
" तुज वरिल आन्तिलोकस ! कोप अतां सर्व खचित शमवीन ।

नव्हतास मूर्ख पुरता, किंवा होतास तेविं अस्थिर न ॥ ३०५ ॥
आज विवेकावरतीं तारुण्यें विजय मिळविला पुरता ।
श्रेष्ठां फसवायाचें, आणुं नको चित्तिं फिरुनिया आतां ॥ ३०६ ॥
मत्कोपा शमवाया अन्य ग्रीकास जड जरा जातें ।
आजवरी मजकरतां सोशियलें त्वां बहूत कष्टांतें ॥ ३०७ ॥
केलेस बहुत विक्रम, बन्धु तुझा तातही तुझा तसला ।
म्हणुनी तव विनतीला देउनियां मान जीव हा वळला ॥ ३०८ ॥
माझी असुनी तुजला देइन मी वाजिनी अतां परत ।
यांतें कळेल माझा आत्मा उद्धत न, अदय नच असत " ॥३०९॥
ऐसें वदुनी देई घोडी नोईमना दुरी न्याया ।
हा आन्तिलोकसाचा होता सहचर रणप्रसंगा या ॥ ३१० ॥
प्याला सुन्दर घेई ठेवुनियां अपण बघुन संधीस ।
कांचन टॅलेन्तद्वय चवथा तो घेत मेरिआनीस ॥ ३११ ॥
परि एक पारितोषिक द्यायाचें पांचवें अतां उरलें ।
ग्रीकसभेमाजी तें देई अकिलीस नेस्तरास भलें ॥ ३१२ ॥
त्याच्या जवळ उभा मग राहुनियां बोलला असें वचन ।
" स्वीकारीं हें आतां स्नेहाभिज्ञान म्हणुन हे सुजन ! ॥ ३१३ ॥
पत्रोक्लशान्त्यविधिचें स्मारक रे ! ठेव जवळ तूं जपुन ।
ग्रीकांमाजी त्यातें नच तूं कधिं पाहशील रे फिरुन ॥ ३१४ ॥
मी देत पारितोषिक कांहीं केल्याविणें तसेंच अतां ।
युद्ध न करसी रणिंचें किंवा तें मल्लयुद्ध जर करतां ॥ ३१५ ॥

शूलक्षेपणकलहीं कधिं नाहीं भाग घेत तूं कांहीं ।
पायीं न धांवसी तूं दुःखद वार्धक्य गांजि तुज पाहीं " ॥ ३१६ ॥
ऐसें वदुनी तेणें ठेवियलें तें तदीय हस्तांत ।
आनंदें स्वीकारुन मार्मिक हें वचन करि मुदभरांत ॥ ३१७ ॥
"बाळा ! खचित तुवां रे ! केलेंसी सत्य वच खरोखर हें ।
चरण न दृढ मम असती स्थैर्य अतां अवयवांत नच राहे ॥ ३१८ ॥
स्कन्धीं न हस्त माझे फिरवाया येति अज हवे तिकडे ।
व्हावें तरुण अतां मीं ऐशी इच्छा मनास आज जडे ॥ ३१९ ॥
शक्ति असावी मजला होती ती एकवार जी मजला ।
ऐसाची अंत्य विधी करण्या इपीअनांस जैं पडला ॥ ३२० ॥
आमारिन्श्यूसातें पुरला ब्रैप्रेशियमिं तया समया ।
तत्स्मरणार्थ सुतांनीं आणियलें प्रीतिदान तें द्याया ॥ ३२१ ॥
मजसिं न तुल्य बलें कुणि, होता ईपीअनांत त्या समयीं ।
होता न पिलिअनांतहि, ईतोलिअनांतहि न कुणी विजयी ॥ ३२२ ॥
क्लैतोमेदीसा मी केलें ईनप्ससंभवा विजित ।
आन्कीअसें नृपानें द्वंद्वा खेळून साधलें अहित ॥ ३२३ ॥
प्ल्यूरोनिअना या मी येतां धांवून जिंकिला पुरता ।
पायीं धांवुन हरिलें श्रेष्ठाही त्या इफिक्लसा पळतां ॥ ३२४ ॥
शूलक्षेपाणिं हरिले नृप फैलीअस व पालिदोरस हे ।
आक्तरसुतद्वयाशीं स्पर्धा करण्यास मीं उभा राहें ॥ ३२५ ॥
माझ्याहून अधिक ते संख्येनें अश्व हांकिती त्वरित ।

आशा त्यां विजयाची. होतिं तिथें पारितोषिकें अमित ॥ ३२६ ॥
ते दोघे; एकानें दक्षपणें रश्मि घेतल्या हातीं ।
दुसरा तुरगां हांकी कठिण कशाघात चालवुन वरतीं ॥ ३२७ ॥
ऐसा पूर्वी होतों. तरुणांनीं या कृती करीं घ्याव्या ।
आज्ञा अतां जरेच्या वीरा मज लागतात मानाव्या ॥ ३२८ ॥
जा तूं सन्मित्राचे अन्त्यविधी नीट घेइं उरकून ।
घेतों स्वेच्छेनें हे, मोद मना, जासि मज न विसरून ॥ ३२९ ॥
ग्रीकांमाजी मातें देतोसी मान काय जो उचित ।
याच्यास्तव तव सारे अमर यथायोग्य तें करोत हित" ॥ ३३० ॥
ऐसें तो वदला मग गेला हा ग्रीकमण्डलीं नृपति ।
नेस्तरमुखांतुनी ती ऐकोनी आपुली बरीच नुति ॥ ३३१ ॥
मग पारितोषिकें बहु मोलाचीं लावि मुष्टियुद्धाला ।
आणीत एक खेंचर सोशितसे जें अनेक कष्टांला ॥ ३३२ ॥
वर्षें सहा जयाला अजुनहि जें दम्य दिसतसे सकलां ।
जातें कठिण सदैवचि यालागीं माणसाळवायाला ॥ ३३३ ॥
क्रीडाङ्गणिं या बांधी; लावी पण एक चांगला प्याला ।
मुष्टी दोन तयाला; नंतर राहून नृप उभा वदला ॥ ३३४ ॥
" हे एत्रिअसज ! नृप हो ! ग्रीकांनों ! मी करीत आह्वान ।
या दोघेजण पुढतीं ज्यांचें कौशल्य तें नच लहान ॥ ३३५ ॥
हात करोनी वरतीं यांसाठीं मुष्टिघात नीट करा ।
देइल विजय अपालो; ग्रीकां वाटेल जो प्रवीण खरा ॥ ३३६ ॥

क्लेशक्षम हें खेंचर त्यानें तंबूंत आपल्या न्यावें ।
होइल जित जो कोणी त्यानें हें पात्र येथुन हरावें " ॥ ३३७ ॥
ऐसें तो वदला मग उठला तत्काल एक शूर नर ।
पॅनोपीअससुत तो ईपीअस मुष्टियुद्धकुशलतर ॥ ३३८ ॥
क्लेशाक्षम खेंचर तें धरुनी करिं गच्च, शब्द हे वदला ।
" प्याला नेइल जो कुणि त्यानें यावें पुढें प्रसंगाला ॥ ३३९ ॥
वाटे ग्रीक न दुसरा मिळवुनियां विजय मुष्टियुद्धांत ।
नेइल हरून खेंचर, ह्मणतों मी श्रेष्ठ पुरुष सकलांत ॥ ३४० ॥
न्यून असें रण कार्यीं इतकें वदणें पुरे न काय असे ? ।
सर्वहि कार्यीं मनुजा मिळणें नैपुण्य शक्य होय कसें ? ॥ ३४१ ॥
सांगून ठेवितों हें अणि तें पुरतें करीन मी सारें ।
पिंजीन देह त्याचा मोडिन हाडें तशींच परिसा रे ! ॥ ३४२ ॥
मित्र तयाचे येथें येऊंदे जमुन राहुंदे पाठी ।
मत्करविजिता त्याला उचलोनी दूर न्यावया साठीं " ॥ ३४३ ॥
ऐसें तो वदला मग सारे सेवून मौन जन बसले ।
उठुन उभा परि राहे युरिआलस वीररूप ज्या सजलें ॥ ३४४ ॥
तालेइअनकुलांतिल मेसिस्त्यूसज बहू जनीं ख्यात ।
याचा मूळ पुरुष तो पूर्वीं गेला प्रसिद्ध थीबांत ॥ ३३९ ॥
ईदिपसाचे तेथें होते ते करित अन्त्य दिवस जन ।
त्यासमयीं वीरें त्या केले जित सर्व तेथ काड्मिअन ॥ ३४६ ॥
घेइ परिश्रम यावर शूली तो थोर तैदिअसतनय ।

होता मागें त्याच्या उत्तेजन देत त्यास शब्दमय ॥ ३४७ ॥
त्यातें इच्छा भारी कीं यातें प्राप्त होउंदे विजय ।
कटिबन्धनी तयानें दिलि वीरा पाहुनी बरा समय ॥ ३४८ ॥
बन्द दुजे रुचिराकृति दिधले गोचर्ममय तया आणिक ।
मग येति बद्धपरिकर दोघे ते अङ्गणांत अनुभविक ॥ ३४९ ॥
युद्धीं गढले दोघे, दृढ कर उचलून वर समोरून ।
भीषण दंष्ट्राभङ्गीं दोघांचे जाति हस्त जड गुतुन ॥ ३५० ॥
सकलाङ्गातुन धांवति घर्माच्या सारख्या तशा धारा ।
ईपीअस घुसत पुढें गालीं मुष्टिप्रहार करित बरा ॥ ३५१ ॥
त्यासरसा दुसरा तो टाकितसे सर्वभर तिथें नजर ।
परि त्याला क्षणभरही तेथ उभें राहवे न बघत तर ॥ ३५२ ॥
कंप भरे सर्वांगा जणुं तीरीं मीन उडुन तळमळत ।
चलन स्तंभन करिती स्तंब तृणाचे जयांत हा पडत ॥ ३५३ ॥
घडवी वृत्त पवन हें जलतल हलवून उत्तरेकडचा ।
ऊर्मि क्षोभुन जाती आश्रय ज्या सर्वकाल मीनांचा ॥ ३५४ ॥
उडतां वीर दुरी हा खावुन आघात मुष्टिचे गालीं ।
ईपीअसें तयाला उचलुन धरिलें परी तया कालीं ॥ ३५५ ॥
मित्र तयाचे भोंवतिं जमुनी त्या नेति अंगणांतून ।
पाय तयाचे कांपति, ओकतसे तो अशुद्ध ही मधुन ॥ ३५६ ॥
नेतां मस्तक त्याचें दोन्हीं बाजूस सतत लोंबतसे ।
अपुल्या लोकांमाजी ठेविति वीरास शुद्धि मुळें न वसे ॥ ३५७ ॥

जातां त्यांनीं अपुला नेला संगें अणोनियां प्याला ।
मग पारितोषिकें दुजिं लावी अकिलीस मल्लयुद्धाला ॥ ३५८ ॥
ग्रीकां दावी आणुन; जी त्यांतें देउं करितसे त्रिपदी ।
अग्निवरी ठेवाया होती बहु योग्य पाहतां अगदीं ॥ ३५९ ॥
द्वादश वृष मोल तिचें होइल हें ग्रीक देखुनी ह्मणती ।
द्याया जितास आणी मध्यें स्त्री एक जी नसे भलती ॥ ३६० ॥
कृतिवैचित्र्या जाणे, मोल तिचें चार वृष असें धरती ।
नंतर भूप उभा तो राहुनियां बोलला न शब्द अती ॥ ३६१ ॥
"या हो उठा जयांतें घेणें अनुभव असेल युद्धाचा" ।
परिसुन वच हें उठला तेलामनतनय पोत वीराचा ॥ ३६२ ॥
आजक्ष एक आला दुसरा युलिसीस कल्पनाप्रचुर ।
होऊन बद्धपरिकर, युद्धांङ्गणिं येति वीर हे शूर ॥ ३६३ ॥
कठिण करें धरिती ते बाहू बल करुन एकमेकांचे ।
उच्च घरांचे वांसे शिल्पी बसवीत गच्च जणुं साचे ॥ ३६४ ॥
होतें ह्मणुन तयांचें मोठ्याही वादळांत रक्षण तें ।
दोघे खेंचिति हस्तें वाजे पाठींत कडकडा नुसतें ॥ ३६५ ॥
घर्म गळे थबथब तों स्कंधीं आणी कुशींत वळ उठले ।
आंतील रक्त ठेंचुन गोठोनी वाटतें निळें झालें ॥ ३६६ ॥
दोघे विजयोत्सुक ते लढती त्रिपदी मिळावयास परी ।
युलिसीस टांग मारुनि याला पाडूं शके न झटत जरी ॥ ३६७ ॥
आजक्षातें नाहीं करतां आलें असें, असून बली ।

कारण युलिसीसाची शक्ति तया वाटतें अतां नडली ॥ ३६८ ॥
ग्रीकां शेवटिं जेव्हां कंटाळा वाटला बघायाचा ।
तेव्हां तेलामनसुत बोले आजक्ष त्यास ही वाचा ॥ ३६९ ॥
"ऐकें युलिसीस अता लाअर्टीसज उदार नयकुशल ।
उचलीं वरतीं मजला अथवा उचलिन तुला करून बल ॥ ३७० ॥
पुढलें होणें जाणें त्याची तरि जोव्ह काळजी वाहे" ।
ऐसें वदुनी यातें उचलुनियां हा तिथें उभा राहे ॥ ३७१ ॥
युलिसीसाला झालें कपटाचें परि न फार विस्मरण ।
जंघेवरतीं केला तेणें आघात नेम धरुन पण ॥ ३७२ ॥
गात्रें विगलित करुनी त्यातें मग ऊर्ध्ववदन पाडविलें ।
पडला युलिसीस परी तेथ अधोवदन; तें जनां दिसलें ॥ ३७३ ॥
आश्चर्य सर्व करिती आणी चित्तीं बरेच घाबरती ।
कंटक युलिसीस तदा त्यातें उचलावया बघे वरतीं ॥ ३७४ ॥
भूमीवरुन तयाला थोडासा वरतिं तेधवां उचली ।
पुरता परन्तु नाहीं उचलूं शकला तयास असुन बली ॥ ३७५ ॥
परि तो वांकवि जानू दोघे धरणीवरी तसे पडले ।
होते जवळ जवळ ते दोघेहीं धूलिमलिन मग झाले॥ ३७६ ॥
दोघे उठुनी आतां तिसऱ्यानें झगडते तिथें खचित ।
राहुन आकिलीस उभा त्यातें बोलून शब्द अडवीत ॥ ३७७ ॥
"झगडुं नका अधिक अतां ! शिणवुं नका देह अधिक कष्टानें !
दोघे विजयी दिसतां; घ्यावें संतोषदान मोदानें ॥ ३७८ ॥

स्वस्थाना मग जावें ह्मणजे ते ग्रीक झगडतिल इतर" ।
ऐसें तो वदला तें ऐकुन हे घेति वाक्य सौख्यकर ॥ ३७९ ॥
मान्य करोनी तद्वच दोघे टाकीत धूळ झाडून ! ।
अङ्गांत चोळ घालिति; दुसरी अकिलीस वस्तु आणून ॥ ३८० ॥
मानार्थ देउं करि तो त्यातें जो होय चपल सकलांत ।
षट्परिमितिचा पेला रजताचा लोक सुबक गणतात ॥ ३८१ ॥
साऱ्या पृथिवीमाजी ऐसा सुन्दर कुठें तदा नव्हता ।
बहुत सिदोनिअनांनीं ज्यातें निर्मून दाविली पटुता ॥ ३८२ ॥
श्यामल जलधीवरुनी आणिति त्या फीनिशिअन आखातीं ।
ठेविति विकावया मग थोआसा भेट शेवटीं करती ॥ ३८३ ॥
जेसनपुत्र युनीअस देई पत्रोक्लशास तो पेला ।
प्रायमतनय लिकाअन बंधांतुनि मुक्त जेधवां केला ॥ ३८४ ॥
ठरवीत पारितोषक द्याया अकिलीस आज पेला तो ।
सर्वांत गति जयाची चपल तयें नेउंदे घरा ह्मणतो ॥ ३८५ ॥
दुसरा येइल त्या जड एक महाकाय देउं करि वृषभ ।
येईल शेवटीं जो कांचन टॅलेन्त अर्ध त्या लाभ ॥ ३८६ ॥
ग्रीकांमाजी मध्यें राहुनियां तो उभा वदे साचा ।
" या हो ! उठा जयांला घेणें अनुभव असेल पळण्याचा "॥३८७॥
ऐसें तो वदला तों उठला आजक्ष ओइलीअसज ।
कंटक युलिसीस दुजा, तिसरा तो लागलाच नेस्तरज ॥ ३८८ ॥
सर्वांत आन्तिलोकस होता हा चपल फार तरुणांत ।

सर्व उभे, त्यां दावी इष्टस्थल भूप पसरुनी हात ॥ ३८९ ॥
मार्ग तयांचा ठरला, मारितसे धांव ओइलीअसज ।
धांवे निकट तयाच्या नंतर युलिसीस थोर नृपति अज ॥ ३९० ॥
सुन्दररशना नारी वस्त्र विणाया उरीं धरी धोटा ।
फेंकी त्या सूत्रांतरिं, चातुर्याचा तिला नसे तोटा ॥ ३९१ ॥
सूत्रांत उभ्या वरच्या सूत्रें गुतवून खालचीं आधीं ।
धोटा उरिं धरलेला सत्वर फेंकून कार्य निज साधी ॥ ३९२ ॥
जवळुन याच्या तैसा सत्वर युलिसीस चालला पळत ।
त्याच्या पदचिन्हांवरि मागुनियां ठेवुनी पदां जात ॥ ३९३ ॥
साधी हें धूलि न जों आजक्षावर उडे पदन्यासें ।
मागुन धांवत जातां स्पर्शी तन्मस्तका निज श्वासें ॥ ३९४ ॥
विजयोत्सुका तयाला पळतांना ग्रीक भरति उत्साहें ।
शेवटिं शेवटिं येतां प्रार्थित युलिसीस देविला आहे ॥ ३९५ ॥
" परिस मिनर्वे ! यावें, पायां साहाय्य देईं कल्याणि ! " ।
ऐसें प्रार्थी त्याची मान्य मिनर्वा करीतसे वाणी ॥ ३९६ ॥
अंगीं चापल्य भरी पायीं खालीं तसें वरी हातीं ।
घालाया झडप उभय धांवति जों पारितोषिकावरतीं ॥ ३९७ ॥
आजक्षाचा तोंची सरला पद धांवतां पुढें वेगें ।
चेष्टेवीण तुझ्या हें खचित मिनर्वे असें न व्हावें गे ! ॥ ३९८ ॥
अकिलीसें वधिले वृष करण्या पत्रोक्लशास सन्मान ।
त्याच्या शकृन्निचयें गेलें होतें भरून हें स्थान ॥ ३९९ ॥

कंटक युलिसीसें मग पहिल्यानें घेतला असे प्याला ।
दुसरा आजक्ष असे त्याच्या वांट्यास वृषभ तो आला ॥ ४०० ॥
ग्राम्य वृषाचीं शृंगें धरुनी आजक्ष मग उभा राहे ।
शकृत् मुखांत शिरलें थुंकुन टाकून करितसे वच हें ॥ ४०१ ॥
" हा धिक्! कवण्या तरि त्या देवीनें पाय दुखविले मम हे ।
मातेपरि युलिसीसा करण्या साहाय्य दक्ष जी राहे " ॥ ४०२ ॥
ऐसें तो वदतांची ग्रीक मनापासुनी तिथें हंसले ।
मग वीर आन्तिलोकस घ्याया ये तोषदान शेवटलें ॥ ४०३ ॥
ग्रीकांतें हंसत वदे " मित्रानों सागतों तुह्मां सारें ।
जाणतसां कीं सुर हे वृद्धां साहाय्य करिति परभारें ॥ ४०४ ॥
आजक्ष हा वयानें आहे मजहून वृद्ध अधिक खरा ।
मागिल पिढिचा आहे. आहे माणूस तो ह्मणून बरा ॥ ४०५ ॥
काळा सोडुन आलें त्यातें वार्द्धक्य सर्व जन ह्मणती ।
अकिलीसावांचोनी चापल्यें ग्रीक त्या न जित करति " ॥ ४०६ ॥
ऐसें वदुनी तेणें स्तविलें त्या चपल पेलिअसज्ाला ।
तेव्हां पेलिअसज तो देता उत्तर तयास हें झाला ॥ ४०७ ॥
" जाईल आन्तिलोकस! फुकट कधीं रे तुझें न हें स्तवन ।
तॅलेन्त सुवर्णाचें देइन तुजला करोनियां वजन " ॥ ४०८ ॥
ऐसें वदुनी तेणें उचलुनियां ठेविलें सुवर्ण करीं ।
स्वीकारी तो मोदें; पुढला अकिलीस मार्ग सरळ धरी ॥ ४०९ ॥
आयत शूल, तसें ते त्राण शिरींचें विशाल अणि ढाल ।

सर्पिदनाचीं शस्त्रें रंगाणिं ठेवीत सर्व जंजाल ॥ ४१० ॥
पत्रोक्लशें रणीं हीं त्याचीं होतीं हरून अणिलेलीं ।
रंगाणिं अकिलीसें मग उक्ति उभ्यानीं असे अशी केली ॥ ४११ ॥
" शुरोत्तमांस वीरां करितों दोघांस आह्मि आव्हान ।
सन्नद्धकाय होउन शूल करीं घ्या न जो मुळिं लहान ॥ ४१२ ॥
लोकांपुढें बघावें तोलुन बल केविं एकमेकांचें ।
एकानें दुसऱ्याच्या छेदावें पृष्ठ चारु मांसाचें ॥ ४१३ ॥
ह्मणजे कवचांतोनी अन्त्रां भेदून रक्त काढावें ।
त्यानें रजतखचित हें सुन्दर मम शस्त्र आज मिळवावें ॥ ४१४ ॥
आस्तीरोपीअस नृप होता स्वामी प्रसिद्ध याचा तो ।
त्याचा खड्ग पुरा जो हरिला तो हा बराच लखलखतो ॥ ४१५ ॥
परि हीं शस्त्रें सारीं घ्यावीं वांटून नीट दोघांनीं ।
माझ्या तंबूमाजी त्यातें रमवीन भोजनीं पानीं " ॥ ४१६ ॥
ऐसें तो वदला मग तेलामनपुत्र उठत आजक्ष ।
दायोमीद उठे तो तैदिअसाचा सुपुत्र बहु दक्ष ॥ ४१७ ॥
एकीकडे वळोनी होती सन्नद्धकाय दोघे ते ।
क्रीडाङ्गणिं मध्यावर जवळी मग जाहले पुढें येते ॥ ४१८ ॥
ऐसे युयुत्सु दोघे पाहुन लोकांस वाटलें भय तें ।
तेव्हां ग्रीक मनीं मग झाले व्यामूढ सर्वही परते ॥ ४१९ ॥
सरतां सरतां पुढतीं आले दोघे बरेच ते जवळी ।
धांवून तीन वेळा झगडा करिती प्रचण्ड वीर बळी ॥ ४२० ॥

तेव्हांच हातघाइस दोघे आले, तशांत आजक्ष ।
ढालीतें मध्यावर विद्ध करी नेम धरुन तो दक्ष ॥ ४२१ ॥
मांसा स्पर्श न झाला, कवचें आंतून होत रक्षण तें ।
दायोमीदें नंतर केलें चातुर्य जें विलक्षण तें ॥ ४२२ ॥
ढालीवरुनी त्याच्या ग्रीवेवर शूल टोंचण्या झटला ।
तेव्हां आजक्षाची भीति ग्रीकांस सुटलि समयाला ॥ ४२३ ॥
ह्मणतात पारितोषिक वांटुन द्या युद्ध थांबवा आतां ।
अकिलीस खड्ग देई दायोमीदास एकल्या परता ॥ ४२४ ॥
म्यानासह पट्ट्यासह देई संतोषदान सुन्दर हें ।
नंतर आकिलीसानें एक अयोगोल आणिला पाहें ॥ ४२५ ॥
बलवन्त एइशन या पूर्वीं फेंकी करें बहू दूर ।
अकिलीस चपलपद त्या वधिता झाला करून रण शूर ॥ ४२६ ॥
अणिला गोल हरोनी नौभागीं लूट आणिली तींत ।
राहुन आकिलीस उभा ग्रीकां बोले धरून ही रीत ॥ ४२७ ॥
" या हो उठा ! जयाला घेणें अनुभव असेल युद्धाचा ।
शस्याढ्य जरि कुणाच्या होइल विस्तार फार शेतांचा ॥ ४२८ ॥
परिवर्तिं पंच वर्षें गोल तया हा पुरेल खचित तरी ।
हलकर्षक मेषप वा धुंडिल लोहार्थ काय मग नगरी ? " ॥ ४२९ ॥
ऐसें तो वदला मग उठला तो शूर पालिपीतीस ।
लीआन्तीअस उठला ज्याला उपमेस देव शक्तीस ॥ ४३० ॥
तेलामनसुत उठला नंतर आजक्ष वीर हा चण्ड ।

ईपीअस चवथा नृप उठला तो वीर जो नसे थण्ड ॥ ४३१ ॥
रांगेंत उभे राहति; ईपीअस गोल उचलुनी स्वकरीं ।
गरगर फिरवुन फेंकी, हंसती त्या ग्रीक पाहतांच परी ॥ ४३२ ॥
मार्सकुलोत्पन्न तदा लीआन्तीअस तसा प्रयत्न करी ।
तेलामनज अनंतर फेंकीं आजक्ष गोल दूरवरी ॥ ४३३ ॥
सर्वांहुन पडला तो घेउनियां लांब गोल गिरकीस ।
नंतर हातीं धरितो फेंकाया वीर पालिपीतीस ॥ ४३४ ॥
वक्राग्रयष्टि फिरवुनि जितकी गोपाळ फेंकितो दूर ।
वृषसंघीं जाउनि ती दूर पडे नेमकी अणि समूर ॥ ४३५ ॥
तितकाच हा पडे अज जाउनियां गोल मंडलीं दूर ।
जयघोष सर्व करती ! उठले तन्मित्र तेधवां शूर ॥ ४३६ ॥
तन्मित्र पारितोषिक उठले न्यायास सर्व नौभागा ।
इषुयोग्य लोह लावी नृप पण धन्वींस पाहुनी जागा ॥ ४३७ ॥
परशू दश अर्ध, तसे परशू दश पूर्ण जे रणा उचित ।
आणून डोलकाठी नावेची पुलिनिं दूर ती पुरित ॥ ४३८ ॥
तीच्या अग्रा बांधी पारावत दोर बांधुनी पायीं ।
त्यातें विद्ध कराया बाणानें भूप कथित या समयीं ॥ ४३९ ॥
"भीरु कपोतालागीं मारिल जो शर तया नरें सहज ।
निज तंबूतें न्यावे परशू दश इथुन लागलेच अज ॥ ४४० ॥
नैपुण्येंही कोणी पक्ष्यातें मारण्या चुकेल जर ।
परि मारिल दोरीवर परशू ते अर्ध मेळविल इतर " ॥ ४४१ ॥

ऐसें तो वदला; मग त्यूसर अणि उठत मेरिआनीस ।
आला मित्र ह्मणवुनी भूप इदामिनिअसास संगतिस ॥ ४४२ ॥
शिरकवचीं सर्व चिठ्या घोळोनी टाकिती तदा खालीं ।
तों भूप त्यूसराची पाळी पहिलीच मारण्या आली ॥ ४४३ ॥
करुन श्रम सरल तयें दिधला सोडून एक तो बाण ।
भूपास अपालोला नाहीं शतमेध बोलला जाण ॥ ४४४ ॥
वर्षावर्षाचीं तीं कापिति शत कोंकरें जयामाजी ॥
राग अपालोस अला पक्ष्यातें बाण लागला न अजी ॥ ४४५ ॥
पायांस बांधलेल्या दोरीवर बाण बसत पायांशीं ।
तीव्र तयाची धारा दोरी कापीत पार समयाशीं ॥ ४४६ ॥
आकाशीं खग गेला दोरी धरणीवरी पडे खालीं ।
जयघोष सर्व करती चूक दुजाच्या मनांत ती आली ॥ ४४७ ॥
तत्करिंचें धनु घेई आतां ओढून मेरिआनीस ।
रोंखून बाण धरि करिं वेळानें गोष्ट सुचत बुद्धीस ॥ ४४८ ॥
देउं अपालोस करी भावें शतमेध वीर एक अजी ।
वर्षावर्षीचीं तीं कापिति शत कोंकरें जयामाजी ॥ ४४९ ॥
त्रस्त कपोत तयाला दिसलें तेव्हां वरी घनाखालीं ।
घिरट्या घेतां त्याला क्षत करिं पंखांत नेमक्या कालीं ॥ ४५० ॥
* मधुनी शर गेला तो परतुनियां जेथ मेरिआनीस ।

* या सांग्रामिक खेळाचें वर्णन वाचून भारतकालीं द्रोणाचार्यांनीं असेच खेळ करविले होते त्यांची आठवण होते.

त्याच्या पायांपाशीं पडत जरा विद्ध करुन धरणीस ॥ ४९१ ॥
उतरे कपोत खालीं बसला तो डोल काठिच्या वरतीं ।
टाकून मान पसरी दोन्हीही पंख; लोक तें बघती ॥ ४९२ ॥
गात्रां सोडुन गेला जीव, तसा विहग खालतीं पडला ।
आश्चर्य लोक करिती, जीव तयांचा बघून घाबरला ॥ ४९३ ॥
नंतर तेथुन नेई दश परशू वीर मेरिआनीस ।
परशू अर्ध तसे ते त्यूसर तो नेत योग्य संधीस ॥ ४९४ ॥
नंतर पेलिअसज नृप अंगणि आणून शूल रोंवितसे ।

गुरुनें एकासमयीं रंगीं भीष्मादि सर्व मेळविले ।
शिष्यांकरवीं तेथें शिक्षित शस्त्रास्त्र खेळ खेळविले ॥ १ ॥

ते पहावयास लोकांचा अलोट समुदाय जमला होता.

स्त्रीपुरुषरत्नशोभित बहु मोठा रंग काय वर्णवतो ।
भासे व्यक्त खवळला यादो-माणि-कोटि-कोश अर्णव तो ॥ २ ॥

वृकोदर व सुयोधन यांनीं गदेचे हात करून दाखविले ते पाहून

जन ह्मणति होय जैसा परिवेष भ्रमवितां अलातातें ।

अर्जुनानें प्रथम चल लक्ष्याचा भेद करून दाखविला.

भेदी सूक्ष्म कठिण चललक्ष्यें पळतां बसोन तो यानीं ।

नंतर त्यानें अस्त्रसामर्थ्य दाखविलें.

अग्न्यस्त्रप्रमुखास्त्रें प्रकट करुनि वारुणादिकें शमवी ।

या खेळांवर लोकांचें प्रेम किति होतें तेंहि पंतांनीं वर्णन केलें आहे.

जनदृष्टि उड्या घालिति बहु माशा जेविं शर्करा खाया ।

आदिपर्व. मोरोपंत.

अग्न्यस्पृष्ट अशी ती कढई मध्यें अणून ठेवितसे ॥ ४९५ ॥
पुष्पांनीं शोभित ही; एक तियेचें असेल वृषमोल ।
मग उठत शूलधर ते, एत्रिअसाचा तसाच सुत लोल ॥ ४९६ ॥
उठला अगमेम्नन तो, उठला तो दूत मेरिआनीस ।
आला सहचर ह्मणुनी भूप इदानिअसास संगतिस ॥ ४९७ ॥
थोर आकिलीस वदे " जाणतसों एत्रिअससुता! पाहें ।
सर्वांहुन अधिक तुझी सत्ता जगतीं किती अजी आहे ॥ ४९८ ॥
बल तुझें श्रेष्ठ कसें, शूली तूं केवढा विशारद रे ! ।
घेऊन पारितोषिक नौभागा जावयास योग्य बरें ॥ ४९९ ॥
देऊं शूल परी या वीरा, ज्या नाम मेरिआनीस ।
मीं तर असेंच कथितों बघ जर हें आवडे तुझ्या मतिस " ॥४६०॥
ऐसें तो वदला, तें नृपतीच्या येतसे पसंतीस ।
वीरास शूल देई स्वीकारी थोर मेरिआनीस ॥ ४६१ ॥
तेथ उभा त्या दिसला दूत तयापाशिं तालथीबिअस ।
नव देत पारितोषिक त्यातें नृप हृदयिं धरुन उल्हास ॥ ४६२ ॥

सर्ग २४ वा.

हेक्तराचें शव प्रायम खण्डणी देऊन सोडवितो.

सारांश:—जोव्हाझेवरून थेटिस अकिलीसाजवळ जाऊन हेक्तराचें शव प्रायमास द्यावें ह्मणून प्रार्थना करत्ये. इरिस प्रायमाकडे जाऊन पुत्राचें शव सोडवून आण असें आग्रहानें सांगत्ये. मर्क्युरि तसाच प्रायमाकडे जाऊन त्याला अकिलीसाच्या तंबूंत सुरक्षित आणतो. वृद्ध करुणरसपुष्ट भाषण करतो व पुत्राचें शव सोडवून घेतो. क्रिया करण्यास १२ दिवसांपुरता तह मागून घेतो. हेक्तराचें शव पाहून ॲन्ड्रोमाकी, हेक्युबा व हेलन या शोक करतात नंतर त्याची क्रिया होते.

कालमान:१२ दिवस पर्यंत हेक्तरशव अकिलीसाच्या तंबूंत राहतें. आणखी १२ दिवस त्याच्या क्रियेंत जातात. तेथपर्यंत तह असतो.

स्थलमान:–अकिलीसाची छावणी व त्रायनगरी.

झालें सभाविसर्जन उठले ते लोक जावया ठाया ।
नौभागीं अशनींचें शयनींचें सौख्य बघती सेवाया ॥ १ ॥
प्रिय मित्रातें अठवुनि होता अकिलीस सारखा रडत ।
वश करि निद्रा सकलां होई हा तिज परी न हस्तगत ॥ २ ॥
गडबड लोळे भूवरी अठवुन पत्रोक्लशास त्या सबला ।
ज्या ज्या गोष्टी केल्या दोघांनीं, त्यांस आठवी सकलां ॥ ३ ॥
बहु कष्ट काढिले जे, वीरांशीं लढुन घोर समरांत ।
किंवा जातां मोजुन लाटा त्या थोरल्या समुद्रांत ॥ ४ ॥
तें तें आजी स्मरुनी गाळितसे उष्ण अश्रुजल पाहीं ।

क्षणिं राहे कुशिवरतीं, उर्ध्वमुख क्षणिं पडे अधोमुखही ॥ ५ ॥
राहे उभा क्षणीं अणि जलधितटीं खेद करित हा फिरत ।
झाली प्रभात तों, ती सागरतीरावरी तया दिसत ॥ ६ ॥
जोडी अश्व जवन रथिं बांधी मृत हेक्तरास त्या आज ।
ह्मणजे त्या फरफटवित यावें न्यायास ओढुनी सहज ॥ ७ ॥
मीनीशिअससुताच्या कबरिसभोंवार तीनदां फिरला ।
तंबूमाजी नंतर येउनियां स्वस्थ शेवटीं पडला ॥ ८ ॥
हेक्तरशव टाकि तिथें धूळित मुख फिरवुनी मुळीं खालीं ।
परि त्यास अपालोनें दिधलें नाहीं कुजूं तया कालीं ॥ ९ ॥
मृतवीराची त्याला आलि दया ह्मणुन योजि ईजिस तें ।
नेतां फरफटवित त्या अङ्ग कसें मग वरील फांफसतें ॥ १० ॥
क्रोधांत हेक्तराचा होता ऐसा करीत अपमान ।
धन्यां अमरां येई करुणा तेव्हां बघून हें मान ॥ ११ ॥
आर्गसहन्त्या दक्षा चढवुन कथिती शवास पळवाया ।
आतां इतर सुरांना होतें हे प्रिय खरेंच या समया ॥ १२ ॥
नेप्चून आणि जूनो आणि मिनर्वा विरुद्ध परि असती ।
द्वेष्य तयां इलियम तें ह्मणुनी अज हट्ट धरुनियां बसती ॥ १३ ॥
प्रायम आणि तज्जन पहिल्यापासून यां न आवडती ।
देवींस पारिसानें उन्मादें मानिलें नसे ह्मणती ॥ १४ ॥
त्याच्या उटजा गेल्या, तेव्हां सन्मानिलें एकलीला ।
जीनें त्याशीं केल्या घातक वेळेस त्या काम्यलीला ॥ १५ ॥

बोले अमरां फीबस उगवे जेव्हां प्रभात बारावी ।
"निर्दय अहांत तुह्मीं ! सुर हो किति दुःखदस्थिति ह्मणावी ! ॥१६॥
अजवृषजंघा तुह्मां अर्पियल्या हेक्तरें न अग्नींत ? ।
ह्मणुनी मृतासही त्या तुह्मीं पळवुन न दूर ठेवीत ॥ १७ ॥
भार्या बघेल त्याला, माता, सुत, जनक, सर्व जानपद ।
ते त्यास अग्नि देउनि करतिल अन्त्यक्रिया तया सुखद ॥ १८ ॥
अकिलीसाचें तुह्मीं सुर हो ! करण्यास इच्छितां हित तें ।
न्याय न तो जाणतसे मार्दव हृदयांत वा कसें असतें ॥ १९ ॥
क्रौर्यीं कुशल असे जो सिंह जणूं सावलेप तो प्रबल ।
घालीत झडप कळपीं आहारेच्छा करावया सफल ॥ २० ॥
अकिलीसाची झाली नष्ट दया हृदयिंची समूळ तशी ।
दुःखद सुखद नरा जी लज्जा ती ठाउकी तया न कशी ॥ २१ ॥
आप्त सखा अधिक प्रिय याहुन जरि नष्ट होय कोणाचा ।
बन्धु ह्मणा पुत्र ह्मणा, आंवरि तरि तोहि वेग शोकाचा ॥ २२ ॥
मित्राच्या कबरीच्या भोंवतिं त्या हेक्तरास ओढितसे ।
बांधुन रथा हयांतें सुरतुल्या अरिस तुच्छ मानि कसें ॥ २३ ॥
नाहीं प्रशस्त कृति ही नाहीं त्यातें मुळींच हितकर ही ।
त्यातें समजूं दे कीं येइल आह्मांस कोप लवलांही ॥ २४ ॥
शूर जरी तो झाला घालि तरी क्रूर फार धिंगाणा ।
निर्जीव मृत्तिकेचा करितो अवमान केवढा जाणा" ! ॥ २५ ॥
धवलकरा जूनो त्या बोले " तूं रजतमयधनुर्धर ! हे ! ।

देतोस हेक्तरा अणि अकिलीसा मान सारखाच बरें ॥ २६ ॥
असते समान ते तर भाषा अमुची अशीच मग असती ।
हेक्तर मुळिं मर्त्य तया स्तन्य दिलें मर्त्य युवतिनें जगतीं ॥ २७ ॥
अकिलीस देवतासुत, त्याच्या जननीस मींच वाढविलें ।
शिक्षित तिजला करुनी लग्न तिचें मींच करुनियां दिधलें ॥ २८ ॥
पेलिअसाची झाली भार्या, जी बहु सुरांस आवडते ।
लग्नसमारंभाला होतां सुर हो ! तुह्मी तिथें ह्मणतें ॥ २९ ॥
रमलास अशनिं तेथें करिं वीणा घेउनी तया कालीं ।
असासि अविश्वास्य सदा पापाशय ! बुद्धि नष्ट तव झाली " ॥ ३० ॥
घनवाहक जोव्ह तिला उत्तर देतां तदा असें वदला ।
"हे जूनो ! अमरांचा राग न तुज पाहिजे बहू आला ॥ ३१ ॥
नाहीं समान हेक्तर अकिलीसाशीं कधींच मानांत ।
अमरांपरि सर्वांहुन हेक्तर तो श्रेष्ठ होय मनुजांत ॥ ३२ ॥
इलियमिं जे नर वसती त्यांमाजी श्रेष्ठ होय हाच खरा ।
मजला तसाच होता; चुकला बलिदान तो न भूप जरा ॥ ३३ ॥
नैवेद्य धूप परिमल अर्पितसे स्थंडिलावरी सारें ।
असला मान तयानें ठेवियला आमुचा सदैव बरें ॥ ३४ ॥
हेक्तरशव चोरुन परि नेण्याची युक्ति देउं सोडून ।
अकिलीसाच्या नकळत करणें हें शक्य अज नसे ह्मणुन ॥ ३५ ॥
कांहीं अमरांनीं त्या थेटिसला जाउनी इथें आणा ।
तीतें मंत्र कथिन मी तुह्मीं ज्या उत्तमांत आज गणा ॥ ३६ ॥

प्रायम अकिलीसातें देइल येऊन देणग्या भारी ।
हेक्तरशव घेवोनी प्रायम पाहील आपुली नगरी ” ॥ ३७ ॥
ऐसें तो वदला मग इरिस पुढें चक्रवातसम उसळे ।
ऐसा निरोप घेउन जाया मोठी त्वरा करून पळे ॥ ३८ ॥
सामास आणि इंब्रस त्यांच्यामध्यें अफाट अंबुधिंत ।
झाली निमग्न मारुन एक उडी खोल फार घाईत ॥ ३९ ॥
अंबुधि कुरकुरला तों अंबुधिच्या गेलि बुडुन खोल तळीं ।
ती आंत आंत गेली जेविं शिशाची लहान जड गोळी ॥ ४० ॥
वृषशृंगांतुन देतां सोडुनियां जलिं तळांत जी उतरे ।
मीनांस मृत्यु आणी खाताती मांस जे अपक्क खरें ॥ ४१ ॥
दिसली गुहेंत थेटिस, दुसऱ्या जलदेवता जिथें जमल्या ।
निर्दोषसुताच्या विधिचा, शोक करी ह्मणुन सकल त्या बसल्या ॥४२॥
सुफल त्रायीं तीचा पुत्र पुढें विगतजीव होणार ।
जन्माची भूमि परी राहिल तेथून दूर ती फार ॥ ४३ ॥
चपलपदी इरिस तिच्या जवळी जाऊन वाक्य हें वदली ।
“गे ! उठ ! आज थेटिस ! बोलावी जोव्ह सुज्ञ तुजसिं बली”॥४४॥
रजतपदी थेटिस मग उत्तर देतां तिला पुसे “ अमरें ।
पाचारिलें मला गे ! सांग अतां येथुनी कशास बरें ? ॥ ४५ ॥
अमरांमाजी जाया मजला होते खरेंच गे लाज ।
अगणित दुःखें माझ्या जीवातें छळिति ज्या नच इलाज ॥ ४६ ॥
गेलेंच पाहिजे परि; त्याच्या शब्दा न येत निष्फलता ” ।

ऐसें वदली देवी आणि झगा असित नेसली निघता ॥ ४७ ॥
याहून अधिक नाहीं रंगानें वस्त्र कोठलें असित ।
पवनपदी इरिस पुढें दावितसे मार्ग ही जशी निघत ॥ ४८ ॥
जलधीचें जल देई वाट तया चालतां दुभंगून ।
तीरावरतीं येतां गेली स्वर्गीं तिथून वर चढुन ॥ ४९ ॥
घनगर्जन सॅतर्नज येथें त्यातें दुरोनियां दिसला ।
अमरांचा धन्यांचा संघ सभोवतिं असे तदा बसला ॥ ५० ॥
जोव्हापाशीं बैसे करित मिनर्वा बसावया स्थान ।
हेमाचा पेला करिं जूनो ठेवीत रुचिर आणि सान ॥ ५१ ॥
शब्दांनीं करि तीचें नंतर ती थोडक्यांत शान्तवन ।
पेला परत करी मग देवी थेटिस करोनियां पान ॥ ५२ ॥
सुरनरपिता तियेशीं भाषण करुं लागला अशा समयीं ।
"आलिम्पसास आलिस थेटिस! तूं खिन्न असुनियां हृदयीं ॥ ५३ ॥
तव चित्तिं दुःख मोठें त्याचा पडणार तुज न कधिं विसर ।
जाणतसें तें सारें तरि तुजशीं बोलणें नसे फार ॥ ५४ ॥
पाचारिलें ह्मणोनी येथें तुज; ऐक वृत्त जें झालें ।
हेक्तरशवा वरोनी नउ दिन सुर भांडतां न हे थकले ॥ ५५ ॥
नगरध्वंसक दुसरा झाला कारण तयास अकिलीस ।
आर्गसहन्त्या कथिती न्याया चोरून शव अखेरीस ॥ ५६ ॥
आकिलीसातें सारा वाटे मोठेपणा परी द्यावा ।
राहील मान तूझा जेणें प्रेमास ऊत बहु यावा ॥ ५७ ॥

कटकीं उतरुन जाईं आज्ञा पुत्रास जाउनी कर कीं ।
राग मला बहु आला तितका इतरां सुरां नसे नाकीं ॥ ९८ ॥
क्रोधावश होवोनी हेक्तरशव ठेवि वक्र नौभागीं ।
टाकीना तें अजुनी देइल का अल्प मान मजलागीं ॥ ९९ ॥
हेक्तरशव तर त्यानें द्यावें आतां खरेंच कीं परत ।
प्रायमनृपतिकडे मी धाडितसें इरिस तों नियोगरत ॥ ६० ॥
ग्रीकांच्या नौभागीं जाउन तनयास सोडविल ह्मणजे ।
द्यावें द्रव्य तयानें आकिलीसा अणिल फार करुणा जें ॥ ६१ ॥
ऐसें तो वदला जें रजतपदी मान्य करित थेटिस ती ।
आलिम्पसोच्चशिखरावरुनी उतरे धरून वेग अती ॥ ६२ ॥
तंबूंत पुत्र तेव्हां दिसला तिज सतत शोक करतांना ।
भोंवतिं सहचर दिसले उद्योगीं फार मग्न असतांना ॥ ६३ ॥
कापुन अजा तयांनीं लोंकरिचा जीवरी बहू भार ।
केला होता त्यांनीं मोठा तंबूंत अन्नसंभार ॥ ६४ ॥
सन्मान्या तन्माता जाउन बसली तिथें तया जवळी ।
त्याशीं भाषण करतां हस्तांनीं ती तदंग कुरवाळी ॥ ६५ ॥
"मम पुत्रक हे ! हृदया पीडिसि किति वेळ रडुन शोकानें ! ।
अशनीं शयनीं नाहीं लक्ष दिलेंसी बऱ्याच कालानें ! ॥ ६६ ॥
मजकरतां अधिक न तूं फार अतां वांचशील बहु करुन ।
ललितस्त्रीविभ्रमसुख सेवुन घे साध्य तेवढें ह्मणुन ॥ ६७ ॥
संप्राप्त आज असती, निष्ठुर तव नियति आणखी मरण ।

देईं ध्यान मजकडे, अणिला संदेश, जोव्ह कथित पण ॥ ६८ ॥
राग तयाला आला, तितका इतरां नसे सुरांलागीं ।
क्रोधावश होवोनी हेक्तरशव ठेवितोस नौभागीं ॥ ६९ ॥
टाकिशि न च तें अजुनी ! ये रे ! सोडून दे तया ह्मणजे ।
व्याया मिळेल बहु धन तुजला देईल खण्डणिंत अज जें" ॥ ७० ॥
अकिलीस चपलपद तिज उत्तर देतां तदा असें वदला ।
" येऊं दे तो येथें घेउन जो खण्डणी करीं वसला ॥ ७१ ॥
नेऊं दे शव त्याला सांगे आलिम्पसेश जर मजला "।
हीं मायलेंक दोघें नौदोशीं करिति वाद येथ भला ॥ ७२ ॥
मार्मिक भाषण करिती, सॅतर्नेज धाडि इरिस इलियमिं तों ।
"जा गे ! त्वरित इरिस तूं आलिंपस सोडुनी जसें कथितों ॥७३॥
प्रायम उदार नृप त्या, अणण्या पुत्रास सोडवुन सांगें ।
ग्रीकांच्या नौभागा बहु धन घेऊन जावयाला गे ! ॥ ७४ ॥
न्यावीं उपायनें तीं होइल तच्चित्त शान्त अज ज्यांनीं ।
त्रायस्थ अन्य कोणी संगें नेऊं नकोस अभिमानी ॥ ७५ ॥
कोणी दूत जरठ परी जाऊंदे एक मात्र संगतिला ।
आणिल रथ हांकुन जो युक्त जया खेंचरें बरीं गतिला ॥ ७६ ॥
अकिलीसहतनृपाचें नेइल शव तो पुरास मग परत ।
मरणाचें भय नलगे नलगे चिंता मुळींच चित्तांत ॥ ७७ ॥
देऊं त्याला संगें बघुन भला एक मार्गदर्शक तो ।
आर्गसहन्ता जो त्या अकिलीसा जवळ घेउनी जातो ॥ ७८ ॥

तंबूंत भूप जातां त्याला अकिलीस नाहिं वधणार ।
येइल वधावया जर इतर कुणी तो निषेध करिल तर ॥ ७९ ॥
तो मूर्ख नाहिं कांहीं, नाहिं उतावीळ, नाहिं पापमति ।
प्रणयार्थिनरालागीं रक्षिल हृदयीं दया धरून अति " ॥ ८० ॥
ऐसें तो वदला मग पवनपदी इरिस तेथुनी सुटली ।
घेउन निरोप शीघ्र प्रायमनृपमंदिरापशीं आली ॥ ८१ ॥
शोकविलापरवानें गेलें सारें भरोनियां स्थल तें ।
जनकाच्या वाटोळे बसले सुत शोक करित एकमतें ॥ ८२ ॥
टाकिति भिजवुनि सारे रुंद झगे चिंब ऊष्ण अश्रुजलें ।
मध्यें वृद्ध बसतसे वस्त्रें झांकून सर्व वपु अपुलें ॥ ८३ ॥
वृद्धाच्या शिरिं अणखी ग्रीवेवर बैसला बराच मळ ।
लोळुन धरणीवरतीं हस्तें जो जमविला तयें विफळ ॥ ८४ ॥
लेंकी सुना तयाच्या सर्वभरी शोक सारख्या करिती ।
ग्रीककरागत योद्ध्यां शूरां बहुतांस आज आठविती ॥ ८५ ॥
प्रायमनृपतीजवळी दूती आली निघून जोव्हाची !
कम्पायमान नृपतिस बोले हलक्या सुरांत ती साची ॥ ८६ ॥
" दार्दन नृप ! धैर्य धरीं प्रायम हे ! चित्तिं भय न धरिं कांहीं ।
नच मी अनर्थसूचक आलें, हें चिन्ह शुभ असे पाहीं ॥ ८७ ॥
आलें तुझेकडे मीं दूती दूरस्थ देव जोव्हाची ।
तव काळजी तयाला, तुजविषयीं येतसे दया साची ॥ ८८ ॥
आलिम्पसस्थ सांगे हेक्तरशव आण सोडवुन तुज हें ।

आतां उपायनांचें अकिलीसा दान इष्ट बहु आहे ॥ ८९ ॥
तेणें द्रवेल नृप तो; जाणें परि एकल्या पडेल तुला ।
त्रोजन दुसरा कोणी संगें घेऊं नको उगा अपुला ॥ ९० ॥
कोणी दूत जरठ परी घेई तूं एक मात्र संगतिला ।
आणिल तो रथ हांकुन युक्त जया खेंचरें बरीं गतिला ॥ ९१ ॥
अकिलीसहतनृपाचें नेइल शव तें पुरास मग परत ।
मरणाचें भय नलगे, नलगे चिंता मुळींच चित्तांत ॥ ९२ ॥
घेई अपुल्या संगें बघुन भला एक मार्गदर्शक तो ।
आर्गसहन्ता जो तुज अकिलीसा जवळ घेउनी जातो ॥ ९३ ॥
तंबूंत नीट शिरतां तुजला अकिलीस नाहिं वधणार ।
येइल वधावया जर इतर कुणी तो निषेध करिल तर ॥ ९४ ॥
तो मूर्ख नाहिं कांहीं, नाहिं उतावीळ, नाहिं पापमति ।
प्रणयार्थिनरालागीं रक्षिल हृदयीं दया धरून अति " ॥ ९५ ॥
ऐसें वदुनी गेली पवनपदी इरिस तेथुनी निघुन ।
शोभनचक्र रथातें सांगे नृप आणण्यास जोडून ॥ ९६ ॥
सांगे रथांत ठेवा द्रव्यकरंडक सुरम्य एक तदा ।
शय्याशाळेमाजी नृप गेला, जी सुगन्धिनें सुखदा ॥ ९७ ॥
पटल तिचें उंच असे वस्तूंचा जींत विरल संग्रह तो ।
भार्येस हेक्युबेला बोलावुन भूप वचन हें करतो ॥ ९८ ॥
" हा दूत मन्दभाग्ये ! आला आलिम्पसस्थ मजपाशीं ।
जोव्हाकडून आला घेउन संदेश योग्य समयाशीं ॥ ९९ ॥

‘ ग्रीकांच्या नौभागीं जाणें, तनयास सोडवायास ।
देणें उपायनें तीं द्रव जीं अणातिल नृपालचित्तास’ ॥ १०० ॥
परि ये मजला सांगें, काय असावें तयांत तुज गमतें ।
मम धैर्यबल कथी कीं नौभागा सरळ जा अतां स्त्रमतें ॥ १०१ ॥
जा जेथें पसरतसे ग्रीकांची ती प्रचण्ड अशि सेना ” ।
ऐसें तो वदला परि तद्भार्या रडत; तीस वदवेना ॥ १०२ ॥
उत्तर त्या परि देई “अहह! वदें तव शहाणपण कोठें ! ।
देशीं परदेशीं तव यश जेणें पूर्वि पसरिलें मोठें ॥ १०३ ॥
ग्रीकांच्या नौभागीं इच्छिसि कां एकला असा जाया ! ।
जाशी त्याशीं जेणें वधिलें पृथुविक्रमां तुझ्या तनयां ! ॥ १०४ ॥
वाटे मजला तूझें आहे काळीज कठिण लोहाचें ।
तूं गावशील हातीं दुष्टाचे त्या असत्यसंधाचे ॥ १०५ ॥
तूझी दया न येइल, तूझा ठेवील मान नच कांहीं ।
मंदिरिं बैसुन आपण पुत्राचा शोक करुं शवाविणही ॥ १०६ ॥
आहे विधिपट याचा विणलेला उपजतांक्षणीं पुरता ।
मी जन्म यास दिधला तेव्हां ठरलें घडेल तें आतां ॥ १०७ ॥
कीं पितरांतें टाकुन दूर कुठें दुष्टहस्तिं त्या पडुनी ।
श्वानां चपल पदांना तृप्त करावें जिवास निज मुकुनी ॥ १०८ ॥
शत्रु तयाचा आहे क्रूर किती ! वाटतें तिथें जावें ।
त्याचें दांतें धरुनी चटचट काळीज चावुनी खावें ! ॥ १०९ ॥
मत्पुत्रवधें केली हानि तयें ती निघेल मग भरुन ।

अरिनें वधिलें तेव्हा तनयाची भीरुता न अलि दिसुन ॥ ११० ॥
कुचभारानत नारी अणखी त्रायस्थ नर दुजे त्यांचें ।
*रक्षण करण्या, पुढतीं लढला ! जाणे न नांव पळण्याचें !" ॥१११॥

---

* या दोन आर्यांत वीरमाता व्हेक्युबा ही शोकभरांत वीराची व्याख्याच करीत आहे असा भास होतो. अर्थात ती व्याख्या देण्याचा अधिकार तिच्या सारख्या वीरमातांसच आहे. ' पुढें लढणें व न पळणें ' हीं वीराचीं दोन लक्षणें तिनें दिलीं आहेत. व तीं लक्षणें किती बरोबर आहेत तें अशाच अधिकारसंपन्न लोकांच्या उक्ती वाचल्याशिवाय कळणार नाहीं. इंद्रजितवधाचें वृत्त ऐकून रावण म्हणतो.

एष पन्थाः सुयोधानां सर्वामरगणेष्वपि ।

अर्थः—उत्कृष्ट योद्ध्यांना स्वर्गप्राप्तीचा हाच मार्ग आहे. तो अमरांसही सर्वांस विदित आहे. पुन्हां रावण म्हणतो.

अद्य वैवस्वतो राजा भूयो बहुमतो मम । येनाद्यत्वं महाबाहो संयुक्तः कालधर्मणा॥

अर्थः—हे महाबाहो ! तुला मरण आणून यम माझ्या बहुमतास प्राप्त झाला आहे.

अर्जुनानें अभिमन्यूची रणांत निधनवार्ता श्रवण करतांच पहिलाच प्रश्न धर्मराजाला विचारला तो पहा.

अभिमुख परप्रहारें पडला कीं, धर्मराज ! सांगावें ।
प्रभुजी ! न जें यशस्कर तें गुरुसमक्ष तोक कां गावें ॥ १ ॥

छातीवर वार खाऊन अभिमन्यु पडला कीं नाहीं तें आधीं सांगा. तसा नसेल तर, म्हणजे पाठीवर वार खाऊन पडलेला असेल तर अशा अयशस्कर मुलाचें वर्णन कशाला करावें ?

सर्ग २२ पृष्ठ ६८४ आर्या १४३ पहा. हेक्तर अकिलीसाला तेंच सांगत आहे मीं छातीवर वार खाऊन मरेन. पळतांना पाठीवर घेऊन मरणार नाहीं. वीरांची भाषाच एक आहे म्हणून वीरमाता, व वीरपिते व वीर यांचें लढण्याचे कामीं एकमत सर्व देशांत सारखेंच आहे.

प्रायम सुरसुन्दर तो वृद्ध तिला फिरुन वाक्य हें वदला ।
" ठेऊन मज न घेई उत्सुक मी फार तेथ जायाला ॥ ११२ ॥
होई न अशुभसूचक पक्षी तूं मंदिरांत मम आज ।
माझें मन वळवाया शक्य नसे तुज कधींच हें समज ॥ ११३ ॥
करता आज्ञा मजला मर्त्य कुणी एक मृत्युलोकींचा ।
कोणि अनागतदर्शी, गणक कुणी थोर पुरुष भक्तीचा ॥ ११४ ॥
ह्मटलें असतें खोटें आणी आम्हीं विरुद्धही असतों ।
परि देवतामुखानें ऐकियला मी निरोप अणि ह्मणतों ॥ ११५ ॥
तीचें दर्शन झालें राहुन सन्मुख, ह्मणुन मी जातों ।
मिथ्या घडेल वच नच; दैवें मेलों तरी बरें धरतों ॥ ११६ ॥
कारण रडतां रडतां इच्छा नुरतां मुळींच रडण्याची ।
पुत्रा कंवटाळीतां मारिल **अकिलीस**! गोष्ट सौख्याची " ॥ ११७ ॥
ऐसें वदुनी तेणें उघडलिं तीं कोशमंदिरद्वारें ।
काढित कंचुक बारा, बारा अवगुंठनें तशीं स्वकरें ॥ ११८ ॥
कंबल चित्रित बारा, बारा काढीत चोल बहु रुचिर ।
टॅलेन्त सुवर्णाचें घेई तोलुन न लावितां उशिर ॥ ११९ ॥
उज्ज्वल तीन त्रिपद्या पेले अणि चषक चार चार भले ।
थ्रेशिअनांनीं पूर्वीं दूत नृपाचे ह्मणोनियां दिधले ॥ १२० ॥
तीही मत्ता अपुली, मंदिरिं राखून वृद्ध ठेवी न ।
इच्छी कीं खण्डणिनें पुत्रा मी सोडवून आणीन ॥ १२१ ॥
त्रोजनलोक तयानें दिण्डींतुन हाकुनी तदा दिधले ।

निर्भर्त्सनपूर्वक वच बोले त्या नृप मुखात जें आलें ॥ १२२ ॥
" जा हो! हतभाग्यांनों! लज्जास्पद सर्व जमतसा कुठले! ।
येतां चिडवाया मज! घरचें तुह्मां न दुःख का पुरलें? ॥ १२३ ॥
सॅतर्नज जोव्हानें दुःखाचा घातला महा घाला ।
शूरावतंस माझा तनय कसा हो रणांत हारविला ॥ १२४ ॥
त्याचें काय तुह्मांला नाहीं वाटत मनांत हो कांहीं! ।
झाला तो मृत, करतिल तुमचा हे ग्रीक नाश लवलांहीं ॥ १२५ ॥
जाईन उतरुनी मी हेदीसाच्या खरेंच तों भवनीं ।
माझी उध्वस्त पुरी अरिनें लुटितां बघेन नच नयनीं " ॥ १२६ ॥
ऐसें वदुनी तेणें दिधले जन हांकुनि स्वदण्डानें ।
वृद्ध तयांतें ढकली मागें जन सरति बहुत खेदानें ॥ १२७ ॥
होते पुत्र तयाचे तेथ उभे हेलिनस व पारिस तो ।
पोलैतीस व पामन, आगाथन अन्य आंतिफोनस तो ॥ १२८ ॥
दायस विख्यात तसा; निर्भर्त्सी वृद्ध भूप सकलांतें ।
आज्ञा वृद्ध तयांतें परुषवचानें करी नउजणांतें ॥ १२९ ॥
" सत्वर या बाळांनों! दिसतां निर्लज्ज! आळशी कुठले! ।
ग्रीकांच्या नौभागीं कां नच मेलांत हेक्तरा बदले! ॥ १३० ॥
हतदैवा धिङ् मातें! वीरांच्या वृद्ध जन्मदात्यातें ।
त्यांतिल एक न उरला! रणिंचें बहु विकट कार्य मज गमतें ॥ १३१ ॥
सुरसुन्दर मेस्तर तो आणी तो त्रोइलस रणीं लढला! ।
हेक्तर तिसरा होता, केवळ सुरसा नरांत जो सजला ॥ १३२ ॥

कारण कधीं न गमला मर्त्यांचा पुत्र तो, गमे अमर ।
या माझ्या तनयांतें मार्से वधिलें, कळे समाचार ॥ १३३ ॥
अवमानहेतु उरले! मिथ्यावादी! व नट! व गायक जे! ।
अजशिशुमेषांदींचे तस्कर! लोकांस ह्मणून घातक जे! ॥ १३४ ॥
त्वरित अतां रथ माझा तुह्मीं करणार सज्ज कां नाहीं? ।
करणें प्रवास ह्मणुनी, वस्तू ठेवा तयांत सगळ्याही" ॥ १३५ ॥
ऐसें तो वदतां सुत जनकदुरुक्तास सर्वही भ्याले ।
शोभन चक्र रथाला उचलुन बाहेर आणते झाले ॥ १३६ ॥
लावीत असत याला ओढाया खेंचरें बहू चपल ।
होता नवाच रथ हा, ठेविति उचलुन करंड मग सकल ॥ १३७ ॥
जूं रुचिर खेंचराचें ठेविति काढून खीळही खालीं ।
होती जी काष्ठमयी, गण्डाकारा सुरेख ती कसली! ॥ १३८ ॥
शोभेस बसविलेलीं होतीं अनुरूप जीस बहु वलयें ।
धूर्बंधन मग अणिती लांब नऊ हात ऊन जें नच ये ॥ १३९ ॥
तितकेंच लांब जूं तें; धूर्दण्डाग्रास बांधती दोर ।
वलयांत खीळ बसविति गण्डा वेष्टून बंद बहु थोर ॥ १४० ॥
बांधून सर्व होतां वांकवुनी ओढिती रथा पुढतीं ।
बहुमोल खण्डणीचे नंतर बाहेर भाग ते अणिती ॥ १४१ ॥
उज्ज्वल रथिं क्रमानें ठेविति घालून चांगली रास ।
क्लेशक्षम दृढशफ अणि जोडिति आणोनियां खेचरांस ॥ १४२ ॥
भेट ह्मणोनी देती मिसिअन हीं खेंचरें प्रायमाला ।

नंतर भूपतिकरतां जोडुन ठेवीत चपल अश्वांला ॥ १४३ ॥
जे पोषिले तयानें काळजिनें सर्व अश्व शाळेंत ।
ऐशा रथास जोडिति दूत अणी भूप अल्प वेळेंत ॥ १४४ ॥
उद्विग्नचित्त आली तेथें तों हेक्युबा पुढें स्थविरा ।
दक्षिणकरिं हेमाच्या पात्रीं रुचिमधुर घालुनी मदिरा ॥ १४५ ॥
हेतु मनीं कीं तर्पण करुन करावें प्रयाण अज त्यांनीं ।
अश्वांच्या पुढतिं उभी राहोनी यांस वदत शब्दांनीं ॥ १४६ ॥
" घ्या ही! जनका जोव्हा! करुनी तर्पण तया असें विनवा ।
शात्रव कटकांतोनी देह सुरक्षित गृहास हा यावा ॥ १४७ ॥
नौभागा मन तूझें दवडी तुज मी न इच्छितें परि तें ।
विनविं इदावासीतें जोव्हातें ज्यास नगर हें दिसतें ॥ १४८ ॥
सॅतर्नजा तया तूं प्रार्थोनी माग रे विहंगम तो ।
दूत तयाचा जो त्या हृदयंगम तुष्टिकर असा गमतो ॥ १४९ ॥
शक्ति असे फार जया बसुंदे उजव्या करांत तो तव रे।
ठेवुनि दृष्टि तयावर जाणें विश्वस्त अरिशिं हेंच बरें ॥ १५० ॥
चपलहयाकीर्ण अशा ग्रीकांच्या जा उठून कटकांत ।
जर जोव्हदूत दे नच, तर 'जावें' हें नसे मम मनांत ॥ १५१ ॥
ग्रीकांच्या नौभागीं जाया उत्सुक उगाच मग अससी! " ।
प्रायम उत्तर देतां वदला हें वाक्य अल्प मग तिजसीं ॥ १५२ ॥
" भार्ये तुझ्या वचाचा उपदेशाचा न करिन अवमान ।
जोव्हास ऊर्ध्वहस्तें विनविन सुटण्या दया तया सान" ॥ १५३ ॥

वृद्ध असें वदला मग सांगे भृत्यांस ओतण्या हातीं ।
जल शुद्ध अल्प तें मग दासी घेउन उभी दिसे पुढतीं ॥ १५४ ॥
कुंभ कमण्डलु तीच्या हस्तीं शोभति तयांतलें जल तो ।
घेउनियां प्रक्षाली निजकर नंतर जरा पुढें सरतो ॥ १५५ ॥
भार्येच्या हस्तांतिल घेउनियां पात्र तो विनंति करी ।
मण्डळ काढून उभा आंत, मधूची नृपाल धार धरी ॥ १५६ ॥
गगनीं लावुन नयनां उच्चस्वर काढुनी करी वचन ।
" हे तात! जोव्ह! विश्रुत, थोर इदानाथ! दे मला दान ॥ १५७ ॥
अकिलीसाच्या जवळी जातां अज येउंदे तयास दया ।
मद्वचन मान्य त्यातें होऊंदे एकदां अशा समया ॥ १५८ ॥
चपल तुझा मजपाशीं पाठव रे! रुचिर अज विहंगम तो ।
दूत सदा तुजलागीं हृदयंगम तुष्टिकर असा गमतो ॥ १५९ ॥
शक्ति असे फार जया बसुंदे उजव्या करावरी मम रे!
देउनि दृष्टि तयावर जाइन विश्वस्त अरिशिं आज बरें ॥ १६० ॥
चपलहयाकीर्ण अशा ग्रीकांच्या मी शिरेन कटकांत " ।
ऐसें तो विनवी तें जोव्हाच्या कर्णीं जाउनी पडत ॥ १६१ ॥
तो मान्य विनति करुनी देई धाडून खालतीं गरुड ।
कृष्ण व्याध खरा हा पक्षांतिल, शकुन चांगला उघड ॥ १६२ ॥
पर्क्नोस यास ह्मणती अङ्गें त्याच्या विशाल पंखांचीं ।
द्वारें श्रीमन्ताच्या उंच जणूं जामदारखान्याचीं ॥ १६३ ॥
खिळवून टाकलेलीं, सांधे अति गच्च बसविले ज्यांचे ।

ऐसा खग दिसला त्यां येतां धांवून मार्गी नगराचे ॥ १६४ ॥
आनंद तयांना झाला हर्षातिशयांत जीव लोळतसे ।
चढुन रथिं देहलिंतुन वृद्ध रथा संभ्रमांत हांकितसे ॥ १६५ ॥
जातां प्रकोष्ठभागीं घुमला आवाज फार चक्रांचा ।
होता पुढतीं दुसरा रथ मोठा चार त्या खेंचरांचा ॥ १६६ ॥
सुज्ञ इदीअस होता त्यांचें सारथ्य करित मोदानें ।
मागुन परि अश्वांतें हांकियलें हृष्ट करुन वृद्धानें ॥ १६७ ॥
करुन कशाघात हयां काढी बाहेर धांवडीत पहा ।
मित्र बरोबर धांवति रडति जणूं मृत्यु पावतो नृप हा ! ॥ १६८ ॥
नगराच्या बाहेरी समभूमीवरतिं उतरुनी आले ।
सुत जामात तयाचे जाते इलियमपुरास ते झाले ॥ १६९ ॥
समभूवरतीं जातां दोघे चुकविति न दृष्टि जोव्हाची ।
पुत्रातें तो वदला बघुन दया येत त्यास वृद्धाची ॥ १७० ॥
" हे मर्क्युरि ! तूं जावें, मानवसंगति तुला बहू अवडे ।
तुज वाटतां हवें तें करतोसी कार्य जें प्रसंगिं पडे ॥ १७१ ॥
ग्रीकांच्या नौभागीं ने जा तूं प्रायमा असा कांहीं ।
जेणें त्यांतें कोणी ज़ातांना अल्पहि न तिथें पाहीं ॥ १७२ ॥
अकिलीसाच्या जवळी जाइल तों तो दिसो न अन्याही " ।
ऐसें तो वदला, वच मोडी यांतील दूत नच कांहीं ॥ १७३ ॥
आर्गससुत मग चढवी सुन्दरपदिं जोड वाहणांचा तो ।
पीयूषमय सुखाचा होता जो सर्व कांचनाचा तो ॥ १७४ ॥

पवन जवानें नेई त्यातें वाहून सागरावरुन ।
अथवा धावुन नेई विपुल धरेवरुनियां त्वरा करुन ॥ १७५ ॥
त्रोदीं हेलिस्पान्टीं लवकर तो पातला पुढें जाया ।
राजकुलांतिल कोणी वाटे हा तरुण येतसे समया ॥ १७६ ॥
तारुण्याविर्भावें सौन्दर्यें आत्मरूप हा सजवी ।
इकडे तों रथ आले जेथें ऐलससमाधि ती बरवी ॥ १७७ ॥
अश्वां व खेंचरांतें थांबविती जल नदींत पाजाया ।
इकडे धरणीवरतीं पडला संधिप्रकाश या समया ॥ १७८ ॥
निरखी दूत समोरी मर्क्युरि दृष्टीस जवळ तों पडत ।
प्रायम नृपतीलागीं दूत असें लागलेंच तो वदत ॥ १७९ ॥
"दार्दन वंशोद्भव हे ! सावध अस ! यांतची शहाणपण ।
वीर पुढें मज दिसतो अमुचा तो करिल नाश करुन रण ॥१८०॥
अश्वारोह करोनी जाऊं ये पळुन सत्वरी आतां ।
तज्जानू कंवटाळुनि विनवूं त्या अथ अतां दयेकरितां" १८१
ऐसें तो वदतांची झाला संभ्रांतचित्त वृद्ध अतां ।
घाबरला नृप !: राहति ताठ उभे केश अंगिं त्या बघतां ॥ १८२ ॥
नृप नष्टशुद्धि झाला, मर्क्युरि येऊन जवळ हात धरी ।
भाषण नृपतिशिं करण्या त्या लागीं प्रश्न एक गोड करी ॥ १८३॥
" कोठें वद तात अतां घेवोनी अश्व खेंचरें जाशी ! ।
मानव होती निद्रित पूर्ण सुधामय निशा बघून अशी ! ॥ १८४ ॥
विक्रम उच्छ्वसित जयां ग्रीकां त्या काय तूं न भीतोस ।

शत्रू तव विद्वेषी त्यांच्या तूं जवळ काय जातोस ? ॥ १८५ ॥
यांतील एक कोणी भयद निशासमयिं तुज बघेल तमीं ।
इतकें धन पाहुन तुज लुटण्या तच्चित्ति कवण हेतु कमी ॥ १८६ ॥
तरुण स्वतां न अससी ! घेसी हा जरठ वृद्ध संगतिला ।
त्रास तुला कुणि देतां, कोण निवारील सांग रे अरिला ॥ १८७ ॥
पीडा तुज न करिन मी अन्यां देईन दूर लावून ।
समजतसें प्रिय तुजला, न्यून न तूं खचित मत्पित्याहून " ॥ १८८॥
सुरसुन्दर वृद्ध वदे प्रायमनृप त्यास " लाडक्या तनया ।
वदतोसी गोष्टी त्या सत्य मला वाटतात या समया ॥ १८९ ॥
या वेळे पावेतों अमरें कुणि राखिलें मला स्वकरें ।
दिधला मज संगतिला प्रियदर्शन दूत अज असा प्रिय रे ॥ १९० ॥
दिससी बहुत चतुर तूं, धन्य तुझीं जाहलीं जगीं पितरें ! " ।
आर्गसहन्ता बोले दूत तया " परिसवृद्ध ! हें वच रे ! ॥ १९१ ॥
वदलासी गोष्टी त्या आज मला वाटती समीचीन ।
परि ये सांग मला हें, सांग मला तें असत्य जें मुळिं न ॥ १९२ ॥
इतकें अमूल्य अगणित नेशि विदेशीं कुठें वदें धन रे ! ।
रक्षण याचें व्हावें ह्मणुनी नेतोस दूर काय बरें ? ॥ १९३ ॥
अथवा तुह्मीं सारे इलियम सोडून भीतिनें जातां ? ।
झाला मृत सुत तव कीं ग्रीकांहुन शूर जो कमी नव्हता" ॥ १९४ ॥
सुरसुन्दर जरठ तया प्रायम नृप पुसत " तूं बरें कवण ? ।
पितरें कवण तुझीं तीं ? श्रेष्ठ खरा पुरुष दिसशी तूं प्रवण ॥ १९५ ॥

मत्तनया हतभाग्या उद्देशुन करिसि वचन सादर तें ” ।
आर्गसहन्ता बोले “ माझें मन पाहतोस तूं दिसतें ॥ १९६ ॥
ह्मणुनी प्रश्न करिशि तूं निर्बन्धें वीर हेक्तराविषयीं ।
त्यास खरोखर नयनीं देखियलें म्यां प्रशस्य रणसमयीं ॥ १९७ ॥
नौभागीं ग्रीकांतें पळवुन शूलें तयांस जो हाणी ।
राहून दूर आह्मीं अद्भुत याची बघीतली करणी ॥ १९८ ॥
परि एत्रिअससुतावर रागावुन दूर बसत अकिलीस ।
जाऊं देईना तो आह्मां ग्रीकांस उचित संधीस ॥ १९९ ॥
सहचर सतत तयाचा एका नांवेंत बसुनियां आलों ।
मिर्मिदनांतिल मीही निर्मळ वंशांत जन्मता झालों ॥ २०० ॥
पालिक्तर जनक असे धनिक परी वृद्ध तुजसमान अतां ।
त्याचे घरीं सहा सुत, आहें मीं सातवा तसें ह्मणतां ॥ २०१ ॥
टाकुन चिठ्या पहाती माझें निघण्यास नांव परि आलें ।
अकिलीसासह इकडे नौकेंतुन यावया मला पडलें ॥ २०२ ॥
नौभागांतुन आलों समभूवरि त्यास एक कारण तें ।
नगरीभोंवति बघती ग्रीक कराया सकाळचें रण तें ॥ २०३ ॥
स्वस्थ बसायाचा त्यां आलासे राग, ह्मणुन उत्सुक ते ।
कदन कराया बघती आंवरती त्यां न अधिक अज परते” ॥२०४॥
सुरसुन्दर ज़रठ तया प्रायम वदला मला खरें सांगें ।
अकिलीसाचा अससी सहचर जातोस त्याचिया मागें ॥ २०५ ॥
नौभागीं आहे का सुत माझा अजुन ठेवलेला रे ! ।

श्वानास वांटिला वा अकिलीसें तोडुनी तयाला रे ॥ २०६ ॥
आर्गसहन्ता बोले दूत तया परिस वचन वृद्धा! हे ! ।
श्वानांनीं न, खगांनीं नच त्या खाऊन टाकिलें आहे ॥ २०७ ॥
अकिलीसाच्यापाशीं आहे तो अजुन तेथ नौभागीं ।
आहे तसाच अजुनी तंबूमाजी जसा जुन्या जागीं ॥२०८॥
पडल्यावर तेथ अतां उगवुन गेली प्रभात बारावी ।
त्याची वपु परि नाहीं गेली सडुनी, अजून दिसत नवी ॥ २०९ ॥
रणहतनरवपु खाती कीटक जे ते न त्या अतां खाती ।
मित्राच्या कबरीच्या भोंवतिं ओढिल तया सुप्रभातीं ॥ २१० ॥
अकिलीस नृपति परि त्या नाहीं करणार एरव्हीं मलिन ।
साश्चर्य पाहशिल त्या हिमसम दिसतो कसा अज नवीन ॥ २११ ॥
गेलें रुधिर धुवोनी राहे परि सर्व अंग मलरहित ।
सारीं क्षतें बुजालीं शूलें जीं होतिं जाहलीं अमित ॥ २१२ ॥
त्वन्मृत पुत्राची ही काळजि घेतात धन्य ते अमर ।
होता आवडता त्यां करताती प्रेम ह्मणुन अनिवार " ॥ २१३ ॥
ऐसें तो वदला मग आनंदें वृद्ध बोलता झाला ।
" पुत्रा ! उचित असे रे ! वस्तूंचें दान नित्य अमरांला ॥ २१४ ॥
जीवन्त पुत्र असतां मंदिरिं तेणें उपेक्षिलें न तयां ।
आलिम्पसवासी ते स्मरती त्या ह्मणुन मृत्युच्या समया ॥ २१५ ॥
परि आतां घे ये हा सुन्दर पेला, व राख नीट मज ।
अकिलीसाच्या तंबुंत ईशकृपेनें व ने अतां सहज " ॥ २१६ ॥

आर्गसहन्ता बोले " वृद्धा! मन पाहतोस तरुणाचें ।
मच्चित्त वळवशील न, देतोसी दान एक मोलाचें ॥ २१७ ॥
अकिलीसाच्या नकळत घेउं कसें, मी तयास तर भीतों ।
शंका मनांत येते या कृतिचा योग जेधवां दिसतो ॥ २१८ ॥
नाहीं तर मजवरतीं संकट येईल मागुनी भलतें ।
होऊन मार्गदर्शक दाविन अर्गासही तुला पुरतें ॥ २१९ ॥
नावेंत बसुन येइन किंवा चालेन सांगतों पायीं ।
मातें तुच्छ करोनी तुजशीं भांडेल कुणि न या समयीं " ॥२२०॥
बोलुन ऐसें मर्क्युरि झाला आरूढ अश्वयुत रथिं तो ।
घेइ प्रतोद एका हस्तिं दुजा रश्मि आकळुन धरितो ॥ २२१ ॥
हांकाया तो बसतां देई अश्वांस खेंचरांस बळ ।
नौभागाचे खंदक आणी तट भयद दिसति तों जवळ ॥ २२२ ॥
रक्षक नुकते गेले होते गुंतून भोजनामाजी ।
आर्गसहन्त्यानें त्यां आणियली झोंप गाढ पूर्ण अजी ॥ २२३ ॥
अडसर मागें सारुन त्यानें तत्काळ उघडिलीं द्वारें ।
नेई आंत नृपाला तेवीं तें वस्तुजात मग सारें ॥ २२४ ॥
नंतर अकिलीसाच्या गेले हे तंबुच्या अतां जवळ ।
मिर्मिदनांनीं दिधला उंच असा त्या उभारुनी सबळ ॥ २२५ ॥
लाविति सामान तया तोडोनी देवदारुवृक्षाचें ।
छप्पर शाकारिति मग कापोनी गवत गोप्रचाराचें ॥ २२६ ॥
कुंपण भोंवतिं घालिति भूमाजीं दाट खांबले पुरुनी ।

द्वारांतें आंतोनी अडसर तो लाविती तदा अणुनी ॥ २२७ ॥
तीन ग्रीकांचें बल लागे लावावयास अडसर तो ।
अकिलीस एकला परि लावाया सहज तो सुखें शकतो ॥ २२८ ॥
वृद्धाकरतां मर्क्युरि उघडुनियां द्वार वस्तुसंग्रह तो ।
आकिलीसातें द्याया घेउनियां आंत ठेवण्या जातो ॥ २२९ ॥
उतरे रथांतुनी मग भूवरतीं आणि त्यास हें वदत ! ।
"रे वृद्ध पुरुष ! आलों मर्क्युरि मी अमर धाडि मज तात ॥२३०॥
संगतिं येणें होतें, आलों तो; परत जातसें ह्मणुन ।
अकिलीसाच्या आतां दृष्टिपुढें मी नसेन बहु करुन ॥ २३१ ॥
साहाय्य उघड इतुकें मर्त्यां अमरें कधीं नच करावें ।
मत्सरमूलक होइल अज एकाकी प्रविष्ट तूं व्हावें ॥ २३२ ॥
जनकाची जननीची पुत्राची शपथ घालुनी विनव ।
जानू कंवटाळ अधीं होइल परिणाम येउनी कींव" ॥ २३३ ॥
ऐसें वदुनि खरोखर मर्क्युरि आलिम्पसास मग जात ।
प्रायम भूप रथांतुन उतरे भूवरतिं अल्प कालांत ॥ २३४ ॥
सूत इदीअस राहे स्वथपणें सारखा तिथें मागें ।
अश्वां व खेंचरां जो बसुनी राखींत तो जसें सांगे ॥ २३५ ॥
तंबूमाजी गेला वृद्ध तसा निघुनियां तदा सरळ ।
जोव्हप्रिय बसलेला होता अकिलीस तेथ नृप सबळ ॥ २३६ ॥
प्रत्यक्ष भूप दिसला होते सहचर बरेच परि दूर ।
होते दोघे जवळी आतोमीदन व आल्किमस शूर ॥ २३७ ॥

दुसरा यांतिल होता शाखा विस्तीर्ण मार्स वृक्षाची ।
सेवा करिती दोघे पानाशनसमयिं हे अज नृपाची ॥ २३८ ॥
भोजन झालें होतें उष्टें परि अजुन काढिलें नव्हतें ।
प्रायम आंत शिरे परि भूपतिनें पाहिलें मुळीं नच तें ॥ २३९ ॥
जवळुन अकिलीसाचे स्वकरें जानू नृपाल कवटाळी ।
चुंबी तदीय कर ते ज्यांस वधाया नरां अली पाळी ॥ २४० ॥
यांनींच पुत्र याचे होते रणिं मारिले पुरा बहुत ।
केला अपराध अशी एकाद्याची घडून समजूत ॥ २४१ ॥
जो नर अपुल्या देशीं खून करोनी विदेश गांठून ।
एका धनवन्ताच्या मंदिरिं तो शिरत; त्यास मग बघुन ॥ २४२ ॥
होतो मोहावश जन, तेवीं अकिलीस होत पाहुन या ।
साश्चर्य अन्य बघती एकामेकांकडेस या समया ॥ २४३ ॥
प्रायम मग विनयें हें अकिलीसा वचन बोलता झाला ।
" आठव तव ताताला ! सुरसम अकिलीस ! या प्रसंगाला ॥ २४४ ॥
दुःखद्वार्धक्याच्या मजसम जो उंबरा असे चढला ! ।
असतील भेवडावित शेजारी रोज उठुनियां ज्याला ॥ २४५ ॥
नाहीं कोणी तेथें चुकवोनी समर टाळण्या नाश ।
परिसुनि कुशल तुझें परि मुदित असे जो, कधींच न हताश ॥२४६॥
तुजसीं बघेन ह्मणतो त्रायांतुन आलियावरी परत ।
सगळ्या गोष्टींनीं परि दुःखी प्राणी खराच मी असत ॥ २४७ ॥
शूरोत्तमां सुतां मीं जन्म दिला पुष्कळांस ज्यां त्रायीं ।
त्यांतिल नाहीं उरला एक हि मीं सांगतों अशा समयीं ॥ २४८ ॥

हे ग्रीकपुत्र आले तेव्हा होते जिवन्त पन्नास ।
एकीतें नवदश सुत झाले ते इतर अन्य भार्यांस ॥ २४९ ॥
मारीं बहुतेकांच्या केलें जानूंस खिळखिळें समरीं ।
हेक्तर मम आवडता, राखी आह्मांस रक्षुनी नगरीं ॥ २५० ॥
देशाकरतां लढतां, त्याला वधिलेंस रार्णि परी नुकतें ।
ग्रीकांच्या नौभागीं घेउन आलों तदर्थ मी धन तें ॥ २५१ ॥
तुजपासोनी त्यातें न्यायातें सोडवून मी आलों ।
आकिलीस ! मान अमरां ! करुणास्पद कां न मी तुला झालों ? ॥२५२॥
आठव अपुल्या ताता ! दुःखी मी अधिक शोधुनी बघतां ।
इतरा न दुःख जें मज सुतघातककर मुखांत हा धरतां" ॥ २५३ ॥
ऐसें तो वदतांची ताताची आठवण तया घडली ।
रडण्याची त्याकरतां यातें प्रवृत्ति आज बहु झाली ॥ २५४ ॥
दोघे रडती; पहिला आठवुनी हेक्तरास शूरास ।
आकिलीसाच्या चरणीं लोळण घेऊन करित शोकास ॥ २५५ ॥
दुसरा जनकार्थ तसा रणहत पत्रोक्लशार्थ नृप रडत ।
आक्रोशें दोघांच्या मंदिर तें सर्व भरुनियां जात ॥ २५६ ॥
दुःख पुरेंसें झालें, हृदयांतिल शोकलालसा सरली ।
अकिलीसाची स्वारी तेव्हां स्थानावरोनियां उठली ॥ २५७ ॥
स्वकरें वृद्धा उचली येत दया पलिततुण्डहनुची ती ।
त्यातें बोलतसे हा मार्मिक वच योजुनी तदा चित्तीं ॥ २५८ ॥
" हा धिक् ! हतभाग्या ! तूं बहु दुःखें सोशिलींस मानसिक ।
ग्रीकांच्या नौभागीं आलासी एकला कसा अणिक ॥ २५९ ॥

येसी त्याच्या पुढतीं जेणें वधिले तुझे अनेक सुत ।
आहे तव केलेलें लोहाचें हृदय सत्य हें बहुत ॥ २६० ॥
परि ये आसनिं बस तूं मनिंचा तव शोक ठेव दाबून ।
× उत्साहध्वंसक तो नाहीं उपयोग शोक बहु करुन ॥ २६१ ॥
अमरांनीं मनुजांचें निश्चित केलें असेंच दैव बरें ।
त्यांनीं आयुष्यभरी सोसावें दुःख वाटतें जबरें ॥ २६२ ॥
नाहीं लेशभरी परि चित्तीं कधिं काळजी सुरांलागीं ।
जुपितर ठेवी मंदिरिं पात्रें बघ दोन चांगल्या जागीं ॥ २६३ ॥
एकांत दुःख भरलें, भरलें तें सौख्य विपुल दुसऱ्यांत ।
मिश्रण यांचें करुनी घनगर्जन जोव्ह वांटि लोकांत ॥ २६४ ॥
दुःख कधीं कोणाला, कोणाला सौख्य लाधतें समया ।
देतो दुःख जयां त्यां तोटा नाहीं कधीं जगिं अपाया ॥ २६५ ॥
सफल धरित्रीवरतीं क्षुधित तयां आपदा सदा गांठी ।
सुरनर पुसति न कोणी फिरतो सर्वत्र पृथिविच्या पाठीं ॥ २६६ ॥
जन्मापासुनि देती पेलिअसा अमर देणगी जबरी ।
धनसंपत्तीविषयीं त्याची लोकांत ती प्रसिद्धि खरी ॥ २६७ ॥
मिर्मिदनाचा शास्ता, आहे ठाऊक मर्त्य मनुज तरी ।
त्यातें देवी भार्या करुनी सुर देति गोष्ट होय खरी ॥ २६८ ॥
देवांनीं त्यावरही कांहींसें दुःख लादलें आहे ।
मंदिरिं नांदायातें नाहीं त्या पुत्र बहुत तें पाहें ॥ २६९ ॥

× शोको नाशयते धैर्यं शोको नाशयते श्रुतम् ।
शोको नाशयते सर्वं नास्ति शोकसमो रिपुः ॥ १ ॥ रामायण.

परि एक पुत्र जो त्या शेवटिं अल्पायुषी असे झाला ।
तो मी कोठें देतों आतां आनंद वृद्ध पितयाला ? ॥ २७० ॥
त्रार्थी येथ रहातों देशाहुन फार दूर आजवरी ।
देतों दुःख तुला मी तूझ्या पुत्रांसही रणीं भारी ॥ २७१ ॥
आह्मां ऐसें कळतें, होतासी वृद्ध ! तूं बरा गबर ।
वरतीं लेस्बास सजे वसवी जें पुर नृपाल माकार ॥ २७२ ॥
तेथुन खालीं फ्रिजिआ; पसरे तीच्यापुढें अमर्याद ।
हेलिस्पान्ट, मिळुनि या भागीं कोणा न लागली दाद ॥ २७३ ॥
संतति संपत्ति तुझी इतकी होती अगाध जन ह्मणती ।
स्वर्गाचे रहिवासी धाडिति मोठा अनर्थ तुजवरतीं ॥ २७४ ॥
त्वन्नगरीच्या भोंवतिं कंदन समरांत मातुनी राहे ।
ऊठ !नको खेद करूं ! काय तयामाजि फायदा आहे ॥ २७५ ॥
पुत्रास्तव अपल्यातें घेतोसी कष्ट कां उगा करुन ।
त्या का सजीव करशिल ! दुसरा जों नच अनर्थ ये घडुन" ॥ २७६ ॥
सुरसम वृद्ध तयाला प्रायम हें वचन बोलता झाला ।
जोव्हप्रसाद नृपते ! द्यावें आसन मुळीं न तूं मजला ॥ २७७ ॥
तूझ्या तंबूमाजी हेक्तर पडला असे न जो पुरला ।
होइल तितकें लवकर दे त्या सोडुन मदीय पुत्राला ॥ २७८ ॥
त्याला पाहिन नयनीं; घे तूं जी खण्डणी तुला अणली ।
उपभोग घे तिचा तूं देशाची प्राप्त भेट होउ भली ॥ २७९ ॥
जीवन्त ठेवुनी त्वां मातें सूर्यप्रकाश दाखविला" ।
रागें अकिलीस वदे अधिकोत्तर करुन चिढविं तूं न मला ॥ २८० ॥

घेऊन खण्डणी मीं हेक्तरशव परत तुज करीं द्यावें ।
हा हेतु जोव्ह कळवी धाडोनी दूत येत सद्भावें ॥ २८१ ॥
जननी येउन गेली येथुन ती जरठजलधिची तनया ।
चित्तीं माझ्या आतां नीटपणें समज जाहला समया ॥ २८२ ॥
हे ! प्रायम ! मजलागीं फसवुं नको ! वाटतें कुणी प्रखर ।
ग्रीकांच्या नौभागीं सोडी आणुन तुला अतां अमर ॥ २८३ ॥
झाली नसती कटकीं मर्त्याची यावया कधीं छाती ।
ज्वानींतहि शक्य नसे, पडता तो खचित रक्षकां हातीं ॥ २८४ ॥
द्वाराचे अडसर तो देता ढकलून आज सांग कसा ।
म्हणुनी सांगतसें तूं मजला चिढवूं नको पुढें सहसा ॥ २८५ ॥
नांहीं तर तंबुंत तुज ठेविन केल्याविणें न अपकार ।
शरणागत तूं असुन हि जोव्हाज्ञाभंग गमत मज सुकर" ॥२८६॥
ऐसें तो वदला जें भीतीनें वृद्ध सर्व तें मानी ।
मारित आकिलीस उडी द्वारांतुन सिंह जेविं अवसानीं ॥ २८७ ॥
जवळी होते दोघे आतोमीदन व आल्किमस शूर ।
पत्रोक्लशनिधनाच्या नंतर गेले कधीं न हे दूर ॥ २८८ ॥
काढून खोगिरें मग सोडिति हे अश्व खेंचरें आतां ।
स्पष्टध्वनि दूताला जरठाला आंत आणिती उठतां ॥ २८९ ॥
त्यातें आसानें बसवुनि गेले प्रमृष्टशा रथापाशीं ।
अगणित खण्डणि अणती हेक्तरशिर परत सोडवायाशीं ॥ २९० ॥
ती सर्व आणिती हे वगळति परि एक चोल दोन झगे ।
नेतां घरीं इथोनी, अस्तर गुंडाळण्या शवा लागे ॥ २९१ ॥

दासींस हांक मारुन नृप कथि आंघोळ घालण्यास शवा ।
करण्या कथि अनुलेपन नेउनियां दूर हळुच ते अथवा ॥ २९२ ॥
प्रायम पाहुनि त्यातें, दुःखावश होउनी चिडेल तसा ।
अकिलीसाही येइल चेव मनीं, आंवरेल नच सहसा ॥ २९३ ॥
जोव्हाज्ञा भंगुनियां वृद्धाचा जीव खचित घेईल ।
स्नातानुलिप्त शव तें वस्त्रानें दूत झांकती शिथिल ॥ २९४ ॥
अवगुण्ठनार्थ घालिति सुन्दर वर चोल एक विस्तृत तो ।
उचलुन अकिलीस तया, तिरडीवर ठेवुनी पुढें सरतो ॥ २९५ ॥
तन्मित्र हात लावुन ठेविति उचलून त्या रथावरतीं ।
मारून हांक सुहृदा, भूपति मग रडत दुःख करुन अती ॥ २९६ ॥
" हे पत्रोक्लश ! नलगे मजवरतीं कोप अज करायास ।
खण्डणि घेउन दिधलें हेक्तरशव जरि तदीय पितयास ॥ २९७॥
हेदीसीं तुज होइल ठाउक किति खण्डणी अज मिळाली ।
यांतिल योग्य तुला मी वांटा देईन वेळ जर आली " ॥ २९८ ॥
अकिलीस असें वदला जाउन तंबूंत मंचकीं बसला ।
नंतर तेथुन उठला प्रायमनृपतीस बोलता झाला ॥ २९९ ॥
" तव सुत सोडुन दिधला, होती इच्छा तुझी जशी आज ।
तिरडीवर तो निजला अरुणोदयिं पाहशील त्या सहज ॥ ३०० ॥
नेशिल तेव्हां त्याला, आतां मन लाव भोजनावरतीं ।
नायोबीला सुचलें भोजन जरि मंदिरीं मुलें मरती ॥ ३०१ ॥
कन्या सहा तसे ते पुत्र सहा तरुण चांगले ज्वान ।
पुत्र अपालो ते वधि रागें उचलून धनु न जें सान ॥ ३०२ ॥

कन्या दायाना वधि, जिस नायोबी वदे ' न लाटोना ।
मत्सम, दोनचि सुत तिज, द्वादश मम ते सुविदित लोकाना' ॥३०३॥
परि ते असून दोघे, हीच्या बहुतांस वधिति सकलांस ।
होतीं शवें तयांचीं लोळत रुधिरांत पूर्ण नउ दिवस ॥ ३०४ ॥
त्यांतें पुरण्यालागीं कोणी तेथें मनुष्य तो नव्हता ।
सॅतर्नसुतें लोकां केलें सर्वांस दगड त्याकरतां ॥ ३०५ ॥
येतां दिवस दहावा अमरांनीं टाकिलें तयां पुरुन ।
तरिहिन अन्ना त्यजिलें, तीनें रडतां बरेंच भागून ॥ ३०६ ॥
निर्जनपर्वतभागीं अद्यापिहि ती शिलोच्चयीं आहे ।
ह्मणतात अप्सरोगण सैपिलसीं तेथ सर्वदा राहे ॥ ३०७ ॥
फेर धरी नाचे गण त्या आचीलोअसा सभोंताला ।
ईशप्रहित क्लेशें शोक करी देह दगड जरि झाला ॥ ३०८ ॥
तरि ये वृद्धश्रेष्ठा ! सेवूं ये अन्न अपण या समया ।
नंतर शोक करीं तूं त्राया नेऊन आपुल्या तनया ॥ ३०९ ॥
ह्मणजे रडशिल तेथें बहु अश्रू तन्निमित्त गाळून " ।
बोले अकिलीस असें उडि मारुनियां अजा वधी धरुन ॥ ३१० ॥
सोलून चर्म काढुन, आंत मसाला भरीत सहचर ते ।
नंतर खण्ड करोनी शूलीं रोंवून भाजिती त्यांतें ॥ ३११ ॥
घेती नंतर काढुन; रुचकर कांहीं अणून भाकर ती ।
आतोमीदन वाढी पात्रांतुन ओळिनें तयां पुढतीं ॥ ३१२ ॥
अकिलीस मांस वाढी; सुग्रासावरतिं हात मारिति ते ।
अशनाची पानाची इच्छा करिती सहर्ष पुरती ते ॥ ३१३ ॥

सुरसम अकिलीसाचें वर्तन ऐसें उदार पाहून ।
दार्देनिअन प्रायम झाला आश्चर्यभरित आंतून ॥ ३१४ ॥
नृपतीचें संभाषण ऐकुन पाहून हसितमुख सतत ।
आश्चर्यचकित झाला मानासिं अकिलीस वीर विख्यात ॥ ३१५ ॥
दोघेजण हर्षानें एकामेकांकडे अतां बघत ।
झाले तृप्त मनीं हे प्रायम मग वृद्ध नृप तया वदत ॥ ३१६ ॥
" जोव्हप्रसाद नृपते ! होइल तितुकी त्वरा अतां करुन ।
शयनागारा धाडीं घेइन निद्रा यथेच्छ मी पडुन ॥ ३१७ ॥
झाला विलुप्तजीवित तव हस्तें पुत्र समरिं ज्या कालीं ।
तेव्हांपासुन माझे नेत्र न हे झांकिले पुटाखालीं ॥ ३१८ ॥
दुःखातें आळवितों करुनी मी शोक सारखा बघ रे ।
प्रासादप्राकारीं धूळिंत मी लोळतों खरेंच बरें ॥ ३१९ ॥
मीं अन्न घेतलें अज मधु मदिरा ओतिली घशामाजी ।
शिवलों नव्हतों तिजला, घेतलि चव मी तिची नृपा आजी" ॥३२०॥
ऐसें तो वदला मग सांगे अकिलीस सेवकालागीं ।
दासीतें दासांतें आणाया मंच रम्य त्या जागीं ॥ ३२१ ॥
सुन्दर चटया रंगित सांगे आणून वरतिं ताणाया ।
चित्रित सत्रंज्या वर सर्वभरी पाहिजेत पसराया ॥ ३२२ ॥
लोमश पांघुरुणेंही ठेवा तेथें सुरेख आणून " ।
घेउन मशाल हातीं सेवक बाहेर जात मग निघुन ॥ ३२३ ॥
अकिलीस भूप तों त्या परिहासें बोलला असें वचन ।
" बाहेर तूं निजावें, ह्मणजे कोणी बघेल तुजला न ॥ ३२४ ॥

ग्रीकांचे मंत्री कुणि येतिल माझ्या इथें अतां जवळ ।
* करितील मंत्रचिंतन त्या कार्या होय उचित हा काळ ॥ ३२५ ॥
तिमिरावृत रात्रीच्या भयद अशा समयिं बघुन येथ तुला ।
अगमेम्ननास जाउन कथितिल हे धरुन चित्तिं हेतूला ॥ ३२६ ॥
सोडविण्यांत शवाच्या कांहींसा मग विलंब लागेल ।
परि ये सांग मला हें, सांग मला जें खरें अज असेल ॥ ३२७ ॥
करण्यास हेक्तराची अंत्येष्टी कितिक लावशिल दिन रे ! ।
ह्मणजे स्वस्थ बसोनी माझ्या लोकांस आंवरीन बरें ॥ ३२८ ॥
सुरसम वृद्ध तयाला प्रायम बोले " खरोखरी आज ।
अंत्येष्टि हेक्तराची करण्यातें सांगतोस नीट मज ॥ ३२९ ॥
हे अकिलीस ! तयानें करिशी मम तूं खरें समाधान ।
जाणसि आह्मीं कैसे गेलों कोंडुन पुरांत नादान ॥ ३३० ॥
दूर बरेंच असे तें गिरिवरुनी लांकडें अतां अणणें ।
त्रायस्थांतें वाटे भीतिस कारण तशांत हें करणें ॥ ३३१ ॥
मंदिरिं ठेउन याला दिवस नऊ शोक सारखा करुनी ।
येतां दिवस दहावा टाकूं भूमींत यास मग पुरुनी ॥ ३३२ ॥

---

* भरतभेटींचे वेळीं **राम** भरतास पुष्कळ कुशलप्रश्न विचारतात
त्यांस कच्चित्प्रश्न म्हणतात. त्यांतील खालीं एक दिला आहे.
कच्चिन्निद्रावशं नैषि कच्चित्कालेऽवबुध्यसे। कच्चिच्चापररात्रेषु चिंतयस्यर्थनैपुणम्॥ १
अर्थ—तूं निद्रेच्या अधीन होऊन रहात नाहींसना ? वेळेवर जागा होत असतो-
सना ? व अपरात्रीं उठून अर्थप्राप्तीकरतां उपायांचें चिंतन करित असतो
सना ? मंत्राचिंतनास दोहोंत काळ एकच ठरविला आहे. रामायण.

भोजन सारे करतिल नंतर येईल दिवस अकरावा ।
त्या दिवशीं कबर रचूं नंतर उजडेल दिवस बारावा ॥ ३३३ ॥
तेव्हां जरूर पडल्या आम्हीं सारे फिरून करुं समर" ।
त्यातें आकिलीस वदे "हेतू पडतील सर्व तव पार ॥ ३३४ ॥
प्रायम वृद्ध! अनिच्छित नाहीं होणार यास कारण तें ।
सांगशि तोंवर मी हें ठेविन कीं आंवरोनियां रण तें " ॥ ३३५ ॥
ऐसें वदुनी तेणें उजव्या मणिबन्धनीं नृपा धरिलें ।
म्हणजे त्याच्या चित्तीं नाहीं उरणार भय तदा पाहिलें ॥ ३३६ ॥
निजले अलिंदभागीं प्रायम अणि दूत शेवटीं आतां ।
परिणामावर दृष्टी ठेविति दोघे अशा स्थळीं पडतां ॥ ३३७ ॥
सुरचित तंबूमाजी मध्यें आकिलीस भूप मग निजला ।
ब्रैसीसजा पहुडलि गौरकपोला तिथेंच संगतिला ॥ ३३८ ॥
दुसरे सुर आणि रथी निद्रावश पडति सर्व रात्रभर ।
शुभकारक मर्क्युरिला नींज न आली करी मनिं विचार ॥ ३३९ ॥
न्यावा नौभागांतुन कैसा प्रायम फिरोनियां परत ।
पुण्यद्वारस्थांचें चुकवाया लक्ष केंवि सांपडत ॥ ३४० ॥
म्हणुनि पुढें तोंड करी वृद्धाच्या मस्तकावरी अपलें ।
आणी वदत तयाला " वृद्धा तुज वाटतें न भय कसलें ॥ ३४१ ॥
आकिलीस येउं देई, अरिवर्गी म्हणुन येथ तूं निजसी ।
देऊन खण्डणी बहु घेसी तूं सोडवून तनयासीं ॥ ३४२ ॥
जीवन्त सोडवूनी तुजला आणावयास जर झालें ।
बाकीचे तनय तुझे देतिल धन तीनपट जरी पडलें, । ॥ ३४३ ॥

अगमेम्नना ह्मणोनी आणी ग्रीकां न पाहिजे कळलें "।
ऐसें तो वदला नृप दूता उठवीत, भय तया पडलें ॥ ३४४ ॥
अश्वां व खेंचरां मग मर्क्युरि जोडीत लावुनी रांगा ।
नेई रथ हांकोनी; ठेवी मार्गें क्षणांत नौभागा ॥ ३४५ ॥
कोणि न पाही यांला, क्रमतां पथ भूप पुढतिं पथिं पाहे ।
झान्थस सावर्तवती, निर्झरणी जो ज्व्हजा तिथें वाहे ॥ ३४६ ॥
आलिम्पसोच्चशिखरा मर्क्युरि गेला निघोनियां पळत ।
धरणीवरतीं पसरे कुंकुमरशना प्रभात तों त्वरित ॥ ३४७ ॥
हांकिति अश्वां दोघे करितांना शोक रडुनियां भारी ।
वाहून खेंचरें शव नेती आली जशी पुढें नगरी ॥ ३४८ ॥
शोभनरशना रामा किंवा कुणि पुरुष यांत अज वळखी ।
व्हीनससम कासान्द्रा चढुनी पर्गामसावरी निरखी ॥ ३४९ ॥
सारथिच्या जाग्यावर बसलेला जनक तिजासिं आढळला ।
करित पुकारा नगरीं नेहमिंचा दूत वृद्ध तो दिसला ॥ ३५० ॥
शवयानीं तो दिसला निजलेला भूप खेंचरांवरचा ।
किंकाळी फोडोनी रडत फिरे मार्ग धरुन नगराचा ॥ ३५१ ॥
" ट्रायपुरींतिल नर हो ! नारी हो ! हेक्तरा बघा नयनीं ।
समरांतून सुरक्षित येतां होता बराच हर्ष मनीं ॥ ३५२ ॥
आनंदहेतु होता नगरांतिल तो जनांस सकलांस "।
ऐसें ती वदतां नर नारी कुणि राहिलें नच घरास ॥ ३५३ ॥
दुःसह्य दुःख झालें कोणाच्यानें न आंवरे आतां ।
नंतर नगरद्वारीं त्यांस दिसे आंत शव तदा शिरतां ॥ ३५४ ॥

शोभनचक्ररथावर भार्या तशि धांव घेत तज्जननी ।
तच्छीर्षा स्पर्शोनी उपटिति निज केश दोन हातांनीं ॥ ३९५ ॥
जमला जनौघ भोंवतीं तेथ उभे लोक राहती रडत ।
सूर्यास्तापावेतों बसते हे शोक करित अज सतत ॥ ३९६ ॥
लोकां उद्देशोनी बोलत परि वृद्ध नृप रथांतून ।
" वाट करावी मजला, जाऊंदे खेंचरांस घेऊन ॥ ३९७ ॥
नेतों घरास याला नंतर जन हो रडाल पोटभर " ।
ऐसें तो वदला मग जन झाले दूर असुनि ते फार ॥ ३९८ ॥
मार्ग रथाला झाला, ठेविति शव मंदिरांत आणून ।
ठेवुन सुरभि शयनिं ते, गायक जन आणिती बलावून ॥ ३९९ ॥
अणि गाति करुणगीतें भरलासे ज्यांत पूर्ण शोकरस ।
हुंकार तयां द्याया नारी सोडिति सशब्द निश्वास ॥ ३६० ॥
ॲन्द्रोमाकी लागे धवलकरा शोक बहु करायास ।
नरहन्त्या पतिचें शिर दों हातीं धरित कठिण समयास ॥ ३६१ ॥
" प्रथमवयीं असतां तूं पतिराया ! विगतजीव झालासी ! ।
निज मंदिरांत मजला विधवेला त्यजुनि आज गेलासी ॥ ३६२ ॥
केवळ बालक उरला मुलगा तूझा शिवाय हा पाहें ।
दुर्भाग्यांनीं आह्मीं दोघांनीं जन्म त्या दिला आहे ॥ ३६३ ॥
प्रौढदशा त्यालागीं प्राप्त कशी ती न खचित होणार ।
कारण तीच्या आधीं येइल कीं पाडण्यांत हें नगर ॥ ३६४ ॥
त्राता एक तयाचा झालासी विगतजीव तूं आज ।
नगराच्या सर्वस्वा आजवरी राखिलेंस तूं सहज ॥ ३६५ ॥

तूं राखिलींस बाळें, नारी त्वां राखिल्या मनुष्येशा ! ।
आतां त्यांतें नेइल, मजला हा त्यांत शत्रु नौदेशा ॥ ३६६ ॥
हे ! माझ्या तनया ! तुज माझ्यासह यावयास लागून ।
कामीं अयोग्य पुष्कळ पडतिल करण्यास कष्ट मागून ॥ ३६७ ॥
अकरुण कठिण धनी तव येइल वांट्यास तेथ एक नवा ।
ग्रीक तुला क्रुद्ध दुजा नेइल बुरुजावरी करें अथवा ॥ ३६८ ॥
लोटुन वरून तेथुन करिल तुझा नाश दुःखकारक तो ।
'सुत, तात हेक्तरानें भ्राता वधिला रणांत' जो ह्मणतो ॥ ३६९ ॥
हेक्तरहस्तें धरणी धरिली दन्तें खरेंच बहुतांनीं ।
नव्हता सौम्य पिता तव येतां संग्रामकार्य अवसानीं ॥ ३७० ॥
शौर्यास्तव असल्या या करित असे शोक सकल हें नगर ।
पितरांस दुःख देसी हेक्तर ! त्याचा न शक्य उच्चार ! ॥ ३७१ ॥
हेक्तर ! कटुतर दुःखें उरलीं माझ्या खरेंच वांट्यास ।
माझ्याकडेस जातां नाहीं तूं पसरिलेंस हस्तांस ॥ ३७२ ॥
अंथरुणावरुनी तूं वदलासी चांगलें न वा वचन ।
रात्रंदिन रडतां मम होइल जें आठवुन समाधान ! "॥ ३७३ ॥
ऐसें ती रडत वदे, नारी मग लागल्या रडायाला ।
तत्काल हेक्युबेनें केला आरंभ शोक करण्याला ॥ ३७४ ॥
" हेक्तर सर्वांमाजी तूं हृदयानंद लाडका तनय ।
आवडलासी अमरां होतासी तूं सजीव जों अभय ॥ ३७५ ॥
तव काळजी तयांनीं सर्वांनीं वाहिली सदैव खरी ।
वाहति अजून तीही आला तुज मृत्यु लढुन जरि समरीं ॥ ३७६ ॥
जे करिं सांपडले त्यां अकिलीसें एकवार मम तनयां ।

नेउनियां विकिलें त्या वंध्योदधिच्या पलीकडे सभयां ॥ ३७७ ॥
सामासीं, लेम्नासीं, इंब्रासिं वा जेथ नसत बंदरही ।
अकिलीसें त्याच तुझा शूलानें जीव घेतला पाहीं ॥ ३७८ ॥
पत्रोक्लश तत्सहचर समरीं तूं मारिलास जो प्रखर ।
त्याच्या कबरीभोंवतिं तुज यानें ओढिलें अतां सभर ॥ ३७९ ॥
परि या कृतिनें त्याला केलें नाहीं सजीव अज पाहीं ।
आतां परि तूं मंदिरिं येउन पडलास येथ लवलाहीं ॥ ३८० ॥
दुःख तयानें झालें मजला बहु तें न सांगवे कांहीं ।
दिसशी सतेज! हत जणु फीबसधृत सौम्य रजतशस्त्रांहीं "॥३८१॥
ऐसें ती रडत वदे, शोकाला ऊत येतसे फार ।
तिसरी नंतर हेलन करुं लागे शोक ज्या नसे पार ॥ ३८२ ॥
" हेक्तर ! सर्वांमाजी तूं हृदयानंद दीर होतासी ।
झाला पारिस पति मम, आणी त्रायास दुरुन जो मजसीं ॥३८३॥
होतें अधिक बरें जर मेलें असतें अधींच पाहिल्यानें ।
देशा सोडुन आलें वर्ष विसावें भरेल वेळानें ॥ ३८४ ॥
निन्दागर्भ परुष वच तव तोंडीं ऐकिलें कधीं नाहीं ।
वस्त्रालंकृत जावा, नणदा, वा दीर वदत जरि कांहीं ॥ ३८५ ॥
सासू कांहिं वदे, जरि (ताता सम सदय सौम्य मामंजी) ।
त्यांस तरी उपदेशुनि मृदु शब्दें बोधिलेंस तूं सहजीं ॥ ३८६ ॥
ह्मणुनी पीडितहृदया रडतें मी आज कीं तुझ्याकरतां ।
माझ्याकरतां रडतें, झालें मज दुःख केवढें आतां ॥ ३८७ ॥
सकल त्रायामाजी कुणि नाहीं मित्र ज्या ह्मणेन बरा ।
सारे जन करताती माझा कैसा सदैव तिटकारा ! " ॥ ३८८ ॥

ऐसें ती रडत वदे अगणित जनसंघ काढि आर्तरवा ।
वृद्ध प्रायम बोले " त्रोजन! काष्ठें अणा अणी जुळवा ॥ ३८९ ॥
ग्रीक लपोनी बसतिल मार्गीं ही काळजी मनीं नलगे ।
देतां निरोप मजला ऐसें अकिलीस रात्रिं मज सांगे ॥ ३९० ॥
कीं तों न करिन रण जों उगवलि नाहीं प्रभात बारावी " ।
ऐसें तो वदला, ते जोडिति शकटांस खेंचरें बरवीं ॥ ३९१ ॥
अश्वहि जोडिति कांहीं, नगरा बाहेर सर्व जन जमले ।
काष्ठांची रास पडे कारण नउ दिवस तेथ हे खपले ॥ ३९२ ॥
मर्त्यां प्रकाशदात्री आज दहावी प्रभात तों आली ।
हेक्तरशव उचलोनी रडत अशी मंडळी मग निघाली ॥ ३९३ ॥
उंच चितेवर ठेवुनि देती मग अग्नि तीस लावून ।
रक्तांगुलि अरुणाची जननी येई प्रभात तों दिसुन ॥ ३९४ ॥
लोक चितेच्या भोंवतिं जमले संभ्रम करून त्या ठाया ।
विझवुन चिताग्नि टाकिति पाहोनी योग्यशा तदा समया ॥ ३९५ ॥
पाहुन बल अग्नीचें श्यामल मधु मद्य ओतिती वरतीं ।
अस्थी शुभ्र तयाच्या जमविति मग बन्धु मित्र रडुन अती ॥३९६॥
त्यांच्या गालावरुनी अश्रूंच्या विपुल वाहती धारा ।
हैम करंडकिं घालुनि आच्छादति नील वरुन पट सारा ॥ ३९७ ॥
पोकळ कबर रचोनी देती ठेवून आंत नंतर ते ।
मोठाले दगड वरी पसरति आणोनियां भराभर ते ॥ ३९८ ॥
घाईंत कबर बांधिति ठेविति रक्षकगणां सभोंवार ।
ह्मणजे ग्रीक न येतिल छापा घालावया अशान्तिकर ॥ ३९९ ॥
रचुनी कबर अशी ते परतुन नृपमंदिरांत जन जमले ।

कारण वृद्ध नृपानें आमंत्रण यांस आदरें दिधलें ॥ ४०० ॥
जोव्हप्रसाद नृप त्यां प्रायम देई प्रशस्त भोजन तें ।
अन्त्येष्टि हेक्तराची हयदमनाची करीत अशि जन ते ॥ ४०१ ॥

येथें अकिलीसाच्या तीव्र रोषाचें व तदनुषंगानें त्याच्या भयंकर परिणामांचें वर्णन करणारें इलियड संपलें. त्याचा विषयच अकिलीसाचा तीव्र रोष होता. त्यानें आपलें कार्य केलें व तो प्रशान्त झाला. पुढें इलियड विस्तृत होण्याचें काम नाहीं, परंतु त्रायांचें व तेथें लढत असलेल्या वीरांचें पुढें काय झालें हें जाणण्याची वाचकांस इच्छा झाली असेल ह्मणून तें वृत्त येथें दिलें पाहिजे.

काष्ठमय अश्वरचनेची कृति काढून हेक्तरवधानतंर त्राय ग्रीकांनीं हस्तगत केलें याचें वर्णन व्हर्जिलनें केलें आहे. हेक्तरनें देहावसानसमयीं वर्तवून ठेवल्याप्रमाणें पादतलीं बाण लागून पारिसाच्या हस्तें अकिलीस मृत्यु पावला. अकिलीसाच्या पिऱ्हसनामक पुत्रानें प्रायमाचा प्राण घेतला. अकिलीसाच्या मृत्यूनंतर त्याचें व्हल्कनकृत कवच घेण्याकरतां युलिसीसाशीं आजक्षाचें भाण्डण झालें. हेतु साध्य झाला नाहीं म्हणून आजक्षानें आत्मवध केला. पारिस मरण पावला म्हणून हेलननें त्याच्या बन्धूशीं दीइफोबसाशीं लग्न लाविलें, परंतु त्राय पतन पावण्याचे संधीस पहिल्या पतीची म्हणजे मोनिलासाची प्राप्ति करून घेण्याकरतां दीइफोबसाचा विश्वासानें घात केला. क्लातेम्निस्त्रा म्हणजे अगमेम्ननाची भार्या, हिनें पति विदेशीं असतां पतिशय्येचें सतीत्वानें रक्षण केलें नाहीं. अगमेम्नन परत येतांच तिच्या कामुक वल्लभानें त्याचा वध केला. दायोमीदही आपल्या भार्येच्या हातून असाच मृत्यू पावता परंतु तो देश सोडुन देऊन आत्मसंरक्षण करिता झाला. नेस्तर मात्र स्वदेशीं ह्मणजे पैलसीं जाऊन मुलाबाळांत सुखानें नांदूं लागला. युलिसीसानें जलमार्गें व स्थलमार्गें घरास जातांना अनेक कष्ट काढुन आपुला देश गांठिला याचें वर्णन होमरनें आदेसीनामक काव्यांत केलें आहे.

शुद्धिपत्र.

पृष्ठ	मूळ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
२	टीप दुसरी	ओळ पहिली	* ह्मणऊनि	+ ह्मणऊनि
७	मूळ	२२	आरंभीची	आरंभींची
१०	मूळ	७	हेक्तर-गेला	अकिलीस-गेला
१५	टीप	शेवटली	वास्तव	यास्तव
१८	टीप	२	गणग्राहकता	गुणग्राहकता
२५	मूळ	२३	अरिस्टॉट	अरिस्टॉटल
२९	”	८	विकारास	विकारांस
३२	”	१७	हेशा	हेषा
३५	”	२०	लटपटती	खट पटती
५३	टीप	१	फार तर	तर फार मान
६२	मूळ	१४	तरी	तर
६२	टीप	७		रामायणांतील हा उतारा आहे असें दाखविण्यास रामायण हा शब्द शेवटीं पाहिजे.
	मूळ			
८३	”	१	**नांवाचा कोश**	**नावांचा कोश.**
८९	”	९	याची	याचीं
९६	”	१०	करता झाला	केली
१०५	”	१५	ह्मणन	ह्मणून
३	श्लोक ३	३	रणात	रणांत
”	४	१	वैषम्य भाव	वैषम्यभाव
५	१५	४	अखिल तेनिदसेश	अखिलतेनिदसेश
६	१७	४	मदश्र परिमार्जन	मदश्रुपरिमार्जन

पृष्ठ	श्लोक	ओळ	अशुद्ध	शुद्ध
८	३०	१	पेलिअस पुत्र	पेलिअसपुत्र
९	३१	१	सनाधिपास	सेनाधिपास
१०	३६	१	होऊन	होउन
१०	३७	२	नृपा ही	नृपाही
११	४२	२	तूं	" तूं
,,	,,	३	लढता	लढतां
,,	,,	४	मजसि	मजसिं
,,	४३	१	वाटुन	वांटुन
१५	६१	४	मजसी	मजसीं
१६	६९	३	शिरीं	शिरिं
१७	७२	१	तुवा	तुवां
,,	७४	२	तथा ही	तथाही
,,	,,	३	राज दण्ड	राजदण्ड
१९	८५	४	सुरम्य मूर्ति	सुरम्यमूर्ति
२२	१००	४	नयेत	न येत
२३	१०२	२	पटगृहात	पटगृहांत
२४	१०८	२	तया	तयां
२५	११२	२	अमरास	अमरांस
२६	११५	१	उद्विग्न चित्त	उद्विग्नचित्त
२७	१२०	२	मातृनातें	मातृनातें "
३०	१३१	४	म्या	म्यां
,,	टीप	४	ब्राएरिअस	ब्रिएरिअस
३१	श्लोक १३७	२	विनाशी	विनाशी "

पृष्ठ	श्लोक	ओळ	अशुद्ध	शुद्ध
३२	१४२	३	एकलाची	एकलाचि
३४	१५०	२	अखिल तेनिदसेश	अखिलतेनिदसेश
,,	१५१	३	साथ	सांथ
४५	२०१	२	कांही	कांहिं
४८	५	३	निद्रासुधामय करि	निद्रा सुधामय करी
५४	३२	१	देहावसान समयीं	देहावसानसमयीं
,,	३४	१	वचन ही	वचनही
५८	५३	१	तयांची	तयांचीं
६६	९०	३	शाखेवरि	शाखेवरी
६७	९६	१	जेव्हा	जेव्हां
,,	,,	२	दशमात	दशमांत
७५	टीप	८	मेंढपालांच्या	मेषपालांच्या
७६	श्लोक १३७	२	मेंढपाल	मेषपाल
७८	टीप	३	अगाध गुणार्णव वर्णन	अगाधगुणार्णववर्णन
७९	०	१	नौकाची	नौकांची
९३	ओवी १८०	३	समरासी	समरासीं
९६	टीप	ओळ १५	देण्यांत आलीं	दिलीं
९७	,,	२१	सानुननय	सानुनय
९९	,,	८	एश्वर्यांत	ऐश्वर्यांत
१००	आ. २१	१	व्हीनसदत्तसुभग	व्हीनसदत्त सुभग
१०२	३६	२	माझें ही	माझेंही
१०३	टीप	२	च्त्रिपट	चित्रपट
१०४	आ. ५०	१	वाच्छा	वांच्छा

पृष्ट	आ.	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१०४	५७	१	तनु सौष्ठवा	तनुसौष्ठवा
,,	टीप	४	डाकीच्या	डोकीच्या
१०५	,,	१२	द्रौपदाचें	द्रौपदीचें
,,	,,	२६	हामर	होमर
१०८	आ.८०	१	मानवतो	मानव तो
,,	,,	२	मानव तो	मानवतो
१०९	८२	१	ग्रीकामधिं	ग्रीकांमधिं
,,	८५	१	दीर्घ नयनां	दीर्घनयनां
११०	९५	२	अगमेम्नन ही	अगमेम्ननही
११४	१३०	२	मार	मार ,,
११८	१६७	२	जय घोषें	जयघोषें
१२०	६	२	करून	करुन
,,	७	१	सकला	सकलां
१२१	१७	२	त्रायस्थास्तव	त्रायस्थांस्तव
१२७	७९	२	त्या	त्यां
१२८	८२	२	नौकामाजी	नौकांमाजी
,,	८६	२	दिधल्या ही	दिधल्याही
,,	८६	२	करतो का	कर तोका
१३३	१३२	२	कितिहा	किति हा
१३७	१७७	२	करून	करुन
१३८	१८३	२	शव	शव तें
१४४	३५	१	सैन्य संहार	सैन्यसंहार
१४५	४५	२	प्रथित	विदित

पृष्ठ	आ.	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१४८	७९	१	ञोजनांस	ञोजनां
१५१	१०३	१	जोडियली	जोडियली "
१५२	११६	१	जघनाशीं ते	जघनाशीं
१५७	१६६	२	तद्वेषा	तद्वेषा
१५८	१७४	१	शोणितशोभित काया!	शोणितशोभितकाया !
१५८	१७९	१	सांगा	" सांगा
१६२	२१७	१	त्यातें	त्यांतें
१६८	२७१	२	तितक्यातांचि	तितक्यांतचि
"	२८१	२	काचनमय	कांचनमय
१७१	३०६	२	जूनो,	जूनो
१७५	३४६	१	मानव हित	मानवहित
१७६	३५९	२	दोन्हीं पातळ	पातळ दोन्हीं
१७७	सारांश ८		दायोमादि	दायोमीद्
१७९ आ. १६		२	धुरळ	धुरळा
"	२०	"	"अरडे न	अरडे " न
१८१	३१	२	इनिआस	ईनिआस
१८४	५७	१	हिप्पोलोफस	हिप्पोलोकस
१८६	७४	१	आयोबेटीस नृपतिला	आयोबेटीसनृपतिला
१८७	७६	१	झाली	झालीं
१८९	९७	१	प्रायम मंदिर	प्रायममंदिर
			नृपति जामातां	नृपतिजामातां
"	९९	१	या पायीं	यापायीं
१९१	११२	२	पूरंध्री	पुरंध्री
"	११८	२		

पृष्ठ	आ.	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१९२	१२९	१	दासी जनांत	दासीजनांत
१९४	१४४	१	चिंता व्याकुल	चिंताव्याकुल
१९५	१५२	२	" बोले	बोले "
,,	१५८	२	तिकडे	तिकडे "
२०१	२०७	२	पाहुनिया	पाहुनियां
२०३	कालमान	१	या सर्गाबरोबर	या सर्गातील हेक्तर व आजक्ष यांच्या द्वंद्वाबरोबर
२०४	आ.१५	२	दोघेही	दोघेंही
२०६	२७	२	तुम्हात	तुम्हांत
२०७	३८	१	करितां	" करितां
२०८	५०	२	तेव्हा	तेव्हां
२१०	७०	२	धैर्य बळें	धैर्यबळें
२११	७७	१	आता	आतां
,,	,,	२	जाता	जातां
,,	८५	२	शस्त्रास्त्र ज्ञान	शस्त्रास्त्रज्ञान
२१९	१६२	१	असे	असें
२२०	१६५	१	नौकाकडे	नौकांकडे
२२४	२१०	१	जीवा	जीवां
२२५	४	२	त्रायस्था	त्रायस्थां
२३१	६५	२	तयाला	अनंतर
२३३	८०	१	स्मृति करती	स्मृतिकर ती
,,	८१	२	मारुन	मारून
२३५	१०१	१	भरंवसा	भरवसा

पृष्ठ	आ.	ओळ	अशुद्ध	शुद्ध
२३५	१०७	२	त्या	त्यां
२३६	११६	२	शीर्ष कवचधर	शीर्षकवचधर
२३७	१२३	२	त्य्सर	त्यूसर
२३८	१३३	१	,,	त्यूसर
,,	१४०	१	,,	त्यूसर
२३९	१४६	२	,,	त्यूसर
२४९	२४९	२	ज्ञान्थस प्रवाहाचे	ज्ञान्थसप्रवाहाचे
२५६	५'१	१	पद् सामर्थ्यें	पद्सामर्थ्यें
२६१	१०३	२	अगमेम्नन नृपतीच्या	अगमेम्नननृपतीच्या
२६२	टीप	१	संदीप्ते	+ संदीप्ते
२७२	आ.२१८	२	बहिरावर्ण द्वारीं	बहिरावरणद्वारीं
२७४	टीप	७	दोघही	दोघेंही
२७५	आ.२३३	२	धावे याच्या	धांवे यांच्या
,,	२४२	२	वीरांचे	वीरांचें
२७७	२५४	२	क्य्रीतिअन	क्यूरीतिअन
२८१	२९०	२	धावा	धांवा
२८४	३२३	१	असें ! पाहीं	असें पाहीं !
२९२	६७	२	चतुरा	चतुरां
,,	७०	२	बघता	बघतां
२९४	८९	२	हास्य विषय	हास्यविषय
,,	९०	१	वलाडून	वलांडून
२९५	१०४	१	एस	ऐसें
२९९	१४५	१	तरी	तरि

पृष्ठ	आ.	ओळ	अशुद्ध	शुद्ध
३०२	१७५	२	शिरून	शिरूं न
३०३	१७९	१	प्रसंगात	प्रसंगांत
३०४	१८९	१	यांतरे	यांत रे
३०६	२१०	१	अह्मां	अम्हीं
३०७	२१९	२	तलां	तला
३११	२	१	ग्रीकाच्या	ग्रीकांच्या
३१२	८	१	चव	वच
,,	११	१	स्कुटाक्षरा	स्फुटाक्षरा
३१४	३५	२	पर्वत दरींत	पर्वतदरींत
३१६	४७	१	काढुन	काढून
,,	५४	२	तत्तनयाची	तत्तनयांची
३१९	८०	१	कतिक	कितिक
३२४	१३५	२	घोरं	घोर
३२५	१३८	२	अम्हा	अम्हां
३२६	१५४	२	मिसळुनी	मिसळुनि
३२९	१७८	२	जाउन	जाऊन
,,	टीप	४	वाल्मिकीनें	वाल्मीकीनें
३३५	आ.२३७	२	सत्वर सा	सत्वरसा
,,	२४१	२	हेक्तर सन्निध	हेक्तरसान्निध
३३६	२४७	२	ग्रीक त्रोजन संघा	ग्रीकत्रोजनसंघा
३३९	२८१	२	पडला'	पडला,
३४१	२९९	१	सुलभ कोप	सुलभकोप
३४२	३१३	२	समरातुन	समरांतुन

पृष्ट	आ.	ओळ	अशुद्ध	शुद्ध
३४३	३१९	१	ईलीअनास	ईलीअनांस
३४६	३५०	१	गोधूम प्रचुर	गोधूमप्रचुर
३४७	३६७	२	बोध वचन	बोधवचन
३४९	३८८	१	आम्हा	आम्हां
३५१	७	२	नद्यास	नद्यांस
३५२	९	१	सरिद्विमल	सरित् विमल
३५४	३७	१	सूतांचें	सूतांचे
३५६	५१	१	यूकालिअन तनय	यूकालिअनतनय
३५७	६०	१	ओरीस्टिस	ओरीस्टीस
३५८	७९	१	किरुनी	चिरुनी
३६०	९२	२	जनास	जनांस
३६३	टीप	१८	गृहस्थास जसें	जसें गृहस्थास
३६५	आ.१३८	२	द्राक्षलता मंडप	द्राक्षलतामंडप
,,	१४१	२	चुकविता	चुकवितां
३६७	१५१	२	घोर तर	घोरतर
,,	१५६	१	आजक्ष द्वय	आजक्षद्वय
,,	१५९	१	कलहात	कलहांत
,,	१६०	२	त्यूसर	त्यूसर
३६९	१७२	१	,,	,,
,,	१७८	१	,,	,,
३७०	१८३	१	सकळ	सकल
३७२	२०३	२	त्या	त्यां
३७४	११	२	कनक कशा	कनककशा

पृष्ठ	आ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
३७६	३३	२	समरात	समरांत
३७७	३९	१	भूच्या	भ्रूच्या
३८१	८१	२	त्यूसर	त्यूसर
३८३	९४	२	शूल चतुर	शूलचतुर
,,	९८	१	आन्द्रीमन सुत	आन्द्रीमनसुत
,,	९८	१	इतोलिअनास	इतोलिअनांस
,,	,,	२	प्ल्यूरनिं	प्ल्यूरनिं
,,	१०१	२	आलस्य प्रेमें	आलस्यप्रेमें
३८७	१४३	१	त्यूसर	त्यूसर
३९५	२२०	२	सर्वजण	सर्व जन
३९७	२४१	२	झाला	झाली
,,	२४४	२	सहचर संघामाजी	सहचरसंघामाजी
३९९	२५७	१	क्षितिं	क्षिति
,,	२६०	२	शल	शूल
४०३	३०१	२	पैलीमेनिसज	पैलीमेनीसज
,,	३०६	२	बहु मोल	बहुमोल
,,	टीप	२	स्मशान यात्रा	स्मशानयात्रा
४०५आ.	३२५	२	हेक्तर गति	हेक्तरगति
४०७	३४०	१	तयापशीं	तयांपशीं
४०८	३४९	१	कुणा तर	कुणा तें
४११	३८२	१	भूपृष्टीं	भूपृष्ठीं
४१२	३८८	१	अरिसेना व्यूह	अरिसेनाव्यूह
४१४	सारांश	७	व्हीनस जवळून	व्हीनसजवळून

पृष्ठ	आ.	ओळ	अशुद्ध	शुद्ध
४१४	३	१	जे	जो
४१५	१४	१	ते	जे
४१६	१४	२	त्यांत	त्यांतची
४१८	४१	१	पलायन रे ”	पलायन रे
”	४१	२	रे !	रे ! ”
४२०	५७	१	प्ह्यूरनिं	प्ल्यूरनिं
”	५८	२	निर्वासन दुःख	निर्वासनदुःख
४२१	६५	१	रण विन्मुख	रणाविन्मुख
४२१	७१	२	दुरुन	दुरुन ”
”	७३	२	संग्राम कलह	संग्रामकलह
४२३	८६	२	बंदानी	बंदांनीं
४२३	८७	२	त्रिरत्न जडित	त्रिरत्नजडित
४२४	९६	१	तेव्हा मी येतां	तेव्हां मी येतां
४२४	१०१	१	चित्राग	चित्रांग
४२७	१२८	१	स्पर्शी	स्पर्शीं
४२७	१३०	१	धवल करा	धवलकरा
४२८	१४३	१	त्यांचें	त्यांचे
४२८	१४३	२	आलिंगन विधि	आलिंगनविधि
४२९	१५०	२	फिनिक्स	फीनिक्स
४३०	१५७	१	आणि	आणी
”	१५८	२	शयन मंदिरांत	शयनमंदिरांत
४३१	१६५	१	गार्गेरस शिखरावर	गार्गेरसशिखरावर
४३१	१६५	२	निद्रा प्रेमाभिभूत	निद्राप्रेमाभिभूत
४३२	१६९	२	वीरास	वीरांस

पृष्ठ	आ.	ओळ	अशुद्ध	शुद्ध
४३४	२००	२	रण पश्चाद्भागीं	रणपश्चाद्भागीं
४३५	टीप	३	त्यांसि	त्यांसीं
४३७	२२२	१	वंशिंजन्म	वांशिं जन्म
४३८	२४०	१	प्रोमाकस भार्या	प्रोमाकसभार्या
४३९	२४६	२	त्यूसर हस्तें	त्यूसरहस्तें
४४०	१	१	खंदकतर	खंदक तर
४४१	५	२	य	या
४४२	२१	१	सुख भाजां	सुखभाजां
४४५	४८	१	धवल करा	धवलकरा
४४५	५३	२	मध्यें वसुनि	वसुनि
४४६	५८	१	मासल	मांसल
,,	६०	१	जोव्ह वज्रानें	जोव्हवज्रानें
४४७	६७	१	धवल करा	धवलकरा
४४८	७१	२	ज्या	ज्यां
४५३	१११	१	धरावगुण्ठकजलधिंत	धरावगुण्ठक जलधिंत
४५५	१३७	१	एकुन	ऐकुन
४५६	१४०	१	आंद्रीमन तनय	आंन्द्रीमनतनय
,,	१४३	२	सकला	सकलां
,,	१४५	१	अता	अतां
४५८	१६९	१	यास	या
४५९	१७३	१	सोडुन	सोडून
४६२	२०७	२	संग्राम कलह	संग्रामकलह
४६४	२२३	२	सिथीरा निवास	सिथीरानिवास
,,	२२७	१	पैसीनार सुताला	पैसीनारसुताला

पृष्ठ	आ.	ओळ	अशुद्ध	शुद्ध
४६९	२८४	१	अन्योन्या	अन्योन्यां
४७६	३५३	२	यांच्या	याच्या
,,	३५७	२	पृष्ठभागाचे	पृष्ठभागाचें
४८०	११	२	शूल कुशल हि	शूलकुशलहि
,,	१३	२	निष्ठुर हृदया	निष्ठुरहृदया
४८१	२१	१	उतावळि	उतावीळ
४८५	६३	२	चढवुनि	चढवुनी
,,	६७	१	ऐसें	ऐसे
४८७	७८	२	पळता	पळतां
८८७	८८	१	कैलाससुतेला	कैलासजेस
४९१	१२५	१	करित	करीत
४९२	१३३	२	सकल	सकळ
४९३	१४२	२	झांकुनयां	झांकुन यां
४९८	१९९	१	लाब	लांब
४९९	२०३	२	दामास्तर सुत	दामास्तरसुत
,,	२०६	१	विगलित परिकर	विगलितपरिकर
५००	२१४	१	काळजींत	काळजिंत
,,	२१५	२	मीनीशिअसज हस्तें	मीनीशिअसजहस्तें
,,	२१६	१	विशाल नयना	विशालनयना
,,	२२२	१	मीनीशिअस सुता	मीनीशिअससुता
५०२	२३८	२	उदात्त दर्शन	उदात्तदर्शन
,,	२४२	१	लिसिअन मुख्यांस	लिसिअनमुख्यांस
,,	२४२	२	तया	तयां
५०३	२५२	२	मजवरिं	मजवरि
५०४	२५७	२	क्षत रुधिर	क्षतरुधिर
,,	२६३	२	लिसिअन नृप	लिसिअननृप

पृष्ठ	मूळ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
५०६	२८३	२	इत्यांदिस	इत्यादिंस
५१०	३१६	१	पत्रोकुश निधनकार्य	पत्रोकुशनिधनकार्य
५१३	३४१	२	तो	तों
५१९	४०८	१	अश्वारोह कुशल	अश्वारोहकुशल
५२४	३१	१	पर्वत पुष्ट	पर्वतपुष्ट
५२६	५१	२	आम्हीं	आम्हिं
५३०	८६	१	ग्रीकासह	ग्रीकांसह
५३३	१२५	१	वाटे	वाहे
५३५	१४०	१	वीरांच्या	वीराच्या
५३६	१४८	२	हिप्पाथोअस रक्षण	हिप्पोथोअसरक्षण
५३७	१६६	१	याहून	याहुन
५४४	२३६	२	अता	अतां
५४६	२५४	१	मार्स तुल्य	मार्सतुल्य
५४८	२७३	१	तियेतें	तियेचें
५५१	३०२	१	त्या	त्यां
”	३०३	१	शोधुन	शोधून
५५२	३१	१	जोव्ह प्रसाद	“ जोव्हप्रसाद
५५५	३४७	२	तयावरी	तयांवरी
५६१	३७	१	गाजी	गांजी
५६६	८१	१	आलिप्पसावरोनी	आलिम्पसावरोनी
”	८२	१	त्यानें	त्यातें
५६९	११६	२	पॅन्थस सुत	पॅन्थससुत
५७५	१७५	१	रजताघ्रि	रजतांघ्रि
५८१	२३३	२	मृगाचा	मृगांचा
५८२	२४१	२	संभ्यांहीं	सभ्यांहीं
५८४	२६०	२	हांकिती	टाकिती

पृष्ठ	आ.	ओळ	अशुद्ध	शुद्ध
५९२	२५	१	दार्तीं	दांतीं
५९८	८८	१	एक	ऐक
६०६	१६७	१	हिमशलका	हिमशलाका
६१७	६३	१	जरि	जरी
६२५	१२८	२	आंतिल	आंतील
६२६	१३९	२	शिरकवचा वर	शिरकवचावर
६३४	२२७	२	दोघा	दोघां
६३९	५	१	उज्ज्वल	उज्ज्वल
६४०	२१	२	जेसन तनयें	जेसनतनयें
६४८	९२	१	जोव्हजा सह	जोव्हजासह
६५०	१०४	१	पाहुनियां	पाहुनि
६६१	२०९	१	धरित्री वरतीं	धरित्रीवरतीं
६६२	२२८	२	साधें	साधे
६६३	२३६	२	अधिक बलाशीं	अधिकबलाशीं
६६६	२६५	२	त्यास	त्यांस
,,	२६७	२	आजिनार तनया	अन्तिनारतनया
६६८	२८५	२	त्रोजन नगरी	त्रोजननगरी
६७१	९	१	तुझ्या	तूझ्या
६७२	२२	२	जाईल	जाइल
,,	२३	२	त्रोजनपुरांत	त्रोजन पुरांत
६८०	१०१	२	हें न	होंहि
६८७	१६५	१	शलाचा	शूलाचा
६९६	२३९	२	पडता	पडतां
,,	२४७	२	क्षेत्रें	शेतें
७०६	६७	१	दोघा	दोघां
७०७	७७	१	रणातुनी	रणांतुनी
७०८	९४	२	दहन कार्यासीं	दहनकार्यासीं

पृष्ठ	आ.	ओळ	अशुद्ध	शुद्ध
७२२	२३७	२	तया	तयां
७२५	२७१	१	इढशफ	द्दढशफ
७२८	२९९	१	धरी	धरीं
,,	३०१	१	तुझ्या	तूझ्या
७३९	४१६	२	त्यातें	त्यांतें
७४१	४३३	२	फेंकीं	फेंकी
७४२	४५०	२	करिं	करि
७४३	४५५	१	अंगणि	अंगणिं
७४४	४५६	१	वृषमोल	वृष मोल
७४६	१२	२	हे	हें
,,	१४	१	आणि	आणी
७५०	४७	२	निघता	निघतां
७५५	१०८	२	चपल पदांना	चपलपदांना
७५७	११६	१	ह्मणुन	ह्मणून
७५८	१२२	२	मुखात	मुखांत
७५९	१३४	२	ह्मणून	ह्मणुन
,,	१३६	२	शोभन चक्र रथाला	शोभनचक्ररथाला
,,	१३८	१	खेंचराचें	खेंचरांचें
७६२	१६५	१	तयांना	तयां
,,	१६५	२	रथिं	रथीं
७६४	१९१	२	परिसवृध्द	परिस वृध्द
७७०	२४९	१	तेव्हा	तेव्हां
७७५	३०३	२	लोकाना	लोकांना
७८२	३८६	१	वदे, जरि	वदे जरि,
,,	,,	१	ताता सम	तातासम

यां शिवाय कान्हा, मात्रा, अनुस्वार यां संबंधीं व इतर अशुध्दें राहिलीं असतील.